ऐतिहासिक लेखसंग्रह

भाग ३-४

ऐतिहासिक लेख संग्रह

स. १७७३

दादासाहेब व गंगाबाई यांच्या कारकीर्दी.

या प्रकरणांत जीं पत्रें यावयाचीं आहेत त्यांतील कथेचा सारांश पुस्तकाच्या चौथ्या भागाच्या अखेरीस दिला आहे. परंतु तो भाग ...न बहुत दिवस झाले यामुळें बहुतेक वाचकांस त्याचें विस्मरण झालें ...ल व या पुस्तकाचे जे नवीन वाचक असतील त्यानीं तो मुळींच ...चला नसेल. याकरितां तो पुनः येथें संक्षेपानें देत आहों.

ता० ३० आगष्ट.

नारायणराव साहेबांचा खून झाल्याबरोबर गारद्यानीं दादासाहेबांची द्वाही फिरविली. सरदार व मुत्सद्दी यानीं ही ती गोष्ट निरुपायामुळें कबूल केली. त्या व दुसरे दिवशीं सखाराम बापू, नाना व मोरोबा फडणीस, त्रिंबकराव मामा वगैरे मुत्सद्दी, शिवाय पाटणकर, घाटगे, घोरपडे, निंबाळकर वगैरे सरदार, आणि इंग्रजांचा वकील मिस्तर मोस्तीन व दुसऱ्या परराज्यांच्या तर्फे पुण्यास असलेले वकील हे सर्व श्रीमंत दादासाहेबांस भेटून त्यांचा धनीपणा कबूल करिते झाले. नंतर राज्यकारभारास सुरुवात झाली. पहिलें काम गारद्यांस वाड्यांतून बाहेर काढण्याचें. त्या गारद्यांस खून झाल्याबरोबर श्रीमंतानीं कंठ्या, शिरपेंच ... लाख रुपये बक्षीस ह्मणून दिलेच होते. पण आतां ते गारदी पूर्वी करार ठरल्या प्रमाणें पांच लक्ष रुपये व साष्टी, पुरंदर आणि नगर हे तीन किल्ले इतकें मिळाल्याशिवाय वाडा सोडीनात. यांपैकीं किल्ले देण्याचें श्रीमंतानीं नाकारिलें तेव्हां ते गारदी बिथरून बसले आणि नारायणरावांप्रमाणें दादासाहेबांसही मारून टाकून मस्तानीचा नातू अल्लीबहादर यास आपण गादीवर बसविणार असें बोलूं लागले! शेवटीं भवानराव प्रतिनिधीनें त्या गारद्यांची समजूत पाडिली व ते ठरल्याप्रमाणें रोख पांच लक्ष व तीन किल्ल्यांबद्दल आणखी तीन लक्ष रुपये पदरांत घेऊन व आपल्या जिवास दगा होणार नाहीं याबद्दल दादासाहेबांपासून जामीन घेऊन वाड्यांतून बाहेर पडले. गारद्यांची अरेरावी वगैरे हा सर्व नाटकी प्रकार होता. आंतून दादासाहेबांचें मन त्या गारद्यांवर सुप्रसन्न होतें व या पुढें सुमेरसिंग, खरकसिंग

महमद इसब व तुळ्या पवार हे चौघे मुख्य मारेकरी श्रीमंतांजवळ विश्वासु सेवक ह्मणून रहात होते.

आजपर्यंत दादासाहेबांच्या पक्षाची मंडळी अज्ञातवासांत दि काढीत होती ती आतां सर्व त्यांच्या भोंवती जमली. बहुतेक सरदार त्यांच्याच घरांतला एक एक प्रतिस्पर्धी दादासाहेबांच्या बाजूचा होता. सर्व त्यांचा अभ्युदय होण्याची वाट पहात होते. फत्तेसिंग गायकवाडास गोविंदराव, नागपुरच्या साबाजी भोंसल्यास मुधोजी, भगवंतराव प्रतिनिधीस भवानराव, हे प्रतिस्पर्धी असून ते आतां त्या त्या सरदाऱ्या मागूं लागले. हैदरअल्लीची आजपर्यंत दादासाहेबांस आंतून फूस होती त्यासही आतां आपला बराच फायदा होईल असें वाटलें. शिवाय चिंतो विठ्ठल, सखाराम हरि, बाजीराव बर्वे, विठ्ठल विश्राम, गंगाधर यशवंत चंद्रचूड, पानाजी फांकडे इत्यादि दादासाहेबांचे प्रसिद्ध अनुयायी होते त्यांचीं नांवें किती लिहावीं? कोणास कांहीं, कोणास कांहीं, असें वरील मंडळीपैकीं प्रत्येकास श्रीमंतानीं देऊ केलें. चिंतो विठ्ठलास त्यानीं दिवाणगिरी दिली. पण जमाबंदीचा कारभार त्यानें नानाफडणिसाचे मतानें व इतर सर्व कारभार सखारामबापूस विचारून करीत जावा असा निर्बंध केला. पण ही दिवाणगिरी नांवाची मात्र होती. श्रीमंत दिवाणाच्या सल्ल्यानें मुळींच चालत नसून प्रत्येक कामांत पाहिजे तशी ढवळाढवळ करीत. यामुळें कारभारांत फारच घोटाळा होऊं लागला. या योगानें पूर्वीं सखारामबापू कारभारी होते तेव्हां त्यानीं केलेल्या कित्येक कामांत घालमेल झाली व तेणें करून त्यांचें मन खट्टू झालें.

धन्याच्या घरांत दुफळी ठेवावी व दोहोंवरही आपली छाप ठेवून आपलें वजन राखावें ही सखारामबापूची आजपर्यंतच्या वागणुकीची तऱ्हा होती तिला दादासाहेबांचें राज्य निर्वेध होऊन दुफळी नाहींशी झाल्यामुळे आतां अवकाशच राहिला नाहीं. पण हें त्यांस कोठून पुरवणार? आतां ही

यांस फार दिवस लाधलीं नाहींत, तेव्हां वस्त्रें घेतलीं असतां आपली हा तीच दशा होईल अशी त्यांस भीति पडली. पण त्यां-

१० अक्टोबर पेक्षां त्यांच्या अर्धांगीचें मन अधिक घट्ट होतें व पुत्र होण्याची तिची आशा खुंटली नव्हती. यामुळें तिनें पूर्वीचा बेत तहकूब करवून श्रीमंतांकडूनच पेशवाईचीं वस्त्रें घेवविलीं.

श्रीमंत स्वारीस निघाले ते फौज जमा करीत सिद्धटेंक, पेडगांव, नरसिंगपूर या गांवांवरून भीमेच्या पाण्यानें चालले. तों इकडे साबाजी भोंसले दहा हजार फौजेसह पैठण व आंबेड या प्रांतीं येऊन लुटालूट करूं लागला व पुण्यावर स्वारी करण्याची त्यानें आवई घातली. त्यामुळें त्याच्या रोंखावर त्रिंबकराव मामा व रास्ते यांस पाठवून श्रीमंत नळदुर्गास गेले. तो किल्ला घेऊन आवसे परगण्यांतून भालकीस आले. तों मोंगलही फौजेची जय्यत तयारी करून बेदरास आला. ती बातमी कळतांच श्रीमंतानीं बेदरास जाऊन मोंगलास गराडा दिला. उभयपक्षीं कांहीं झटापटी झाल्यावर मोंगल हैराण होऊन त्यानें तहाचा संदर्भ लाविला. मग तह ठरला त्यांत वीस लक्षांची जहागीर व औरंगाबाद पेशव्यांस द्यावी असा करार ठरला. परंतु मागून मोंगल श्रीमंतांच्या भेटीस

डिसेंबर. आला तेव्हां त्यानें त्यांस एकांतांत नेऊन त्यांची इतकी कांहीं ओतप्रोत स्तुति केली व इतकें लीनतेचें सोंग आणिलें कीं, 'भोळा सांब' दादासाहेब प्रसन्न होऊन त्यानीं तहांत घेतलेला सर्व मुलूख त्यास बक्षीस केला.

यानंतर गोविंदराव गायकवाड, मुधोजी भोंसले व बाबूजी नाईक यांस परत जाण्यास निरोप देऊन व साबाजी भोंसल्याचें पारिपत्य करण्याच्या कामावर नेमिलेल्या त्रिंबकराव मामाकडे आणखी थोडी फौज पाठवून श्रीमंत दादासाहेब खंडण्या घेत घेत निवृत्ति संगमावर कृष्णा उतरून रायदुर्गच्या रोंखें गेले. तों हैदराचा वकील येऊन खंडणीचा ठराव करून गेला.

\ ादासाहेब व गंगाबाई यांच्या कारकीर्दी.

ंस्य साहाय्य घेऊन अर्काटाकडे स्वारी करण्याचा श्रीमंतांचा इरादा होता. लवकरच त्यांजवळ फौजेचा रोजमुरा देण्याकरितां द्रव्य नाहींसें झाल्यामुळें त्यांनीं माधवरावानीं पूर्वीं जिंकलेल्या तिकडच्या मुलखापैकीं तीन परगणे थोड्याशा रकमेकरितां हैदरास विकून टाकिले!

इकडे श्रीमंत कृष्णापार होण्याच्या सुमारास पुण्यास वाड्याच्या बंदोबस्ताकरितां ह्मणून आनंदीबाईनें पाठविलेल्या गारद्यानीं पार्वतीबाई व गंगाबाई यांस मारण्याचा एलगार केला त्यावरून बारभाईनीं आपला बेत तडीस नेण्याची जलदी केली. नारो आपाजी तुळसीबागवाले यांनीं पुण्याच्या कोतवालास कैद करून शहर ताब्यांत घेतलें. सखारामबापू व नाना फडणीस यांनीं गंगाबाईस पुरंदरावर नेऊन ठेविलें व तिच्या नांवें राज्य कारभार हांकण्यास सुरुवात केली. त्रिंबकराव मामा व साबाजी भोंसले एकत्र झाले. या राजकारणास निजामअल्ली पूर्वींच अनुकूल असल्यामुळें तो ही मामा व भोंसले यांस मिळण्याकरितां येऊं लागला. या बातम्या दादासाहेबांस. कळल्यावर आपल्या लष्करांत ही चोंहोंकडे फितूर आहे असा त्यांस संशय आला. भवानराव प्रतिनिधीस आपली फौज कमी करण्याविषयीं त्यांनीं हुकूम केला असतां तो त्यानें ऐकिला नाहीं. त्यास ताब्यावर आणण्यासाठीं मुरारराव घोरपडे वगैरे सरदारांस आज्ञा केली असतां त्यानीं ती मानिली नाहीं. त्यामुळें श्रीमंतांस क्रोध येऊन प्रतिनिधीवर हल्ला करण्यासाठीं त्यानीं हुजरात व गारदी पाठविले. पण तो मरून जाईन पण हार खाणार नाहीं अशा निग्रहानें लढाईस उभा राहिला तेव्हां हुजरात व, गारदी कच करून मागें सरले. मग श्रीमंतानींच माघार घेऊन प्रतिनिधींशीं समेट केला. इतक्यांत पटवर्धनांचा फितूर उघडकीस आला. तेव्हां पटवर्धन वगैरे जितके फितुरी सरदार आढळले

३० ज्यानेवारी १७७४.

१ फेब्रुवारी.

त्यास सामोपचारानेंच कांहीं तरी निमित्त काढून देशीं जाण्यास [illegible] देऊन दादासाहेब माघारे वळले. परत फिरतांनां त्यानीं हैदराशीं नवीन तह केला त्यांत माधवराव पेशव्यानीं इतक्या मेहनतीनें व पराक्रमानें मिळविलेला कर्नाटकचा सर्व मुलूख त्यानीं हैदरास देऊन टाकिला इतकेंच नव्हे तर स्वराज्यापैकीं कृष्णा व तुंगभद्रा या नद्यांमधील मुलूख ही दिला! रास्ते व पटवर्धन यांच्या जहागिरी स्वराज्याच्या वर लिहिलेल्या टापूंत होत्या ह्मणून त्यांवर सूड उगविण्याकरितां तो अजीबात प्रांतच त्यानीं हैदरास दिला! या तहास कल्याणदुर्गचा तह ह्मणतात. हा मुलूख दिल्याबद्दल दादासाहेब मात्र पेशवाईचे योग्य व खरोखरीचे अधिकारी असून बाकी गंगाबाई किंवा तिचा मुलगा हीं सर्व थोतांडें आहेत असें मी या उपर समजत जाईन व दादासाहेबांस मात्र दरसाल सहा लक्ष रुपये खंडणी देत जाईन, असें हैदरानें कबूल केलें.

नंतर श्रीमंत कृष्णा उतरून रास्त्यांच्या जहागिरींतून लुटालूट व जाळपोळ करीत पंढरपुरास आले. त्यांच्या रोखानें मोंगल,
२६ मार्च साबाजी भोंसले व त्रिंबकराव मामा असे तिहींकडून तिघे चालून येत होते. मामा बरोबर हुजरात व रास्ते व पटवर्धन मिळून पंचवीस हजार फौज होती. मामाच्या फौजेची व दादासाहेबांच्या फौजेची कासेगांव गोपाळपुरावर गांठ पडून लढाई झाली. खुद्द मामा जखमी होऊन पाडाव झाले व दुसरे दिवशीं मरण पावले.

हा जय झाल्यामुळें कारभाऱ्यानीं माजविलेलें बंड मोडेल असें दादासाहेबांस वाटलें. पण तसें कांहीं एक न होतां कारभाऱ्यानीं मामा॰च्या जाग्यावर हरीपंत फडक्यांस पाठविलें. त्यानीं पुनः फौजेचा जम बसविला आणि भोंसले व मोंगल यांस मिळवून घेऊन पुनः
एप्रिल. लढाई देण्याच्या इराद्यानें ते दादासाहेबां समीप येऊन उतरले. या त्रिवर्गांच्या फौजेबरोबर आपला टिकाव लागत नाहींसें पाहून

...साहेब औरंगाबादेकडे चालले. मागून त्रिवर्गांच्या फौजा पाठलाग करीत आल्या. तेव्हां औरंगाबाद सोडून श्रीमंत खानदेशांतून तापीतीरीं ब्ऱ्हाणपुरास गेले. मागून पाठलागाची फौज येत होती तिची निजाम-अल्लीच्या कावेबाजपणामुळें मजल थोडथोडी होत होती. यामुळें त्या दोन्ही फौजांत अंतर फार पडलें.

इकडे ता० १८ एप्रिल इ. स. १७७४ रोजीं गंगाबाई प्रसूत होऊन सवाई माधवराव जन्मास आले. या प्रमाणें पेशवाईस योग्य वारस उत्पन्न झाल्यामुळें आतां दादासाहेबांचा धनीपणा कायमचा नष्ट झाला, व त्यांच्या धामधुमीस बंडाचें स्वरूप प्राप्त झालें. हें बंड मोडण्याचें काम आतां लवकरच सिद्धीस जाईल असा कारभाऱ्यांस भरवसा वाटूं लागला. तो इतका कीं, या सुमारास बाबूजी नाइकामार्फत दादासाहेबानीं त्यांशीं मायावीपणानें समेटाचें बोलणें लाविलें असतां त्यानीं साफ जबाब दिला कीं, श्रीमंतांनीं दोन लक्ष रुपये दरसाल दानधर्मास घेऊन आह्मांजवळ रहावें. तें न पतकरेल तर पाहिजे तिकडे चालतें व्हावें?

नं० १२६१

श्री.

(भाद्रपद वद्य
सप्तंबर प० पंधरवडा)

सेवेशीं विज्ञापना. आपण पत्रें पाठविलीं तीं पावोन लिहिला मजकूर कळला व जिवाजी माळी याजबरोबर चिठी पाठविली ती काल संध्याकाळीं पावोन मजकूर कळला. येथून जाहलें वर्तमान व अलीकडील वरचेवर लिहितच आहों. सारांश आपली फौज जमा सत्वर व्हावी. तरतूद आधीं करावी. इकडील प्रकार ' सर्कार नामक ' यास कारभार करावा (असें श्रीमंत) ह्मणतात. नित्य वाड्यांत बलावितात. कारभार करीत नाहीं असें [सखाराम बापू] तोंडानें ह्मणतात; परंतु आंतून राजकारण आहे जे, महिना दोन महिने जाऊन येऊन कारभार करावा. कां कीं, लौकिकांत वाईट होईल कीं, " त्यांची गत तशी झाली आणि कारभारी कारभार यांजवळ करूं लागले, तेव्हां राजकारणांत होते; " असें होईल. यासाठीं ह्मणतात जे ' बोलावाल तेव्हां येऊं. पुसाल तें सांगों. चिंतो विठ्ठल शहाणे आहेत. त्याणींच कारभार करावा ' असें ह्मणतात. चिंतो विठ्ठल जालें वर्तमान यांचे घरास जाऊन सांगतात (व सखाराम बापू सांगतील) त्याप्रमाणें कारभार करितात. आबाजी महादेव ही काल आले. शिष्ये सवारों जमा झाले आहेत. वरचेवरी येतच आहेत. मामलती विल्हेस लावावयास सांगितल्या. चिंतो विठ्ठल याणीं व नाना फडणीस याणीं एकविचारें करून मामलतीचा कारभार करावा. याचें कारण चिकार नामक माहीत झाल्यावर नानास आंत घेणार नाहीं असें दिसतें. नानानीं होय न ह्मणावें तर अब्रू राहिली पाहिजे यास्तव बोलावूं पाठवितात तेव्हां जातात. सांगतात तें मान्य करितात! राजश्री मोरोबा दादास नित्य एकवेळां बोलावितात. त्यांशींही

१ शिवाजी बाबाजीचें वामनरावास. २ सखारामबापू.

(श्रीमंत) खलबत करितात. (त्यांजवर) ममता बरीच दिसत्ये पण विश्वास पुरत नाहीं! आह्मांविशीं दादाच थोरल्यांजवळ बोलिले. त्याचें उत्तर झालें कीं फौज सारी जमा करावी. आहेत तेथेंच रहावें. आज्ञा होईल त्याप्रमाणें वर्तणूक करावी असें ह्मणतात. दादा वरचेवरी निखालसतेचा प्रकार करावयाच्या योजनेंत आहेत. आमची कारस्थानी चालेल तेथवर करीत आहों असें ह्मणतात. जितके मातबर आहेत तितक्यांचे घराचे आसपास दोन तीन प्रमाणें जासूद ठेविले आहेत. बातम्या वरचेघरी ठेवितात. कोण कोणाचे घरास जातो अशी बातमी ठेवितात. याजकरितां दादानीं सांगितलें कीं, घरास येत व जाणें. सांगून पाठवूं. तुह्मीं वर्तमान सांगून पाठविणें अथवा चिठ्ठी पाठवीत जाणें. असें सांगितलें आहे. नानाच्या वाड्यांत जात असतों. उभयतांच्या विचारें येईल तसें करितों. सकारनामकाच्या घरास जात असतों. मामाच्या घरास जातों. चिंतो विठ्ठल याच्या घरास जाण्याचा राबता अतःपर घालितों! साऱ्यांचेंच दैव फिरलें काय करावें! रास्ते यांजकडे कुवारी व दुसरा किल्ला आहे तो व बागलकोट सोडून देणें असें ह्मणणार. आंतून राजकारण होत आहे. रास्ते यांजवर आमच्या पेक्षां कटाक्ष अधिक आहे. (श्रीमंत) कोणास काय ह्मणतील, कोणाचें काय घेतील, हा भरंवसा नाहीं. रास्ते यांजकडील समजावीस लोकांची घरीं होत असते सहजांत करोलास (त्यानीं) दारू दिली. त्याजवरून सुमेरसिंग याणीं (श्रीमंतांस) समजाविलें कीं, " (रास्त्यानीं) दारू वांटली. दंगा करणार. अगोदरच आज्ञा झाली तरी हल्ला करून लुटितों. " तेव्हां बोलिले कीं, मर्नास आणून आज्ञा करूं. हें वर्तमान त्यांचे घरीं कळतांच ते सकारनामकाकडे गेले. चिकार नामकाकडे जाऊन ' लटकें वर्तमान '

---

१ दादासाहेबांजवळ. २ नाना व मोरोबा यांच्या. ३ बंदुकवाल्या स्वारांस. ४ चौकशी करून

असें केलें. आपण येथें नव्हतां ही मोठी गोष्ट झाली. नाहीं तर भल तेंच समजाऊन पेंच तूर्तच घालितें. दूर आहां. होणार ते होऊ परंतु दूर आहां. गोविंदराव गायकवाड यांस तीन हजार फौज ठेवावयास सांगितली. व सदाशिव रामचंद्र दोन हजार, बाजीराव बर्वे हजार, येणें प्रमाणें सांगितलें आहे. वरचेवरी मायेचे आहेत त्यांस सांगतात. विठ्ठल विश्राम यांस ही सांगणार. हुजरात सात हजार आणविली. पागा आणविल्या. हुजूर पागा हरीपंत भिडे यांस दिली. वर साऱ्या पागांची मखलासी देखरेख नरसिंगराव उद्धव यांस सांगितली. फौजेचा कारभार सखाराम हरी व मल्हबा[१] व बाजीपंत अण्णा या त्रिवर्गांस सांगितला आहे. वरकड मुत्सद्दी यांस गोड बोलतात. कृष्णराव[२] याजवर इतराजी दिसत्ये. राजश्री बाबूजी नाईक वानवडीसच राहिले. कृष्णराव याचे रदबदलींत ते आहेत. नरसिंगराव धायगुडे यांस सांगितलें कीं " लाख रुपये देणें. नाहीं तरी सरंजाम सोडून गुदस्तांचा हिशेब देणें. " तेव्हां पैक्याचा पैका देऊन सरंजाम सोडावा (असें होऊन) त्यानीं रदबदली करून पावणा लक्षावर ठराव करून घेतला. फौज जमा करा ह्मणून (त्यांस श्रीमंतांनीं) सांगितलें आहे. गाडदी औरंगाबादेहून सहा हजार आणविले होते. मागती पत्र पाठविलें. जहानखान पहिला तोफखान्याकडील होता त्यास लिहिलें कीं हजार गाड्यांसुद्धां येणें, असें ही पत्र गेलें आहे. सरंजामापैकीं कोणाची चौथाई घ्यावी, कोणाचा निम्मे घ्यावा, असें तोंडानें ह्मणतात. सदाशिव रामचंद्र रदबदली करून आह्मांकडील सरंजाम आपणास द्यावा असें ह्मणतात. ' साराच बंदोबस्त करणें आहे ' (असें) थोरले ह्मणतात! सरंजामी[३] रदबदली करितात कीं " चाकरी हुजूर करूं. त्यांच्या[४] निसबतीस चाकरी होत नाहीं. असें ह्मणतात "

१ मल्हारराव पानशे. २ काळे बारामतीकर. ३ पटवर्धनांचे पोटसरंजामदार. ४ पटवर्धनांच्या.

(असें) दादास सांगितलें. मनास आणितों ह्मणून त्यानीं सांगितलें आहे. इकडील सविस्तर राजश्री नारोपंत नाना सांगतील त्यावरून कळेल. ऐवज सरकारचा द्यावयाचा राहिला होता त्याची तरतूद केली तों (ही) गडबड झाली. जिकडील तिकडे तसाच राहिला. मागतील तेव्हां द्यावाच लागेल. चार दिवस गडबड आहे तों द्यावयाचा नाहीं. तसाच प्रकार ह्मणतील तेव्हां द्यावाच लागेल. हे विज्ञापना.

नं० १२६२ श्री. [१४ सपटंबर]

सेवेशीं शिवाजी बावाजी व रामाजी गणेश साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल तागायत भाद्रपद कृष्ण त्रयोदशी भोमवासरे प्रातःकाळ. वर्तमान यथास्थित असे. विशेष. इकडील वर्तमान तर वाड्यांत गाडदी पांच सातशें चौक्यांनीं व सदरेस व दिवाणखान्यांत देखील तेच होते. त्यांच्या देण्या घेण्याचा फडशा झालाच होता. जिवास जामीन दिल्याखेरीज निघत नव्हते. शेवटीं जामीन दरम्यान देऊन व बेलभांडार देऊन झाडून गाडदी बाहेर निघाले. तेव्हां शहर जरा स्वस्थ झालें. [श्रीमंत] सात आठ हजार गाडदी ठेवणार आहेत. राजश्री भवानराव यांस प्रतिनिधी[2] देणार. जास्ती सरंजाम देणार. सदाशिव रामचंद्र व राजश्री बाबूजी नाईक व बाजीराव बर्वे, विठ्ठल विश्राम वगैरे मिळून पंधरा हजार फौजेचे सरदार नवे करणार. त्यांस सरंजाम पाहिजे त्यास सकार नामकाचे मतें कोणापासून चवथाई घ्यावी, कोणापासून तिजाई घ्यावी, कांहीं सरकारांतून द्यावें. आणि भरती करावी, असें सहजांत बोलतात. राजश्री चिंतो विठ्ठल कारभार कारितात. नित्य वाका सकार नामकास समजावितात. तेथून पुढें कर्तव्याचा विचार [सखारामबापू] सांगतात

१ पद वामनरावास. २ प्रतिनिधींचें पद.

खुनानंतरची हकीगत.

त्या प्रमाणें करितात [जिवास] समाधान नाहीं ह्मणून घरींच असतात. (श्रीमंत) बलावितात तेव्हां दरबारास येतात. खलबत होत असतें. कारभाराच्या तोडजोडी सांगतात. कारभार करावा असें श्रीमंत ह्मणतात. आह्मांस कारभाराचें अगत्य नाहीं. चहूं दिवशीं आठ दिवसीं बोलावाल तेव्हां येऊं. पुसाल त्यांत कळेल तसा मनसबा सांगों. कारभारच करा ह्मणत असल्यास शागीर्द जवळ न ठेवावे, त्यांस असाम्या देऊन जागां जागां पाठवावें, त्यांचें ऐकत न जावें, गाडदी दोन हजारांवर न ठेवावे, तर कारभार करूं. या प्रमाणें चिकार[1]नामकाची रदबदली लागली आहे. कारभार सकार[2] नामकाकडे होतो. गुंता नाहीं. आह्मीं त्याजकडे जात असतों. आह्मांशीं माया ममतेनें बोलतो, परंतु मायावी बोलणें आहे! रास्ते यांजवर (श्रीमंतांचा) रागच होता. 'किल्ले द्यावे बागलकोट द्यावा.' असें ह्मणत होते. त्याणीं सकार नामकाकडे येरझारा घालून व रात्रौ चिकार नामकाकडे जाऊन त्यास दिलें घेतलें असावेंसें वाटतें. उभयतानीं श्रीमंतांजवळ सुधारून बोलून चालून करारांत आणून बेलभांडार परस्परें झाला जे, " तुह्मांकडे कोट किल्ले सरंजाम आहे तो करार असे. तुह्मीं इमानें इतबारें चाकरी करावी. नानासाहेब कृपा करून चालवीत होते त्या प्रमाणें चालविलें जाईल." याप्रमाणें बेलभंडार जाहला. त्या समयीं श्रीमंत व सकार नामक व चिकार नामक व रास्ते इतकेच होते. या प्रकारचें रास्ते यांजकडील वर्तमान. आह्मांकडील (वर्तमान तर) प्रथम दिवशींच राजश्री मोरोबा दादा बोलिले कीं, (जसे) आह्मीं दोघे[3]. (तसें) तिसरे ते[4]. त्यांविशीं वचन असावें. तेव्हां (श्रीमंत) बोलिले कीं, गुंता तिलमात्र नाहीं. कोट किल्ल्यांचा प्रकार साऱ्यांचा होईल त्या प्रमाणें त्यांचा. असें संकलित

१ चिंतो विठ्ठलाची. २ सखारामबापूकडे. ३ मी व नाना. ४ पटवर्धन.

बोलणें जाहलें. त्याजवर नित्य दादांचें त्यांचें बोलणें होतच आलें. त्याजवर (श्रीमंत) बोलूं लागले कीं "त्यांस पत्र घ्यावें व तुह्मी ही पत्र पाठवावें. आणि त्यांस एक खाशास आणवावें ह्मणजे त्यासीं बोलून चालून त्यांची खातरजमा करून त्याजपासून खातरजमा करून घेऊं. यास्तव सत्वर आणवावें" ह्मणून आज्ञा झाली. त्या अन्वयें सरकारचें पत्र व उभयतांचीं पत्रें व राजश्री सखारामपंताचें पत्र निमित्यास येणें प्रमाणें घेऊन पाठविलीं आहेत. सरकारचें पत्र व उभयतांच्या पत्रावरूनच भरंवसा बलविल्यावर आल्या खेरीज गत्यंतर नाहीं. श्रीमंत राजश्री भाऊसाहेबानीं यावें अथवा आबानीं यावें. त्यास उभयतांचे विचारें आबानींच यावें.' ह्मणजे याचा अर्थ काय (तर,) आबा खाशांत जमा. चांगला जाबसाल दिसेल तसा करून वचन देतील. त्यांचें वचन घेतील. कडोविकडीचा जाबसाल पडल्यास 'सरदार आहेत त्यांस लिहून पाठवितों. उत्तर आलें ह्मणजे विनंती करूं.' असें ही पाहिजे. आबांचे शरीरीं समाधान नसेल हें प्रमाणच. परंतु ते आल्याखेरीज तोड पडणार नाहीं. केवळ सरदारांचीच गांठ पडूं नये. दोन पालख्यांचे भोई एक पालखीस लावावे आणि हलकी पालखी चालवीत असा बंदोबस्त करावा, आणि प्रतिपदेस रवाना करावी, हा उत्तम प्रकार. शरीर प्रकृत ठीक नसल्यास नच येववे त्यापक्षीं श्रीमंत राजश्री भाऊसाहेबानीं यावें. सहस्र प्रकारें आबानींच यावें. येथें फार दिवस लागणार नाहींत. वचनाचे जाबसाल आठ दिवसांत उलगडून जावयास येईल. सेवेशी श्रुत होय हे विज्ञापना.

---

१ श्रीमंत मोरोबा दादास बोलले कीं, वामनरावाकडे पाठविण्याकरितां तुह्मीं आह्मांकडून पत्र लिहून घ्यावें. २ तुह्मी [वामनरावानीं] ३ नाना व मोरोबा फडणीस यांचे.

नं० १२६३ श्री. (सपटंबर)

सांष्टांग नमस्कार विनंती येथील क्षेम भाद्रपद शु० १९ बुधवार दर जागा पुणें जाणून आपणा कडील क्षेम लिहून चित्त प्रमोदवीत असलें पाहिजे. विशेष. श्रीमंत राजश्री नारायणराव पेशवे यांस श्रीमंत राजश्री दादासाहेब याणीं आपण कैदेंत असतां बहुत कांहीं श्रमी केलें तें मनांत ठेऊन गाडदी तमाम फोडून छ० ११ जमादिलाखरीं सोमवारीं दिवसा दोन प्रहरच्या घटका उपरांतिक भोजन करून आपण आराम करीत बसले होते ते समयीं गाडदी लोक हजरीस ह्मणून तयार होऊन आले होते. एकास एक कजीया करून वाड्यांत शिरले. एकदांच हजार बाराशें गाडदी जमा आंत झालें. या शिवाय बाहेर पांच सात हजार जमा होते. आंत गेले ते लोक देवघर आदीकरून भरून गेलें. श्रीमंत रावसाहेबांकडे गेले. हें वर्तमान श्रीमंतांचे शागीर्द पांच चार जवळ होते. (त्यानीं) हें वर्तमान सांगितलें जे, दादासाहेबांचे गाडदी वाड्यांत शिरले. दंगा झाला. ह्मणतांच खाशानीं हातचा निमचा घेऊन दादासाहेबांकडे गेले. दादासाहेब नाटकशाळेंत होते तेथेंच जाऊन गांठलें. रूबरू बोलिले जे 'तुमचे गाडदी वाड्यांत शिरले. तुम्हीं आपला जीव सांभाळणें.' म्हणून तरवार उपसली. दादासाहेब यांनीं मिठी घालून हात धरितांच

---

१ पत्र कोणी कोणास लिहिलें आहे हें कळत नाहीं. आमचा तर्क असा आहे कीं, नरगुंदकर भास्करराव याचा प्रतिस्पर्धी बळवंतराव याच्या कारभाऱ्यास हें पत्र बळवंतराव याच्याच कोणी कारकुनानें लिहिलें असावें. नरगुंद संस्थान माजी पेशव्यानीं भास्कररावास दिलें होतें तें आपणास मिळावें ह्मणून बळवंतरावाची खटपट होती आणि दादासाहेबांस पेशवाई मिळालीं तर आपलें काम होईल असें त्यास वाटत होतें. हैदरअलीकडे ही त्याचें सूत्र होतें. पटवर्धन हे भास्कररावाचे मित्र असल्यामुळें हें व या पुढचें आपाजीराम यानें गोपाळराव नांवाच्या कोणा इसमास पाठविलेलें अशीं दोन्हीं पत्रें वाटेंत धरलेलीं असावीं.

काकुळतीस आले. ' जीव वांचविणें. ' इतक्यांत गाडदी यांणीं पाठलाग करून वार केला ते समयीं दादासाहेब याणीं पोटाशीं घेतलें. परंतु गाडदी कहेंत न राहतां पाय धरून ओढून कचाकच वार केले. तेथेंच मुडदा पडला त्या गडबडेंत दादासाहेबांस कपाळावर व डावे हातावर दोन जखमा लागल्या. मागतीं सभोंवते गाडदी जमा होऊन दादासाहेबांचीं द्वाही फिरविली. शाहाजणें वाजलीं. हे गडबड होतांच बाहेरील मुत्सद्दी घाबरे झाले. शेवटीं बापु व बजाबा पुरंधरे आदी करून मुख्य मुख्यांस चोपदार पाठवून [दादासाहेबानीं] बोलावून नेलें. तमाम बंदोबस्ती करणेस चिंतो विठ्ठल यांस सांगितलें. त्यानीं अंगीकार केला. राजश्री बापू तो सर्वत्रांस वडील दाखवण्यास (मात्र) केलें आहेत. शव तीन प्रहर रात्रीस दहा पांच ब्राम्हण व मशाल बरोबर देऊन दहन करविलें. दिवस उगवे तों तमाम मुत्सद्दी वाड्यांतच होते. दहा पंधरा ब्राम्हण मारिले गेले व शागीर्द ही नेले. पहांटेचे वेळेस एक चोपदार पाठवून सरदार बोलावून भेटून त्यांची समजूत करून आपला बंदोबस्त करीतच आहेत. वाड्याचे दरवाजे अद्याप खुले नाहींत. गाडदी तमाम भरले आहेत. पुरता बंदोबस्त जाहल्यावर [वाड्यांतून] काढितील. काल मंगळवारी तिसरे प्रहरीं श्रीमंत राजश्री दादासाहेब याणीं आपाजीराम[1] यांस बोलावण्यावर बोलावणीं पाठवून भेटतांना तमाम मुत्सद्दी कारभारी लोक होते तितक्यांत आपण विटाळाचा ह्मणून अवघ्यांपेक्षां जवळ बोलावून बोलिले जे " आह्मांकरितां तुह्मीं फार श्रमी झाला, परंतु क्रिया सोडली नाहीं. करार केला. बरें. चिंता नाहीं. इत:पर तुमचें उर्जित फार करूं. तुमचे धण्याचें ही बहुतच उर्जित करूं. बहुता दिवसांचा त्यांचा आमचा ऋणानुबंध आहे. त्यांचा मुद्दा जो आहे तो करूं. तुह्मीं जलद ज्या प्रमा-

---

१ हा हैदराचा वकील.

सर्व राजकीय स्थिति बदलावी हें त्यांच्या मनांत येऊं लागलें. श्रीमंतांच्या मूर्खपणामुळें मुत्सद्दी व सरदार लौकरच त्यांस नाराज होतील व त्या योगानें हें सर्व पारडें आपणास फिरवितां येईल असा त्यानीं अजमास बांधिला. आपण नारायणरावसाहेबांचे दिवाण असून व माधवरावानीं मरतेवेळीं त्यांचा हात आपल्या हातांत घातला असून ही त्यांचा खून झाला ही गोष्ट बापूंच्या मनास फारच लागली. त्यांस कैदेंत ठेवून दादासाहेबांनीं गादी· वर बसावें ह्मणून आरंभीं जो कट झाला होता तिकडे सखारामबापूनीं कानाडोळा केला असला तर असेल. पण मारण्याच्या कटांत ते नव्हते हें अगदीं निर्विवाद आहे.

पटवर्धनांवर पूर्वीपासून दादासाहेबांचा रोष असे व तेही त्यांशीं आजपर्यंत बांकूनच वागत असत. सांप्रत कर्नाटकचे स्वारी निमित्त त्यांची फौज मिरजेस जमा होत होती त्यामुळें श्रीमंतांस त्यांविषयीं शंका उत्पन्न झाली. परंतु तिचें निराकरण नाना फडणविसानीं केलें. त्यानीं श्रीमंतांस विनंती केली कीं, ते आपणाशीं इमानानें वागतील याबद्दल हमी मी घेतों. आपणही माझे मार्फत त्यांस आण भाक देऊन त्यांचे मनांत किंतु असेल तो दूर करावा. तेव्हां श्रीमंतानीं सांगितलें कीं त्यानीं थोडके लोकांनिशीं भेटीस यावें ह्मणजे समक्षच त्यांची

१० अक्टोबर. खातरजमा करून देऊं. त्याप्रमाणें परशुरामभाऊ पांचशें स्वारांनिशीं पुण्यास येऊन नानांचे मार्फतीनें श्रीमंतांस भेटले व उभयपक्षीं बाह्यात्कारें निखालसपणाचीं बोलणीं झालीं.

भाऊ पुण्याच्या आसपास असतां त्यानीं तेथील स्थितीची बारीक रीतीनें चौकशी केली तेव्हां नारायणरावसाहेबांची स्त्री गंगाबाई गरोदर असून तिचा गर्भपात करवावा, तें न होईल तर तिचा जीव घ्यावा, या मसलतींत आनंदीबाई असल्याची त्यांस बातमी कळली. गंगाबाईचा कसें तरी करून बचाव करावा असें त्यांच्या मनांत आलें. तिला मिरजेस पळ·

वून न्यावी अशीही एकदां मसलत त्यानीं केली होती पण ती त्यांच्या जव-ळच्या लोकांपैकीं कोणाच्याही मनास आली नाहीं. भाऊ प्रमाणेंच पुण्यांतील थोर थोर मुत्सद्यांस गंगाबाईबद्दल वाईट वाटत असून तिचें संरक्षण कसें व्हावें या विवंचनेंत ते पडले होते. त्या प्रसंगीं सखारामबापूनीं पुढाकार घेऊन सर्वांची एकवाक्यता करून मसलत ठरविली

अक्टोबर.

कीं दादासाहेबांस पदच्युत करून गंगाबाईच्या नांवें आपण व नाना फडणीस मिळून अनुक्रमें मुख्य व दुय्यम कारभारी या नात्यानें कारभार चालवावा. बाईस मुलगा झाला तर ठीकच आहे. न होईल तर तिला दत्तक देऊन त्याला गादीवर बसवावें. पूर्वीं दादासाहेबांचे प्रसिद्ध अनुयायी ह्मणून जे या लेखांत सांगितले आहेत त्यांखेरीज बहुतेक मुत्सद्दी व सरदार या मसलतींत मिळाले व ती पार पाडण्याकरितां दादासाहेब पुणें सोडून दूर जाण्याची संधी पहात बसले. ती संधी ही त्यांस लवकरच मिळाली.

मुधोजीचा अभिमान धरल्यामुळें साबाजीचें पारिपत्य करणें श्रीमंतांस अगत्याचें वाटलें. पण तो साबाजी मोंगलाच्या पाठीशीं पडल्यामुळें मोंगलास वठणीस आणल्याशिवाय साबाजीचें पारिपत्य कसें होणार? तेव्हां आतां प्रथम मोंगल व साबाजी यांचें शासन करावें, नंतर हैदरअल्लीवर स्वारी करून त्यापासून खंडणी घ्यावी. नंतर अर्काटप्रांतीं जाऊन महमद अल्ली व इंग्रज यां पासून ही खंडणी घ्यावी अशी श्रीमंतानीं मसलत योजिली.

पेशवाईचीं वस्त्रें आपण न घेतां तीं आपला दत्तक पुत्र अमृतराव याच्या नांवें घ्यावीं असा प्रथम त्यांचा बेत होता. अशी योजना करण्यास ते कारण ह्मणून जें सांगत त्यावरून ते किती मूर्ख होते व तो दुर्बळ छत्रपति त्यांच्या किती अवहेलनेस पात्र झाला होता हें चांगलें कळतें. तें कारण कोणचें तर, वस्त्रें देणारा 'राजा अपेशी!' माधवराव व नारायणराव या माजी पेशव्यांस याच राजानें पेशवाईचीं वस्त्रें दिलीं असतां तीं

णें आपल्या धन्यास जें जें लिहिणें असेल तें बेफामीनें[1] लिहिणें. तुमचा मुद्दा काय असेल तो सांगणें " ह्मणतांच राजश्री आपानीं जाब दिला कीं " आह्मीं सेवक उभय पक्षींचे असों एका संस्थानचें[2] एका संस्थानास येणें विहितच आहे. अशा मध्यें एकाचे ह्मणविल्यावर एकास दुःख वाटतें. आपणा करितां श्रमी झालों ह्मणून आज्ञा केलीत तर आमचा भोग होता! धण्याचा मजकूर आह्मांस येथें कैद करितांच (त्यानीं) फौजा तयार करून मुलखावर पाठविल्या. दोन मजली कूच करून आले. मागती आह्मांस सोडिल्याचें कळतांच, आमचे हातचा कागदही जाऊन पावला तेव्हां, फौजा आपणाकडे महकूब केल्या आणि दुर्गावर पाठविल्या आहेत. त्याचें पारिपत्य करून सावनूरकराकडे येणार. या प्रमाणें पत्रें आलीं. त्या दोघांचें पारिपत्य करणें निश्चय. ते ही हेंच इच्छीत होते त्या प्रमाणें मनोगत त्यांचें ही सिद्धीस गेलें! " ह्मणून कित्येक ममतेच्या गोष्टी फार कांहीं बोलिले. त्यांस[3] फार कांहीं संतोष होऊन बोलूं लागले जे " जखम फार दुखत आहे. शेकावी लागते. आह्मीं तुम्हांस जे क्षणीं बोलावूं ते क्षणीं येत जाणें " ह्मणून सांगून उठले. राजश्रीबरोबर आम्हीं गेलों होतों. ही सारी गोष्ट आम्हां देखत झाली. इतकियावर राजश्रीचें ऊर्जित फारच होईल असें दिसतें. सर्वत्र यांचेच हितचिंतक आहेत. धण्यासीं यांचा जागा झाला आहे. अशा प्रसंगीं आपण तेथील मजकूर ज्या प्रमाणें पाहिजे त्या प्रमाणें यजमानांस सांगून कबूल करून येथील बंदोबस्ती जें जें होणें आहे तें काम हातीं घेऊन लिहून पाठवावें. ह्मणजे जे जे आपले मनोभाव आहेत ते सर्व घडून येतील. समय यावांचून दुसरा नाहीं. त्याचा तपशील किती ह्मणून लिहावा! येथील प्रकाशक[4] देखील घाबरला आहे. यासी फार कांहीं गडबड

---

१ निर्भयपणें. २ चित्रदुर्ग संस्थानिकावर. ३ दादासाहेबांस. ४ प्रकाशक ह्मणजे भानु. नाना फडणिसांचें उपनांव भानु.

करावयास चुकत नाहीं. राजश्रींनीं सर्व आशा टाकून आपले क्रियेस लक्ष ठेऊन तुमचें ऊर्जित चिंतीत आहेत. तेथील बंदोबस्ती करून येथील मजकूर व दक्षणेचें वर्तमान जे आपली मर्जी आहे त्याप्रमाणें घडोन देतील. हे समयीं हरएक गोष्टीची जीद न करितां यजमानास हातीं घेऊन काम चालीस लावणें. सर्वत्रांचें ऊर्जीत करणें या मध्यें इह पर दोन्ही आहेत. फल काल परित्याग न करणें. तेथील काम हाताखालीं घेतल्यास सर्व घडून येईल. [1]खालीं घरीं बसून बंदोबस्त होणें ती गोष्ट निराळीच आहे! जे गृहस्थ तुह्मांकरितां झोंबत आहेत त्यासीं बेजार न करणें. राजश्री रवि[2]नामक ही बहुत कांहीं गोड बोली बोलतात. राजश्री आकार नामक बोलतात जे या प्रमाणें शेवट पावेतों आह्मीं वाट पाहतों. परंतु राजश्रीस करावयाची उमेद दिसत नाहीं. आह्मीं होऊन कोठपावेतों वाट पहावी? असें ह्मणतात. घडी घडी राजश्री आह्मांशीं बोलतात जे, आमची शर्त किती आहे तितकी सर्व देणें घेणें तमाम आशा सोडून गृहस्थांचे अभिमानाकरितां सोडिलें. परंतु प्रांत दिसत नाहीं. या प्रमाणें आह्मीं सोडिलें ह्मणजे उभयपक्षीं काम जाईल. खराब ही होईल. ह्मणून बहुत कांहीं बोलत जातो. त्यास आह्मी जें जें समाधान करावें ते करितों. परंतु आपण मात्र आळस न करितां तेथें धण्याची मर्जी कशी आहे तसें कबूल करून काम घेणें. दोन्ही कडील बंदोबस्त ज्या रीतीनें पाहिजे त्या रीतीनें होऊन येईल. हे काबू दुसरे समयीं येणार नाहीं. आतां झालें तरी राजश्री रविनामक यांस हातीं ध्यावें ह्मणून किती खुशामत करितो. परंतु आह्मीं जवळ आणोन गांठ पडों देत नाहीं. क्षण क्षणीं समाधान करीत जातों. इतके श्रम केल्यास सार्थक करावें. त्याहीवर पेशजी राजश्री आकाराकडून त्यांचे यजमानास पत्र लिहून पाठविलें. भाव पेशजी

---

१ रिकामे. २ रविनामक कोण? भानु नव्हत असें वाटतें.

तपशीलवार आपणास कळविला होता. त्याचा भाव राजश्रीस परवाना आला. व जिन्नस (पत्रच त्यांनीं) दाखविलें. त्यांत लिहिले भाव— दुर्गकरावर फौजा तोफा पाठविल्या आहेत. तिकडून वकील ही आला आहे. गोष्ट उरकतांच सावनूरकराचें काम काबू. ती सूचना लिहिली आहे ह्मणून लिहिलें आहे. व जिन्नस पत्र दाखविलें आहे त्याची अमदानी झाल्यावर कोणास ही आटोपणार नाहीं. भारी मनसबा पडेल. या गोष्टीचें निदर्शन लिहिले प्रमाणें आलें कीं नाहीं तें पाहणें. शेवट पावेतों परीक्षा न करणें. येथील आशा सोडणें ह्मणून धन्यास सांगणें. येथील मजकूर कित्येक लिहिणेस येतें, एक न येतें! एक भोंसले माजले आहेत. हिंदुस्थान खवळलें आहे. मोंगल खवळले आहेत. याप्रमाणें वर्तमान आहे. अशा प्रसंगीं तुह्मांस कोण विचारतो? व्यर्थ दौलत न बुडविणें. शेवटीं माधवरायास हें वर्तमान मसलत सांगून त्यांस कोणत्या रीतीनें सांगावें तें सांगून अपकीर्ति न घेणें. तुह्मीं बेफाम असणें ह्मणून क्रिया देऊन एक होऊन काम काढणें. मागून जें जें मनास येईल तें करणें. येथून राजश्री रविनामकाचा ही कागद करवून परभारें पाठवितों. तुमचें नांव कांहीं सांगत नाहीं. घरोब्यामध्यें दौलतेस क्षेम होय तें काम करणें ह्मणून सांगतों. ते ही समजत आहेत. येथील बोलणें जैसा प्रसंग पडेल त्या प्रमाणें बोलतों. तुमचें नांव परिछिन्न घेत नाहीं. समाधान असों देणें. तपशील किती लिहावा! घोडें एक घेणें लागेल. खर्चास मात्र पाहिजे. समयावर पैसा मिळणार नाहीं. देवाजीस जलद पाठविणें. तपशीलवार वर्तमान लिहूं. हे विनंती. राजश्री व्यंकटरावजीस साष्टांग नमस्कार. कृपा पूर्ण असली पाहिजे. एखादें अक्षर नडलें असलें तरी सुधारून पाहणें. चिरंजीव वेंकं यास आशीर्वाद. क्षेमरूप असों हे आशीर्वाद. एखादें अक्षर चुकलें असलें तरी उत्तम प्रकारें पाहून समजून घेणें दुसऱ्यानें पहावयास अवकाश पडला नाहीं. हे विनंती.

राजश्री आपांची भेट दादासाहेबांस जाहली याचा उत्साह पाहतां राजश्रींचें ऊर्जित फारच होईल असें दिसतें. आपण मात्र माणसास पाठवावयास आळस न करणें. शुद्ध चतुर्दशीस कागद लिहिला तो ही पाठविला आहे.

नं० १२६४ श्री. (२ सपटंबर)

राजश्री गोपाळराव स्वामीस—

सेवक आपाजीराम नमस्कार विनंती. भाद्रपद बहुल प्रतिपदा बुधवार प्रात:काल. आतां अजुरदार याजजवळ आजी लखोटा लिहून पाठविला आहे तर आज पासून पांचवे दिवशीं रविवारीं सायंकाळ पर्यंत तुह्मांजवळ पावेल ह्मणून करार करून पाठविला असे. तर लिहिले करारास पावले वर भारी पैका देणें केलें असे. पावलियाची वेळ दिवस लिहून तथ्य पाठविणें. कळावें. श्रीमंत राजश्री दादासाहेब छ० १२ जमादिलाखरीं सोमवारीं दोन प्रहरा दौलतीस बसले. श्रीमंत नारायणराव कलागतींत मारले गेले. दोन प्रहर रात्रीस परवां अग्नि दिला. एकछत्री राज्य झालें. श्रीमंत थोर सरदार आहेत. बनुरास हें पत्र पावतेक्षणीं अर्जी आंचीवरं[१] रवाना करणें. क्षणभर विलंब न करणें. आधीं रवाना करून आंचीवर देणें. कोटी पत्राचें पत्र[२] जाणावें. हे विनंती.

नं० १२६५ श्री. (९ सपटंबर)

श्रीमंत राजश्री मोरोपंत आबा स्वामींचे सेवेशीं.

साष्टांग नमस्कार विनंती तागायत भाद्रपद कृष्ण चतुर्थी मंदवासर.

---

१ ह्मैसुरच्या राज्यांतील डांकेस आंची ह्मणत. २ पत्र शिवाजी पंताचें.

इकडील वर्तमान वरचेवरी आपणांस लिहिलेंच आहे. आपण पत्रें पाठविलीं तीं पावोन लिहिला मजकूर कळला. राजश्री आबाजीराम यास पाठवणें व नागजकराविशींचा मजकूर लिहिला त्यास येथील गडबडेचा प्रकार आहे. मशारनिल्हेस पत्र पावतें केलें. दोन चार दिवसांत येतील. नागजकराविशीं पत्र घेऊन पाठविलें आहे. आम्हीं वाड्यांत नमस्कारास गेलों होतों. " यजमानाकडून आह्मीं येथें आहों. आज्ञा होईल त्या प्रमाणें वर्तणूक करूं." ह्मणून बोलून आलों. आश्विन शु० १ स सप्तऋषीस जावयास (श्रीमंत) निघणार. आह्मांकडील फौजेस यजमानासह सप्तऋषीस बोलावितील असा प्रकार दिसतो. कारभारी याणीं येऊन विनंती केली कीं आपल्याच्यानें कारभार होत नाहीं. आमचें आहे तें चालवावें. राजश्री मोरोबादादानीं[1] कारभार केल्यास संतोष आहे असें ह्मणतात. फडणीस मंडळी दरबारास येत असतात. राजश्री त्रिंबकराव मामा येत असतात. राजश्री बाबूजी नाईक काल वानवडीस येऊन राहिले. भेटीस आले होते. ' लवकर आलां नाहीं ' ह्मणून श्रीमंत बोलिले. त्याणीं उत्तर केलें कीं, " समारंभ होता! पहावयास लौकर यावें त्यास एक दिवस अधिक लागला! काय गोष्ट केलीत! " ह्मणून शब्द ठेऊन बोलिले. वानवडीस पुनः जाऊन राहिले. पागेचा कारभार राजश्री नरसिंगराव उद्धव यांस सांगितला. महालकरी यांचें बोलणें चालणें मनास आणून रसदा घेणें ह्मणून राजश्री नाना फडणीस यांस सांगितलें. कमावीसदारांसीं बोलतात. पागा चारणीस गेल्या होत्या त्या आणविल्या. फौजेस फारसें बोलावीत नाहींत. हुजरातीचे शिलेदार वगैरे यांस तमाम सांगतात कीं अडीचेशांचा[2] शेरा करार करून देऊं. त्यांत चांगला व गणतीचे राऊत बाळगावे. वीस रुपये, पंचवीस रुपये,

---

१ सखारामबापू. २ सालिना अडीचशें रुपयांचा.

चाळीस रुपये, रोजमरा नालबंदी मनस्वी, हें पुरवत नाहीं ह्मणून सांगितलें. शिष्ये पाउणशें जमा झालें आहेत. वरचेवरी जमा होतात. त्यांस सांगितलें कीं, ' आतां दहा शागीर्द ठेवणार. वरकडांनीं आपापल्या घरास जावें.' या प्रमाणें सांगितलें. परंतु तसें होणार नाहीं. असाम्या सांगून थांग्या थांग्यानीं लावतील असें दिसतें. राजश्री हरीपंत (फडके) बारामतीकरांबरोबर आले. काल भेटले. " तुमचें काय [ह्मणणें] आहे ती यादी लिहून आणणें. जें देऊं तें ध्यावें. " असें बोलले आहेत परंतु ती गोष्ट राहील. रास्ते यांचे चार पांचशें लोक समजले. पांच सहा दिवस काम तटलें होतें. आतां फिरोन चालीस लागलें आहे. कारभारी यानीं अंगा निराळें टाकलें यांत अर्थ बहुत आहेत. आजच करूं लागल्यास लौकिकांत होईल कीं " मारावयाच्या मंत्रांत होते. आतां कारभार करूं लागले " यास्तव तूर्त अंगानिराळें टाकिलें? पुढें करितील. चिंतो विठ्ठल त्यांचेच आहेत. मकार नामक अगदींच घरीं बसल्यास (सांगणारे) भलतेंच सांगून भलतेंच करितील यास्तव बलाऊं पाठवितात तेव्हां जावें लागतें. जात असतात. खलबत यांसीं फार करितात. बाळाजीपंत ठोसर व दामले यांस बेड्या घातल्या होत्या त्या जामिन घेऊन बेड्या तोडल्या. मारावयाच्या मंत्रांत बहुत होते, परंतु मोठे अग्रेसर सुमेरसिंग. व तुळाजी पवार. या दोघांनी (पेशव्यानीं) थोरल्यांच्या अंगास मिठी घातली असतां ओढून (अंगावर) वार टाकिले व पांच सात वारांनी पुरा केला. ' वांचावेणें ' ह्मणून फारच ग्लान (त्यानीं) केली परंतु (यानीं) न ऐकिलें ! थोडीशी पुतळी कराचलीची सुमेरसिंगाच्या हातची थोरल्यांस लागली आहे. फौजेची समजाविस निकडीनें करून जमा करावी. सदाशिव रामचंद्र याची चलती तूर्त आहे. विठ्ठल विश्राम याची रदबदल त्याणीं केली कीं, " आपला मार्ग लक्षांत बसले त्यांस सरंजाम दिला पाहिजे. " तेव्हां (श्रीमंत त्यास) बोलिले कीं,

" तुम्हांकडे काय होतें, फौज किती होती, त्याची यादी लिहून घेऊन येणें " त्याजवरून यादी लिहिली आहे. " किल्ले निहाय वगैरे तालुका आपणाकडे होता तो नीलकंठराव[1] यांस दिला आहे तो आम्हांस द्यावा असें ह्मणतात. बालभाषा आहेत! हैदरखान यास पंचवीस हजार रुपयांचें जवाहीर व हत्ती वस्त्रें पाठविणार, राजश्री मुधोजी भोंसले यांस बलाऊं पाठविणार, असा मनसबा आहे. ज्यास संतोष ते संतोषेंकरूनच दरबारास जात असतात. ज्यांस असंतोष त्यांस बलाऊं पाठविल्यास न जावें तर इलाज नाहीं, चौकी घरीं पाठवितील. यास्तव जातात! कळावें सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

न० १२६६ श्री. (आश्विन शु० तृतीया १९ सपटंबर.)

सेवेशीं शिवाजी बाबाजी साष्टांग नमस्कार येथील कुशल तागायत छ० २९ जमादिलाखरचीं पत्रें पाठविलीं तीं छ० २९ मिनहूस पावोन सविस्तर मजकूर कळला. तेथें आज्ञा जे " चित्रदुर्गकरापासून हैदरखान यानीं दोन लाख होन घेतले. आतां हरपनहळ्ळी व सावनूर वगैरे तालुक्यांत गडबड करील. सरकार तालुके गडबडले. व कित्तूराचा पैका तिसालां येणें तो विना तिकडे आमची फौज गेल्या खेरीज पैका येत नाहीं. तालुक्याचा बचाव होणें नाहीं. याज करितां तिकडे फौजसुद्धां जावयाची आज्ञा झाल्यास उत्तम आहे. मकारनामक व नकारनामक यांचे विचारें कर्तव्य तें करावें विशेष झटूं नये. पुण्यांत फौज किती जमा आहे! भोंसले किती फौजे निशीं येणार! सप्तऋषीस कधीं जाणार! आह्मांकडील नालबंदी बहुतकरून झाली. आतां लोक जमा होतील. [तेथें] गाड-

१ नीलकंठराव पटवर्धन कुरुंदवाडकर. २ पत्र वामनरावास.

दी किती आहेत! पुढें किती ठेवणार! कारभारी मुख्यत्वें कोण आहे! हें सविस्तर लिहावें. " ह्मणून आज्ञा, ऐशियास चित्रदुर्गकरापासून (हैदरानें) जिवापेक्षां पैका फार घेतला. वरकड संस्थानांस व सरकार तालुक्यांस उपद्रव लागले हें प्रमाण. तिकडे फौज गेल्यानें बचाव होऊन कित्तूराचा पैका उगवेल हें प्रमाण. परंतु एकजण खासा कोणी येऊन समक्ष बोलून चालून खातरजमा करून घेतल्याखेरीज फौजेचें पुसूं नये हें उभयतांचे[1] मतें ठरलें, याजकरितां न पुसिलें. श्रीमंत राजश्री आबा अथवा भाऊसाहेब उभतांतील एकजण निघाले असतील. निघाले नसल्यास सत्वर रवानगी करावी. कोणतो ही गोष्ट उभयतांच्या विचाराखेरीज करीत नाहीं. ' झटू नये ' ह्मणून आज्ञा तसेंच करितों. झालें वर्तमान उभयतांस[2] निवेदन करितो. हे सांगतात त्या प्रमाणें करितों भोंसले[3] यांस दोन तीन हजार फौजेनिशीं भेटीस बोलाविलें असतां बारा पंधरा हजार फौजेनिशीं निघालें. येतात. फार फौजेची आवई ऐकून शहरानें धास्त खाल्ली आहे. वकि· लास श्रीमंत रागें भरले कीं दोन हजार फौजेनिशीं बलाविलें असतां मातबर फौजेनिशीं यावयास प्रयोजन काय? तेव्हां बोलिलें कीं लिहून पाठवितों. परंतु ते मातबर फौजेशिवाय येत नाहींत. ' आपली फौज अत:पर जमा होईल ' ह्मणून (लिहिलें) तर निकडीनें जमा करावी. दिवसगत आ- तां न लागे तें केलें पाहिजे. भोंसले जालनापुरच्या पलीकडे आले, पुढें येतात. पुण्यांत फौज दोन हजार आहे. आठ हजार फौजेची यादी लिहून बोलाऊं पाठविलें आहे. तीनशें अडीचशें रुपयांचा शेरा करावा, जितके दिवस चाकरी होईल तितके दिवसांचें कबज करावें, त्यांत एकांडे देखील बाळगावे, असें ह्मणतात. येणें करून फौजेचा जय फारसा

---

१ नाना फडणीस व मोरोबा यांच्या मतें. २ नाना व मोरोबा फडणीस यांस. ३ मुधोजी भोंसले.

पडतां दिसत नाहीं. आहेत ते कबूल करीत नाहींत. भरणेवाईक[1] कबूल करितात. फौजेच्या बोली चालीचा अखत्यार राजश्री सखाराम हरीवर आहे. राजश्री मलवा[2] ही उगीच जवळ असतात. तोडजोड सखाराम हरी करितात. गाडदी शहरांत आहेत. सारे गाडदी पांच हजार ठेवणार त्यापैकीं दोन हजार आहेतच. आणखी तीन हजार ठेवणार आहेत. कारभार चिंतो विठ्ठल व आबाजी महादेव करितात. सूत्रधारी[3] यांच्या आधारावर करितात. (सखारामबापू) अगत्याचा जाबसाल असतो त्याजविशीं श्रीमंतांस सांगून पाठवितात. आपण दोन रोजानीं चार रोजानीं येऊन खलबत करून जातात. तूर्तच कारभार करूं लागावें तर लौकिक वाईट. याजकरितां मास पक्ष असेंच करावें, पुढें कारभार करावा, असें ठरेल यांत संशय नाहीं. नरगुंदवासी यांचा मजकूर लिहिला तो कळला. आपल्या पत्रा पूर्वींच वर्तमान बळवंतराव यांच्या कारकुनानीं उठविलेंच होतें. आह्मीं लटकें ह्मणत होतों. आपल्या पत्रावरून खरेंसें झालें. होणारास इलाज नाहीं. आतां तिकडील पत्र आपल्यास येईल. तिकडे गडबड नाहीं, निभावणी पडेल, असें राजश्री काळाप्पाचें[4] पत्र आलें तरी यादी लिहावयासीं येईल. तीन लक्ष पंधरा हजार रुपये नक्त, सालमजकुरीं चाकरी नाहीं, असें ठरलें होतें. यादी लिहावी तों हें वर्तमान येतांच तसाच मजकूर राहिला. आतां राजश्री बळवंतराव याजकडील कारकून मनस्वी बेरीज बोलतात. ते जमावसह नवलगुंदास आले, पुढें गडबड करणार, असें ही वर्तमान आहे. अशा गडबडेंत गडबड करण्यास चुकणार नाहीं. राजश्री सदाशिव रामचंद्र बरवे व विठ्ठल विश्राम यांस फौज ठेवावयास सांगितल्याचा भाव पेशजी लिहिलाच आहे. सदाशिव रामचंद्र यांस अमदाबाद देणार आहेत. राजश्री

---

१ भरणेवाईक—कसल्या तरी स्वारांचा पथकांत भरती करणारे सरदार. २ मलवा पानशे. ३ सूत्रधारी सखारामबापू. ४ काळो भैरव पेठे (नरगुंदचे कारभारी)

बाबोजी नाईक यांस खास पागेस व जातीस मिळून पावणा लक्षाचा सरंजाम बावडें व इंदापुरचे गांव सोनी वगैरे मिळून भरती करून देणार. (बाबूजी नाईक) भोसें घेणार होते तें राहिलेसें झालें. सरंजाम पांच हजार फौजेचा दिला तर घेणार. कमी घेत नाहीं. दोन हजार फौजेचा देऊं (असें श्रीमंत) ह्मणतात. परंतु तें यांच्या खातरेस येत नाहीं. तूर्त असें आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

पै।। छ० ९ रज्जब.

न० १२६७ श्री. (आश्विन शु० अष्टमी
२३ सपटंबर.)

राजश्री कृष्णाजीपंत[1] आपा गोसावी यांसी.

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्नेहांकित बापूजी शिंदे सुभेदार सरकार शिरें. राम राम. विनंती उपरी. येथील कुशल तागायत छ० ९ रज्जब दीड प्रहर दिवस जाणून स्वकीय कुशळ लेखन करीत असलें पाहिजे. विशेष. पुण्याहून हैदरखानाचे वकिलाची जोडी पट्टणास जात होती ते आमचे चौकीवर सांपडली त्यांचा झाडा घेऊन लखोटे सांपडले ते फोडून पाहिले. त्यांत लिहिलें आहे जे, " हल्लींची काबू फार चांगली साधली असे. तरी फौज पाठवून शिरें, मदगिरी, चेनरायदुर्ग, होसकोटें, बाळापूर, हे तालुके अगोदर क्षण विलंब न करितां हस्तगत करावे. प्रसंग असा येणार नाहीं. " ह्मणून फार फार तऱ्हेनें लिहिलें असे. त्यास हें वर्तमान आपणास कळावें याजकरितां लिहिलें असे. तर या उपर रात्रंदिवस बहुत खबरदार राहणें. शें पन्नास माणूस प्रसंग

[1] कृष्णाजी अनंत हा पटवर्धनांच्या जहागिरींतला परगणा दोड्डबाळापूर उर्फ थोरलें बाळापूर येथील कमावीसदार.

दिसून येईल त्या सारखें नवें ठेवावें. बंदोबस्त जातीनें रात्रंदिवस पहात जावा. बहुत काय लिहिणें हे विनंती.

पै॥ छ० १९ साबान

नं० १२६८ श्री. (आश्विन शुद्ध अष्टमी ९ सपटंबर)

पै।। छ० ८ रज्जब.

सेवेशीं शिवाजी बाबाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल तागायत छ० ९ रज्जब मुक्काम पुणें वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपण सांडणीस्वारासमागमें छ० ३० जमादिलाखरचें पत्र पाठविलें तें छ० ३ रज्जबीं पावोन सविस्तर मजकूर कळला. उभयतां लेखकांचें[1] पत्र पावतें केलें. श्रीमंतांचें पत्र पावतें केलें. लेखकांच्या पत्राचें उत्तर घेऊन पाठविलें आहे. घ्यावें. राजश्री मोरोबादादास पांच सात दिवस ज्वर येतो. त्यांत ढाळ घेतला, चाळीस पन्नास वेळां ढाळ झाले, तेणें करून फारच वाखा झाला. श्रीमंत समाचारास घरास गेले होते. श्रीमंत सौभाग्यवती आनंदीबाई समाचारास गेली होती. लेखकांवरी कृपा प्रस्तुत बरीच आहे. श्रीमंतांच्या पत्राचें उत्तर [आपणाकडून] आल्याचे पूर्वीं (ते) दोन वेळां नानाजवळ खलबतांत बोलिले कीं, " अद्यापि (पटवर्धनापैकीं) कोणी येत नाहींत हें काय! तुह्मीं त्यांस लिहून पाठवून सत्वर आणवावे. आणखी कितेक ममतेचें बोलणें बोलिले तें कागदीं पत्रीं लिहावें तरी लिहितां नये. सारांश खुलासा मनास आणितां श्रीमंतांची ममता चित्तापासून आहे, दुसरा अर्थ तिलमात्र नाहीं, असें आहे. परंतु आतां

---

१ पत्र वामनरावास. २ नाना व मोरोबा फडणीस यांस तुह्मीं लिहिलेलें.

खुनानंतरची हकीगत.

वर्तमान चवघे चहूं प्रकारचें सांगतात कीं ' ते येत नाहींत. मिरजेस (युद्धाच्या तयारीचें) सामान होत आहे. ' अशीं वर्तमानें उठवितात. आपणास यावयास दिवसगत लागते येणें करून कसें भासेल न कळे. याजकरितां आपण विलंब न लावावा. श्रीमंत राजश्री आबांचें येणें न होय त्यापक्षीं श्रीमंत राजश्री भाऊसाहेबानींच पांचशें स्वारानिशीं यावें. दसऱ्याचे पूर्वीं निघाले नसतीलसें दिसतें. असो. दसऱ्यास निघून लवकर यावें. राजश्री सखारामबापूंचें पत्र पावतें केलें. वाचून पाहून बोलिले कीं " तुह्मांविशीं वचनास गुंतलोंच आहों. येणार त्यानीं सत्वर यावें असें लिहून पाठवावें. " त्यांस श्रीमंतानीं बोलाविलें होतें. खलबत उभयतांचें चार घटका झालें. कारभाराचा डौल त्यांजकडेस पडेलसा दिसतो. शिंद्याकडील कारभारी यासीं [श्रीमंतांची] आणाक्रिया बेलभांडार झाला. होळकराकडील बोलणें राजश्री विसाजी कृष्ण यांस श्रीमंतानीं सांगितलें आहे. परंतु होळकराकडे नारोपंताचीं पत्रें गेलीं आहेत त्याचें उत्तर आ-ल्याखेरीज आण शपथेस गुंतत नाहीं. आपण लिहिल्या अन्वयें गृहस्थाकडे जात असतों. आपण कोणी आल्यावरी सरंजामी हवालीं करितील. सरकारांत पंचमेळ होन व धारवाडी भरावयाचे आहेत. आह्मीं तरतूद केली होती परंतु गडबडेमुळें ऐवज घ्यावयाचा राहिला. ज्याकडे मनास आणिला होता त्याणीं ऐवज लांबविला. आतां ऐवज होनांचा मिळत नाहीं. पंचमेळ पोतें चालीनें तीन रुपयांस झाले. सरकारचा तगादा ऐवजाचा लागला. त्याजवरून आह्मीं उत्तर केलें कीं, सरंजामी यांजकडे ऐवज येणें ते येथें राहिले आहेत. तो खेरीजकरून पंचवीस तीस हजार राहतील तो ऐवज महिन्या पंधरा दिवशीं देऊं ह्मणून सांगितलें, परंतु आ-पण कोणी आल्यावर भरणा करावा लागेल. याजकरितां पंचमेळ होन व धारवाडी बाकी राहिले आहेत ते झाड्यास रुजू पाहून येतांना आणावे.

भास्करराव यांजकडील बोलणें चढीं लागलें आहे. राजश्री बळवंतराव यांजकडील पांच लक्ष ह्मणतात. भास्करराव मृत्यु पावल्याचें कळल्यावर बोलणें चालणेंच नाहीं. तीन लक्षांस झाल्यास विल्हे लावावें असें राजश्री रामचंद्रपंत आपाचे मतें आहे. काळाप्पानीं नरगुंदाहून लिहिलें आहे. झाल्यास खटपट करून पाहतों. वेदभाष्याचें पुस्तक सोय पाहून मागून घेतों. " कोणी येऊन बोलणें झाल्याखेरीज फौजेविशीं विचारावयास ठीक पडत नाहीं. पुसों नये व आह्मीं पुसत नाहीं " ह्मणून उभयतानीं सांगितलें. सारांश सत्वर यावें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं० १२६९ श्री. (आश्विन शुद्ध दशमी
२५ सपटंबर)

सेवेशीं शिवाजी बाबाजी. साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल तागायत छ० ७ रज्जब मंदवासर मुक्काम पुणें वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपण पत्र छ० २ रज्जबचें पाठविलें तें छ० ६ मिनहूस पावोन सविस्तर मजकूर कळला. राजश्री नाईकाचे पत्राचें उत्तर पाहून त्यांस पावतें केलें. ' अद्यापि कोणी येत नाहीं ' ह्मणून श्रीमंतानीं स्मरण केलें व राजश्री नाना फडणीस बहुतच शब्द लावीत होते जे ' श्रीमंतांच्या पहिल्या पत्रास न आल्यास आह्मीं शब्द ठेवणार नाहीं. परंतु आमचें पत्र खातरजमेचें गेलें असतां संशय धरितात! येत नाहींत! आह्मीं लिहूं तें खातरजमा करून घेतल्याशिवाय लिहूं कीं काय! पत्र जातांच आले असते ह्मणजे आमच्या बोलण्यास ठीक पडतें जे, ' पत्र जातांच आले. ' गुंता नाहीं. ' बरें. आतां दसऱ्यास तरी निघून सत्वर यावें हेंच युक्त आहे.

---

१ पत्र वामनरावास.

दादासाहेब स्वारीस निघतात.

राजश्री बापूजी नाईकं[1] याणीं दहा हजार रुपये राजश्री नारोपंत पोंक्षे यांच्या पासून घेतले + ना हकतीकडे आले आहेत राजश्री विसाजी रुपये आणखी घेऊन रद घांटाखालीं वसई वगैरे प्रांतीं इंग्रजानीं उपद्रव करावयाचा मनसबा केला आहे याजकरितां कांहीं फौज व गाडदी सामान देऊन राजश्री मलबा पानसे यांस (श्रीमंत तिकडे) पाठविणार आहेत. वरकड अधिकोत्तर लिहावेंसें नाहीं. सारांश येणार त्यांनीं सत्वर यावें. नाहीं तरी श्रीमंतास संशय वाटेल व मध्यस्थ ही खोटे होतील. आपणास सर्व कळतच आहे. सूचना मात्र लिहिली आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं० १२७० श्री. (२९ सपटंबर)

पै॥ छ० १९ रजब सुरुसन ११७४

सेवेशीं[2] शिवाजी बाबाजी कृतावेक साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल तागायत आश्विन शुद्ध १४ बुधवासर मुक्काम पुणें वर्तमान यथास्थित असे. विशेष. सविस्तर वरचेवर लिहिलेंच आहे. श्रीमंत दसऱ्यास बाहेर निघणार ह्मणून लिहिलेंच होतें. त्या प्रमाणें दसऱ्याचे दिवशीं बीस घटका रात्रौ डेरा दाखल झाले. दोन दिवस बाहेर संगमावर मुक्काम होता. काल त्रयोदशी भौमवारीं कूच करून कोरेगांवास गेले. ग्रहण तेथें करून थेऊरास जाणार. तेथून सिद्धटेंकास जाणार. पंच यात्रा करून सप्तऋषीस जावें असा मनसबा आहे. राजश्री मोरोबादादांचे शरीरीं समाधान नाहीं याजकरितां घरीं राहिले आहेत. राजश्री नाना

---

१ बापूजी नाईक हें सराफाचें नांव. २ पत्र परशुरामभाऊस. + जेथें जागा रिकामी आहे तेथें मूळपत्रांत अक्षरें फाटलीं आहेत.

फडणीस समागमें गेले आहेत. राजश्री सखारामपंत समागमें गेले आहेत. वरकड मुत्सद्दी फार करून समागमें गेले. राजश्री चिंतो विठ्ठल ग्रहण करून जाणार. राजश्री कृष्णराव बल्लाळ उदासच आहेत ते बारामतीस गेले होते. तिकडेच आहेत. राजश्री बाबोजी नाईक बारामतीस गेले. सप्तऋषीस जावयास येतों ह्मणून मान्य करून गेले आहेत. भोंसले व मोंगल एकत्र होऊन बिघाड करावा असें मानस उभयतांचें दिसतें. निजाम अल्लीखान बाहेर निघाले असें वर्तमान आहे. भाऊसाहेब! आपण कोठें आलां? काय वर्तमान? दसऱ्यास निघालां असल्यास नीरेवर आलांच असाल. त्यास बोरच्या (?) घांटानें थेऊरास यावें. आह्मीं येथून निघून थेऊरास येतों. तेथून पुढें जाऊं. आह्मीं पुण्यांतच आहों. आपण थेऊरास यावयाचे सुमारें आह्मीं येतों. चिरंजीव राजश्री *रामाजीपंत साठे* थेऊरास काल गेले. कळावें. दोबे जासूद पाठविले आहेत. एकजण मिरजेस रवाना करावा. एक आह्मांकडे पाठवावा. आपण लिहितील त्याप्रमाणें येऊन पोंचतों. सेवेशी श्रुत होय हे विज्ञापना.

नं० १२७१ श्रीगणराज. (८ अक्टोबर)

पै॥ छ० १४ रज्जब एकादशी ११७४

अपत्यें[1] परशुरामानें साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल तागायत आश्विन कृष्ण सप्तमी गुरुवार. मुक्काम वानवडी. वर्तमान यथास्थित असे. विशेष. नजीक बेलसरें करेच्या मुक्कामावरून पत्र पाठविलें आहे तें पावलेंच असेल. अलीकडील वर्तमान तरी तेथून कूच करून आह्मीं नजीक लोणी येथील मुक्कामास आलों. श्रीमंतांचे चिरंजीव अमृतराव सप्त-

---

१ पत्र परशुरामभाऊचें वामनरावास.

श.१६९९ दादासाहेब व गंगाबाई यांच्या कारकीर्दीं इ. स. १७७३

दादासाहेब स्वारीस निघतात.

ऋषीस जावयास लोणीच्या मुक्कामीं येऊन राहिले होते ह्मणून आह्मीं आळंदीस राहिलों. काल ते कूच करून जेजुरीस गेले. समागमें राजश्री बजाबा व भवानराव आहेत. प्रतिनिधी भकारनामकास देणार. पेशवाईचीं वस्त्रें चिरंजीवासच देववावीं असा मनसबा करून (थोरल्या श्रीमंतानीं) पाठविले आहेत. रविवारीं दशमीस वस्त्रें घ्यावयाचा मुहूर्त पाहिला आहे. आह्मीं काल कूच करून वानवडीस आलों. सडे दोन तीनशें स्वारांनिशीं मोरोबादादाकडे जाऊन भेटी घेतली. बोलणें चालणें झालें. प्रहरभर तेथेंच होतों. सहा घटका रात्रीस तेथून निवून मुक्कामास आलों. पर्जन्य अतीशय. परवां मात्र पर्जन्य पडला नाहीं. काल फारच पडला. पर्जन्यानें मात्र फारच हैराण केलें! मकारनामकास[१] आरोग्य आहे. पण शक्त नाहीं याजकरितां दिपवाळी करून तृतीयेस निघून लष्करास येणार. आह्मीं आल्याचें वर्तमान श्रीमंतांस लिहून पाठविलें होतें त्याचें उत्तर आलें कीं 'त्यांस पाठवून देणें.' त्यास आज कूच करून श्रीमंतांच्या येण्याच्या सुमारें जातों. राजश्री नाना फडणीस जवळ आहेतच. मंदवारीं भेटीस मुहूर्त आहे. नाहीं तर रविवारीं मुहूर्त चांगला आहे त्या दिवशीं भेटी घेऊं. श्रीमंतांचें आज कोरेगांवावरून कूच आहे. थेऊराकडे येऊन तेथून जेजुरी मोरेश्वर करून कुरकुंबावरून सिद्धटेंकास जाणार. भोंसले पैठणास आले आहेत ते पुढें येणार. त्यांच्या भेटी नागतळ्याच्या सुमारें होणार. राजश्री साबाजी भोंसले व रुकनुदौला एक जागाच आहेत. त्यांच्या व मुधोजी[२] भोंसले यांच्या भेटी झाल्या नाहींत. भेटी व्हाव्या असा मनसबा होत होता तों हें वर्तमान[३] झाल्यावर राजश्री मुधोजी भोंसले यांस श्रीमंतांचीं पत्रें 'भेटीस येणें' ह्मणून जातांच त्यांगीं मनसबा इकडे यावयाचा केला. राजश्री साबाजी भोंसले व रुकनुदौला काय मनसबा

---

१ मोरोबादादास. २ मुधोजी. ३ नारायणरावसाहेबांचा खून.

करितील पहावा. निजामअलीखान बाहेर निघाल्याचें वर्तमान आहे. लष्करांत गेल्यावर कागदीं पत्रींचें वर्तमान असेल त्या प्रमाणें लिहून पाठवूं. राजश्री सखारामपंत आदीकरून लहान थोर मुत्सद्दी सारे लष्करांत गेले आहेत. सकार नामक दोन चार दिवसानीं बोलाऊं पाठवितात तेव्हां येतात. पुसतात तो जाबसाल करितात. चिकारनामकावरी कार्यभागा-चा अखत्यार आहे परंतु करितील ह्मणतील तीच गोष्ट शेवटास जाईल असा प्रकार नाहींच. आपल्या चित्तास येईल तसा ही (श्रीमंत दादा-साहेब) कारभार करितात. सकारनामकास कारभार करा ह्मणतात. परंतु आपल्या अखत्यारें चालून आपण कला कारभार (श्रीमंत) शेवटास नेणार नाहींत, आपण करावें एक, ते करितील एक, तेव्हां कारभार कसा चालेल? स्वरूप कसें राहील?" याजकरितां कारभार करीत नाहीं-त. "घरीं रहा ह्मणाल तरी घरीं राहूं. माझें आहे त्याप्रमाणें चालवा-वें. समागमें रहावें ह्मटल्यास राहूं. पुसाल सुचेल तें सांगूं." येणें प्रमाणें ह्मणतात. कारभार नको असा अर्थ नाहीं. परंतु आपण करून तेंच शेवटास जाणार नाहीं याजकरितां नको ह्मणतात. असा प्रकार आहे. लष्करांत गेल्यावरी एक दोन दिवसांत बारीक मोठें सारें वर्तमान कळेल त्या प्रमाणें लिहून पाठवूं. भोंसले येणार त्यापक्षीं आपलें सामान भरंवशाचें असावें. चाकरी चुकरीचा प्रसंग पडेलच. याजकरितां आपले कडील तीनशें पावेतों राऊत सत्वर पाठवावे. आपणाकडील कांहीं व चिरंजीव राजश्री दादाकडील कांहीं ऐसे मिळून सडे सडे पांचशें पावेतों पाठवावे. आह्मीं ही आपल्याकडील खासे खासे आणविले आहेत. जरूर पत्र पाव-तांच लोकांची रवानगी करावी. (श्रीमंतांकडे) गाडदी यांचा भर भारी! सारे सरदार व मातब्बर मुत्सद्दी यांजपासून आणा शपथा घेतात. आह्मांस ही ह्मणतील कीं काय पहावें! बरें! हरिसत्ता प्रमाण! राजश्री आनंदराव

दादासाहेब स्वारीस निघतात.

गोपाळ यांचा काल फडशा एक लाख चाळीस हजार रुपयांवर झाला. तीर्थस्वरूप राजश्री कोन्हेरराव यांची समजाविशीं झाली किंवा कसें झालें तें लिहावें. हरकसें त्यांचा निकाल काढावा आणि समजूत होय तें करावें. आपण आपल्याकडून करावें, मग हरिसत्ता प्रमाण! राजश्री धोंडो दत्तात्रय यांस रजपुतानीं कजिया करून मारिलें. कवीजंग नगरकर यांसीं रात्रीं निजले जागांच मारून गळा कापिला! असा कोणाचा विश्वास नाहींसा झाला आहे. आपण रजपूत व गाडदी लोक यांजवर चौकीचा विश्वास न ठेवावा. भले[1] लोक, कांहीं बाणदार, असे चौकीजवळ असावे. किल्ल्याच्या दरवाजांत शें पन्नास माणसें बारगीर ठेवावे व चिरंजीव तात्याजवळ तसेच चांगलेच असावे. गोविंद हरी सहस्त्रबुद्धे यांस वाटेनें येताना चाकर एक अविंधें[2] मारीत होता. मग भाई वगैरे होते त्यांनीं वांचविला. तो चाकर ही जिवें मारिला. येथें (श्रीमंतांची) गाड्यांवर भक्त फार आहे. ते ही तारखे पारखेच आहेत. श्रीसत्तेनें घडेल तें खरें. आपणास मुहूर्तेंकरून निघावें ह्मणून लिहिलें होतें त्यास निघालां असलां तरी उत्तम. नाहीं तरी लौकर निघावें. दिवसगत करूं नये. चिरंजीव राजश्री बाळास बरोबर बाहेर काढावें. आपण पत्र पाठविलें तें पावलें. तीर्थस्वरूप राजश्री आबाची तुळा झाली, आबा आठ दिवसानीं येतील, ह्मणून लिहिलें तें कळलें. उत्तम आहे. त्यांची शरीर प्रकृत कशी आहे तें लिहावें. विदित होय हे विज्ञापना. चिरंजीव तात्या व बाळा यांसीं आशीर्वाद. आह्मीं सावध आहों. आपण सावध असावें. लोभ करावा. तीर्थस्वरूप राजश्री आबा वडिलांचे सेवेशीं दीजे. राजश्री रामाजीपंत साठे आपले घरास गेले. हे विनंती.

---

१ मराठे शिलेदार. २ मुसलमान.

दादासाहेब स्वारीस निघतात.

नं० १२७२ श्री. (११ अक्टोबर)

अपत्यें परशुरामानें साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल तागायत आश्विन कृष्ण दशमी इंदुवासर मुक्काम नजीक जेजुरी वर्तमान यथास्थित असे. विशेष. वानवडीच्या मुक्कामावरून पत्रें पाठविलीं आहेत तीं पावलीं असतील. अलीकडील वर्तमान तर वानवडीवरून कूच करून थेऊरास आलों. त्या दिवशींच श्रीमंतांचें कूच कोरेगांवाहून होऊन नायगांवास आले. दुसरे दिवशीं कूच झालें ते येथें आले. आह्मीं कूच करून आलों ते डावे बाजूस अंतरानेंच राहिलों. राजेवाडीवरून लष्करचा मार्ग, तेथें मार्गावरच राजश्री सखारामपंत राहिले होते. डेऱ्यावरूनच (सरकारची) स्वारी आली तेव्हां ते बाहेर आले. तेव्हां (आह्मी त्यांस) भेटावेसें झालें. डेऱ्यास जाऊन क्षणभर बसून आलों. शिवाजीपंतास घटकाभर ठेऊन घेऊन बहुत श्रमी होऊन बोलत होते कीं " कैलासवासी रावसाहेबानीं [नारायणराव] आपल्या हातीं दिले असतां आपल्यावरी निमित्त आलें! त्यांची गत त्या प्रकारची झाली. आह्मीं वांचलों! आह्मांस मरण येईल तर बरें! " असें नाना प्रकारें बोलून फारच श्रमी होत होते. मंत्रांत तर होते. परंतु (नारायणराव) जिवानिशीं गेले ही गोष्ट वाईट झाली. (दादासाहेब त्यांस) कैदेंत ठेविते अगर दादासाहेब बाहेर निघून जाते तरी भलता मनसबा करावा, या राजकारणांत असतां मोठी गोष्ट झाली याजकरितां मनापासून श्रमी आहेत. काम कारभार यांजकडे व्हावा ती गोष्ट नाहीं. चिकारनामक कारभार करितात त्यांजवर ही पुरता विश्वास नाहीं. शागीर्द समजावितात तसा चहूंकडून कारभार चालतो. [२]चिकारनामक करितील तेंच होईल असें असतें तरी सकार नामकास संतोष

१ पत्र परशुरामभाऊच वामनरावास. २ भलतीच.

असता. चिकार नामक त्याच्या सूत्राखेरीज नाहीं. तेव्हां ती गोष्ट नाहीं याजकरितां फारच यांगी आहेत. आह्मीं शुक्रवारीं या मुक्कामास आलों. परवां मंदवारीं राजश्री नाना फडणीस यांच्या डेऱ्यास जाऊन भेटी घेतली. बोलणें चालणें झालें. सारें कच्चें पक्कें वर्तमान (त्यांनीं) सांगितलें. त्यांतील मुख्यत्वें भाव जे, राजश्री मोरोबादादा पेशजी दादासाहेबांच्या सोडवण्याचें वेळेस — हे त्यांत होते ते वेळेस — तुह्मांखेरीज आपण नाहीं असें संकेत करून बोलणें झालें होतें ते उपयोगीं पडल्यामुळें आह्मांवरी देखील कृपा फारच करितात ह्मणून (नानानीं) सविस्तर सांगितलें. श्रीमंतांचे भेटीचा मुहूर्त काल रविवारचा होता. श्रीमंतांस नानानीं विनंती केली कीं, [तुह्मांस भेटावयास परशुरामभाऊ] पंचविसांनिशीं येतील. तेव्हां त्यांनीं संशयाचा प्रकार पुसिला. याणीं खातरजमा केली कीं, "दुतर्फा मध्यस्थ आह्मींच आहों. त्यांजविशींचो खातरजमा करितों व आपणाविशींची खातरजमा त्यांजपाशीं करितों." असें झाल्यावर "पंचविसांनिशीं आल्यास काय चिंता आहे" ह्मणून उत्तर झाल्यानंतर आह्मांस भेटीस बोलाविलें. तिसरे प्रहरीं पंचविसांनिशीं भेटीस गेलों. कचेरीच्या डेऱ्यांत भेटी झाल्या. क्षणभर बसलों. सर्वांस विडे दिले. इतक्यांत बोलणें झालें जे, "कधीं निघालां? किती लोक बरोबर आणिले आहेत? वामनराव कधीं येतील? त्यांस लौकर आणावेिणें. तुमची खातरजमा करितों. आतां मायेचे तुह्मींच आहां." ह्मणून बोलिले. आह्मीं उत्तर केलें कीं, "निघून चौदा दिवस झाले. पर्जन्यानें हैराण फार केलें. वामनराव आज्ञेप्रमाणें येतील. लोक आज्ञेप्रमाणें येतील. लोक पांचशें समागमें आणिले आहेत. थोडक्या लोकांनिशीं येणें ह्मणून आज्ञा होती त्या प्रमाणें थोडकेच आणिले. आतां आज्ञा होईल त्याप्रमाणें वर्तणूक

१ लाखलेल.

करूं. स्वामी धणी आहेत. सर्व प्रकारें कृपा करावी. आह्मीं एकनिष्ठेनें सेवा करावी. " ऐसें उत्तर केलें. त्याजवर " बहुत उत्तम. तुमची खातरजमा करितों. तुह्मीं वामनराव यास फौजसुद्धां सत्वर आणावें. " ह्मणून बोलिले. आह्मीं नमस्कार करून डेऱ्यास आलों. आज अथवा उदईक बोलणें चालणें होईल. कारभाराचा प्रकार ह्मणावा तर चिकार नामक करितात परंतु त्यांचे ठायीं पुरता विश्वास नाहीं. पुरता विश्वास लेखकाकडे आहे. त्यांच्या लबाड्या, त्यांचे दोष, नकार नामक यांजजवळ बोलतात. " आजच त्यांचे हातून कामकाज न घ्यावें तरी त्यांस वाईट वाटेल याजकरितां त्याजकडून काम कारभार घेतों. बंदोबस्त पुरता झाल्यावरी त्यांस टाकावें आणि काम कारभार मकार नामकाच्या हातून घ्यावा (असा माझा हेतु आहे.) तुह्मीं अस्मदीयांत आहां. देशस्थांचा मला विश्वास नाहीं. गोहदेस वगैरे जागां जागां मनसब्यास मकलक [?] दिली आहे. " अशा वाईट गोष्टी त्याच्या नकार नामकाजवळ बोलतात. यांच्या नालस्ती, यांचे दुर्गुण चिकार नामकाजवळ बोलत असतील कीं काय कोण जाणे ! खलबतें साऱ्यांशींच करितात. ' सकार ' नामक यास चहूं रोजीं पांच रोजानीं बोलावून आणून दोघांचेंच असें खलबत सहा सहा घटका होत असतें. कोण विश्वासु आणि कोण इतराजीचा हें समजत नाहीं ! कोणाचा पायपोस कोणाचे पायीं नाहीं. सारेच बुडावे असा पाया दिसतो. परिणाम कोणाचा ही नाहीं. " रास्ते यांची मध्यस्थी चिकारनामकाकडून झाली आहे याजकरितां विश्वास त्याचा पुरता नाहीं " असें नकार नामक लेखक याजवळ ह्मणतात. आमची मध्यस्थी लेखकाकडे आहे ह्मणून चिकारनामकाजवळ ह्मणत असतील कीं काय न कळे !

---

१ फडणीस. २ चिंतो विठ्ठलाच्या. ३ नाना फडणीसाजवळ. ४ मोरोबादादाच्या हातून. ५ आमच्या जातीचे. कोकणस्थ.

दादासाहेब स्वारीस निघतात.

' लेखकाकडील मध्यस्थी त्यांची आहे, आह्मांस विश्वास पुरत नाहीं, ' असें ह्मणतील किंवा ' अकृत्रिम लेखकांजवळ आहेत, आणि त्या मंडळीचा विश्वास नाहीं, ' असें ही खरें असेल हें न कळे! असो. येथील प्रकार श्रीमंत कैलासवासी नारायणराव यांची वाट त्या प्रकारें झाली. श्रीमंत मातुश्री गंगाबाईस गर्भ आहे यांत संशय नाहीं. त्यास सौभाग्यवती आनंदीबाई गर्भपात व्हावयाचीं साधनें फारच करितात तीं पत्रीं लिहितां पुरवत नाहींत! गर्भपात न झाल्यास मारावी, ती गोष्ट न झाल्यास पुत्र कदाचित झाल्यास त्यास अपाय करावा, या साधनांत आहेत. इतके श्रीमंतांचे पदरीं वाढविले आहेत. जी गोष्ट झाली त्यास इलाज नाहीं परंतु आतां ही गोष्ट देखत देखत होणार त्याचा बचाव कोणाच्यानें होईनासा झाला!! बचावाची गोष्ट बोलेल तो अवकपेंत येईल असा प्रकार ईश्वरें घडविला आहे! आह्मीं असून व्यर्थ असें झालें आहे! उपाय नाहीं. आपण रविवारीं डेरा दाखल झालांच असाल. या रोखें दोन मजलीचें कूच करावें तों इकडून पत्र पाठवितों त्या प्रमाणें इकडे यावयाचें करावें. पंचयात्रा झाली ह्मणजे मजल दर मजल गंगातीरास भोंसल्याचे भेटीस जाणार. भेटी झाल्यावर मनसबा होणें तो होईल. त्याप्रमाणें जिकडे जाणें तिकडे जातील. शेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

नं० १२७३ **श्रीगणपति** (आश्विन वद्य १०
११ अक्टोबर.

अर्पत्यें परशुरामानें साष्टांग नमस्कार विनंती. ' सकारनामक ' याणीं मनसबा केला एक आणि जाहला एक! इतकें असून आपणावर (श्रीमं-

---

१ परशुरामभाऊचें वामनरावास पत्र.

तांची) भक्त नाहीं. आपल्या जिवाळयाचा कारभार भगवंतराव प्रतिनिधी व फलटणकर यांची घालमेल झाली, अशा लहान मोठ्यांच्या मायेच्या कामकाजास हिसके बसूं लागले, येणें करून यांगी फारच आहेत. याजकरितां राजकारणें करून यांस उलटी द्यावी आणि खूळ माजवावें असें मनसब्यांत चालणे आहेत असें बारकाईनें वर्तमान ऐकिलें आहे. याचा शोध पुरता मनास आणून लिहून पाठवितों. या पत्राचें उत्तर पाठवाल त्यास " पत्र पाठविलें तें पावले. मजकूर कळला. " इतकेंच पत्र पाठवावें. नगारखाना समागमें न घ्यावा. किल्ल्यांत लोक ठेवावयाचे ते ठेऊन बंदोबस्त उत्तम प्रकारें करून दोन मजली कूच करून विम्यांच्या सुमारें यावें तों पत्रें पाठवितों त्या प्रमाणें यावें. भोंसल्याच्या भेटी झाल्याखेरीज आह्मांस कित्तूर अदवानीकडे जावयास निरोप देणार नाहींत. बोलून पाहतों. श्रीमंतांचे चिरंजीव सप्तऋषीस गेले आहेत. मार्गानें जवाहिराचा डबा गमावला. वस्त्रें चिरंजीवास देववावीं असा मनसबा होता ती गोष्ट राहिली. वस्त्रें तेथून आणावीं आणि श्रीमंतानींच घ्यावीं असें ठरलें आहे. श्रीमंतांचें मनास चिरंजीवास देववावीं असें होतें याचें कारण ह्मणाल तरी ' राजा अपेशी! ' कैलासवासी माधवरावसाहेब यांस वस्त्रें झाल्यास फार दिवस गेले नाहींत. नारायणराव यांस दिलीं त्यांस ही फार दिवस गेले नाहींत तेव्हां आपण घेतल्यानें तशीच गत होईल असा अंदेशा चित्तांत आणून चिरंजीवास द्यावीं म्हणत होते. निश्चय ही ठरला होता परंतु सौभाग्यवती आनंदी बाईच्या विचारें मुख्यानींच घ्यावीं असा आग्रह, याज करितां मुख्यानींच वस्त्रें घ्यावीं असें ठरलें. यांचीं वस्त्रें चिरंजीवानीं आणावीं असें झालें. प्रतिनिधीचीं वस्त्रें भवानराव यांस होतील. काल

---

१ बैतागलेले. २ दादासाहेबांस.

दादासाहेब स्वारीस निघतात.

रविवारीं मुहूर्त होता. वस्त्रें घेऊन सत्वरच येतील. अनेक प्रकारचे मनसब्रे अनेक बोलतात, परंतु कोणाचा विश्वास येत नाहीं! आम्हीं आपले जागां कोणाचा विश्वास धरीत नाहीं. परंतु डौल एक प्रकारचा दिसतो! श्रीमंतांवर गाडद्यांची जबरदस्ती दिसते. फौज फारशी नाहीं आणि (श्रीमंतांस फौजेचें) अगत्य ही नाहीं असें झालें आहे. श्रीमंत गंगाबाई-च्या गर्भाच्या बचावांत आहों, परंतु जशा बनेल तशा युक्तीनें करावयाचे योजनेंत आहों. सर्व दोहीं कडील मंडळ गर्भाचे बचावास एक होईल येथें[1] ही दगा होईल असें दिसतें. यांत काय घडतें पहावें. आपण[2] यासाठीं नगारखाना ठेऊन यावें. फार काय लिहावें! श्रीमंतांचे चिरंजीव जे दिवशीं वाड्यांत आले ते दिवशीं श्रीमंत दादासाहेबांचे पूजनाचें लिंग भंग झालें व चिरंजीवाचें पागोटें वडिलांचे दर्शनीं पडलें. समय ही देवाजवळील तेच समयीं पडली. अशीं अनेक प्रकारचीं दुश्चिन्हें झालीं आहेत. श्री परिणाम लावणार! आपण कांहीं अनुष्टान करावें. ग्रह वाईट आले आहत यास्तव दानें करावीं. जप करवावे. गर्भाचे संरक्षणार्थ कांहीं पांच सात ब्राम्हण जरुर (अनुष्टानास) घालवावे. श्री कृपा करील. रास्ते ही आले आहेत. अद्यापि आमची भेट नाहीं. होईल बहुत काय लिहिणें कृपा कीजे हे विज्ञापना.

---

१ गंगाबाईच्या गर्भास आनंदीबाईकडून. २ गर्भास दगा होण्याचा व मिरजेहून स्वारीबरोबर नगारखाना न आणण्याचा संबंध काय? ३ मागीं दोन्हीं पेशव्यांच्या कारकीर्दींत दादासाहेबांचे दत्तकपुत्र अमृतराव यांस पुण्यास येण्यास सक्त मनाई होती नारायणरावसाहेब वारल्यावर दादासाहेबांनीं अमृतरावांस पुण्यास आणविलें त्यावेळीं हीं दुश्चिन्हें घडलीं.

दादासाहेब स्वारीस निघतात.

नं० १२७४ श्रीगणपति. (आश्विन वद्य चतुर्थी
४ अक्टोबर.)

पै॥ छ० २१ रज्जब.

अपत्यें परशुरामानें साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० १६ रज्जब मुक्काम वाल्हें वर्तमान यथास्थित असे. विशेष. काल लोणंदाहून कूच करून मुक्काम मजकुरीं आलों. आज येथून कूच करून करे वर नजीक जेजुरी येथें मुक्कामास गेलों. आज दोन तीन दिवस पर्जन्य बहुत पडला. काल राजश्री शिवाजीपंताचें पत्र (पुण्याहून) आलें. वर्तमान विशेष नाहीं. श्रीमंतांचा मुक्काम कोरेगांवावर आहे. " नारो त्रिंबक राजमाचकिर इंदुवारीं मृत्यु पावले. आज आठ दिवस झाले. श्रीमंतांस काल कळलें. दशाहांतील सुतक धरितीलच असें नाहीं. आठ पुरुषांतरें आहेत. तीन दिवसाचें ही ह्मणतात म्हणून वर्तमान आहे " ह्मणून लिहिलें होतें. श्रीमंतांबरोबर सारे मुत्सद्दी नकार[2] नामक आदिकरून आहेत. मकार नामक पुण्यांत आहेत त्यांचे शरीरीं समाधान नाहीं. हल्लीं उतार आहे. मकार नामका खेरीज दुसरें कोणी पुण्यांत नाहीं. त्यांचे विचारें " आपण पुण्यास यावें, आपली भेट व्हावी, बोलणें चालणें व्हावें, उपरांत श्रीमंतांचे भेटीस (आह्मीं) जावें, असें मकार नामकाचें मानस आहे. त्यास आपण पुण्यांत यावें " ह्मणून शिवाजी पंतांनीं लिहिलें होतें त्यास आम्हीं शिऊबांस लिहिलें कीं " पुण्यांत कोणी नाहीं. बायकामुलें पुण्यांत. आम्हीं पुण्यांत आल्यानें श्रीमंतांस संशय येईल असें आहे. त्यांत तुमच्या विचारें '. यावें ' असें असल्यास लोणीवर सारा मुक्काम करून आपणाकडे दहा पांचांनिशीं येऊन वरचेवर भेट घेऊं. काय तें उत्तर

---

१ पत्र परशुरामभाऊचें वामनरावास. २ नकारनामक—नाना फडणीस. मकार नामक मोरोबादादा.

दादासाहेब स्वारीस निघतात.

लौकर पाठवावें. " म्हणून लिहिलें आहे. त्याचें उत्तर येईल तसे जाऊं. श्रीमंत थेऊरास येणार आहेत. राजश्री बाबूजी नाईक बारामतीस गेले आहेत. तेथें[1] नाहींत. त्यांचे विद्यमानें भेट (श्रीमंतांची) घ्यावी असें (मनांत) आहे. त्यास त्यांची बातमी आणून भेट घेऊं. तूर्त एक दोन दिवस मुहूर्त ही नाहीं आणि तिकडील ही मजकूर कळेल त्या सारखें करूं. आपणाजवळ फौज जमा झालीच असेल. तासगांवांत ही फौज जमा झाली आहे. वैरणीचा तोटा अगोदर पडलाच होता. आतां तो फौज सारी जमा झाली आहे तेव्हां वैरणीचें संकट मिरजेंत देखील पडलें असेल. यास्तव तासगांवची फौज व आपली फौज कुरुंदवाडची फौज ऐशी एक जागां करून आपण मुहूर्तें करून दोन चार कोसीं जाऊन मुक्काम करून रहावें. राहिली फौज जमा व्हावयाची असेल ती लौकर जमा करावी. भरती लोकांची व्हावयाची राहिली असेल ती लौकर लौकर भरती लोकांची समजावीसी करून करावी. " भोंसले भेटीस येणार ह्मणून आवई आहे परंतु चित्त शुद्ध नाहीं. तीस हजार चाळीस हजार फौज बरोबर आहे ह्मणून बाजारी वर्तमान आहे. परंतु वीस पंचवीस हजार फौज असेल. बिघाड करावा असें मानस आहे ह्मणून वर्तमान ऐकण्यांत आहे. " ह्मणून शिवाजीपंतानीं लिहिलें आहे यास्तव आपण सारी फौज सुद्धां जमावून रहावें. ह्मटले वेळेस कूच करावयास विलंब पडणार नाहीं. बाहेर निघाल्यानें सर्व तयारी माणूस आपापली करितें आणि दिसण्यांत ही ' आपली फौज जमाऊन राहिले आहेत ' असें ही दिसतें बाहेर निघून राहिल्यानें आब आहे. आबानें काम होईल असें प्रत्यक्षानें होत नाहीं. यास्तव वडिलीं पत्र पावतांच मुहूर्तें निघून फौज जमावून रहावें. आपले शरीरीं ग्रह नीट नाहींत यास्तव ग्रहांचा जप व

१ पेशव्यांच्या लष्करांत.

ग्रहणीं तुला करणार होतां ते केली किंवा नाहीं हें लिहून पाटवावें. ग्रहांचा जप करवावा व कांहीं अनुष्ठान आपल्या बऱ्यासाठीं करवावें असें योजिलें होतें तें केलेंच असेल. नसल्यास करवावें. चिरंजीव राजश्री बळवंतराव यांचे डोळ्यास कांहीं गुण असल्यास लष्करास बरोबर घ्यावें. राजश्री मोरोबादादा यांची पागा तेथें आली आहे त्याजवर चांगले पंधरा सोळा बारगीर ठेवून पागा बरोबर घ्यावी ह्मणजे आपले पागेबरोबर चाकरी चुकरीस कामास येईल. घरीं ठेवणार ह्मणून ऐकिलें ह्मणून लिहिलें आहे. तरी घोडें चांगलें आहे, बारगीर ठेऊन बरोबर घ्यावे. सविस्तर तेथें गेल्यावर लिहितों. आपण नेमल्याप्रमाणें शिलेदार फार करून आले. परंतु कोणी खासे आले, कोणाचा मुलबाळ आला आहे, असें झालें आहे. ' आणखी लोक रवाना करितों ' ह्मणून (आपण) लिहिलें होतें. केले असतील ते पावतील. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना. चिरंजीव राजश्री तात्या[1] व बळवंतराव यांसीं आशीर्वाद. लिखितार्थ परिसोन वरचेवर पत्र पाठवीत जावें. सावध असावें. लोभ कीजे हे आशीर्वाद.

नं० १२७९ श्री. (आश्विन वद्य दशमी
११ अक्टोबर

तीर्थस्वरूप राजश्री बाबा वडिलांचे सेवेशीं

अपत्यें परशुरामानें दोनी कर जोडून शिर साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० २३ रज्जब मुक्काम करातीर नजीक जेजुरी. वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपण पत्रें छ० १८ रज्जबचीं पाठविलीं तीं छ० २२ रज्जबीं पावोन सविस्तर वर्तमान कळलें. " तीर्थस्वरूप राजश्री

---

१ वामनराव.

दादासाहेब स्वारीस निघतात.

आबानीं लिहिलें आहे त्याचे योग घडवून निरोप घेऊन यावयाचें करावें " ह्मणून लिहिलें, ऐशास श्रीमंतांची काल रविवारीं सायंकाळच्या सहा घटका दिवसास भेट झाली. बोलणें चालणें व्हावयाचें आहे. आपण भाव लिहिले त्याच प्रमाणें बोलतों, परंतु भोंसल्याच्या भेटी झाल्याखेरीज निरोप होणार नाहीं असा भाव दिसतो. आह्मीं तो " आदवानी कित्तूरचा पैका (आह्मांस) उगवावा लागतो, पैका न उगवला तर सरकारांतून द्यावा लागेल, " असें बोलून ठेवतों. अद्यापि बोलणें चालणें झालें नाहीं- बोलणें झाल्यावर भाव समजतील. समजल्यावर सविस्तर लिहूं. वरकड बारीक मोठें वर्तमान पुरवणी पत्रावरून विदित होईल. " लोकांची भरती झाली नाहीं. लोकांची ओढ तिकडे पुण्याकडे पडली आहे. तर पांचशें लोक ठेऊन पाठवावे " ह्मणून लिहिलें, त्यास येथें लोक हुजुरातचे आहेत. एक दोघांचें अनुसंधान लागलें आहे. बनतील तितके ठेऊन पाठवितों. आपण लिहिलेवरून नरसिंगराव पांढरे यांजकडे पत्र पाठविलें आहे. येतील तर पहातों. येथें ही फारसे नाहींत. श्रीमंत सरसकट अडीचशें,मातबर पाहून तीनशें, रुपयांचा शेरा द्यावा असें ह्मणतात त्याजवरून लोक फार करून गेले. जुने जुने मातबर मात्र आहेत. अलीकडे राजश्री नानानी (श्रीमंतांस) समजावून ' तिजाई नालबंदी सालास देतात त्यास साल मजकुरीं तैनात तिजाई द्यावी ' असें केलें आहे. परंतु कोण राहतात, कोण जातात, हें कळत नाहीं. सदाशिव रामचंद्र व बाजीराव बर्वे यासीं फौज ठेवावयासीं (श्रीमंतानीं) सांगितली आहे परंतु दोघांस मिळून तीन हजार रुपये दिले आहेत! त्यांजवळ कोणी नाहीं. येथें श्रीमंताजवळ फौज चार पांच हजार आहे. भोंसले आठ दहा हजार फौजेनिशीं सडे एकट्या-नीं मात्र येत आहेत. घास दाणे फार घेतात. एक दोन हजार फौजे निशीं (हे यांस) या ह्मणतात. मग काय होतें पहावें. आपण दोन

तीन मजली दरमजल यावें. अनमान न करावा. बहुत काय लिहिणें सारीं तिन्ही (पथकें) एक जागां व्हावें. हे विज्ञापना.

न० १२७६ श्री. (११ आक्टोबर.)
पै॥ छ० ७ रज्जब

श्रीमंत राजश्री आ[1]बा स्वामीचे सेवेशीं—

पोष्य शिवाजी बाबाजी साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल तागायत आश्विन कृष्ण दशमी बुधवासर मुक्काम नजीक जेजुरी. वर्तमान यथास्थित असे विषेश. आपण पत्र पाठविलें तें पावलें. सविस्तर मजकूर कळला श्रीमंतांच्या काल भेटी झाल्याचें व बारीक मोठें कच्चें पक्कें सविस्तर वर्तमान श्रीमंत राजश्री भाऊसाहेबांच्या पत्रावरुन कळेल. उतावळींचा प्रकार आज्ञेप्रमाणें होत नाहीं. राजश्री नाना आहेत यांच्याच विचारें होणें तें होतें. ह[2]रनामक पुण्यांतच आहेत. भोंसल्याच्या भेटी झाल्याखेरीज कित्तूर अदवानीकडे जावयास निरोप होणार नाहीं. खटपट करुन पहातच आहें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना. ‘ शरीर प्रकृत आहे तशीच आहे ’ ह्मणून लिहिलें त्याजवरुन चिंता लागली आहे. तुला दान केल्यावर आरोग्य होईल असें लिहिल्यावरून अवसानच गेलें! सर्वांस आधार वडीलपणें दाब आपला, येणेंकरून सर्वत्रांस भरंवसा आहे. आरोग्यतेचें वृत्त लिहावें. तेणेंकरून समाधान होईल. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

१ मोरो बल्लाळ. २ हरीपंत फडके.

दादासाहेब स्वारीस निघतात.

नं १२७७ श्रीशंकर. (आश्विन वद्य एकादशी
१२ अक्टोबर.)

पै ॥ छ० ११ साबान सुरु सन आर्बा सबैन मय्यावअल्लफ
श्रीमंत राजश्री बाबा[1] स्वामीचे सेवेशीं.

विनंती सेवक कृष्णाजी अनंत कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० २४ रज्जब पावेतों स्वामीचे कृपेंकरून पे॥ थोरले बाळापुरचें[2] व सेवकाचें वर्तमान उत्तम असे विशेष. स्वामीनीं आज्ञापत्र पाठविलें तें पावलें. तेथें आज्ञा कीं, " श्रीमंतांस दगा झाला ह्मणून तिकडे ठाणीं यानीं गडबड होईल. यास्तव गडबड वारे तों पावेतों शें पन्नास माणूस नवें ठेऊन बंदोबस्त करून सावधपणें राहणें " ह्मणून आज्ञा, त्यास गडबडी करितां दोनशें माणूस ठेऊन चौकी पाहाऱ्याचा बंदोबस्त उत्तम केला आहे. शिरें, मदगिरी व चंद्रायदुर्ग येथील तमाम वळसा[3] निघून गेला. राजश्री बापूजी शिंदे याणीं पत्र शिऱ्यांहून लिहिलें कीं " हैदरखानाचा वकील पुण्यास आहे त्यानें पट्टणास पत्र लिहिलें कीं हल्लींची काबू फार चांगली आहे तर फौज पाठवून शिरें व मदगिरी, चेनरायदुर्ग, होसकोटें, बाळापुर, हे तालुके अगोदर क्षण विलंब न करितां हस्तगत करावे. हा प्रसंग पुढें येणार नाहीं. ह्मणून फार फार तऱ्हेनें लिहिलें असे. ह्मणून फारच गडबड झाली. तीं पत्रें (शिंदे याणीं) पुणीयासीं रवाना करून जासुदांस बेडी घालून ठेविले आहेत. हैदरअल्ली पट्टणास आहे मागडीस हणमंत शिंदा चार हजार स्वांर व कांहीं प्यादे व तीन तोफानिशीं झाडींत येऊन राहिला आहे. पट्टणास बातमीकरितां (आह्मीं) माणसें पाठविलीं आहेत. आह्मीं आपले जागां बहुत हुशारीनें आहों.

---

१ वामनराव. २ हा परगणा पटवर्धनांच्या जहागिरींतला व पत्र लिहिणारा हा या परगण्याचा कमावीसदार. ३ रयतलोक. ' वळसा या शब्दाचा अर्थ ' अवर्षण ' असाही आहे. ४ नं० १२६७ चें पत्र पहा.

दादासाहेब स्वारीस निघतात.

स्वामीचे पुण्य प्रतापें करून कांहीं चिंता नाहीं. पे।। मजकूरचें वर्तमान तर आज तागायत पाऊस नव्हता. त्यास अलिकडे हस्तांचा मात्र पाऊस झाला तेणेंकरून तळ्यांस थोडें बहुत पाणी आलें. दाणा सवंग रांगी येथील खंडी दहा फलेमानीं[2] व धान्य नऊ फलमानीं झालें आहे परंतु कोणी घेणारा नाहीं! रयत बहुत घाबरी[3] झाली आहे परंतु स्वामींचे कृपेंकरून कांहीं चिंता नाहीं. गुदस्त जमाखर्चाचा ताळेबंद पाठविला आहे. येऊन पावेल. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं १२७८ श्री. (कार्तिक शुद्ध षष्ठी.

२१ आक्टोबर

गै।। छ० ८ साबान.

श्रीमंत राजश्री वामनरावबाबा स्वामीचे सेवेशीं.

पोष्य शिवाजी बाबाजी साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल तागायत छ० ४ साबान गुरुवासर. मुक्काम खेड नजीक भीमा उत्तर तीर. वर्तमान यथास्थित असे. विशेष. काल राउता बरोबर पत्रें पाठविलीं आहेत. पावलीं असतील. आपण लांब लांब मजली करून यावें. आज ही लष्कराचा मुक्काम जाहला. दर्याबाई आज येणार. करंबेल्यास राऊत पहावयास पाठविले आहेत. मोर्चे लावितात कीं काय समजत नाहीं. निंबाळकरानीं घास दाणा न दिला तरी (भोंसले त्यांस) उपद्रव करितील जासूद शिलेदारांकडे पत्रें न्यावयास आपणाजवळ नसतील यास्तव जासूद असामी चार पाठविले आहेत. व चावजी घरून आला तो पाठविला आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना. चार असामींस रोजमरा दिला आहे. हे विज्ञापना.

---

१ नाचण्या. २ फलम हें एक नाणें रुपया ऐवजीं. ३ नारायणरावसाहेबांचा खून व हैदराची स्वारीची तयारी हीं रयत घाबरी होण्याचीं कारणें.

दादासाहेब स्वारीस निघतात.

नं १२७९ **श्रीगणपति.** (२४ अक्टोबर)

पै॥ छ० ९ साबान.

अपत्यें परशुरामानें साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल तागायत कार्तिक शुद्ध नवमी भानुवासर मुक्काम सुगांव भीमा उत्तर तीर. वर्तमान यथास्थित जाणून स्वकीय लेखन केलें पाहिजे. विशेष. आपण सांडणीस्वाराबरोबर पत्रें पाठविलीं तीं काली संध्याकाळीं पावोन सविस्तर मजकूर कळला. " बुधवारीं पंचमी कूच करून मणेराजुरीस आलों. पागा वगैरे सारा सरंजाम आला. अतःपर गुंता तिलमात्र नाहीं. गुरुवारीं कूच करून मजल दर मजल येतों. पुढें कोणत्या रोखें यावें. लष्कर कोणीकडून आणणार. तें सविस्तर जलद लिहून पाठवावें " ह्मणून लिहिलें, त्यास लष्करचा आज येथें मुक्कामच झाला. उदईक कूच करून नरसिंगपुराहून भीमा उत्तर तीरानें पंढरपुरास जाणार असें आहे. तिकडून गेल्यानें करकंबचे गांव फार सांपडतात, खराबी होईल, याजकरितां रदबदल करून पहातों कीं नरसिंगपुराजवळ भीमा उतरून दक्षिण तीरानें गेल्यानें बचाव होईल असें आहे. दुसरा प्रकार केमावरून निंबावरून करकंब तालुका उजवा टाकून मोहोळ परगण्यांत जाऊन क्षेत्रास जावें असे दोन मार्ग आहेत. परंतु ऐकून त्याच मार्गें जातील असा भरंवसा पुरवत नाहीं ! तत्राप रदबदली करून पहातों. नरसिंगपुराकडे गेल्यानें उत्तमच झालें. तुह्मांच लिहिलेंच आहे (कीं) नरसिंगपुरच्या सुमारें यावें ह्मणजे गांठ पडेल. कदाचित केमावरून तालुका उजवा टाकून जावयाचें ठरल्यास ते क्षणीं आपणाकडे पत्रें जलद पाठविलों कीं ' तसेंच पंढरपुराकडे यावें ' येणें प्रमाणें लिहून पाठवितों. आपण नरसिंगपुरचा रोख धरून यावें तों दुसरीं पत्रें पाठवितों. श्रीमंत (आह्मांस) नित्य पुसतात व चिह्या पा·

---

१ पत्र वामनरावास.

दादासाहेब स्वारीस निघतात.

ठवितात कीं " अद्यापि [वामनराव] कां येत नाहींत? त्यांजकडे (तुह्मी) जलद पत्र पाठवून लांब लांब मजली करून त्याणीं सत्वर यावें " असें ह्मणतात व चिम्या पाठवितात. तृतीयेस तेथून कूच करून याल या अर्थें आह्मीं सांगत आलों कीं, दोन दिवसांत येतात. त्यास आपलें कूच दोन दिवस लांबलें व पुढें ही मजली लांब करून येतां किंवा हलक्या करून हें ही न कळे. आमच्या लिहिण्यांत तरी लांब लांब मजली करून यावें असें आहेच. त्या प्रमाणें यालच. यांची निकड आहे याजकरितां त्वरेनें यावें ह्मणून लिहितों. शेवटीं सडे येऊन पोहोचावें असें लिहिलें होतें ती सोय बनली नसेल. असो. लांब लांब मजली करून लिहिल्या अन्वयें यावें तों वरचेवरी पत्रें पाठवितों. चिरंजीव राजश्री राघोबा दादा ही आलाच असेल. तुह्मीं पत्र पावतांच लांब लांब मजली करून यावें. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

नं० १२८०

(कार्तिक शुद्ध
अक्टोबर दु० पंधरवडा.)

लष्करांतून शिवाजीपंताचें वामनरावास पत्र. (पै॥ छ० ९ साबान)

" लष्कर सिद्धटेकावर आहे. पेडगांवाजवळ भीमा पार होऊन सिद्धटेकावर एक मुक्काम करून भोंसले यांच्या येण्याच्या सुमारें नागतळ्यावर जाणार. तेथें भोंसल्याच्या भेटी होणार. दर्याबाई भोंसले व रघूजी भोंसले व फौज पांच सात हजार जोगाईच्या आंब्यावर खंडणी घेऊन मौजे इरलें परगणे आवसें येथें जानोजीबावांचें थडगें तयार होत आहे तेथें येऊन पुढें तुळजापुरच्या रोखें येणार. "

---

१ रघुनाथराव नीलकंठ पटवर्धन कुरुंदवाडकर.

दादासाहेब स्वारीस निघतात.

नं० १२८१

(कार्तिक शुद्ध ५
२० अक्टोबर.)

परशुरामभाऊचें पांडुरंगरावास पत्र ३ साबानचें मु० भीमातीर.

" सिद्धटेंकाहून कूच करून मुक्काम मजकुरीं काल आलों. लष्कर पंढरपुरावरून तुळजापुरचे रोखें जावें असा मनसबा ठरोन जात आहेत. दर कूच जाणार. मध्यें एखादा मुक्काम झाला तर होईल. भीमा पैल-तीरानें लष्कर जात आहे. "

नं० १२८२

(कार्तिक शुद्ध
अक्टोबरच्या दु० पंधरवडा.)

परशुरामभाऊचें पांडुरंगरावास पत्र (पै० ११ साबान.)

" निंबाळकरांचे मुलखांत प्रस्तुत मुक्काम खेड तालुका राशीन भीमा उत्तर तीर येथें आहे. यांचे तालुक्यांतून घास दाणा घ्यावासा मनसबा झाला आहे. राजश्री साबाजी भोंसले मोंगलाचे आसऱ्यास गेले आहेत. त्यास मोंगलास पत्रें [येथून] गेलीं कीं आसरा न देणें. त्यांनीं आसरा न दिला तर तह रह होईलसा दिसतो. आसरा दिल्यास सहजच बिघाड होईलसा दिसतो. "

नं० १२८३

(२७ अक्टोबर)

परशुरामभाऊचें वामनरावास पत्र कार्तिक शु० १२ बुधवारचें

" श्रीमंत आह्मास नित्य पुसतात कीं वामनराव कधीं येतील? आज उद्यां येतील असें ह्मणत आलों. पर्जन्यानें आपणास वाटेनें हैराण केलें यामुळें दिवसगत लागली. असो. आतां लांब मजली करून दोन तीन दिवसांत नरसिंगपुरावर यावें. चिरंजीव राघोबा ही बरोबर येतच असेल.

दादासाहेब स्वारीस निघतात.

नरसिंगपुरावरून पंढरपुरास जाणार. राजश्री मोरोबादादा परवां आले. तोफखानाही आला. खजीना यावयाचा आहे तो ही येईल. दर्याबाई-ची आज भेटी होणार. "

नं० १२८४ **श्रीगणराज.** [३० अक्टोबर.]

पै॥ छ० १९ साबान.

अपत्यें वामनानें साष्टांग नमस्कार विनंती येथील वर्तमान तागायत कार्तिक शु० १९ मंदवार मुक्काम आलेगांव प॥ टेंबुरणी भीमा उत्तर तीर येथें यथास्थित असे. विशेष. आह्मीं तीर्थरूपांचे[२] श्राद्धाकरितां गुरुवारीं भालवणी नजीक एक मुक्काम केला. तेथून काल कूच करून नरसिंग-पुराजवळ भीमा उत्तर तीरास आलों. आज सहा घटिकेस श्रीमंतांचे भे-टीस मुहूर्त होता याजकरितां पहाटेची पांच घटका रात्र असतां कूच करून सूर्योदयास गोटानजीक आलों तों चिरंजीव राजश्री भाऊ सरकारचे गोटां-तून कूच करून आले. येथें मुक्काम करून आह्मीं व चिरंजीव राजश्री भाऊ पंचवीस लोकांनिशीं जाऊन श्रीमंतांची भेट आज दहा घटिकेस घेतली. आपणास कळावें ह्मणून लिहिलें आहे. मागाहून सविस्तर लिहून पाठवितों. आह्मीं श्रीमंतांचे दर्शनास गेलों तों राजश्री मुधोजी भोंसले श्रीमंतांकडे राजश्री रघोजी भोंसले यांस सेनासाहेब सुभेचीं वस्त्रें देववायासाठीं आले होते. तेथेंच आमची भेट झाली. जामातही उभा उभी भेटले. राजश्री रघूजी भोंसले यांस सेनासाहेब सुभेचीं वस्त्रें आजच सहा घटकेस दिलीं. कळावें. बहुत काय लिहिणें हे विनंती.

---

१ पत्र मोरो बल्लाळ उर्फ आबा यास. २ गोविंद हरीचे.

दादासाहेब स्वारीस निघतात.

नं० १२८९ **श्रीगणपति.** (कार्तिक शुद्ध १३
२८ अक्टोबर.)

अर्पत्यें परशुरामानें दोनी कर जोडून शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० ११ साबान गुरुवार मुक्काम उज्जनी परगणे टेंबुरणी भीमा उत्तर तीर. वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपण भालवणीचे मुक्कामाहून गुरुवारचे प्रातःकालचें पत्र पाठविलें तें आतांच सायंकाळचे सहा घटका दिवसास पावलें. लिहिला मजकूर कळला. ' आज आपलें पत्र न आलें तरी क्षेत्रास जाऊं. मंदवारीं लष्करास येऊं ' ह्मणून लिहिलें, त्यास क्षेत्रास जावयाचें न करावें. आज लष्करचें कूच मौजे सुगांव येथून होऊन मुक्काम मजकुरीं आलों. उद्यां बहुत करून मुक्काम येथें होईल. यास्तव आपण लांब मजल करून येथेंच यावें. कदाचित कूच झालेंच तरी नरसिंगपुरास कूच होऊन जातील. बहुतकरून मुक्कामच होईल. यास्तव आपण लांब मजल करून येथेंच यावें. श्रीमंतानीं आज प्रातःकाळीं बोलावूं पाठविलें होतें. " वामनराव याणीं दिवसगत करावयास कारण काय? सत्वर त्याणीं यावें. जलद सांडणीस्वार त्यांजकडे पाठवावा. " ह्मणून आज्ञा केली. त्वरेनें बोलवावयाचें कारण हेंच कीं राजश्री साबाजी भोंसले याणीं म्हसें मुधोळ वगैरे सरकार तालुक्यांत रोखेकरून फारच गडबड मांडिली आहे. याजकरितां सड्या फौजा करून त्यांजवर जाणार असा मनसबा ठरला आहे. यास्तव पत्रें पावतांच कूच करून लांब मजल झाल्यास करावी. परंतु उदईक या लष्करास मिळावें. राजश्री रघोजी भोंसले यांच्या भेटी झाल्या. आपण उदईक अठरा घटकांत श्रीमंतांची भेट घ्यावी. आजच येऊन राहिल्यास परवां मंदवारीं आश्विनी सहा घटका आहेत त्यांत तरी घ्यावयासी येईल. परंतु उदईक

---

१ परशुरामभाऊचें वामनरावास पत्र.

दादासाहेब स्वारीस निघतात.

लांब मजल करून लष्करा समीप येऊन रहावें हें उत्तम आहे. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

नं० १२८६ (३० अक्टोबर.)

कार्तिक शु० १५ चें आळेगांवचे मुक्कामाहून पांडुरंगरावास वामनरावाचें पत्र.

" आह्मीं तीर्थरूपांचे श्राद्धाकरितां भाळवणीनजीक मुक्काम करून दुसरे दिवशीं बारा कोसांची मजल करून नरसिंगपुराजवळ भीमा उत्तर तीरीं मुक्काम केला. श्रीमंतांचे भेटीस आज मंदवारीं सहा घटकेंत मुहूर्त होता याजकरितां आह्मीं पहाटेच्या पांच घटका रात्रीस कूच करून गोटाजवळ सूर्योदयास आलों तों चिरंजीव राजश्री भाऊ फौज सुद्धां आह्मांकडे आले. येथें मुक्काम करून चिरंजीव व आह्मीं पंचवीस लोकांनिशीं जाऊन श्रीमंतांची भेट घेतली. आह्मीं श्रीमंतांचे दर्शनास गेलों होतों तेथें राजश्री मुधोजी भोंसले श्रीमंतांकडे आले होते तेथेंच मशारनिल्हेची व आमची भेट झाली. राजश्री रघोजी भोंसले यास सेनासाहेब सुभ्याचीं वस्त्रें आजच सहा घटकेंत दिलीं. "

नं० १२८७ (३१ अक्टोबर.)

वामनरावाचें पांडुरंगरावास पत्र आळेगांवाहून कार्तिक व० १ चें.

" साबाजी भोंसले यानीं सरकारचे तालुक्यांत चिल्या करून उपसर्ग घास दाण्याचा देतात. त्यांस मोंगलाचाही आसरा आहे. यास्तव त्याजवर राजश्री त्रिंबकराव मामा या समागमें राजश्री मुधोजी भोंसलेही उद्यां येथून कूच करून जाणार. मामा व हे मिळून पुढें जाणार. श्रीमंतांचा मुक्काम आज येथेंच आहे. क्षेत्रा[१]स जाणार आहेत. भीमा येथेंच पार

१ पंढरपुरास.

होऊन दक्षिण तीरानेंच गेल्यानें करकंबेस उपसर्ग लागणार नाहीं ह्मणून विनंती केली आहे. "

नं० १२८८ **श्रीगणराज.** (कार्तिक वद्य षष्ठी. ५ नोवेंबर)

पै॥ छ० २६ साबान सुरुसन अर्बा सबैन मया व अल्लफ.

चिरंजीव राजश्री तात्या[1] व गंगाधर बाळ यांसीं प्रती वामनराव गोविंद आशीर्वाद उपरी येथील कुशल छ० १९ साबान मुक्काम इडनी तालुके, नलदुर्ग जाणून स्वकीय कुशल लिहिणें. विशेष. श्रीमंतांची व आमची भेट झाल्यानंतर दुसरे दिवशीं तुह्माकडे पत्रें पाठविलीं आहेत त्याजवरून सर्व कळलें असेल. भीमातीराहून कूच करून दक्षिण तीरानेंच क्षेत्रास जावें असा मनसबा होता तो प्रकार राहिला. राजश्री साबाजी भोंसले यास यवनांचा[2] आश्रय यास्तव यवनाशींच गांठ घालावी असा मनसबा करून भीमातीराहून कूच करून करकंब उजवी सहा सात कोस टाकून पिंपळनेरावरून घाटणे पे॥ करकंब येथें मुक्काम करून मजल दर मजल येथें आले. येथून ही कूच करून नलदुर्गनजीक मुक्कामास गेलों. किल्ला घ्यावा असा ही मनसबा आहे. मोंगलाजवळ ही पंचवीस हजार फौज व जंगी सामान चांगलें आहे. त्याजकडील वकील ही सरकारांत आले आहेत. ते बोलतात कीं, पहिल्यापासून स्नेह आहे त्याच प्रमाणें पुढें ही आहे. असें बोलतात. त्यांस श्रीमंतांनीं आज्ञा केली कीं, " साबाजी भोंसले यास आश्रय देऊन ठेऊन घेऊं नये, (इकडे त्यास) लाऊन द्यावें ह्मणजे स्नेह खराच. " त्यास वकील बोलतात कीं " श्रीमंतांचे आज्ञेवरूनच आह्मीं त्याचें साहित्य केलें. आतां लाऊन द्यावें हें उत्तम दिसत नाहीं. "

---

१ पांडुरंगराव, २ निजामअल्लीचा.

असें बोलतात. मोंगलाचे चित्तीं साबाजी भोंसले यास ठेऊन घेऊन राजकारण करावें असें नाहीं. राजश्री मुधोजी भोंसले यांस या गोष्टीचें अवश्यक, श्रीमंतांस मशारनिल्हेची भीड भारी, ह्मणून मोंगलावर चालिले. या उपर ठरेल तें मागाहून लिहून पाठवूं. श्रीमंतानीं फौजेचा अजमास पहावा ह्मणून खडी गणती घेतली. पंचवीस हजार फौज जमा आहे. भोंसले पंधरा हजार. एकूण चाळीस हजार फौज आहे. आणखी लोक वरचेवर येतच आहेत. आह्मांस ही श्रीमंतांनीं एक दोनदां बोलावूं पाठविलें होतें. आमचीं तिन्ही पथकें मिळून चार साडेचार हजार गणती झाली. सामान चांगलें आहे असें श्रीमंतांस विदित झालें. सविस्तर मागाहून लिहून पाठवितों. नलदुर्गास मोर्चा लावणार. सड्या फौजा ही पुढें पाठविणार. यवन भालकीचे सुमारें आहे. श्रीसत्तेकडून मनसबा ठरेल तो खरा. सांप्रत कारभारी कोणी नाहीं. जें करणें कर्तव्य तें श्रीमंतच समजून उमजून करितात. पत्रें तातडीनें लिहिलीं यास्तव हेंच पत्र तीर्थस्वरूप राजश्री आबाकडे पाठवून द्यावें. यवन भागानगराकडे जाणार. खासा तो भागानगरींच आहे तो ही बाहेर निघून आपले फौजेंत येणार. श्री सत्तेनें काय घडून येईल तें खरें! तूर्त मनसब्याचा डौल या रीतीचा आहे. नलदुर्ग लौकर हस्तगत झालेवर पुढें आवसें येथें जाणार. आह्मांस पुढें सडे होऊन यावें ह्मणतात. अद्यापि निश्चय नाहीं. आज मजलीस गेल्यावर काय ठरेल तें पहावें. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

---

१ साबाजीस धरून कैदेंत घालण्याचें.

मोंगलावर मोहीम.

नं० १२८९ श्रीगणराज. (कार्तिक शुद्ध पौर्णिमा. ३० अक्टोबर)

पै॥ छ० १९ साबान.

अपत्यें वामनानें साष्टांग नमस्कार विनंती. राजश्री मुधोजी भोंसले यास श्रीमंत आपणापाशीं ठेऊन घेणार. ' फौजेची तयारी करून राजश्री मामाबरोबर लावून द्यावी ' असें (मुधोजीस श्रीमंत) ह्मणतात. मातबराबरोबर फौज पाठवून देतील आणि खासा तूर्त श्रीमंतांपाशीं राहतील. राजश्री मोरोबादादा पुण्याहून येऊन पांच सहा दिवस झाले. श्रीमंतांचें व त्यांचें खलबत दोन घटका होत असतें. महालचा कारभार बहुतकरून ' चिकार[2]नामक ' करितात. फडणीसाकडील राजश्री नारोपंत परचुरे महालच्या काम काजांत असतात. ' सकार[3]नामक ' यांस समाधान नाहीं याजकरितां सिद्धटेंकानजीक राहिले होते. तेथून कुरकुंबवरून महादेवाच्या सुमारें येणार होते. आठ पंधरा दिवस तेथें राहून सासवडास जाणार असें वर्तमान होतें. त्यास श्रीमंतानीं निकडीचीं पत्रें दोन पाठविलीं कीं ' सत्वर येणें ' येतात किंवा नाहीं पहावें. श्रीमंत पंढरपुरास जातात. तेथून सुरापुराकडे जाणार. तेथील संस्थानिक पामनाईक मृत्यु पावला. त्या निमित्येंकरून तिकडे जाणार. दुरोख शह आहे. आठ पंधरा दिवस तेथें राहून कर्नाटकांत जावें असा मनसबा आहे. घडेल तें प्रमाण! बहुत काय लिहिणें हे विनंती.

नं० १२९० (कार्तिक वद्य नवमी ८ नोवेंबर.)

गंगाधररावास वामनरावाचें नलदुर्गाहून पत्र २२ साबानचें.

---

१ पत्र मोरो बल्लाळ उर्फ आबा यास. २ चिंतो विठ्ठल. ३ सखारामबापू.

श. १६९९ दादासाहेब व गंगाबाई यांच्या कारकीर्दीं इ. स. १७७३ मोंगलावर मोहीम.

" आह्मांस पुढें मोंगलावर जावयासी श्रीमंतांची आज्ञा झाली याजकरितां आह्मीं आज जड भारी सामान व हत्ती मंगळवेढ्यास पाठवून देऊन पुढें गेलों. "

नं० १२९१ (१४ नोवेंबर.)

विसाजी नारायण वाडदेकर याचें पांडुरंगरावास पत्र

कार्तिक वद्य ३० रविवारचें पुण्याहून.

" पुण्यांत पळणीची गडबड आहे. दोहों दोहों रोजीं आवाई पडत्ये. लोक तमाम पळतात. लष्करचें वर्तमान तरी काल चहूं रोजानीं सांडणी स्वार सरकारांत आला. त्यांत वर्तमान कीं, नलदुर्ग किल्ला सरकारांत घेतला. यांचे लष्करास व मोंगलाचे लष्करास छत्तीस कोसांची तफावत आहे. साबाजी भोंसले साकर खेड्यावर वऱ्हाडचे सरदेस आहे. तहवारजंग व रुकनुदौला वगैरे तमाम त्यांजकडील फौजा जमा झाल्या. भोंसला ही लष्करांत त्याचे आठा दिवसानीं येणार. पुण्यांत गडबड आहे कीं साबाजी भोंसला पुण्यांत येतो. त्यास यांच्या फौजा भागानगरच्या रोखें आहेत आणि भोंसला या सदरेस आला यास्तव लोक पुण्यांतील फार गडबडले आहेत. "

नं० १२९२ श्री (कार्तिक वद्य त्रयोदशी १३ नोवेंबर.)

तीर्थस्वरूप राजश्री कोन्हेरराव वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें परशुरामानें दोनी कर जोडून शिर साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० २६ साबान वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावलें, लिहिला मजकूर कळला. चिरंजीव राजश्री राघोबा

दादाचे लग्नाचा निश्चय केला आहे तरी चिरंजीवास पाठवून द्यावें ह्मणून लिहिलें, ऐशास आह्मांस पुढें जावयाची आज्ञा झाली त्याजवरून आह्मीं सडे होऊन कूच दर कूच मोंगलावर भागानगरास चाललों. तूर्त चिरंजीवास पाठवावयास येत नाहीं. पुढें माघ मासीं लग्न तिथी योजून इकडील शहाचा गुंता उरकला ह्मणजे श्रीमंतांस विनंती करून निरोप घेऊन पाठवून देऊं. राजश्री साबाजी भोंसले यांजवर राजश्री त्रिंबकराव मामा व रास्ते यांस सडे रवाना केले आहेत. भोंसले पैठणाकडे गेले आहेत ह्मणून वर्तमान आहे. मोंगल भागानगरासमीपच आहे ह्मणून वर्तमान आहे, त्यास आह्मीं दर मजल चाललों. नलदुर्गास तोफा चार दिवस लाविल्या होत्या. निशाण व पांच लोक किल्लेकऱ्यांनीं किल्ल्यांत घेतले आणि सलूख होऊन तोफा मना करून तेथून कूच करून मुक्काम मजकुरीं आलों. आपणांस कळावें. वरकड इकडील मजकूर सविस्तर चिरंजीवांचे पत्रावरून कळेल. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

नं० ११९३

(कार्तिक वद्य
नोवेंबरचा प० पंधरवडा.)

पांडुरंगरावाचें वामनरावास पत्र [पै॥ छ० २ रमजान]

" श्रीमंत मातुश्री गोपिकाबाई[1] मठांत राहिली आहेत. चार घरची भिक्षा आणून उदरपोषण मात्र करितात. ईश्वर इच्छेस उपाय नाहीं! अशा थोरांच्या गती मग इतरांची कथा काय! "

नं० ११९४

[कार्तिक वद्य द्वादशी
११ नोवेंबर.]

वामनरावांचें नलदुर्गच्या मुक्कामाहून २९ साबान गुरुवारचें

---

१ नाशीक येथें.

मोंगलावर मोहीम.

पांडुरंगरावास पत्र.

" मोंगलाचा बिघाड झाला. राजश्री त्रिंबकरावमामा पुढें गेलेच आहेत. आह्मांस पुढें जावयास श्रीमंतानीं आज्ञा केली त्याजवरून आह्मीं आज कूच करून पुढें गेलों. जड भारी सामान हत्ती वगैरे सरंजाम अक्कलकोटांत ठेविला. नलदुर्गास मोर्चे लावून आज तीन दिवस झाले."

नं० १२९५

[कार्तिक वद्य
नोवेंबर प० पंधरवडा.]

वामनरावांचें नलदुर्गाहून (पै० छ० १ रमजान)
पांडुरंगरावास पत्र.

" नलदुर्गचा किल्लेदार येऊन भेटला त्यास आपलासा करून (श्रीमंतानीं) ठेविला. किल्ला आपलासा केला. येथून कूच करून आवशांचे सुमारें १० कोस गेले. आह्मांस दोन कोस पुढें जाऊन राहण्याविशीं श्रीमंतांची आज्ञा झाली आहे."

नं० १२९६

[कार्तिक वद्य षष्टी
९ नोवेंबर.]

वामनरावांचें नलदुर्गाहून पांडुरंगरावास पत्र.

" श्रीमंतानीं आपल्या फौजांचा अजमास पहावा ह्मणून खडी गणती घेतली. आमच्या तिन्ही पथकां मिळून साडेचार हजार फौज भरली."

नं० १२९७

(मार्गशीर्ष शुद्ध २
१६ नोवेंबर.)

परशुरामभाऊचें मोरो बल्लाळास पत्र छ० १ रमजानचें.

मोंगलावर मोहीम.

" आज कूच करून भालकीनजीक गेलों. बाबूजी नाईक व मुधोजी भोंसले असे समागमें आहेत. मोंगल व रुकनुदौला वगैरे खासा नबाब देखील एकत्र होऊन शहर सोडून अलीकडे आले आहेत. श्रीमंत ही आठ कोस मागें आहेत. गांठ पडावयाचे सुमारास येऊन पोंचतील. "

नं० १२९८ श्री (१३ नोवेंबर.)

श्रीमंत राजश्री तात्या साहेब स्वामींचे सेवेशीं.

विनंती सेवक बाळाजी केशव[1]. कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागायत कार्तिक वद्य १४ मुक्काम करकंब स्वामीच्या कृपावलोकनें सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. लष्करांतून काल रात्रौ जासूद आला. लष्करचें वर्तमान तरी नलदुर्गाचा किल्ला सर झाला. तूर्त तेथेंच मुक्काम आहे. पुढें सडे होऊन मोंगलाकडे जातात. श्रीमंत राजश्री बाबासाहेब[2] यांस पंचमहालचे जप्तीस पाठविणार. मुहूर्त करून अर्ध कोसावर राहिले. पुढें कोणतें ठरेल तें पहावें. रास्ते यांस निंबाळकराची जहागीर जप्त करावयास आज्ञा केली. या प्रमाणें वर्तमान आहे. साबाजी भोंसले गंगातीरें गेला. अविंधाची फौज बेदरचे सुमारें आहे, तिकडे मजल दर मजल [हे] जातात. मुधोजी भोंसले यांचा लेक चिमणाराजा फौजेसहवर्तमान आमचे परगण्याचे सरदेनें मोहोळ उपरतण्याची खंडणी घेऊन पुढें गेले. मागाहून भोंसले कडील बाण राऊ व डांगोपंत फौज सुद्धां आले. निंबाळकराचे मुलखांत येणार. याप्रमाणें वर्तमान आहे. निंबाळकराचा मुलूख फारच खराब झाला. त्याच्या सोबतीमुळें करकंब परगण्याचीं खेडीं पिंपळनेरापासून हिंवरे पावेतों तुडविलीं आनिवार फौज ! उपाय नाहीं. या खेरीज तुटक फौजा श्रीमंत गेल्या

१ हा करकंबचा कमावीसदार. याचें हें पांडुरंगरावास पत्र. २ वामनराव.

मार्गें जातात. मधून ही जातात. उपद्रव फार लागला आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं० १२९९ श्री (१९ नोवेंबर.)

सेवेशीं शिवाजी बाबाजी साष्टांग नमस्कार विनंती तागायत मार्गशीर्ष शु० १ इंदुवासर मुक्काम मंगळवेढें वर्तमान यथास्थित असे. विशेष. श्रीमंत नारायणराव कैलासवासी झाल्यावरी आह्मीं सुष्ट दुष्टांशीं सान्याशींच राजकारणें घरांस जाणें येणें योग्यतेनुसार केलें. त्यास ' सकार नामक ' फारच निखालसतेचें बोलणें चालणें व पुढें कोणत्या विचारें कसें करावें हें ही प्रकार अकृत्रिमपणें शपथपूर्वक बोलत आले. तदोत्तर तेथील निखालसता लेखकमुखें रुबरू वगैरे दिसून आल्यावर आपणाकडे पत्रें पाठविलें. आपण श्रीमंत राजश्री भाऊसाहेबांची रवानगी केली ते येऊन पोंचले. सकार नामक यांची भेटी राजेवाडीजवळ झाली तेव्हां त्यांच्या चित्तांत आलें कीं (हे) श्रीमंतांचे एकनिष्ठपणें चाकर आहेत. या प्रसंगीं श्रीमंत मातुश्री गंगाबाईच्या बचावाचा प्रकार करूं लागल्यास आमच्या मनसब्यांत येतील व रास्ते ही येतील. नकार नामक लेखक ही येतील. देशस्थ मंडळी ही सर्व ही आपल्या लगामींच आहेत. मनसबा केल्यास गर्भाचें संरक्षण होईल. दैवेंकरून पुत्र झाल्यास उत्तम. नाहींतर पुत्र त्यांच्या दायजाचा घ्यावा. असें चित्तांत येऊन (सखारामबापू) राजकारणें करूं लागले. आह्मांसीं बोलून आणाक्रिया दिली कीं, " गंगाबाईच्या बचावा-

---

१ हें पत्र वामनरावास लिहिलेलें असून फारच महत्वाचें आहे. कारण ' बारभाईच्या कारस्थाना ' ची घटना कशी होत गेली हें यांत उत्तम प्रकारें वर्णिलें आहे. २ सखारामबापू विषयींची खात्री नाना फडणीस यांणीं दिल्यावरून. ३ सखारामबापूच्या. ४ पेशव्यांच्या भाऊबंदाचा पुत्र गंगाबाईच्या मांडीवर देऊन दादासाहेबांस पदच्युत करावें.

विशीं व श्रीमंतांचे दौलतेविशीं तुह्मीं आह्मीं एक असावें " येणें प्रमाणें परस्परें खातरजमा झाली. श्रीमंत भाऊंच्या मतें गंगाबाईस चोरून काढून हरएक आपल्या स्थळास न्यावी असें ह्मणत होते ती गोष्ट आमच्या कोणाच्या विचारास आली नाहीं. सारेच बोंब आमच्या पाठीस लागेल ही गोष्ट करूं नये. असें झाल्यावरी सकार नामकाचें राजकारण लागल्यावरी (भाऊनीं ती) गोष्ट टाकिली. सकार नामकानीं गंगाबाईस कृष्णाजी[1] हरी यांच्या घरीं यावयाचा राबता घालविला. लष्कर लांबलें ह्मणजे सप्तेऋषीस[2] आणावी आणि साऱ्यांनीं मिळून मंडळ एक करून बंदोबस्त करावा, मोंगल भोंसले यांशीं राजकारण करावें, (असा बेत ठरला.) सप्तऋषीचा किल्ला नकारनामक[3] लेखक यांचे स्वाधीन. त्याणीं सांगितलें कीं गंगाबाई तेथें येतांच किल्ल्यावर घ्यावी हें आह्मांकडे. वरकड हकार[4] नामक त्यांत आहेत. आह्मीं मेणवलीस राहूं. तुह्मांत आहों असें समजावें. या प्रमाणें झाल्यावरी ' सकार नामक ' उद्योगास लागले. आणि समाधान नाहीं ' ह्मणून पेडगांवापासून मागें निरोप घेऊन राहिले. मनसब्याच्या साधनांत आहेत. राजकारण कच्चें पक्कें हें समजेल तसें करावें लागेल. तुह्मांस ही पुरतें समजलें पाहिजे यास्तव आह्मीं आलों आहों. उदईक त्या गृहस्थाकडे[5] जातों. जर करून साधून पुढें परिणाम लागेसा असल्यास त्यांशीं बोलून चालून लष्करास संवज्ञापूर्वक लिहिणें तें लिहूं. कागदींपत्रीं लिहावयाचें नाहीं. राजश्री हरीपंत[6] घरचे आले, पत्र आपणास पावेल, असें जाणून या प्रमाणें आपणाकडे लिहावयास सांगितलें[7] त्या प्रमाणें लिहिलें आहे. सविस्तर आमची भेटी जाहल्यावरी विनंती करीन.

---

१ हा गंगाबाईचा बाप. उपनांव साठे. हा या वेळीं मेला होता पण त्याची बायको हयात होती. २ साताऱ्यास. ३ नाना फडणीस. ४ हरीपंत फडके. ५ सखारामबापूकडे. ६ हा पटवर्धनांचा एक विश्वासु कारकून व आप्त. ७ सांगितलें परशुरामभाऊनीं.

पक्कें झाल्यास सर्वांच्या विचारास आल्यास बरें आहेसें दिसतें. घडतां अवघडच आहे! त्यांचे[१] अन्नानें वाढल्यास[२] होईल त्यास चुकूं नये इतका प्रकार आहे. घडेल तें खरें! आपण पत्र वाचून लाखोटा करून वाडीस पाठऊन त्यांणीं[३] वाचून पाहून विसर्जन करावें. संकलित पर्याय हकारनामकास सुचविले आहेत. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं० १३०० श्री (मार्गशीर्ष शुद्ध नोवेंबरचा दु० पंधरवडा.)

विज्ञापना[४]. कूच होऊन सीनेच्या पाण्यावर गेले. मलिकंपेठेवर उतरले. मलिकंपेठेपासून बेहल्यावरून (?) मोहोळपर्यंत लष्कर जाऊन राहिलें आहे. आधीं मोंगलअल्ली याचा पुत्र शहाजादा बेगमपुराहून मोहोळास जाऊन राहिला. त्या नंतर फौज गेली होती त्याणीं गांव बळावून तोफा चढवून मार दिला. एक दोन तोफा देवळावर, एक दोन बुरजावर, एक दोन भिताडावर, जागा पाहून बंदोबस्त करून पाहून झुंजतो. फौज श्रीमंतांची जाऊन दोन तीन दिवस झाले तों काल स्वारीच गेली आहे. खंडणी करितात किंवा काय प्रकार होतो कळत नाहीं. वर्तमान आल्यावर सेवेशीं लिहितों. स्वामीचीं पत्रें वाटंबरेच्या मुक्कामाहून आलीं होतीं. अलीकडे लष्करचा मुक्काम कोठें आहे, क्षेत्रास येणार किंवा माणेच्या पाण्यानें संगमास जाणार, हें लिहावया आज्ञा करणार धणी समर्थ आहेत. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

१ पेशव्यांच्या. २ वाढलों आहों यास्तव. ३ नरसोबाच्या वाडीस मोरो बल्लाळ यावेळीं होते त्याणी. ४ कोणा कमावीसदाराचें वामनरावास पत्र.

मोंगलावर मोहीम.

नं० १३०१

(मार्गशीर्ष वद्य
दिसेंबरचा प० पंधरवडा.)

परशुरामभाऊचें पांडुरंगरावास पत्र. पै॥ २३ रमजानचें.

" चंदावरचें राज्य महमदअल्लीनें घेतल्याचा मजकूर लिहिला तो कळला. हिंदु राज्य बहुत दिवसांचें होतें! मोठें वाईट झालें. ज्या ज्या काळीं जें होणें तें चुकत नाहीं."

नं० १३०२

(मार्गशीर्ष वद्य
दिसेंबरचा प० पंधरवडा.)

वामनरावाचें पांडुरंगरावास पत्र. पै॥ २३ रमजान.

" नाना फडणीस यांणीं " पंचवीस प्यादा विश्वासूक मर्द माणूस त्यांत दहा बारा पावेतों बरकंदाज असावें असें टेऊन आपणाकडे पाठवून देणें " ह्मणून आह्मांस सांगून गेले. आह्मीं कबूल केलें. या करितां विश्वासु मर्द व देखणें असे माणूस पाहून पाठवून द्यावें."

नं० १३०३

(मार्गशीर्ष वद्य २
१६ नोवेंबर.)

वामनरावाचें पांडुरंगरावास पत्र. १ रमजानचें
उदगिरी तालुक्यांतून.

" नबाब बाहेर निघाले. आह्मांस दहा कोसांचे तफावतीनें लष्करापासून रहावें अशी श्रीमंतांची आज्ञा त्या प्रमाणें राहात आहों. राजश्री बाबूजी नाईक व नरसिंगराव धायगुडे व आह्मी एकत्र आहों."

नं० १३०४

[२६ नोवेंबर.]

वामनराव यांचें गंगाधररावास पत्र नजीक बेदर येथील मुक्कामाहून.

श. १६९५ दादासाहेब व गंगाबाई यांच्या कारकीर्दी. इ.स. १७७३
मोंगलावर मोहीम.

मार्गशीर्ष शु० १३ चें.

" मोंगलाची व श्रीमंतांची गांठ पडली. मोंगल बेदरचा आसरा धरून पांच सहा दिवस मुक्काम करून बसला आहे. श्रीमंतांच्या फौजा सभोंवत्या फिरतात व तोफा ही दोन वेळ गोटावर नेऊन लाविल्या. (मोंगल अद्यापि कूच कां करीत नाहीं हें कळत नाहीं. कांहीं फौज मागाहून यावयाची आहे व सडे होऊन कूच करावें अशा मनसब्यांत आहे ह्मणून वर्तमान आहे. आह्मीं नित्य उठून सभोंवतें वैरण काडी लांकूड फांटें जाळीत फिरत आहों. अरुणोदयीं स्नान संध्या आटपून बाहेर निघून चार घटका सहा घटका रात्रपर्यंत आसपास घिरट्या घालून गोटास येत आहों. मोंगलाचीं कहीचीं तट्टें व उंटें व बैल नेहमीं लुंगारी[1] आणीत आहेत. बेदरच्या पश्चिमेस होतों तेथें चार मुक्काम झाले. तिकडून तोफा मारावयाचा लाग साधेना, पाण्याचा तोटा, व वैरणही लांबली, याजकरितां छ० ७ रमजानीं तेथून कूच करून बेदरचे उत्तरेस चार कोसांवर जनवडाजवळ येऊन मुक्काम केला. वाञ्छेरा[2] येथून अदकोसावर आहे. श्रीमंत बुनगे मागें दोन कोस टाकून पुढें सडे होऊन आहेत. किल्ल्याचे पूर्वेस मैदान आहे तेथें तोफा लावाव्या ह्मणून ह्मणतात परंतु तोफा तेथें लावण्याचें कठीण आहे. "

नं० १३०५ **श्री सीताकांत** (मार्गशीर्ष शुद्ध ७
२० नोवेंबर.)

राजश्री वामनराव गोंसावी यांसीः

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकित मुधोजी भोंसले सेना धु॰

---

१ पेंढारी. २ वाञ्जरा नदी.

रंधर दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जावें. विशेष. वाणी सरकारचे बाजारचा बैल घेऊन भरतीस गेला होता त्यास तुम्हांकडील बेदड्यांची गांठ पडली त्यांनी सरकारचें दस्तक त्याजपाशीं असतांही दोघें माणसें जिवें मारिलीं. एक दोन जखमी करून साखर तांदुळ व गूळ वगैरे भरती घेऊन येत होता ते बैल लुटून नेले. प्रस्तुत ते बेडदे ही तुमचे येथें ठिकाणीं लागले आहेत. व वाणी यांचे बैलही तुमचे गोटांत आहेत. त्यास वाणी मजकुरांचे बैल लुटले आहेत त्या पेंढारियाकडून त्यांची चीजवस्त सरंजाम सुद्धां व भरती सुद्धां वाणी यांस देववावें. आपले आपल्यांत असा प्रकार न घडावा. याकरितां बैल सरंजाम सुद्धां देवविणें. रवाना छ० ९ माहे रमजान बहुत काय लिहिणें हे विनंती.

नं० १३०६ (मार्गशीर्ष शुद्ध १२
२९ नोवेंबर.)

परशुरामभाऊचें मोरो बल्लाळास पत्र १० रमजानचें.

" आह्मीं बेदरास मार्गशीर्ष शुद्ध पंचमीस आलों. श्रीमंत दुसरे दिवशीं आले. मोंगल खासा भागानगराहून तयार होऊन बेदरास आह्मीं आलों तेच दिवशीं आला. किल्ला पाठीस घालून (त्याचें लष्कर उतरलें आहे. श्रीमंत आल्यावर दोन तीन दिवस चारचार घटका तोफा लावून गोळे मोंगलाचे गोटावर टाकिले. मोंगल आसऱ्याची जागा धरून बसला. यांचा काट त्याजवर चालेना. मोंगल हारीस आणून मातबर जहागीर घ्यावयाची कस्त (आहे) व चहूंकडील रान जाळावें, रस्त अगर कुमक जाऊं देऊं नये, धौंशा व भोंसले[1] यांस ही दूर आहेत तोंच मु-

---

१ साबाजी भोसले.

काबला देऊन मागें सारावें, या प्रमाणें मसलत झाली आहे. "

नं० १३०७ (मार्गशीर्ष शुद्ध १२
२५ नोवेंबर.)

परशुरामभाऊचें पांडुरंगरावास पत्र.

" राजश्री साबाजी भोंसले मोंगलाकडे यावयाचा प्रकार दिसत नाहीं. 'परित्वा'च करावें असा त्याचा प्रकार दिसतो! त्याचे तोंडावर सरकारची फौज ही आहेच. श्रीमंत मोंगलाजवळ जहागीर 'कैलासवासी जवळून तुह्मीं घेतली आहे ती देणें' असें ह्मणतात. तो जागा धरून बसला आहे. तोफांचा लाग ही नाहीं. कूच करील ते समर्मी जें होईल तें खरें! [श्रीमंतांच्या] कारभाराचा अखत्यार एकावर ही नाहीं. नित्य नवा मनसबा होत आहे!

नं० १३०८ श्रीगणराज. (२६ नोवेंबर.)

पै छ० २३ रमजान.

चिरंजीव राजश्री तात्या यांसी प्रती वामनराव गोविंद. आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत मार्गशीर्ष वद्य त्रयोदशी भृगुवार मुक्काम नजीक बेदर दोन कोस जाणून स्वकीय कुशल लिहिणें. विशेष. जमाखिंडी पा। उदगिरी येथील मुक्कामाहून तासगांवच्या माणसा समागमें पत्र पाठविलें आहे तें प्रविष्ट झाल्यानंतर सर्व कळेल. छ० ३ रमजानीं येथें आलों तेंच दिवशीं मोंगल बेदरास आला. आह्मीं संध्याकाळ पावेतों तोंडावर जाऊन उभे राहिलों. चिरंजीव राजश्री भाऊ व राघोबादादा छबीन्यास रात्रीस आल्यानंतर आह्मीं गोटास आलों. श्रीमंतांस[1] ही लिहून

---

१ माधवराव पेशवे.

मोंगलावर मोहीम.

पाठविलें कीं मोंगल बेदरास आला ह्मणून. तेव्हां श्रीमंत ही दुसरे दिवशीं आले. फौजेचा मोहला करून छ० ४ रमजानीं मोंगलाचे गोटावर चालिले. सरकारच्या तोफाही लागू केल्या. पाऊणशेंपर्यंत गोळा गोटावर टाकिला. सरकारच्या फौजा मिसळून उभ्या राहिल्या होत्या तेव्हां मोंगलानें ही गोळ्यांचा मार केला तेव्हां आमच्या फऱ्यांत दोन गोळे आले. तेव्हां तीन घोडीं ठार झालीं व शेव्याजी नलवडे जदीद शिलेदार बरा माणूस चांगला होता त्यास गोळा लागून ठार झाला. अस्तमानपर्यंत उभे राहून श्रीमंत गोटास गेले. आह्मीं गोटास आलों. मोंगलाचे फौजेचें दर्शन झालें! अरुणोदयीं स्नान संध्या उरकून अस्तमान पर्यंत मोंगलाचे आसपास उभे राहून रात्रीस गोटास येत आहों. मोंगलाची गांठ तो पडली. मोंगलाचें सामानही चांगलें आहे. एक दोन वेळ मातब्बर झुंज झाल्याविना तहाचा प्रकार ठरत नाहीं. आह्मांस पहिल्याप्रमाणें उजवी बाजू सांगितली आहे. राजश्री बाबूजी नाईक व आह्मीं मिळूनच मोंगलाचें येथून कूच झालें ह्मणजे मोंगलाचे उजवे बाजूस जाणार. राजश्री साबाजी भोंसले आंबेडाकडे आहेत, त्याचे तोंडावर राजश्री त्रिंबकराव मामा व राजश्री आनंदराव दादा रास्ते रवाना केले आहेत. मोंगलाचे बाजार बुनगे व फौज कांहीं मागाहून यावयाची आहे. यास्तव मोंगलाचा येथें मुक्काम आहे. तो कूच करून वाझरेच्या पाण्यानें वर चढणार ह्मणून वर्तमान आहे. कूच जाहल्यानंतर सहजच रोख कळेल. आह्मीं कोणेविशीं उतावीळ करीत नाहीं. श्रीमतांची मर्जी रक्षून आहों. तुह्मी कोणविशीं उतावीळ फिकीर न करावी. मोंगलाकडील कहीची गांठ पडत असती. लुगारे जाऊन बैल व तट्टें आणितात चिरंजीव राजश्री भाऊकडील ही एक घोडीं ठार, पांच घोडीं जखमी आहेत तीं खैर आहेत. बेदरच्या पश्चिमेस चार मुक्काम झाले तेथून तोफा मारावयास लाग साधेना व पाण्याचा ही तोटा; वैरण ही लांबली' या

जकरितां परवां नवमीस तेथून कूच करून बेदरच्या उत्तरेस चार कोसांवर येऊन जनवाडानजीक मुक्काम केला. वाझरा येथून अर्धा कोस आहे. श्रीमंत बुनगें मागें दोन कोस टाकून सडे झाले आहेत. नित्य फौजेचा तलावा मोंगलासभोंवता होत आहे. वैरण काडी तळावरील देखील जाळावें अशी आज्ञा झाली आहे. मागील तळ व उसाचे फड जाळावयासाठीं काल आह्मांकडील फौज गेली होती. किल्ल्याचे पूर्वेस मैदान चांगलें आहे तेथें तोफा नेऊन किल्ल्यास लावाव्या ह्मणतात परंतु त्या जागांत तोफा नेऊन लागू करावयाचें परम कठीण आहे. बसालतजंग याची फौज (मोंगलाच्या कुमकेस) येणार. काळ्या चवथऱ्याजवळ गदवाल तालुक्यांत फौज आली. हे धौशा यावयाचा आहे, फिरंगी यावयाचे आहेत, याजकरितां मुक्काम करून आहेत ह्मणून बोलतात. जवळ सभोंवते फौजा फिरतात तेव्हां कूच करीत नाहीं. कूच केल्यानें निभाव नाहीं, कुमक यावयाची असेल, ह्मणूनच वाट पाहत मुक्काम केला आहे असें वाटतें. आतां तर नित्य रात्रं दिवस सभोंवती फौज फिरती. कुमकही येऊन सामील व्हावयाची हें कठीणच दिसतें. साबाजी भोंसले तो जालनापुरच्या रोखें आहेत. (त्यांची) फौजही दहा हजार आहे ऐसें येथें बोलतात. राजश्री त्रिंबकराव मामा व रास्ते त्याजवर गेले आहेत. त्यांचें व यांचें अंतर वीस कोसांचें आहे. भोंसले तमाम मुलखांत खंडण्या घेतात. त्यांचे धास्तीनें सर्व पुणें पळालें. मोंगलानें तो जागाच धरिला तेव्हां मसलत भारी आहे. कारभाराचा भार कोणावर नाहीं. (श्रीमंत) खासाच सर्व आपण करितात. परिणाम लावणार श्री गजानन आहे! वरकड वर्तमान शिवाजीपंतानीं सांगितलें असेल अथ-

---

१ गंगाबाईच्या स्थापनेसंबंधें गुप्तरूपें मसलत चालली होती तिजविषयीं.

वा सांगतील. बहुत सावधपणें राहणें. काल बरा नव्हे. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं० १३०९ **श्रीगणराज.** (मार्गशीर्ष वद्य १३
२६ नोवेंबर.)

चिरंजीव राजश्री तात्या यांसी आशीर्वाद उपरी येथील कुशल वर्तमान छ० ११ रमजान पावेतों यथास्थित असे. विशेष. तुह्मांकडे पत्रें लिहून लखोटे करून दिल्यानंतर श्रीमंतांनीं बोलाऊं पाठवून सांगितलें कीं तुह्मीं (व) राजश्री बाबूजी नाईक मिळून बेदरच्या पूर्वेस जाऊन राहणें असें सांगितलें. त्यास राजश्री नाईक बोलिले कीं आणखी चार पांच हजार फौज समागमें दिली तर जाऊं, नाहींतर जात नाहीं, असें बोलिले. तेव्हां श्रीमंत नाईकावर बहुत खट्टे झाले. आह्मांसही पुशिलें. आह्मीं " आज्ञा प्रमाण. चाकरीविशीं उजूर तिलमात्र नाहीं. विचार करणें तो धन्यांनीं करावा. " अशी विनंती केली. तेव्हां " हुजुरात पैकीं पांच हजार फौज चिंतो विठ्ठल अथवा सखाराम हरी यांजसमागमें देतों. तुह्मीं व ते मिळोन जावें. नाईकाची वाट न पहावी. " अशी आज्ञा झाली त्याजवरून आह्मीं गोटास आलों. भोजन करून सडे होऊन जातों. येथील प्रकार एकही स्थिर नाहीं असें आहे! श्रीगजाननानेंच लज्जा रक्षावी! नहून दुसरा प्रकार नाहीं. हेंच पत्र तीर्थस्वरूप राजश्री आबाकडे पाठवून द्यावें. नाईक कांहीं दरबारास आले नाहींत परंतु त्यांची चिट्ठी श्रीमंतांस आली होती त्याजवरून बहुत खट्टे झाले आणि आह्मांस सांगितलें कीं तुह्मीं जाणें. आह्मीं ' आज्ञेस उजूर नाहीं ' ऐसा जाबसाल केल्यावर बहुत प्रसन्न झाले. आणि नित्य स्वमुखें तारीफ करीत असतात

१ पत्र वामनरावाचें पांडुरंगरावास.

कीं " एवढे मात्र चाकरीस उजूर करीत नाहींत. " आह्मांस तो चाकरीस ' नाहीं ' ह्मणणें नाहीं. श्रीगजाननाचे कृपेंकरून सर्व बरेंच होईल. कोणे गोष्टीची चिंता न करणें. बहुत सावध रहात जाणें. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं० १३१० श्री. (मार्गशीर्ष वद्य १३ २६ नोवेंबर)

सेवेशीं आपाजी त्रिंबक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० ११ रमजान मुक्काम नजीक बेदर येथें यथास्थित असे. विशेष. सविस्तर वर्तमान श्रीमंत राजश्री बाबासाहेबांनीं लिहिलें आहे त्याजवरून कळेल. आतां सर्व कारभार मोंगलाचा. दुसरा उद्योग नाहीं! अरुणोदयीं स्नान संध्या उरकून सभोंवता तलावा करून यावें इतका प्रकार! मोंगल जागा धरून बसला आहे. कूच करावयाचा प्रकार दिसत नाहीं. धसाव [?] बाहेर यावयाचा आहे याजकरितां मुक्काम असें ही बोलतात. परंतु जागा सोडीत नाहीं. तोफांचा लागही गोटावर गोळे मारावयाचा नाहीं. याजमुळें आज पांच सहा दिवस गोळा गोळी नाहीं. रिकामा तलावा होतो. आजपावेतों आपल्या लष्करांत सवंगाई विपुल आहे. आणखी महिना पंधरा दिवस (मोंगलानें) जागा धरिली तर मसलत भारी. वैरण व सर्पण मिळावयाचें कठीण. तूर्त अग्नीचीं[२] आराधना आहे! (श्रीमंत) मसलतींत श्रीमंत राजश्री बाबांस व भाऊस बोलावूं पाठवितात. उभयतां जात असतात. बोलावयास मसलत सांगावयास चुकत नाहींत. श्रीमंत कृपा फारच करितात. चाकरीविशीं बाबासाहेब व भाऊसाहेब फार जपतात.

१ हा पटवर्धनांचा एक कारकून. उपनांव पोंक्षे. २ ' अग्नीची आराधना ' ह्मणजे गांवखेडीं व शेतें भातें जाळणें!

खंदारकरांकडून एक वेळ संधानाचा प्रकार आला होता तो राजश्री शिवाजीपंतांनीं आपणास सांगितलाच असेल. त्याजवर एक कारकून त्याच्या पुतण्याकडून आला होता त्यासीं बोलावयाचें बोलून आंत लावून दिला. मोंगलाचे चित्तीं कांहीं देऊं नये. श्रीमंतांचे चित्तीं कांहीं पेशजी जहागीर दिली आहे ती घ्यावी असें आहे. यांत घडेल तें खरें. आमचे लोकांची भरती होत आली. धौशा आला तर तो निशाचरी विद्या करावयास चुकणार नाहीं असें ह्मणतात. मोंगलाचें सामान पंचवीस तीस हजार फौज पाऊणशें तोफा असें चांगलें सामान आहे. साबाजी भोसले पैठणचे रोखें आहेत त्यांचे चित्तीं 'परित्वा' च करावें असें आहे. त्याचे तोंडावर मामा पाठविले आहेत. कसें होतें पहावें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं० १३११ श्री (मार्गशीर्ष वद्य दिसेंबरचा पहिला पंधरवडा.)

विनंती[३] उपरी. आपण काल चिठ्ठी पाठविली ती पावली. तेथें लिहिलें कीं 'गुरें मोंगलाचे लष्करचे वतीचीं आणिलीं तीं सोडतात' त्यास 'सोडूं न ये' ह्मणून ताकिदी स्वारांस झाल्या. भोंसले व गाईकवाड यांस ताकिदी झाल्या. दुसरें वर्तमान तर मोंगल भेटल्याचें वर्तमान. पहिले दिवशीं रुकनुदौला आला त्याणें करार करून गेला कीं " वीस लक्षांची जहागीर देतों. औरंगाबाद देतों. " याप्रमाणें करार. खासा मोंगल आला भेटीस. सामोरे चिरंजीव व गाइकवाड व भोंसले व खासे

१ खंदारची जहागीर मोंगलाईत बेदर जिल्ह्यांत आहे. तेथील जहागीरदार गोपाळसिंग हा पटवर्धनांचा पुरातन स्नेही होता. २ कवाइती पायदळ व तोफा यांचे जोरावर रात्रीं छापे घालणें. ३ हें कोणा कारकुनाचें पत्र. हें दोन नंबर आधीं लागलें आहे.

सारे गेले. तेथें भेटी भोंसले गाईकवाड व खासे यांच्या झाल्या. गोटास दादासाहेब आले. मागाहून मोंगल आला. उठोन बाडाचे बाहेर गेले. तेथून हातीं धरून डेऱ्यास आले. मसलत झाली. उपरांत भोजन मोंगलांचें झालें. उपरांत खलबत मोंगल व खासे [व] रुकनुदौला व कृष्णराव काळे चौघे खलबतांत होते. खलबत झाल्या उपरी बाहेर आले. मग वस्त्रें पुढें ठेविलीं. जवाहीर व इतर दिलें त्याचा तपशील—मोत्यांची कंठी एक किंमत रुपये ४५०० सिरपेंच ३००० जेगाहिबेस (?) ६०० मोत्यांची माळ १५०० येणें प्रमाणें जवाहीर दिलें. हत्ती दोन चांगले, घोडे दोन मिळून किंमत रुपये ८०० या उपरी सरदारांस कोणास दिलें नाहीं. स्वारीबरोबर सरदार व मुत्सदी कोणी एक बोलाविलें नाहीं. बरोबर अप्पा बळवंत व हरिपंत भिडे, सखाराम हरी चिंतो विठ्ठल, गायकवाड, भोसले, इतके होते. [शिवाय] कृष्णराव बल्लाळ मग कोणी एक नव्हते. मोरोबादादा, सदाशीव रामचंद्र व इतर मुत्सदी व सरदार कोणी नव्हते. पाटणकर यांस बोलाविलें नाहीं ह्मणून (ते] रुसले. मोंगलांची रूबरू गांठ पडल्या उपरीं "औरंगाबाद देऊं नये" (असें ठरलें. ती) फिरून मोंगलांस दिली. उभयतां फार कष्टी झाले. चिरंजीवांस पांच लक्षांची (जहागीर) दिली ती माघारी मोंगलांनीं घेतली. बाकी पंधरा[1] राहिले हे बक्षीस मोंगलांस साहेबानीं केले ज्या समयीं आमची चिट्टी येईल तेव्हां खाशानें यावें या प्रमाणें करार साबाजी भोंसले यांचें सूत्र मामाकडे आलें त्यास साहेबानीं (मामास) लिहिलें कीं 'सल्ला न करणें ' साबाजी टोंक्याचें सुमारें आहे. काल संध्याकाळीं मामाचीं पत्रें आलीं मामाकडे आणखी फौज पाठवावी तरी तुह्मांसच रवाना करणें हा मनसबा दिसतो आणि खाशानीं पंचमहालाकडे जावें, अर्काटास जावें, मोंगलानें बरोबर

---

१ पंधरा लक्षांची जहागीर.

यावें, हा अर्थ आहे. उदईक कूच आहे. मला घोडी बसावयास नाहीं. राघोबादादा यांचे हत्तीविशीं विनंती करितों. आज्ञा झाली तरी मीच सरंजाम सुद्धां येईन. हे विज्ञापना.

नं० १३१२ (२७नोवेंबर)

वासुदेव धोंडदेव यांचें लष्करांतून पांडुरंगरावास पत्र
मार्गशीर्ष शु० १३ चे नलदुर्गाहून

"श्रीमंत छ० २ रमजानीं बेदरास पोंचले. समागमें बाबूजी नाईक पांच हजार फौजेनिशीं आहेत. आमचा मुक्काम बेदरापासून दोन कोसांवर होत आहे तों निजामअल्लीखानाचें कूच होऊन बेदरचे मुक्कामास आले. पंचवीस हजार फौज व गाडदी वीस हजार, तोफा साठ, खेरीज धौशाचें सामान तोफा वीस, जेजाला दोन हजार, सुतरनाला पांचशें, येणें प्रमाणें सामानसुद्धां शहरानजीक (त्याचा) मुक्काम झाला. मोंगल बेदरास येऊन पोंचल्याचें वर्तमान आह्मी चिट्ठी लिहून श्रीमंतांस कळविलें तेव्हां खासा सडे होऊन फौज व दहा तोफा समागमें घेऊन शहरास पावले. निजाम अल्लीखानांचे गोटावर तोफा लाविल्या. तोफखान्याच्या बाजूनें फौजा ही उभ्या राहिल्या होत्या. श्रीमंतांकडील तोफांचे बार तीन होतपर्यंत त्यांजकडील गोळी अथवा तोफ सुटली नाहीं. उपरांतिक त्याजकडील तोफा सुरू झाल्या. दोन घटका गोळा गोळी झाली. हुजुरातचे पंधरा वीस घोडे ठार झाले. आह्मांकडीलही दहा पांच घोडीं ठार व जखमी मिळून आहेत. बसालतजंग निजामअल्लीकडे दहा तोफा व पांच हजार गाडदी व दोन हजार फौजेनिशीं येत आहे. टिपूही येणार ह्मणून वदंता आहे. फिरंगी गोरा पांचशें व गांडदी दोन हजार याप्रमाणें धौशाचें सूत्रें आणविला आहे. नबाबाचा जमाव झाला ह्मणजे बेदरचे बाहेर

निवणार. "

नं० १३१३ (मार्गशीर्ष शुद्ध
नोवेंबरचा प० पंधरवडा)

वामनराव गोविंद यांचें पांडुरंगरावास पत्र नलदुर्गाहून

भीमेवरून कूच करून मजल दर मजल श्रीमंत मीरमुसाखान याजवर चालिले आहेत. येथून पांच गावांची तफावत श्रीमंतांस मोंगलांस आहे. आज नलदुर्गास जाऊन किल्ला घेणेंचा मानस आहे. मोंगलाचे फौजेची तफावत थोडी आहे तेव्हां मोर्चे लावितील कीं न लावितील पहावें. आह्मी व भाऊ व राघोबादादा मिळून आमच्या फौजेची गणती ४००० झाली. सारे फौजेची गणती ३९००० झाली. खेरीज मुधोजी भोंसले पांच हजार. एकूण चाळीस हजार फौज आहे. याखेरीज गाडदी पांच हजार आहेत. तोफा दोनशें आहेत. सरंजाम चांगला आहे. राजश्री त्रिंबकरावमामा पांच हजार फौजेनिशीं पुढें गेले आहेत. त्यांच्या कहीची व मीरमुसाखानाच्या कहीचो गांठ पडली होती ह्मणून वर्तमान आलें आहे. श्रीमंत बहूत कृपा करितात. सकाळीं श्रीमंतानीं सारी फौज बाजूनें चालावयाची आज्ञा केली होती त्याज प्रमाणें चालिले. फौज पाहतां इंद्राची संपत्ति आहे! साबाजी भोंसले मोंगलांचे पाठीस पडले आहेत. मोंगलांची फौज भोंसले व धैाशा व पांढरे वगैरे मराठे मिळून हजार जमली आहे. आठ चार दिवसांत झूज व्हावेसें दिसतें"

नं १३१४ (पौष शु १०
२३ दिसेंबर)

वामनराव गोविंद यांचें पांडुरंगरावास पत्र छ० सवालचें—

श. १६९९ दादासाहेब व गंगाबाई यांच्या कारकीर्दी इ. स. १७७३
मोंगलावर मोहीम.

"श्रीमंतांस रुकनुद्दौलानीं वीस लक्षांची जाहागीर व औरंगाबाद द्यावी असा करार केले नंतर नबाब निजाम अल्ली खानच भेटीस आले. भेटी झाल्या. डेऱ्यास आले. मेजवानी झाली. दोन घटका खलबत झालें. ऊभय पक्षीं समक्ष निखालसतेचें बोलणें झालें तेव्हां श्रीमंतांनीं कृपा करून जहागीर माफ केली. मोठेसें काम लागेल तेव्हां नबाबानींच यावें असा करार झाला. उपरांतिक वस्त्रें दिलीं. दोन हत्ती व दोन घोडे, शिरपेंच, मोत्यांची कंठी, मोत्याची माळ, व जेगा येणें प्रमाणें बहुमान दिला. रात्रींचेच बेदरास निघून गेले. श्रीमंतांचा प्रताप समर्थ! उभय पक्षीं सख्य झालें ही मोठी गोष्ट झाली. राजश्री साबाजी भोसले यांचें सूत्र राजश्री त्रिंकरावमामा यांजकडे आलें आहे. पत्रें ही याच प्रमाणें सरकारांत आलीं होतीं. तह करूं नका ह्मणून मामास लिहून पाठविलें आहे. भोसले टोंक्याचे सुमारें आहेत. महंमदइसफ व सुमेरसिंग यांस जमीयतीसुद्धां व चार तोफा हजार पांचशें राऊत [सुद्धां] यवनाचे सल्याचे पूर्वीच राजश्री मामाकडे रवाना केले आहेत. तह झाले नंतर फिरून गाईकवाडाची फौज ही तिकडेच रवाना केली आहे. तूर्त खासा स्वारी पंचमहालांत चालली. सुरापुर व गदवाल वगैरे संस्थानची खंडणी घ्यावी, अर्काट पावेतों जावें, अर्काटकरांचें पारिपत्य करावें, चंदावर घ्यावें, असा इमदा मनसबा योजिला आहे. नबाबाकडील, फौज ही समागमें येणार."

नं० १३१९

(२६ दिसेंबर.)

मोरो बल्लाळाचें वामनराव व परशरामभाऊ यांस पौष शु० १२ रविवारचें पत्र.

" मोंगलाशीं तह झाल्याचा मजकूर लिहिला तो कळला पुढें सुरापूर व गदवाल येथील खंडण्या घेऊन अर्काट पावेतों जावें असा मनसबा आहे

ह्मणून लिहिलें तें कळलें श्रीमंतांची मर्जी रक्षून बहुध सावधपणें असावें."

नं१३१६ (पौषशु० ३
१६ दिसेंबर)

परशुरामभाऊंचें गंगाधरराव व पांडुरंगराव यांस पत्र छ० १सवालचें "यवन बेदरचा किल्ला पाठीसी घेऊन उतरला. श्रीमंतानीं दोन दिवस तोफांचे गोळे गोटावर मारिले. मग भोंवते फिरून यवनाची कही रस्त पंधरा दिवस बंद केली. तेव्हां वकिलाचे हातें पंधरा लक्षांची जहागीर द्यावी असें बोलून सूत्र लागलें. तेव्हां श्रीमंतांची मर्जी जे रुकनुदौल्यास वस्त्रें व हत्ती देऊन निरोप दिला. दुसरे दिवशीं नबाव येऊन भेटी झाल्या. मेजवानी होऊन त्यास वस्त्रें, दोन हत्ती व दहावीस हजारांचें जवाहीर नबाबास दिलें. बोलणें चालणें खलबत झालें. एकमेकांनीं समयास कुमक करावी, श्रीमंत कैलासवासी यांणीं भाऊपणा चालविला त्या प्रमाणें चालवावा, पंधरा वीस लक्षांचा मुलुख द्यावा, असें बोलत होते. नबाब येऊन भेटला ह्मणून माफ केला! सालमजकुरीं बेदरपावेतों प्रांत अजीबाद खराब झाला. पुढें पांच लक्षांची जाहागीर चिरंजीवास द्यावी असा करार ठरोन तह झाला. दुसरे दिवशीं तेथून कूच करून दरमजल सुरापुराकडे जात आहेत"

नं१३१७ (पौषव० १२
९ जानेवारी)

गंगाधररावास वामनराव यांचें पत्र तुंगभद्रा दक्षिण
तीरच्या मुक्कामाचें छ० २९ सवालचें.

" श्रीमंतांची व नबाब बसालतजंग यांची भेट झाली. राजश्री मुरारराव घोरपडे यांस बोलाऊं पाठविलें आहे. राजश्री आपाजी राम बोलून हैदर

खान याजकडे गेले. तिकडून जाबसाल येईल तेव्हां कळेल. ”

नं १३१८ (२१ डिसेंबर)

अनूबाई घोरपडे यांचें पांडुरंगरावास पत्र पौष शु ० ८ मंगळवारचें.

“ लष्करांतून आतांच माणसें आलीं. चिरंजीव राजश्री दादांचा व निजाम अल्ली यांचा तह झाला. वीस लक्षांची जहागीर मोंगलानें चिरंजीवास दिली. उभयतांच्या भेटी झाल्या. मोंगलानें निरोप समयीं ‘ कांहीं पोटास देणें ’ ह्मणून गौरवानें मागितल्यावरून फिरून तोच सरंजाम दादांनी मोंगलास दिला. सल्ला होऊन चिरजीव फौजसुद्धां पंचमहालांत गेले. पंचमहालची खंडणी होऊन हैदर नाईक याजवर दबाव घालावा ऐसें पत्रांत लिहिलें आहे. ”

नं० १३१९ श्रीगणराज. (माघ वद्य जानेवारीचा दु० पंधरवडा)

चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांसी आशीर्वाद. उपरी तुह्मी पत्र पाठविलें तें व कोन्हेर रायांनीं पाठविलें तें पावलें. सविस्तर वर्तमान कळलें. लष्करचें आपाजीपंताचें पत्र काल पाठविलें होतें. आज गुरुवारीं अस्तमानी बाबांचें पत्र आलें तेंच बजिन्नस पाठविलें आहे. पाहून माघारें पाठवून देणें [लष्करांत] अद्याप इकडील वर्तमान कळलें नाहीं. परवां (श्रीमंतांची) भवानरायाबरोबर कटकट झाली होती. फिरून त्यांची समजाविशी झाली. हें वर्तमान कळलेवर मागती फूट पडेल ! एकाबरोबरच एक जाहलें असते ह्मणजे बखेडा न पडतां.

---

१ पत्र पांडुरंगरावाचें गंगाधररावास. २ वामनरावांचें. ३ पुण्यांत बारभाईचें कारस्थान उभारिल्याचें. ४ प्रतिनिधीबरोबर. ५ प्रतिनिधीबरोबर इतर सरदारांनीं दगा करून ‘मुख्यास विश्वरूप दाखविलें’ असतें तर

बाजारवर्तमानाकडे न पाहतां तुह्मी जलदीनें जाऊन नानाजवळ प्रविष्ठ व्हावें. काय नशिबीं असेल तें होऊं, परंतु जरूर जावें. लष्करचें पत्र पाहून बाईकडे पाठवून देणें. तीं पाहून (आह्माकडे) पाठवितील. बहुत काय लिहिणें. हैबतीबरोबर पत्र पाठविलें तें पावलें. माणकोपंताचें हीं पत्र पावलें. माणकोपंतास तूह्मी जाल त्याच सुमारें आणविणें. (साताऱ्याच्या) किल्ल्याखालीं फौज आहे ती अंतऱ्यानें टाकून जलदीनें जाणें. बहुत खबरदारीनें एखादा रातवा खपून जाणें. हे आशीर्वाद. नक्कल न पाठविली तरी कामास येईल परंतु (पत्रें) तासगांवीं पाठवावीं. हे आशीर्वाद.

नं० १३२०

विसाजी नारायण वाडदेकर याचें वामनरावास पत्र.
पौष वद्य १४ मंगळवारचें पुण्याहून.

"हिंदुस्थानांत रोहिल्यानें तमाम अम्मल उठविले ह्मणोन झांसीहून व दिल्लीहून पुण्यास लिहिलीं आलीं. पुण्यास साबाजी भोंसला येणार ह्मणून पळण झाली होती. परंतु मामा व भोंसले एकत्र झाल्यामुळें आतां सर्व स्वस्थ आहे. मुंबईकर इंग्रज यानें तयारी बहुत केली आहे. तोफा आरमार जेजाला गार्दी वगैरे तयारी जाली आहे. माघ शुद्धांत बाहेर पडणार. आणि साष्टी घ्यावयास येणार ह्मणोन बातमी आली त्याजवरून पुण्याहून साष्टीस पांच सातशें हशम व पांचशें राऊत येणें प्रमाणें रवाना जाले आहेत. अद्यापि बाहेर निघाला नाहीं. निघणार ह्मणोन आवाई आहे.

---

१ नानाफडणिसांजवळ पुरंदरास २ परशुरामभाऊची आई जानकीबाई हिजकडे तासगांवांस ३ रातवा खपणें=रात्रीची मजल मारणें ४ नजीबउद्दौला

तयारी तो सामान सुद्धां केली आहे. ''

नं० १३२१

(१९ दिसेंबर)

वामनरावांचें पांडुरंगरावास हुमणाबादेहून पत्र पौष शुद्ध २ चें. श्रीमंत बेदराहून निघाले ते दर मजल येथें आले. आमची श्रीमंतांची गांठ याच तळावर पडली. काल आज येथेंच मुक्काम झाले. राजश्री मुधोजी भोंसले यांस येथूनच निरोप देणार. गाईकवाडास काल मेजवानी झाली. त्यांस गुजराथेंत रवाना करणार. श्रीमंत काडलूर संगमावरून पुढें जातात.

नं० १३२२

(माघ वद्य ३
३० जानेवारी)

नारो आपाजी तुळसीबागवाले यानीं वामनरावास पत्र
पाठविलें त्याची नक्कल. (परशुरामभाऊचें हातची)

" सेवेशीं नारो आपाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान तागायत छ० १७ जिल्काद पावेतों यथास्थित असे. विशेष. श्रीमंत सौभाग्यवती पार्वतीबाई व श्रीमंत मातुश्री गंगाबाई यांची आज्ञेप्रमाणें किल्ले पुरंदर येथें रवानगी केली. समागमें राजश्री सखारामपंत व नाना फडणीसही गेले. सेवेशीं विदित व्हावें ह्मणून लिहिलें आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना. "

नं० १३२३

(माघ वद्य १४
९ फेब्रुवारी)

गंगाधररावाचें पांडुरंगरावास पत्र छ० २७ जिल्कादचें.

" पुरंदरीं ११०० स्वारांची गणती झाली. भोंसले व त्रिंबकरावमामा अद्यापि आले नाहींत. सातान्यास आलेली फौज जेजुरीवर उतरली आहे."

लष्करांत फितूर

नं० १३२४ (फाल्गुन वद्य १०
७ मार्च)

कोन्हेरराव त्रिंबक यांचें पांडुरंगरावास पत्र २३ जिल्हेजचें
पुरंदराहून–

" बातमीविशीं उभयतां कारभारी फार शब्द ठेवितात. लष्करांतून इतर लोकांचे आपआपले घरीं लिहिलें येतें परंतु आह्मांकडून बातमी कांहींच कळत नाहीं ! "

नं० १३२५ (६ मार्च)

गंगाधररावांचें पांडुरंगरावास पत्र फाल्गुन कृष्ण ९ चें.
राजश्री हरीपंत फडके राजश्री त्रिंबकरावमामाकडे काल गेले. जलदीनें त्यांनीं व भोंसले वगैरे याणीं जावे जलदीस्तव पाठविले आहेत मोंगलाच्या व मामाच्या भेटी अक्कलकोटाजवळ झाल्या.

नं० १३२६ श्री (माघ वद्य ६
२ फेब्रुवारी)

चिरंजीव राजश्री तात्यासाहेब यांसी प्रंती वासुदेव धोंडदेव. आशीर्वाद विनंती. तागायत छ० २० जिल्काद पावेतों यथास्थित कणेकलचे मुक्कामीं असों. विशेष. छ० १९ जिल्कादीं राजश्री पंत प्रतिनिधी भवानराव यांजवर हल्ला श्रीमंतानीं नेमिली. मोठी गडबड झाली. हुजुरातची व भवानराव यांची गोळागोळी होऊं लागली. तोफा श्रीमंतानीं तयार केल्या, सोडल्या मात्र नाहींत. हें वृत्त कळून सारे फौज सुद्धां (आह्मी) तयार होऊन भवानराव याचे अघाडीस आलों. आज भवानराव याची गत तीच उद्यां आपली असें जाणून अघाडीस आलों तों प्रतिनिधींनीं मध्यस्थ होते त्यांसीं बोलून श्रीमंतांची भेट घेतली. प्रतिनिधींचीं दोन

घोडीं गोळ्या लागून ठार पडलीं. स्त्री समागमें आहे. निदान समयीं मारून टाकावी आणि आपण मरावें हाच निश्चय करून स्त्रीस आपणाजवळच झुजांत नेली होती. श्रीमंतांचे आघाडीस सहा घटका पावेतों गोळागोळी झाली. आह्मीं तयार होऊन आलों तेव्हां श्रीमंतांस संदेह प्राप्त झाला. 'तूह्मी किंनिमित्य आलां' ह्मणून हुजरे आले. कारकून ही आले. तेव्हां यांणी सांगितलें जे "आपली स्वारी तयार झाली हे वर्तमान कारकुनानें आह्मांस चिठ्ठी लिहिली त्याजवरून आह्मी तयार होऊन सेवेशीं हजर झालों पुढें आह्मांस काय आज्ञा" असें पुसिलें, तेव्हां सांगितलें जे "तुह्मीं आमच्या पिछाडीस राहणें अगर बाजूस राहणें" असें सांगितलें परंतु वचनाचें प्रमाण माहीतच आहे हें जाणून डाव्या बाजूस दीड कोसाचे तफावतीनें राहिलों. बुणगें लक्ष्मेश्वरास पाठविलें घोड्यावरून जीन ठेंऊन उभे होतों. सायंकाळचे चिंतो विठ्ठल व बजाबा आले आठ दिवस आपले अंगूस कोणेविशीं गोष्ट घडलीयास आपण जामीन असें वचन प्रमाण त्यांचें घेऊन मग जीन उतरलें. प्रहर रात्रौ दाजी भेटीस गेले. प्रमाण झालें दोन तास रात्रौ भोजन झालें. सोहित्य धायगुडे आदिकरून होते. सर्वत्रांनी मिळून मुख्यांस विश्वरूप दाखवावें तें आठ दिवसांत होऊन सत्वरच भेटीस येत असों. असा संकेत आहे सूचनार्थ लिहिलें आहे. बुणगें आणावयाचें आहे. तेंही येईल. गडबडीमुळें लिहिलें नाहीं व लिहावयाचें नाहीं हें जाणून सूचना लिहिली आहे. विदित होणें. बुणगें मिळेतों पावेतों तिहींकडील जेवणार एकत भोजन होतें हे आशीर्वाद.

---

१ वामनराव २ सोबतीस ३ तिन्ही पथकांतली ब्राह्मण मंडळी.

लष्करांत फितूर

नं १३२७

(माघवद्य ७
३ फेब्रुवारी)

श्रीगणराज

श्रियासह चिरंजीव राजश्री पंढरीनाथ तात्या व बाळ यांसी प्रती वामनराव गोविंद व परशुराम रामचंद्र. आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत छ० २१ जिल्काद गुरुवार मुक्काम हर्येग्रावानजीक होन्नूर तालुके रायदुर्ग वर्तमान यथास्थित जाणून स्वकीय कुशल लिहीत जावें. विशेष इकडील वर्तमान राजश्री भवानराव प्रतिनिधी यांचे गोटा भोंवती चौकी दोन तीन हजार फौजेची पांच सात रोज श्रीमंतांनीं बसविली. परवां भौमवारचे रात्रीं सरकारची फौज तयार होउन प्रतिनिधीवर हल्ला करावयास गेले. आमचा कारकून सरकारचे गोटांत होता त्यानें सुचना लिहिली कीं याज प्रमाणें वर्तमान आहे. आपणास सरकारचें बोलावणें गेलेंच असेल तर तयार होऊन यावें.' आह्मांस सरकारचे गोटास पाण्यामुळें दोन कोसाचें अंतर होतें. तेथून आह्मी तयार होऊन सरकारचे अघाडीस येईंजे पर्यंत सूर्योदय झाला. बातमी लागतां पहाटेचे चारघटका रात्रीं मध्यस्थी पडून प्रतिनिधीचें समाधान झालें असें वर्तमान कळलें. आह्मी श्रीमंताकडे कारकुनाबरोबर सांगून पाठविलें जे " स्वारी तयार झाल्याचें वर्तमान कळून आह्मी तयार होऊन आलों पुढें आज्ञा काय ? " तेव्हां उत्तर झालें कीं, " तुह्मांस बोलावूं पाठविलें नव्हतें. कां आलां?" तेव्हां कारकुनानें जाबसाल केला कीं, आपले सान्निध कारकून ठेविला त्याणें तयारीचें वर्तमान कळविल्यावरून तयार होऊन आलों. तेव्हां आज्ञा झाली कीं जाऊन उतरावें. त्यास रात्रौ तयार होऊन बुनगें सुद्धां

---

१ पांडुरंगराव व गंगाधरराव २ही कर्नाटकांतली एकनदी हिला तिकडे " हागिरी असेंही ह्मणतात

लष्करांत फितुर

गोटांतून निघालों त्यामुळें बुनगें एकीकडे राहिलें. आह्मी एकीकडे गेलों. भाऊ सरकारचे अवाडीस जाऊन, उभे राहिले होते. त्यास सारे एक जागा होईजे पर्यंत प्रहर दिवस आला. श्रीमंतांचे चित्तीं संशय येऊन वरचेवर निरोप पाठवीत कीं कां अद्यापि उभे? आमची तो याप्रमाणें चुकामूक झाली. तिकडील उपरांत आह्मांस संशय वाटला. बुनगें एकीकडे गेलें. आह्मीं फौजेसुद्धां उजवे बाजूस पाणी पाहून उतरावयास गेलों परंतु जीन तसेंच होतें. तिकडील एक प्रकार वाटला. तसेंच संध्याकाळ पावेतों होतों. उपरांत राजश्री चिंतो विठ्ठल व बजाबा आले तीर्थस्वरूप राजश्री दोंजीस घेऊन श्रीमंतांकडे गेले. तेथें बोलणें चालणें झालें. राजश्री मुरारराव घोरपडे सेनापती हे मध्यस्थ होऊन उभयपक्षीं संशय पडले होते ते निवृत्त केले. याजप्रमाणें वर्तमान झालें. त्यास, तेथील प्रकार समजलेलाच आहे. त्यांचें अंतर शुद्ध आहे हा भरंवसा आहे नाहीं हें कळतच आहे. तूर्त याजप्रमाणें झालें. पुढें परिणाम लाविणार श्रीसमर्थ आहे! बुनगें चुकून गेलें तें आणावयास पाठविलें आहे तेंही येऊन मिळेल. कित्तुराकडे ऐवज यावयाचा आहे तो उगवावयास जाण्यास निरोप आठ पंधरा दिवशीं देतों ह्मणून करार करून घेतला आहे. या पत्राची नक्कल करून तासगांवास व कुरुंदवाडास हें वर्तमान कळावयाकरितां पाठवावें. मंगळवेढ्यांस[१] ही नक्कल करून पाठविणें. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद

नं १३२८

श्री

[फाल्गुनशु १२
२३ फेब्रुवारी]

राजश्रीया विराजित राजमान्य राजश्री नरसिंगराव
स्वामीचे सेवेशी

---

१ पुरुषोत्तम कृष्ण पटवर्धन मंगळवेढेकर.

श १६९५ दादासाहेब व गंगाबाई यांच्या कारकीर्दी इ.स. १७७४
लष्करांत फितूर

पोष्य सखाराम भगवंत. साष्टांग नमस्कार विंनती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जावें. विशेष. राजश्री विष्णु नरहर लष्कराहून आले त्याणीं सविस्तर मजकूर सांगितला तो कळला. त्यास तुमचें लक्ष इकडे पुरतेंच आहे व हल्लीं मशारनिल्हे याणीं खातरजमा केली. त्यास राजश्री भवानराव पंडित प्रतिनिधि व राजश्री वामनराव गोविंद हे उभयतां तुह्मांस सांगतील त्याप्रमाणें ते व तुह्मीं मिळोन कर्तव्य तें करावें. सर्व गोष्टी तुह्मांस समजल्याच आहेत. मेहनतीचे कारस्थानीचे दिवस हेच आहेत. सर्व एकदिल होऊन कर्तव्यार्थ करावा. रवाना छ० ११ जिल्हेज. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे विंनती.

नं १३२९ **श्रीगणराज** [२८ फेब्रूवारी]

अपत्यें गंगाधरानें साष्टांग नमस्कार विंनंती येथील कुशल तागायत फाल्गुन कृष्ण द्वितीया इंदुवासर मुक्काम नजीक पुरंदर वर्तमान यथास्थित असे. विशेष. इकडील वर्तमान तर फौज तीन हजारपावेतों जमा झाली आहे. वरचेवर लोक येतात. तमाम लोक हिंदुस्थानचे स्वांरीचे आपल्या घरीं आहेत त्यांस श्रीमंत राजश्री दादासाहेबांचीं पत्रें तमाम आलीं आहेत कीं पत्र पावतांच तयार होऊन येणें• या प्रमाणें पत्रें आलीं आहेत. राजश्री बाबूजी नाईक यांस पत्र आलें आहे कीं, फौज सुद्धां तयार होऊन सत्वर येऊन सामील होणें. असें पत्र आलें आहे. ते बारामतीहून येथें आले आहेत. मेजवानी झाली. शपथ बेलभांडार झाला. आज अथवा उदईक बारामतीस जाणार. ठेवावयाजोगे नव्हते यास्तव निरोप दिला- राजश्री मोरोबादादा यांचे बोलणें राजश्री नाना फडणीस यांशीं

---

१ गंगाधररावाचें पांडुरंगरावास पत्र.

लष्करांत फितूर

झालें होतें परंतु मधीं कांहीं संशय आला याजकरितां जुन्नरास मुंजीस गेले. राजश्री नाना फडणीस मुंजीच्या निमित्यें करून जाऊन बोलून चालून निखालसता करून घेतली. पत्र पाठवितील तेव्हां यावें येणें प्रमाणें करार करून आले आहेत. राजश्री त्रिंबकराव मामा व भोसले व दर्याबाई येणें प्रमाणें तीस पस्तीस हजार फौज एकदील आहे. व मोंगलाकडील धौशा सरदार आहे. त्यास ' सामील होणें ' ह्मणून मोंगलाचीं पत्रें गेलीं त्यास सामील करून घेऊन गुंजोटीवरून कूच करून दादासाहेबांचे सुमारें (मामा) जातात. मोंगल येदगिरिजवळ होता तो आवशाकडे जातो याचें कारण काय तर श्रीमंत राजश्री दादासाहेब यांनीं आबाजी महादेव यास मोंगलाकडे पाठविलें आहे. ते मागाहून येऊन जवळ पावतील, त्यास तर इतल्ला देणें नाहीं, यास्तव गांठ तोडावी या अर्थें आवशाकडे जाणार. इकडे मोंगलाचे कागदपत्र प्रमाणाचे आले. लढा तिलमात्र राहिला नाहीं. लष्करचें वर्तमान मात्र कळत नाहीं ही चिंता आहे. राजश्री विष्णु नरहर लष्कराहून आले ते आपणास मिरजेंत भेटून आले. त्यांणीं वर्तमान सांगितलें असेल. राजश्री त्रिंबकरावमामा फौज सुद्धां त्या लष्कराजवळ गेल्यावर संकेताप्रमाणें सारे एकत्र होतील आणि दादासाहेबांस धरितील अथवा लुटितील असें दिसतें. आमचीं पत्रें लष्कराहून येत नाहींत हीच चिंता आहे. राजश्री सखारामपंत व नाना फडणीस येथील बंदोबस्त करून सप्तऋषीस जाऊन तिकडून पुढें हलके हलके दादासाहेबांचे रोखें होणार. विदित होय हे विज्ञापना.

---

१ साबाजी भोंसले.

दादासाहेब परत फिरतात

नं १३३० श्री (फाल्गुन शु०
फेब्रु. प. पंधरवडा)

पुरवणी तीर्थरूप मातोश्रीबाई वडिलांचे सेवेशीं—

विनंती. ही बातमी त्यास कळतांच पारघाटानें खालीं उतरून राजगड तोरण्यानें चढून माघवद्य एकादशीस पुण्याचे मुक्कामीं येऊन उभयतां जुनरास गेली. राजश्री सखारामपंत बापू व नाना फडणीस व राजश्री हरीपंत फडके पुरंदरास आहेत. पुण्यांत राजश्री नारो आपाजी पुरंदराहून आज्ञा येते त्याप्रमाणें कारभार करितात. सरकारच्या वाड्यांतून वस्तभाव देखील कोठींतील जिन्नस समेत पुरंदरास नेला. जवाहीरखाना मात्र सिंहीगडास नेला. इतकें व्हावयास कारण काय ह्मणाल तरी मुख्यत्वें-करून सौ॥ पार्वतीबाई व गंगाबाई यांस मारून टाकावें असे मारेकरी सांपडले. त्यांणीं नावेंही सौ॥ आनंदीबाई * यांचीं सांगितलीं. हा प्रकार कळल्यापूर्वी वाड्याच्या बंदोबस्ताकरितां ह्मणून सांगत होते. मागें जाहल्या कार्याचा सूड घ्यावा हें कारभारी यांच्या अंतर्यामी होतेंच. इतक्यांत हें ही निमित्त ह्या गोष्टीस अनुकूल जाहलें. राजश्री सखारामबापू व नाना फडणीस व हरीपंत फडके इतक्या
उभारणी करून दोन अडीच हजार रावतांनिशीं किल्ल्यास राहून मुलकी बंदोबस्त करितात गंगाबाईच्या नांवाच्या सनदापत्रें व नारायणराव यांच्या नांवाचे शिक्के करितात. चहूंकडे फौजांसही बलावणीं गेलीं आहेत. अवघ्या सावकारांस बलावून नेलें होतें. त्यांस धीर भरवंसा दिला.

---

१ लिंबकराव मामा पेठे यांची स्त्री वेणूबाई यांनीं आपल्या मातोश्री अनूबाई घोरपडे इचलकरंजीकर (बाळाजी विश्वनाथ पेशवे यांची कन्या) यांस लिहिलेलें हें पत्र असून याचा हा मधला एकच बंद मिळाला. २ उभयतां कोण. * रिकामी जागा सोडिली आहे तेथील अक्षरें कसरीनें खाल्लीं आहेत.

दादासाहेब परत फिरतात

त्यांणीं सखारामबापूचे नांवचीं खतें ध्यावीं व लागेल तितका पैका ध्यावा असें कबूल केलें. कारभाऱ्यांनीं सर्वस्व आपले भरीस घालावें पण (दादा-साहेबांचें) पारिपत्य पुरतें करावें असें चित्तावर धरिलें आहे. जितके तिकडल्या पक्षाचे होते तितक्यांच्या घरीं चौक्या बसल्या. सदाशिव व रामचंद्र यांचा जामदारखाना खणिला. चिंतोविठ्ठल व विसाजीपंत लेले यां व्यतिरिक्त सर्वांस उपद्रव लाविलाच आहे राजश्री केशवराव कोतवाल याच्या पायांत बिडी घालावी असें केलें परंतु—

नं १३३१ **श्रीगणराज** (८ मार्च)

अपल्ये गंगाधरानें साष्टांग नमस्कार विनंती तागायत फाल्गुन कृष्ण एकादशी भोमवासर वर्तमान यथास्थित असे. विशेष. काली जासुदास पत्रें लिहून दिल्यावर वर्तमान आलें ह्मणून जासुदास ठेऊन घेतलें होतें. वर्तमान तर राजश्री त्रिंबकरावमामा ची व रुकनुद्दौलाची भेटी गुंजोटीनजीक वद्य पंचमी बुधवारीं झाली दुसरे दिवशीं नबाबाची भेटी होणार (होती) तदोत्तर कूच करून श्रीमंत राजश्री दादासाहेबांच्या रोखें जातात. येणें प्रमाणें पत्रें आलीं. आज पावेतों भीमेवर येऊन लष्करच्या रोखें जात असतील. श्रीमंतांचें लष्कर कपाट संगमावर आलें. राजश्री मुरारराव घोरपडे यांस निरोप दिला. राजश्री भिवराव दि० तोफखाना यांस व गोपाळ नाईक तांबवेकर यांस संधानासाठीं श्रीमंतांनीं रवाना केलें ते ।चिमल ग्यास आले. पुढें इकडे येतात. तीर्थस्वरूप राजश्री वामनराव बाबांच्या संधानासाठीं भिवराव व गोपाळ नाईक व बाजीपंत निसबत फडणीस येणे प्रमाणें गेले होते काय बोलणें झालें न कळे कित्तूराकडे त्यांस जावयाचा

---

१ पत्र पांडुरंगरावास गंगाधररावाचें. २ जाणार होते.

दादासाहेब परत फिरतात

निरोप देऊन आपण कृष्णेच्या पाण्यानें येणार ह्मणून राजश्री विसाजी कृष्ण यांच्या चिरंजीवाचीं पत्रें आलीं. आपणाकडे पत्रें आलीं असल्यास लिहून पाठवावें. बातमी येत नाहीं इतकेस्तव राजश्री नाना व बापू या दोघांस फार वाईट वाटतें. यास्तव वडिलीं तीर्थरूपांस लिहून इकडे दररोजीना एक पत्र यावें याविशीं आपण लिहावें. आपण राजश्री वासुदेवकाकास लिहून वरचेवर बातमी लिहून आणवून वरचेवरी लिहीत जावी. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

नं १३३२ श्री [फाल्गुन वद्य ३० १२ मार्च]

पै॥ छ० २८ जिल्हेज मंदवार.

सेवेशीं विज्ञापना. तागायत भृगुवार अडीच प्रहर दिवसपर्यंत स्वामीचे कृपावलोकनें करून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. आज प्रातःकाळीं सांडणीस्वार येथून रवाना केला आहे. येऊन पावला असेल. त्या अलीकडील वर्तमान तर लष्कराहून राजश्री बहिरजी घोरपडे यांजकडील शिलेदार कारकून आतांच येथें आला. काल सकाळच्या दोन तास दिवसास सिद्धनाथावर लष्कर होतें ते कूच होऊन गेल्यानंतर निघून इकडे आला. त्याचें जबानीचें वर्तमान जे खासा स्वारी चार तास दिवस आल्यानंतर चालों लागत होती ते काल एक तास दिवस आला कीं नाहीं तों स्वारी चालूं लागली. याचें कारण राजश्री मामा भंडार कवड्यास फौजेसह आले. पुढें दहा बारा हजार फौज (त्यांनीं) रवाना केली आहे. याजमुळें अलीकडील[२] लष्कर गडबडलें आहे. काल प्रातःकाळीं

---

१ हें कर्नाटकांतील कोणा कमाविसदाराचें वामनरावास पत्र. २ दादासाहेबांचे

दादासाहेब परत फिरतात

लष्कर कूच झाल्यानंतर अघाडीस बुनगें जात होतें तें मामाकडील फौजेनें लुटिलें अशी आवाई तळावरील लोकांनीं ऐकून खरखटी भांडी धुवावयाची फुरसत न होतां तशींच खरखटीं भांडींच लादोन निकडीनें गेले. पंढरपुरापावेतों जावें अशी यांची योजना होती ह्मणून आलेले कारकून सांगत होते. मुख्य लष्करांत अवसान नाहीं. मामांचें बल भारी दिसतें. अशा समयीं स्वामींनी कपाटसंगम डावा बराच लांब टाकून लांब लांब मजली करून गेल्यास इकडील लष्करचें कांहीं (भय) नाहीं. सर्व स्वामीच्या ध्यानांत असेल. मी लिहावयास शक्त नाहीं. ऐकिलें वर्तमान श्रुत झालें पाहिजे यास्तव सांडणीस्वार माघारा पाठविला आहे लष्कर तडाका देशाकडे चाललें हें वर्तमान तहकीक आहे. सेवेशीं श्रुत होय. कृपा केली पाहिजे हे विज्ञापना. कालचा मुक्काम कोल्हेरचा झाला. ग्रहण तेथेंच व्हावें असें ही आहे. लष्करांतील सावकार वगैरे सरदारांनीं देखील अधिक आगळें ओझें होतें तें जिकडे सोय फावली तिकडे लावून देऊन सडे आहेत. मुख्यांच्या तोंडावर तेज कांहीं नाहीं. काळिमा आली आहे. खर्चास जवळ पैसा नाहीं याजमुळें लष्करांत सावकारांचे गुमास्ते कोणी होते त्यांस धरून बसवोन पैका मागतात. ते पैसा आपल्याजवळ नाहीं ह्मणतात. "खरें लटकें ह्मणाल तर चालल्या वह्या पहा" ह्मणतात. असा विचार लष्करांत झाला आहे. हे विज्ञापना.

नं १३३३ श्री (११ मार्च)

सेवेशीं विज्ञापना तागायत फाल्गुन वद्य १४ भृगुवार अरुणोदयपर्यंत स्वामीचे कृपावलोकनें करून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष.

---

१ कोणा कारकुनाचें वामनरावास पत्र.

श.१६९६ दादासाहेब व गंगाबाई यांच्या कारकीर्दी इ.स. १७७४

दादासाहेब परत फिरतात

स्वामींनीं सुतर स्वाराबरोबर छ० २४ जिल्हेजचें आज्ञापत्र पाठविलें तें काल प्रहरीं दिवसास घरास पावलें. मी कांहीं कार्या निमित्य गजेंद्रगडास गेलों होतों. कालच तास रात्रीस पत्र पावून सनाथ झालों. पत्रांतील भावार्थ समजलों. मिरजहून राजश्री चिंतोपंत आले ते गोखले यांचे घरीं उतरलें होते. मी ही तेथें होतों. स्वामींचें लष्कर कोठें आहे, काय वर्तमान, हें मला राजश्रीनीं पुसिलें तेव्हां सविस्तर सांगितलें. कंपलीस आपला मुक्काम आहे ही बातमी आह्मांस समजलीच होती. वाटेच्या मजली व मार्गी वाटेवर अमुक गांव लागतात हें यादीवर लिहून दिलें. काल प्रातःकाळीं घोड्यांस नालबंदी करून कनकगिरीचे मुक्कामास मशार निल्हे गेले. मी घरास आलों. तेव्हां (ते आतांपर्यंत) स्वामीपाशीं आलेच असतील. उत्तरेकडील सविस्तर वृत्त निवेदन करितील त्यावरून ध्यानास येईल. या लष्करचें वर्तमान तर गलगल्यावर लष्कर गेलें. बागलकोटास मोर्चे द्यावे असा मनसबा होता परंतु राजश्री मामा चाळीस हजार फौजेनिशीं भोंसला व घोशा आदिकरून अबजलपुरानजीक भीमातीरास आले आणि या लष्करचे पेंढारी अघाडीस कांहीं गेले होते त्यांचीं तट्टें मामांच्या फौजेनीं पाडून नेलीं आणि लष्करांत धर नाहीं याजमुळें शहास न गुंतता निघून गेले. लष्करांतून एक गृहस्थ आला त्यानें सांगितलें कीं हेरदो फौजेचा मुकाबिला मात्र व्हावा ह्मणजे इकडे कोणी रहात नाहीं. × वगैरे मिळून चार पांच हजार फौज व गाडदी इतके मात्र इकडील ममतेचे. त्यांतही ते समयीं कोण जातात न कळे. मुख्य इकडील यांचें अवसान परिच्छिन्न गेलें आहे. दोन्ही फौजेचा मुकाबिला आठ दहा दिवसांत व्हावा असें आहे. परंतु राजश्री मामा आपली वाट

---

१ दादासाहेबांच्या दोन्ही × येथें मुळपत्र फाटलें आहे

दादासाहेब परत फिरतात

पाहतात. आपण जातांच तोंड लागतें. बुनगें टाकून खाले वाटेनें गेल्यास सोय ठीक आहे. दोहों तिही मजलीनें मामाची व आपली गांठ पडेल. या लष्करांत तर आपण निघून तिकडे गेलांच अशी आवाई आहे. याजमुळें खरें किंवा लटकें ह्मणून सरकारच्या दहा वीस जोड्या व कारकून आपल्या लष्करांत बातमीस आले आहेत. याच मार्गें गेले. शोध घ्यावा. आढळलें वृत्त सेवेशीं श्रुत व्हावें ह्मणून लिहिलें आहे. विदित होय हे विज्ञापना.

नं १३३४ फाल्गुन वद्य
मार्च प. पंधर.]

पांडुरंगराव यांचें गंगाधररावास पत्र

" मुलुख लुटाल तरी तुमचें पारिपत्य परिछिन्न होईल असें सांगितलें त्यावरून मुलुख लुटीत नाहीं. तीर्थस्वरूप यांचे गोटाशेजारीं येऊन उतरतात. राजश्री मुरारराव याचाही डौल इकडेच आहे ह्मणून भास्करपंतांनीं लिहिलें आहे. राजश्री मामा व रास्ते व गाईकवाड व भोसले मिळून पंचवीस तीस हजार फौज आहे आंवढ्याचे सुमारें आहेत. ते मोंगलांस भेटून श्रीमंतांकडे येणार अशी वदंता आहे."

नं० १३३५ श्री [चैत्र शु०
२१ मार्च]

राजश्रीया विराजित राजमान्य राजश्री गंगाधररावजी स्वामीचे सेवेशीं पोष्य हरी बल्लाळ साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल तागायत

१ या पत्राचा एकच बंद मिळाला त्यांतील या ओळी येथें दिल्या आहेत २ दादासाहेबांस गांठण्याकरितां ३ फडके

दादासाहेब परत फिरतात

छ० ८ मोहरम मुक्काम सातारा जाणून स्वकीय कुशल लिहित असलें पाहिजे. विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावलें लिहिलें वर्तमान कळलें. आह्मी राजश्री मामांचे लष्करांत पोंचल्यानंतर श्रीमंत सातारियास येतात हें वर्तमान कळल्यावर दोन तीन हजार फौज समागमें देऊन येथें पाठविलें. किल्याचा बंदोबस्त करावा व सातान्यास गेल्यानें आवई पडेल असें जाणून रवाना केलें. काल येथें आलों. किल्याचा बंदोबस्त चांगला आहे. श्रीमंत मिरजेचे अलीकडे आले नाहींत. अशी बातमी येत्ये. आपणाकडे येतच असेल. मामा फौजसुद्धां कऱ्हाडचे सुमारें येणार होते. परंतु श्रीमंत मिरजे पुढें आले नाहींत हें कळल्यावर कऱ्हाडाकडे येणार नाहींत मिरजेचा रोख धरतील असें दिसतें आपल्या तालुक्याच्या बंदोबस्ताचा प्रकार तर सोंगल भोसले मामा मिळून पन्नास हजार फौज जमा झाली आहे. भोसल्याची फौज अनिवार. गांव लुटितात ताकीद करीत असतों. परंतु चालत नाहीं. मंगळवेढे परगण्याची रखवाली करीत असतां खराबी झालीच. असो. पुढेंही तालुका आपला आहे. आपण लिहावें मग आह्मी जपावें असें नाहीं. मजकडून होईल तितकें करीन. उदईक येथून निघून मामाकडे जातों. कळलें पाहिजे. बहुत काय लिहिणें. कृपा केली पाहिजे हे विनंती. राजश्री शिवाजीपंत स्वामीस साष्टांग नमस्कार हे विनंती.

नं० १३३६ श्री (फाल्गुन व० १२ ९ मार्च)

राजश्रीया विराजित राजमान्य राजश्री नरसिंगराव[1]

स्वामीचे सेवेशीं

---

१ धायगुडे.

दादासाहेब परत फिरतात

पोष्य सखाराम भगवंत साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जावें. विशेष. राजश्री त्रिंबकराव मामाच्या व नबाबाच्या भेटी गुंजोटीच्या मुक्कामीं झाल्या. तेथून दरमजल फौज सुद्धां त्याच रोखें येत आहेत. त्यास तुह्मी राजश्री मामाकडे पथक सुद्धां जाऊन पोंचणें. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे विनंती.

नं० १३३७ श्री (फाल्गुन वद्य १२
९ मार्च)

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य राजश्री नरसिंगराव
जनार्दन गोसावी यांस.

प्रती मातोश्री गंगाबाई आशीर्वाद सु॥ आर्बा सबैन मय्या व अल्लफ. राजश्री त्रिंबकराव विश्वनाथ यांच्या व नबाबाच्या भेटी गुंजोटीच्या मुक्कामीं झाल्या. दरमजल फौज सुद्धां त्याच रोखे येत आहेत. त्यास तुह्मी पथक[1] सुद्धां त्र्यंबकराव याजकडे जाऊन पोंचणें. जाणिजे. छ० २२ जिल्हेज बहुत काय लिहिणें.

लेखन
सीमा.

नं० १३३८ श्रीगणराज [१८ मार्च]

अपल्यें त्रिवेंगींचे[2] साष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ चैत्र शुद्ध षष्ठी

---

१ धायगुज्यांचें पथक एक हजार स्वारांचें होतें. २ वामनराव, परशुरामभाऊ व रघुनाथराव यांचें कोन्हेररावास पत्र पुरंदरास.

(२१२३)

दादासाहेब परत फिरतात

भृगुवार मुक्काम बागलकोट पावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. राजश्री त्रिंबकराव मामाचें पत्र आलें त्याजवरून आह्मी सडे होऊन आलों. त्यास अद्यापि काहीं मामाचे लष्करची बातमी अमके जागीं आलें अशी नाहीं. राजश्री गोपाळपंत सोनी आले त्यांनी [तुह्माकडील] सविस्तर वर्तमान सांगितलें त्याजवरून कळलें. कंपलेहून पत्रें रवाना केलीं तीं पावलींच असतील. त्याजवरून सविस्तर कळेल. जमखिंडी, तेरदाळ, यादवाड हे तिन्ही परगणे (श्रीमंतांच्या लष्करानें) अगदीं लुटून फस्त केले. तेथून कूच झालें ह्मणजे मिरज प्रांतही लुटला जाईल. श्रीमंताचा मुक्काम काल गुरुवारी आसंगी परगणें जमाखिंडी येथें होता. आज कूच होऊन कोणीकडे गेले हें कळलें नाहीं. तुह्मांस वर्तमान वरचेवर मिरजेहून लिहितच असतील पत्रें वरचेवर पाठवीत नाहीं ह्मणून लिहिलें त्यास आह्मी येथें संकटांत होतों. पत्रें पाठविलीं तर निभाव होणार नाहीं आणि एखादा दगा होईल यास्तव न पाठविलीं. श्रीमंत बेळगांवाकडे जाणार. अथणीस दहा हजार फौज गेली आहे. आतांच जमाखिंडीहून पत्रें आलीं. त्यांतील वर्तमान श्रीमंत करवीराकडे जाणार हेंही ऐकितों. मामाचे लष्करची बातमी लागेतों आह्मीं बागडकोटचे पंचक्रोशींत आहों! श्रीमंत मातुश्री बाईसाहेबाचे[1] आज्ञेप्रमाणें मर्जी रक्षून रहावें. बहुत काय लिहिणें हे विनंती.

त्रिवर्गांस[2] पुरुषोत्तम कृष्ण याचे आशीर्वाद. लोभ करीत जाणें हे आशीर्वाद. राजश्री शिवाजीपंत व हरीपंत यांस साष्टांग नमस्कार. लोभ करणें हे विनंती.

अपत्यें रघुनाथानें साष्टांग नमस्कार विज्ञापना. लिखितार्थ परिसी-

---

१ गंगाबाईस्या. २ कोन्हेरराव, विनायकराव व गंगाधरराव यांस.

दादासाहेब परत फिरतात

जे हे विज्ञापना.

चिरंजीव विनोबा व गंगाधरराव बाळ यां त्रिवर्गांचे आशीर्वाद. इकडील वृत्त सविस्तर लिहिल्यावरून कळेल. हे आशीर्वाद.

नं० १३३९ श्री [२१ मार्च]

सेवेशी धोंडो केशव नेने. दोन्हीकर जोडून साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना. तागायत चैत्र शु० ९ संध्याकाळपर्यंत सेवकाचें वर्तमान यथास्थित असे विशेष. बातमी वर्तमान कळत नाहीं ह्मणून रागें भरून धनी लिहितात, त्यास आलें वर्तमान लिहीतच आहें. मिरजेची बातमी लवकर येत नाहीं त्यास आमचा इलाज काय! जासूद जोडी ठेविली त्यांपैकीं पेशजी एक जासूद व एक प्यादा ऐसे पाठविले ते पावलेंच असतील. दुसरे बातमीचा प्यादा मुजरद पाठविला आहे तोही पावलाच असेल. मामांचे[2] लष्करचें वर्तमान तर आजचा मुक्काम चितळी नजीक मायणीवर खुद्द मामाचा. पाणी येरळेचें. भोंसले व मोंगल[3] कलेढोणावर आहेत उदईक कूच होऊन कोणीकडे जातात किंवा एक दिवस – रोजाचे[4] दिवस अविंधांचे आहेत मुक्काम होईलसें दिसतें. आणि दुसरी मसलत राजश्री हरीपंत फडके सातार्‍यास महाराज आणावयाकरितां आले आहेत त्यांचा ही मार्ग पाहतात. महाराजांचा अनमानच दिसतो. आज संध्याकाळपर्यंत उतरले नव्हते. परंतु आतांच च्यार घटका रात्रीस तोफा जाहल्या त्याजवरून महाराज [किल्ल्यावरून खालीं] उतरले सारिखे दिसतें. श्रीमंतांचा[5] मुक्काम काल कुडचीवर होता. आज कूच करून वडेसांगलीवर (?) आले. तेथून

१ रहिमतपूरचा कमाविसदार याचें हें गंगाधरराव पुरंदरास होते त्यांजकडे पत्र पाठविलें. २ त्रिंबकरावमामा पेठे यांच्या. ३ साबाजी भोंसले व निजामअल्ली. ४ मोंगलाचे. ५ दादासाहेबांचा.

दादासाहेब परत फिरतात

कृष्णेच्या पाण्यानें साताऱ्यास येणार. बुनगें झाडून राणीच्या[1] मुलखांत लावून देऊन सडे होतात. त्यांचा ही रोख जवळच आला. श्रीमंतांनी कृष्णेचे पाणी धरिलें, मामानीं वेरळेचें पाणी धरिलें; गांठ कोठें पडत्ये पहावें! मोंगलाचें लष्कर बेकैद अनिवार आहे. तमाम गांव जाळून नागवून फस्त करितो. कांहीं रहात नाहीं. कातरखटाव, कलेढोण, मायणी वगैरे लुटिलीं. बायकांची फारच बेअब्रू करितात. आमचा गांव झाडून उजाड झाला. घर रखवालीस मात्र माणूस ठेविलें आहे. मामाकडे पाटील कुळकर्णी पाठविले आहेत. आपणाकडे माणसें पाठविलीं कीं, राजश्री बापूचीं पत्रें मामास व भोंसल्यास व मोंगलास [मुलखास उपद्रव न देण्याविषयीं] घेऊन पाठवावीं. त्यास तीं अद्यापि येत नाहींत त्या पत्रांखेरीज बचाव होत नाहीं. तर पत्रें लवकर पाठवावीं. यत्न करून पहातों. राजश्री हरीपंत फडके यांसही पत्रें पाठवावीं. ते मामास कांहीं पत्रें देतील. आमच्या गांवापासून पांच सहा कोशांवर आहेत. मध्यें घांट मात्र आहे ह्मणून आज कही आली नाहीं. उदईक कहीवालेच गांव मारून नेतात! याप्रकारचें वर्तमान आहे. गांव लुटून नेत तों मी (येथून) निघत नाहीं. मग येथें काम काय! सेवेशीं येतों! सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं १३४० **श्रीगणराज** (१७ मार्च).

चिरंजीव राजश्री तात्या यांसी प्रती वामनराव गोविंद आशीर्वाद उपरी येथील कुशल तागायत चैत्र शु० ९ गुरुवार मुक्काम कमती मलप्रभातीर यथास्थित असे. विशेष. भोमवारीं देशाकडे यावयास कूच करून

---

१ करवीरकरराणी जिजाबाई.

निघालों हें वर्तमान तुह्मांस लिहिलेंच आहे. त्या अलीकडे काल हणमसागरापलीकडे चार कोसांवर राहून आज मुक्काम मजकुरास आलों. बुनगें आजपर्यंत समागमेंच आहे. उदईक बागलकोटचा मुक्काम नेमिला आहे. श्रीमंतांचें कूच मुक्काम कोणीकडे होईल त्या सुमारें येत असो. तिकडे लष्कर कोणीकडे जातें. बोलवा काय आहे, हें सविस्तर लिहावें. आणि आपले जागां बहुत सावधपणें रहावें. येथें आलियानंतर राजश्री मामाकडे पत्रें रवाना केलीं. आह्मी व तें लवकरच एके जागां होऊं असें आहे. हें वर्तमान तिकडे पुरंदरांस लिहून पाठवावें. श्रीमंतांचें लष्कर मिरजेकडे येणार ह्मणून पेशजी तुह्मीं लिहिलें होतें त्याजवरून लांब लांब मजली करून मजल दर मजल येथें आलों. पुढेंही लष्कराचा सुमार पाहून येत असतों. श्रीमंत जवळ आले आहेत. बहुत सावधपणें राहत जावें. घरांतील दुखण्याचा प्रकार लिहिला तो कळला . बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं १३५१

(श० १६९९ माघ व०
जानेवारीचा दु० पंधरवडा)

पांडुरंगरावांचें पत्र गंगाधररावास.

" चिंतोपंताच्या पत्रांतील आशय कीं राजश्री मामा व साबाजी भोंसले यांचें एक करून आलों. किमपी उजूर नाहीं. तासगाव- कुरुंदवाडची वस्तवानी व माणसें आदिकरून किल्ल्यांत न्यावीं सविस्तर वृत्त बाई पुण्याहून निघाल्याचें वर्तमान लिहिलें होतें तींच पत्रें बाजिन्नस लष्करास रवाना केलीं. आमचे मतें तुह्मीं साताऱ्याकडील बातमी राखून लवकर निघून जावें. निदानीं ही वाट सोडून पांच गांवांचे अंतरानें तुमचें व कोन्हेर राव यांचे विचारें झालें तर जितकें सामान आहे तितक्यांनिशींच वेळेवर

जलद जाऊन नानाजवळ प्रविष्ट व्हावें. आतां निमित्यास म्यावेंसें नाहीं. प्रकटता झाली आहे. दुसरें, ज्या काळीं जें होणें तें चुकत नाहीं. इ. कडील व लष्करची काळजी न करितां आमचे मतें लांब लांब अंतऱ्यानें नानाजवळ जाऊन पोंचावें. वेळ तो जाईल परंतु त्यांस आठवावयास होईल.

नं १३४२ श्री (श० १६९२ फाल्गुन० ३०
१२ मार्च)

तीर्थस्वरूप राजश्री वामनरावबाबा वडिलांचे सेवेशीं

अपत्यें काळो बाहिरवं कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल तागायत छ० २८ जिल्हेज स्थिरवार जाणून स्वकीय कुशल लिहित असलें पाहिजे. विशेष. इकडील वर्तमान सविस्तर लिहून आपणाकडे माणसें पाठविलीं आहेत तीं पोचलींच असतील त्यावरून कळेल. अली. कडील वर्तमान तर परवां गुरुवारीं काली निडगुंदीनजीक मुक्काम होता. काल शुक्रवारीं कूच करून गलगलें शूर्पालाकडे गेले. विजापुरचा रोख हा आहे. मालोजी घोरपडे निघून गेले त्यां बरोबर दोन हजार फौज व दोघे सरदार ही निघून गेले. राजश्री विसाजीपंत बिनीवाले यांचे पुत्रावर इतराजी होऊन नजरबंदी ठेविले आहेत. या प्रकारें वर्तमान लष्कर जेथें जाईल तेथें जाळून फन्ना! बागलकोटच्या मुलखांत कांहीं बाकी राहिली नाहीं. लष्कराचे भयामुळें खेडींपाडीं यांचे गुळें बागलकोटाच्या उत्तर भागीं दोन कोसांवर डोंगरांत होतें तें गुळें लुटून नेलें बायका तमाम नासून टाकल्या. अविंधाचे लष्करची गत मांडली आहे. कळलें पाहि-

[1] हा नरगुंदकरांचा कारभारी उपनांव पेठे. दादासाहेबांच्या लष्करची हीं हकीगत त्यानें वामनरावपटवर्धन यांस लिहिली आहे.

दादासाहेब परत फिरतात

जे. उत्तरे कडील फौजा येलमेल येथें आल्या. मोंगल मिळाला. ऐशीं हजार फौज जमा झाली. सडे होऊन गांट घालणार असें वर्तमान आहे. सडे झालेलें वर्तमान पत्रें येणारांस आलीं. आलें वर्तमान लिहिलें आहे. प्रस्तुत आपला मुक्काम कोठें आहे, कोणत्या रोखें येणार , तें कळवावें. राजश्री दौलतराव घोरपड्यास सन्मानें करून कृष्णातीरीं निरोप दिला. ते स्वस्थळास आले. जेष्ठ पुत्र श्रीमंतांबरोबर आहेत. राजश्री बळवंत राव निरोप घेऊन आले. बुधवारीं गजेंद्रगडीं होते. तेथून पुढें आले असतील. श्रीमंतांनीं आपलें काय तें निवडल्यावर विल्हे करून देऊं असें अश्वासन दिलें. तूर्त खर्चापुरतें धारवाडप्रांतीं सनदा लिहून दिल्या आहे-तसें ऐकितों. आह्मी बंदोबस्ती करून सावधतेनें आहोंच. सूचना लिहिली आहे. राजश्री चिंतो हरी व आबाजी विश्वनाथ हे उभयतां कोठें आहेत तें लिहावें. मिरजेस ही लिहीत आहों. आपणाकडे परस्पर वर्तमान येतच असल. निरंतर पत्री परामर्ष करावा. कृपा असावी हे विनंती

नं १२४३ श्री (फाल्गुन व० ३०
मार्च १२

राजश्रीया विराजित राजमान्य राजश्री वामनरावबाबा स्वामीचे सेवेशीं. पोष्य लक्ष्मण हरी साष्टांग नमस्कार विनंती येथील वर्तमान तागायत फाल्गुन वद्य अमावास्या मंदवार पावेतों यथास्थित असे विशेष. लष्करांतून आज बातमी आली. लष्कर कृष्णा उतरून येलगुरावर मुक्काम आहे. तेथें राहणें करणार. तोफखानेचे भिवराव निघून गेले नंतर तोफा एक

---

१ हा नरगुंदचे संस्थानावर वारसा सांगणारा. उपनांव हेबळीकर. २ पुरंदरचा व लष्करांतील फितूर मोडल्यावर. ३ शके१६९५ च्या वर्षाच्या शेवटच्या दिवशीं हें पत्र लिहिलें. ४ हारिहरचा मामलेदार. उपनांव लागू. ५ पानशे.

दादासाहेब परत फिरतात

एक सरदारास पांच पांच तोफा दिल्या. गाडदी यांजकडे दहा तोफा दिल्या आहेत. सड्या फौजा जाऊन मुलुख लुटून जाळून फन्ना करतात. तालिकोटांकडे फौजा रवाना केल्या होत्या तो मुलुख जाळून लुटून फिरून लष्करास आल्या. बागडीकोटाकडे फौजा जाऊन मुलुख अगदीं सत्य-नाश केला. किल्ल्याच्या अगर मातबर ठाण्याचा गळां पडत नाहींत. मुलुख मात्र सत्यानाश करतात. ग्रहण झाल्यानंतर लष्कर कूच होऊन रामतीर्थाच्या रोखें जावयाची एक आवई. एक कोल्हापुरास जाऊन मिरजेहून देशीं जावें अशी आवाई. मुलुख मारून तारा़ज करतात. कांहीं बाकी रहात नाहीं. राजश्री विसाजी कृष्ण यांचे लेकाचे कागद चौकींत सांपडले याजकरितां त्यांस कैद करून ठेविला आहे. मुधोळचे मालोजी घोरपडे आपलें पथकसुद्धां आपले गांवांस आले त्यांज बरोबर आणखी दोन हजार स्वारांची पथकें निघून गेलीं. वरचेवर (दुसरे लोकही) पळून जातात. पुरंदराहून जासूद जोड्या चार आल्या. शिरें व मदगिरी व चेनरायदुर्ग व होसकोटें येथील कमावीसदारांस मातुश्रीचे कागद घेऊन गेले ते सांगत होते [कीं,] राजश्री त्रिंबकरावमामा तीस हजार फौजे निशीं सोलापुरास आले. (पुरंदराहून त्यांजकडे)आणखी फौज ठेवून पाठवितात. राजश्री बापू व फडणीस सर्व पुरंदराजवळ आहेत. सातारेस कांहीं फौज पाठविली आहे. या प्रकारें वर्तमान आलें तें सेवेशीं लिहिलें आहे मिरजेस आपला कागद रवाना केला. बहुत काय लिहिणें. लोभ करीत जाणें हे विनंती.

---

१ तालीकोट बागलकोट हा रस्त्याचा सरंजाम व ते गंगाबाईकडचे सबब त्यांच्या मुलुखाचा दादासाहेब सत्यानाश करितात! २ ओसाड. ३ विनीवाले. ४ गंगाबाईच्या.

दादासाहेब परत फिरतात

नं १३४४

(फाल्गुन व० १४
११ मार्च श०१६९५)

बापूजी शिंदे बाळापुरचे किल्लेदार यांचें वामनराव गोविंद यांस पत्र २७ जिल्हेजचें.

"राजश्री बाजीराव बर्वे व विठ्ठल विश्राम हे सरकारचीं फौज व हैदराकडील वकील आबाजीराम व करीमखान हे श्रीमंतांच्या सनदा घेऊन ठाणें स्वाधीन करावें ह्मणून आले. व पुरंदराहून राजश्री सखारामबापू व नाना फडणीस यांणीं पूर्वीं पत्रें पाठविलीं आहेत कीं सनदा श्रीमंतांच्या सादर झाल्या तरी ठाणें हैदराकडे न देणें. किल्ल्याचा बंदोबस्त उत्तम प्रकारें करून सावध राहणें. इकडील किल्ले कोट वगैरेचा बंदोबस्त झाला. तुमचे कुमकेस राव [1]मशारनिल्हे रवाना करतों ह्मणून त्यास सरकारच्या सनदेंत आज्ञा कीं तोफा काढून मुरारराव यांच्या तालुक्यांत पाठवाव्या आणि [2]जंकिरा असेल तो विकून टाकावा. या प्रमाणें सनद घेऊन आले. त्यांस पर्यायें करून उत्तर सांगितलें कीं तोफा वगैरे काढण्यास पंधरा दिवस लागतील. करितां पुढील ठाण्यांचा बंदोबस्त आधीं करावा ह्मणून सांगितलें परंतु त्यांणीं तें मान्य न करितां आग्रहास प्रवर्तक होऊन हैदरास लिहून पाठवून चार हजार बार व तीन हजार शिपाई व दीड हजार स्वार व तोफा येणेंप्रमाणें फौज आणवून ठाण्यास लागले. परगणा खराब केला. आज आठ दिवसापासून त्यांची आमची लढाई लागली आहे. तिकडील इकडील शें पन्नास माणूस ठार व जखमी झालें आहे. करितां चार पांच हजार फौज लवकर पाठवून द्यावी ह्मणजे त्यांस हांकून लावितों."

---

१ राव मशारनिल्हे कोण? ज्यांस हें पत्र लिहिलें आहे ते वामनराव पटवर्धन?

२ धान्य व दारूगोळा वगैरे सामुग्री.

दादासाहेब परत फिरतात

नं० १३४९ **श्रीगणराज** (चैत्र शुद्ध ९ १७ मार्च)

अंपत्यें साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ० ४ मोहरम गुरुवार जाणून सदैव आशीर्वाद पत्र पाठवीत जावें. विशेष. आपण हरेकलेच्या मुक्कामचें जिल्हेजचें पत्र पाठविलें तें छ० ४ मोहरमीं पावलें. लिहिलें वर्तमान कळलें. इकडील वर्तमान तरी छ० २ मोहरमीं तेरदाळानजीक हळेइंगळीवर मुक्काम श्रीमंतांचा होता. छ० ३ मोहरमीं कुडचीवर येणार होते. पुढें कृष्णेच्या पाण्यानेंच जातील असा सुमार आहे. त्यांत घडतां घडेल तें खरें! जमखंडी, गलगले, तेरदाळ परगण्याचे गांव लष्करचे दंग्यामुळें जाळून लुटून फस्त झालें परगण्यांतील माणसें मारिलीं गेलीं व जखमी हीं बहुत झालीं या प्रकारचें वर्तमान आहे कृष्णेच्या पाण्यानीं चालले तेव्हां मिरज प्रांत आहेच मंगळवेढ्याहून छ० १९ जिल्हेजचें पत्र आलें, त्यांत राजश्री मामा उमरजेवरी आले. रास्ते, भोंसले, गाइकवाड, अविंध, ऐसे सर्वत्र आहेत. राजश्री हरीपंतही मामाचे लष्करांत आले आहेत ह्मणून लिहिलें होतें. श्रीमंतांचा मनसबा दुधगंगेच्या पाण्यानीं कोल्हापुरास जावें असा ही आहे. त्यांत जें घडेल तें प्रमाण. तीर्थस्वरूप सौभाग्यवती यश्वदावयनीची आवना जी आहे तीच आहे. औषध उपाय होत आहेत, श्रीकृपेनें आरोग्य होईल. राजश्री कोन्हेर नारायण या समागमें पत्रें पुण्याकडील वगैरे पाठविलीं होतीं तीं पावलींच असतील. काल बुधवारीं मंगळवेढ्याचीं पत्रें आलीं. मामाचा मुक्काम काल मंगळवारीं सांगोल्याचे अलीकडे मांजरीवर आले. खासा अविंधही समागमें आहे. ऐनापुरच्या सुमारें श्रीमंतांच्या भेटी घ्याव्या ऐसा मनसबा आहे. श्रीमंतांचा

---

१ कोणा कमाविसदाराचें वामनरावास पत्र.

श. १६९६ दादासाहेब व गंगाबाई यांच्या कारकीर्दी इ. स. १७७४

दादासाहेब परत फिरतात

मुक्काम मंगवारी हळेइंगळीचाच मुक्काम झाला. या उपर कोणते रोखें होतील पहावें. अथणीकर विनायकपंत तर अगोदरच आले होते. अथणींत तोफा व फौज पाठवून अथणींत ठाणें घातलें. लष्करांत किमापि ताळ नाहीं. गो-वध ही होतात. ब्राह्मण बायका कपाटसंगमाच्या गाडद्याकडे आहेत. शूर्पालकर ब्राह्मणापासून खर्चाचे पंधरा हजार रुपये घेतले. आतां मामा समीप आले. आपण खामखा जलदी करावी. वेळ हीच आहे. पुण्याकडील मजकूर फौज पांच हजार पावेतों आहे. विसाजी कृष्ण व नारो शंकर यांचे मेहुणे व आह्माकडील रास्ते यांचे जिवाजी राजे वगैरे पागे आहेत. आणखी येत आहेत. आपाजी धायगुडे वगैरे पागा पांच सात आहेत. आतां सर्व प्रकारें ठीकच होईल. यांत श्रीपंढरीनाथ करील तें खरें, हुप्परीकर व घरचीं सर्व मंडळी आंत आहेत. इकडील चिंता न करावी. राजश्री रावोपंत जोशी श्रीमंतांचे लष्करात होते, धरतातच असें झालें तेव्हां मशारनिल्हे काल छ० ३ मोहरमीं आह्मांजवळ आले. गोपाळनाईक तांबेकर व भिवराव पुण्यास गेले. मध्यस्थी नाहीं ती काळजी आपण न करावी. विसाजी कृष्ण यांचे चिरंजीवाचे विपत्य करतात. बेळगांव मागतात. मल्हारराव सुमंत ह्मणून कोणी आहे त्याजवर ममताही होती परंतु कागदपत्र सांपडले आतां पाय उतारा महमद इसफ याचे जिलबींत आहे. रामचंद्र गणेश अकटे दाखल आहेत भवानराव व त्यांची बायको दोन पालख्यांत बसवून मजलास आहे. बरोबर तीनशें गाडदी व दीडशें पागा असतात. बाजीपंत वगैरे लोक बहुतजण आहेत. लोक सर्व बेदिल आहेत. हरीपंत फडके गेले पासून लष्करची जलदी आहे. श्रीमंत चार रोज पळत फिरलेस फौज पाठीस लागलेविना फडशा होणार नाहीं. उभयतां कारभारी यांचें मानस आपण खामखां यश घ्यावें असें आहे. आपणांस पत्रें पाठविलीं होतीं तीं

सेवेशीं पेशजी रवाना झालींच आहेत. ती फौज जवळ आलेस खासा व मायेचे लष्करांतून सर्व ही फुटतात. विदित होय हे विज्ञापना.

नं० १३४६ श्री. (चैत्र शुद्ध मार्चाचा दु० पंधरवडा)

सेवेशीं साष्टांग नमस्कार विज्ञापना ऐसिजे. येथील क्षेम मंदवार प्रातःकाळ तास दिवस वर्तमान यथास्थित असे. विशेष. लष्करचें वर्तमान शुक्रवारीं गलगले पुढें दोन कोसांवर मुक्काम. आज कूच अगर मुक्काम बातमी आली नाहीं. संध्याकाळपर्यंत येईल. येतांच लिहून पाठवितों. काल लष्कराहून गृहस्थ एक आला त्यानें वर्तमान सांगितलें. विसाजीपंत बिनी याचे पुत्रास चाप लावून दीड लाख रुपये घेतले. फडणीशीकडील कारकून यास अटक केले आहेत. नित्य चाप आणून पुढें टाकतात परंतु (तो) पैसा कबूल करीत नाहीं सुमंताकडील मल्हारपंतास बेडी ठोकली. राजश्री रामचंद्र गणेश व आपाराव बळवंत यांजवर इतराजी आहे. पुढें कसें घडतें पहावें. विजापूर ठाणें श्रीमंतांचे झाले, राजश्री भवानराव निघोन गेले नाहींत. त्यांणीं ठाणेची चिठ्ठी दिली त्याजवरून ठाणें झालें. तेथें बाजार बुनगें ठेऊन आपण सडे होऊन लढाई करावी या धमकेंत आहेत. उत्तरेकडील फौज वीस कोस पंचवीस कोसांवर आली ह्मणतात. परंतु अब्दुलपुरच्या अलीकडे आलेली बातमी अद्यापवर आलेली नाहीं. लष्करांतील बुनगें वगैरे जाणारास प्रसिद्धपणें जाऊं देत नाहींत. वरकड यथास्थित असे. बहुत काय लिहिणें कृपा असावी हे विनंती.

नं १३३८।१३३९ व १३४० हीं बातमीचीं पत्रें कोणी कमाविसदारानें लिहिलेलीं वामनरारावास. २ यावरून आजपर्यंत प्रतिनिधीकडे विजापुरचें ठाणें होतें असें झालें.

दादासाहेब परत फिरतात

नं० १३४७ श्री (चैत्र शुद्ध मार्च दु० पंधरवडा)

साष्टांग नमस्कार विनंती. तागायत शुक्रवार पावेतों जाणून स्वकीय कुशल लेखन करीत असलें पाहिजे. विशेष. आपण बुधवारचें पत्र पाठविलें तें पावलें. सविस्तर अर्थ कळला. श्रीमंत राजश्री मामाच्या लष्करांतून आतांच जासूद पत्रें घेऊन आले. गुंजोटीहून कूच होऊन अलीकडे दोन मजली लष्कर आलें. छ० २४ तारखेचीं पत्रें आहेत. एक दोन रोजांनीं गांठ पडावी असें दिसतें मजल दर मजल येतात ह्मणून जबानी जासूद यानें सांगितलें. आपणास कळावें ह्मणून लिहिलें आहे. त्या लष्करचें कूच होऊन आज गलगल्याचा मुक्काम झाला. उद्यां शुक्रवारीं गुवर्तलास जाणार या प्रमाणें बातमी आली आहे. कळावें बहुत काय लिहिणें कृपा करावी हे विनंती.

नं० १३४८ श्री [चैत्र शुद्ध मार्च दु० पंधरवडा)

सेवेशी साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना. येथील क्षेम शुक्रवार चवथा प्रहर संध्याकाळ पावेतों वर्तमान यथास्थित असें. विशेष. लष्करचें आज कूच होऊन गलगलेचे पलीकडे दोन कोसांवर मुक्काम झाला. मजल दर मजल साताऱ्यास अथवा करवीरास जाणार याची आवई फार आहे. राजश्री भवानराव प्रतिनिधी निघून गेले ह्मणन तोंड जबानी वर्तमान. आणि लष्करामध्यें तिकडील पक्षाचे आहेत त्यास तमाम नजरबंदींत ठेविले आहेत. उत्तरेकडील फौज अबदुलपुराजवळ आली लष्कराहून तिसरे दिवशीं माणसें आलीं. मोंगल व धौशा व इकडील फौज ह्मणतां चार पांच कोसांचा तळ पडतो. फौज भारी आहे. शनिवारीं रविवारीं गांठ घा-

लावी याच प्रकारें जासूद जबानी सांगत होते. आणि पत्र ही होतें. एक दोन रोजीं मुकाबला होतो. सध्यां इकडील अरिष्ट वारलेसें झालें आपण मजला पत्रें लिहितां तीं राजश्री रावजीस दाखवितों. तेणें करून बहुत संतोषी होतात. कळावें ह्मणून लिहिलें आहे. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

नं १३४९ श्री (२७ मार्च)

चिरंजीव राजश्री तात्या यांसी प्रती वामनराव गोविंद व परशुराम रामचंद्र व पुरुषोत्तमराव कृष्ण आशीर्वाद तागायत चैत्र शु० १५ पर्यंत यथास्थित असे. विशेष. आह्मीं सावळजेहून कूच करून हतीजावर मुक्काम केला. तेथून दोन प्रहर रात्रौ कूच करून वाटुंबरेस उजाडावयास आलों. तेथें बातमी लागली कीं श्रीमंतांनीं मध्यरात्रीं कूच क्षेत्रावरून पुढें केलें अशी बातमी आमचेच जासूद घेऊन आले. त्यावरून क्षेत्रास मुक्काम नेमून सांगोल्यांजवळ गेलों. तेथें एक थोर तोफ व तीन तोफा दुसऱ्या एकूण चार तोफांचे गाडे जाळून तोफा टाकून गेले. हें वर्तमान ऐकून पुढें कासेगांवाजबळ गेलों. तेथें बातमी लागली कीं, श्रीमंतांचें कूच झालेलें मागती मुक्काम झाला. आणि फौजा जमा करीत आहेत. चिरंजीव भाऊ आघाडीस चालत होते ते कासेगांवाजवळ उभे राहिले. आह्मांकडे व मामाकडे सांगून पाठविलें कीं श्रीमंत क्षेत्रीं तयार झाले आहेत. आपण बुनगें माघारें फिरवून फौज जमावून यावें. त्यानंतर श्रीमंतांची फौज चालून आली. अगोदर श्रीमंतांनीं कृष्णराव तोफान्याचे[1] नांवची चिट्ठी पाठविली कीं, संधान केल्यास उभय पक्षीं बरें. त्यास राजश्री पुरुषोत्तमराव व नारोपंत केसकर यांस बोलावयास पाठवावें. त्याज-

१ तोफखाने हें टोपणनांव पानशांचें ते तोफखान्यावरील दरोगे ह्मणून.

श. १६९६ दादासाहेब व गंगाबाई यांच्या कारकीर्दी इ.स. १७७४ कासेगांवची लडाई.

वरून जावें न जावें असें होत आहे तों फौज समीप येऊन उभे राहिले. मागून फौजेची लांबण लागलीच होती. आह्मी अठरा एकुणीस कोसांची मजल चालून गेलों. फौज जमा झालीच होती. परंतु लांबून गेलों [त्यामुळें] घोडीं माणसें. मांदीं झालीं होतीं. येऊन गांठ पडल्यावर मागें सरू नै ये. श्रीमंतांनीं तीन टोळ्या. [केल्या] पुढें गाडदी व तोफा पाठीमागें खासे श्रीमंत. हुजरात दोन्हीबाजूनीं दोन टोळ्यांनीं केले. तेव्हां मामानीं ही तीन टोळ्या केल्या. आह्मी आपल्या बाजूस. उजवे बाजूस नारोशंकर व विठ्ठल शिवदेव व रास्ते यांचीं पथकें. मध्यें मामा हुजुरात घेऊन. या प्रमाणें कासेगांवचे अलीकडे माळावर उभे राहिलों. तों तिकडून नीट चालून आले. आमचे बाजूवर सैन्य वाढून आलें तें मागें फिरवून घातलें. मामाचे तोंडें लागावयास गेले तों मामानीं तेथून हुलकावून कातरते कातरते आमचे बाजूस आले. आह्मी दोन तीन वेळ सैन्य पाव पाव कोस फिरविलें. तों तिकडील गाडदी व हुजरात वगैरे पथकें नीट चालून आले. मामाकडील हुजरातीची गांठ पडली. तेथें मारामारी झाली. माणूस फार जायां झालें. मामाची हुजरात निघाली[३] ते समयीं आह्मी संभाळून थोपीत थोपीत निघालों. मामा आमचे बाजूस येतांच तिकडील सैन्य वाढून आह्मांस सारे फौजेचें पुढें घालावयास आले. तों भाऊ शें दोनशें लोकांनिशीं हुजरात व महमद इसफ यांचें तोंडावर वाढून गेले. तेथें त्यांची यांची हातवाई झाली. महमदइसफ ओळखोन वार लोकां करवीं टाकिले. परंतु (त्यांचे) आगांत सामान यामुळें वार कारेगार झाले नांहींत. भाऊकडील दहा पंधरा माणूस तेथें राहिलें. दहा पांच माणूस हत्याराचें जखमी झालें. हुजरात पळाली

१ सरतां येईना. २ डावे बाजूस. ३ पळाली. ४ परशुरामभाऊ. ५ चिलखत.

कासेगांवची लढाई.

तेव्हां भाऊ दहा विसांनिशीं सांभाळून आले. खासा जरी पटका व हत्ती वगैरे पाडाव करून नेलीं. आमचीं निशाणें तिघांचीं सांभाळून आणलीं. उंटांवरील नौबती राहिल्याशा वाटतात! मामाची गत तर मामाचे तोंडावर जखम होती. अदकोस लढाईपासून अलीकडे आले तथें खालीं आले. उपरांतिक काय झालें न कळे. मिठी फार पडली होती. जिवंत सांपडले गेले किंवा ठार झाले हें पुर्तेपणीं कळलें नाहीं. आमची मंडळी सर्व खैर आहेत. चिंता नाहीं. तेथून सहा घटका रात्रीं मागें फिरून चाललों. राजश्री साबाजी भोंसले मुक्कामास आले होते त्यांचें वर्तमान कळलेवर त्यांचे पुढें ओढ्यावर मुक्काम केला. आमची व भाऊची चुकामुक पडली होती. आज प्रातःकाळीं एक जागां झालों. येथें मुक्काम आज भोंसले सुद्धां केला आहे. मोंगल खासा आज येथें मुक्कामास येणार पुढें आघाडी आली. साबाजी भोंसल्याकडे चिरंजीव भाऊ व हरीपंत तात्या व नारोपंत केसकर तोफखान्याचे यांचें बोलणें झालें. भोंसल्याचा दुसरा प्रकार नाहीं. 'श्रीमंतांचे मागें जिवावर उदार होऊन कार्यास प्रवर्तलों त मामा नाहीं ह्मणून चुकतों असा प्रकार काय आहे! आज नबाब आले ह्मणजे उदईक सारा जमाव जथून चढाई करून जातों.' अशी बोली झाली. हें वर्तमान पुरंदरास लिहिलें आहे. एक आज खैर झाली. मागती श्रीगजाननकृपेंकरून लढाई देतों. मग श्रीसत्तेनें घडेल तें घडो. आह्मांकडील सरदारापैकीं कोणी राहिलें नाहीं. मामा मात्र राहिले असें ह्मणतात. आज पुर्ता शोध कळेल. बहुधा राहिलेच असें दिसतें. आह्मीं कांहीं शरण जात नाहीं. मामा कोसभर आलेले लोकांनीं पाहिले. परंतु मोंगलाकडे गेले किंवा कोणीकडे भडकले न कळे!

१ लढाईत मेले नाहींत.

आज सांजपर्यंत सर्व कळेल. चिंता न करणे. बहुत काय लिहिणे लोभ कीजे हे आशीर्वाद.

नं १३५० श्री [चैत्र व०
१ एप्रिल)

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री वामनराव व परशुरामपंत भाऊ स्वामीचे सेवेशीं

पोष्य सखाराम भगवंत साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहित जावें. विशेष. श्रीमंतांची व मामांची लढाई होऊन मामा पाडाव नेले ह्मणून येथें वर्तमान आलें, त्यास तुमचें पत्र आलें नाहीं. तरी लढाईचें वर्तमान लिहावें. तुह्मी राजश्री साबाजी भोंसले व नबाब यांजवळ जाऊन पोंचलां ह्मणून वर्तमान ऐकिलें हें फार उत्तम झालें. लढाई होऊन मामा पाडाव झाले त्यास उपाय नाहीं. पुढें योजिला मनसबा शेवटास न्यावा हाच विचार येथील आहे. तरी तुह्मी व नबाब व भोंसले यांजवळ सामील होऊन आरंभिला मनसबा शेवटास न्यावा. कोणही प्रकारें मसलत शेवटास न्यावी. ये विशीं आळस होणारच नाहीं. विस्तारें काय लिहावें? बहुत काय लिहिणें लोभ असो दीजे हे विनंती.

नं १३५१ श्री (चैत्र शु० २
१ एप्रिल)

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री वामनराव व परशुरामपंत भाऊ स्वामीचे सेवेशीं.

पोष्य बाळाजी जनार्दन. साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल

श. १६९६ दादासाहेब व गंगाबाई यांच्या कारकीर्दी इ.स. १७७४
कासेगांवची लढाई.

जाणून स्वकीय कुशल लिहित असलें पाहिजे. विशेष. श्रीमंतांची व मामाची लढाई होऊन मामा पाडाव गेले ह्मणून वर्तमान आलें, त्यास तुमचें पत्र आलें नाहीं तरी लढाईचें वर्तमान लिहावें. तुह्मी राजश्री साबाजी भोंसले व नबाब यांजवळ जाऊन पोंचला ह्मणून वर्तमान ऐकिलें हें फार उत्तम झालें. लढाई होऊन मामा पाडाव झाले त्यास उपाय नाहीं. पुढें योजिला मनसबा शेवटास न्यावा हाच विच्यार येथील आहे तरी तुह्मीं नबाब व भोंसले यांजवळ सामील होऊन आरंभिला मनसबा शेवटास न्यावा. सर्व नबाब भोंसले वगैरे एक चित्त होऊन आरंभिली गोष्ट शेवटास न्यावीच न्यावी. आह्मी उभयतां सातार्‍यास जाऊन राजमंडळचे वगैरे सरदार वगैरे यांस पत्रें लिहून तुह्मांस उपयोगी पडेसें करितों. लोभ असों दीजे हे विनंती

राजश्री पुरुषोत्तमराव दाजी यांस साष्टांग नमस्कार. मामास (श्रीमंतांनीं धरून) नेलें तरी चिंता नाहीं! सर्व गोष्टी ठीक आहेत. हरिपंतास घेऊन सर्व एक चित्तेंकरून केलें. शेवटास न्यावें. हे विनंती.

नं० १३९१ श्री (चैत्र शुद्ध ९ १ एप्रिल.)

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री वामनराव गोविंद व परशुराम रामचंद्र व रघुनाथराव नीलकंठ स्वामी गोसावी यांसी.

प्रती मातुश्री गंगाबाई. आशीर्वाद. विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत गेलें पाहिजे. विशेष. लढाई होऊन राजश्री त्रिंबकराव विश्वनाथ यांस पाडाव करून नेलियावर तुह्मीं सारे एकत्र होऊन मनसब्याची मजबुती केली आहे ह्मणोन विदित झालें. उत्तम आहे.

दादासाहेब परत फिरतात

ये विशीची रुकनुद्दौलाचीं पत्रें आलीं त्यावरून संतोष झाला. त्यास तुह्मीं सेवा एकनिष्टपणें केलीं आहे व पुढें ही कराल हा भरंवसा आहे. तरी योजिला मनसबा शेवटास न्यावा हाच विचार येथून आहे. तरी तुह्मीं सारे एकत्र होऊन योजिलें कार्य सिद्धीस नेणें. तुह्मांस विस्तारें लिहिणें नलगे. रवाना छ० ९ मोहरम सुहसन आर्बा सबैन. मऱ्या व अल्ताफ. बहुत काय लिहिणें हे विनंती.

नं० १३९३ श्री (अधिक वैशाख शुद्ध)
१९ एप्रिल.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री नरसिंगराव
स्वामीचे सेवेशीं.

पोष्य सखाराम भगवंत. कृतानेक साष्टांग नमस्कार. विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत जावें. विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावलें. लिहिला मजकूर सविस्तर कळला. श्रीमंताकडील लोकांचा मजकूर लिहिला तो कळला. सरंजामी वगैरे यांच्या घरीं निकड करावी ह्मणून लिहिलें, त्यास निकडच झाली आहे. या उपरी बोभाट लवकरच होतील. छ० ७ सफर. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे विनंती.

नं० १३९४ श्रीगणराज (चैत्र वद्य १
२८ मार्च.)

अपत्यें साष्टांग नमस्कार विनंती येथील क्षेम तागायत छ० १६ मोहरम सोमवार प्रहररात्रपर्यंत क्षेम असे. विशेष. सड्या फौजांची लढाई होऊन मोड झाला. स्वार ही तासगांवास आले वरून चिंता वडिलांकडील

प्राप्त आहे. मोंगल पिछाडीस होता तेथें (आपण) दम घेतला असेल. सर्वांचें कुशलतेचें वर्तमान लिहून पाठवावें. आह्मी सावधतेनें आहों. राजश्री बाबुराव छत्रे निशाणें व तुडुम [?] इकडे आले. आपलें वर्तमान कळले वरून [आपणाकडे] रवानगी करणार. स्वहस्ताक्षरें चिठ्ठी पाठवावी. बहुत काय लिहिणें हे विनंती.

नं० १३९९ श्री [चैत्र वद्य ३
३० मार्च]

राजश्री वामनराव बाबा व परशुरामपंत भाऊ व रघुनाथराव
स्वामीचे सेवेशीं.

पोष्य बाळाजी जनार्दन साष्टांग नमस्कार. विनंती उपरी तागायत छ० १७ मोहरम पावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. तुह्मी छ० १४ मोहरमचें पत्र पाठविलें तें छ० १६ मिनहूस[1] पावलें. इकडील मजकूर सविस्तर हरीपंतांस लिहिला आहे त्यावरून कळेल. आपण कोणे गोष्टीविशीं फिकीर न करावी ह्मणून लिहिलें व हरीपंताचे पत्रावरून सविस्तर कळलें. या उपर नबाब भोंसले सर्व मिळून मजबूतीनें करणें तें करीत जावें. बहुत सावध असावें. सर्वांचें मनोधारण रक्षावें. मान अपमान मनांत न आणून बातमी फार राखीत जावी. [दादासाहेब] छाप्याचे वगैरे अनेक दगे करितील. मजबूतीनें असावें मामा गेले तर काय चिंता आहे! लोभ असों द्यावा हे विनंती.

---

[1] कासेगांवच्या लढाईतून.

दादासाहेब नर्मदेच्या रोंखे जातात

नं० १३९६ (अधिक वैशाख शु० एप्रिल दु० पंधरवडा)

शिवाजी बाबाजीचें वामनरावास पत्र—

" श्रीमंत मातुश्री गंगाबाई प्रसूत झाली. पुत्र झाला. संतोषाचें वर्तमान आपणास कळावें ह्मणून लिहिलें आहे. आपण चित्तावर घेतल्या सारखें आज पावेतों उत्तमच सूर्योदय झाला! आतां सर्व गोष्टी उत्तमच आहेत."

नं०१३९७ (१ एप्रिल)

शिवाजी बाबाजीचें वामनरावास पत्र पुरंदर मुक्कामाहून अधिक वैशाख शु० १० गुरुवारचें.

" त्रिंबकरावमामा गेल्यामुळें हुजरातींत वगैरे मनसब्यास वजन नाहीं. ते मातबर होते. राजश्री हरीपंत तात्या मेहनत करितात, परंतु अंतर पडतें." ह्मणून लिहिलें तें कळलें मामांची मातबरी. त्यांची व नबाबांची भेटी अगोदर झाली, बोलणें चालणें झालें होतें, ते गेल्यामुळे मनसब्यास फारच कमी पडलें. इलाज काय! उभयतांतील[1] एकानें जावें ह्मणून कारस्थानी करावयास चुकलों नाहीं परंतु पाय न घेत यास्तव शेवटीं कृष्णराव व नाना जोशी यांची रवानगी आग्रहें करून दिली. त्रिवर्गांतील नूतन[2] पाठवावे असें कोणाच्या विच्यारें होतें. त्यांस न जाण्याचा मनसबा दिला, व जुन्नरासही गेले. राजश्री साबाजी भोंसले व दर्याबाईचा प्रकार लिहिला तो कळला. त्यास मामानीं पेंच पडेल ह्मणून केलें तेंच मनसबा शेवटास जाई तों राखिलें पाहिजे. वांकडें न दिसेसें झालें

---

१ सखारामबापू व नाना फडणीस यांपैकीं एकानें. २ नवीन तिसरे कारभारी मोरोबादादा.

पाहिजे. राजश्री साबाजी भोंसले या विषयीं उभयतांचा विचार दुसरा नाहीं. वचन दिल्या प्रमाणें निभावणी करितील. आपण दर्याबाई व साबाजी भोंसले यांचे कालानुसार नीट करून दिलें ही मोठी गोष्ट केली. श्रीमंत मातुश्रीबाईस नमस्कार प्रविष्ट केला. श्रीमंत मातुश्री पार्वतीबाई बोलली कीं ' भरंवसा तुमचा. तुमच्या भरंशावर हा गोष्ट झाली.

नं० १३६८

(वैशाख शुद्ध
मे० दु० पंधरवडा)

हरीपंत फडके यांचें वामनराव व परशुरामभाऊ यांस पत्र—
" गंगापुरांकडून आजच पत्रें आलीं कीं, किल्ले त्रिंबकचें राजकारण विघडलें होतें त्यास राजश्री दोजी तेथें राहून हर तजविजेनें राजश्री बळवंतराव काशी व हवालदाराचा लेक व सरनोबत असे त्रिवर्गास घेऊन गंगापुरास आले. सारांश तेथील सर्व खूळ मोडलें.

नं० १३६९ श्रीगणराज. [१४ एप्रिल)

चिरंजीव राजश्री वामनरावबाबा व राजश्री भाऊ व राजश्री रघुनाथराव बाळ यांसी प्रती कोन्हेरराव त्रिंबक. आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत वैशाख अधिक शु० ४ गुरुवासर मुक्काम नजीक पुरंदर वर्तमान यथास्थित जाणून स्वकीय कुशल लिहीत जावें. विशेष. इकडील सविस्तर राजश्री बाळाजीपंत याजबरोबर लिहिलें आहे व मशारनिल्हेनीं

१ कारभारी बापू व नाना यांचा. २ सदाशिवराव भाऊसाहेब यांची पत्नी. ३ गंगापूर नजीक नाशीक येथें नानासाहेब पेशवे यांची स्त्री गोपिकाबाई रहात होती. ४ पुरुषोत्तम कृष्ण पटवर्धन.

दादासाहेब नर्मदेच्या रोखे जातात
सवाई माधवराव यांचा जन्म

सांगितल्यावरून कळलेंच असेल. चिरंजीव राजश्री गंगाधरराव बाळ मिरजेस जाऊन आज चार दिवस झाले. उदईक जाऊन पोंचतील. श्रीमंत[1] मजल दर मजल टोंक्यास गेले. नबाब व भोंसले व आपल्या [2] त्यास निंबाळकरांचे मेजवानी करितां व जड भारी (सामान) नबाबानीं ठेवावयाकरितां मुक्काम केले ह्मणून अंतर फार पडलें. इंदुवारी नगराहून कूच करून पुढें गेलां ह्मणून राजश्री हरीपंत तात्यानीं उभयतांस[3] लिहिलें होतें त्याजवरून कळलें. दोन तीन मजलीनें गंगेवर[4] गेला असाल श्रीमंत जातील त्यांचे पाठीवर जाणें होईल. अंतर फार पडत जाते. तिकडून येणार ते फार करून आल्यावरी ते सहजच हलके होतील. संदर्भाचें राजकारण राजश्री नाईक बारामतीकर यांचे विद्यमानें (त्यांनीं) कळविलें आहेकीं. " धणीपणा राखून सर्व ही काम कारभार करावा. नाहीं तरी पहिली जहागीर व किल्ले श्रीमंत कैलासवासी रावसाहेबांनीं[5] दिले होते त्या प्रमाणें द्यावे." असें राजकारण आहे. नाईक बारामतीहून काल येथें आले अहेत यांचें खासगत बोलणें चालणें आहे त्या साठीं आले आहेत. व राजकारणाचा प्रकार ऐकावें असें उभयतांचें मानस नाहीं. 'त्यांचा दम कोठपावेतों आहे तेथपावेतों फिरतील. काय चिंता आहे!' असाच दम आहे. [6]जप्तीचे कागदपत्र तमाम गेले. कळावें. उभयतांनीं एक दोन वेळां बोलावून नेऊन सांगितलें कीं, ९३००० रुपये सालगुदस्तांबद्दल येणें, त्यास सरकारांत खर्चाची निकड आहे. तरी

---

१ दादासाहेब. २ येथें मूळपत्र फाटून अक्षरें गेलीं आहेत. ३ पुरंदरयेथें उभयतां कारभारी यांस. ४ गोदावरी तीरास. ५ माधवराव पेशव्यांनीं. ६ प्रतिपक्षाकडील लोकांचीं घरें दारें जप्त करण्याबद्दलचे हुकूम.

दादासाहेब नर्मदेच्या रोंख जातात
सवाई माधवराव यांचा जन्म

ऐवज जरूर द्यावा. सरंजामी यांजकडे ऐवज येणें आहे ह्मणून ज्ञाबसाल झाले, . त्यास सरंजामी याचा सरंजाम जप्त करावा. पंचवीस हजार रुपये मोघम ठेवावे व जमखंडीबद्दल सतरा हजार रुपये पैकीं तीन हजार राहिले आहेत ते येणें प्रमाणे द्यावे ह्मणतात. ' होय, नव्हे, ' कोठपावेतों ह्मणावें! ऐवज दिला पाहिजे. त्यास आपण हुजरातीच्या वगैरे लोकांस खर्चावेचास ऐवज दिला असल्यास त्याची यादी लिहून पाठवावी. ह्मणजे तितका ऐवज मजुरा होईल. बाकीच्या ऐवजाची चिट्टी व तीन हजार रुपयेची चिट्टी जमखंडीबद्दल नक्ताची पाठवावी सरकारचा ऐवज देणें त्याचे होन पंचमेळ धारवाडी दर ३८२ प्रमाणें होन होतील तितके द्यावे लागतात. ऐवज दिल्याखेरीज उभयतांची मर्जी राहात नाहीं ऐवजाची चिट्टी पाठवावी. ऐवज गुदस्तांबाबत आजपावेतों ओढिला. त्यांस खर्चाची निकड जाणून ते, ही ऐवजाची निकड करून मागतात. यास्तव ऐवजाची चिट्टी पाठवून द्यावी. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे आशीर्वाद.

नं० १३६० **श्रीगणराज** (२ मे)

चिरंजीव राजश्री वामनरावबाबा व राजश्री भाऊ व राजश्री राघोबा-दादा यांसी प्रती कोन्हेरराव त्रिंबक. आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत वैशाख आधिक कृष्ण ७ मुक्काम नजीक पुरंदर वर्तमान यथास्थित जाणून स्वकीय कुशल लिहित असलें पाहिजे. विशेष. तुह्मी पत्रें छ० ६ सफरचीं पाठविलीं तीं छ० १४ मिनहूस पावोन सांवस्तर मजकूर कळला. [आपण] त्रिवर्गास पत्रें पाठविलीं व श्रीमंत मातुश्री बाईचीं पत्रें येणें प्रमाणें पाठविलीं तीं पावतीं केलीं. " श्रीमंत राजश्री दादासाहेब ब्र्हाणपुरचे रोखें चालले. नबाबाचें जड भारी सामान शहरांत

दादासाहेब नर्मदेच्या रोंखे जातात
सवाई माधवराव यांचा जन्म

टाकिलें. याज उपरी मजल दर मजल श्रीमंतांचे पाठीवर जात आहों." ह्मणोन लिहिलें तें कळलें. दर्याबाईकारितां व नबाबाचें जड भारी ठेवण्याकारितां दिवसगत लागली याजकरितां तफावत फार पडली. तुमचा इलाज काय! बऱ्हाणपुरच्या आसऱ्यास गांठ पडेल. 'होळकर व शिंदे निघाले, आपणाकडे येतात,' ह्मणून गुरुजींची पत्रें वारंवार येतात. लिहिण्यापुसण्यावरून ते दुरोख राहणार नाहींत. इकडेच येतील यांत संशय नाहींसा दिसतो. राजश्री चिंतो विठ्ठल व विसाजी केशव संधाना साठीं (श्रीमंतांकडून येथें) आले. बोलण्या चालण्याचा प्रकार (तर) दोन लाख रुपये दान धर्मास द्यावे आणि आनंदवल्लीस रहावें. येणें प्रमाणें पुरवल्यास मान्य करावें, ह्मणून (येथून श्रीमंतांस) पत्रें पाठविलीं आहेत उभयतां राहिले अतःपर तिकडे जात नाहींत. वचन प्रमाण झालें. चिंतो विठ्ठल यांची तैनात पंधरा हजार पाहिली श्रीमंतांनीं केली होती. आतां जास्ती पंधरा हजार करून तीस हजार करार झाली. यांत खानदेशचे वतनाचा ऐवज देखील तीस हजाराची भरती करून द्यावी येणें प्रमाणें ठरलें. विसाजी केशव कोंकण तालुक्याची रदबदली कारितात. अद्यापि निश्चयाची गोष्ट कांहीं नांहीं श्रीमंत मातुश्री गंगाबाई प्रसूत झाली. पुत्र झाल्याचें वृत्त आपल्यास कळलेंच असेल. अकरा दिवशीं नामकरण झालें. मोठा समारंभ झाला. राजश्री बाबोजी नाईक सर्व कुटुंबसुद्धां आले होते. पुण्यांतील हीं मातबर मातबर आले होते. नांव श्रीमंत राजश्री माधवरावसाहेब ठेविलें समारंभ चांगलाच झाला. हेलकरणी बाईका मराठ्यांच्या अकरा दिवस पाणी घालीत असतात, त्यांस बारामती, सुपें

---

१ महादाजीपंत उपनांव भट. २ संधानाचें बोलणें बोलणारे.

क्र. ११९६ दादासाहेब व गंगाबाई यांच्या कारकीर्दी इ.स. १७७४
दादासाहेब नर्मदेच्या रोखें जातात
सवाई माधवराव यांचा जन्म.

फलटण, वांई, सासवड, तालुक्याच्या व पुण्याच्या गांव खेड्यांच्या ह्मणतां सात आठ हजार झाल्या त्यांस लुगडीं व चोळखण या प्रमाणें दिलें पुण्यांतील वाड्यांतील बायका दहा हजार झाल्या त्यांस चोळखण दिलें. आबाल वृद्धांस सर्वांस मोठा संतोष झाला. वैशाख शुद्धांत उभयतां कारभारी सप्तऋषीस[1] जाणार कळावें राजश्री आपाजीराम पाटणकर व वेंकोजी नाईक श्रीमंतांकडून संधानासाठीं ह्मणून आपल्या लष्करास आले ते पुन्हां त्यांजकडे गेले नाहींत. निखालसपणें इकडेच राहिले. तेव्हां तिकडील लोकांस संशय झालाच असेल! राज्यास अधिकारी भगवंतें केलें. हें वृत्त सर्वत्रांनीं ऐकल्या उपरांतिक फार करून उठून आपल्या लष्करांत आले असावेसें दिसतें. सविस्तर लिहावें. वैशाख मासांत मनसबा शेवटास गेला ह्मणजे मोठी गोष्ट आहे. पुढें झाल्यास संकटच आहे! आज पावेतों या थरास भगवंतें आणिलें पुढेंही चिंता त्यासच आहे. पार पाडील. राजश्री मोरोबादादा जुन्नराहून आले ते मुहुर्तासाठीं पुण्यांतच राहिले होते. आज किल्यावर येणार. 'या मनसब्याच्या गोष्टी आपणाजवळ पहिल्यापासून बोललों नाहीं. उभयतांशींच बोलत आलों' याजकरितां परम खट्टे[2]! आह्मांशीं बोलणें चालणें सरळ नाहीं. असो काय चिंता आहे! रावो बापू व भगवंतराव बेडेकर व बाजीपंत आण्णा वगैरे मंडळी श्रीमंतांच्या लष्करांतून निघून आल्याचा तपशील लिहिला तो कळला. मनसबा शेवटास न्यावा. चार दिवस अधिक लागल्यास चिंता नाहीं, असाच मनसबा होत असावा, असें लिहिलें, त्यास वारंवार आमचें बोलणें चालणें (कारभाऱ्यांशीं) होत असतें उभयतांचा खबीर

---

१ साताऱ्यास महाराज्यांकडे पेशवाईचीं वस्त्रें नूतन पेशव्या करितां घेण्यासाठीं. २ रुसलेले.

दादासाहेब नर्मदेच्या रोखें जातात
सवाई माधवराव यांचा जन्म.

पक्काच आहे. दुसरा विचार नाहीं. 'दोन लाख रुपये दानधर्मास घेऊन आनंदवल्लीस रहावें. येणे प्रमाणें त्यांनीं मान्य केल्यास लोक व विश्वासू कोणी श्रीमंतांजवळ ठेवावा आणि बंदोबस्त चांगला करावा; या प्रमाणें त्याणीं मान्य न केल्यास जथ विस्कटून आपला जथ पाडून बंदोबस्त करावा; ' असा मनसबा आहे. नर करून लांबणविर पडा लागल्यास असें करावें असें आहे. इतक्यांत तिकडील लोक उठून आले आणि आपल्या फौजांची गांठ पडून फडशा झाल्यास उत्तमच गोष्ट झाली. तुह्मीं पत्र छ० [१] सफरचें सरकारच्या खिजमतगाराबरोबर पाठविलें तें काल रविवारीं संध्याकाळीं पावलें. मजकूर कळला घांट उतरून त्याच दिवशीं गेलां ह्मणून खिजमतगारांनीं सांगितलें. निकड झाल्यास गांठ पडून फडशा सत्वरच होईल. राजश्री मोरोबादादा आले. किल्ल्याखालींच राहिले आहेत. राजश्री आबा मामाचे ही पुत्र आले आहेत ईश्वर कृपेंकरून राज्यास पांघरूण ईश्वरें केलें. आतां मनसब्यास ही बळ पडेल. येथें उभयतांचा विचार पक्का आहे. आतां नानांचें सर्व लक्ष तुमचे ठायीं आहे आज पावेतों ईश्वरें चांगलेंच घडविलें. पुढें मनसबा शेवटास निर्वेध व्हावें हा भरंवसा आपणावर आहे. राजश्री नानानीं आपणास परभारें लिहिलें आहे त्या अन्वयें मनसबा शेवटास नेल्याविना स्वस्थ होत नाहीं. यांत घडेल तें करावें राजश्री मोरोबादादा आपणावर फारच रुष्ट आहेत. याचें कारण आह्मांस समजलेंच आहे. पत्राचें उत्तर मशारनिल्हेनीं लिहून दिलें तें पाठविलें आहे. ध्यावें मिरजेहून नासूद जोडी पत्रें घेऊन पैठण पावेतों गेले. पुढें वाट चालेना ह्मणून माघारे

---

१ अमृतराव त्रिंबक पेठे.

दादासाहेब नर्मदेच्या रोखे जातात
सवाई माधवराव यांचा जन्म

येथें आले त्यांस ही पाठविले आहेत. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे आशीर्वाद.

नं० १३६१ [अधिक वैशाख शु० १०
२१ एप्रिल]

गंगाधरराव गोविंद यांचें वामनरावास पत्र छ ० ९ सफरचें-
आह्मांस पुरंदरीं जिवास समाधान न वाटे याकरितां तीर्थस्वरूप राजश्री तात्यांनीं उभयतां कारभारी यांस लिहून आमची रवानगी मिरजेस करविली. श्रीमंत मातुश्री गंगाबाई प्रसूत झाली. पुत्र झाला. मोठा लाभ झाला. श्री पंढरीनाथानें राज्यास धणी केला. सविस्तर तीर्थस्वरूप राजश्री तात्यांच्या पत्रावरून कळेल. सत्य गोष्ट साक्षात् विष्णूनें अवतार राज्य रक्षणार्थ घेतला! या एवढा हर्ष कोणता आहे? "

नं० १३६२ श्री [२ मे]
सेवेशीं शिवाजी बाबाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल तागायत वैशाख अधिक कृष्ण सप्तमी. इंदुवासर मुक्काम नजीक पुरंदर. वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपण पत्रें पाठविलीं तीं पावलीं. सविस्तर मजकूर कळून संतोष झाला. सरकारच्या हुजऱ्याबरोबर श्रीमंत राजश्री नानास पत्राचें उत्तर पाठविलें तें वाचून पाहून फार संतोषी झाले. बोलिले जे ' इतक्या पत्रांचीं उत्तरें आलीं त्यांत पत्र वाचून पहावया योग्य एवढेंच आहे,' ह्मणून बोलिले. व ' पुढें मनसबा शेवटास नेणें हा भरंवसा त्यांवरच आहे. भरंवसा त्यांचाच धरून उद्योग केला व पुढें

१ पत्र वामनरावास.

मनसबा शेवटास नेणें हें त्यांजकडेच आहे, ' ह्मणन फार संतोषें घरोब्यानें बोलत होतों. उभयतां कारभारी यांचें मत आज पावेतों एकच आहे. दुसरा विचार तिलमात्र नाहीं. आतां तिसरे गृहस्थ आले आहेत. यांच्या विचारास आपण माहीतच आहां. परंतु उभयतांमधीं विपर्यास पडणार नाहीं. चित्त मिळून गेलें. विपर्यास पाडावयास (पाडणारे) चुकणार नाहींत परंतु विपर्यास पडणार नाहीं असेंच आहे. शिन्यांस मोर्चे टिपूनें लाविलें, झुजतें, ह्मणून वर्तमान आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं० १३६३ श्रीगणराज (अधिक वैशाख वद्य १० ९ मे.)

पै।। छ० १६ रबिलावल.

तीर्थस्वरूप राजश्री भास्करपंत आपा वडिलांचे सेवेशीं.

चिरंजीव राजश्री तात्या यांसी व गंगाधर बाळ यांसी प्रती वामनराव गोविंद आशीर्वाद उपरी येथील कुशल तागायत छ० २३ सफर मुक्काम धुळकोट जाणून स्वकीय लिहित जावें. विशेष. इकडील वर्तमान सविस्तर लिहून मुजरद जोडी वरणगांवचे मुक्कामाहून तुह्मांकडे रवाना केली आहे ती येऊन पावलीच असेल. त्या अलीकडील वर्तमान तर राजश्री आपा बळवंत वगैरे तमाम लहान मोठे लोक वीस पंचवीस हजार फौजेनिशीं देखील तोफा श्रीमंतांकडून इकडे आले. त्यांच्या भेटी तापीतीरीं चांगदेवावर झाल्या. तेथून कूच करून ब्र्हाणपुरानजीक आलों ते दिवशीं जिकडील लोक तिकडे विल्हेवार उतरले. सरकारांतून सान्या फौजेस रोजमराही दिला. श्रीमंत मजल दर मजल नर्मदेकडे चालले यास्तव आह्मी व विठ्ठल शिवदे-

१ मोरोबादादा.

अं. १६९६ दादासाहेब व गंगाबाई यांच्या कारकीर्दी इ. स. १७७५

दादासाहेब नर्मदेच्या रोंखे जातात.

बाचे पुत्र व नरसिंगराव धायगुडे व रास्ते खासे त्यां या रोखावर जावयाकरितां निवून परवां बऱ्हाणपुरावरून कूच करून मुक्काम मजकुरीं आलों. बरकड झाडून फौजा मोंगल व भोंसले आदिकरून बऱ्हाणपुरावर राहिले आहेत. राजश्री आपा बळवंत आह्मां समागमें नेमिले आहेत ते आज येणार याजकरितां एक मुक्काम येथें केला. आह्मीं निघून दोन कोस पुढें गेलों. श्रीमंत नर्मदा पार होऊन इंदुरास होळकराजवळ गेले अशी बातमी कालच आली. पुढें त्याजकडे पत्रें रवाना केलीं आहेत कीं, 'याजउपर भडकून न जावें मुक्काम करावा. मनांत किमपि संशय न आणावा.' अशीं पत्रें पाठविलीं आहेत. खेरीज शिंदे होळकर यांस ही 'श्रीमंतास जाऊं देऊं नये. तमाम वाऱ्या बंद कराव्या' अशीं पत्रें गेली आहेत. श्रीमंतासमागमें हजार दीड हजार फौज व गाडदी तीन चारशें इतकें सामान आहे. मुख्यत्वें सखाराम हरी सदाशिव रामचंद्र व मानाजी फाकडे व मालोजी घोरपडे व बाबूराव पाटणकर असे सडे आहेत. त्यांपैकीं मालोजी घारपडे व बाबूराव पाटणकर हे तो नर्मदापार होत नव्हते, इंदुरा पावेतों आग्रह करून नेले आहेत. ते ही येतील. नित्य दहा पांच उठून येतच आहेत राजश्री आपा बळवंत आज येतांच उदईक कूच करून पुढें इंदुरचे सुमारें जातों. येथून इंदूर दहा अकरा गांवें आहे. दोहों तिहीं दिवशीं नर्मदा पार होऊन जाऊं. आतां लांबणीवर पडणार नाहीं असें दिसतें. यांत श्रीसत्ता प्रमाण! या उपर श्रीमंतानीं आह्मांवर चालून यावें हा तो प्रकार राहिला. जीव मात्र घेऊन पळतात! जातीनिशीं कदाचित लांबले तरी चिंता नाहीं. एकल्यानें जाऊन करणें काय हें कळतच आहे! हस्तगतच करावे या लागांत आहों. बरें! ईश्वर घडवील तें खरें! चिरंजीव राजश्री गंगाधरबाळाची चिंता लागली आहे तरी (त्याच्या व्याधीचें) उपशमन झाल्याचें वृत्त लिहून संतोषवावें. बुनग्याची

रवानगी अद्यापि झाली नाहीं ह्मणून काल चवदावें दिवशीं तासगांवाहून जासूद आले त्यांनीं सांगितलें. त्यास अलीकडे रवानगी झाली न झाली हें कळत नाहीं. आह्मी तर लांबलों याउपर बुनग्याची आमची कशी गांठ पडेल. न कळे. तुह्मांकडीलही आज एक मास वर्तमान कळत नाहीं. सविस्तर लिहिणें आतां कित्तुरकरांकडे कागद पाठवावे. रायदुर्गास सामान ठेविलें आहे त्याजविशीं लिहिलेंच आहे तर सामान ठेविलें आहे तें आणवावें. आतां लष्कर लवकरच मागें फिरेल; तरी पैक्याची तरतूद असों देणें. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं० १३६४ श्रीगणपती [६ मे]

तीर्थस्वरूप राजश्री बाबा व भाऊ वडिलांचे सेवेशीं चिरंजीव राजश्री बाबा व भाऊ यांसि प्रती पुरुषोत्तम कृष्ण. आशीर्वाद उपरी व साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील वर्तमान तागायत अधिक वद्य एकादशी मुक्काम गंगापुर येथें वर्तमान यथास्थित असे. विशेष. अलीकडे पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं तर ऐसें न करावें. सदैव पत्र पाठवावें. इकडील वर्तमान तर वद्य चतुर्थीस चवदाघटका रात्रीस श्रीमंत मातुश्री बाई गंगापुरास आली. समागमें दादा आले मी व राजश्री खंडेराव व राघोबा आंतवळे सुद्धां व राजश्री रामचंद्रपंत मामा त्यांजकडील लोक सुद्धां राहिलों. रात्रीचा तीन कोस अंजनीपर्वत पलीकडे राहोंजे पर्यंत पाठवावयास निरोप घेऊन माघारा सहा घटका रात्रीस आमचे खासा पागेचे दहाजण समागमें घेऊन त्रिंबकास गेलों. पांच दिवस तेथें होतों. किल्लेकऱ्यांशीं कळेल तसें बोलून बळवंतराव सुभेदार व हवालदाराचा लेक व सरनोबतचा लेक असें त्रिवर्गास घेऊन आलों. श्रीमंत मातुश्री बाईचे

---

१ दोनप्रकारचा मायना विनोदार्थ. २ गोपिकाबाई.

पायांवर (त्यांजकडून] डोई ठेवून त्यांस येथें आह्मीं आपले जवळच ठेविले आहेत. कोळ्यानीं बहुतच उपद्रव मांडला आहे. अंजनी पर्वतावर दोन शिष्ये व चार पांचशें माणूस जमा झालें आहे. एक दोन गांव त्यांनीं रात्रीचे लुटून तोडाताड केली. एक दो दिवशीं त्यांचाही परामर्ष करून वरता एक माणूस न राहे तें करितों! पुरंदरास ही पत्रें रवाना केलीं. त्याची आज्ञा झाली ह्मणजे येतों. अज्ञ वाचून यावें तर तुह्मी ही बोल लावाल! याचें उत्तर लिहिणें' जनार्दन राम कल्याणाकडे आहे तिकडे येणेंचीं पत्रें गेलीं आहेत लक्ष्मण बर्वे संगमनेरास आले आहेत. त्यांस ही येणें अशीं पत्रें गेलीं आहेत. येथें नवरीचा शोध करविला आहे योग घडावयाचा असल्यास घडेल. नाहीं तर लग्नास जावें असें मानस त्याचें आहे. घडेल तें लिहितों. राघोबा ओतवळेस व दादाकडे कर्ज घेऊन दिलें. कळलें पाहिजे. बहुत काय लिहिणें लोभ करीत जाणें. हे विज्ञापना व आशीर्वाद.

नं० १३६९ श्री. अधिक वैशाख व० १२

(७ मे)

तीर्थस्वरूप राजश्री वामनरावबाबा व परशरामपंतभाऊ वडिलांचे सेवेशीं अपत्यें कोंळो बहिरव साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल तागायत छ०२९ सफर जाणून स्वकीय कुशल लिहित असलें पाहिजे विशेष छ० २२ मोहरमचें पत्र डोबगांवच्या मुक्कामाहून पाठविलें तें छ० ३ सफरीं पावलें. लिहिला मजकूर कळला लष्करचें वर्तमान कळलें. ' राजश्री मामा विश्वासघातामुळें त्यांजकडे सांपडले. वरकड सर्व मंडळी खैर आहे. ' ह्मणून लिहिलें तें कळलें. मामा तिकडे सांपडले, मृत्यु

१ पेठे. नरगुंदकरांचे कारभारी.

पावले, अनुचित गोष्ट झाली! विश्वासघात केल्यावर उपाय नाहीं. आपण सर्व मंडळी सुद्धां सुखरूप आहां येणें मुळें बहुत संतोष झाला. अलीकडे वर्तमान कळत नाहीं. आपलें पत्र पावतांच दुसरे दिवशीं जोडी आपणाकडे जोडी रवाना केली ती मार्ग न चाले, वाटेचें दुर्घट, या मुळें जोडी परतून पत्रासह माघारी काल आली. राजश्री मुरारराव घोरपडे यांस आपण पत्र पाठविलें तें प्रविष्ट करून प्रतीउत्तर आलें तें ही याज बरोबर पाठविलें होतें तेंही परतून आलें. करितां हल्लीं दुसरी जोडी आपणाकडे जावयास मिरजेस पाठविली आहे. तेथून आपणाकडे येतील त्यांबरोबर सविस्तर आपला मुक्काम कोठें आहे. श्रीमंत कोणते मुक्कामीं आहेत, मनसबा काय, आपणास व श्रीमतांस अंतर किती कोसांचें आहे सर्व लिहावया आज्ञा करावी. शिंदे होळकर तिकडे जवळ आहेत ह्मणे! ते कोणाकडे येणार हें लिहावें. आपल्या पत्रीं ' श्रीमंत बीडच्या सुमारें चालिले, मागून पिछावर मोगल भोसलेसह वर्तमान सडे होऊन त्यांच्या रोखें जातो, ' असें लिहिलें होतें. प्रस्तुत वर्तमान बऱ्हाणपुरचे रोखें श्रीमंत जात आहेतसें वर्तमान आहे. सविस्तर लेखन आज्ञा करावी इकडील वर्तमान राजकीय तर राजश्री मुरारराव घोरपडे फौजेसह डंबळ प्रांतांत आले आहत. कोरलहल्लीं गांव डंबळकरांचा तें ठाणे घातलें. जयंतीबाई ह्मणून ठाण्यांत होती तिजला चौकी आहे. तेथून गलगनाथास येणार. कोपळ प्रांतींचीं गुरें आणिलीं. डंबळकरास उपसर्ग देऊन दीड लाख रुपये मागतातसें वर्तमान आहे. तेथून तळ सावनुराकडे येणार. त्यांस लाख रुपये मागतात. येणें प्रमाणें वर्तमान. तेथून पुढें को.

नं० १३६६ श्री. (अधिक वैशाख वद्य १३
(८ मे.)

राजश्री पुरुषोत्तमराव स्वामी गोसावी यांसी.

श. १६९६ दादासाहेब व गंगाबाई यांच्या कारकीर्दी इ.स. १७७४

दादासाहेब माळव्यांत जातात

स्ने० अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्नेहांकित मुरारराव हिंदुराव घोरपडें ममलकत मदार सेनापती दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय लेखन करीत असलें पाहिजे. या नंतर तुह्मीं पत्र पाठविलें तें पावलें. राजश्री पांडुरंगरावजीनीं मिरजेहून पत्रें पाठविलीं तीं पावलीं. मातुश्री गंगाबाई प्रसूत झाली. पुत्र झाला, ह्मणून ऐकिल्यावरून संतोष झाला. श्रीची कृपा! या उपर सर्व ही सुगमच प्रकार आहे. राजश्री दादा[1] थोडके फौजेनिशीं आहेत, नबाब व राजश्री वामनराव आदि समस्त सरदार भारी फौजेनिशीं समीपच आहेत, संधानाचा प्रकार लागला आहे ह्मणून मध्यस्थ बोलणार बोलतात, ह्मणून दार्शित झालें; ऐशास मनसबा फार सरस झाला. नबाब व राजश्री वामनराव यांनीं दुसरा विचार न करतां संधानाचें लागलेंच आहे त्या निमित्यें दादास समीप करून फौजेचा दाब दाखवून उतरावें. दादासीं करार पूर्वीं माधवरावजीनीं केल्याप्रमाणें मुलुख द्यावयाचा द्यावा. त्यांत अंतर दादास वांकडें सर्व प्रकारें योजूं न ये. मनसब्यास आरंभीं नारायणरावजीची व शेवटास त्रिंबकराव या उभयतांची कीर्ति[2] तिकडेंच असों द्यावी! या अर्थें कारस्थानींत हरगीज कमी न करितां हरतऱ्हेन मनसबा शेवटास न्यावा. दादास कराराप्रमाणें कांहीं दिवस निभवावें. महिना दोन महिन्यानंतर बंदोबस्त राखून नबाबजींस मात्र निरोप देऊन वरकड फौज सरदार एकंदर फुटों न देतां पुरतां बंदोबस्त सहा चार महिने चांगला करून त्या नंतर हिंदुस्थान कर्नाटक या प्रकारें योजणें तो (मनसबा) योजावा. आमच्या ध्यानांत एक अर्थ सुचविला आहे. आह्मीं आजवर तुंगभद्रा तीरास होतों. राजश्री बापू अगर वामनराव परशुरामपंत व आपण स्मरण करून हरएक बंदोबस्त

---

१ रघुनाथराव. २ विश्वासघाताची अपकीर्ति.

करावयास लिहितील या अर्थे फौज गाडदी वगैरे यथास्थित येऊन राहिल्या स आमचें स्मरणच न केलें! बरें असो. आपणास आमची निखालसता सर्व ही सांगितलीच आहे त्याप्रमाणें राजश्री बापूस सुचविलेंच असेल. आमचा भार सर्व प्रकारें बापूंकडे[1]. त्यास अवश्यक तेंच आह्मांस. अन्य विचार नाहीं. आपणाकडील कुशलवृत्त समजणेचा प्रकार पंधरा पंधरां रोजाचें लिहून पाठवावें. राजश्री वामनरावजीस लिहिलें आहे. आपण सांगून जोड्या वरचेवरी पाठवाव्या. याप्रमाणें येथून लिहून पाठवावयास येईल. रवाना छ० २६ सफर. मनसबा उरकल्यानंतर पंधरा पंधरा रोजाचें वृत्त कळवीत जाणें. बहुत काय लिहिणें.

नं० १३६७ श्रीगणराज (अधिक वैशाख शुद्ध ७ १८ एप्रिल)

चिरंजीव राजश्री सुभेदार यांसी प्रती पांडुरंगराव गोविंद आशिर्वाद उपरी काल रविवारीं तीर्थस्वरूप राजश्री बाबांचें पत्र प्रवरासगमचे मुक्कामचे छ० २ सफरचें आलें. आज शिवनदचे मुक्कामास गेलों ह्मणून लिहिलें आहे. धायगुडे[2] आल्यापासून श्रीमंतांचें लष्कर बहुतच घाबरें झालें आहे. जासूद, खिजमतगार, मोततदार वगैरे लोक देखील उठून येतात. शें पन्नास राऊत ही येतात. गंगेवरी श्रीमतांशीं लोकांनीं रोजमुऱ्याकरितां अडविलें होतें. औरंगाबादेस जाऊन कर्ज घेऊन रोजमुरा देतों असा करार करून पुढें गेले. औरंगाबादेस कर्ज मिळणें कळतच आहे! या उपर लवकरच गुंता उरकेल ह्मणून लिहिलें आहे. श्रीमंतास व आह्मांस सात आठ गांवची तफावत आहे ह्मणून लिहिलें होतें. पुरंदरचीं पत्रें आलीं त्यांत चिंतो विठ्ठल व विसाजी केशव संधानास आले आहेत ह्मणून

---

१ सखारामबापूकडे. २ शिवराम नीलकंठ पटवर्धन कुरुंदवाडकर.

लिहिलें आहे. पुरंदरचीं पत्रें तुह्मांस ही काल राउता समागमें आलींच आहेत. हे आशीर्वाद.

पै॥ छ० १३ सफर.

नं० १३६८ श्री. (१७ मे.)

चिरंजीव राजश्री तात्यासाहेब[1] यांसी प्रती वासुदेव धोंडदेव आशीर्वाद विनंती येथील कुशल तागायत वैशाख शुद्ध ७ पावेतों मुक्काम मौजे भुतेवरणगंगा नजीक नर्मदा पांच कोस. यथास्थित असे. विशेष. इकडील वर्तमान तर बऱ्हाणपुरचे मुक्कामाहून फौजा इकडे आल्या. श्रीमंत दादासाहेब सडे दोन हजार फौज व हजार गाडदी तीन चारशें कारखान्याचे उंट व पंचवीस तीस व सदाशिव रामचंद्र, सखाराम हरी, बाबूराव पाटणकर, मालोजी घोरपडे मुधोळकर, वगैरे येणें प्रमाणें दर मजल बडवईचे घांटें इंदुरास गेले. तुकोजी होळकर तीन कोस सामोरे येऊन घेऊन गेले. महादजी शिंदे उज्जनीहून इंदुरास आले भेटी झाल्या. बोलण्या करितां कारकून त्यांजकडील आले आहेत यांजकडील तो राजश्री विष्णू महादेव व गुरूजी पूर्वींच गेले आहेत. बोलण्यांतील भाव " धणीपणा राखावा. पूर्वींची जहागीर द्यावी व किल्ले द्यावे, " येणें प्रमाणें भाव आहेत. ठरण्यांत लौकर येतां दिसत नाहीं. प्रस्तुत कांहींचे बोलण्यांत छावणीचा प्रकार ठरेल, उभयतां सरदारांचा बिघाड होईल, असें दिसतें. राजश्री हरीपंत तात्या व भोंसले नबाब सारे बऱ्हाणपुरास राहिले आहेत. राजश्री आपाजी बळवंत, आपली फौज, रास्ते, धायगुडे, इचलकरंजीकर,[2] येणें प्रमाणें गणतीची सोळा हजार पुढें फौज आली आहे. या फौजेस व हरीपंतास दहा गांवची तफावत आहे. आज लष्कर कूच होऊन सनावदास गेलें.

---

१ पांडुरंगराव. २ पटवर्धन शीळकर.

दादासाहेब माळव्यांत जातात.

तेथून बडवेचा घांट तीस कोस राहतो. ओंकारेश्वर ही तीन कोसच आहे. इंदुर सहा गांव आहे. राजश्री नागोराम व मोरो गिरमाजी इकडून पाठविले आहेत त्यांचीं पत्रें आज उद्यांत येतील. उभयतां दोन्ही सरदारांनीं चित्तावर घेतल्यास लवकर गुंता उरकेल. नाहींतर पाऊस काळ समीप आला तेव्हां कळतच आहे! बुनगें न आलें. खर्चास पैसा नाहीं. येथें दोहोंत्याने रुपये मिळत नाहींत असा प्रकार आहे. चार पांच हजार रुपये शिल्लक आहेत! हरीपंत तात्यापासून पंचवीस हजार घेतले ते सरले. लौकर ऐवज आल्यास परिणाम लागेल. इकडील सविस्तर बाबाचे पत्रावरून कळेल. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

नं० १३६९ श्री (वैशाख शु० १३
२३ मे.)

विज्ञापना तागायत छ० ११ रोज मंगळवार प्रातःकाळ जाणून मुक्काम लष्कर बऱ्हाणपूर. श्रीमंत राजश्री दादासाहेब पेशवे सेबुराडियानजीक मुक्कामास आले त्याच मुक्कामीं अद्याप आहेत ह्मणून वर्तमान आहे. राजश्री कृष्णराव बळवंत वगैरे फौजा रेवातीरास गेल्या होत्या. त्यांनीं तेथून कूच केलें. इकडे देशास येतात व येथील फौजेचा कूच उदयीक छ० १२ बुधवारीं आहे. देशास येणार. राजश्री भवानराव प्रतिनिधी छ१० सोमवारीं यथून कूच करून अनुर–लिंबवाडीस मुक्कामास गेले. देशास गेले. सेवेशीं श्रुत होय. शिलेदार वगैरे फौजेस रजा दिला. सरदार वगैरे निवडक लोक बरोबर ठेवितात. तोफखाना येथून देशास जावयास रवा-

१ हरीपंत फडक्याचे लष्करांतून कोणा एकाचें बातमीपत्र.

ना झाला. कांहीं नवल विशेष वर्तमान आल्यास सेवेशीं लिहिलें जाईल. भोसल्यास निरोप झाला. बऱ्हाणपुरापासून कोसावर मुक्काम आहे. तेथून हा आज उदयीक कूच होईल. विदित होय विशेष. काय लिहिणें हे विज्ञापना.

नं० १३७०

अधिक वैशाख व० ७

महादाजी बल्लाळ [गुरुजी) यांचें वामनरावांस पत्र.

छ० २० सफरचें इंदुराहून.

" तुह्मीं सैन्यासह नर्मदा पार सनावदास आलां आहांत, परंतु खरें खोटें, फौज किती, हें कळत नाहीं; तरी लिहावें. श्रीमंत येथें आले. उभयतां सरदारांनीं भेटून साम लाविला त्यास आठ रोज एक ही निश्चय होत नाहीं. पावसाळा जवळ आला. आजचें उद्यां करितां पाऊस पडूं लागल्यास फौजा चालणार नाहींत. सहजच मनसबा लांबणींत पडेल, हे गोष्ट उत्तम नाहीं. आपण नर्मदा उतरून बलवड्यावर यावें; आणि आह्मांस पत्र पाठवावें कीं आह्मीं आलों; ह्मणजे त्या दबावानें लवकरच फडशा होईल. या गोष्टीस आळस न करावा. "

नं० १३७१

[अधिक वैशाख व०
मे दुसरा पंधरवडा.)

पांडुरंगरावाचें वामनरावास पत्र.

" श्रीमंत मातुश्री अधिक शु० ७ इंदुवारीं प्रसुत झाली, पुत्र झाला, ह्मणून पुरंदराहून पत्रें गेलींच असतील. मोटा लाभ झाला! सूर्योदय झाला. आतां श्रीकृपेनें सर्व यथास्थितच होईल. देव सत्याकडे आहे. असें पुरें समजलें. जे द्वामुष्यायणी होते त्यांची देखील खातरजमा

झाली. आतां सर्व पादाक्रांतच होतील यांत संशय नाहीं. राजश्री. मुराराव घोरपडे व दौलतराव घोरपडे, सावनूरकर नवाब, व चित्रदुर्गकर व कनकगिरीकर या सर्वांस पत्रें पाठविलीं. दुष्टांस शासन सुष्टांचें पालन श्री भगवंत करील असा भरंवसा झाला. श्री पंढरीनाथें राज्यास धणी केला. इंदुवार सुदिन ते दिवशीं श्रीमंतांचे राज्यांतील झाडून चौघडे जसे शनवारीं वाजतात तसे वाजवावे. आह्मी आपला नौबदखाना इंदुवारीं नेहमीं सुरू करवितों. ”

नं० १३७१ (अ० वैशाख व० १४ ९ मे.)

महादाजी बल्लाळ गुरुजी यांचें हरीपंततात्यास पत्र २७ सफरचें मु. इंदुरचें—

“ श्रीमंत येथें आले. शिंदे होळकर भेटले. रंग पाहतां समागमें तीन चार हजार फौज व दोन हजार गाडदी एकूण सारे एक दिल, मरणोन्मुख जिवाचे उदार, असे आहेत. झुज करितां अस्सल खैर व सरकार काम दोन होत नाहींत. यास्तव उभयतांनीं श्रीमंतांशी सल्ला लाउन स्थिर करून येऊन कारस्थानी रीतानें अस्सल खैर व सरकार काम दोन्ही साधावीं[1]. हें कारस्थान करितात. चौथाइ तिजाई काम झालें आहे. इकडे वर्तमान आलें कीं राजश्री वामनराउ आदिकरून सरदार नर्मदे पलीकडे आले, समराडच्या घांटावर येणार ऐसें ऐकिलें, त्याजवरून हें पत्र आपणास लिहिलें असे. तर आपली फौज जेथें असेल तेथेंच मुक्काम करून ठेवावी कारस्थानें दोन्ही गोष्टी साधाव्या हें युक्त आहे. येथील कारभारास फार

---

१ दादासाहेब तर जिवंत रहावे आणि त्यांची फौज तर मोडावी हीं दोन कामें.

दिवस लागत नाहींत. ये विशीची काळजी सरदारांस बहुत आहे. मी आज दोन अडीच महिने या प्रकर्णी आहें तें केवळ फुकट जाईलसें होणार नाहीं. मागून तुमचा दबाव चांगला असावा. तुह्मीं श्रम केले आहेत. ते व्यर्थ कसे होतील? "

नं० १३७३ [वैशाख वद्य ?
जून प० पंधरवडा.]

शिवाजी बाबाजीचें पांडुरंगरावास पत्र पुरंदराहून पै॥ छ. ० १ रबिलावर "राजश्री साबाजी भोंसले व दर्याबाई राजश्री हरीपंततात्याजवळ ब्र्हाण-पुरापाशीं होतीं. उभयतां मधीं विरुद्ध होतें. तोड न निघे तेव्हां रदबद-लीवर गोष्ट पडली. " पांच लक्ष रुपयांची जहागीर दर्याबाईस द्यावी व दोन किल्ले द्यावे आणि त्यांणीं स्वस्थ रहावें. फौज दर्याबाईजवळची साबाजी भोंसले याजवळ रहावी. नालबंदी देणें ती द्यावी. " येणें प्रमाणें ठरलें असतां संशय आला न कळे! दर्याबाई तयार होऊन पळून जावयास अदकोस गेली. तेव्हां फौजा तयार होऊन पाठीवर गेल्या. दर्याबाईची फौज लुटली. माणूस जखमी जायां फार झालें. दर्याबाई व रघोजी भोंसले यांस धरून आणिलीं. तो कैदेंत राजश्री हरीपंताजवळ आहेत. राजश्री साबाजी भोंसले यांस सेना साहेब सुभा वचनाप्रमाणें दिला. वस्त्रं येथून जाणार. त्यांजबरोबर मोंगलाकडील धौशा[1] द्यावा आणि मुधोजीवर पाठवावें. या प्रमाणें ठरलें आहे. "

---

१ मोंगलाचा सरदार इब्राहिमखान धौशा.

शा० १६९६ दादासाहेब माळव्यांत राहतात. इ. स. १७७४
शिंदे होळकरांची मध्यस्थी

नं० १३७४ [२ मे.

बाळाजी केशव यांचें पांडुरंगरावास पत्र.

वैशाख शु० १६ चें नर्मदा दक्षिणतीर येथून—

“ श्रीमंत बऱ्हाणपुरानजीक गेले ते दिवशीं साऱ्या लोकांनीं दंगा केला. ‘ आमचे हातें अतःपर पळवत नाहीं. निरोप द्यावा. ’ त्यास श्रीमंतानीं बहुत प्रकारें सांगितलें कीं, नर्मदा पार पोंचवून देणें. तें मान्य न करितां सारे एक जूट होऊन राजश्री बजावा पुरंदरे व राजश्री आपा बळवंत व आनंदराव गोपाळ व शहाजी भापकर व देरेकर वगैरे तमाम पागे व नामी लोक पंधरा सोळा हजार आह्मांकडे आले. या खेरीज पायचीं माणसें व पेंढारी देखील आले. तोफा ही बऱ्हाणपुरास राहिल्या. राजश्री मुधोजी भोंसले शहरासच राहिले. श्रीमंतांसमागमें सखाराम हरी व आबाजी महादेव व सदाशिव रामचंद्र व मालोजी घोरपडे व मानाजी फांकडे ऐसे तीन चार हजार फौजेनिशीं शहरांतून कूच करून अशेरीजवळ गेले. आह्मी सडे होऊन पाठोपाठ जात आहों. ”

नं० १३७५ श्री. (वैशाख शुद्ध
मे प० पंधरवडा.)

राजश्री वामनराव बाबा तथा राजश्री भाऊ
स्वामींचे सेवेशीं.

विनंती उपरी राजश्री महादजी शिंदे यांचीं पत्रें राजश्री बापूंस आलीं तीं त्यांनीं पहावयास पाठविलीं व राजश्री अर्धांस पत्र आलें त्याची नक्कल पाठविली व रामराव शिंद्याकडून बापूकडे येतात. त्यांचें पत्र आलें तें

---

१ बऱ्हाणपुरास. २ पत्र हरीपंत फडके यांचें. ३ शिवाजी विठ्ठल विंचुरकर. ४ आपाबळवंत.

पहावयास पाठविलें तें पाहिलें व नागोराम मोरोबा पुढें गेले आहेत त्यांची चिठी आली ती ही पावली. वर्तमान सविस्तर कळलें. त्यांतील मुख्यार्थ फौजेनें नर्मदा उतरूं नये, बरें आहे! रामराव भेटल्यावर सर्व भाव समजतील. जें आढळेल तें लिहावें. आपण बापू अप्पा तेथें आहां. जसं जसें लिहिणें तें पुढें लिहीत जावें. आह्मांस लिहीत जावें. कोणे अर्थें कज्जा तुटावा! राजश्री बापू नानाचे करण्याची रीत सर्व समजली आहे, मग चिंता काय? सरदारांचे[1] बोलण्याचे भाव काय हें कळल्यावर अधिक उणें समजेल. आह्मीं येथून दर कूच यावें कीं काय? किंवा पुढें आपण आहेत, आह्मीं मुक्कामच करावा, तें लिहावें. त्या प्रमाणें करूं. पाऊस डोंकीवर आला. त्वरा होऊंन निकाल पडता ह्मणजे बरें होतें. काळजी सर्वांस आहे. श्रीकृपेनें घडेल तें खरें. गंगापुरचा लखोटा येथें आला तो रवानगीस येथें राहिला तो हल्लीं पाठविला असे. राजश्री बापू नाना सातारियास वस्त्रें आणावयास गेले. पत्रें आलीं. लवकरच पुरंधरास येतील. कळावें कृपा कीजे हे विनंती.

पै॥ छ० ४ रबिलावल सुरूसन सीत सबैन मय्या व अल्लफ

नं० १३७६ श्री. (वैशाख वद्य १ ४
(८ जून.)

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री वामनराव बाबा व
परशुरामपंतभाऊ स्वामीचे सेवेशी.

पोष्य हरी बल्लाळ[2] साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल तागायत छ० २७ रबिलावल जाणोन स्वकीय कुशल लिहीत जावें. विशेष. तुह्मीं पत्र पाठविलें तें पावलें. लिहिला मजकूर सविस्तर राजश्री कृष्णराव

१ शिंदे होळकरांचे. २ फडके.

आप्पा यांचे पत्रीं लिहिला आहे त्यावरून सर्व कळेल. वरकड वर्तमान पुरंधराहून पत्र आलें त्यांत मजकूर कीं, शिरें हैदरखानानें घेतलें. तुंगभद्रेवर कांहीं तरी सरकारची फौज गेली पाहिजे याजकरितां राजश्री पुरुषोत्तमराव गंगापुरास गेले आहेत त्यांस इकडे आणविलें. राजश्री वामनराव फौजसुद्धां आले तरी फार उपयोगीं पडतील. इकडे मसलत अशी, तिकडे तशी? याप्रमाणें वर्तमान आहे. आपल्यास कळावें. बुनगें आलें असलें तरी पाठवून द्यावें ह्मणोन लिहिलें, त्यास अद्याप बुनगें येथें येऊन पावलें नाहींत. आलियावर आपणाकडे रवाना करूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंती.

नं० १३७७ श्रीसुबराज (ज्येष्ठ शुद्ध ३ १२ जून)

पै॥ छ० ३ जमादिलावल.

राजश्री वामनराव व परशुरामपंत गोसावी यांसी.

सकल गुणालंकरण अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकित मुरारराव हिंदुराव घोरपडे ममलकत मदार सेनापती दंडवत. विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय लेखन करीत असलें पाहिजे. विशेष. अलीकडे पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं असें नसावें. सर्वदा पत्र पाठवून तोषवीत जावें. इकडील वर्तमान आपणास वरचेवरी लिहून पाठविलेंच आहे त्यावरून कळलें असेल. राजश्री सखारामपंत व बाळाजीपंत फडणीस यांनीं मनसब्याची रचना करून पाठविल्यास आपण सिद्धीस पोंहचविलातो बहुत उत्तम केलें! राजश्री रघुनाथरावदादा इंदुरीं राहिले किंवा पुरंधराकडे यावयाचें केलें हें कळवावें. हैदरखानाचा विचार तुह्मांस न कळे

कोणता? शिन्यांच्या किल्ल्यास महसरा करून ठाणें घातलें. मदगिरीही घेतली. वरकड ठाण्यांस उपसर्ग द्यावयास कमी नाहीं. राजश्री सखाराम पंत बापू यांचीं पत्रें आह्मांस येतात कीं कर्नाटकांत फौज देऊन सरदार पाठविणार, पाठवेतां. लौकरच फौजा आल्यावर इकडील बंदोबस्त होईल. अगाध नाहीं. आपल्याकडील मनसब्याचा लक्ष धरून आजवर आमचा मुक्काम तुंगभद्रा नदीतीरीं होता. सांप्रत छ० २ रबिलाखरीं कूच करून जरीमलें रायदुर्ग गुत्ती तालुकेकडे गेलों. आपणास कळावें यास्तव लिहिलें असे. आपणाकडील जोडी आजवर * ठेविली होती त्यास निरोप देऊन छ० २ रबिलाखर आपणाकडील स वर-चेवरी लिहून पाठवीत जावें वरचेवरी पत्रें पाठवीत जावीं जाणिजे बहुत काय लिहिणें हे विनंती.

---

१ वेढा. * येथें मूळपत्रांत अक्षरें फाटलीं आहेत.

समेटाची व्यर्थ खटपट व शिंदे होळकरांचे लपंडाव.

इ० स० १७७४

दादासाहेब ब-हाणपुरास पोंचतात तों त्यांच्या पाठीवर हरीपंत फडके येत होते ते ही पांच सहा मजलींच्या अंतरावर येऊन पोंचले. फडक्यांबरोबर पटवर्धन व रास्ते वगैरे सरदार असून शिवाय साबाजी भोंसले व पायदळ तोफखान्याच्या जय्यत तयारीनिशी खासा निजामअल्ली होता. एकंदर फौज पन्नास हजारांवर जमली होती. एवढी फौज एकदिलाची असती तर दादासाहेबांचा बंदोबस्त करणेंच काय' पण दुसरी कोणचीही अवघड मसलत तिला सहज पार पाडतां आली असती! पण या फौजेंत निम्मे बळ निजामअल्लीचे होतें. आणि तो तर मराठ्यांना लुबाडण्याचा हा खासा हंगाम आला आहे, या वेळीं पुणें दरबाराकडून मुलखाचा व द्रव्याचा चांगलाच लाभ आपणास करून घेतला पाहिजे; व त्यासाठीं दादासाहेबांची मसलत जितकी लांबणीवर पडेल तितकें पुणें दरबारास आपलें जास्त अगत्य पडेल, असें समजून कांहीं तरी निमित्त काढून मुक्काम करी व हळू हळू चाले. त्यामुळें या फौजेंत व दादासाहेबांच्या फौजेंत अंतर पन्नास साठ कोसांचें पडलें. साबाजी भोंसले तर मुधोजीस कह्यांत आणण्यापुरता पुणें दरबारास मिळाला होता. या पेक्षां त्या दरबारच्या मसलतींत अधिक मन घालण्याचें त्यास काय कारण? याकरितां तोही निजामअल्ली प्रमाणेंच अनास्थेनेंच वागत असे. या दोघांस मागें टाकून दादासाहेबांचा निकडीनें पाठलाग आपल्या फौजेनिशींच हरीपंत फडक्यानीं करावा तर शत्रूशीं गांठपडून त्रिंबकरावमामाप्रमाणेंच आपली दशा झाली तर कसें होईल हें त्यांस भय होतें. शिवाय मागें टाकल्यामुळें

समेटाची व्यर्थ खटपट व शिंदे होळकरांचे लपंडाव.

रुसून मोंगल व भोंसले परपक्षास मिळाले तर तिकडून ही मोठीच अडचण पडली असती. या मुळें मोंगल व भोंसले यांस बरोबर

एप्रिल. घेऊन पाठलागाचें काम जसें चालेल तसें तें चालूं देणें हरीपंतास भाग पडलें. किती झालें तरी ही फौज मोठी व नामांकित सरदारांच्या हाताखालीं होती. तिच्याशीं गांठ पडली तर आपली धडगत नाहीं हें जाणून दादासाहेब बऱ्हाणपुरास गेल्यावर नर्मदा उतरून शिंदे होळकरांकडे जाण्याचा विचार करूं लागले, तेव्हां त्यांची फौज विसकटण्यास प्रारंभ झाला. सात हजार फौजे निशीं मधोजी भोंसले दादासाहेबांस सोडून नागपुराकडे निघून गेले. नारायणरावसाहेबांचा खून करणाऱ्या गारद्यांपैकीं महमद इसफ दोन हजार गारद्यांनिशीं मुधोजी बरोबर चालता झाला. दुसरा मारेकरी खरकसिंग हा तोरखेडें येथील सरंजामदार बडे आडनांवाचे होते त्यांच्या आसऱ्यास जाऊन राहिला. आणखी ही हजारों लोक जिकडे वाट फुटेल तिकडे चालते झाले. भवानराव प्रतिनिधी, धायगुडे व दुसरे कांहीं सरदार आधींच निघून आले होते. दादासाहेब नर्मदा उतरूं लागले तेव्हां 'आपल्याच्यानें यापुढें तुह्मांबरोबर पळवत नाहीं' असें सांगून बजाबा पुरंदरे, आपाबळवंत, आनंदराव गोपाळ, शहाजी भापकर, खंडेराव दरेकर इत्यादि सरदार पंधराहजार फौजेसह निघून हरीपंत फडक्यांच्या लष्करास येऊन मिळाले. राहतां तळावर सखाराम हरि, मानाजी फाकडे, सदाशिव रामचंद्र, मालोजी घोरपडे, बाबराव पाटणकर हे सरदार' दोन हजार स्वांर एक हजार गारदी, तीन चारशें उंट व पंचवीस हत्ती इतकेंच काय तें सामान दादासाहेबांजवळ राहिलें. तेव्हां ते भयभीत होऊन लांब लांब मजली मारून कसे तरी इंदुरास जाऊन पोंचले. तुकोजी होळकर तीन कोस सामोरा येऊन मोठ्या आदरानें त्यांस शहरांत घेऊन गेला. महादजी शिंदे

समेटाची व्यर्थ खटपट व शिंदे होळकरांचें लपंडाव

उज्जनीस होता तो ही लगेच त्यांस येऊन भेटला.

महादाजी शिंदे व तुकोजी होळकर यांस माधवराव पेशव्यांनीं सरदाऱ्या दिलेल्या होत्या. त्या त्यांस न देण्या विषयीं दादासाहेबांचा अत्यंत आग्रह होता व त्यामुळें माधवरावाशीं त्यांचें वितुष्ट वाढून उभयतांत लढाई होऊन पराजित झाल्यामुळें दादासाहेबांस कारागृहवास भोगावा लागला होता. या पूर्व पीठिकेवरून पहातां शिंदे होळकरानीं पुणें दरबारास सर्वथा अनुकूल असावें व दादासाहेबांस प्रतिकूल असावें हेंच योग्य होतें व वस्तुस्थिति ही तशीच होती. पण तो राज्यक्रांतीचा काळ असल्यामुळें शिंदे होळकरांची वागणूक पुणें दरबाराशीं किंवा दादासाहेबांशीं सरळपणाची नव्हती. अशी सरळपणाची वागणूक त्यांजकडून या प्रसंगीं न घडण्याचें कारण कांहीं भय व कांहीं अपमतलबीपणा हें होय. भय असें कीं, सखारामबापू व नाना फडणीस यांनीं सर्व सरदारांचें एक चित्त करून व मोंगलाशीं सख्य करून हें बारभाईचें कारस्थान उभारिलें आहे. गंगाबाईस पुत्र झाल्यामुळें या मसलतीस विशेषच तेजी आली आहे. पण केवळ या भरावर जाऊन आजच्या प्रसंगीं आपण दादासाहेबांशीं शत्रुत्वानें वागलें आणि उद्यां मोंगल बिथरल्यामुळें किंवा कोणी सरदार फितुर झाल्यामुळें अथवा कोणा जबरदस्ताचें दादासाहेबांस पाठबळ मिळाल्यामुळें हें सर्व पारडें फिरलें आणि दादासाहेबांची सरसी झाली तर आपली गत कशी होईल? हैदरअल्ली, सुजाउद्दौला, रोहिले, इंग्रज या सर्वांशीं दादासाहेबांची हल्लीं राजकारणें घाटत आहेत. रास्ते व पटवर्धन या खेरीज प्रतिपक्षाकडील बहुतेक सरदाराचीं त्यांचे पत्रव्यवहार खेळत आहेत. खुद्द पुण्यांत सुद्धां मुत्सद्यांच्या नानाप्रकारच्या मसलती होत आहेत, व खलबतें घाटत आहेत. अशा प्रसंगीं उद्यां काय होईल याचा नेम कोणी सांगावा? याकरितां पुणें दरबारची आज्ञा मान्य केल्यासारखें दाखवावें व इकडे दादा-

सखेटाची व्यर्थ खटपट व शिंदे होळकरांचे लपंडाव

साहेबांशीं ही गोड असावें. याप्रमाणें शिंदे होळकरांचे या वेळीं विचार होते व त्यास अनुसरून त्यांनीं वर्तन केलें. या वर्तनास आपमतलबी पणाची बाजू अशी होती कीं, जेथें धन्याच्या घरांत दुफळी तेथें चाकराची चंगाळी हा न्याय सर्वत्र आहे. दादासाहेब शिंदे होळकरास नको होते हें खरें, पण राज्य निर्वैर होऊन लढाया व दंगे धोपे बंद झाल्यावर मग लढाऊ लोकांची मातब्बरी व अगत्य रहात नाहीं. हें त्यास चांगलें कळत होतें. शिवाय शांतता झाल्यावर आपल्या ताब्यांत जहागिरीचा मुलूख आहे त्याचा हिशेब कारभारी मागूं लागतील हें त्यास भय होतेंच. या करितां दादासाहेबांचें खूळ हें असेंच चालूं रहावें व त्याचा बंदोबस्त करण्याच्या निमित्तानें पुणें दरबारास वारंवार नडवून व हुलकावण्या दाखवून अधिक जहागीर उकळावी व आपलें स्तोम माजवावें. आणि कारभाऱ्यांस आपल्या पायधरण्या करावयास लावाव असें ही त्यांचें धोरण होतें. मिळून दादासाहेबांचा पक्ष प्रबळ झाला तरी यांचें नुकसान नाहीं आणि तसें झालें नाहीं तरी यांचा फायदाच!

श्रीमंत दादासाहेब नर्मदापार झाल्याची बातमी लागतांच हरीपंतानें पटवर्धन, रास्ते, विंचुरकर, नारोशंकर धायगुडे, आप्पा बळवंत यांचीं पथकें मिळून वीस हजार फौज वामनराव पटवर्धनाबरोबर फार त्वरेनें अघाडीस पाठविली. ती नर्मदेवर पोंचते तोंच तिकडून महादजी शिंद्याचीं वामनरावास व हरीपंतास पत्रें आलीं कीं श्रीमंत येथें आले आहेत. तुह्मी नर्मदा उतरून इकडे आल्यानें आमचा मुलुख खराब होईल व श्रीमंतासही भय उत्पन्न होऊन ते भलतीकडे भकतील. याकरितां तुह्मी आहां तेथेंच असावें. तुह्मी येथें आल्यानें जें काम व्हावयाचें तें आह्मी करीतच आहों. लवकरच श्रीमंतांची समजूत करून त्यांस देशीं घेऊन येतों. या लिहिण्यावर हरीपंताचा फारसा भरंवसा नव्हता. कारण कीं या पूर्वीं दादासा-

(२१७१)

समेटाची व्यर्थ खटपट व शिंदे होळकरांचे लपंडाव

हेबांनीं माळव्याकडे येण्याचा रोंख धरिलेला पाहतांच शिंदे होळकरानीं हरीपंतास लिहिलें होतें कीं, श्रीमंतास इकडे येण्यास मार्ग दोन. एक हंड्याचा घांट किंवा बडव्यांचा घांट. पैकीं हंड्याच्या घांटाचा बंदोबस्त आमच्या हांतून होणार नाहीं. तो तुह्मी फार जलद करावा. बडव्यांच्या घांटाचा बंदोबस्त मात्र आह्मी चांगला केला आहे. त्या मार्गानें आह्मी श्रीमंतांस येऊं देत नाहीं. पण त्याप्रमाणें हरीपंतानें केलें असतां श्रीमंत बडव्यांच्याच घांटानें कांहीं एक अडकाठी न होतां खुशाल निघून गेले!

तेव्हां मागच्या प्रमाणें ही देखील थाप नसेल कशावरून,
मे. असें हरीपंतास वाटणें साहाजिकच होतें. पण एवढे थोर सरदार सांगत आहेत त्या अर्थी चार दिवस दम खावा व गोडी गुलाबीनें काय होईल तें पहावें असें मनांत आणून हरीपंत व वामनराव आपापल्या जागीं मुक्काम करून राहिले. शिंद्याचें ह्मणणें कीं, दादासाहेबांवर हल्ला करून त्यांच्या सैन्याची दाणादाण करणें अवघड नाहीं. कारण त्यांजवळ सैन्य अगदीं थोडकें आहे. पण अशी बळजबरी केल्यास ‘ अस्सल खैर व सरकारी काम हीं दोन्ही होत नाहींत. ’ ह्मणजे ते जिवावर उदार होऊन लढणार त्या अर्थी ते जिवंत हातीं लागावे व त्यांची फौज तर मोडिली जावी हीं दोन्ही कामें होणार नाहींत. याकरितां सामोपचारानेंच त्यांस वळवून ताळ्यावर आणितों. मग इकडून तिकडे व तिकडून इकडे पत्रें व निरोप कित्येकदां आले गेले. उभयपक्षीं वकिलांचे हेलपाटे ही झाले. आणा शपथा, चर्चा व घासाघीस ही बहुत झाली. याप्रमाणें महिना लोटून गेला तरी कांहीं होईना असें पाहून वामनराव नर्मदा उतरून एक मजल पुढें आला व हरीपंतानें ही तळ हालवून कूच केलें, तों शिंद्याची पत्रें तातडीची आलीं कीं आतां उतावळी कराल तर मसलत बिघडेल. श्रीमंतांचा आमचा करार ठरला आहे कीं, आप.

(२१७२)

समेटाची व्यर्थ खटपट व शिंदे होळकरांचें लपंडाव

णास फौजेचें देणें पांच सात लक्ष रुपये झालें आहे तेवढें कारभाऱ्यानीं वारावें व उभयतां सरदारानीं आपणास देशीं घेऊन जावें व आपले
जून. मार्फतानें आमचा बंदोबस्त करून द्यावा. कारभाऱ्यावर आमचा विश्वास नाहीं पण उभयतां सरदार त्यांशीं बोलून आमची जी सोय करून देतील ती आह्मांस मान्य आहे. तेव्हां शिंद्याच्या लिहिण्याप्रमाणें हरीपंतांनीं दादासाहेबाकडे तत्काळ रुपये पटविले. पण ते रुपये हातीं पडतांच कांहीं तरी कुरापत काढून शिंदे होळकरांशी भांडून दादासाहेब भोपाळच्या रोंखे कूच करून चालले. ते एक मजल जातात तों शिंदे होळकरांच्या फौजानीं येऊन त्यांस गराडा दिला व शिंद्यानीं सांगून पाठविलें कीं, आह्मी आपणास पुढें जाऊं देणार नाहीं. आह्माशीं करार केल्याप्रमाणें देशीं चलावें. आह्मी बरोबर येतो. पुढें आपण जाऊं लागल्यास कटकट होईल. याकरितां माघें फिरावें. याप्रमाणें शिंद्याचा निग्रह पाहतांच निरुपाय होऊन दादासाहेब अगदीं हळूहळू चालीनें देशाकडे येऊं लागले. त्यांच्या पाठीवर शिंदे होळकर ही एक मजल अंतर ठेऊन येत होते.

इकडे दक्षिणेंत काय काय वर्तमानें घडत होतीं हें ही सांगितलें पाहिजे. बारभाईच्या कारस्थानामुळें दादासाहेब कर्नाटकातून देशीं आले तेव्हां मुरारराव घोरपड्यानें आपली फौज तयार करून मे महिन्यांत तुंगभद्रेवर येऊन तळ दिला. दादासाहेबांच्या मसलतींत सर्व कार्यभाग तुह्मींच पतकारिला, आमचें स्मरण देखील केलें नाहीं, असा त्यानें वामनरावास पटवर्धनास एका पत्रांत टोमणा मारिला आहे. त्यावरून या स्वारीच्या मनांत चालू असलेल्या राज्यक्रांतींत आपल्या वांटणीस कारभाऱ्यांनीं कांहीं मातब्बर काम घालावें व त्यापासून आपला फायदा करून घ्यावा असें होतें. पण तसा कांहींच योग न जुळल्या मुळें तो अनागोंदी व कनकगिरी

समेटाची व्यर्थ खटपट व शिंदे होळकरांचे लपंडाव

येथील संस्थानांपासून व डंबळच्या देसायापासून खंडणी घेऊन लुटालूट करीत चित्रदुर्गापर्यंत जाऊन आगष्ट महिन्यांत परत गुत्तीस गेला. सर्व मराठी फौजा उत्तरेकडे गुंतल्या आहेत व कर्नाटक मोकळें पडलें आहे हें पाहून बसालतजंगास ही मुलुखगिरी करण्याची हुरूप आली. तो अदवानींतून बाहेर पडून मुलुख लुटीत जाळीत बागलकोटापर्यंत आला. हरीपंत फडके वेरुळाजवळ फौजेची छावणी करून राहिला होता त्यास पुरंदराहून कारभाऱ्यांनीं पत्र लिहिलें कीं, बसालतजंगाचें पारिपत्य करण्यासाठीं आनंदराव रास्ते आणि वामनराव व परशुराम भाऊ पटवर्धन यांस त्यांच्या फौजेसह इकडे पाठवून द्यावें. त्यावरून हरीपंतानें त्याप्रमाणें त्या सरदारांची रवानगी केली. ते पुण्याच्या सुमारें येतात तों बसालतजंग घाईघाईनें अदवानीस परत गेला. यामुळें आषाढापासून पावसाळा संपेपर्यंत पटवर्धनांची फौज पुण्याच्या आसपास छावणी करून राहिली. माधवराव पेशव्यानीं घेतलेला कर्नाटकांतील सर्व मुलूख दादासाहेबांनीं कल्याणदुर्गच्या तहांत हैदरास देऊन टाकिला हें मागें सांगितलेंच आहे. तो मुलूख ताब्यांत घेण्याचें काम हैदरानें या पावसाळ्यांत निर्विघ्नपणानें पार पाडिलें. या मोहिमेवर त्यानें टिपूस नेमिलें होतें. टिपूस चेनरायदुर्ग व गुरमकोंडा हीं ठाणीं घेण्यास मात्र थोडी बहुत लढाई करावी लागली. बाकीचीं शिरें होसकोटें, बाळापूर, मदगिरी वगैरे ठाणीं त्यानें जरब दाखवूनच काबीज केलीं! हा मुलूख सांभाळण्यास पुणें दरबारानें फौज पाठवावी तर त्यांचें सर्व लक्ष्य दादासाहेबांचा बंदोबस्त करण्यांत गुंतून गेल्यामुळें तसें कांहीं एक घडून आलें नाहीं. देशाहून कुमक न आल्यामुळें हीं ठाणीं शत्रूशीं मुळींच झुजलीं नाहींत यांत आश्चर्य तें काय?

सवाईमाधवरावांचे कारभारी ह्मणून सखारामबापू व नाना फडणीस सर्व राज्याचा कारभार चालवीत होते ही गोष्ट मोरोबादादास अगदीं खपत

नव्हती हें पूर्वी सांगितलेंच आहे. त्याला आपल्या कारस्थानीपणाची घमेंड मोठी होती व अजूनही कांहीं व्यूह रचून मी दादासाहेबांस गादीवर स्थापीन व त्यांचा मुख्य कारभारी होईन व हल्लींच्या कारभाऱ्यांची चांगली खोड मोडीन असें त्यांस वाटत होतें. श्रीमंत सवाईमाधवराव व त्यांची आई यांसह सखारामबापू आणि नाना फडणीस पावसाळा सुरू झाला तेव्हां पुरंदर किल्ल्यावरची हवा वाईट ह्मणून खाली सासवडास येऊन राहिले होते व तेथेंच सारा राज्यकारभार चालला होता. असें असतां आपणा चौघांस ही धरण्याची मोरोबादादानें तयारी केली आहे अशी त्यांस खात्रीलायक बातमी जून महिन्याच्या अखेरीस एके दिवशीं कळल्यावरून ते मुलास व बाईस घेऊन पडत्या पावसांत अतिशय धांदलीनें

जून पुरंदरावर पळून गेले! एवढ्या धाडसाचा बेत मोरोबानें केला तेव्हां आणखी कोण कोण मुत्सद्दी या फितुरांत मिळाले आहेत व कोणची फौज त्यानें वश केली आहे ही बापू व नाना यास काळजी उत्पन्न झाली. जुलईच्या प्रारंभीं दादासाहेब नर्मदा उतरून आले तेव्हां त्यांच्या इशाऱ्यावरून येथील फितुरी आणखी कोणचें संकट उत्पन्न करितील याचा नेम नाहीं, याकरितां आपल्या विश्वासाची कांहीं फौज आपणाजवळ पाहिजे असें मनांत आणून त्यांनीं पटवर्धनांची फौज पुण्याजवळ ठेऊन घेतली. दादासाहेब इकडे येत आहेत खरें, परंतु यांचें लक्षण बरेंसें दिसत नाहीं असें समजून त्यांनीं पावसाळ्यांत बहुत आस्थेनें आपलीं राजकारणें पक्कीं केलीं व नवीन फौज चाकरीस ठेवण्याची तरतूद केली. आगस्टांत दादासाहेब तापी उतरून जों जों जवळ जवळ येऊं लागले तों तों कारभाऱ्यांच्या मनसब्यास अधिकाधिक रंग चढत चालला. खासा निजामअल्ली व त्याचा सरदार धौंशा हे जय्यत तयारी करून औरंगाबादेस छावणी करून होते. कारभाऱ्यांचा निरोप येण्याबरोबर त्यांनी स्वारीस

निघण्याची सिद्धता केली होती. नागपुराहून साबाजी भोंसले ही बाहेर निघण्याची तयारी करीत होता. नवीन ठेवलेली फौज पुण्यास जमा होत होती. हरीपंत फडके देऊळघाटासमीप तयारीनेंच राहिला होता. अशा स्थितींत दादासाहेबांचा काय बंदोबस्त करून द्यावयाचा हें ठरविण्यासाठीं शिंदे होळकरांचे वकील पुरंदरास आले. त्यांनीं सांगितलें कीं, दरसाल दहा लक्ष रुपये उत्पन्नाचा मुलुख व मध्यमप्रतीचे दोन किल्ले दादासाहेबास द्यावे व त्यांवर देखरेख शिंदे होळकरांची असावी. पुणें दरबारानें त्या संबंधें कोणचीही पंचाईत करूं नये. हें ह्मणणें कारभाऱ्यांनी तत्काळ मान्य केलें व शिंदे होळकरांच्याही कांहीं मागण्या बारीक सारीक होत्या त्या कबूल केल्या. आजपर्यंत शिंद्यानें कारभाऱ्यांकडून दादासाहेबांस पंधरा लक्ष रुपये मध्यस्थीचें ढोंग करून फौजेच्या देण्याबद्दल ह्मणून देवविले, आपणही लाख पन्नास हजार घेतले, शिंदखेड वगैरे किरकोळ ठाणीं घेतलीं. वर लिहिल्याप्रमाणें दादासाहेबांस जहागीर व किल्ले नेमून घेऊन त्यांचा सर्व बंदोबस्तीचा मामला आपणाकडे करून घेतला व शेवटी दगाबाजी करावयाची ती केलीच!

नोवेंबर

भरपावसाळ्यांत दादासाहेब लष्करासह कूच करून येत होते. वाटेंत तापी व नर्मदा या महानद्या व इतर नदीनाले भरलेले असल्यामुळें हळू चालण्यास ही योग्य सबब त्यांस होतीच. शिवाय त्यांच्या मनांत स्नान संध्या करून स्वस्थ बसण्याचें मुळींच नव्हतें. शिंदे होळकरांच्या बाह्यात्कारी जबरदस्तीमुळें निरुपायानें ते देशीं येत होते तरी त्यांची चोंहोंकडे राजकारणें व फितुर चाललेच होते. तापी उतरतां उतरतां त्यांनीं बऱ्हाणपुरासमीप अशीरगड नांवचा बळकट किल्ला आहे तो दगा करून घेण्यासाठीं फौज पाठविली होती. परंतु तेथील किल्लेदार सावध असल्यामुळें त्यानें मारामार करून ती फौज हुसकून लाविली तेव्हां मानाजी फांकडे

वगैरे सरदार जखमी होऊन ' रगत गाळीत ' परत आले! वाटेंत दररोज रयत लोकांस धरून आणून मार देऊन पैका घ्यावा, मामलेदारांवर कांहीं तरी निमित्त ठेवून त्यांस अद्वातद्वा दंड करावे, दंडाचा वसूल न होईल तर त्यांचे तालुके लुटावे हा त्यांनीं क्रम धरिला होता. अशा स्थितींत भाद्रपदाच्या महिन्यांत जेव्हां शिंदे होळकरांनीं वर लिहिलेला पुणें दरबारचा करार मान्य करण्याविषयीं विनंती केली तेव्हां दादासाहेब कांहीं तरी आढेवेढे घेऊन निकालाचें काम दिवस गतीवर टाकूं लागले. कारभाऱ्यांनीं उभयतां सरदारांस साफ सांगून पाठविलें कीं, प्रत्येक गोष्ट तुमच्या ह्मणण्या प्रमाणें मान्य केली असतां तुमच्यानें निभावणी होत नाहीं तर यास वाटेल तें करूं द्यावें. ते व आह्मी पाहून घेऊं! त्यानंतर सरदारानीं लिहिलें कीं, आह्मी दादासाहेबाशीं बोलणें करीत आहों त्यांचीं उत्तरें आपणास कळवून आपलीं त्यांस कळविण्यांत उगीच दिवस व्यर्थ जातात. याकरितां आपण पुरंदराहून निघून समीप यावें ह्मणजे निकाल त्वरित होईल. तें ही ह्मणणें मान्य करून पुरंदरचें व श्रीमंत सवाई माधवराव यांचें संरक्षण करण्याचें काम पुरुषोत्तमराव पटवर्धनावर सोंपवून उभयतां कारभारी बाहेर निघाले. पण ते रिकामे आले नाहींत. त्यांबरोबर पंचवीस हजार फौज होती. शिवाय ते निघाल्याबरोबर मोंगल व साबाजी भोंसले हीं त्यांस मिळण्याकरितां त्वरेनें येऊं लागले. हरीपंत फडके ही तळ हालवून दादासाहेबांच्या रोखें चार मजली कूच करून आला. या जय्यत तयारीनें शिंदे होळकरांच्या मनांस संतोष वाटला नाहीं. सांप्रत त्यांनीं फौज तीसहजार पर्यंत जमा केली होती, व त्यांस अशी आशा होती कीं, या फौजेच्या जरबेवर कारभाऱ्यांशीं गरम नरम बोलून दादासाहेबांस परत देशीं घेऊन आल्याविषयींचें उपकाराचें ओझें त्याचे छातावर लादून " याप्रसंगीं आपले मागील हिशेबाकितबाचे फडशे आहेत

समेटाची व्यर्थ खटपट व शिंदे होळकरांचे लपंडाव

ते उरकून घ्यावे व हिंदुस्थानची (हिंदुस्थानच्या मोहिमेची) एक तयारी आपणाकडे करून घ्यावी अशा मसलतींत होते. त्यास इकडील जबरदस्ती पाहून त्यांस मसलत पडली 'आपण इतकें करून फळ नाहीं! आतां मुख्यांस [दादासाहेबांस] जाऊं द्यावें तरी यांचा राग; धरून द्यावें तरी बदलौकिक ; ' अशी विवंचना पडली आहे. " एवंच या कारभारासंबंधें ते बाह्यात्कारें उत्सुक पण आंतून उदासीन होते. ही त्यांच्या मनाची स्थिती दादासाहेबांस माहीत होती. तिकडून कानाडोळा होईल असें जाणून चोंहोंकडून फौजा आपणाकडे येत आहेत असें पाहून त्यांनीं पलायन केलें! आमचें ह्मणणें अमान्य करून श्रीमंत निघून गेले, पाठलाग करण्या करितां लवकर फौज पाठवा अशीं कारभाऱ्यांस पत्रें लिहून शिंदे होळकर श्रीमंतांच्या पाठीस लागले! मागून हरीपंत फडके, पटवर्धन वगैरे सरदारांची फौजही त्वरेनें गेली. पण श्रीमंत कोणासच सांपडले नाहींत. ते पहिले दिवशीं एकदम वीस कोसांची मजल करून तापीवर गेले. तेथें तालनेरास बुनगें व जड सामान टाकून देऊन नर्मदेवर गेले. तेथें आनंदी बाई होती तीस घेऊन सेंधवेच्या घाटानें माळव्यांत शिरून धारेस गेले. आनंदीबाई गरोदर होती. तिला पळण्याचे श्रम सोसेनात, सबब तिला धारेस ठेवून आपण उज्जनीस गेले. तों मागून शिंदे होळकर व हरीपंत यांच्या फौजा समीप आल्या.

उभयतां कारभारी, व नबाब मागून येत होते ते नर्मदेपर्यंत आले. यापुढें पाठलागास आपण जाण्यांत कांहीं विशेष आहे असें नाहीं, कारण कीं तें काम हरीपंत करीतच आहेत; शिवाय इंग्रजानें साष्टीस वेढा घातल्याची खबर आली आहे तिकडेही कुमक पाठविणें जरूर आहे. असें मनांत आणून कारभारी परत पुरंदरास आले. येतांना त्यांनीं नबाबास आपल्या स्थळास जाण्यास निरोप दिला व आपणाबरोबरची बहुतेक फौज

समेटाची व्यर्थ खटपट व शिंदे होळकरांचें लपंडाव

हरिपंताकडे पाठवून दिली.

इकडे दादासाहेबांचा पळण्याचा व समेटाचें बोलणें करण्याचा क्रम एकाच वेळीं सुरू होता. त्याकामीं मध्यस्थि कारितां ह्मणून त्यांजकडून मालोजी घोरपडे, बाबूराव पाटणकर व यशवंतराव माने हे सरदार शिंदे होळकरांकडे आले होते ते परत जाण्यास कंटाळून इकडेच राहिले. श्रीमंतांच्या मनांत तीन राजकारणापैकीं कोणचें तरी एक साधावयाचें होतें. एक सुजाउद्दौल्याकडे जावें. तें न होईल तर हैदरअल्लीकडे जावें. हीं दोन्ही न होतील तर इंग्रजांकडे जावें. शिंदे होकर व हरीपंत एकत्र झाल्याची खबर येतांच आतां सुजाउद्दौल्याकडे किंवा हैदराकडे जावें तर पल्ला फार लांबीचा असल्यामुळें सुरक्षितपणें जाऊन पोचणें दुरापास्त आहे असें जाणून त्यांनीं सुरत व भडोच येथील इंग्रजांच्या आश्रयास जाण्या करितां व गोविंदराव गायकवाडाचें साह्य मिळविण्याकरितां गुजराथेकडे पळ काढिला व त्यांचे पाठोपाठ हरीपंत वगैरेंच्या ही फौजा तिकडे गेल्या.

जानेवारी १७७५

नं० १३७८ श्री. (वैशाख शु० १

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री वामनरावबाबा व
राजश्री परशुरामपंतभाऊ स्वामीचे सेवेशीं.

पोष्य लक्ष्मण हरी. साष्टांग नमस्कार विनंती येथील वर्तमान तागायत छ० २९ सफरपर्यंत यथास्थित जाणोन स्वकीय कुशल लिहीत असिलें पाहिजे. या नंतर बहुत दिवस तुह्मांकडील पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. याकरितां चित्तास समाधान वाटत नाहीं तर सविस्तर वर्तमान लिहून पाठवावें. इकडील वर्तमानराजश्री मुराराव घोरपडे तुह्मीं गेल्यावर अनिगुंदी तालुक्यांत होते ते तेथून येऊन हरपनहल्लीकरांकडून घांसदाणा घेऊन डंबळकर यांजकडील इनामतीचा गांव कारलेहाल्ली व नागरहळ्ळी वगैरे दोन तीन गांव मारून मातुश्री जयंतीबाईस धरून तिजपासून १६ हजार होन करार करून मातुश्रीस ऐवज आणावयास निरोप देऊन पाठविलें. चौं दिवसाची मुदत केली आहे. तेथील गुंता उरकल्यावर हावनूर व सावनूर यांजपासून कांहीं घास दाणा घेणार असें वर्तमान आहे. या उपर कोणीकडे जातो पहावें. आह्मांस त्यांचे कागद नित्य येतात. आह्मी नित्य शाखभाजी वगैरे पाठवून संतोषानें राखिला आहे. तो ही आमच्या तालुक्यास उपद्रव करीत नाहीं. त्या मध्यें तुमचा कागद समयासच आला तो त्याजकडे पाठविला त्याजवरून फार खुशाल जाहला. आह्मांस 'भेटीस' या ह्मणोन दोन तीन कागद आले. सोय पाहून भेटीस एक दिवस जाऊं भेटी जाहलियावर बोलाचाली होईल ती आपणास लिहून पाठवूं. बिदनुराहून उज्जनोप्पा हजार दीड हजार प्यादे व पांचशें राऊतानिशीं येऊन हरीहराच्या सरदेस कडलीगोपीजवळी एक दोन दिवस उतरला होता. तेथून उठोन बिदनुरास गेला. त्या मुळें हरिहर तालुक्याचीं गांवें व कसबा गडबडला होता. लष्कर

---

१ हरिहरचा मामलेदार. उपनांव लागू. २ उजनापा हा हैदराचा कोणी सरदार

श० १६९६ दादासाबे माळव्यांत राहतात. इ. स. १७७४
शिंदे होळकरांची मध्यस्थि.

गेलियावर स्वस्थ जाहले. राजश्री मुराराव याचें लष्कर जवळ आहे ह्मणून लक्ष्मेश्वर पावेतों व सावनूर तालुका व हावनूर तालुका डंबळ व कोपळ सारे धास्तीमुळें गुळें झालें आहे. लावणीचे दिवस. कांहीं काम चालत नाहीं. लष्कर दोन मजली पलीकडे गेल्यायर जमाबंदी करून लावणीही करूं शिग्यांकडील वर्तमान अधिक वद्य १० स हैदरनाईकाचें ठाणें पडलें. कौलानें उतरलें. परंतु बापुजी शिंदा व तेथील प्यादे साऱ्यांस चौकींत ठेविलें आहे. हैदरनाईकास कागद लिहून पाठविला आहे. त्याचा जाब येईल त्या प्रमाणें सोडतील. खासा हैदरनाईक कोडगास[1] गेला होता. कोडगचें ठाणें घेऊन आपलें ठाणें घातलें. नाईमार[2] कोडगवाल्याची कुमक करीत होता त्याजकरितां त्यास दाब देऊन करार केला कीं, कोडग वाल्याची कुमक करूं नये. असें करून घाटावर आला. बसालतजंग कनक गिरीकडून अने गोंदीर्यंत आला होता तेथें दोन चार मुक्काम करून कांहीं घासदाणा घेऊन अद्वानीस गेला. राजश्री बाजीराव बर्वे हैदरनाईकाचे फौजेबरोबर आहेत. राजश्री विठ्ठल विश्राम त्यांचेच मुलुखांतून तुर्कबडीस गेला. तेथून श्रीमंत दादांचे लष्करास जाणार ह्मणून लोक बोलतात. राजश्री विसाजीपंत मामा यांसी दोन हजार होन पंचमेळ देविले होते त्यास आजपर्यंत मार्ग सुरळीत नव्हता व ऐवज हो जमा नव्हता याकरितां पाठविला नव्हता. आजच दोन हजार होन पंचमेळ तासगावांस रवाना केले. तेथून श्रीमंत आप्पा पुणियासी रवाना करतील. त्याच्या अगोदर कुंदगोळचे दोन हजार लक्ष्मेश्वरचे चार हजार होन मिरजेस रवाना केलेच आहेत. राजश्री अंताजीपंतमामास एकेरी होन देणें देणें ह्मणोन लिहिलें होतें त्यास तूर्त मिळत नाहींत यामुळें

---

१ कुर्गास. २ मलबारचा पाळेगार.

चार दिवस आळस झाला. आतां हजार दीड हजार जमा झाले आहेत. आणखी दोन हजार कोठें कर्ज पाहून राजश्री मामांस पावते करतों. हल्लीं राऊता बरोबर प॥ लक्ष्मेश्वर पैकीं दोन हजार होन मिरेजस रवाना केले आहेत. दोघांचे नांवचा कागद लिहिला आहे त्यामध्यें एकंदर मजकूर लिहिला आहे. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

नं० १३७९ श्रीगणराज (वैशाख शुद्ध ११ ११ मे.)

अपल्यें साष्टांग नमस्कार विंनंती. श्रीमंतांनीं राजश्री बाबूजी नाईक यांचे विद्यमानें संधानाचा प्रकार करून संधान लाविलें कीं, ' पेशजी श्रीमंत कैलासवासी रावसाहेबानीं पांच किल्ले दहा लक्षाची जहागीर दिली होती त्याजप्रमाणें द्यावी, ह्मणजे स्नानसंध्या करून राहूं. हा एक प्रकार. दुसरा उभयतां कारभारी यानीं कारभार करावा. आपला धणीपणा राखावा. ' असें आहे, ह्मणून पुरंदरास श्रमिंतांकडून आल्या गृहस्थासच नाईकानीं पाठविला होता. त्यास " जहागीर द्यावयाचा मजकूर स्वल्प, चिंता नाहीं; परंतु उगाच रहावयाचा प्रकार त्यांचे वस्तु व्हावयाचा नाहीं. फिरून फौजेचा जथ आतां त्यांजकडे पडावयाचा नाहीं. दोन महिने जिकडे फिरतील तिकडे पिछावर फिरावें ह्मणजे सहजच सर्व कळतें ! त्याजसारिखें पुढें करावयास येईल. " असें कारभारी यांचें मानस आहे ह्मणून पत्रें आलीं. आपणासही कारभारी याणीं लिहिलेंच असेल. संधानाचा मजकूर असला तर नादीं लावून लोक फोडून हलके करावे. मग जसें दिसेल तसें करावें. मायावीस मायावीच प्रकार करून कार्य साधावें! बुनगेंही आपलें पत्र रवाना केलें असेल तर पावतांच रवाना करितों. लष्कर

१ पांडुरंगरावाचें वामनरावास पत्र.

फार लांबलें. मुख्य गोष्ट थोर लाभ भेट होण्याचा झाला (?) आता चिंता करीत नाहीं. बहुत काय लिहिणें हे विनंती.

नं० १३८० श्री (वैशाख शुद्ध ११
११ मे)

राजश्री वामनरावबाबा व परशुरामभाऊ स्वामीचे सेवेशीं विनंती उपरी येथील वर्तमान ता॥ छ० १० रबिलावल. मुक्काम नजीक बऱ्हाणपूर यथास्थित असे. विशेष. इंदुराहून राजश्री महादाजीपंत व विष्णुपंत यांनीं लिहिलें कीं, सहा सात लक्ष रुपये देऊन शिबंदीपासून श्रीमंतास मोकळें करून (देशास परत) आणावें असा ठराव केला आहे. ऐवजाची तरतूद सत्वर व्हावी. लष्करचा मुक्काम आहे तेथेंच असावा असें शिंदे होळकर यांचे पत्रीं. या अन्वयें तपशील पत्रीं आला त्यासी उत्तरें येथून समर्पक लिहून पाठविलीं तीं आपण पाहून पुढें रवाना केलींच असतील. आपण पुढें गेले. मागाहून दुसरी फौज गेली. सारे नर्मदा दक्षिण तीरीं राहिले तों सरदारांचीं पत्रें येतात तेव्हां नदी उतरतां नये. मोठी गोष्ट अडचणींत पडली आहे. गुरुजीस पत्र लिहिलें आहे त्याचें उत्तर आह्मीं लिहिल्याप्रमाणें समर्पक आलें तर उलगडेल. नाहींतर फेंदीस काम पडलेसें दिसतें. आपण तेथून उद्योग करणें तो करितात, आह्मीं येथून लिहितों, परंतु फडशात गोष्ट येत नाहीं यास काय करावें! सर्व [लबाड ?] मंडळी तेथें[2] मिळाली आहे. ज्यांत लवकर फडशा होय अशी गोष्ट करावी. कृपा केली पाहिजे हे विनंती.

नं० १३८१ श्री [वैशाख शुद्ध १९
१९ मे]

राजश्री वामनराव गोसावी यांसी अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकित महादजी शिंदे दंडवत. विनंती उपरी येथील कुशल जाणोन

---

१ पत्र हरीपंत फडक्यांचें. २ इंदुरास.

श० १६९६ दादासाहेब माळव्यांत राहतात. इ. स. १७७४. शिंदे होळकरांची मध्यस्थी.

उपरी येथील कुशल तागायत छ० ४ रबिलावल मुक्काम नजीक नर्मदा पांच कोस जाणोन स्वकीय लिहित जावें. विशेष. अलीकडे तुह्मांकडून महिना सवामहिना पत्रच येत नाहीं त्याजवरून काळजी लागली आहे. ऐसें न करावें. दर आठवडा एक जोडी रवाना करीत जावें. बुनगें रवाना करावें येविशीं दोन चार पत्रें निकडीचीं तुह्मांस पाठविलीं आहेत. त्याजबरोबर खर्चाचा ऐवज येईल ह्मणोन चातकन्याय मार्ग लक्षांत आहों. गैरवळण, येथें पैसा मिळत नाहीं. रानांतील कारभार ऐसा यथास्थित असला तर स्थित राहतें. नाहीं तर कळतच आहे! दुसरें पर्जन्यकाल समीप आला. डेरा राहुटी नाहीं. लोकही बुनगें न आलें ह्मणोन कष्टी. असें असोन काय निमित्य दिवसगत लागली कळत नाहीं. आह्मी तर लांबलों. आठ पंधरा दिवसांत तरी बुनग्याची रवानगी केली असली तर येऊन पावेल. इकडील वर्तमान तर बऱ्हाणपुरावरून श्रीमंतापासून सारी फौज फुटोन आह्मांकडे आली तेंव्हां श्रीमंत वीस पंचवीस कोसाच्या मजली करून हजार दीड हजार फौजे निशीं बडव्यांच्या घाटानें इंदुरास होळकरापाशीं गेले. राजश्री तुकोजी होळकराच्या भेटी झाल्या. तदोत्तर राजश्री महादजी शिंदे यांस वर्तमान कळोन ते ही इंदुरास येऊन भेटले. आह्मी तप्तीचांगदेवावर होतों तेंव्हां होळकराकडे विष्णु महादेव गुरुजी गद्रे व महादजीपंत (गुरुजी) शिंद्याकडे आज दोन अडीच महिने वकीलीस आहेत त्यांचीं पत्रें आलीं कीं श्रीमंत बडव्याचे घांटानें आल्यास .आह्मी येऊं देत नाहीं. भिल्लांकडून बारीचा बंदोबस्त करविला आहे. हंड्याच्या घांटानें गेल्यास इकडून बंदोबस्त होणार नाहीं यास्तव तुह्मीं जलद पाठोपाठ यावें." त्याजवरून राजश्री हरीपंततात्या मोंगल व भोंसले सहवर्तमान बऱ्हाणपुराजवळ मुक्काम करून राहिले. पुढें आह्मांस व राजश्री आपा बळवंत, व रास्ते, व विठ्ठल शिवदेवाचे पुत्र, व धायगुडे, नारो शंकर, धोंडो दत्तात्रय,

स्वकीय लेखन करीत गेलें पाहिजे. विशेष. आपणाकडील पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं तर लिहावें. इकडील वर्तमान तर श्रीमंतांचें दर्शन होऊन वीस पंचवीस रोज झाले. सामान्वयें एक ही निश्चयांत येईना, तोड न पडे, तो मजकूर वरचेवर महादाजीपंत गुरुजी यांस सांगत होतों. आपणास ते लिहितच असतील. इतके दिवस श्रम केलेचें सार्थक दिसेना. तेव्हां अनेक प्रकारें हिताहित व अंदेशें बोध करून विनंती केली त्यावरून मर्जी प्रसन्न होऊन जाबसाल एक निश्चयांत आणिला आहे. तीन अंश काम झालें. चतुर्थांश राहिला तो आजि उद्यांचे दिवसांत शेवटास जाईल (आह्मीं) उभयतां सरदारांनी श्रीमंतासमागमें देशास जावें (असें ठरलें.) सेंधव्याचे मार्गें खानदेशांतून जाण्याचा विचार होत आहे. तिकडील फौजेची गांठ न पडावी अशी मर्जी आहे. जाबसाल लांबणीवर पडला ह्मणोन आपण नर्मदा उतरोन उत्तर तीरास याल, श्रीमंतास संशय येईल, याजकरितां आपण फौज सुद्धां रेवा दक्षण तीरींच रहावें. श्रीमंतांची स्वारी उभयतां सरदारांसह येथून निघोन सेंधव्याचे मार्गें चालले ह्मणजे आपणास लिहोन पाठवितों. आपण मग कूच करून परभारें त्याच मार्गें राजश्री हरीपंत तात्याचे फौजेस मिळावें. येविशीं राजश्री गुरुजी व नागोराम व मोरो गिरमाजी व निळो गोपाळ यांनीं लिहिलें आहे त्यावरून कळेल. रवाना छ० १२ रबिलावल बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

पै॥ छ० १४ रबिलावल मुक्काम नर्मदा दक्षण तीर
सुहूसन खमस सबैन.

नं० १३८१ **श्रीगणराज** वैशाख शु० ६
१६ मे]
पै॥ छ० ३ रबिलाखर.

चिरंजीव राजश्री तात्या यांसी प्रती वामनराव गोविंद आशीर्वाद

शिंदे होळकरांची मध्यस्थी

मिळोन पंधरा वीस हजार फौजेनिशीं रवाना केले. मजल दर मजल मुक्काम मजकुरास आलों तों श्रीमंत इंदुरास पोहचून शिंदे होळकरांच्या भेटी जहालियाचें वर्तमान कळलें. उभयतां सरदारांचीं पत्रें ही आलीं कीं आपण पुढें न यावें. जेथें आमचीं पत्रें पावतील तेथेंच मुक्काम करून रहावें. मागाहून बोलण्या चालण्यास कारकून पाठवितों. त्याजवरून आह्मीं येथेंच मुक्काम केला आहे. कारकूनही काल आला. त्याच्या बोलण्यांतील भाव पहातां लांबणीवर टाकावें असाच प्रकार दिसतो. यास्तव इकडून मोरो गिरमाजी व नारो राम व निळो गोपाळ ऐसे श्रीमंताकडे पाठविले आहेत. जाऊन पांच सा दिवस झाले. श्रीमंतांचा व उभयतां शिंदे होळकर यांचा मतलब कसा आहे हें समजलें पाहिजे. याजकरितांच कारकून रवाना केले आहेत. शिंदे होळकर इकडील लक्षाशिवाय नाहींत असेंच दिसतें. परतु आज आठ दिवस लांबणिवर घातलें आहे. याजमुळें संशय वाटतो. आह्मीं एकाएकीं निकड करून इंदुरासच जावें तर बाऱ्यांचाही बंदोबस्त त्यानीं केला आहे. तत्राप धुडावून[1] जाऊं, परंतु शिंदे होळकरांनीं पुढें न यावें असें लिहिलें असतां गेल्यास त्यांस एक प्रकार वाटेल याजमुळें वाट पहात आहों. श्रीमंत हस्तगत झाल्यास उत्तमच आहे. घेऊन देशास येतच आहों. ज्यापक्षीं शिंदे होळकर श्रीमंतांचे शेरीक[2] होऊन आह्मासी बदलून गोष्ट सांगतील तेव्हां छावणी पडली तरी करून फडशा करणें प्राप्तच आहे. श्रीमंत मातुश्री बाईसाहेब यांचें दैव चागलें आहे तेव्हां इतकें लांबणारच नाहीं. यांत ईश्वर सत्ता प्रमाण. या उपर घडेल तें मागाहोन लिहोन पाठवितों. चिरंजीव राजश्री गंगाधरबाळाची प्रकृत कशी आहे हें लिहोन पाठवावें. चिरंजीव राजश्री राघोबा

१ धुडावून बारीवाल्यास हुसकून लावून. २ सोबती.

दादा व तीर्थस्वरूप राजश्री दाजी अद्याप येथें आले नाहींत. गंगापुरास होते. राजश्री मुराररावव घोरपडे यांस पत्र लिहिलें आहे तें रवाना करून उत्तर येईल तें ठेऊन घ्यावें. अधिक शुद्ध चतुर्थीचें पत्र पाठविलें तें काल संध्याकाळीं पावोन लिहिला मजकूर कळला. पत्र एक महिन्यानें पावलें. काली सायंकाळीं इंदुराहून राजश्री गुरुजींचीं पत्रें निकडीचीं आलीं कीं, जे तुह्मीं जलद कूच करून नर्मदा उत्तर तीरास येणें, ह्मणजे लवकर फडशा होईल. नाहींतर उभयतां सरदार बोलण्यांत तों वाईट दाखवीत नाहींत, परंतु लांबणीवर पडेल. या अर्थें लिचिले वरून आज कूच करून सावदेवावर तीन कोस गेलों. उदईक रेवा उत्तर तीरास जातों. राजश्री हरीपंत बऱ्हाणपुरावर आहेत. त्यांस निकडीचीं पत्रें पाठविलीं आहेत कीं जलद कूच करून यावें. ह्मणजे दबावानें लवकर उलगडा होईल. ते ही लवकरच येतील. उभयतां सरदारांजवळ जमियत थोडीच आहे. परंतु घांट अवघड आहे यास्तव उगेंच दबावणी दाखवितात. होणें जाणें कळतच आहे! श्रीगजानन लवकर गुंता उरकोन भेटी करील. चिंता न करणें. श्रीमंत राजश्री माधवराव साहेबांचें दैव विचित्र आहे. कोणी लबाडी करून परिणाम नाहीं. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं० १३८३ (वैशाख शुद्ध ६
१६ मे)

परशुरामभाऊचें पांडुरंगरावास पत्र छ० ४ रबिलावलचें—
" आह्मीं दर मजल नर्मदा तीरास जात होतों तों शिंदे होळकरांचीं पत्रें आलीं कीं, ' तुह्मीं पुढें न येणें. तुह्मीं येऊन जें कार्य होणें तें आह्मीं करीतच आहों. पुढें येऊं न ये. आल्यास आमचा तालुका खराब होईल. ' त्यावरून नर्मदेच्या अलीकडे सहा कोसांवर मुक्काम करून राहिलें

आहों. श्रीमंतांसी बोलणें चालणें होत आहे. 'आमच्या मनोदयानुरूप ऐकत नाहींत ह्मणून विवेकाच्या गोष्टी सांगत आहों' असें भाव शिंदे होळकरांच्या लिहिण्यांत आहेत. परंतु आह्मांस येथें येऊन दहा बारा दिवस झाले,अद्यापि जाबसाल ठरत नाहीं,तेव्हां लबाडीचा भाव दिसतो!"

नं० १३८४ (वैशाख वद्य २
२७ मे)

वामनराव गोविंद यांचें पांडुरंगरावास पत्र १९ रबिलावल मु० नर्मदा दक्षिणतीरचें--

"श्रीमंत इंदुरासच आहेत. इकडून नागो राम व मोरो गिरमाजी व निळो गोपाळ तहाच्या बोण्याकरितां तेथें गेले आहेत. शिबंदीचा पैका द्यावा आणि पुढील खर्चाचा वंदोबस्त करून द्यावा या प्रमाणें त्यांचा मुद्दा आहे. त्यांत अधिक उणें होणें तें होऊन ठरावांत येईल. परंतु नित्य एक सवाल जबाब नवा बोलतात. दिवसगतीवर नेतात. शिंदे होळकर इकडील लक्षांत असतां लांबणीवर पडलें आहे. दर कूच इंदुरास जावें तर उभयतां सरदाराची पत्रें येतात कीं, पुढें न यावें. फडशांत गोष्ट आणितों. त्यावरून येथेंच मुक्काम केला आहे. आह्मी येथें आल्यावर राजश्री भवानराव प्रतिनिधी व राजश्री बाजीपंत आण्णा हे ही सात आठ हजार फौजेनिशीं आले. मनापासून तह होऊं नये असें शिंदे होळकरांचें मानस नाहीं. दोन दिवस अधिक उणे लागून फडशा होइल. या उपर बहुत दिवस लागणार नाहींत. काय तें निस्तोष आठ दिवसांत कळेल. चिरंजीव राजश्री राघोबा व तीर्थस्वरूप राजश्री दादाजी हे अद्यापि गंगापुरासच आहेत. त्रिंबकच्या किल्ल्याची घालमेल झाली होती परंतु युक्तीनें

१ पुरुषोत्तमराव पटवर्धन.

दाजीनीं ज्यानें खेळ केला त्यास हाताखालीं घेऊन बंदोबस्त केला. तुह्मां-कडे पत्रें लिहून तयार केलीं इतक्यांत महादजी शिंदे यांचें पत्र आलें त्याची व जिन्नस नक्कलच करून पाठविली आहे त्याजवरून सविस्तर कळेल. सारांश या पत्रावरून फडशा झाल्यादाखल दिसतें श्रीमंत राजश्री रावसाहेबांचें दैव विचित्र आहे! त्यांचा जन्मकाळ झाल्यापासून फार करून सर्व बंदोबस्त झालाच आहे."

नं० १३८५

[ज्येष्ठ वद्य १०
३ जुलई]

लक्ष्मण हरी लागू यांचें पांडुरंगरावास पत्र २३ रबिलाखरचें–
" टिपूमिया यानें शिरें घेऊन पाडून टाकिलें. राजश्री बापूजी शिंदे व दरकी कारकून सारे घेऊन पट्टणास गेले त्यांस अद्यापि निरोप झाला नाहीं. खुद्द हैदर नाईक पट्टणांतच आहे. शिरें घेतलेवर टिपूमिय्या मदगिरीस गेला. तेथील लोक कांहींच झुजले नाहींत. टिपू जातांच किल्ला दिला. हवालदार फितूर झाला होता. चेनरायदुर्गास मोर्चे लाविले आहेत. तो ही किल्ला कुमक नाहीं तेव्हां किती दिवस झुजेल? थोरले बाळापुरचें ठाणें धास्तीखालीं टाकून पळून गेले. तेथें ही हैदराचें ठाणें पडलें. राघो बापूजीचा आह्मांस होसकोट्याहून कागद आला. ते ही टिपूच्या जरबेंतच आहेत. मुराराव घोरपडे यांचें लष्कर चित्रदुर्गच्या सरदेस आहे. दुर्गकरांची व त्यांची भेट होऊन सेनापति गुत्तीस जाणार."

नं० १३८६

[आषाढ शु० ३
१२ जुलई

कोन्हेरराव व पुरुषोत्तमराव यांचें पुरंदराहून
पांडुरंगरावास पत्र–२ जमादिलावलचें

" श्रीमंत व उभयतां कारभारी पुरंदरास कां गेले ह्मणून लिहिलें, त्यास

पेशजी तुह्मापाशीं उभयतां कारभारी बोलत होते जे, आह्मांस कांहीं आढळलें तर आह्मीं निवून वर जाऊं. त्यास कोणी क्षुल्लकानें कांहीं वर्तमान सांगितलें त्यावरून निघून आले. वरकड कांहीं नाहीं."

नं० १३८७ (१४ जुलई)

शिवाजी बाबाजीचें पत्र पुरंदराहून पांडुरंगरावास.

आषाढ शु० ५ बुधवारचें.

"राजश्री भवानराव (प्रतिनिधी) यांची मध्यस्थी पहिल्यापासून वामनराव बाबाकडेच आहे. याजकरितां उभयतां कारभाऱ्यानीं याच निसबतीस बोलणें चालणें लाविलें आहे. याजकरितां श्री० रा० दाजी पुढें जाऊन त्यांस आणिलें. सरंजामाचा वगैरे ठराव होणें तो या आठा दिवसांत होईल. नंतर किनईस वस्त्रें घेऊन जाणार. वासुदेव बाबा पळून गेले याजकरितां ठाणीं घ्यावयास फौज व तोफखाना जाणार. नबाब बसालतजंग माघारा गेला ह्मणून लिहिलें तें कळलें. उत्तम झालें. 'भकारनामक' प्रस्तुत या लक्षांत पुर्ते आहेत. पुढील प्रकार वर्तणुकीवरून कळून येईल.

नं० १३८८ श्री (८ जुलई)

सेवेशीं शिवाजी बाबाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल तागायत ज्येष्ठ कृष्ण अमावास्या मंदवासर मुक्काम नजीक पुरंदर वर्तमान यथास्थित असे विशेष. आपण पत्रें छ० २० रबिलाखरचीं पाठविलीं तीं व छ० २३ रबिलाखरचीं छ० २५ मिनहूस एकेच वेळेस पावलीं तिसरीं पत्रें प्यादाबरोबर पाठविलीं तीं काल संध्याकाळीं पावलीं सविस्तर मजकूर कळला लष्करचीं पत्रें रवाना केलीं वरकड जाबसाल आलाहिदा पुरवणी पर्वी लिहिले आहेत त्याजवरून कळतील श्रीमंत राजश्री

१ भगवतराव प्रतिनिधीचा मुतालीक कैदेंत होता तो पळून इंग्रजाकडे आला. २ भगवंतराव.

दादासाहेबांचे मानस भोपाळाकडे जावें येणें प्रमाणें मनसबा करून चार कोस गेले तसेंच शिंदे होळकर पाठीवर जाऊन भोंवताले बसले तेव्हां कटंकट झाली जे आम्ही तुह्मांस जाऊं देणार नाहीं आह्मांसी करार केल्या प्रमाणें देशास चलावे आम्ही घेऊन जातों दुसरीकडे जाणें घडणार नाहीं असें ह्मणतांच एक दोन मुक्काम केलें उपाय नाहीं शिंद्याचा निग्रह पाहिला तेव्हां बोलिले कीं कूच करावें देशास येतों येणें प्रमाणें बोललें कूच करून बाबीचा घांट उतरून खालीं आले शिंदे होळकर पाठीवर आहेत नर्मदेस सहा कोसांचे अंतर होतें दुसरे दिवशीं नर्मदेवरी येणार होते नर्मदा उतरून येतात गुंता नाहीं ह्मणून गुरुजीचीं पत्रें आलीं मधीं न गुंतले तरी नर्मदा अथवा तापी उतरावयास दिवस लागतील त्यास उपाय नाहीं नद्या उतरले ह्मणजे लवकरच येतील आपल्या फौजा गंगातीरास येऊन मुक्काम करतीलसें दिसतें मागाहून सविस्तर लिहून पाठवितों श्रीमंत राजश्री वामनरावबाबा पूर्णा उत्तरतीरास आले होते नदीस पाणी आलें ह्मणून पलीकडे होते राजश्री हरीपंत तात्या पूर्णा दक्षिण तीरास होते एका दिवसांत पाणी उतरतांच एकत्र होऊन कूच करून येत असतील सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं० १३८९ **श्रीगणराज** [आषाढ शु० ३ ११ जुलई)

अर्पत्यें पांडुरंगानें विज्ञापना. येथील वर्तमान तागायत छ० १ जमादिलावल जाणून स्वकीय कुशल लिहित असलें पाहिजे. विशेष. ' तुमचें जाणें बसालतजंगाकडे जाहलें कीं काय, ' ह्मणून लिहिलें, ऐशास फौजच आली नाहीं. रविवारीं आह्मी मिरजेस आलों इंदुवारीं रात्रीं

१ वामनरावास त्याच्या स्त्रीच्या सुतकांत हें पत्र लिहिलें आहे सबब नमस्कार लिहिला नाहीं.

सासवडाहून (श्रीमंत माधवराव व गंगाबाई) सागती माचीस गेलीं. कारभारी आपले गिरफदारींत. सारा प्रांत खराब झाल्याची काळजी कोणी करीत नाहीं. बसालतजंग यागें दोन अडीच लाख रुपये मिळवून बाग लकोटकरांपासूनही घांसदाणा घेऊन माघारा गेला. एरव्ही तो विजापुर पंढरपुरा पावेतों येता तरी कोणी पुसत नव्हता! परंतु पुढें राज्य थोर, पुढें परिणाम नाहींसें जाणोन गेला. हैदरखान याणें शिरें, मदगिरी, बाळापुर हीं ठाणी घेतलीं. वरकड तुंगभद्रे पावेतों मुलुख गेले दाखलच आहे. पर्जन्यकाळांत सावनुरास यावें ही त्याची कस्त आहे. अर्काट वाले आपली कन्या टिपूस देऊन तें व हे एकत्र होणार असें आहे. मुख्य कर्नाटक गेले दाखल! पुढें बाजत बरसात (कांहीं तरी होईल) ह्मणावें तर आजपर्यंत झाला मनसबा तो ही पुढें पडणार! तेव्हां (हैदराचें) पारिपत्य होणें कळतच आहे! बहुत काय लिहिणें हे विनंती.

नं १३९० [आषाढ शु० ११
१९ जुलई)

शिवाजी बाबाजी ह्मसकर याचे पुण्याहून पांडुरंगरावास पत्र ९जमादिलावलचें–

" उभयतां कारभारी[1] व श्रीमंत मातुश्री मुलासह पर्जन्यकाळ किल्यावरच क्रमणार किंवा कसें ह्मणून लिहिलें, त्यास तिकडून (दादासाहेब) येतात त्यांचा बंदोबस्त चांगला झाला ह्मणजे खालीं उतरावयाची तजवीज करितील. तोंपावेतों किल्यावरच राहणार. किल्याचा बंदोबस्त उत्तम आहे. आंह्मी आलों येथील गृहस्थांची मनसबे चाळणा चोंहीकडे होतात. परंतु कागदोपत्रीं पत्तेवार सापडल्याखेरीज कसें ह्मणतां येईल? सासवडकर[2]

---

१ मोरोबादादा. २ बजाबा पुरंदरे.

गृहस्थानें सकारनामकाकडे सूत्र लाविलें कीं, आपल्यास आपणामधीं घ्यावें, खातरजमा करून घ्यावी, ह्मणून रदबदल लाविली आहे. जर करून दादासाहेबांचा चांगला बंदोबस्त झाला ह्मणजे सारेच राजकारण लावून नरम होतील.तोंपावेतों राजकारणें करावयास चुकणार नाहींत. सासवडाहून [कारभारी वगैरे] एकाएकीं रात्रौ किल्ल्यावर गेले येणें करून बदलौकिक झाला हें प्रमाणच आहे. ”

नं० १३९१ (आषाढ शु १३
२१ जुलई)

पांडुरंगराव व गंगाधरराव यांस पुरंदराहून
कोन्हेरराव व पुरुषोत्तमराव यांचें पत्र—

चिरंजीव बाबा व भाऊ आज मोरेश्वरास येणार. श्रीमंत दादासाहेबांकडील बाजारबुणगें सर्व नर्मदा उतरून आलें श्रीमंत व शिंद्दे होळकर मागाहून नर्मदा उतरणार. ”

नं० १३९२ (आषाढ शु० १३
२१ जुलई)

शिवाजी बाबाजीचें पत्र पुरंदराहून पांडुरंगरावास—

“ तुह्मीं पुण्यास गेलां होतां तेथील मजकूर कसा, काय तो लिहिणें ह्मणून आज्ञा, त्यास कर्जाच्या ऐवजासाटीं व ‘ मकार नामका’ कडील मजकूर कसा काय तोही मनासआणावा असें उभयतां [कारभाऱ्या]चें मानस तोही मजकूर मनास आणिला. ‘ उभयतां मधीं यावें, परस्पर खातरजमा व्हावी, ’ हें (मोरोबादादाकडून) बोलण्याचालण्यांत आलें. परंतु विश्वास

१ वामनराव व परशुरामभाऊ.

पुरावयाचा नाहीं! आंत शिरून तिकडील पक्ष बळावावा असेंच अंतःक- रण दिसून आलें. याकरितां आम्हीही मोघमांत बोलून आलों. श्रीमंत राजश्री दादासाहेब नर्मदे अलीकडेच आहेत. शिंदे उतरून आले म्हणजे गंगातीरास येणार.'

नंबर १३९३ [आषाढ व० २
२५ जुलई]

शिवाजी बाबाजीचें पत्र पांडुरंगरावास पुरंदराहून –
" श्रीमंत राजश्री दादासाहेब नर्मदा दक्षिण तीरास आले. लवकर नर्म- दा उतरत आहेत. श्रावणमासीं गंगातीरास येतील. "

नं०१३९४ (आषाढ व० ९
३१ जुलई]

मेघश्यामराव कृष्ण यांचें मंगळवेढ्याहून वामनराव व परशुरामभाऊ यांस पत्र–

" तुम्हीं पुरंदरास आल्यापासून पत्र पाठविलें नाहीं. आनंदराव रास्ते डफळ्यांच्या पारिपत्यास्तव फौज सुद्धां पंढरपुरीं आले तेव्हां डफळ्यांनीं सलुखाचें बोलणें ठरवून तह करून घेतला. पांचशें स्वारांनिशीं चाकरी करावी व पंचवीस हजार रुपये गुन्हेगारी द्यावी असें ठरलें. "

नं०१३९५ श्री (आषाढ शु०
जुलई. प. पंधरवडा.

सेवेशीं विज्ञापना. श्रीमंत राजश्री दादासाहेबांस घेऊन उभयतां सरदार नर्मदेवरी आले. नर्मदा उतरावयास लागले. देशास येतात.

---

१ गोदातीरास. २ पत्र शिवाजी बाबाजीचें पुरंदराहून पांडुरंगरावास. ३ शिंदेहोळकर.

संशय नाहीं उभयतां सरदारांचें लक्ष इकडे पुरतें आहे. गुरुजींचीं पत्रें येतात, त्यांचीं व अहिल्याबाईचीं येतात, त्यांत संशय दिसत नाहीं. तत्राप न कळे! राजश्री हरीपंततात्या एदलाबादेजवळ बारा तेरा हजार फौजेनिशीं राहिले आहेत. तिकडून त्यांस घेऊन आले ह्मणजे बाजूनें आपल्या फौजा येतील. नबाब औरंगाबादेस धौशा सुद्धां सिद्धच आहे. बसालतजंग याजकडील उपद्रव लागला आहे याजकरितां श्रीमंत राजश्री वामनरावबाबा व रास्ते यांस इकडे यावयास निरोप द्यावा ह्मणोन एक पत्रांत इकडून लिहिलें गेलें होतें त्याजवरून राजश्री हरीपंततात्यांनीं उभयतांस फौजसुद्धां इकडे यावयास निरोप दिला. पांच सात दिवसांत भिमेवरी येतील. पंढरपुराजवळ उतरावयास जातील किंवा इकडे येतील पहावें त्यास पेशजीच्या पत्रीं पंढरपुराकडेच यावें असें पत्र गेलें होतें. कसें करतील पहावें. आठा रोजांत इकडे अथवा पंढरपुराजवळ येतील त्यांजकडूनच पत्रें आलीं ह्मणजे आपणाकडे सुमार लिहून पाठवितों. माचीच्या बंदोवस्तास आणखी हजार माणूस नवें पत्तेवार ठेविलें आहे. बंदोबस्त चांगला आहे. सासवडासच असते तर हरएक दगा होता! घालमेलींत बहुत होते. साक्षमोच्या अथवा दस्तेवज ह्मणावा तरी कोणाचा सांपडत नाहीं. आप्तपणानें (कोणी] येऊन सांगतात त्याचें नांव परिस्फूट करितां येत नाहीं असें आहे. [कारभारी] आतां सावधपणानें बंदोबस्तानें आहेत. किल्याची हवा वाईट खरी परंतु मान्य करावी लागली. उपाय नाहीं. नगर अथवा मिरज (तूर्त श्रीमंतांस राहण्यास) युक्त होती परंतु उभयतांच्या ही चित्तास न ये. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं० १३९६ (सप्टेंबर प. पंधरवडा.)

गारदी हजार, येणें प्रमाणें सामान [श्रीमंतांजवळ] आहे. इकडील

१ पत्र शिवाजी बाबाजीनें स्वारीतून पांडुरंगरावास लिहिलें त्याचा हा एकच बंद मिळाला.

सामान भारी आलें समजोन घाबरे झाले. इकडे येत नाहींत. 'गच्छंति' करावयाचा प्रकार आहे! उभयतां सरदार यांचें मानस होतें कीं, या प्रसंगीं आपले मागील हिशेबकितेबाचे फडशे आहेत ते उरकून घ्यावे व हिंदुस्थांनची एक तयारी आपणाकडे करून घ्यावी अशा मसलतींत होते. त्यास इकडील जबरदस्ती पाहून त्यांस मसलत पडली. आपण इतकें करून फळ नाहीं. आतां मुख्यास जाऊं द्यावें तरी यांचा राग, धरून द्यावें तरी बदलौकिक, अशी विवंचना पडली आहे. कारभारी याणीं उभयतांस साफ लिहिलें कीं, तुमच्या कराराप्रमाणें आह्मीं कबूल केलें असतां तुमच्यानें निभावणी होत नाहीं तत्रापि चिंता नाहीं. त्यांस जाऊं देणें. आमच्या चित्तास येईल त्या प्रमाणें करूं. ते आहेत आह्मीं आहों! चिंता नाहीं. असें साफ लिहिल्यावरून त्यांस बहुत विचार पडला. पुढें काय होतें पहावें. इकडील फौज तरी सर्व हुजरात वगैरे सरदार रास्ते सुद्धां वीस हजार पर्यंत जमा झाली. किरकोळ बरचेवर येत आहेत. विसाजीपंत बिनीवाले यांची रवानगी कर्नाटकच्या दबावास रवाना केले त्यानीं पंढरपुरच्या सुमारें असावें. इतक्यांत इकडील फडशा झाल्यावरी कोण सरदार पाठवणें त्याची रवानगी होईल. सर्व मुत्सदी बरोबर आहेत. मकार निराळे करून सर्व आले आहेत. भवानराव प्रतिनिधी देखील आहेत. सारांश उत्तरेकडील जबरदस्ती नाहीं. ईश्वरी इच्छा मात्र न कळे. हरीपंताबरोबर फौज पंधरा हजार रुकनद्दौला हरीपंतास भेटले त्यांची फौज आठ हजार, भोंसले दहा हजार, एकूण सर्व फौजबंदी मुख्य श्रीमंतांकडील पन्नास पंचावन हजारपर्यंत जमा होईल. नबाबाचें लक्ष क्षेप निक्षेप आह्मांकडे आहे. नबाबास दिल्लीची वजीरी

---

१ हिंदुस्थानच्या स्वारीची. २ मोरोबादादा खेरीज. ३ निजामअलीचा कारभारी ४ सवाईमाधवराव यांजकडील

सांगणार असें आहे. वरकड सविस्तर श्रीमंतांच्या पत्रावरून कळेल. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

नं० १३९७ श्री [श्रावण व० १०
३१ आगस्ट]

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य राजश्री नरसिंगराव[1]जनार्दन गोंसावी यांस—

सेवक माधवराव नारायण प्रधान. नमस्कार. सु॥ खमस सबैन मय्या अल्लफ. तुह्मांकडील सरंजामाचे महालांतून राजश्री मुधोजी भोंसले व हैदर नाईक व गोविंदराव गायकवाड यांजकडे वगैरे फितुरी जागा शिलेदार वगैरे चाकरीस गेले असतील त्याची गांवगतावार चौकशी करून घरें व वतनें ठिकाणीं लावून जप्त करणें व त्यांचे माणसाकडून त्यांस कागद लेहवून ते घरीं लवकर येत तें करणें. व आणखी शिलेदार तुमच्या तालुक्यांत राहत असतील त्यांणीं फितुरी सरदारांकडे चाकरीस जाऊं नये. ये विशीं त्यांस गांवचे पाटील कुळकर्णी जामीन घेणें ह्मणोन तुह्मी आपले कमावीसदारांस महालोमहालीं पत्रें लिहून बंदोबस्त करणें. जाणिजे. छ २३ जमादिलाखर. बहुत काय लिहिणें.

लेखन
सीमा.

१ धायगुडे.

नं० १३९८ श्री. (भाद्रपद शुद्ध २
८ सपटंबर)

अखंडित लक्ष्मीं अलंकृत राजमान्य राजश्री नरसिंगराव जनार्दन
स्वामी गोसावी यांस.

सेवक माधवराव नारायण प्रधान. नमस्कार. सु॥ खमस सबैन मय्या व अल्लफ. सरंजामी फौजेची जलदीनें तयारी करोन निघोन भाद्रपद शुद्धांत हुजूर येऊन दाखल होणें ह्मणोन पेशजीं पत्रें सादर झालींच आहेत त्याप्रमाणें तुह्मीं शीघ्रता करून निघालांच असाल. त्यास तुह्मीं कधीं निघालां तें लिहून पाठविणें आणि दरमजल महांदेवाच्या[1] सुमारें येऊन मुक्काम करून राहणें. जाणिजे. छ० १ रज्जब. बहुत काय लिहिणें.

लेखन
सीमा.

नं० १३९९ श्रीसुबराज (भाद्रपद शु० ६
११ सप्तंबर)

पै॥ छ० १७ रज्जब.

राजश्री वामनराव व राजश्री परशुरामपंत गोसावी यांसी.

विनंती उपरी हैदरखानानें फारच चढाई केली आपण त्या प्रांतीं असतां त्यानें शेखी करावी असा प्रकार नाहीं ह्मणून लिहिलें ऐशास हैदरखानाची स्थिती रीति आपण नेणते असा अर्थ नाहीं देशांतून कांहीं फौज येती तर

१ सातारा जिल्ह्यांत शंभुमहादेवाचा डोंगर आहे त्यानजीक.

त्यांची कारगारी न चालती परंतु तो प्रकार न घडला राजश्री पंत प्रधान यांचें पुण्य समर्थ आहे कर्नाटकचा बंदोबस्त यथास्थित घडोन येईल गुरुम-कोंडेचे राजश्री बाबूराव भास्कर यांणीं बेहिकमतीनें जावसालाचा डौल घडविला त्यावरून टिपू अल्लीखानाचें येणें तिकडे झालें गडावर भोज दळवी व मावळे हिम्मतीचे आहेत सांप्रत किल्ला झुजतो जागा नामी हिम्मत धरतील तर अवघड नाहीं रवाना छ० ४ रजब बहुत काय लिहिणें हे विनंती.

नं० १४०० [भाद्रपद वद्य ९
२९ सप्तंबर]

गंगाधरपंत आबांस शिवाजी बाबाजीचें पत्र पुरंदराहून

" श्रीमंत राजश्री दादासाहेब बऱ्हाणपुरापाशींच आहेत. अलीकडे (तापी) उतरून येणार. अशीरीस[1] दगा करावयाचें केलें (होतें.) राजश्री जगन्नाथपंत[2] सावध झाले. मारामार करून मानाजी शिंदे वगैरे नामोहरम[3] करून हुसकून लाविले. रगत गाळीत आले! घोडीं माणसें जाया झालीं. बऱ्हाणपुरास दगा करावयाच्या मनसब्यांत (श्रीमंत दादासाहेब) आहेत. चहूंकडे राजकारणें लावितात. खेळ करावयास चुकत नाहींत! फौजा लवकर जमा झाल्या ह्मणजे बंदोबस्त होईल. मोंगल या लक्षांत पुरता आहे. गुंता[4] नाहीं. "

नं० १४०१ श्री (भाद्रपद वद्य १४
४ अक्टोबर.)

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री नरसिंगरांव बाबा

१ अशीरगड. २ अशीरगडचा किल्लेदार. ३ फांकडे. ४ धायगुडे.

स्वामीचे सेवेशीं.

पोष्य हरी बल्लाळ. साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल तागायत छ० २७ रजब जाणून स्वकोय कुशल लेखन करीत असिलें पाहिजे. विशेष. आपण वरांस जाऊन फिरोन पुरंदरास आलां ह्मणून ऐकिलें त्यास फौजेची तयारी केलीच असेल. आपणास येथें लवकर पाठवावें ह्मणून श्रीमत उभयतांस[2] लिहिलें आहे तरी आपण पत्र पावतांच येथें निघून यावें. इकडील वर्तमान श्रीमंतांस लिहितों त्यावरून कळत असेल. श्रीमंत (दादासाहेब) तापीतीरीं आहेत. [तापी] उतरावयाची तजवीज होत आहे. सारें कर्म दगाबाजीचें आहे! तुह्मीं येथें अशा दिवसांत असावें यास्तव सारीं कामें एकीकडे ठेवन जरूर यावें. फौज जमा झाली नसली तर मागाहून चिरंजीव घेऊन येतील. आपण लवकर यावें. बहुत काय लिहिणें कृपा लोभ असों दीजे हे विनंती.

नं० १४०२ [१२ अक्टोबर]

लक्ष्मण बल्लाळ यांचें परशुरामभाऊस व वामनरावास पत्र

आश्विन शुद्ध ७ चें सासवडाहून.

“ श्रीमंत राजश्री दादाकडून विष्णु[3] महादेव व होळकराकडील नारो गणेश[4] व शिंदे याजकडील बाळाराव[5] असें येथें आहेत. काल सोमवारी भेटी झाल्या. शिंदे यांची फौज तापी उतरून अलीकडे आली आहे. राजश्री हरीपंत तात्या फौज सुद्धां देऊळ वांटाखालीं गोदड पिंपरीस आहेत. ”

---

१ इनाम गांव व नेहमी राहण्याचें ठिकाण मौजे मोरवें. धायगुड्यांचें दुसरें इनामगांव ह्मावशी हें आहे. २ सखारामबापू व नाना फडणीस यांस. ३ गद्रे सावकार. ४ होळकरांचे दिवाण. ५ महादजी शिंद्यांच्या बहुतेक मोठमोठ्या उलाढालींत हा बळाराव ‘ वकील ’ ह्मणून प्रसिद्ध आहे.

नं० १४०३ श्री (१२ अक्टोबर.)

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री बाबा[1] व तात्या

स्वामींचे सेवेशीं

पोष्य लक्ष्मण बल्लाळ साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल तागायत आश्विन शुद्ध सप्तमी जाणून स्वकीय कुशल लेखन करीत गेलें पाहिजे. विशेष. आपली आज्ञा घेऊन निघालों तो काल सोमवारीं संध्याकाळीं सासवडास पावलों. कळावें. आपण घोडीं दोन दिलीं होतीं तीं नवलोजीबरोबर माघारीं पाठविलीं आहेत. येऊन पावतील. इकडील वर्तमान तर श्रीमंत राजश्री दादाकडून विष्णु महादेव व होळकराकडून नारो गणेश व शिंदे याजकडील बाळाराव असे आले. काल सोमवारीं भेटी झाल्या. पुढें काय मजकूर होईल तो पहावा. शिंदे यांची फौज तापी उतरून अलीकडे आली आहे. राजश्री हरीपंत तात्या फौज सुद्धां देऊळ घांटाखालीं गोंदडपिंपरीस आहेत आपणास कळावें. चिरंजीव आपा[2]ही लष्करांतच आहेत. बहुत काय लिहिणें कृपा लोभ असो दीजे. हे विनंती.

नं० १४०४ श्री (आश्विन शुद्ध १२
१६ अक्टोबर)

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री रामचंद्र[3] शिवाजी

गोंसावी यांस––

पोष्य माधवराव नारायण प्रधान. नमस्कार. विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय लिहिणें. विशेष. मौजे आउंज परगणे मंदरूप येथील

---

१ वामनराव व पांडुरंगराव. २ आपा बळवंत. ३ सोलापुरचा किल्लेदार व माधवराव बल्लाळ पेशवे यांचा मेहुणा.

जहागिरीचा अंमल राजश्री जगपतराव निंबाळकर याजपासून सरकारांत घेऊन राजश्री नरसिंगराव जनार्दन धायगुडे यांजकडे फौजेच्या सरंजामास करार करून दिला आहे. त्यास तुह्मीं किल्ले सोलापूर येथून मशारनिल्हेची कुमक करून मोजे मजकूरचें ठाणें बसवून देणें. जाणिजे. छ० १० साबान. सु॥ खमस सबैन मय्या व अल्लफ. बहुत काय लिहिणें हे विनंती. *

नं० १४०६ **श्रीगणराज** (कार्तिक शुद्ध नोवेंबर प० पंधरवडा.)

उभयतां[1] वडिलांचे सेवेशीं विज्ञापना. उभयतां कारभारी यांस दगा करून मारावें, राज्यांत खुळ करावें, अशा मनसब्रेंत बहुतजण आहेत तें वर्तमानही कळतें. परंतु निकड बसवून पारिपत्य होत नाहीं! ते गृहस्थ जवळ (राहून) मनसबा करितात! याजकरितां माचीसे[2] ही मागती आले, ये विशीं मी नानांसही[3] दोन चार वेळ विनंती केली व निघाले हें वर्तमान ऐकून हा लिहून पाठविलें. दादा लांब राहिले नाहींत.

* या संबंधें १ जगपतराव निंबाळकर यास आऊजचें ठाणें धायगुडे यांच्या हवालीं करण्याविषयीं २ वामनराव गोविंद पटवर्धन यांस ठाणें हवालीं करून घेण्याच्या कामीं धायगुडे यांची कुमक करण्याविषयीं व ३ आउंज येथलि देशमूख व देशपांडे यांस धायगुडे यांजकडे सुरळीतपणें अम्मल देण्याविषयीं अशीं पेशवे सरकारचीं तीन पत्रें आहेत तीं येथें घेतलीं नाहींत. धायगुडे यांस याच सालीं फौजेच्या सरंजामाकरितां जोगाईचें आंबें या परगण्याचा जहागिरीचा अमल व निमे वाबतीचा हक्क देण्यांत आला होता तीं ही पत्रें येथें छापिलीं नाहींत.

१ पत्र पांडुरंगरावाचें वामनराव व परशुरामभाऊ यांस. २ दगा होतो असें पाहून सखारामबापू व नाना फडणीस श्रीमंत व गंगाबाई यांसह सासवडास रहात होते ते फिरून पुरंदर किल्ल्याच्या माचीस येऊन राहिले. ३ फडणीस यांस. ४ दादासाहेबांस आणण्याकरितां लष्कर सह. ५ मोरोबादादा कळसूत्र चालविणारा.

जवळच मारणार आहेत! एकदांच गर्क होईल! आपणही पुरंदरीं आलेवर उभयतांस सांगून ज्या गोष्टीनें श्रीमंतांचें कल्याण होय तें करावें. जागा राहावयास उत्तम पाहिजे. दहा हजार पांच हजारानीं दंगाही होऊं नये, वेळ पडलेस लाख फौजे बरोबर दोन महिने पर्यंत टक्कर मारी; अशी [राहण्यास जागा] असावी. कारभारी तिकडे राहून मिरजेसही आणावीं असें मनांत आणून अंशेकरून सूचना केली. परंतु वृद्धांचे विचारास हें येणारच नाहीं. वरकड पहाडी किल्लेही प्रसंग पडलेस मिरजेबरोबर टिकणार नाहींत. पंढरपुराहून बजाबा रवाना झाले होते तेव्हांचें त्यांचें ध्यान शिवाजीपंत व कोन्हेरराव सांगतां कळेल. आमचे सर्वांचें जीवित्व वत्सा. जवळ आहे. जीवें भावें सेवा करावी (हाच आमचा हेतू.) उभयतांतून एक ही कोणी धटाईचा नाहीं. कमावीसदारी किल्लेस काय होणार? याजकरितां उगेंच लिहिलें. आपण व हरीपंत व कारभारी मिळून स्थल उत्तम, हवा मुलास चांगली, बंदोबस्त होऊन परिणाम लागेसी तजवीज करावी. बहुत काय लिहिणें हे विनंती.

नं० १४०६ **श्रीगणपति** [कार्तिक शुद्ध १३
१६ नोवेंबर.]

अर्पत्यें परशुरामानें दोन्ही कर जोडून साष्टांग नमस्कार. विनंती तागायत छ० ११ रमजान बुधवार पावेतों मुक्काम भिवंडी नजीक पुरंदर येथें सुखरूप असों. विशेष. परवां इंदुवारीं मुहूर्त होता यास्तव तेच

१ प्रलय. २ श्रीमंत व गंगाबाई अशीं दोघें. ३ सखारामबापूचे. ४ पुरंदरें. ५ सवाईमाधवराव यांजवळ. ६ दोघा कारभाऱ्यांत हीं धैर्य नाहीं असें ह्मणणें. ७ तालुक्याच्या मामलेदाराच्या ताब्यांत सरकारी दाणा गोटा व किरकोळ सामान सांठविण्यासाठीं किल्ले असतात त्यांतच पत्र लिहिणाऱ्याच्या मतें पुरंदरची गणती. ८ पत्र वामनरावास.

दिवशीं लांब मजल करून किल्ल्यास गेलों. श्रीमंतांची व उभय कारभारी यांची भेट झाली. राजश्री नानाचें आमचें बोलणें श्रीमंत राजश्री दादासाहेब यांजकडील प्रकर्णाविशींचें व शिंदे होळकर यवनादिकांचीं पक्कीं राजकारणें कशीं आहेत असा भाव सर्व मनास आणिलें. उभयतां कारभारी यांचें ही [आपसांत] ठीक आहे. राजकारणें चांगलीं आहेत. शिंदे होळकर यांचा पुरता खंबीर आहे. शिंदे यांचे बाळाराव आले आहेत. त्यांचे राजकारणांत तीर्थस्वरूप राजश्री दाजी आहेत. राजकारण पक्कें आहे. संदेह नाहीं. आपणास राजश्री हरीपंत यांजवळ जाऊन सामील व्हावें ह्मणून लिहिलें आहे त्यांचीं कारणें, धौशा[1] हरीपंतास सामील झाला, आपली फौज जावी, जबरदस्त असावें, उभयतां[2] सरदारांस जड भारी पडल्यास सामील होऊन लौकर कार्य व्हावें, या अर्थे फौजा जमा करविल्या आहेत. देशीं ही पंधरा हजार फौजेची तरतूद आहे. कर्ना. टकाचें रोखें पाठविणार. उमरज तीच फौज घेऊन देईल ह्मणोन आह्मीं आग्रह करावा तरी कामाचे दिवस, खेड्यासाठीं आग्रह करणें हीं ठीक नाहीं, जाणून आग्रह न केला. आपण घांट माथा अलीकडे यावें तों दोन चार दिवसांत पक्का ठराव करून लिहितों त्या प्रमाणें पुढें दरमजल यावें. मी ही त्या सुमारें आपण येतात तों निघून येतों. आपले कित्येक मजकूर आहेत ते बोलण्यांत आले नाहींत. काल किल्ल्यास गेलों नाहीं आज जाऊन बोलतों त्याप्रमाणें उत्तर पाठवूं. गुजराथेंत ही सहा हजार फौज नारोपंत केसकर पाठविलें. फौजेच्या मनसब्याचा डौल पाहतां

१ निजामअल्लीचा सरदार इब्राहिमखान धौशा. धौशा हें ताशासारखें वाद्य आहे तें आपल्या स्वारीपुढें वाजविण्याचा मान यास निजामाकडून मिळाला होता ह्मणून यास ही 'धौशा' ह्मणत असत. २ शिंदे होळकरांस दादासाहेब आढपैनासे होतील तर.

कांहीं वाईट नाहीं. फारच चांगला आहे. मोंगल, भोंसले, शिंदे, होळकर आदिकरून एकत्र आहेत तेव्हां जसें ह्मटलें तसें होईल! शिंदे, होळकर यांचा ठराव अद्यापि झाला नाहीं, परंतु उभयतांची ममता (त्याज- वर) चांगली आहे. येथेंही त्यांची मान्यता बरींच राखिली आहे. श्रीमंत राजश्री दादासाहेबांस दहा लक्षांची जहागीर व दोन किल्ले मध्यम निसबतीस द्यावे. बंदोबस्त सरदारांचा असावा, असा ठराव झाला. शेवटास काय होईल तें पहावें! लक्ष प्रकारें तरी व्हावें असें आहे. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

चिरंजीव राजश्री राघोबादादास आशीर्वाद. तुह्मीं लिहिलेप्रमाणें ताकीद पत्रें घेवितों. हे आशीर्वाद.

नं० १४०७ श्री [अजमासें भाद्रपद शुद्ध सप्तंबर प० पंधरवडा.]

विनंती[2] उपरी. चिट्टी पावली. जाबीतजंग याचा मजकूर लिहिला तो कळला. (त्यास) निरोप दिला नाहीं. भोजनास बोलाविलें होते. त्यांचा येथें मुक्काम करविला. आह्मीं घांट चढून जातों. सरदारांची गांठ लवकर पडावीसी आहे. गांठ न पडली, वांकडीच मसलत दिसों लागली, तर यास बलाऊन घ्यावें याप्रमाणें केलें आहे. तेव्हां तें होतें न होतें हें आठ दिवसा अलीकडे समजेल. तदोत्तर जसें करणें तसें करा- वयास येईल. नबाबानीं व बापूनीं नर्मदेपर्यंत यावें ह्मणून लिहिलें, त्यास त्याचा विचार उदयीक आपली आमची गांठ पडल्यावर बोलून मग लिहूं हे विनंती.

---

१ साबाजी. २ चिठी हरीपंत फडक्याची वामनरावास.

नं० १४०८ श्रीगणपति (१४ अक्टोबर.)

चिरंजीव राजश्री तात्या यांसी प्रती परशराम रामचंद्र आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत कार्तिक शुद्ध पौर्णिमा पावतों भिवंडी नजीक पुरंदर वर्तमान यथास्थित असे. विशेष. आह्मीं तासगांवाहून निघालों ते एकादशीस येथें आलों, श्रीमंतांची, बाईचा, व कारभारी यांची भेटी जाहली. बोलणें चालणें झालें. उभयतां सरदार श्रीमंत राजश्री दादासाहेबांस घेऊन येतात. तापी उतरून अलीकडे येऊन तीन मजली आले. कासार बारीनें येणार. उभयतां सरदारांकडील कारभारी आले आहेत. [दादासाहेबांस] दहा लक्षाची जहागीर व दोन किल्ले द्यावे येणेंप्रमाणें ठराव होऊन यादी त्यांजकडे गेली आहे. परंतु त्यांची प्रकृत ठाऊकच आहे! चहूंकडे राजकारणें करावीं, येण्यास दिवसगत लावावी, सरकारच्या परगण्यांस उपद्रव करावा, लटकेंच निमित्य ठेऊन रुपये घ्यावें, असा त्यांचा स्थायिभाव आहे. जानसालास लांब पडतें, याजकरितां उभयतां कारभारी यानीं समीप यावें हें उभयतां सरदारांचें मानस, त्याप्रमाणें लिहीत आले, परंतु उभयतांचें मानस जावयाचें नव्हतें. उभयतां सरदार या लक्षांत पुरते आहेत यांत संशय तिळमात्र नाहीं; परंतु मनसबा शेवटास जावा, कराराप्रमाणें निभावणी व्हावी, यास दिवसगत होत चालली. फौजेंत डोईजड एकाच्या आळ्यांत सर्वांनी चालावें असा कोणी नाहीं. आहेत त्यांचा विश्वास नाहीं. उभयतां कारभारी गेल्याखेरीज मनसबा शेवटास जात नाहीं. तेव्हां सर्वांचे मतें उभयतानीं जावें, आपल्या फौजा राजश्री हरीपंतसुद्धां एकत्र व्हावें, नबाब छ० १९ रमजानीं बाहेर निघणार त्यांस ही सामील करून घ्यावें, इतक्यांत कराराप्रमाणें फडशांत आल्यास उत्तमच झालें; नाहीं तरी गांठ घालावी, असा

---

१ पांडुरंगराव.

ठराव झाला. कर्नाटकांत फौज पाठविल्या खेरीज बंदोबस्त राहणार नाहीं याजकरितां राजश्री विसाजी कृष्ण अथवा रास्ते यांस पाठवावें असें बोलण्यांत आलें आहे. श्रीमंत व बाई किल्ल्यावरी आहेत. येथील बंदोबस्त विना मायेचें तेथें कोणी असल्याखेरीज राहणार नाहीं. याजकरितां किल्ल्याच्या बंदोबस्ताची जिम्मा आह्मी कबूल केली कीं, तीर्थस्वरूप राजश्री कोन्हेरराव व चिरंजीव राजश्री तात्यांस आणून किल्ल्याचा बंदोबस्त करवितों. असें कबूल करून तुह्मांस व वडिलांस लिहिलें आहे व सरकारचीं पत्रें उभयतांस ही पाठविलीं आहेत. तरी तेथील किल्ल्याचा बंदोबस्त करून द्यावा. चिरंजीव राजश्री गंगाधरबाळ आहेतच व तीर्थस्वरूप राजश्री मेघःशामरावबापू ही मंगळवेढ्याहून येतील. त्यांस आह्मीं इकडून पत्र पाठवितों. ते येतील. तेथील बंदोबस्त राखोन शें दोनशें पावेतों प्यादे चांगले विश्वासू समागमें आणावे आणि तुह्मीं व तीर्थस्वरूप राजश्री कोन्हेरराव उभयतां लौकर यावें. तुह्मीं आल्याखेरीज उभयतांस कूच करून मजल दरमजल जावयास येत नाहीं. यास्तव त्वराच करून यावें. उभयतांस आणविलें ह्मणून तीर्थस्वरूप राजश्री बाबांस आह्मीं लिहून पाठविलें आहे. तेथें राऊत नेमणुकीचे असतील ते तेथेंच असावे. प्यादे शें दोनशें आणावे. राऊत चार पांचशें आपणाजवळ येथें पाहिजेत त्यास तीर्थस्वरूप राजश्री बाबास लिहून पाठवून आणवितों. सारांश उभयतां कारभारी निघाले ह्मणजे मोठीच गोष्ट होईल. मसलतीस बळ चांगलें पडेल. व कर्नाटकांत दहा हजार फौज पाठवितात तेव्हां कांहीं तिकडील फारशी चिंता करावी नलगे. आणि सारे जमा एकत्र झाल्यावर तिकडील मसलतीस ही फार दिवस लागणार नाहींत. यांत हरीसचा प्रमाण!

हातून कदापि घडावयाचें नाहीं. यास्तव तुमचे भरंवसेवर कराल असें जाणोन कबूल केलें. हुजरातची हजार दीड हजार फौज येथें राहील असें आहे यास्तव जलद यावें. चिरंजीव सौभाग्यवती लक्ष्मीबाई प्रसूत व्हावयाची बहुतकरून जाहलीच असतील. यास्तव कांहीं गुंता पडला तरी आपलें पत्र यावें कीं ' दहा दिवस झालेवर निघोन येतो ' आणि गुंता नसिला पडला तरी सुमूहूर्तेंकरून लौकर यावें. आपण आल्याशिवाय यांस लांब जातां येत नाहीं. आपले जिम्मे करून मग जातील असें आहे. यास्तव जलद यावें. फार काय लिहिणें. सर्व आपणास कळतच आहे. तीर्थस्वरूप मातुश्री सगुणाबाईनीं कित्येक मजकूर सांगितला त्याजवरून येथें येतांच केसोपंत पाटलास बोलावूं पाठविलें आहे. परंतु तीर्थस्वरूप राजश्री दाजीच्या सांगण्यांत कीं वीस हजार रुपयेवरी रोजमऱ्याचे त्याचे आंगीं क्षेप निक्षेप लाऊन द्यावें असें ह्मणत होते. परंतु तें त्यांच्या चित्तास नये. आणि मातुश्रीच्या सांगण्यांत तो तीस हजार रुपये केसोपंत कबूल करतील, नाहीं तरी आपले पदरचे देतील, असे होते. यास्तव त्यांस बलावूं पाठविलें आहे. काय होईल पहावें परंतु आमचे मतें दुराग्रहास पडूं नये. लौकिक चांगला नव्हे. यास्तव कांहीं पांच सात हजार पावेतों खेडींपाडीं तोडून ध्यावीं. यांत तुमचे व मातोश्रीचे विचारें कसें तें लिहावें त्यासारखें येथें बोलूं. परंतु उत्तर लवकर यावें. मातुश्रीही लवकर मागाहून येतो ह्मणून बोलली होती. त्यांस ती आली असलिया येथें यांचे मतें करूं तसें करावयास येईल. तेथें असलिया उत्तर पाठवावें. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे विनंती.

चिरंजीव राजश्री बळवंतराव यांसीं आशीर्वाद. लिखितार्थ परिसोन किल्ल्याची वगैरे बंदोबस्ती करून बहुत सावध राहणें. सर्वांचा परामर्ष

करीत जाणें. शरीरास औषधी दैवी मानवी उपाय करून उत्तम आरोग्यता होय तें करावें. उत्तम आरोग्य जाहल्याचें वृत्त लिहावें तेणेंकरून संतोष होईल. लोभ कीजे हे आशीर्वाद.

नं० १४०९ श्रीगणराज [कार्तिक वद्य ३
१० अक्टोबर]

आशीर्वाद. उपरी येथील कुशल तागायत छ० १६ रमजान पावेतों यथास्थित असे. विशेष. तुह्मीं पत्रीं भाव लिहिले तितके ध्यानांत आणून विचारें करून मनसबा पाहिला. परंतु श्रीमंत मातुश्री बाईच्या संनिध विना आपण राहिल्या शिवाय कारभारी यांस दुसऱ्याचा विश्वास पुरत नाहीं. समयोचित सारीं संकटें येऊन पडतात तेव्हां सारासार पाहून संकटाची निभावणी दिसेल ती करावी लागते. कालानुरूप जें होणें तें श्रीमंतांच्या पुण्यें होतच आहे. श्रीमंत व बाई राहणार तेथील सारा कारभार कारभारी आपण होऊन सांगत असतां हा समय हातचा जाऊं देऊं नये. या प्रसंगीं सारीं संकटें सोसून श्रीमंतांच्या पायांवर दूर देशची नजर बसवून खामखा मेहनत करावी हाच युक्त मनसबा आहे. आपिल्या स्थलाचा बंदोबस्त ज्या ज्या तऱ्हेने करावयाचा तसा करावा. ज्याजकडे जीं जीं कामें नेमावीं त्यानीं अहोरात्र आपलाले कामास जपत असावें. कागदपत्रांचा गुंता तो फारच आहे, युक्तीनें सारा उलगडेल तो उरकावा. राहील तो पुढें पहावयास येईल. जसें मिरजेहून (तुह्मांस) निघणें संकट तसेंच कारभारी यांस पुरंधराहून बाहेर निघणें संकट! अशा समयास लौकिक संपादावा. परंतु लिहिल्याअन्वयें आपल्या स्थळाचा पक्का बंदोबस्त करून समय रक्षणें लौकिक मिळवणेंचे दिवस हेच आहेत. तुमचे

१ पत्र वामनरावाचें पांडुरंगरावास. २ मिरजेचा.

लिहिण्याचे पूर्वींच चिरंजीव भाऊस तुह्मीं लिहिले भाव आणि घरीं कार्यें आहेत असें लिहिलें आहे. परंतु दूरदेशीं पाहतां समय निघोन जाईल आणि शब्द मात्र राहील. यास्तव इतकें लिहिलें आहे. तुह्मीं ही पुरतें मनन करून पाहणें. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं० १४१० श्रीगणपति (१३ अक्टोबर.)

अपत्यें परशुरामानें साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल तागायत कार्तिक कृष्ण षष्ठी गुरुवासरे दोन प्रहर वर्तमान यथास्थित असें. विशेष. आपणास पेढगांवच्या सुमारें येण्याविशीं लिहिलें होतें, त्यास उभयतां कारभारी काल रात्रौ डेरा दाखल झाले. उदईक कूच करून कुंभारवळणास जाणार. तेथून राजेवाडी. तेथून कोरेगांवावर भीमेच्या पाण्यावर जाणार तेथून मजल दरमजल जाणार. याजकरितां आपण बारामती. च्या सुमारें आलांच असाल. अतःपर लांब लांब मजली करून कोरेगांवच्या सुमारें सत्वर यावें. नाहीं तरी हे पुढें, आपण मागें, असें होईल. याजकरितां सोळा सोळा कोसांच्या मजली करून येऊन मिळावें प्रातःकाळीं पत्रें पाठविलीं आहेत कीं पेढगांवच्या सुमारें यावें. त्यास डेऱ्यास उभयतांच्या आल्यावरी असा निश्चय समजल्यानंतर लिहिलें असे. लिहिल्या प्रमाणें जलदीनें यावें. कोरेगांवच्या सुमारें फार लौकर यावें. पांचवे दिवशीं कोरेगांवास जातात. गुंता नाहीं. जलद यावें. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे विनंती.

पौष्य बाळाजी जनार्दन साष्टांग नमस्कार विनंती उपरी आमचें जाणें आपण घडविलें. उत्तम आहे. लौकर यावें. हे विनंती.

पै॥ छ० २० माहे रमजान सन ११७५

---

१ पत्र कोन्हेररावास.

नं० १४११ श्री (१४ अक्टोबर.)

सेवेशीं लक्ष्मण हरी. साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल तागायत कार्तिक वद्य सप्तमीपर्यंत वर्तमान यथास्थित असे. विशेष. राजकीय वर्तमान तर आठ दिवसाखालें बंकापुरामध्यें फितवा (हैदरअल्लीनें) केला होता. किल्ल्यांतील मावळे सव्वाशें हैदर नाईकास भेटले होते. हैदर नाईकाकडून दोन हजार होन आणून खादले होते. जे रात्रीस मनसबा व्हावा तेच दिवशीं भेदल्या मावळ्यापैकीं गोविंदराव यांस सांगितलें गोविंदराव यांस मारावें, किल्ला बळावावा, सरदेस हैदर नाईकाचे लोक आणून ठेविले होते त्यांस बलावून आणून किल्ला द्यावा, हें वर्तमान गोविंदराव यांस कळलें. उपरांतिक सावध होऊन मावळ्यांस धरून आणून मारामार करून त्याजपासून होन घेतले. एक दिवस गुदरला असतां तर किल्ला गेला होता. तूर्त ईश्वरानें खैर केली. मावळे काहीं मारले. कांहीं कैदेंत ठेविले आहेत. खासा हैदरनाईक पट्टणांत आहे. टिपू गुरुमकोंड्यास आहे. गुरुमकोंडा घेतला ह्मणून बाजारी वर्तमान आहे. उजनाप्पा बिदनुराहून पट्टणास गेला होता, त्यांस हैदरनाईकानें बहुमान सन्मान करून बरोबर फौज व गाडदी देऊन बिदनुरास पाठविला. तो येऊन चेनगिरीस राहिला आहे. पुढें मनसबा काय करतो पहावें. सावनूरकरानीं मागील कारभारी यांसीं चौकी देऊन राजश्री खंडेराव यांसीं दिवाणगिरी दिली. त्यांचे पूर्वीं बिदनूरकरांचें व सावनूरकरांचें थोडें बहुत [झूज] लागलेंच होतें. त्याजवरून खंडेराव यांनीं वकील पाठवून तह करावा असें केलें आहे. लवकरच तह होईल. सावनूरकरांचा तह झाला ह्मणजे काय करतो पहावें. असें वर्तमान आहे. बहुत काय

---

१ पत्र पांडुरंगरावास. २ बंकापुरचा किल्लेदार.

लिहिणें लोभ करीत जावें हे विनंती.

पै॥ छ० १४ जिल्काद सन ११७५.

नं० १४१२ श्रीगणपति (कार्तिक शुद्ध नोवेंबरचा प० पंधरवडा.)

चिरंजीव राजश्री तात्या यांसीं आशीर्वाद उपरी. पुणतांबेस धौंशा कडील फौज जाऊन पन्नास हजार रुपये घेतले हें पेशजी तुह्मांस लिहिलें होतें. त्यांस जाबतिजंग यास चांगले रीतीनें सांगून पाठविलें तेंव्हां त्यानीं आमचा ऐवज देतों असा करार केला. त्याजप्रमाणें ऐवज गांवकरांस बोलाऊन नेऊन दिला ह्मणून कालच पुणतांबेहून गांवकरांचें पत्र आलें. तुह्मांस कळावें ह्मणून लिहिलें आहे. झांशीस गोसावी याचे मोर्चे चार पांच महिने होते ते उठून गेले, ह्मणून झांशीहून पत्र आलें. राजाराम गोविंद भेलशांकडे जप्तीस श्रीमंतांकडून जाऊन मोठा दंगा केला होता त्याचें ही पारिपत्य राजश्री खंडेराव त्रिंबक सरकारांतून तिकडे रवाना केले होते त्यानीं केलें. फौज उधळली. तो जातीनिशीं पळून गेला हें पेशजी तुह्मांस लिहिलेंच आहे. हे आशीर्वाद.

नं० १४१३ श्रीगणपति (२६ नोवेंबर.)

श्रियासह चिरंजीव राजश्री पंढरीनाथ तात्या यांसीं प्रती परशराम रामचंद्र आशीर्वाद उपरी येथील कुशल तागायत कार्तिक वद्य अष्टमी मंदवासरे मुक्काम कुंभारवळण कऱ्हातीर. नजीक पश्चिमेस कोसभर सासवड. वर्तमान यथास्थित असे. विशेष. तुह्मीं पत्र पाठविलें तें पावलें.

---

१ पत्र वामनरावाचें पांडुरंगरावास. २ धौंशा. ३ हिमत बहादर. ४ दादासाहेबांकडून. ५ पांडुरंगराव पंढरीनाथ तात्या एकच.

लिहिलें वर्तमान सविस्तर कळलें. तर्थिस्वरूप राजश्री कोन्हेरराव यांजकडे पत्र पाठविलें होतें. मंगळवारीं मुहूर्तें निघतात. परंतु दोन चार दिवस तयारीस लागतील " ह्मणोन लिहिलें तें कळलें. आपला " येण्याचा मजकूर तर परगण्याचे हिशेब बिल्हे लावावयाचे व वराता वरचेवर येतात, कर्जवाम करून भरणा केला पाहिजे, व ऐवज ही स्वारींत पाठविला पाहिजे घरांतही अडचण, राजी बिराजीचे दिवस, सर्व वस्तवानीसह कुटुंब एका किल्लेंत, तेव्हां स्थळाची मजबुदी पाहिजे, किरकोळ सर्व बंदोबस्ती आमचं करणार आह्मींच, तेव्हां तेथें पांच सात महिने राहून इकडे एकटे चिरंजी वाचे हातून काम आटपणार नाहीं. याजकरितां कोन्हेरराव व दाजीबा व बापूस न्यावें. चिरंजीवाचें लग्न करणें आहे. एक दोघी मुलाचीं ही लग्नें घरीं करावयाचीं आहेत. येथें किल्लेचा प्रकार प्रसंग पडल्यास येथील प्रकार कसा होईल? " ह्मणून कित्येक पर्याय लिहिले, ऐशास इतके पर्याय लिहिले हे खरेच आहेत. परंतु उभयतां कारभारी यांचें मानस तुह्मीं यावें. तुह्मांखेरीज खातरजमा होत नाहीं. आपले मायेचे, बंदोबस्ती यथास्थित नामी मनुष्य इभ्रतीचा असल्यास मनसब्यास युक्त आहे. दाजींचा प्रकार तर त्यांस घरास जावयास आह्मीं येथें आल्यावर निरोप द्यावा असें पहिले बोलण्यांत होतें त्यावरून दाजी निरोपाची घालमेल करितात. परंतु राजश्री नाना निरोप देत नाहींत. बरोबर असावयास पाहिजे असें मानस त्यांचें. दाजींचें मानस निरोप घेऊन जावयाचें. असें असतां येथें रहावें असें ह्मटल्यास मग कळतच आहे! तत्राप आग्रहें करून राहिले तरी ते जातीनें सडे. माणूस काणूस नाहीं. असे करितां स्वार शें पन्नास जास्ती ठेविले तरी ते किल्ल्याखालीं राहतील. ते (दाजी) किल्ल्यावर जातीनें राहतील. काल या प्रकारचा. दगेबाज, विश्वास कोणाचा धरितां येत

१ पुरुषोत्तमराव कृष्ण.

नाहीं. चौकशी करून यथास्थित बंदोबस्त जाहला पाहिजे. तो चार माणूसकाणूस हाताखालीं असलिया विना कसा होतो? याजकरितां तुह्मीं यावें. तुमचे बरोबर शें पन्नास माणूस सहज येईल. किल्लेची बंदोबस्ती कोणते रीतीनें करावयाची माहीतगारी, चवकशी चांगली, मायेचे विश्वासू नामी मनुष्य अमका आहे ही इभ्रत, मनसब्यास बळ पडणार, असें आ-मचें मानस ह्मणून कित्येक अन्वयें लिहिलें. परंतु तुमचे विचारें मनसब्या स येत नाहीं! स्थळाचे भाव लिहिले, ऐशास शेजारीं दगा आहे ह्मणावा तरी वृद्धाचे लक्षांत पुरते आहेत. त्यांचा वसवसा धरावयाचा नाहीं. कर्नाटकचे तोंडावर दहा हजार फौज राजश्री विसाजीपंत बिनीवाले बरोबर रवाना झाली. शत्रूही प्रस्तुत त्या प्रांतीं कोणी नाहीं. लग्नाचे दिवस ह्मणावे तरी दोन तीन महिने नाहींत. महालकरी यांचे हिशेब कितेबांचा फडशा करणें त्यास महालकरी यांस वसुलाचे दिवसांत गुंतवावयाचे दिवस नाहींत. स्वारींत ऐवजाचे तरतुदेचा प्रकार तरी चिरंजीव राजश्री गंगाधर बाळ आहेच. ऐवजाची तरतूद सांगावी त्याप्रमाणें ऐवज स्वारींत रवाना करतील. आणि येथून ही लिहिल्याप्रमाणें तरतूद करून रवानगी वरचेवर करितील. तो ही प्रकार चालेसाच आहे. स्थळाची मजबुदी असली पाहिजे, ऐशास तीर्थस्वरूप राजश्री मेघःश्यामरावबापू व चिरंजीव बाळ सामान्य दिवसांत मजबुदी राखतील. व तीर्थस्वरूप राजश्री भास्करपंत आप्पा ही वरचेवर पाहतील. श्रीकृपेकरून मसलतही लवकरच शेवटास जाईल. महिन्या दोन महिन्यांचा प्रकार असे करितां होतो. लौकिकांत ही ‘ सर्व लहान थोर या मसलतीस झटतात’ असें ही होतें. त्यांत श्रीमंत व श्रीमंत बाईजवळचा बंदोबस्त यथास्थित असल्यास मग साऱ्याच गोष्टी

१ शेजारीं कोल्हापूरकर आहेत ते किल्ल्यास दगा करितील ह्मणाल तर ते सखा-रामबापूच्या धोरणानें पुर्तेपणें वागणारे आहेत.

उत्तम. असे कित्येक भाव आहेत. त्यांत तुमचे विचारें ती कोन्हेरराव-जी व बापू यांसच पाठवावें असें असलिया चिरंजीव धोंडोबा विनोबास तरी सत्वर पाठवून द्यावें. दाजीस रहा ह्मणतो, परंतु राहतातसें निश्चयांत आलें नाहीं. मागाहून लिहून पाठवूं. तुह्मीं तेथील काम काज चिरंजीवाचे गळीं घातल्याविना मग कधीं करावयास शिकावें? माणसाचे अंगावर पडल्याविना समजत नाहीं. अंगावर पडल्यास सहजच समजतें. तुह्मीं यावें हा उत्तम पक्ष आमचे मतें. यांत तुमचे मतें काय येईल तें खरें! कोन्हेरराव यांची तरी रवानगी लवकर करावी. कारभारी यानीं काल किल्ल्याचे जवळून कूच करून मुजकुरीं आले. आज येथें मुक्काम जाहला राजश्री बजाबा व चिंतो विठ्ठल व रामचंद्र गणेश वगैरे बरोबर सारे घेणार. त्यास बज्याबा अनमान करितात. याजकरितां मुक्काम जाहला. बरोबर घेऊन जाणार. दर मजल राजेवाडीवरून थेऊरावरून पुढें कोरेगांवावर भीमा उतरावयास जाणार. तेथें एक दुसरा मुक्काम कदाचित जाहला तर होईल. नाहीं तर दर मजल गंगातीरास जाणार. श्रीमंत राजश्री भवानराव प्रतिनिधी काल येऊन पोचले. साऱ्या फौजा महादेवाकडील कोरेगांवच्या रोखें आणविल्या आहेत. येथें फौज सध्यां सात आठ हजार आहे. महादेवाजवळची बारा तेरा हजार फौज याजप्रमाणें जमाव आहे. तीर्थस्वरूप मातुश्री सगुणाआक्काचें त्यानीं बोलून चालून घरांतचे घरांत समजावेंसें केलें. त्याचा तपशील सविस्तर अलाहिदा लिहिला आहे त्याजवरून कळेल. तीर्थस्वरूप राजश्री बाबासही कोरेगांवच्या सुमारें लौकर बोलाविलें आहे ते दोन चार दिवसांत येतील. उदईक येथून कूच होईल दर मजल जातात. नवाब डेरे दाखल छ० १९ रमजानीं जहाले. पत्रही आलें. हरीपंत वेरुळावर आहेत. धौशास त्यांस दहा कोसांशें अंतर आहे. श्रीमंत खानदेशांतच आहेत. हे निघाल्याची खबर गेल्यावर

काय करतात पहावें! मकीर नामक लेखक मात्र पुण्यांत राहतीलसें दिसतें. आपल्यास गुंत्यामुळें चार दिवस लागले तरी तीर्थस्वरूप राजश्री कोन्हेरराव व चिरंजीव उभेयतां असे पाठवावे. तीर्थस्वरूप राजश्री दाजीस बहुतां प्रकारें आग्रह केला परंतु त्यांचे विचारास येत नाहीं व राजश्री नानांचे चित्तीं बरोबर ही असावे असें आहे. परंतु कालपासून राजश्री नाना ही त्यांस तुम्ही राहणें ह्मणत आहेत. काय ठरेल तें मागाहून लिहितों. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे आशीर्वाद.

पै॥ छ० २९ रमजान सन खमस.

नं० १४१४ श्री (मार्गशीर्ष शुद्ध ९
११ दिसेंबर.)

राजश्री वामनराव बाबा स्वामींचे सेवेशीं.

विनंती उपरी. आतांच गुरुजींचें पत्र शुक्रवारचें आलें. श्रीमंत कूच करून पुढें गेले, जलदी जलपीनें यावें, ह्मणून लिहिलें आहे. त्यास रविवारीं आपण निकड करून घांटाखालीं यावें. सोमवारीं प्रातःकाळीं भेट जाहली ह्मणजे पुढें जावयाचा विचार करूं. त्वरेस मोल आहे. रवाना छ० ७ सवाल दीड प्रहर रोज चढता. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

पै॥ छ० ७ सवाल सुरू सन ११७५

नं० १४१५ श्रीगणपति [मार्गशीर्ष शुद्ध
दिसेंबर प० पंधरवडा.]

चिरंजीवे राजश्री तात्यांस आशीर्वाद उपरी. तुह्मीं बेल्यांकडून

---

१ मोरोबादादा. २ पत्र लिहिणाराचे; चुलतभाऊ विनोबा व धोंडोबा. ३ चिठी हरीपंत फडक्याची. ४ परशुरामभाऊचें पांडुरंगरावास पत्र. ५ दादासाहेबांचे अनुयायी बाजीराव बर्वे यांची.

माणसें आलीं होतीं त्यांचा पत्ता लावून कागदपत्र सुद्धां धरून पुरंदरास पाठविले ह्मणोन लिहिलें, ऐशास प्याद्यांनी सांगितलें कीं वाटेंत एक असामी मयत झाली, एक असामी राहिली आहे ती दाखल झाली. कागद पत्र उभयतां कार्यभागीं यास दाखविले. त्यांसीं दुसरे किल्लेवर पाठविल्याचा मजकूर पहिलाच बोलण्यांत आलाच होता. परंतु तीर्थस्वरूप राजश्री दाजीनीं ठेविली असतां देणें ठीक नाहीं, त्यांची मर्जी ही रक्षिली पाहिजे, विचार आहे, पत्र घेऊन तुह्मांकडे पाठवावें असें होतें; तों हें आपलें पत्र आलें त्याजवरून वडिलींचें सांगितलें कीं, या उपर आपला गुंता काडीमात्र नाहीं. दुसरे स्थळास लाऊन देणें. ' त्यास आज उद्यां कोणत्या स्थळास लाऊन देतात ती सनद व तुह्मांस पत्रें पाठवून देतों. रजपूत आला आहे त्याचें परिणाम तुह्मीं लिहिलें प्रमाणेंच होईल. इकडील वर्तमान तरी किल्ले पुरंधर येथील खालील पेठेंत सिंधी आहेत त्यांसीं लेखकांनीं संधान करून गडकऱ्यांजवळ बोली लाविली. दोन लाख रुपये (काम) झाल्यानंतर द्यावें. तूर्त एक हजार मोहरा (ह्मणजे) पंधरा हजार रुपये द्यावें. त्यास हें वर्तमान गडकऱ्यांस कळतांच [त्यांनीं] यांसीं कळविलें. उभयतां कारभारी यांणीं त्या सिंध्याचे उत्तम प्रकारें पारिपत्य केलें. किल्लयाची निशां न पटे. काल मानावर नजर देऊन तूर्त तीर्थरूप राजश्री दाजीस किल्लयास ठेवावें असें केलें. आपला तिकडील गडबडीनें अनमान दिसलाच होता. मग हें कबूल करून वडिलांस ठेविलें. बहुत प्रकारें सांगितलें तो विस्तार कोठवर लिहावा! तीर्थरूप राजश्री कोन्हेरराव व उभयतां चिरंजीव असे निघाले असल्यास लौकरच येऊन पावतील. त्यांनीं त्रिवर्गांनीं किल्लेस रहावें असें ठरलें असलें

१ पुरुषोत्तमराव दाजीनीं. २ मोरोबादादानीं. ३ कारभाऱ्यांस. ४ निशा न पटे भरंवसा वाटेनासा झाला.

तरी रवानगी तिकडे किल्लयास करावी. तीर्थस्वरूप राजश्री बाबांची[1] आमची उद्यां भेट होईल. जहालेवर सविस्तर लिहून पाठवितों. दहा वीस चांगले विश्वासूक माणूस चांगले नामी असे व कांहीं किरकोळ मिळोन पन्नास पावेतों माणूस किल्लयास वडिलांकडे जरूर पाठवावें. अनमान करूं नये. तेथें[2] आहेत ते तुमचे. नांव तुमचें वाईट झालें तरी तुमचेंच. चांगलें झालें तरी तुमचें! असें समजोन त्यांस वारंवार पत्र पाठवून समाचार घेत जावा. तेणेंकरून त्यांस हो संतोष वाटेल. आपणास कळतच आहे परंतु सूचना प्रकार लिहिला आहे. तुह्मीं स्थलीं सावध रहावें. सारी भिस्त तुह्मांवर आहे. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे आशीर्वाद.

नं० १४१६ श्री (१६ दिसेंबर)

सेवेशीं शिवाजी बाबाजी[3] साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल तागायत मार्गशीर्ष शुद्ध १४ भृगुवासरे मुक्काम विरोले गिरणा नदी वर्तमान यथास्थित असे. विशेष. श्रीमंत राजश्री वामनराव बाबा पुढें राजश्री हरीपंत तात्याकडे गेले. एकत्र होऊन श्रीमंत राजश्री दादासाहेबाचे पाठीवर चालले. होळकर व शिंदे श्रीमंतांचे पाठीवर एक मजलीच्या अंतरानें जातात. राजश्री हरीपंत तात्यास लेहून पाठवितात कीं ' श्रीमंत पळतात, सत्वर येणें. आह्मीं थोडके आहों. तुह्मीं आलां ह्मणजे गांठ घालूं, ' असें लिहितात. श्रीमंतांस व आमच्या फौजांस चाळीस कोसांचें अंतर पडलें आहे. राजश्री हरीपंत तात्या काल तापीवर गेले. श्रीमंत नर्मदेवर गेले. आतां गांठ पडणें कठीण आहे. उभयतां सरदारांचें कृत्रिम परिछिन्न दिसतें. श्रीमंत राजश्री बाबानीं आपणास पत्रें लिहून जासूद आह्मांकडूनच पाठविले त्यानीं सविस्तर आपणास लिहिलेंच आहे.

---

१ वामनरावाची. २ पुरंदरास. ३ पत्र मिरजेस पांडुरंगरावास.

आह्मांस उभयतां कारभारी यांपाशीं ठेविलें आहे. उभयतांची व नबाबाची गांठ कासारबारीस पडली. अद्यापि भेटी जाहल्या नाहींत. सा कोस सात कोसांची मजल नबाबाची होते. साता कोसांचें अंतर नबाबास याजकरितां आज उभयतांचा मुक्काम झाला. उदईक कूच होईल. नर्मदे-पावेतों जाणार. सड्या फौजा पुढें जातच आहेत. मागाहून होईल तें वर्तमान लिहून पाठवूं. राजश्री वासुदेव काकांनीं रत्नागिरीस पत्र घेऊन आपणाकडे पाठवावयासी सांगितलें त्याजवरून राजश्री महिपतराव यांचें पत्र शिवाजीपंतास घेऊन पाठविलें आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना. ' अट्टनीचे मामलतीचा करार राजश्री रामचंद्र नारायण यांजकडे करून हसेबंदी ठराऊन दिली आणि नबाब बसालतजंग यांसीं सरकारची थैली करून देवणें. आमच्या नांवचा पाशीं कागद मिरजेहून लिहून देतील ' येणेंप्रमाणें बाबानीं आह्मांस लिहिलें त्यांजवरून थैली करून पाठविली आहे. आपणास पार्शी पत्राविशीं वगैरे मजकूर बाबानीं लिहिलाच असेल हे विज्ञापना.

नं० १११७ **श्रीगणराज** (कार्तिक वद्य २ २० दिसेंबर)

अपत्यें वामनानें दोन्हीकर जोडून साष्टांग नमस्कार विज्ञापना ताग-यत छ० १९ रमजान इंदुवार मुक्काम गोदल (?) यथास्थित असे. विशेष आपणाकडे पत्र चिरंजीव राजश्री भाऊनीं पाठविलें व आह्मांस (पुरंदराहून) पत्र आलें त्याची नक्कल (मिरजेस) चिरंजीव राजश्री तात्यांकडे पाठविली त्याजवरून कळलेंच असेल. सारांश मनसबा लांबत चालला याजकरितां उभयतां कारभारी यानीं नेट धरून बाहेर निघावयाचा प्रकार केला आहे.

१ रत्नागिरीचा मामलेदार शिवाजीपंत परांजपे.

श्रीमंताजवळ व बाईजवळ तुह्मीं रहावें व चिरंजीव राजश्री तात्यानीं असावें तेव्हां त्यांस विश्वास पुरतो, असा प्रकार योजून चिरंजीवानीं श्रीमंत बाई व कारभारी यांचे सांगितल्यावरून आपणास व चिरंजीवास येणें ह्मणोन जलद सुतरस्वार आपणाकडे रवाना केला तो येऊन पावलाच असेल. त्यास आपण व चिरंजीव राजश्री तात्यानीं मिळोनच सत्वर यावें. चिरंजीवास तेथील बंदोबस्ताकरितां एक दुसरा दिवस लागल्यास आपण जलद पुढें निघून यावें तें पुरंदरासच जावें. कारभारी बुधवारी किल्ल्यावरून खालीं उतरतात. दरमजल औरंगाबादे पावेतों जाणार. तेथें जाऊन मोंगलास अनुकूल करून घेऊन पुढें जाणार. आह्मांस पेडगांवचे सुमारें येणें ह्मणोन लिहिलें आहे. त्याजप्रमाणें आह्मीं दर मजल पेडगांवास जातों. पांचशें लोकांची नेमणूक पुरंदरास पाठवावयाची झाली आहे त्याजप्रमाणें एक दोन दिवसांत लोकही पाठवून देतों. या समयीं नाहीं होय ह्मणतां नये याजकरितां जलदीनें निघोन जावें. विशेष काय लिहावें लोभ असों दीजे हे विनंती. अपत्यें दादानें साष्टांग नमस्कार विज्ञापना. वरकड ती॥ च्या पत्रावरून कळेल हे विज्ञापना.

नं० १४१८ **श्रीपांडुरंग** (मार्गशीर्ष शुद्ध दिसेंबर प० पंधरवडा)

विनंती[1] सेवक नारो महादेव. कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना. आह्मीं तोरखेड तापी तीराहून उभयतां कारभारी यांची आज्ञा घेऊन आलों. गंगेवरून[2] श्रीमंत राजश्री बाबांची रवानगी पुढें राजश्री हरीपंततात्याकडे जहाली. देखील रास्ते, आनंदराव गोपाळ, दहा बारा हजार फौज पाठविली याणीं दोन तीन मजली लांब करून कासारबारी

१ कोणा कारकुनाचें पांडुरंगरावास पत्र. २ गोदावरीवरून वामनरावांची.

पलीकडे राजश्री हरीपंत यांची भेटी जाहली. उभयतां एकत्र होऊन पुढें दर मजल श्रीमंतांच्या पाठीवरी गेले. श्रीमंत राजश्री दादासाहेब कासारबारी नजीक आले होते. उभयतां सरदार समागमें होते परंतु यांसमागमें फौज भारी अविंधं आला. ही बातमी जातांच कूच करून गेले. उभयतां सरदारांचीं पत्रें आलीं कीं, ' आमचें बोलणें अमान्य करून कूच करून तापी तीरास गेले, फौजा सत्वर पाठवणें, ह्मणोन पत्रें आलीं त्याजवरून त्यांची रवानगी पुढें जाहली. श्रीमंत दर मजल वीस कोस लांब मजली करून नर्मदा पार गेले. श्रीमंत सौभाग्यवती मातुश्री आनंदीबाईस घेऊन गेले. यास व श्रीमंतांस वीस कोसांचें अंतर होतें. उभयतां सरदारांस विसा कोसांचें अंतर होतें. श्रीमंत नर्मदा उतरोन मांडवेचा (?) घांट चढोन धारेस गेले. तेथें टिकाव न जाहला तरी पुढें राजश्री गोपाळराव बर्वे यांचे विद्यमानें रोहिल्याकडे जावें ह्मणून दर मजल जातात. उभयतां कारभारी यांचीं पत्रें राजश्री हरीपंतास जातात कीं, तुह्मीं लांब लांब मजली करून गांठ घालणें, नच गांठ पडे तरी चमेली पावेतों पाठीवर जाणें, ह्मणोन वरचेवरी पत्रें जातात. उभयतां सरदारानीं कबिले इंदुरास ठेऊन पाठीवर दहा कोसाचे अंतरें आहेत. राजश्री हरीपंत यांचीं पत्रें उभयतां सरदारांस गेलीं होतीं कीं, ' आपण आलों. तुह्मीं मुक्काम करणें. एकत्र होऊन पुढें जाऊं ' ह्मणोन लिहिलें होतें. परंतु त्यांनीं मुक्काम केला नाहीं. पुढें जातात. हे ही नर्मदा पार होऊन पाठीवरी गेले. उभयतां सरदारांचा खेळसा दिसतो! त्यांत होळकर यांची निखालसतेचीं पत्रें येतात. शिंदे यांचा अंतर्यामीं तिकडे खेळ आहे. या प्रमाणें उभयतां कारभारी यांजवळ वर्तमान आहे. राजश्री

---

१ शिंदे होळकर. २ कारभाऱ्यांबरोबर. ३ कारभाऱ्यांस मिळण्याकरितां निजाम अल्ली. ४ मुलें माणसें.

श० १६९६ दादासाहेब पुनः माळव्यांत पळून जातात इ. स. १७७४

हरीपंत सेंदवेचे बारीनें गेले. घोशाची फौज मागाहून गेली. पिछाडीस भिल्लांनीं झाबडा झाबड केली. गाडदी यांच्या बंदुका घेतल्या. भिल्लांनीं वाट चालेनाशी केली. आठ दहा दिवस पत्रें येत नव्हतीं. [आमच्या] तिन्हीं पथकांचे राऊत पांच सातशें मागून त्याच बारीनें जात होते, परंतु भिल्लांनीं जाऊं दिले नाहींत. तट्टें हिरून घेतलीं. माणसें मारलीं मग माघारे फिरोन आले. वाट चालत नाहीं. उभयतां कारभारी याणीं भिल्लांस आणून समाधान करून सांगितलें परंतु वाट चालत नव्हती. यांणीं कूच करून सेंदवेची बारी सोडून नगराकडे गेले याप्रमाणें वर्तमान आहे. अविंध समागमें आहे. नर्मदा पावेतों जावें असा मनसबा आहे. यांत घडेल तें खरें. राजश्री शिवाजपंत उभयतां कारभारी यांजपाशीं ठेऊन श्रीमंत गेले. सेवेशीं श्रुत होय. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विज्ञापना. श्रीमंताजवळ फौज दोन हजार पावेतों आहे. डेरे वगैरे सामान वाटेनें टाकीतच गेले आहेत. लोकही फुटून आले. मालोजी घोरपडे, लक्ष्मणराव पाटणकर, व सुभानराव माने, व यशवंतराव माने, वगैरे लोक उठोन आले' ह्मणून वर्तमान आलें होतें. मानाजी फांकडे मात्र समागमें चारशें लोकांनिशीं आहे. सखाराम हरी व सदाशिव रामचंद्र व आबाजी महादेव असे आहेत. फौज अगदीं नाहीं. याप्रमाणें वर्तमान आलें होतें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं० १४१९   श्री   [मार्गशीर्ष वद्य दिसेंबरचा दु० पंधरवडा]

राजश्री वामनरावबाबा व राजश्री परशरामभाऊ स्वामींचे सेवेशीं.

---

१ आमचे यजमान वामनरावबाबा, २ दादासाहेबांजवळ.

विनंती उपरी. उदईक रेवा[2] उतरावयासी दाटी फार होईल याजकरितां आपण फौज सुद्धां आज पार जावें ह्मणजे दाटी होणार नाहीं. आह्मी आजच पलीकडे जाऊं. कळावें हे विनंती.

नं० १४२० श्री (२६ दिसेंबर.)

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री पांडुरंगराव तात्या स्वामीचें सेवेशीं पोष्य लक्ष्मण हरी साष्टांग नमस्कार विनंती येथील वर्तमान तागायत मार्गशीर्ष वद्य अष्टमी पर्यंत यथास्थित असे. विशेष. तु ॥ दोन पत्रें पाठविलीं तीं पावलीं. लिहिलें वर्तमान कळोन संतोष जाहला. चिरंजीव राजश्री हरीपंत यांसीं घरीं जाणें ह्मणून पाठविलें ते पुरंदरास गेलें. तेथें श्रीमंत राजश्री बापू व नाना यांनीं लक्ष रुपये कर्ज मागितलें. त्यांचे मध्यस्थ राजश्री दाजी व राजश्री शिवाजीपंत यांनीं भिडेस घालून पन्नास हजार रुपये कबूल करविले. यंदाचा काळ एक प्रकारचा. आह्मी जवळी पैसा नाहीं. ऐसे असोन पन्नास हजार रुपयांचे होन धारवाडी चौदा हजार करार करून (त्यांनीं) चिरंजीवाची चिठी आह्मांवर घेतली सरकारचा कारभार. मध्यस्तींही मातबराचीच. असें असोन न द्यावे तर एक प्रकार दिसेल. येथें आह्मांजवळी एक होन नव्हता परंतु संकटांत पडोन सावकाराचे कर्ज घेऊन चौदा हजार होन धारवाडी पाठविले आहेत हे घेऊन राजश्री राघोपंत आपणाजवळी येतील. यांजबरोबर प्यादे व राऊत देऊन पुण्यास पोंचेसे करावें. हा समय कर्ज द्यावयाचा नव्हता, परंतु मुलानें कबूल केल्यावर पाठवून दिलें. याची उगवणी करायाचा भार आपणासच आहे. इकडील वर्तमान तर टिपूनें गुरुमकोंडा घेऊन कडपें वगैरे पालेगाराच्या खंडण्या घेऊन शिरें प्रांतीं फौज सद्धां आला.

---

[1] चिठी हरीपंत फडक्यांची. [2] नर्मदा.

तेथून सडा मात्र श्रीरंगपट्टणांस हैदरानें बलाऊन नेला. त्यास काय सांगोन मनसबा करतो पहावें. खासा हैदरनाईक श्रीरंगपट्टणांतच आहे. डेरे मात्र बाहेर दिले आहेत. चौंकडे आवई पडली आहे. अद्यापि बाहेर निघाला नाहीं. चित्रदुर्ग व हरपनहळीकर वकील खंडणीस गेले होते. त्यास हरपनहळीकर चाळीस हजार होनावर चुकवून आले. दुर्गकरांस दोन लाख होन मागतो. व कृष्णापानाईक रायदुर्गकर पट्टणास गेला आहे तो हैदरनाईकाचा चिरंजीवच झाला आहे! त्यानें एरडकिरे ठाणे सोडून देणें ह्मणून लाविलें आहे. हे गोष्ट दुर्गकर मान्य करीत नाहींत या मुळें प्रस्तुत दुर्गावर राजकारण करणार ऐसा मनसबा आहे. सावनूरकर यानीं दिवाणगिरी खंडेराव यांस सांगितली. त्यानीं वकील पट्टणास पाठविले होते. त्यांसही लाख होन मागतो. हे पंचवीस तीस हजार पर्यंत द्यावयास कबूल आहेत. कसें होतें पहावें. हैदरनाईकाची फौज प्यादे कांहीं चेनगिरीस जमा जाहले आहेत. त्यामुळें हरीहर प्रांताचें सारे गुळे गेले. पैसा वसूल होत नाहीं. अलीकडे शिकारपुराकडे ही प्यादे राऊत जमा झाले आहेत. त्यांनीं एक दोन गांव हावनूरकराचे मारिले असें वर्तमान आहे. हैदरनाईक उत्तरेकडील काय राजकारण होतें तें पाहतो. तिकडे यथास्थित झालें तर उत्तम आहे. नाहीं तर नदी उतरून आपले तालुक्यास येतो. बहुत काय लिहिणे लोभ करीत जावा हे विनंती.

नं० १४२१ श्री

(२६ दिसेंबर)

सेवेशीं शिवाजी बाबाजी. कृतानेक साष्टांग नमस्कार. विनंती येथील कुशल तागायत मार्गशीर्ष कृष्ण अष्टमी इंदुवासरे मुक्काम तोरखेड

१ पत्र पांडुरंगरावास.

तापी उत्तर तीर वर्तमान यथास्थित असें. विशेष. आपण पत्रें पाठविलीं तीं पावलीं. मजकूर कळला. श्रीमंत राजश्री वामनराव बाबांच्या नांवचे लाखोटे पाठविलें ते जासूद येथेंच राहिले आहेत. पुढें वाट चालत नाहीं सरकारचे कागदपत्र जात नाहीं व तिकडून ही पत्रें येत नाहींत. राजश्री हरीपंततात्या व आपल्या फौजा नर्मदे अलीकडे एक मजलीवर असतां पत्रें आलीं त्यांतील मजकूर श्रीमंत राजश्री दादासाहेब नर्मदा पार होऊन धारेच्यीं रोखें उज्जनी उजवी टांकून गेले. होळकर व शिंदे यांनीं बुनगें नर्मदेवर टाकून इंदुराकडून माळव्याच्या सुमारें पुढें आडवें व्हावें ह्मणून दर्शवून गेले. मशारनिल्हे व आपल्या फौजा उतरोन पाठीवर तसच जावें या अर्थें गेले. पुढें कोठ पावेतों गेले असतील समजत नाहीं. तिकडून कागदपत्र आले ह्मणजे सविस्तर लिहून पाठवूं. श्रीमंत राजश्री दादासाहेब पहिल्यानें कूच करून वीस कोस तापीवर आले त्या दिवशीं धारेला डेरा वगैरे फरासखान्याचें सामान थालनेरांत टाकिले तें येथें आल्यावरी सरकारांत आणिलें. पुढें जातां जातां लोक फार फुटले. राजश्री मालोजी घोरपडे व बाबूराव पाटणकर व यशवंतराव माने मध्यस्तीस ह्मणून होळकर शिंदे यांजकडे आले ते त्यांजवळच राहिले. लोक पायींचे देखील फार उठोन आले. मानाजी फाकडा, सदाशिव रामचंद्र, व सखाराम हरी, व गणेश विठ्ठल, वगैरे पागा मिळोन दोन हजारानिशीं धारेस पवाराच्या गेले. पुढें जातां जातां लोक फार करून फुटतील. पांच सातशें राहिले तरी न कळे. आपल्या फौजा पाठीवर गेल्याच आहेत. तिकडून पत्र येतांच लिहून पाठवूं. श्रीमंत सौभाग्यवती मातुश्री आनंदीबाई नर्मदे जवळ होती त्यांस आणून समागमें घेऊन गेले. या प्रकारचें तिकडील वर्तमान इकडील वर्तमान तर नबाब निजामअलीखान यांची व या उभयतां[1].

---

१ सखारामबापू व नाना फडणीस यांची.

च्या भेटी छ० १९ सवालीं जाहल्या. रुकनुद्दौला पुढें सामोरे येऊन उभयतांस डेन्यास घेऊन गेले. भेटी जाहल्या. बोलणें चालणें झालें. समागमेंच सा साता कोसांच्या मजली करीत येथें पावेतों आले. तोरखेडें बड्यांकडे होतें. मवासगिरी करीत होते. गुदस्तां फौजा पाठविल्या असतां आले नाहींत. खरगसिंग ठाण्यांत गुदस्तां होता तो श्रीमंताकडे गेला. माधवराव बडे पांचशें स्वारांनिशीं होता तो झाडींत भिल्लाणांत गेला. ठाणें एक दिवस झुंजलें, रात्रौ पळोन गेले. ठाणें सरकारचें बसलें. अतःपर नर्मदेपावेतों जावें असा मनसबा आहे. परंतु तिकडील पत्रें आलीं ह्मणजे त्यांच्या लिहिल्या प्रमाणें जावें, नाहीं तरी आठ पंधरा दिवस जवळ पास फिरावें, उपरांतिक तिकडील मनसब्यासारखें करावें, असें आहे. साष्टीस इंग्रजानीं येऊन मोर्चे लाविले आहेत. आंतील लोकांनीं दोन वेळा मोर्चेवर चालोन गेले. वसईहून पांचशें कुमक साष्टीस आली. पुण्याहून हजार माणूस पायींचें गेलें. राजश्री विसाजी कृष्ण रवाना झाले. येथून राजश्री शिवाजी विठ्ठल हजार राऊतानिशीं गेले. राजश्री आपाजी हरी धोडपकर सात आठशें पायींच्या माणसानिशीं रवाना झाले. सामान साष्टीस चांगलें पोंहचलें. श्रीमंतांच्या पुण्यप्रतापें करून इंग्रज नामोहरम होऊन जाईल. विसाजी केशव ही पागासुद्धां वसईस गेले. गुजराथेकडे गायकवाडाची कटकट लागली होती. राजश्री फत्तेसिंग गायकवाड सरकार लक्षांत होते. गोविंदराव दादासाहेबांच्या लक्षांतील, याजकरितां पांच हजार फौज फत्तेसिंगाचे कुमकेस पाठविली होती. इतक्यांत गोविंदराव यांची फौज फुटोन गेली. दोन तीन हजार राहिला आहे. त्याचें पारिपत्य होईल. फत्तेसिंग काईम राहिला. हें

१ लुटालूट. २ माजी पेशव्यांचा खून करणारांपैकीं एक. ३ दादासाहेबांकडे. ४ बिनीवाले.

गुजराथचें वर्तमान. भोंसल्याकडील वर्तमान राजश्री साबाजीची जरब मुधोजीवर आहे. चिंता नाहीं. मुधोजीचेंही सामान फुटलें. साबाजी फार जबरदस्त आहे. कर्नाटकचें कसें वर्तमान तें कळत नाहीं. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं० १४२२ श्री (२७ दिसेंबर.)

श्रीमंत राजश्री कोन्हेरराव स्वामी

गोसावी यांस.

आश्रित रामचंद्रभट वाटवे. अनेक आशीर्वाद उपरी येथील क्षेम मार्गशीर्ष वद्य नवमी भौमवार जाणून क्षेम असे. विशेष. आपण पुरंधरास पावलेचें वर्तमान लिहिलें तें कळलें. उभयतांची भेट जाहली नाहीं तरी चिंता काय आहे? राजश्री दाजीनीं जाबसाल करून घेतलेच असतील करवीरवासी यांचें व इचलकरंजीकर यांचें युद्ध नित्य लागलें आहे सामानगड व भुदरगड हे दोन्ही किल्ले राजश्री राणोजी शिंदे यांजकडे आहेत. ते करवीरास दरबारीं होते. त्यांचा यांचा विपर्यास होऊन न कळतां ते सामानगडास निघून गेले. या प्रकारें या राज्यांत कलह आहे. काय होईल तें पहावें. बहुत काय लिहिणें हे विनंती.

नं० १४२३ (मार्गशीर्ष शुद्ध १४
१६ दिसेंबर.)

विष्णुपंतास बाळाजी विष्णु सहस्रबुद्धे यांचें पत्र

पुण्याहून.

" दादासाहेब दोन मजली पलीकडे गेले. फौजा पाठीस लागल्या

१ हे कुरुंदवाडकरांचे उपाध्ये.

आहेत. उभयतां कारभारी टोंक्यावर आहेत. कोंकणांत साष्टीस इंग्रज आला यास्तव राजश्री विसाजीपंत बिनीवाले पुरंदराहून रवाना झाले आहेत. गाडदी व लोक नवे ठेवून रवाना केले. पहिला कोतवाल केशवराव तेथें होता त्याचा फितूर असें लोक बोलतात. याजकरितां फौज व पायींचें माणूस पाटविलें आहे."

नं० १४२५

(मार्गशीर्ष शुद्ध
डिसेंबर प० पंधरवडा)

पांडुरंगरावाचें वामनरावास पत्र.

"इंग्रज एकाएकींच साष्टीस येऊन मोर्चे दिले. रामाजी महादेव यांचे पुत्र बाहेर होते. मोर्चे बसले उपरी अंगेजणी करून पांचशें लोकांनिशीं किल्ल्यांत गेले. पुरंदराहून विसाजीपंत वगैरे लोकांचीं रवानगी झाली होती परंतु इंग्रजानीं हल्ला करून साष्टी घेतली. मोठा दगा झाला. फौज देशीं न ठेवितां कारभारी तिकडे गेले. पुरंदराहून वसई साष्टी मुंबई नजीक. तेथें ही संकट आहे. कसा परिणाम लागतो पहावें!

नं० १४२६

(२८ डिसेंबर)

महादेवभट पटवर्धन वास्तव्य कोळंबें तालुके रत्नागिरी यांचें
पांडुरंगरावास पत्र मार्गशीर्ष वद्य १० चें --

"सागरांतील धामधूम बहुत झाली आहे. इंग्रज याणें साष्टीस वेढा घालून झुजतो आहे. गोंव्याकडील फिरंगी ही तयार झाला आहे. विजयदुर्गास येणार. धुळप याचें आरमार तयारीनिशीं आहे. पुढें कठिण काळ आला आहे!"

नं० १४२६

[मार्गशीर्ष वद्य
दिसेंबरचा दु० पंधरवडा]

हरीपंत फडके याची वामनराव पटवर्धनास
चिटी छ० २९ सवालची

" राजश्री महादजी शिंदे यांजकडून पत्र आलें तें आपल्यास पहावयास पाठविलें आहे. उदईक सात कोसांचें कूच. धार डावी दोन कोस राहील. सरदारांची मर्जी आजपर्यंत रक्षीत आलों. पुढेंही भेट होऊन काय होतें तावत्कालपर्यंत रक्षिलीच पाहिजे. त्यांचा मुलूख लागेल त्याचें रक्षण झालें पाहिजे, ये विषयीं लष्करांत पुर्ती ताकीद असावी. वैरण आणावी. गांव लुटूं नये, दाणा आणूं नये, याप्रयाणें ताकीद करावी ह्मणजे सरदारास चांगले वाटेल. आपल्यास सर्व समजतें तथापि लिहिलें आहे."

नं० १४२७

(१३ जानेवारी १७७५)

कोन्हेरराव व पुरुषोत्तमराव यांचें गंगाधररावास पत्र
पौष शुद्ध द्वादशीचें पुरंदराहून

" साष्टी घ्यावयाची योजना नारो आपाजी करीत आहेत. श्रीमंत दादासाहेब मेहदपुरीं आहेत. शिंद्यास व त्यांस सत्तावीस कोसांची व हरीपंतास व श्रीमंतास पसतीस कोसांचा तफावत आहे. उभयतां कारभारी व नवाब बऱ्हाणपुराजवळ आहेत. नर्मदेपर्यंत जावें असें आहे. श्रीमंत रावसाहेब सुखरूप आहेत. श्रीमंत सौभाग्यवती मातुश्रीस ज्वर येतो. येथील हवा फारच एक प्रकारची आहे. वाऱ्याचें मात्र स्थान हेंच आहे असें वाटतें!"

नं० १४२८

[९ जानेवारी १७७९]

विसाजी नारायण वाडदेकर यांचें पत्र गंगाधररावास

पौष शुद्ध ८ चें पुण्याहून

" श्रीमंत दादासाहेब धारेचे पुढें माळव्याचा (मांडव्याचा ?) घांट चढून गेले. त्यांचे पाठीमागें विसा कोसांवर उभयतां सरदार आहेत. त्यांचे पाठीवर वामनराव बाबा व परशरामभाऊ व हरीपंत फडके वगैरे फौज तीस हजार आहे. दरमजल पुढें जात आहेत. राजश्री सखारामपंत बापू व नाना फडणीस फौज सुद्धां बऱ्हाणपुरचे पुढें सोळा कोसांवर फैजपुरावर आहेत. "

स० १७७५ सालचीं वर्तमानें
गुजराथचीं स्वारी.

दादासाहेब गोविंदराव गायकवाडास मिळवून घेण्यासाठीं व इंग्रजांचा आश्रय करण्यासाठीं गुजराथेंत पळून गेल्याचें पूर्वीं लिहिलेंच आहे. गोविंदराव गायकवाड व त्याचा सावत्रबंधु फत्तेसिंग या दोघांमध्यें लढाई सुरू होती. ती लढाई उद्भवण्याचें कारण असें झालें होतें कीं दमाजी गायकवाड वारल्यानंतर माधवराव पेशव्यांनीं त्याच्या मुलांत सरदारीसंबंधें तंटा लागला असतां इतर भावास एकीकडे सारून गोविंदरावास सरदारी दिली होती. हीं सरदारीचीं वस्त्रें घेतानां पेशवे सरकारास नजराणा खंडणी वगैरे मिळून पन्नास लक्ष रुपये देण्याचा गोविंदरावानें करार केला होता. सरदारीचीं वस्त्रें मिळून वर्ष सहा महिने लोटले तरी गोविंदरावाच्या हांतून सरकारांत वर लिहिलेली रक्कम भरण्याचें होईना. शिवाय त्याच संधीस गोविंदरावाचा बंधु फत्तेसिंग हा पुण्यास आला होता त्यानें पेशव्यांशीं बोलणें लाविलें कीं. आपण सर्व रकमेचा निर्गम करून देतों, आपणास सरदारी द्यावी. गोविंदराव हा दादासाहेबांचा अभिमानी असल्यामुळें त्याकडे पेशव्यांचा ओढा विशेषसा नव्हताच. त्यांतून फत्तेसिगानें पुणें दरबारचें मुत्सदी अनुकूळ करून घेतले असल्यामुळें ते त्यासच सरदारी द्यावी असें ह्मणूं लागले. नजराण्याची वगैरे सर्व रक्कम देऊन मामूल वहिवाटी प्रमाणें पेशवे सरकारची फौजेनिशीं चाकरी करण्याचीही फत्तेसिंगानें कबुली दिली. तेव्हां सरदारीचीं वस्त्रें फत्तेसिंगास देण्यावांचून पेशव्यांस गत्यंतरच राहिलें नाहीं. परंतु पूर्वीं आपणच केलेलें आपणच कसें फिरवावें असें मनांत आणून श्रीमंतांनीं त्यांतले त्यांत असें केलें कीं, गोविंदरावाकडे सरदारीचा धनीपणा व 'सेनाखासखेल' हें पद पूर्वी

सन १७७५ सालचीं वर्तमानें

गुजराथची स्वारी

प्रमाणेंच असावें व त्यानें आपल्या खर्चा पुरती तीन लक्षांची जहागीर तोडून घेऊन पुण्याजवळ दावडी येथें रहावें असें ठरविलें आणि फत्तेसिंगास ' सेनाकर्ते ' असें नवीन पद देऊन गायकवाडांचा मुलूख व फौज त्याचे हवालीं केली! फत्तेसिंगानें सरकारांत रक्कम भरली व हैदरअल्लीवरच्या तिसऱ्या स्वारींत चार हजार फौज चाकरीस कर्नाटक प्रांतीं पाठविली. तिनें तिकडे दोन अडीच वर्षे राहून मोतीतलावाच्या लढाईंत वगैरे चांगली कामगिरी बजाविली. फतेसिंगानें आपल्या राज्याचा कारभार सुयंत्रपणानें चालविला होता व माधवराव पेशव्यांच्या जरबेमुळें गोविंदराव ही दादवडीस स्वस्थपणानें राहिला होता. ही स्थिति नारायणराव साहेबांचा खून होई पर्यंत कायम होती. पण त्या नंतर हें पारडें पुनः फिरून गोविंदरावास दादासाहेबांस गायकवाडांची सरदारी व सर्व मुलूख दिला. मग तो फौज जमा करून फत्तेसिंगास हुसकून लावण्याकरितां गुजराथेंत गेला. त्यास त्याचा चुलतां खंडेराव गायकवाड अनुकूळ झाल्यामुळें फत्तेसिंग कित्येक झटापटी झाल्यानंतर जेरीस आला. इतकें होतें तों इकडे पुण्यांत बारभाईचें कारस्थान उद्भवून दादासाहेब पदच्युत झाले. त्यामुळें कारभारी सखारामबापू व नाना फडणीस यांजकडून आपली कुमक होईल अशी फत्तेसिंगास आशा उत्पन्न झाली, व त्याप्रमाणें त्यानीं त्याच्या कुमकेकरितां पांच हजार फौज नारो आनंदराव नांवाच्या सरदाराबरोबर गुजराथेकडे पाठविली. तिकडे गोविंदरावानें प्रांतांत ठाणीं बसवून फत्तेसिंग बडोद्यांत होता तेथें त्यास वेढिलें होतें. त्याच्या कुमकेस पुण्याहून गेलेली फौज सोनगडापर्यंत जाते तों खुद्द दादासाहेबांची स्वारीच तिकडे गेली त्यामुळें ती फौज सोनगडासच थबकून राहिली व हरीपंत फडके वगैरे पाठलाग करीत तिकडे आले तेव्हां त्यास सामील झाली.

(१२३३)

गुजराथची स्वारी

गोविंदरावास दादासाहेब येऊन सामील झाल्यानंतर उभयतांच्या फौजा बडोद्यांजवळ पंधरा दिवस पर्यंत स्वस्थपणें होत्या. त्या नंतर शिंदे होळकरांस बरोबर घेऊन हरीपंत फडके सर्व फौजेसह बारा कोसांच्या अंतरावर येऊन ठेपले ही बातमी कळतांच दादासाहेब व गोविंदराव बडोद्यांहून तळ हालवून अहमदाबादेस जाण्याच्या उद्देशानें महीनदीच्या

जानेवारी रोंखें चालले. फत्तेसिंग हरीपंतास सामील झाल्यावर तें लष्कर ही पाठलाग करीत आलें तेव्हां उभयपक्षीं थोडीशी झटपट होऊन इकडील तिकडील शें दोनशें लोक जायां जखमी झाले. मानाजी फाकडे व गोविंदराव हे तोंडावर होते त्यांशींच ही झटपट झाली. दादासाहेब चार कोस पुढें गेले होते. फडक्यांच्या लष्करांत शिंदे होळकर होते त्यांचे दादासाहेबांकडे फितुराचें सूत्र असल्यामुळें इकडील बित्तीम बातमी तिकडे जात असे, परंतु तिकडचे बेत काय आहेत हें मात्र इकडे कळण्यास मुष्कील पडे. शिवाय आपल्या बाजूच्या सरदारांत फितूर असल्याचें माहीत असल्यामुळें आपआपसांत आशंका उत्पन्न होऊन कोणीही सरदार पुढें होऊन मेहनत करण्यास धजत नसे त्याचा परिणाम असा झाला कीं, दादासाहेब कांहीं एक अडथळा न येतां बाजार बुनग्यासह खुशालपणें मही उतरून गेले. पलीकडे जातांच त्यानीं तोफा पायदळ व पंधरा हजार स्वार अशी फौज नदीचे उतार रोंखून उभी केली. मागून हरीपंताचें लष्कर आलें त्यास घांट रोंखिल्याची बातमी आगाऊ कळली नव्हती. अघाडीस पटवर्धन होते त्यांचें पांच सहाशें माणूस नदीपार झालें व आणखीही कोणी कोणी पलीकडे गेले तों तिकडून एकदम मारा सुरू झाल्यामुळें ते सर्व लोक माघारे नदी उतरून आले. मागून आणखी फौज पलीकडे जाण्याचा एलगार करीत होती परंतु ती जागा अवघड असल्यामुळें या फौजेचा काट चालेनासा झाला. उभयपक्षीं चार घटका

तोफातोफी मात्र झाली पण तींत ही कांहीं विशेषसें निष्पन्न झालें नाहीं, शेवटीं नदी उतरण्याचें काम उद्यांवर घालवून सायंकाळीं फडक्यांचें लष्कर परत तळावर आलें. दुसऱ्या दिवशीं निघण्याची तयारी होते तों दादासाहेबांकडून सल्ल्याचें बोलणें करण्याकरितां वकील आले. ते वकील शिंदे होळकरांच्या मध्यस्तीनें बोलत होते. दोन्हीं लष्करें सत्ता दिवस महीच्या अलीकडे व पलीकडे अशीं राहिलीं होती. समेटाचीं नित्य नवीं बोलणीं दादासाहेबांचे वकील बोलत त्यामुळें कोणचेंच कलम ठरण्याचा रंग दिसेना. दादासाहेबांच्या मनांत हल्ला करण्याचें मुळींच नसून केवळ दिवस घालविण्याकरितां ही त्यानीं पूर्वीं अनेक प्रसंगी लढविलेली शक्कल आतांही चालविली आहे हें हरीपंतानीं ओळखलें असल्यामुळें हीं तहाबद्दलचीं अद्वा तद्वा बोलणीं त्याणीं प्रथमच झिटकारिलीं असतीं; परंतु शिंदे होळकरांसारखीं जड जड प्रस्थें मध्यें पडल्यामुळें तें ही त्यास करितां येईना! दोन्हीं लष्करें जवळ जवळ असल्यामुळें तिकडील पक्षाच्या लोकांस या फौजेंत फितुराचा फैलाव करण्यास चांगलेंच फावलें. कांहीं शिलेदार फितुरांत सांपडले त्यांचे हरीपंतांनीं शासन केलें परंतु न उघडकीस आलेला आपल्या फौजेंत आणखी किती फितुर आहे हें कळण्यास मार्ग नसल्यामुळें त्यास फार फार सावधपणानें वागावें लागत असे. समेटाचें बोलणें घाटतां घाटतां मध्यस्थ शिंदे होळकर यानीं शेवटीं हरीपंत फडक्यांस सांगितलें कीं, दादासाहेबांस फौजेचें देणें बत्तीस लक्ष रुपये झालें आहे तें सरकारांतून त्यांस द्यावें व जातीच्या खर्चाकरितां दरसाल दहा लक्ष रुपये उत्पन्नाची जहागीर त्यांस द्यावी! हें बोलणें ऐकतांच हरीपंतानीं उभयतां सरदारांस रागावून उत्तर दिलें कीं, गुदस्तांपासून तुह्मी या समेटाच्या मध्यस्थींत पडून सरकारांतून दादासाहेबांस मनस्वी रुपये देवविलेत व आणखी ही द्यावे ह्मणून आतां ह्मणतच आहां. मी फडणिशीकडचा यःकश्चित

कारकून. सरकारचे बत्तीस लक्ष रुपये दादासाहेबांस आपल्या जबाबदा॰ रीवर देण्याची माझी योग्यता नाहीं! तुह्मी थोर सरदार. तुह्मांस ती योग्यता आहे. दादासाहेब व तुह्मी काय पाहिजे तें ठरवा व करा. आ- ह्मांस येथें राहण्याचें कारण नाहीं. याप्रमाणें बोलून हरीपंत तात्या तत्काळ फौजेसह कूच करून परत बडोद्यास आले. त्यांचे मागोमाग शिंदे होळ॰ करानीं येऊन त्यांची समजूत केली कीं, दादासाहेबांशीं आह्मी लढाई कर॰ ण्यांत पुढाकार घेतों ह्मणजे तुमच्या संशयास कारणच राहिलें नाहीं. तुह्मीं सडे होऊन आमच्या मागें मात्र असावें. याप्रमाणें बोलणें

फेब्रुवारी

झाल्यावर हरीपंत सडे स्वारीनें पुनः दादासाहेबावर गेले. पण पुढें ता० १७ फेब्रुवारी रोजीं दादासाहेबांशीं महीच्या पैलतीरीं जी मोठी लढाई झाली तींत शिंदे होळकरानीं विशेष पुढाकार घेतल्याचें कोठें नमूद केलेलें नाहीं. फत्तेसिंगानें मात्र त्या प्रसंगीं उत्तम रीतीनें मेहनत केली. त्या लढाईंत दादासाहेबांचा पूर्ण पराजय होऊन त्यांच्या फौजेची दाणादाण झाली. असा पराजय होण्याचें कारण दादासाहेबांच्या सांगण्यांत असें आलें कीं,* फौजेच्या मध्यभागीं चार हजार स्वांर व दहा हजार आरब पायदळानिशीं आपण उभे होतों. पंचवीस हजार फौजेनिशीं हरीपंतानें मुद्दाम मध्यभागावरच हल्ला केला तेव्हां आयत्यावेळीं ते आरब लढण्याचें नाकारून निघून गेले. मग चार हजार स्वारांनिशीं उभे राहून पंचवीस हजार फौजेचा मारा सोसणें होईना सबब आपणास लढाईंतून त्वरेनें निघून जावें लागलें. कसेंही असो. या लढाईंत दादासाहेबांचा अगदीं पूर्णपणें मोड झाला हें खरें आहे. त्या प्रसंगीं त्यांच्या तोफा, हत्ती निशाणें व बाबूराव पाटणकर व गणेश विठ्ठल हे सरदार हरीपंताच्या हातीं लागले. लढाई सायंकाळच्या प्रहर दिवसापासून काळोख पडेपर्यंत चालून तिचा

---

* selections from state papers bombay. p. 218

सन १७७५ सालचीं वर्तमानें

असा परिणाम झाल्यावर थोड्याशा फौजेनिशीं दादासाहेब खंबाइताकडे पळून गेले आणि गोविंदराव व खंडेराव गायकवाड, मानाजी फांकडे, सदाशिव रामचंद्र, आबाजी महादेव, सखाराम हरी वगैरे बाकीचे सरदार काय फौज व सामान राहिलें तें घेऊन नडियादेकडे पळाले. हरीपंताची फौज रात्रभर लढाईच्याच जागीं राहिली. उजाडल्यावर त्या फौजेच्या दोन टोळ्या झाल्या. एक टोळी वामनराव पटवर्धनाबरोबर दादासाहेबांच्या पाठलागाकरितां खंबाईताकडे रवाना करून दुसऱ्या टोळीसह स्वत: हरीपंत नडियादेकडे गेले. दादासाहेब खंबाईतास पोंचतात तों पाठोपाठ पटवर्धन येत असल्याची वर्दी आली. तेव्हां श्रीमंतांनीं भयभीत होऊन खंबाइताच्या नबाबास सांगून पाठविलें कीं, आह्मांस तुमच्या किल्ल्यांत आश्रय द्यावा. पण त्यानें किल्ल्याकडे येऊं देण्याचें साफ नाकारिल्यामुळें श्रीमंतांनीं तेथें इंग्रजांची वखार होती तिजवरील अमलदारास सांगितलें कीं, तूं कसें ही करून आह्मांस सुरतेस पोंचते करून दे त्यानें उत्तर केलें कीं, आमचीं जहाजें भावनगरच्या बंदरांत आहेत तेथें आपण जावें ह्मणजे जहाजवाले आपणास सुरतेस नेतील. त्याप्रमाणें श्रीमंत भावनगरावर गेले. बरोबर फौज नव्हतीच व काय लवाजमा होता त्याची ही हा वेळपर्यंत वाताहात झालीच होती. कांहीं शागीर्दपेशाचे माणूस व विश्वासू कारकून व शिपाई व नाटकशाळा व दासी वगैरे मिळून सातशें माणूस बरोबर होतें शंभर घोडे व सात हत्ती बरोबर होते ते कोणाच्या तरी

फेब्रुवारी २३ हवालीं करावें तर कोणीही हवालीं करून घेईना सबब ते मोकळे सोडून देऊन श्रीमंतांची स्वारी जहाजांत बसून सुरतेस सुखरूपपणें जाऊन पोंचली.

दादासाहेब इंग्रज लोकांचा आश्रय मागण्यासाठीं सुरतेस गेले होते. असा आश्रय देण्याचे इंग्रजांस तरी काय अगत्य पडलें होतें हें कळण्या-

साठीं त्यांच्या एवढा वेळ पर्यंत काय हालचाली चालल्या होत्या हेंही अंमळ विस्तारानें येथें सांगितलें पाहिजे. साष्टी व वसई हा टापू गोव्याच्या फिरंगी लोकांच्या ताब्यांत पूर्वी होता तो त्या पासून इ. स. १७३९ त मराठ्यांनीं घेतला. त्या दिवसापासून तो परत घेण्याची फिरंगी लोक तर संधी पहात होतेच. पण त्या शिवाय हा टापू निदान यापैकीं साष्टी तरी आपणास मिळाल्यानें आपली अनेक प्रकारें सोय होईल हें जाणून मुंबईकर इंग्रज सलोख्यानें किंवा बळजबरीनें हा टापू बळकाविण्यासाठीं टपून बसले होते. माधवराव पेशवे व दादासाहेब यांमध्यें विरोध उत्पन्न झाला त्या दिवसापासून पेशव्यांचें अकल्याण इच्छिणारे हैदरअल्ली, निजामअल्ली व नागपूरकर भोंसले हे जसे आपला फायदा करून घेण्यासाठीं दादासाहेबांचे हितचिंतक बनले त्याप्रमाणें मुंबईकर इंग्रजानींही दादासाहेबांशीं स्नेहासलोख्याचा शिलशिला पत्रद्वारें व निरोपानिरोपीं ठेविला होता. नारायणराव पेशवे वारल्यावर साष्टीवर स्वारी करण्याची इंग्रजानीं तयारी केली होती व तेथील किल्लेदारास लाख रुपये लांच देऊन ही किल्ला घेण्याची वाटाघाट मुंबईच्या कौन्सिलांत होत होती. पण या बातम्या पुण्यास कळून तेथून बंदोबस्त झाल्यामुळें ती मसलत त्यावेळीं थंड पडली. पुढें बारभाईंचें कारस्थान उद्भवून त्रिंबकराव मामाशीं लढाई झाल्यावर दादासाहेब नर्मदेच्या रोंखे चालले तेव्हां पुण्यास इंग्रजांचा वकील मोस्तीन नांवाचा होता त्याजवळ त्यांनीं कवाइती पायदळ व तोफा कुमकेसाठीं मागितल्या होत्या. पण हें बोलणें नुसतें मोघम असून कुमक कोणच्या शर्तीवर द्यावी घ्यावी हें ठरलें नव्हतें. पुढें दादासाहेब माळव्यांत जाऊन शिंदे होळकरांच्या मध्यस्तीनें परत पुण्यास येत असतां तापीच्या सुमारें आले तेव्हां त्यानीं इंग्रजांशीं पुन: बोलणें सुरतेच्या गव्हर्नरामार्फत सुरू केलें. इंग्रजानीं सांगितलें कीं तूर्त फौजेच्या खर्चाकरितां पंधरा लक्षापासून वीस लक्षापर्यंत रकम

सन १७७५ सालचीं वर्तमानें

आगाऊ द्यावी व बारभाईंचें बंड मोडून श्रीमंतांची पुनः स्थापना झाल्यावर साष्टी व वसई द्यावी, ह्मणजे आपण तोफांसुद्धां अडीच हजार पायदळ कुमकेस पाठवितों. दादासाहेबांचे ह्मणणें पडलें कीं इतकी रक्कम आगाऊ देण्यास आपणाजवळ नाहीं. आपण साष्टी व वसई साफ देणार नाहीं पण त्या ऐवजी गुजराथेंत दरसाल अकरा लक्ष रुपये उत्पन्नाचा मुलूख देऊं व त्याबद्दल इंग्रजानीं एक हजार गोरे व दोन हजार काळे शिपाई व पंधरा तोफा कुमकेस पाठवाव्या. या विषयाची उभयपक्षीं भवति न भवति होते तोंच गोव्यास फिरंगी लोकांची साष्टीवर स्वारी करण्यासाठीं झपाट्यानें तयारी होत असल्याची मुंबईस बातमी आली. तेव्हां इंग्रजानीं पुढें मागें न पाहतां एकदम साष्टीवर स्वारी केली. त्या किल्ल्यास आठ दिवस वेढा पडला होता. किल्लेकऱ्यांनी हिमत धरून एक दोन हल्ले मारून काढिले पण कोणीकडून कुमक न आल्यामुळें इंग्रजानीं तोफांचा मारा करून तटबंदी पाडून आंत प्रवेश करून किल्ला घेतला. त्यावेळींही मोठी मारामारी होऊन उभयपक्षीं मोठें नुकसान झालें. उरण वरसोवें वगैरे टापू साष्टीखालीं होते ते ही इंग्रजांच्या हातीं लागले.

या बातम्या सखारामबापू व नाना फडणीस यांस कळल्या तेव्हां ते दादासाहेबांच्या मुकाबल्याकरितां तापी उतरून गेले होते हें पूर्वीं सांगितलेंच आहे. इंग्रजांशीं दादासाहेबांचें बोलणें सुरू असल्याची बातमी त्यांस होतीच. इंग्रजांची उपेक्षा करावी तर ते वसई घेऊन

जानेवारी आणखी बोरघांटाकडे फैलावा करितील याकरितां त्यांचा बंदोबस्त करावा व साष्टीही परत घेण्याची तजवीज कांहीं झाली तर पहावी या हेतूनें उभयतां कारभारी दादासाहेबांच्या पाठलागाचें काम हरीपंतावर सोंपवून परत पुण्यास आले होते.

दादासाहेब गुजराथेंत आल्यापासून त्यानीं इंग्रजांशीं तहाचें बोलणं

जारीनें पुनः सुरू केलें उभयपक्षीं वाटाघाट होण्यास बरेच दिवस गेले. त्या मुदतींत हरीपंताने निकड करून आपल्या फौजेची दाणादाण करूं नये ह्मणून त्याशीं सलोख्याच्या बोलण्याचा दादासाहेबानीं उगीच नाद लाविला होता. ही गोष्ट हरीपंतास कळत नव्हतीसें नाहीं. पण शिंदे होळकर आंतून परपक्षास सामील असल्यामुळें व दुसरे ही अनेक फितूर असल्यामुळें मनांतले मनांत चरफडून स्वस्थ राहाणें त्यास भाग पडलें होतें? शेवटीं दादासाहेब व इंग्रज यांमध्यें ता० ६ मार्च रोजीं तहाची याद ठरलीं त्या यादींत सोळा कलमें असून त्यांत मुख्य कलमें पुढें लिहिल्याप्रमाणें होतीं. इंग्रजानीं काळे व गोरे शिपाई व गोलंदाज कामाठी वगैरे तोफांसह असें एकंदर तीन हजार सैन्य दादासाहेबांच्या कुमके करितां पाठवून तें त्यांची गादीवर पुनः स्थापना होईपर्यंत त्यांजवळ ठेवावें. त्या सैन्याच्या खर्चाबद्दल दादासाहेबानीं त्यांस दरमहा दीड लाख रुपये द्यावें. या रकमेची नियमानें वेळचेवेळीं पोंच होत जावी यासाठीं तूर्त गुजराथेंतील चार तालुके त्यांच्या ताब्यांत द्यावें. आणि दादासाहेबांची स्थापना झाल्यावर आपली कुमक केल्याबद्दल बक्षीस ह्मणून त्यानीं साष्टी, वसई व गुजराथेंत आणखी कांहीं महाल मिळून सव्वा एकोणीस लक्ष रुपये उत्पन्नाचा मुलूख इंग्रजास कायमचा द्यावा! याप्रमाणें तह ठरला असें पक्कें झाल्यावर दादासाहेबांनीं हरीपंताजवळ अद्वातद्वा मागण्या सुरू केल्या व त्या कबूल करण्याबद्दल शिंदे होळकरांची पुनः मध्यस्थी होतीच! शेवटीं सलोख्याचें बोलणें न बनल्यामुळें लढाईवर गोष्ट आली व तींत मोड झाल्यामुळें दादासाहेब सुरतेस पळून गेले हें वर आलेंच आहे.

दादासाहेब सुरतेस जातात तों त्यांच्या कुमकेकरितां मुंबईहून तेथें फौज आली होतीच. ती व सुरत व भडोच येथील फौजेपैकीं कांहीं भाग मिळून काळे गोरे कवाइती तीन हजार माणूस व पंधरा वीस तोफा

सन १७७५ सालचीं वर्तमानें

असें सर्व सामान घेऊन दादासाहेब सुरतेहून खंबाइतास आले. इकडे, वामनराव पटवर्धन भावनगरापर्यंत दादासाहेबांचा पाठलाग करीत गेले होते ते श्रीमंत सुरतेस गेल्यावर काठेवाडांतच महिनाभर हिंडत होते हरीपंत फडके नडियादेकडे गोविंदराव गायकवाड वगैरे सरदारांच्या पाठलागाकरितां गेलें होते हें पूर्वीं सांगितलेंच आहे. त्या सरदारांत गोविंदरावाजवळ चार हजार व खंडेराव गायकवाडाजवळ दोन हजार अशी गायकवाडांची सहा हजार फौज असून शिवाय आबाजी महादेव, सदाशिव रामचंद्र, सखाराम हरी व मानाजी फाकडे यांजवळ दादासाहेबांची चार हजार फौज जरीपटक्यासुद्धां व बुनगें व जामदारखाना असें लटांबर होतें. हरीपंत जवळ आलेसें पाहून त्या सरदारानीं प्रथम जैतपुराकडे जाण्याचा निश्चय करून त्या रोंखानें दोन मजली कूच केलें परंतु पुढें झाडी फार असल्यामुळें मार्गीं निभाव होणार नाहींसें जाणून हरीपंतास सांगून पाठविलें
मार्च कीं दादासाहेबांचा पक्ष सोडून आपण तुह्मांकडे येतों, बोलणें केवळ वरकरणी असून हे सरदार दादासाहेब व इंग्रज येण्याची वाट पहात होते. त्या प्रमाणें ते खंबाइतास आल्याची बातमी कळतांच हरीपंतास चुकवून ते सरदार दादासाहेबांकडे गेले. एक खंडेराव गायकवाड मात्र हरीपंतास येऊन मिळाला. इंग्रजास घेऊन दादासाहेब आल्याची बातमी कळतांच वामनराव पटवर्धन काटेवाडांतून व फत्तेसिंगराव गायकवाड बडोद्याहून येऊन हरीपंतास मिळाले. या पूर्वींच हरीपंताच्या लष्करांतून महादजी शिंदे निरोप घेऊन गेले होते. तुकोजी होळकर थोड्याशा लोकानिशीं राहिले होते ते ही पुढें लवकरच परत माळव्यांत गेले.

गोविंदराव गायकवाड वगैरे सरदार येऊन मिळाल्यावर दादासाहेब इंग्रजासह खंबायतेंतून बाहेर पडून अहमदाबादेच्या रोंखें चालले. स्वार व पायदळ मिळून नवी फौज चाकरीस ठेवण्याचा त्यांचा उपक्रम चालूच

गुजराथची स्वांरी

होता. यामुळें लवकरच इंग्रजांखेरीज तीस हजार फौजेचा भरणा त्यांजवळ झाला. एवढ्या फौजेस रोजमुरा देण्याचें अवसान श्रीमंतास

एप्रिल

नसल्यामुळें ही एवढी थोर फौज दिवसेंदिवस अधिक अधिक बेदिल होतां होतां शेवटीं लढण्याच्या कामास अगदींच निरुपयोगी झाल्यानें लढाईचा सर्व बोजा इंग्रजांवरच पडत गेला. या फौजेचा मुकाबला घेण्याकरितां हरिपंताची तीस हजार फौज आली ती ही पोटास न मिळाल्यामुळें जवळ जवळ याच मासल्याची झाली होती. तथापि तींत सखारामबापू व नाना फडणीस यांचीं पथकें, पटवर्धन, रास्ते, पानशे व हुजरातचे कांहीं नामांकित पथकें अशी फौज अजमासें सतरा अठरा हजार पर्यंत विश्वासाची व बऱ्यापैकीं होती. मुख्यत्वें याच फौजेच्या बळावर हरिपंतानीं इंग्रज व दादासाहेब यांशीं गांठ घातली. इंग्रजी फौजेवर मुख्य सरदार कर्नल किटिंग ह्मणून होता त्यास आपले लोक ' किटण ' ह्मणत. तो चांगला शूर व हुशार अमलदार होता. त्यानें मराठे आंगावर चालून आले ह्मणजे वाटेंत थांबून तोफांच्या भडिमारानें त्यांस हुसकून लावावें व पुनः वाट चालूं लागावें असा क्रम ठेविला होता. दादासाहेबांजवळ तोफा नव्हत्या व शत्रूचा हल्ला आला असतां तो सोसण्याची त्यांच्या फौजेंत कुवत नव्हती आणि बरोबर बाजार बुनगें व अवजड सामान मात्र फार होतें. त्या करितां वाट चालतां चालतां इंग्रजांस आपला बचाव करून शिवाय दादासाहेबांची पिछाडी व बगला यांचें ही रक्षण करावें लागत असे! हरीपंताची फौज सहसा इंग्रजांचे वाटेस जात नसे. मुख्यत्वें दादासाहेबांच्या फौजेस बेजार करण्याकडे तिचा मुख्य कटाक्ष असे. दोन चार वेळां हरीपंतानीं तोफा लाविल्या त्या सुद्धां दादासाहेबांच्या फौजेवर व मुख्यत्वें दादासाहेब ज्या जाग्यावर असत त्या जाग्याची शिस्त धरून! इंग्रज दररोज दोन तीन कोस चालत. मराठे एखादे दिवशीं त्यांच्या दृष्टीस पडत,

एखादे दिवशीं न पडत! इंग्रजांचें कवाइती पायदळ थोडेंच होतें तरी तें फारच चांगलें होतें व तोफांचा सरंजाम ही उत्कृष्ठ प्रकारचा होता. त्या धमकेवर हरीपंताच्या फौजेनें एकदम आपणास येऊन बिलगावें व आपण तोफांचा व बंदुकांचा मनस्वी मारा करून शत्रूचें एकदम पांच चार हजार घोडें माणूस जायां करावें अशी इंग्रजांस मोठी हौस होती. पण मराठ्यांची ह्मणून कांहीं कवाईत होतीच! ज्या धंद्यांत शत्रूची चार पैसे किमतीची दारू गोळी खर्च व्हावी आणि त्या बरोबर आपला मात्र हजार दोन हजारांचा घोडा ठार व्हावा, अशा धंद्यांत कांहीं लाग साधण्या जोगा असल्या खेरीज ते आपण होऊन कशास पडतील? आपणा देखत शत्रूनें दररोज दोन चार कोसांची सुरक्षितपणानें मजल मारणें ह्मणजे कांहीं आपला पराजय करणें नव्हे! जेथपर्यंत आपण घोड्यावर स्वार आहों तेथपर्यंत आपणास गांठून लढाईस उभे राहण्याचें भाग पाडणें हें कांहीं पायदळाच्या हातून होणें शक्य नाहीं. लढाई करणें न करणें हें केव्हांही आपल्या हातांतच राहणार. मग वेळीं अवेळीं लगट करून उगीच आपले घोडें माणूस जायां करून घ्यावें यांत काय तात्पर्य आहे? या धोरणावर मराठी फौजेची वागणूक होती, पण कर्नल किटिंग यास हें चांगलेंस समजत होतें असें वाटत नाहीं. मराठे हल्ला करण्याचा आव मात्र घालितात पण तोफांचे पांच चार बार केल्याबरोबर पळून जातात त्या अर्थीं हे लोक अगदीं नामर्द आहेत अशी त्या चिमुकल्या इंग्रजी फौजेची समजूत झाली! ही समजूत इंग्रजांस एका प्रसंगीं चांगलीच भोंवली. हरीपंताच्या तोफा सुरू झाल्या ह्मणजे आपल्या फौजेची फार नासाडी होत्ये याकरितां कसेंही करून या उपद्रवापासून इंग्रजांनीं माझा बचाव करावा असें दादासाहेबांनीं सांगितल्यावरून कर्नल किटिंग यानें त्यांस आश्वासन दिलें होतें कीं, यापुढें जर हरीपंत लढाईत तोफा लागू करील तर मी त्या तोफा तत्काळ हल्ला करून

हिसकून घेऊन तुमच्या हवाली करीन! कबुल केल्याप्रमाणें करून दाखविण्याची संधी ही त्यास लवकरच आली!

ता० १८ मे रोजीं इंग्रज व दादासाहेब नापार येथून निघून मही नदीच्या रोखानें कूच करून चालले असतां सुमारें एक कोसावर जातात न जातात तों त्यांच्या पिछाडीवर एका झाडींतून तोफांचा भडिमार सुरू झाला. हें पहातांच कर्नल किटिंग यानें लष्कर थांबवून आपल्या तोफा आणवून मारा केला व मराठ्यांच्या तोफा बंद पाडल्या. त्या तोफा ते काढून नेत असतां इंग्रजांची एक टोळी व दादासाहेबांकडील कांहीं आरब व सिंधी लोक तोफा घेण्यासाठीं चालून आले. त्यांवर पांच चार हजार मराठ्यांनीं निकरानें एक दोन हल्ले करून त्यांची दाणादाण केली व बहुत माणसें कापून काढिलीं. त्या समयीं मराठे लगट करून इंग्रजांचें लष्कर जेथें होतें तेथपर्यंत मारामार करीत गेले. दोन तोफाही त्यांनीं घेतल्या परंतु त्या नेता येईनात ह्मणून कान्यांतून खिळे मारून निरुपयोगी करून टाकून दिल्या. इतक्यांत इंग्रजांनीं सांवर खाऊन बंदुकांचा व तोफांचा पराकाष्ठेचा मारा केला व मराठ्यास हुसकून लाविलें. या लढाईंत इंग्रजांचें तीनशेंपर्यंत माणूस ठार व जखमी झालें. त्यांत चांगले चांगले गोरे आफीसर व सोजिर ही बरेंच मारिले गेले त्यामुळें ही हानि इंग्रजास फारच जड भासली. दादासाहेबांकडील माणूस मारिलें गेलें त्यांत आरबच पुष्कळ होतें. हरीपंताकडील बाजूचेंही नुकसान बहुत झालें. या लढाईंत हरीपंताकडील प्रमुख सरदारांपैकीं जखमी व ठार झालेल्यांची संख्या बरीच होती व त्यावरून फार निकराची लढाई झाली असावी असें वाटतें. कारण कीं, मालोजी घोरपडे मुधोळकर यांस पांच जखमा लागल्या त्यांत एक गोळीची व एक तरवारीची अशा जबर होत्या. त्यांचे बंधु राणोजी घोरपडे ठार झाले व त्यांच्या त्या चिमुकल्या पथकांत आणखीही घोडें

माणूस दहा पांच ठार झालें. त्या लढाईंत मालोजी घोरपड्यांस व त्यांच्या घोड्यास मिळून बेवीस जखमा लागल्या होत्या ? ' मालोजी बावानीं आपल्या लौकिकाप्रमाणें शिपाईगिरी केली. ' जयवंतराव पानशे यांस गोळीची जबर जखम लागली. आनंदराव गोपाळ यांस गोळ्याचा धबका लागला व त्यांच्या पुत्रास दोन गोळ्या लागल्या. पटवर्धनांपैकीं नानोबा सुभेदार व बळवंतराव दीक्षित (दोघेही यादवाड घराण्यापैकीं) यांस तरवारीच्या व संगिनीच्या जखमा होत्या. सय्यद हुसेन ह्मणून एक उत्तम गोलंदाज या स्वारींत हरीपंताकडील तोफांवर अंमलदार होता तोही ठार पडला. तो आपल्या धंद्यांत फार प्रवीण असल्याबद्दल खुद्द कर्नल कीटिंगें यानें लिहिलें आहे. या नापारच्या लढाईंत एक चमत्कारिक गोष्ट घडली. शत्रूकडील लोक कोणचे व दादासाहेबांकडील कोणचे हें ओळखतां यावें ह्मणून इंग्रजानीं दादासाहेबांकडील स्वारांस ताकीद करवून त्यांजकडून आपापल्या पागोट्यांत झाडपाल्याचें तुरे खोंवविले होते. ही गोष्ट हरीपंताकडील लोकांस कळल्यावरून यानींही तसेच तुरे लावून इंग्रजांचे लष्करांत प्रवेश करून कत्तल केली. हे लोक जवळ गेले तेव्हां दादासाहेबांचा विश्वासू कारकून हरीपंत भिडे यास इंग्रजानीं विचारिलें कीं, हे लोक कोणाचें आहेत! त्यानें ही हे लोक मानाजी फांकडे किंवा सखाराम हरी परभु यांच्या टोळींपैकीं असतील असा चौकशी न करितां जबाब दिला. त्यामुळें इंग्रजानीं उपेक्षा केल्यावरून हरीपंत फडक्यांकडील त्या लोकांचा बराच लाग साधला! पण पुढें लढाई संपल्यावर दादासाहेबाकडील आरबानीं भिड्यानें विश्वासघात केला असें समजून त्याचे तुकडे तुकडे केले!

पावसाळा समीप आला व दादासाहेबांस बरोबर घेऊन पुण्यावर चालून जाण्याचें आपल्याच्यानें होत नाहीं असें पाहून कर्नल कीटिंग् भडोचेकडे जाऊं लागला. इंग्रज व दादासाहेब भडोचेस छावणीस राहतात

गुजराथची स्वारी

असें समजून हरीपंतानें ही बेत केला कीं, गणेशपंत बेहरे यांस अहमदाबादेच्या रक्षणा करितां दहा हजार फौजेसह त्या प्रांतीं छावणीस ठेवावें, रास्ते व नारोपंत केसकर यांस सुरत अठ्ठाविशींत छावणीस ठेवावें व बाकी फौजेसह आपण देशीं यावें. या प्रमाणें बेत होऊन दोंहींकडे दोन टोळ्या वर सांगितल्या प्रमाणें त्या त्या सरदारांबरोबर रवाना होऊन बाकीचें लष्कर बावापिराच्या घांटीं नर्मदेस उतार आहे तेथें येऊन नदी उतरून दक्षिण तीरास येऊं लागलें. बुणगे व बहुतेक अवजड सामान अलीकडे आलें

जून १० होतें व फौज नदी उतरत होती. इतक्यांत इंग्रज लहानलहान मचव्यांत लोक भरून भडोचेहून जलमार्गानें येऊन बुणग्यावर छापा घालावयास आले. परंतु वेळींच सावधपणा झाल्यामुळें बुणगें सुरक्षितपणें निघून दर मजल खानदेशांत आलें. घोडीं स्वारांबरोबर उत्तरतीरास व त्यांचीं जिनें वगैरे सामान बुणग्याबरोबर दक्षिणतीरास असें झाल्यामुळें व इंग्रजांनीं बावा पीराचा घांट रोखून ती वाट बंद केल्यामुळें हरीपतांची

जुलई. फौज मोठ्या अडचणींत पडली. मग ते उत्तरतीरानेंच सुमारें साठ कोस वर येऊन चोळी महेश्वराजवळ नर्मदा उतरून खानदेशांत कोंडाई बारीजवळ येऊन छावणीस राहिले.

हरीपंत फडके इकडे आल्यामुळें इंग्रज, दादासाहेब व गोविंदराव गायकवाड यांस गुजराथ मोकळी सांपडली. त्यानीं डभईचें ठाणें घेतलें व त्या प्रांतीं नर्मदेच्या उत्तर तीरास पेशव्यांचा मुलूख होता तितका बहुतेक घेतला. फत्तेसिंग गायकवाड एकटा इकडील पक्षाचा. त्याचा या तिघांबरोबर लढून कसा निभाव लागतो? इंग्रजांनीं दादासाहेबांस सल्ला दिला कीं बडोद्यावर चालून जावें. पण ही गोष्ट गोविंदरावाच्या मनास येईना. ही गायकवाडांची राजधानीची जागा एकदां इंग्रजांच्या हातीं गेल्यावर तेच बळकावून बसतील, मग ती आपणास कोठून मिळणार,

सन १७७९ सालचीं वर्तमानें

असा संशय आल्यामुळें गोविंदरावानें ही इंग्रजांची मसलत साफ नाकारिली इतक्यांत फत्तेसिंगांकडून इंग्रजांस निरोप आला कीं, दादासाहेबांचा व माझा समेट करून द्यावा. त्यांस पंतप्रधान समजून मी त्यांच्या आज्ञेंत वागण्यास कबूल आहें. मग इंग्रजांच्या मध्यस्थीनें दादासाहेबांचा व फत्तेसिंगाचा तह झाला त्यांत असें ठरलें कीं, फत्तेसिंगानें मामूल वहिवाटी प्रमाणें तीन हजार फौज पुण्यास चाकरीकरितां पाठवावयाची ती तिकडे न पाठवितां दादासाहेबांकडे पाठवावी. फत्तेसिंगानें दोन महिन्यानीं दादा साहेबांस सव्वीस लक्ष रुपये रोख द्यावे. मध्यस्थीच्या खटपटीबद्दल त्यानें इंग्रजास अडीच लक्षांचा मुलूख द्यावा. माधवराव पेशव्यांच्या कारकीर्दी पासून गायकवाडी मुलुखांपैकीं तीन लक्ष रुपये उत्पन्नाची जहागीर गोविंदरावाकरितां निराळी ठेविलेली होती व तिचा वसूल पेशव्यांच्या मार्फत गोविंदरावाकडे फत्तेसिंगास द्यावा लागत असे. पण तें कलम दादासाहेबानीं या तहांत माफ केलें व फत्तेसिंगास सांगितलें कीं ती जहागीर तुह्मींच खावी. आह्मी गोविंदरावास दक्षिणेंत दहा लक्षांची दुसरी जहागीर देऊं गोविंदरावानें वरकरणी रुकार या तहास दिला पण मनांतून ही गोष्ट त्यास अगदीं आवडली नाहीं. फत्तेसिंगानें तर वेळ मारून नेण्याकरितां तह केला. पुढें इंग्रजांच्या मार्फतीनें तो दादासाहेबांस भेटण्याकरितां आला. तों इकडे गोविंदराव बिथरून बडोदें प्रांतीं जाऊन गांव लुटूं लागला. फत्तेसिंगानें तहाच्या कलमाप्रमाणें गोविंदरावास वागावयास लावण्याविषयीं मध्यस्थ इंग्रज लोक यांस तगादा लाविला. त्यांनीं गोविंदरावाविषयीं दादासाहेबांजवळ तकरार केली. त्यांनीं ती मनावर न घेतां उलट गोविंदराव व आपण जाऊन बडोदें घ्यावें अशी मसलत केली! तेव्हां इंग्रजानीं फत्तेसिंगास बडोद्यांस लावून दिलें व आश्वासन दिलें कीं जर हे दोघे बडोदें घेण्यास येतील तर आपण तुह्मांस मदत करूं व यांची मसलत

ह्मणून पाडूं!

या पावसाळ्यांत दादासाहेबांचा सरदार अमीनसाहेब यानें अहमदाबादेकडे येऊन धामधूम आरंभिली होती पण तेथील सुभेदार आपाजी गणेश यानें खंडेराव गायकवाडाची मदत घेऊन या अमीनसाहेबास मोडून पिटून लाविलें. अमीनसाहेबानें गणेशपंत बेहेऱ्याचा पराजय केल्याचा व अहमदाबादेस वेढा घातल्याचा मजकूर ग्रांटडफनें लिहिला आहे त्यास प्रत्यंतर आमच्या पहाण्यांत आलें नाहीं.

या प्रमाणें दादासाहेब, इंग्रज व गायकवाड यांच्या गुजराथेंतील धामधुमी प्रकरणीं या सालीं जितकी हकीगत घडली तितकी येथपर्यंत सांगितली आहे. पण या मुदतींत मराठी साम्राज्यांत व इतरत्र फार महत्वाच्या घडामोडी होत होत्या त्याही येथें सांगणें जरूर आहे. या करितां त्या संक्षेपानें सांगण्याचा उपक्रम करितों.

बऱ्हाणपुरच्या मुक्कामीं सखारामबापू व नाना फडणीस यांचा निरोप घेऊन निजामअल्ली निघाला तो वऱ्हाड प्रांतीं चालला. इलिचपूरचा नबाब इस्मायलखान पठाण यानें १७७३च्या आगष्टांत मुधोजी भोसल्यांच्या मदतीनें पेशवे व मोंगल या दोघांच्या ही फौजांस धुडकावून लाविलें होतें सबब त्याचें पारिपत्य करण्याचें राहिलें आहे तें आतां करावें असें योजून वऱ्हाडप्रांतीं जातांच निजामअल्लीनें इलिचपुराभोंवतालचीं बहुतेक ठाणीं घेतलीं. या खेपेस त्याजवळ फौज चांगलीं व मुबलक असल्यामुळें इलिचपुरास वेढा घालावा असें त्याच्या मनांत आलें. इतक्यांत साबाजी भोंसले व मुधोजी भोसले यांची लढाई होऊन साबाजी मारला गेल्याचें नागपुराकडून वर्तमान आलें. त्या लढाईंत नारायणराव पेशव्यांचा खून करणाऱ्या गारद्यांच्या जमादारांपैकीं महमद इसफ हा दोन हजार गारद्यांसह मुधोजीच्या बाजूस लढत होता. या गारद्यांत साबाजीनें लढाऊ हत्ती

सन १७७५ सालचीं वर्तमानें

जानेवारी. घालून गारदी बहुतेक तुडवून मारून टाकिले व मोठा पराक्रम करून मुधोजीची फौज मोडून उधळून लाविली. त्या वेळीं धरपकड व कत्तल सुरू झाली: तींत मुधोजी सांपडत होता त्यास मारूं नये ह्मणून सांगण्याकरितां साबाजीनें आपला हत्ती पुढें आणिला तों इतक्यांत उलट मुधोजीनेंच जोडगोळीचें पिस्तुल साबाजीवर झाडून त्याचा प्राण घेतला. साबाजीचा फत्ते होऊन ही तिचा असा विपरीत परिणाम झाल्यामुळें राज्याचा अधिकार आयताच मुधोजीच्या हातीं आला व त्या प्रमाणें त्यानें अंमल बसविण्याची सुरुवात ही केली. आपल्या पक्षाचा पुढारी सरदार साबाजी मारला जाऊन त्याच्या जागीं दादासाहेबांच्या कृपेतला मुधोजी याचें वर्चस्व झालेलें सखारामबापू व नाना फडणीस यांस अर्थातच आवडलें नाहीं. त्यांनीं मुधोजीस तंबी देण्याविषयीं निजामअल्लीस लिहिलें. त्यानें ही चार रुपये चावण्याची व आपलें प्रस्थ वाढविण्याची ही उत्तम संधी आहे असें जाणून नागपुरावर स्वारी केली. मुधोजीचा दिवाण दिवाकरपंत हा साडेतीन शहाण्यापैकीं होता. त्यानें सल्ला दिल्यावरून मुधोजीनें निजामअल्लीस बारा लक्ष रुपये देऊन त्याशीं समेट केला. मुधोजीचा मुलगा रघोजी यास जानोजी भोसल्याची बायको दर्याबाई हिनें दत्तक घेतलें होतें व त्यासच दादासाहेबानीं सेनासाहेब सुभ्याचीं वस्त्रें देऊन मुधोजीस त्याचा पालक नेमिलें होतें. मध्यंतरी बारभाईनीं साबाजीस वस्त्रें देऊन मुधोजीशीं भांडण्याकरितां त्यास उभें केलें होतें. पण तो आतां मारला गेला त्या अर्थी पुन: पूर्वीप्रमाणें रघोजीच्या नावें सेनासाहेबसुभ्याचीं वस्त्रें द्यावीं ह्मणून मुधोजीनें निजामअल्लीमार्फत नानाफडणीस व सखारामबापू यांस विनंति केली व पुन: आपण दादासाहेबांच्या बाजूस वळणार नाहीं, नेहमीं पुणें दरबार सांगेल त्याप्रमाणें वागत जाऊं असें इमान प्रमाण दिलें. त्यावरून उभयतां कारभाऱ्यानीं रघोजीस वस्त्रें दिलीं.

सन १७७९ मधील वर्तमानें

मे नागपुरास असतां निजामअल्लीनें मुधोजीस सांगून पाठविलें कीं, तुमच्या लष्करांत माजी पेशव्यांचा खून करणारा गारदी महमद इसफ आहे त्याचें पारिपत्य करण्यासाठीं त्यास आमच्या हवालीं करावें. परंतु मुधोजीनें रदबदली केली कीं, आजपर्यंत तो आमच्या आश्रयास होता याकरितां त्यास हवालीं करण्यांत आम्हांवर अपेश येतें. त्यास एवढ्या वेळे पुरतें निवदान द्यावें. आह्मी त्यास घालवून देतो. या प्रमाणें सांगून मुधोजीनें सदरहू गारदी यास आपल्या राज्यांतून घालवून दिलें.

या प्रमाणें तिकडील कारभार आटपल्यावर निजामअल्ली औरंगाबादेस आला. येथें आपणास नेहमीं तुमच्या कामाकरितां फौजेसह छावणी करून राहिलें पाहिजे; शेजारीं दौलताबाद किल्ला तुमच्या ताब्यांत आहे तेथील माणसांशीं आमच्या माणसांच्या हरहमेशा गांठी पडून

जून कलागती होणार हें चांगलें नाहीं; या करितां तो किल्ला आह्मांस द्यावा; असा निजामअल्लीनें आग्रह धरिल्यावरून सखाराम बापू व नाना फडणीस यानीं त्याचें ह्मणणें मान्य केलें.

या सालास प्रारंभ होण्यापूर्वींच करवीरच्या महाराजांची व इचलकरंजीकरांची कांहीं क्षुल्लक प्रकरणावरून धुसफुस सुरू होऊन हातघाईवर पल्ला आला होता. उभयपक्षीं लढाईची तयारी ज्यारीनें सुरू झाली; तेव्हां इचलकरंजीकरांचे पटवर्धन उपाध्ये असल्यामुळें व यांचें घराणें त्यांच्याच आश्रयानें ऊर्जितावस्थेस आलेलें असल्यामुळे यानीं त्यांस उत्तम रीतीनें साहाय्य केलें. त्या मुळें करवीरकरांस क्रोध येऊन त्यानीं इचलकरंजीस वेढा घातला व पटवर्धनांचे ही कांहीं गांव लुटलें. ती ओरड पुरंदरास जातांच उभयता कारभारी यानीं करवीरकरांस निषेध

एप्रिल पूर्वक पत्र लिहिलें व निरोप ही पाठविले. पूर्वींपासून सखारामबापूचें करवीरच्या महाराजांकडे चांगलें सूत्र असल्यामुळें त्यांस स्वदस्तुरचें चांगलें सणसणीत पत्र लिहिलें होतें व हें पत्र पहातांच

करवीरकरांचा दगा

करवीरकर स्वस्थ होतील असा त्यांस भ्रम होता. पण या वेळीं पुणें दरबारचें सर्व लक्ष्य व सामर्थ्य इंग्रज व दादासाहेब यांचा मोड करण्याकडे गुंतलें होतें, निजामअल्ली व नागपूरकर यांशीं पुणें दरबारचा सलोखा डळमळीतच होता व शिंदे होळकर सुद्धां त्या दरबाराशीं तूर्त फटकूनच होते. हैदरअल्ली ही आपला डाव साधण्याचा लाग पहात होता. अशा स्थितींत आपलें पारिपत्य करण्याचें सामर्थ्य पुणें दरबारांत तूर्त तरी नाहीं हें करवीरकर जाणत असल्यामुळें त्यानीं कारभाऱ्यांच्या पत्रांस व निरोपांस न जुमानतां उलट पेशव्यांच्या मुलखास उपद्रव देण्याची सुरुवात केली.

स० १७७४ च्या जून पासून कित्तूरकर देसायाचा दंगा सुरू झाला. प्रथम प्रथम त्याचा उपद्रव थोडा असल्यामुळें त्याची क्षुल्लक पाळेगारांत गणना होऊन उपेक्षा झाली. असें होतां होतां तो शेवटीं फार प्रबळ होऊन त्यानें हल्लीं बेळगांव व धारवाड जिल्ह्याखालीं असलेल्या मुलखापैकीं बराच मुलख लुटून फस्त केला. त्यानें नवलगुंद तालुका घेतला, कलवटगींत ठाणें बसविलें, धारवाड व गदग यांवर येण्याची आवई घातली. धारवाडच्या मामलेदाराचा पराजय करून त्याच्या तोफा हिसकून घेतल्या व इकडे गोकाके पर्यंत ठाणीं बहुतेक घेतलीं. पंधरा हजार पायदळ, दीड हजार स्वार, शिवाय कांहीं तोफा इतकें सामान त्यानें जमविलें होतें व हैदरअल्ली, करवीरकर महाराज व शंकराजी घोरपडे मुधोळकर या तिघांकडे ही त्यानें सूत्र बांधिलें होतें. सारांश लुंग्यासुंग्या फौजेस दाद देणारा तो आतां नव्हता व त्याच्या पारिपत्याची जरूरीनें व काळजीपूर्वक तरतूद करणें आतां प्राप्त झालें होतें.

करवीरकर व कित्तूरकर या उभयतांचा ही बंदोबस्त करण्याच्या कामावर कारभाऱ्यानीं पांच हजार फौज देऊन कोन्हेरराव पटवर्धन यास पाठविलें, व मागून त्याच्या मदतीस दीड दोन हजार फौज देऊन रामचंद्र गणेश कानडे व कृष्णराव पानशे यांची रवानगी केली. हे तिघे ही

सरदार शूर व अनुभवी होते व त्यां बरोबरची फौज ही प्रस्तुतच्या कामगिरीच्या मानानें भरपूर पुरेशी होती. परंतु एवढ्या फौजेस पोटाकरितां दर आठवड्यास रोजमुरा दिला पाहिजे तो देण्यास कारभाऱ्यांजवळ पैका नव्हता. यामुळें एक दोन आठवडे रोजमुरा देण्यांत थोडी कसूर होतांच ही फौज बेदिल व बेभरंवशाची होऊन तिची दशा गुजराथेंत हरिपंताबरोबर फौज होती ती प्रमाणेंच किंबहुना तिजपेक्षांही वाईट झाली. कारण त्या फौजेंत हरिपंत, वामनराव, परशुरामभाऊ, तुकाजी होळकर, महादजी शिंदे हे सरदार होते व यां पैकीं प्रत्येक जणाच्या अंगीं कशाही स्थितींत आपल्या सैन्याचा बोज राखून शत्रूवर दरारा ठेवून देण्याची अक्कल होती व यामुळें त्या फौजेचें व्यंग फारसे दृष्टोत्पत्तीस आलें नाहीं. परंतु या फौजेंत कोन्हेरराव व त्यांचे सोबती शूर व अनुभवी होते तरी फक्त कोणाच्या तरी हाताखालीं काम उत्तमरीतीनें करण्याच्या लायखीचे होते. एखाद्या मुलुखगिरींत मुख्य अधिकाराच्या जबाबदारीचा बोजा उचलण्याचें त्यांच्या अंगीं शहाणपण नव्हतें. त्यांचें आपसांत एकमत नसल्यामुळें कोणच्याही मसलतीवर एकदम सर्व फौजेचें बळ पाडून नेटानें झटून ती मसलत पार पाडणें शेवटपर्यंत झालेंच नाहीं.

कारभाऱ्यानीं कोन्हेररावास निघतानांच सांगितलें होतें कीं करवीरकरांशीं लढा फारसा वाढवावयाचा नाहीं. एक दोन लढायांत चांगली ठोकर लागली ह्मणजे ते ताळ्यावर येऊन तहास कबूल होतीलच. तसें झालें ह्मणजे इचलकरंजीकरांचा व करवीरकरांचा सलोखा करून द्यावा. दोघांसही दबावून सांगितलें ह्मणजे तंटा तुटेल. सरकारचे ही बारीक सारीक मुद्दे असतील ते करवीरकरांपासून उगवून घ्यावे. या प्रमाणें करवीरचें काम आटपल्यावर कित्तूरकरावर स्वारी करून त्या बंडाचा बीमोड करून टाकावा.

कोन्हेरराव मिरजेस आल्यावर तेथें पांडुरंगराव पटवर्धन सुमारें एक हजार

स्वार व तितकेंच पायदळ जमवून त्याची वाट पहात बसला होता तो त्यास मिळाला. नंतर कोन्हेरराव इचलकरंजीजवळ करवीरकराची फौज तळ देऊन राहिली होती तिजवर चालून गेला. तेथें बरीच लढाई होऊ-
न करवीरकरांचा मोड झाला व त्यांची फौज पळून गेली.
जून ही लढाई झाल्यावर तिसरें दिवशीं पुनः कोन्हेररावानें करवीर-
करांशीं गांठ घातली. पण या खेपेस ते आसऱ्याची बळकट जागा धरून बसले होते यामुळें कोन्हेररावाचा विशेष काट चालला नाहीं व त्यास मागें हटावें लागलें. तितक्यांत संधि पाहून करवीरकरांची फौज तेथून निसटून कोल्हापुरच्या आसऱ्यास जाऊन बसली. तेथपर्यंत जाऊन तिजवर हल्ला करण्याचें कोन्हेररावाच्यानें होईना. सबब तो गांव लुटूं लागला व खंडणी गोळा करूं लागला. त्यानें आळत्याचें ठाणें घेतलें व शिरोळास वेढा घातला. इतक्यांत एके रात्रीं करवीकरांची फौज अकस्मात् येऊन तिनें पटवर्धनांच्या फौजेस न जुमानतां त्या ठाण्यांत दारूगोळी वगैरे सामान व नवे लोक आणून घातले; व जातां जातां तोफांचे गोळे मारमारून पटवर्धनांस आपला तळ हालविणें भाग पाडलें! दुसरें दिवशीं शिरोळचे मोर्चे उठले व पांडुरंगराव आपली फौज घेऊन मिरजेस परत आला! करवीरकरांची फौज जरी फक्त तीन साडेतीन हजार होती तरी ती एक जुटीची होती यामुळें तिनें पटवर्धनांची फौज दुपटीपेक्षां अधिक असतां
ही तिची याप्रमाणें फटफजिती केली! याप्रमाणें ही लढाई
जुलई ५ रेंगाळत चालली. नाना फडणीस ह्मणत कीं हुजरून पांचशें
स्वार आले तर आपण करवीरकरांचा सहज बंदोबस्त करूं असें पांडुरंगरावांचें प्रथमचें ह्मणणें होतें. पांचशेंच्या जागी सात हजार स्वार, दीड दोन हजार पायदळ, शिवाय तोफा इतक्या सामानाची तरतूद केली असून ही करवीरकरांवर दरारा बसत नाहीं हा काय प्रकार आहे? यावर पांडुरंगराव व कोन्हेरराव हे उत्तर करीत कीं, मुख्य कारभारी सखा-

सन १७७५ मधील वर्तमानें

रामबापू हे करवीरकरांस आंतून अनुकूळ आहेत. आमच्या घराण्याशीं त्यांचें पुर्वीपासून वांकडें असल्यामुळें आह्मांस मोठ्या मसलतीवर नेमून तोंडघशीं पाडावें अशी त्यांची मसलत आहे व तीस अनुसरून हे त्यांचें खेळ चालले आहेत. हुजुरून फौज आली आहे तिजवरील सरदारांस तिकडूनच इशारा मिळालेला आहे व त्यामुळें आणीबाणीच्या वेळीं फौज मागें पाय घेत्ये यास आह्मी काय करावें?

करवीरकरानीं लढाई सुरू होण्यापूर्वींच पुरंदरास महादेवशास्त्री व आपाजी शामजी नांवाचे वकील पाठविले होते. लढयाचीं जीं कलमें होतीं त्यामध्यें लढाईचा रंग जसा पालटेल त्या प्रमाणें हे वकील फेरबदल करीत! आपल्या प्रांतांत पेशव्यांची फार फौज जमून राज्याचा सत्यानास होत चालला, लढाईचा खर्च या पुढें आपणास झेंपणार नाहीं, थोडक्या सामानावर आपण बरीच करामत करून दाखविली इतकें यश तूर्त बस्स झालें, या पुढें पेशव्यांच्या कारभाऱ्यांस अधिक चिडीस घालण्यांत अर्थ नाहीं, या गोष्टी मनांत आणून करवीरकर तहास कबूल झाले. सरकारच्या लौकिकाप्रमाणें करवीरकरांचें पारिपत्य जरी कांहींच झालें
आगष्ट नव्हतें तरी कित्तूरकराचें बंड मोडण्याचें काम फार जरूरीचें असल्यामुळें कारभाऱ्यानीं ही कशीबशी तहाची याद ठरवून हें प्रकरण समेटून घेतलें.

नंतर कोन्हेरराव कित्तूरकरावर चालून गेला. गोकाकेपासून दीड कोसावर मालधनी येथें लढाई होऊन कित्तूरकराचा मोड होऊन तो मागें हटला. नंतर चार दिवसानीं दुसरी लढाई होऊन तींत ही
आगष्ट २२ त्याचा मोड होऊन फार नाश झाला- तेव्हां तो डोंगरझाडीचा आसरा धरून बसला, व समेटाच्या गोष्टी बोलूं लागला कोन्हेररावाच्या मनांत तह करावयाचा होता परंतु कित्तूरकरास हैदरखाना

कडून कुमक मिळण्याची फार आशा होती या मुळें तो तह ठरविण्याचें लांबणीवर टाकूं लागला. मग कोन्हेररावानें त्याचीं ठाणीं घेण्याचा उपक्रम झपाट्यानें सुरूं केला. त्याणें ता० १२ सप्तंबर पासून होंगल, देसनूर, वण्णूर, नागनूर, सगोली व आणखी किरकोळ दहा पांच ठाणीं दीड महिन्यांत घेतलीं. त्या मुदतींत धारवाड व कोपळ येथील मामलेदारानीं तिकडील प्रांतीं कित्तूरकरानें जीं जीं ठाणीं घेतलीं होतीं तीं तीं सर्व परत घेऊन पूर्वी प्रमाणें अंमल बसविला. या प्रमाणें चोंहोंकडून ताण बसून आपली फौज विसकटून घरोघर निघून गेली; कोन्हेररावाचा शह कित्तुरापासून पांच चार कोसांवर आला; हैदरखानाची फौज तुंगभद्रेवर आलेली असून ही तिचा उपयोग आपणास होत नाहीं; असें पहातांच कित्तूरच्या देसायाचा धीर सुटला व त्यानें शरण येऊन कोन्हेररवाशीं तह केला. धारवाड प्रांतास हैदरखानाच्या फौजेनें उपद्रव सुरूं केला असून हरिहर व होंगल हीं महत्वाचो ठाणीं तिनें काबीज केलीं होतीं व त्यामुळें तिकडे जाण्याविषयीं कारभाऱ्यांचा कोन्हेररावास तगादा होता व त्या करितां कित्तूरकराशीं तह करणें त्यास प्राप्त झालेंच होतें. यामुळें कित्तूरकराच्या अपराधाच्या मानानें पहातां त्याशीं अतिशय

अक्टोबर सवघड शर्तीवर तह ठरला. दोन लक्ष रुपये यंदांची खंडणी व मागील बाकी काय राहिली असेल ती सर्व चुकता करावी ही काय ती तहाची शर्त!

या नंतर कोन्हेरराव फौजेसह धारवाडाकडे कांहीं मजली जातो तोंच त्यास पुनः करवीर प्रांतीं परत येण्याविषयीं कारभाऱ्यांचा हुकूम गेला! पूर्वी करवीरकरांशीं तह ठरला होता त्यांत एक कलम असें होतें कीं, करवीरकर व इचलकर्जीकर या दोघानीं ही तत्काळ आपापल्या फौजांस निरोप द्यावा, परंतु उभयपक्षीं एकमेकांचा भरंवसा नसल्यामुळें फौजा

दूर झाल्या नाहींत. अर्थातच कांही तरी कळ काढून पुनः हातघाईवर येण्यास त्या तयारच होत्या. इचलकर्जीत अनूबाई घोरपडी होती ती बाळाजीविश्वनाथ पेशवे यांची कन्या. तिचा सासरा नारो महादेव यास प्रसिद्ध संताजी घोरपडे सेनापति कापशीकर यानीं पुत्र मानून इचलकर्जी संस्थान बक्षीस दिलें होतें. इचलकर्जी व त्या शेजारचीं कांहीं खेडीं व आजरें महाल व मिरज प्रांतीं व करवीर प्रांतीं देशमुखीचें उत्पन्न इतकें सर्व कापशीकरापासून नारो महादेव यांस मिळालें होतें. करवीरकरांचें ह्मणणें कीं ज्या अर्थीं कापशीकर सेनापति हे आमचे सरदार आहेत त्या अर्थीं त्यानीं दिलेली देणगी ती आह्मीच दिलेली आहे व त्याचा मोबदला इचल-कर्जीकरानीं आह्मास नोकरीच्या रूपानें दिला पाहिजे. शिवाय आमचे राज्यांतील देशमुखीचा ते उपभोग घेतात त्या अर्थीं इतर जमीदारांप्रमाणें त्यानीं ही आमचा ताबा कबूल केलाच पाहिजे. अनूबाईचा नवरा व्यंकटराव नारायण घोरपडे याचें ह्मणणें असें होतें कीं संताजी घोरपड्यानीं आह्मांस जें जें उत्पन्न दिलें होतें तें तें सर्व शाहु महाराजानीं पुनः पृथक् पृथक् सनदा पत्रें देऊन आह्मांस इनाम करून दिलें आहे. घोरपड्यानीं इनाम दिलें तेव्हां सातारा व करवीर या उभय राज्याच्या वांटण्या झालेल्या नव्हत्या व पुढें त्या झाल्या तेव्हां कृष्णावारणेचा तह झाला त्यांत उभय छत्रपतीनीं एकमेकांचीं इनामें निर्वेध चालवावीं असें कलमच आहे. आमची सरदारी सातारा राजमंडळाकडील आहे त्यांचे आह्मी ताबेदार आहों व त्यांची नोकरीही करीत आहों करवीरकरांशीं आह्मांस अर्थाअर्थी संबंध नाहीं. याप्रमाणें हें करवीरकरांचें व इचलकर्जीकरांचें भांडण पेशवाईच्या प्रारंभापासून सुरू असून अद्यापिही तसेंच चालू आहे. हल्लीं इंग्रजसरकारानें जरी बहुतेक अंशा करवीरकरांच्या तर्फेनें फैसला दिला आहे तरी या कामीं पूर्वींचे कागदपत्र व वहिवाट पाहून पूर्ण विचार करून

न्याय दिला गेला आहे असें ह्मणवत नाहीं. असो. व्यंकटराव घोरपडे यानीं बाजीराव बल्लाळ पेशव्यांच्या कारकीर्दींत गोवें प्रांतीं फिरंग्यावर स्वारी करून मोठा लौकिक मिळविला. ते वारल्यावर त्यांचे चिरंजीव नारायण-राव व्यंकटेश हेही नानासाहेब व भाऊसाहेब पेशवे यांच्या दक्षिणेंत व कर्नाटकांत ज्या ज्या स्वाऱ्या झाल्या त्यांत आपल्या फौजेसह हजर राहून चाकरी करीत. पुढें ते ही वारले व त्यांचे चिरंजीव ह्मणजे अन्नपूर्णा-बाईचे नातू व्यंकटराव नारायण यांच्या नांवें सरदारी झाली. त्यानीं ही चाकरीचा क्रम पूर्वींप्रमाणेंच चालविला. नुकतेंच जिचें वर्णन आह्मी केलें आहे त्या गुजराथच्या स्वारींत ही व्यंकटरावाचें पथक चाकरीस होतें. आजपर्यंत अनूबाईचें संस्थान आपल्या ताब्यांत आणण्यासाठीं व तिच्या वतन हक्कांत घालमेल करण्यासाठीं कोल्हापूरकरानीं वेळोवेळ यत्न केला परंतु तिला माहेरचें ह्मणजे पेशव्यांच्या घरचें बळ भक्कम असल्यामुळें तिनें करवीरकरांस कधींच जुमानलें नाहीं. हल्लीं पेशव्यांच्या राज्यावर चोंहों-कडून संकटें आलेलीं पाहून अनूबाईपासून बळजबरीनें संस्थान हिसकून घेण्याच्या इराद्यानें करवीरकरानीं फौजेच्या तयारीस सुरवात केली. पण बाजीराव व चिमाजी आपा यांच्या स्वभावापैकीं कांहीं प्रखरपणा त्यांची बहीण अनुबाई हिच्या स्वभावांतही होता व तो एवढ्या उतारवयांतही अजून कायमच होता. तिनें हिंमत धरून फौज चाकरीस ठेवण्याची सुरवात केली. सर्व पटवर्धन तिच्या अर्ध्या वचनांत होते व सखारामबापू व नाना फडणीस ही तिला पूज्य मानीत असत. त्यांनीं तिच्या मदतीक-रितां कोन्हेररावास फौज देऊन पाठविलें. त्यानें पांडुरंगरावाची मदत घेऊन लढाया केल्या त्यांचा परिणाम काय झाला हें वर आलेंच आहे. शेवटीं तह ठरला त्यानें बाईचें समाधान झालें नाहीं व करवीरकर तर तो मोडण्यास संधी पहातच होते. अनुबाईचा अभिमान धरल्यामुळें पटवर्ध-

नांचा करवीरकरांशीं उगीचच्या उगीच द्वेष वाढत चालला. करवीरचे महाराजांशीं सर्व पेशवे सेवकाच्या नात्यानें व मर्यादेनें पत्र व्यवहार करीत व सखारामबापू व नाना फडणीस हेही याच पद्धतीनें लिहीत. परंतु पांडुरंगराव व कोन्हेरराव हे महाराजांस पत्रें पाठवीत त्यांत त्यांस उद्देशून 'स्वामी' 'धणी' 'छत्रपती' ही पदें योजण्याचें काळजीपूर्वक टाळीत व फक्त 'महाराज' एवढेंच पद लिहिण्यांत आणीत! त्यांच्या लिहिण्याच्या शैलींत महाराजांविषयीं नम्रता व आदर जितका दिसून यावा तितका दिसून येत नसे. अशा बारीक बारीक गोष्टीमुळें पटवर्धन व कोल्हापुरकर यांमध्यें जो द्वेष उत्पन्न झाला तो पुढें पंचवीस वर्षें राज्यास भोंवला! कित्तूरकरांच्या बंडाचा बीमोड पेशव्यांच्या फौजेच्यानें झाला नाहीं हें पाहून करवीरकरांस आणखी चेव आला व त्याच सुमारास हैदर अल्लीकडूनही त्यांस उत्तेजन मिळाल्यामुळें त्यांचा दंगा पुनः सुरू झाला.

हैदरअल्लीनें दादासाहेबांचा पक्ष स्वीकारला होता व त्यांजकडून तुंगभद्रा व मलप्रभा या नद्यांमधील मुलूख दरसाल सहा लक्ष रुपये खंडणी देण्याच्या शर्तीवर मिळविला होता. परंतु हा मुलूख अद्यापि त्याच्या हातीं आला नव्हता. पटवर्धन, पेशवे व रास्ते यांजकडे मुख्यत्वें हा टापू होता उत्तरेकडे काय काय धामधुमी होतात इकडे त्याचें लक्ष्य होतें. संधि साधेल तेव्हां हा मुलूख घ्यावा व तेथपर्यंत आपल्या राज्याची बळकटी व अंतर्व्यवस्था करीत रहावें हें त्यानें धोरण धरिलें होतें. अदवानीचा नबाब व निजामअल्लीचा भाऊ बसालतजंग यानें बल्लारीस वेढा

नोवेंबर घातल्यामुळें तेथील संस्थानिकानें हैदराजवळ कुमक मागितली. त्यानें श्रीरंगपट्टणाहून पांच दिवसांत बल्लारीस येऊन बसालतजंगावर छापा घातला व त्या फौजेचा विध्वंस करून बसालतजंगापासून एक लाख होन घेऊन त्यास सोडून दिले आणि शेवटीं बल्लारीही आपणच

घेतली! पुणें दरबारास इंग्रजांवर जय मिळवितां आला नाहीं व करवीरकर व कित्तुरकर यांचे दंगे मोडण्यांत त्यांचे शैथिल्य दिसून आलें असें पाहून पेशव्यांचो कुरापत काढण्याचें त्यानें मनांत आणिलें व सात आठ हजार फौज धारवाड प्रांतावर स्वारी करण्यास पाठविली. तिनें हरिहर व हल्याळ हीं ठाणीं घेतल्याचें मागें लिहिलेंच आहे.

या सालीं नारो शंकर वारला. त्याचा मुलगा रघुपतराव यास सरदारिचीं वस्त्रें देतांना सरकारांत नजराणा घेण्यांत आला त्यांत पक्कें पावणें दोन मण सोनें व दहा लक्षांचें जवाहीर सरकारांत आलें.

सदाशिवराव भाऊसाहेबांचें नांव घेऊन कोणी तोतया मुलखांत दंगा करीत होता त्यास पकडून व त्याची चौकशी करून माधवराव पेशव्यानीं त्यास अहमदनगरच्या किल्ल्यांत कैदेंत ठेविलें ही हकिगत मागें (पृष्ठ १२९३।९४ येथें) दिलीच आहे. तो तोतया अजून कैदेंतच असून त्यास एक जागीं पुष्कळ दिवस न ठेवितां किल्ल्याकिल्ल्यावरून हिंडवीत असत. जून महिन्यांत निजामअल्लीस कारभाऱ्यांनीं दौलताबाद दिली तेव्हां तोतया तेथें होता. त्यास भलतेच जागीं ठेवावा तर या धामधुमीच्या दिवसांत दगा होऊन हें नवेंच खूळ उभें राहील असें जाणून कारभाऱ्यानीं त्यास मिरजेच्या किल्ल्यांत आणून ठेविलें ती जागा त्यांच्या विश्वासाची व बंदोबस्ताची होती. पण तोतया तेथें आल्याबराबर तो खरोखरीच भाऊसाहेब आहे असा ज्यांस भ्रम होता त्यांत चळवळ व चर्चा सुरू झाली. या मंडळींत प्रमुख अनूबाई घोरपडी व खुद्द पांडुरंगरावाचा चुलता भास्कर हरि व त्याचे मुलगे व इतरही कांहीं वजनदार मंडळी होती अनूबाईचा उलाढाली स्वभाव पांडुरंगरावास माहीत होता व घरांतल्या

घरांत असल्या महत्वाच्या मुद्यावर मतभेद झालेला पाहून त्यास भय वाटलें. त्यानें कारभाऱ्यांस तगादा लाविला कीं हें तोतयाचें लचांड मिरजेंत नको. यास दुसरे कोठें ठेवावें. भाऊसाहेबांची स्त्री पार्वतीबाई क्षयाच्या व्यथेनें पुण्यांत अत्यवस्थ होती. या बाईस आपला नवरा कोठें तरी अद्यापि जिवंत असेल ही आशा होती व तिनें " सौभाग्यवती " हें उपपद सोडिलें नव्हतें त्या बाईनें पांडुरंगरावास पत्रांवर पत्रें पाठवून विनविलें कीं, तोतयास तूर्त मिरजेंतच ठेवावें त्याचा बंदोबस्त ठेवणें जरी खर्चाचें काम झालें आहे तरी मजवर दृष्टि देऊन मी जिवंत आहे तो त्यांस तेथेंच ठेवावें. परंतु पांडुरंगरावानें तें कांहीं एक न ऐकतां कारभाऱ्यांस फारच जिकीर करून तगादा लाविला तेव्हां त्यांनीं तोतयास मिरजेंतून काढून रत्नागिरीस पाठविलें.

अक्टोबर

शिंदे होळकरांनीं नाना प्रकारचे लपंडाव करून दादासाहेबांचें खूळ या थरास आणिलें. ते इंग्रजाकडे गेल्यावर तरी कारभाऱ्यांच्या पक्षास त्यांनीं झटून मदत करावी व मसलतींत पुढाकार घ्यावा तें ही केलें नाहीं. इंग्रजांची गांठ पडण्यापूर्वींच गुजराथेंत हरीपंतास सोडून शिंदे उज्जनीस आले. होळकर कांहीं दिवस थोड्याशा फौजनिशी होते ते असून नसून सारखेच होते. छावणी झाल्यावर ते ही इंदुरास गेले. पुढें मसलत कशी करावी, तजविजी कोणच्या योजाव्या, याची गोष्ट कोणीच काढीना ! मुख्यत्वें महादजी शिंद्यावर कारभाऱ्यांचा राग फार झाला होता व तो वाजवी होता हें कोणीही सांगेल. शिंद्यास साडे पासष्ट लक्ष रुपये उत्पन्नाचा मुलूख पेशव्यांनीं जहागीर दिला होता व त्याच्या उत्पन्नातून सरकारास कारण पडेल तेव्हां त्यानें फौज ठेवून चाकरी करावी व कारण न पडेल तेव्हां वसुलाचा भरणा सरकारांत करावा असा करार होता. एवढ्या जहागिरीच्या मानानें त्यानें वीस बत्तीस हजार फौज बाळगावी.

महादजी शिंद्याची लबाडी

परंतु गेल्या दोन वर्षांत त्यानें सात आठ हजारांपेक्षां अधिक फौज ही बाळगिली नाहीं व सरकारांत पैसाही दिला नाहीं! कारभारी जहागिरीच्या उत्पन्नाचे हिशेब मागूं लागले तेव्हां ते देण्यास त्यास अर्थातच तोंड नव्हतें तो टाळाटाळीचीं उत्तरें देऊं लागला. होळकरही त्याच्याच धोरणानें वागूं लागला. उत्तरें प्रत्युत्तरें होतां होतां हें भांडण विकोपास जाण्याचा रंग दिसू लागला. शिंद्याच्या मनांत अजूनही भुलथापा देऊन कालक्षेप करावयाचा होता. व त्याकरितां त्यानें बाळाराव नांवाचा वकील पुण्यास पाठविला होता. परंतु त्याचें बोलण्यांत बोलणें नसल्यामुळें कांहींच जम बसेना. नाना फडणीसांची समजूत काढावी ह्मणून शिंद्यानें
जुलई पांडुरंगराव पटवर्धनास मध्यस्थ होण्यास सांगितलें. परंतु नानानीं पांडुरंगरावास साफच जबाब दिला कीं, तुह्मी या मध्यस्थींत पडून परिणाम लागणार नाहीं. सर्व उपाय थकले तेव्हां शिंदे होळकरानीं जहागिरीचे हिशेब दाखविण्याचें व सवाई माधवराव यांची इमानपूर्वक मनापासून चाकरी करण्याचें कबूल केलें. हें भांडण सर्व हिंदुस्थानभर महशूर झालें होतें व त्याची समजूतही तितक्याच
अक्टोबर प्रसिद्धपणें व्हावयास पाहिजे होती. या करितां असें ठरलें कीं पुणें दरबारानें शिंदे होळकरांस आणण्याकरितां कारकून पाठवावे व त्या उभयतानीं फौजेसह दसरा झाल्यावर देशीं निघून यावें.

मागें दादासाहेब पळून गुजराथेंत गेले तेव्हां बरोबर आनंदीबाई होती ती गरोदर असल्यामुळें तिला पळण्याचे श्रम होईनात ह्मणून त्यानीं तिला धारच्या किल्ल्यांत ठेविलें होतें. तेथें ती पौष शुद्ध ९
जाने० १० स प्रसूत होऊन बाजीरावसाहेब जन्मास आले. बाईनें नाना-फडणिसास साखर पाठविली होती! परिणामीं गोड तें गोड! बाळंतपणांतून उठल्यावर तिनें भिल्ल व गारदी चाकरीस ठेवून दंगा कर-

ण्यास प्रारंभ केला. तिला शिंदे होळकर खर्चास पुरवितात

जुलई म्हणून पुण्यास ओरड सुरू झाली. उलटपक्षीं महादजी शिंद्यानें ओरड केली की, तुला शिंद्याची सरदारी देतों असें सांगून तिनें भगिरथराव शिंद्यास फितूर करून मजशीं भांडावयास उभें केलें आहे!

राज्यांत चोंहींकडे बंडें व धामधुमी सुरू झाल्या. नवीनही उपस्थित होऊं पहातच होत्या. शिवाय इंग्रजाशीं युद्ध सुरू होतेंच. मुलखांतून वसूल निर्वेधपणें येईना व जो वसूल येई तो फौजेच्या खर्चास पुरेना राज्यांतून अधिक पैसा वसूल करण्याकरितां कारभारी यानीं हक्क रसूम व दहकपटी हे एक वर्षापुरते नवीन कर यंदा बसवून वसूल घेतला. जमीन बाबीचा वसूल दर शेंकड्यास दहा रुपये जाजती घ्यावे; गांव गन्नाचे पाटील कुलकर्णी चौगुले शेट्ये महाजन यांच्या हक्क मुशाहिऱ्याचें उत्पन्न एक सालचें अजीबात घ्यावें. इनामदारांच्या इनामाचें एक सालचें उत्पन्न सर्व घ्यावें; सर्व सरदार, दरकदार, तैनातदार यांच्या तैनाता एक सालच्या घ्याव्या; वाणी उदमी वगैरे लोकांच्या प्राप्तीवर शेंकडा एक रुपया घ्यावा; याप्रमाणें या करांचें स्वरूप होतें. हे कर आपल्या रयतेवर न बसावे अशी पटवर्धनांची फार इच्छा होती पण नानाफडणिसानीं जिकिरीचीं पत्रें वारंवार लिहून सर्व पैसा वसूल केला.

जुन्नर, भीमा शंकर व त्रिंबकेश्वर यांच्या आसपास घांट बंधारीस कोळी लोकानीं कित्येक पहाडी किल्ले घेऊन फारच पुंडावा आरंभिला.

त्रिंबक सूर्याजी परभू हा दादासाहेबांचा अनुयायी फौज जमवून

नोवेंबर सप्तश्रृंगीचा डोंगर धरून बसला. त्याच्या दंग्यानें प्रांत ओस पडत चालला. हे दंगे मोडण्यासाठीं कारभारी यानीं करवीरच्या स्वारीतून रामचंद्र गणेश परत आला होता त्याबरोबर तीन हजार स्वार

व एक हजार गारदी देऊन त्यास रवाना केलें.

जमिनीवर ज्या प्रमाणें लढाई सुरू होती त्याप्रमाणें इंग्रजाशीं पाण्यांतही लढाई सुरू होतीच व तींत इंग्रजांची प्रथमपासूनच सरशी होती.

जानेवारी त्याच्या आरमारानें वसई बंदराचा बारा कित्येक महिनेपर्यंत अडविला होता परंतु त्यांस तेथून हाकून लावणें मराठी आरमाराच्यानें झालें नाहीं. उलटपक्षीं इंग्रजी आरमारच मराठी आरमार जेथें दृष्टीस पडेल तेथें त्याचा पाठलाग करीत असे. "पाण्यांतील कामास सांप्रत काळीं इंग्रज अधिक आहे" हें हरिपंत फडक्यानें सुद्धां कबूल केलें होतें. एकाप्रसंगी इंग्रजांच्या आरमारानें मराठी आरमाराचा पाठलाग कारितां करितां त्यापैकीं एका गलबतास गांठून लढाई करून त्याचा नाश केला तेव्हां त्यावरचे बहुतेक लोक प्राणास मुकले. या संबंधें ग्रांटडफ् लिहितो कीं, 'मराठ्यांची पांच गलबतें होतीं त्यांत तीन अनुक्रमें शेचाळीस, अडतीस व बत्तीस तोफांचीं होतीं व दोन तेवीस तेवीस तोफांचीं होतीं. इंग्रजांचीं गलबतें 'रिव्हेंज' व 'बांबे' नांवाचीं दोनच होतीं. मराठी आरमार दिसण्यांत प्रचंड होतें तरी इंग्रजी गलबतांस पाहिल्या बरोबर तें पळूं लागलें. तेव्हां इंग्रजी गलबतानीं निकड करून सर्वांत मोठें शेचाळीस तोफांचें 'समशेरजंग' नांवाचें गलबत होतें तें गांठिलें व त्यास लढाई करणें भाग पाडिलें. नंतर तीन तास लढाई होऊन समशेरजंग दारूस आग लागल्यामुळें जळून गेलें. त्या वरचा नाखुदा व बहुतेक लोक मेले व गलबताचा पूर्ण विध्वंस झाला. या संबधें पुरंदराहून पटवर्धनांच्या वकिलानें हकिगत लिहिली आहे ती अशी– "सरकारच्या एका पालाच्या पाठीस इंग्रजाकडील पाल लागले. निकड झाली तेव्हां आपल्याकडील लोकानीं बारुदखान्यास (दारुखान्यास) आग लावून जाळिला. त्यांच्या हातास लागूं दिला नाहीं. माणसें कांहीं आली. फार करून मेलीं."

प्रसंगाचें पर्यवसान दोंही वर्णनांत एकच आहे पण प्रसंग कसा व कां घडला या वर्णनांत मात्र तफावत आहे कारण कीं लढाईत यदृच्छेनें दारूस आग लागून गलबत जळणें व माणसें मरणें निराळें, आणि एका गलबतानें दोन गलबताशीं तीन तास निकरानें लढून शेवटीं सर्व उपाय थकले तेव्हां सरकारचें गलबत शत्रूच्या हातीं जाण्यापेक्षां जळून खाक झालें तरी बेहत्तर, त्या कामीं आपण सर्व मेलों तरी बेहत्तर, अशा राष्ट्राभिमानानें प्रेरित होऊन आपण होऊन दारूखान्यास आग लावणें व सर्वांनीं मरावयास तयार होणें हें अगदी निराळें आहे!

इतका वेळ पर्यंत निजामअल्ली, हैदरअल्ली, भोंसले, गायकवाड, शिंदे, होळकर, कोल्हापुरकर, कित्तूरकर इत्यादिकांच्या वागणुकीचा झोंक कसा होता हें सर्व वर्णन केलें. सुरापुरकराचा दंगा, साष्टीवर मराठ्यांची छोटीशी स्वारी व तेथून पिछेहाट, बुंदेलखंड प्रांतीं जाट व गोसावी यांचा दंगा व मोड, अशा कांहीं किरकोळ गोष्टी सांगावयाच्या राहिल्या तथापि त्या विशेष महत्वाच्या नव्हत. माधवराव पेशव्यांसारख्या पराक्रमी व कर्त्या माणसाची किंमत रयतेस यंदां चांगली कळली. ज्यानें यावें त्यानें रयतेस चोपावें, लुटावें व खुशाल चालतें व्हावें! माधवरावासारखे पेशवे राज्य सूत्रें चालवीत होते तेव्हां हेच निजाम व हैदर कसे वचकून साळसूदपणें वागत होते! हल्लीं कारभाऱ्यांशीं नानाप्रकारें लपंडाव खेळणारे हेच शिंदे होळकर त्या वेळीं कसे थर थर कांपत होते! कित्तूरकरासारखे क्षुद्र संस्थानिक यांची त्या वेळीं काय मगदूर कीं डोचकें वर काढितील! ही च ती दिग्विजय करण्यास समर्थ अशी मराठी फौज! हिची उस्तवारी ठेवणारा व हिजपासून काम घेणारा नायक नाहींसा झाल्यामुळें आंधळ्या हत्ती प्रमाणें हिची दशा होऊन हिचें प्रचंड शरीर व बळ हीं उपहासास मात्र पात्र झालीं! अशा प्रसंगी ज्यांशीं राजकारणें करून सख्य केलें ते परकीय राजे

आरमारची लढाई

रजवाडे भुलथापा देऊन, भेडसावून किंवा बळजबरी करून मराठी साम्रा- ज्याचे लचके तोडून घेण्यास मात्र टपलेले आहेत, ज्या सरदारांचा भरंवसा धरून कारस्थान उभारिलें तेच सरदार जिवें भावें मदत करावयाची सोडून साम्राज्याचें काय होईल याची फिकीर न करितां आपलाच तळीराम गार करून घेण्यांत गर्क झाले आहेत! घरीं दारीं, मुलखांत किंवा लष्करांत जिकडे पहावें तिकडे फितूर आणि विश्वास घात! जो येणार तो पैशासाठी हात पसरणार आणि तो पैसा तर कोठें दृष्टीस पडेना! अशी स्थिति डोळ्यांसमोर रात्रंदिवस उभी असतां कारभारी नाउमेद झाले यांत कांहीं आश्चर्य नाहीं. दादासाहेबांचें खूळ हें या सर्व अव्यवस्थेचें मूळ होतें हें खूळ मोडावयाचें तर दादासाहेब हातीं लागले पाहिजेत. दादासाहेबांनीं इंग्रजांचा आश्रय धरिला. इंग्रज तर बलिष्ठ व हरहुन्नरी शत्रु हें यंदांच्या लढाईत कळून चुकलें! इंग्रजाचा मोड होई पर्यंत वर्षानुवर्ष त्याशीं लढलेंच पाहिजे. पण तसें करितां करितां साम्राज्यावर आणखी एखादें अरिष्ट येऊन कोसळलें तर कशी गत होईल? या गोष्टी मनांत आल्यामुळें इंग्रजा- शीं सलोखा करून दादासाहेबांस स्वाधीन करून घेण्याचा यत्न करून पहावा असें कारभाऱ्यांच्या मनांत आलें. दोन तीन महिन्यापूर्वी आनंद- राव जिवाजी यांच्या मार्फत इंग्रजांचा निरोप कारभाऱ्यांस आला होता कीं, आम्हांस वीस लक्ष रुपये देऊन साष्टी तुमची तुम्ही परत घ्यावी, आणि दादासाहेबांस दोन किल्ले व पंधरा लक्षांची जहागीर देऊन त्यांची समजूत करावी. या प्रमाणें करावें असें त्या वेळीं कारभारी यांच्या मनांत नव्हतें, पण अलीकडे चोहोंकडून मसलत बिघडत चालली व गुजराथ इंग्रजांच्या हातीं लागल्ये असें झालें, त्यामुळें वर सांगितलेल्या शर्तीवर आपण सलोखा करण्यास कबूल आहों असें त्यानीं इंग्रजांस कळविलें. पण इंग्रजांचा या वेळीं वरपगडा असल्यामुळें कांहीं दिवस लढाई अशीच चालू राहिल्यास हेच कारभारी आणखी

जुलई

पुष्कळ द्रव्य व मुलूख देऊन तह करितील असें समजून इंग्रजांनीं कारभाऱ्यांचें ह्मणणें मान्य केलें नाहीं.

मुंबईच्या इंग्रजानीं दादासाहेबांचा पक्ष स्वीकारून ही लढाई सुरू केली होती व तींत एवढा वेळ पर्यंत त्यांची सरशी होती हें जरी खरें होतें तरी त्यांस ही पंचाईतच येऊन पडली होती. लढाई सुरू होण्या अगोदर दादासाहेबानीं मुंबईकर इंग्रजांची समजूत घातली होती कीं, मराठी राज्यांतील सर्व सरदार व प्रमुख लोक मला अनुकूल आहेत. तुह्मी मला घेऊन बाहेर पडा व कारभाऱ्यांच्या फौजेवर एक दोन जय मिळवा ह्मणजे सर्व सरदार मला येऊन मिळतील व स्वल्प आयासानें माझी गादीवर स्थापना होऊन तुह्मांस कराराप्रमाणें मुलूख व पैसा मिळेल. पण अलीकडे इंग्रजांच्या लक्ष्यांत येत चाललें कीं, शिंदे होळकर भोंसले वगैरे सरदार कारभाऱ्यांस अनुकूळ नाहींत हें खरें, पण दादासाहेबांस ही ते मुळींच अनुकूळ नाहींत! आपण जेथपर्यंत या मसलतीत आहों तेथपर्यंत दादासाहेबांस कोणी येऊन मिळत नाहींत. सर्व ओझें आपलें आपण च उचललें पाहिजे! आपल्या जबाबदारीवर मुंबईकरांनीं ही मसलत पतकरिली होती. हींत यश आलें तर ठीकच होतें. अपेश आलें तर मात्र कलकत्तेकरांकडून तंबी पोंचण्याची मोठी भीति होती. कारण त्यांच्या परवानगी खेरीज यांनी काडीमात्र हालचाल करूं नये असा विलायतेहून सक्त हुकूम नुकताच आला होता. आपल्या फौजेचा खर्च चालवून शिवाय दादासाहेबांचा खर्च मुंबईकरांस चालवावा लागत असे. पण त्यांजवळचा पैसा लवकरच संपला. त्यांचें सर्व उत्पन्न मराठी राज्याशीं मुंबईचा व्यापार चालत असे त्यावर अवलंबून होतें. हा व्यापार पुणें दरबारानें सक्तीनें बंद केला होता. पुण्याचे व्यापारी लाख पाऊण लाख रुपये नजराणा सरकारास देतो, आह्मांस मुंबईशीं व्यापार करूं द्या,

महमद युसफ

असें नानाफडणिसांस ह्मणत होते पण त्यांनीं तें मान्य केलें नाहीं!

गुजराथच्या स्वारीची फौज खानदेश प्रांतीं छावणी करून होती तिला त्या विश्रांतीच्या दिवसांत ही एक लहानशी कामगिरी आली. नारायणराव पेशव्यांचा खून करणाऱ्या गारद्यांपैकीं प्रमुख गारदी महमद यूसफ यास मुधोजी भोंसल्यानीं राज्यांतून घालवून दिल्यावर त्यानें तीन हजार पायदळ व हजार स्वार जमा करून नेमाड प्रांतीं लुटालूट सुरू केली. ती बातमी हरिपंत फडक्यांस कळतांच त्यांनीं हें बंड
जुलई मोडण्याकरितां आपा बळवंत, व परशुराम भाऊ, वामनराव पटवर्धन यांस पांच सात हजार फौजेसह रवाना केलें. महमद यूसफ शिवणीचें ठाणें बळकावून बसला होता तो ही फौज जातांच तेथून निघून जवळच चिखली ह्मणून ठाणें होतें तेथें जाऊन बसला. त्या ठाण्याच्या आसपास डोंगर व बिकट झाडी होती. या फौजेबरोबर तोफा नव्हत्या व अवघड डोंगराळ जाग्यांत स्वारांचा इलाज चालण्याजोगा नव्हता. या करितां अशीरगडाहून तोफा आणवून ही फौज त्या ठाण्यावर चालून गेली. तोफा आल्याची बातमी येतांच गारद्याचा
आगष्ट जमाव विस्कळीत होऊन तो पळून गेला. दहा वीस कोस पाठलाग केल्यावर दाट झाडी लागल्यामुळें पुढें जाण्याचा उपाय खुंटला व गारद्याची फौज दाणादाण होऊन चोंहोंकडे निघून गेली असल्यामुळें मुलखास उपद्रव देण्याचें अवसान त्याच्यांत राहिलें नाहीं, असें समजून ही पटवर्धनांशी वगैरे फौज परत आली. तिकडे तो महमद यूसफ गढे मंडळाकडे नर्मदा उतरावयास गेला असतां तेथील लोकानीं त्यास नदी उतरूं न देतां परत हुसकून लाविलें. तो परत शिवणीकडे येत असतां मुधोजी भोंसल्यानीं त्यास धरण्याकरितां लोक पाठविले होते त्यांची गांठ पडली व त्यानीं त्यास पकडून नागपुरास नेलें. महिना पंधरा दिवस

पूर्वी महमद यूसफ यानें मुधोजी भोंसल्यास सांगून पाठविलें होतें कीं, साबाजीस मारून मी तुह्मांस गादीवर बसविलें त्या अर्थी तुमच्या निम्मे राज्याचा खावंद मी आहे. असें असतां पेशव्यांची फौज मला धरावयास आली तेव्हां तुह्मी माझें साहाय्य केलें नाहीं हें ठीक नाहीं. दिवाकरपंत तुमचा दिवाण आहे त्याच्या सांगण्यावरून तुह्मी या प्रमाणें वागलांत. असो. दादासाहेबांचा बोलबाला झाल्यावर तुमच्या दिवाणाचें मी पारिपत्य करीन! असला हा मगरुरीचा निरोप कांनीं पडतांच भोंसल्यानीं लोक पाठवून त्यास वर सांगितल्याप्रमाणें कैद करून नागपुरास आणिलें. उभयतां कारभारी यानीं भोंसल्यास पत्रें पाठविलीं कीं, महमद युसफ यास आणण्याकरितां कारकून पाठविला आहे याच्या हवालीं त्यास करावें. त्यावरून भोंसल्यानीं गारदी पुण्याहून आलेल्या कारकुनाच्या हवालीं केला व त्यानें तो हरीपंताच्या लष्करांत आणून पोंचता केला.
नोवेंबर तेथें हरीपंतानीं त्याचे पांच पाट काढवून डोईस शेंदूर घालून गाढवावर बसवून लष्करांत चोंहींकडे हिंडवून डोक्यांत मेखसू घालून त्यास मारून टाकविलें.

पावसाळा संपतांच हरीपंतानीं सर्व फौज तयार करून गुजराथेंत जाण्याकरितां सोनगडच्या रोखें कूच केलें. दादासाहेब व इंग्रज यांजबरोबर चाललेल्या लढाई संबधें कारभारी जरी कांहींसे नाउमेद झाले होते तरी खुद्द हरीपंताची व पटवर्धन वगैरे सरदारांची नाउमेद बिलकुल झालेली नव्हती. यामुळें पावसाळ्यांत सामानाची दागदुजी व नवीन पुरवठा करावयाचा तो करून शिलेदारांस दीलभरंवसा देऊन त्यानीं फौज ताजीतवानी करण्याचा यत्न केला होता. परंतु कांहीं आठवडे गेले नाहींत तों पुण्याकडून रोजमुऱ्याचा पैसा येण्याचें बंद झाल्यामुळें पुनः फौजेची स्थिति गतवर्षी प्रमाणेंच झाली! पुण्याहून रोजमुऱ्याचा राहो,

पण नालबंदीचा पैसा सुद्धां यंदां येण्याची मुष्कील दिसते असें पहातांच हजारों शिलेदार घरोघर निघून आले. या सुमारास वामनराव पटवर्धन मृत्यु पावल्यामुळें सवाई माधवराव पेशव्यांच्या बाजूचा एक प्रमुख सरदार नाहींसा झाला. वामनराव शूर, तलख, मेहनती असा फार चांगला सरदार होता. तो पूर्वीपासून प्रकृतीने अशक्त व दम्याच्या अजारानें घेरलेला असे व त्यामुळें त्यास प्राय: घरींच बसून रहावें लागे. पण गोपाळराव मेल्यावर सरदारीचें ओझें त्याच्या डोक्यांवर पडलें तेव्हां त्यानें तें हिमतीनें पतकरिलें. त्याची कारकीर्द सुमारें पांचच वर्षांची झाली तरी तीं वर्षे केवढीं उलाढालीचीं व आणीबाणीच्या प्रसंगाचीं होतीं! रोगी ह्मटला ह्मणजे तो पथ्यापाण्यास जपून थंडी वाऱ्यास भिऊन आपल्या प्रकृतीचा तोल राखण्यांत चूर असावयाचा, पण वामनरावानें तर जिवाकडे न पहातां उन्हांत पावसांत रानांत जेव्हां व जेथें काम पडेल तेव्हां व तेथें फौजेसह निष्ठेनें सरकारी चाकरी करून दाखविली! जैनाबाद येथें आश्विन वद्यांत फौजेचा मुक्काम असतां त्याची प्रकृति बरीच

अक्टोबर

बिघडली व तेंच दुखणें विकोपास जाऊन तो कार्तिक शु० नवमीस मृत्यु पावला. त्याचे दोन भाऊ पांडुरंगराव व गंगाधरराव मिरजेस होते ते मुलकी कामास ठीक होते परंतु फौजेच्या कामांत वाकब नव्हते. सबब पांडुरंगराव याचे नांवें सरदारीचीं वस्त्रें झालीं तरी स्वाऱ्या शिकाऱ्या करण्याचें काम परशुरामभाऊकडे आलें व पटवर्धनांची सर्व फौज अर्थात त्याच्या हाताखालीं आली. मिरजेस राहून जहागिरीचा बंदोबस्त राखावा व मुलुखगिरीवर आपली फौज असेल तेव्हां तिला पैक्याचा व सामानाचा पुरवठा करावा हें काम पांडुरंगरावाकडे आलें. या कामास तो योग्य होता व गेलीं चार वर्षें त्यानें हें काम फार चांगलें चालविलें होतें. पण एवढ्यावर तृप्त न होतां आपण नांवांचे सरदार

आहों ते खरोखरीचे व्हावें अशी त्यास वासना झाली. लष्करी कामाचें सर्व कांहीं इंगित आपणास पूर्णपणें माहीत आहे असा त्यास भ्रम उत्पन्न झाला! त्या भ्रमाचा परिणाम किती वाईट झाला हें पुढें कळेलच.

निजामअल्लीचा दिवाण रुकनुद्दौला याचा पुणें दरबाराशीं माधवराव पेशव्यांच्या कारकीर्दीपासून मोठा स्नेह होता व त्याच्याच द्वारानें निजामअल्ली त्या दरबारास दादासाहेब प्रकरणीं अनुकूल झाला होता. गतवर्षी त्या दिवाणाच्या रदबदली वरून कारभाऱ्यांनीं नबाब निजामअल्लीस साडे बारा लक्ष रुपये उत्पन्नाचा मुलूख जहागीर ह्मणून दिला होता. त्याची शर्त हीच होती कीं नबाबानें नेहमीं अनुकूल असावें व फौजेचें साहित्य करीत असावें. त्याप्रमाणें गतवर्षी तो स्वतः व रुकनुद्दौला व इब्राहिमखान धौशा असे मोठ्या फौजेसह मराठ्यांस सामील झाले होते. यंदा असें ठरलें होतें कीं धौशाचा भाऊ जाबीतजंग यास दहा पंधरा हजार कवाइती पायदळ व तोफखाना बरोबर देऊन नबाबानें हरीपंताकडे रवाना करावें. परंतु इतक्यांत औरंगाबाद येथें रुकनुद्दौला गारद्यांशीं कांहीं कटकट होऊन मारला गेला. त्या नंतर दुसरा दिवाण न करितां दिवाणगिरीचेंही काम नबाब आपणच पाहूं लागला. त्यानें आयत्या नोव्हेंबर वेळीं कारभाऱ्यांस सांगून पाठविलें कीं, गतवर्षीं तुह्मी साडे बारा लाखांची जहागीर दिलीत तेव्हां ' कारभारी तीस लक्ष रुपयांची जहागीर तुह्मांस देणार आहेत ' असें रुकनुद्दौला मजशीं बोलला होता व त्याच भिस्तीवर मी जाबीतजंगास हरीपंताकडे पाठवितों असें बोललों होतों. त्याप्रमाणें साडे सतरा लक्षांचा मुलूख भरतीचा राहिला आहे तो आतांच्या आतां हवालीं कराल तर जाबीतजंगाच्या फौजेची तयारी होत्ये. नाहींतर होत नाहीं! इतकें बोलूनच तो राहिला नाहीं. त्यानें कारभाऱ्यांस भेडसावण्याकरितां भडोचेस दादासाहेब होते त्यांशीं सूत्र

लाविलें कीं, सवाई माधवराव ह्मणून जें मूल पेशवाईच्या गादीवर कारभा-ऱ्यांनीं बसविलें आहे तें गंगाबाईचेंच आहे किंवा कारभाऱ्यांनीं कांहीं तरी थोतांड केलें आहे हा मला संशय आहे. पुण्याच्या लोकांस दादासाहेबांचें नांवही उच्चारिलेलें खपत नाहीं. मग त्यांचे नूतन चिरंजीव बाजीराव यांची गोष्ट कशाला! वर्षोनवर्ष हे कलह माजून राज्य ओस पडत चाललें. ही पेशवाईची दैना माझ्यानें पहावत नाहीं. तर आतां तुमचें ही राहूं द्या आणि कारभाऱ्यांचें ही राहूं द्या. अमृतरावासच सर्वांनीं मिळून पेशवाई देऊं या, ह्मणजे साराच तंटा मिटला! हा कावा पहातांच कार-भारी गांगरून गेले व निजामअल्लीच्या मागण्याप्रमाणें मुलूख देण्यास कबूल झाले! त्यावर त्यानें त्यांस पुनः सांगून पाठविलें कीं, या साडे सतरा लक्षांच्या मुलखांत गाडापूर, वैजापूर, जालनापूर, पैठण, आंबेड, आवसें आंबें, अळंद, गुंजोटी हेंच परगणे दिलेत तर घेईन. हे परगणे सोईचे व सुपीक असून त्यांपैकीं कांहीं बिनीवाले व धायगुडे या सरदारास जहा-गीर होते, यामुळें हे द्यावयाचें कारभाऱ्यांच्या मनांत नव्हतें. पण काय करितात! नबाबास त्यांनीं हे महाल तत्काल दिले. विसाजीपंत बिनीवा-ले यांची कर्नाटकांत रवानगी होत होती. परंतु त्यांची जहागीरच गेल्या-मुळें ते अडून बसले. तिकडे नरसिंगराव धायगुडे हरीपंताच्या लष्करांत होते त्यांस आपली जहागीर मोंगलास दिल्याचें कळतांच ते क्रुद्ध होऊन कुचाचा नगारा करून देशीं निघून येण्यास सिद्ध झाले. परंतु हरीपंतांनीं दादा बाबा करून त्यांची कशी तरी समजूत काढून त्यांस तूर्तापुरतें राहून घेतलें.

इतकें होतें तों इंग्रजाशीं लढाई तूर्त तहकूब होण्याचा प्रसंग आला कलकत्यास वारन हेस्टिंग्स् गव्हर्नर जनरल होता. मुंबई व मद्रास येथील इंग्रजानीं परराज्याशीं तह किंवा लढाई करणें ती हेस्टिंग्स् याची

परवानगी घेऊन करावी व त्याच्या आज्ञेंत वागत जावें असा ईस्ट इंडिया कंपनीच्या मुख्य अधिकाऱ्यांचा नुकताच हुकूम झाला होता. परंतु तिकडे दुर्लक्ष्य करून मुंबईकरानीं आपल्याच अखत्यारांत दादासाहेबांस आश्रय देऊन पुणें दरबाराशीं लढाई सुरू केली. ही गोष्ट हेस्टिंग्स् यास न खपून त्यानें मुंबईकरांस लढाई बंद करण्याविषयीं सक्तीनें हुकूम केला व पुणें दरबारास पत्र लिहिलें कीं, मुंबईकरांस लढाई बंद करण्याचा हुकूम केला आहे त्याप्रमाणें ते वागतील. आपण ही लढाई बंद

नोवेंबर

करावी. आह्मी आपणाकडे वकील पाठवीत आहों. तो वकील जो तह ठरवील तो आह्मांस मान्य आहे. याप्रमाणें पत्र येतांच कारभाऱ्यानीं हरीपंतास पत्र पाठविलें कीं, तूर्त लढाई बंद झाली आहे, सबब तुह्मी गुजराथेंत न जातां सोनगडच्या सुमारें रहावें. सुरत व भडोच येथील इंग्रजांचें ही आह्मी दादासाहेबांस मदत करीत नाहीं त्यानीं व तुह्मी इच्छेस येईल तें करावें असें हरीपंतास पत्र आलें. त्या वरून हरीपंतानीं मुक्काम केला.

इंग्रज तह करणार, ते आपणास मदत करीत नाहींत, हें पक्कें माहीत असतां व जवळ विशेषशी फौज नसतां दादासाहेब भडोचेनजीक होते ते नर्मदा उतरून हरीपंताच्या रोखें तीन मजली आले. इतकें धारिष्ट त्यांस कशांमुळें आलें आहे हा हरीपंतास कयास होईना! इतक्यांत एक भयंकर गुप्त कारस्थान सहजगत्या उघडकीस आलें. गुदस्तां महीच्या लढाईंत दादासाहेबांचा मोड झाला तेव्हां इकडे पाडाव झालेल्या लोकांत गणेश विठ्ठल ह्मणून सरदार होता. त्यास हरीपंतानीं कैदेंतून मुक्त करून सन्मान करून तैनात करून देऊन जवळ बाळगिलें होतें. त्यानें बसून बसून लष्करांत फितूर केला! तो इतका कीं हरीपंताजवळ असणारे खिजमतगार सुद्धां त्यानें फितविले! त्या गणेश विठ्ठलानें इतक

केल्यावर दादासाहेबांस पत्र लिहिलें कीं, येथें हरीपंताची फौज फारशी नाहीं. आहे तो ही रोज पटकीनें शेंकडों माणसें मरत असल्यामुळें फि-किरींतच आहे. पटवर्धनांची फौज अद्यापि लांब मागेंच आहे. आह्मी येथें आपल्या पक्षास पुष्कळ लोक अनुकूल करून घेतले आहेत. आपण तावडतोब फौजेसह निघून यावें. आपण जवळ आलांत ह्मणजे हरीपंतास कैद करितों! हें पत्र जातांच दादासाहेब तीन मजली आले तों हा दुष्ट बेत उघडकीस आला. मग हरीपंतानी गणेश विठ्ठलास बिड्या ठोकून पट्टा किल्ल्यावर कैदेंत ठेविलें आणि दुसरे कोणी गुन्हेगार होते त्यांचीही पारिपत्यें केलीं. मसलत उघडकीस आली हें पहातांच दादासाहेब इंकडे येण्याचा रोख सोडून सुरतेपासून दहा कोसांवर गळाकांबळा ह्मणून स्थळ आहे तेथें जाऊन राहिले.

नंबर १४२९ श्री (ज्येष्ठ व०

जून दु० पंधरवडा.)

पुं॥ तीर्थस्वरूप मातोश्री बाई वडिलांचे सेवेशीं—

विज्ञापना. लष्करांतील वर्तमान तरी आज एक महिना झाला. ज्येष्ठ शु॥ १२ मंदवारी बावापीराचा घांट भडोजेपासून बारा कोसांवर आहे तेथें लष्कर नर्मदा उतरत होतें. फौज पलीकडे व बुनगें अलीकडे उतरून आलें होतें. इतक्यामध्यें अलीकडील कडेनें इंग्रजाची फौज आली व पाण्यातून गलबतें इंग्रज आला. पण गडबड न होऊन बुनगे अलीकडे होतें तें निभावोन आलें. नदीमध्यें होते ते मात्र गडबडोन आले. तेथून त्या दिवशीं निवून आले ते मार्गी पंधरा रोज सड्या फौजांची वाट पहात होते. कोठें बातमी नाहीं तेव्हां बुनगें झाडून देशास आलें. राजश्री मलबा बापू पानशे मात्र हजार दोन हजारानिशीं खानदेशांत माले-गावांवर होते. आठ रोज जाहले उपरांत चमेली महेश्वराच्या घांटें राजश्री हरीपंत तात्या उतरत येणार त्या सुमारें जाणार आहेत. आम्हा-कडील राजश्री दाद सावंत दोनशें स्वार बरोबर घेऊन सडे फौजेंत आहेत. बरकड बुनगें लोकांचें व लोक मिळून दोनशें व पागेचीं तट्टें होतीं तीं इकडे आलीं. राजश्री बाबाजीराव समागमेंच आलें. हें वर्तमान नानांच्या कानावर घातलें. आपणास कळावें. वरकड बारीक कार्यक्रम (?) तपशीलवार राजश्री जिवबा शिंदे ज़बानी सांगतील त्याजवरून निवेदन होईल. हे विज्ञापना.

---

१ हें पत्र व्यंकटराव नारायण घोरपडे इचलकरंजीकर यानीं आपली आजी अनूबाई हीस लिहिलेलें आहे. हें जून महिन्यांत लिहिलेलें असून येथें चुकून लागलें आहे.

नं० १४३०   श्री   (८ जानेवारी)

श्रीमंत राजश्री तात्यां स्वामीचे सेवेशीं.

पोष्य शिवाजी बाबाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल तागायत पौष शुद्ध सप्तमी भानुवासरे मुक्काम रावेर नजीक ब्ऱ्हाणपूर येथें स्वामीचे कृपेकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. पुरंधराहून उभयतां कारभारी निघोन फौजा समागमें साऱ्या जमा झाल्या. गंगातीरास आले. तेथून राजश्री हरीपंततात्या व आमचे यजमान व रास्ते येणें प्रमाणें (पुढें)रवाना झाले. तों होळकर व शिंदे यांचीं निकडीचीं पत्रें आलीं कीं " फौजा जलदीनें पाठवाव्या. श्रीमंत राजश्री दादासाहेब विसा कोसांचें कूच करून तापीवर गेले. आह्मी कूच करून पाठीवर जातों. सत्वर फौजा पाठवाव्या. " अशीं पत्रें वारंवार आलीं. नबाबाकडील धौंशा राजश्री हरीपंततात्यास सामील झालेच होते. त्यासुद्धां पुढें कासारबारी उतरोन गेले नंतर आपणाकडे पत्रें यजमानांनीं पाठविलीं ती जासूद जोडी आह्मांकडून आली. आह्मी पत्र आपणास लिहून दिलें आणि रवानगी केली. तीं पत्रें पावलींच असतील. अलीकडे राजश्री नारोपंत वझे यांचा फडशा करून निरोप दिला त्यांजबरोबर पत्रें पाठविलीं आहेत तीं पावलींच असतील. अलीकडील वर्तमान तर श्रीमंत सेंदव्याचे बारीनें नर्मदेवरी गेले. होळकर व शिंदे एक मजलीच्या अंतरानें पाठीवर गेले. आपल्याही फौजा लांब मजली करीत गेले. परंतु अंतर पहिलेंच फार पडलें, व धौंशाचें पाईचें माणूस व तोफा निभावल्या पाहिजेत, याजकरितां बारा कोसांच्या मजली करीत गेले. उभयतां कारभारी व नबाब कासारबारीअलीकडे एक जाहले. सहा कोसांच्या मजली करीत तापीवर आले. दरम्यान भेटी झाल्या. बोलणें चालणें निखालसपणाचें जाहलें.

---

१ पांडुरंगराव तात्या. २ पटवर्धन. ३ वाटेंत आह्मांस भेटून.

एक दोन मुक्काम तापीवर जाहले. तारेखेडें बडे यांजकडे पहिल्यापासून होतें. ते श्रीमंत राजश्री दादासाहेबांस सामील होऊन खरंगासिंग वगैरे यांस जागाजुगा दिली होती. याजकारितां सालगुदस्तां राजश्री हरीपंतताऱ्यानीं बऱ्हाणपुरावरून फौज तिकडे पाठविली होती परंतु कांहीं जाहलें नाहीं. गढी मजबूद. फौज उठोन आली. तापीवर थालनेराजवळ राहिले होते तेथून दोन मजलीवर तारखेडें होतें. याजकारितां फौज तोफा पाठविल्या आणि तिकडे कूच केलें. आणि दोन मजलीनीं तारेखेड्यास गेले तों फौज तोफा गेल्या होत्या. तोफा लागू जाहल्या. मागील शह मातबर. परिणाम नाहीं. राजश्री माधवराव बडे डोंगरांत भिल्लाच्या आसऱ्यास गेलेच होते. ठाण्यांत [लोक] होते त्यांनीं ठाणें टाकून पलायन केले. ठाण्याच्या बंदोबस्तास व --- राजश्री नाना फडणीस यांचे स्त्रीचें वर्तमान आलें, दोन तीन दिवस गुंता होता, --- मुक्काम जहाले. ठाण्याचा बंदोबस्त करून कूच करून थालनेराजवळ आले. सेंधव्याचे बारीनें नर्मदेवरी जावें तरीं साष्टीस इंग्रजानीं मोर्चे बसविले याजकरितां तिकडे फौजा रवाना झाल्या. व नर्मदेवरी गेल्यानें विशेष नाहीं, ते पुढें पळतात, पाठीवर मातबर फौजा गेल्याच आहेत, याजकारितां तिकडे जावयाचें महकूब करून तापीच्या पाण्यानें सहा कोसांच्या मजली करून (उभयतां कारभारी) येथें आले. आपल्या फौजा सेंधव्याच्या बारीनें गेल्या. नंतर मागाहून जाणारांस भिल्लांनीं उपद्रव दिला तो कळतांच मागाहून जाणार तमाम यांचे लष्करांत आले. तिकडून पार्थीचीं माणसें देखील त्या मार्गानें जात येत नाहींत. बारी पलीकडे गेल्यापासून यजमानांचें पत्र आह्मांस एकही आलें नाहीं. आह्मीं दोन चार पत्रें होळकर

---

१ नारायणरावसाहेबांचा खून करणाऱ्यांपैकीं एक प्रमुख गारदी.

व शिंदे यांजकडील कारभारी यांच्या सोईनें सरकारचें कागदपत्र गेले त्याजबरोबर पाठविलीं. परंतु पावल्याचें उत्तर आलें नाहीं. उत्तरें आल्यावरी सविस्तर लिहून पाठवितों, तिकडील वर्तमान तर श्रीमंत राजश्री दादासाहेब पवाराचे धारेस गेले. पवार ही समागमेंच होते. त्यास ठाणे मागोन घेऊन तेथें पायींचीं माणसें आपले जवळील ठेऊन बंदोबस्त करून श्रीमंत सौभाग्यवती मातुश्री आनंदीबाईस तेथें ठेविली आणि सडे जाहले. तों आपल्या फौजा नर्मदेवरी पावल्या. होळकर व शिंदे इंदूर व उज्जनीच्या दरम्यान गेले. यांजकडे पत्रें वारंवार आलीं कीं, सत्वर येणें. त्याजवरुन धौशास नर्मदेअलीकडे टाकून आपल्या फौजा पुढें उभयतां सरदारांच्या रोखें गेल्या. धौशा न गेला. राजश्री हरीपंत तात्याच्या ह्मटल्यावरूनच, परंतु नबाबास कळतांच धौशास पत्र पाठविलें कीं तुह्मांस नर्मदेवरी रहावयास कारण काय? सत्वर जाऊन सामील त्यास होणें. त्याजवरून नर्मदा उतरून (त्यानें) पलीकडे जावे तों आपल्या फौजा नर्मदेचा घांट चढोन गेल्या. होळकर व शिंदे यांचीं पत्रें वरचेवरी आलीं. गुरुजीहि त्यां समागमें होते त्यांचीं पत्रें आलीं. त्यावरून (हरीपंत) उभयतां सरदारांपाशीं गेले. भेटी जाहल्या. बोलणें चालणें निखालसपणें जाहलें. हें वर्तमान श्रीमंतांस कळतांच हिंदुस्थानचा रोख सोडून पायगड गुजराथचा रोख धरून कूच करून तिकडे गेले. त्यांचे पाठीवर आपल्या फौजा उभयतां सरदार मिळोन गेले. धौशानें मागाहून जावें तरी गांठ पडणार नाहीं याजकरितां इकडे येणें ह्मणून पत्रें यांचीं व नबाबाचीं जाणार. वाट चालत नाहीं याजकरिता आह्मांकडील व रास्ते व हुजरातीचे वगैरे दोन हजार फौज येथें तटली आहे. जासूद अथवा कागदपत्र दरोबस्त जात येत नाहीं. श्रीमंतानीं सुजाउद्दौलाकडे राजकारण केलें होतें व हैदरखानाकडे (त्यांचें) राजकारण तर पक्कें आहेच.

दुसरें राजकारण इंग्रजाकडील. साष्टीस मोर्चे लाविले हे त्याजवरूनच. साष्टीस सामानाचा पुरावा येथून चांगला केला होता परंतु सामान पोंहचे तों पूर्वीच साष्टी इंग्रजांनीं घेतली. भडोच व सुरत इंग्रजाकडे आहे तिकडे सूत्र आहेच. सुजाउद्दौला याकडे जावें तरी पल्ला लांब. याजकरितां तिकडील रोख सोडून इंग्रजांचे राजकारणावरून गुजराथेकडे आले. आपल्या फौजांस व त्यास चाळीस कोसांचें अंतर पडलें. आपल्या फौजां बरोबर तोफा आहेत. ते सडे आहेत. याजकारितां गांठ लवकर पडत नाहीं. गुजराथेंत गेले. पाठीवर फौजा गेल्या आहेत. गांठ पडेल तेंव्हां खरी! बडोद्यास राजश्री गोविंदराव गायकवाड आहेत त्यांजजवळ पांच सहा हजार फौज व चार हजार पायींचें माणूस येणेंप्रमाणें सामान त्यांजवळ आहे. त्यांचें सूत्र श्रीमंताकडे आहेच. भडोचेंत शिरतील किंवा सुरतेच्या आसऱ्यास जातील पहावें. हैदरखानाकडील पल्ला लांब, पोंहचणें होणार नाहीं, याजकरितां कर्नाटक व हिंदुस्थान दोन्ही पल्ले लांब ह्मणून टाकून इंग्रजाकडील राजकारण जवळ करून गुजराथेंत आले, या प्रकारचें वर्तमान. तिकडून तहकीक वर्तमान कागदपत्र आले ह्मणजे सविस्तर लिहून पाठवूं. साष्टी इंग्रजांच्या हातास गेली ही फारच वाईट गोष्ट जाहली. राजश्री साबाजी भोंसले नागपुरास आहेत. राजश्री मुधोजी भोंसले व इस्मायलखान येणेंप्रमाणें अलजपुरास आहेत. साबाजी भोंसले यांसीं लोकांनीं तलबेसाठीं गवगवा केला आहे. मुधोजी भोंसले याची फौज देऊळ घांटाकडे दोन तीन हजार आली आहे. घास दाण्याचा उपद्रव बीड व गंगथडी वगैरे प्रांतीं करावा असें [त्या फौजेचें धोरण] आहे. याजकरितां तहवारजंग रुकनुद्दौला यांचा भाऊ बीड गंगथडीकडे जाणार. त्याजसमागमें त्रिंबकराव शिवदेव यांचें पथक व पवार येणेंप्रमाणें देणार. नबाबाचें मानस आलजपुरास जावें आणि इस्मालखान याचें

पारिपत्य करावें असें आहे. एक दोन दिवसांत जावें न जावें याचा ठराव होईल. पावगडाकडे गुजराथेंत [श्रीमंत] गेले असें पुरतें जाहलें. कागदपत्र दुसरे आले ह्मणजे उभयतां फौजेसह गंगथडीच्या सुमारें माघारें जाणार असें आहे. दोन चार दिवसांत ठराव होईल तो मागाहून लिहून पाठवूं. हैदरखानाकडील मजकूर कसा आहे, काय वर्तमान, आपण वरचेवरी पत्रें पाठवावीं. तिकडील वर्तमान राजश्री नाना पुसत असतात. याजकरितां आठा चहूं रोजांत एक पत्र पाठवावें. पुरधराहून वरचेवरी श्रीमंत राजश्री पुरुषोत्तमराव दाजी आपणास लिहीतच असतील. राजश्री नारो आनंदराव दि॥ तोफखाना हे पांच हजार फौजेंनिशीं सरकारांतून राजश्री फत्तेसिंग गायकवाड याचे कुमकेस गेले. सोनगडानजीक गेले तेथेंच आहेत. पुढें जावें तो श्रीमंत तिकडे त्या रोखें येणार, यास्तव मुक्काम करून आहेत. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

पै॥ छ० २७ जिल्काद सुरुसन खमस सबैन मय्या व अलुफ.

नं० १४३१

(४ दिसेंबर.)[1]

बळवंतरावास वामनरावाचें पत्र मार्ग० शुद्ध १ चें

मुक्काम रुई येथून:–

" आमची व कारभारी यांची गांठ कार्तिक वद्य १२ स भीमातीरीं जाहली. कारभारी फौजेचा जमाव करीत येतात ही बातमी श्रीमंतास नातच आहे त्यावरून श्रीमंत आपले जागां बहुत गडबडले आहेत. नबाब बाहेर निघाले. रुकनुद्दौला राजश्री हरीपंताचे भेटीस आले होते. बहुतच निखालसतेचें बोलणें बोलोन गेले. नबाबाकडील प्रकार दुसरा किमपि

१ या पत्रावर महिना दिसेंबर घातला आहे हा १७७४ सालचा दिसेंबर समजावा.

नाहीं. गंगेवर[1] गेल्यावर तिकडील[2] मनसब्यांचा डौल समजेल."

नं० १३३२ श्री [१६ जानेवारी]

श्रीमंत राजश्री तात्या[3] स्वामीचे सेवेशीं

पोष्य विष्णु नारायण झैसकर. साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल तागायत पौष शुद्ध पौर्णिमा पावेतों सुखरूप असो. विशेष. आपला निरोप घेऊन निघालों तो पुणियांत सुखरूप पावलों. इकडील वर्तमान तर साष्टीस इंग्रज येऊन वेढा घालून बसला. किल्ल्यानजीक मोर्चे लागू करून तोफांचा वगैरे गरनाळांचा मार भारी केला. त्या समयीं किल्लेकरी यांनीं बरीच हिंमत धरून एक दोन येलगार मारून काढिले. त्या समयीं इंग्रजाकडील भले माणूस कप्तान दोन चार ठार जाहले व या खेरीज माणूस ही दोन चारशें जाया झाले. त्याजवर त्यानें फिरोन हिंमत धरोन येलगार करून तोफांचा मार केला आणि किल्ल्याचा तट पंधरा वीस हात पाडून त्याच मार्गे आंत शिरोन हस्तगत केली. त्या समयीं आंतील लोकांनीं मारामार चांगलीच केली. तेव्हां उभयतांचे मिळोन हजार बारोशें माणूस ठार झालें. रामाजी महादेव याचा पुत्र आनंदराव यांस धरून नेले आहेत. आंतील लोकांनीं अठरा रोज बरीच हिंमत धरून राहिले होते परंतु बाहेरून फौजेचा कांहींच उपराळा जाहला नाहीं याजमुळें किल्ला गेला. हल्लीं येथून फौज व राऊत वगैरे रवाना करीतच जाहेत. पहिली फौज तेथेंच आहे. हा मजकूर सविस्तर आपणास विदित व्हावा यास्तव लिहिलें आहे. सर्व प्रकारें आह्मीं आपल्या पदरचे आहों. कृपा लोभ असों द्यावा हे विनंती.

पै॥ छ० २० जिल्काद सुरुसन खमस ११७५

१ गोदेवर. २ दादासाहेबांकडील. ३ झैसकर यानें कल्याणाहून पांडुरंगराव यांस पत्र लिहिलें आहे.

नं० १४३३ (१८ जानेवारी)

जिवाजी रामचंद्र यांचें ती॥ अण्णा यांस पत्र

पौष वद्य २ चें.

" श्रीमंत राजश्री दादासाहेब मही नदीच्या तीरीं मुक्काम करून लढाई करावी या अर्थे राहिले. छ० ११ जिल्कादीं तमाम लहान थोर सरदार राजश्री हरीपंत फडके यानीं बोलावून नेऊन बेलभंडार घेऊन विडे दिले. तमाम फौजा तयार होऊन बुनगें पाठीवर घेऊन पांच कोस पुढें गेले तो फत्तेसिंगाकडून बातमी आली कीं दादासाहेब कूच करून नदी पलीकडे गेले. तेव्हां आणखी दोन कोस पुढें येऊन मुक्काम केला. होळकर शिंदे यांचा फितूर आहे त्याजमुळें लौकर फडशा होत नाहीं. दादासाहेबांकडील वकील आला होता कीं, दहा लक्ष रुपयांची जहागीर व दोन किल्ले द्यावे आणि धणीपणाचा कारभार आपणाकडे असावा. या प्रमाणें तह रह जाहला तर भेटीस येतों. फत्तेसिंग आजच इकडे येणार आहे."

नं० १४३४ (पौष वद्य १
१७ जानेवारी)

बामनरावाचें पांडुरंगरावास पत्र १४ जिल्कादचें

बडोदे नजीक मुक्कामचें—

" हरीपंतांची व आमची गांठ पडल्यानंतर महिना सवा महिना दूर मजल चालत आहों. बडोद्यानजीक आलों. श्रीमंतांस व आह्मांस बारा कोसांची तफावत आहे. [श्रीमंत आह्मांपुढें] ठरोन रहात नाहींत. आपल्यास काय करितील (न कळे) हें भय धरून रानभरी होऊन राजश्री गोविंदराव गायकवाड याच्या आसऱ्यास आले. त्याचे वस्तु तरी या फौजेशीं ठरोन रहावयाचा प्रकार दिसतच आहे! श्रीमंत गांठ पडो देत नाहींत, आह्मीं तर पिच्छा सोडीत नाहीं! फत्तेसिंगही आज येणार."

नं० १४३५ श्री (१९ जानेवारी)

तीर्थस्वरूप राजश्री काका वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें जिऊबानें साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत पौष वद्य ३ मु॥ वसती सावळी वर्तमान यथास्थित असे. विशेष. श्रीमंत राजश्री दादासाहेब व गोविंदराव गायकवाड बडोदेनजीक महीच्या तीरीं मुक्काम करून होते. आह्मीं पायागडचे अलीकडे चार कोसांवर होतों. तों बातमी आली कीं श्रीमंत राजश्री दादासाहेब लढाईस तयार होऊन राहिले. दुसरे दिवशीं छ० १३ जिल्कादीं तमाम फौजा तयार होऊन दादासाहेबांवर चालले तों बडोद्यांतील फत्तेसिंग गायकवाड यांजकडून बातमी आली कीं, खंडाबर गायकवाड मानाजी फाकडे यांजकडील फौज सुद्धां (श्रीमंतांनीं) ठेविला. आपण खासा बुनगें घेऊन नदी पलीकडे चार पांच कोस जाऊन राहिले. फौजेच्या पुढें लुटारी होते त्यांनीं गांव खेड्यांनीं दादासाहेबांकडील ताकीददार राऊत होते त्यांचीं घोडीं आणलीं. व फत्तेसिंग गायकवाड याजकडील स्वार हजार दोन हजार राऊत छबीन्यास होते त्यांनीं पालख्या व तट्टें व उंटें घेऊन आले. शिंदे व होळकर यांजकडील बातमी त्यांस गेली. त्यामुळें दादासाहेब कूच करून अमदाबादेच्या सुमारें गेले. त्यांस व आह्मांस वीस कोसांचे अंतर पडलें. आह्मीं मजल दर मजल त्यांचे पिच्छावर चाललों आहों. दादासाहेबांचे चित्तीं लढाई करावी असें होतें, परंतु शिंदे होळकर यांजकडील पत्र गेलें याजमुळें कूच करून गेले. मुख्य गोष्ट शिंदे होळकर यांचा फितूर आहे यामुळें फडशा होतां दिसत नाहीं. आह्मांविशीं चिंता न करावी. बहुत काय लिहिणें लोभ असो द्यावा हे विज्ञापना.

---

१ जिवाजी रामचंद्र जोशी पोतनीस यानें विष्णु कृष्ण यांस लष्करांतून पत्र पाठविलें. २ गोविंदराव.

नं० १४३६ श्री [२६ जानेवारी]

श्रीमंत राजश्री बाबासाहेब[1] स्वामीचे सेवेशीं.

विनंती सेवक केसो बल्लाळ व रामचंद्र बल्लाळ गोरे कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल तागायत पौष वद्य दशमी गुरुवासरे पावेतों स्वामीचे कृपेंकरून यथास्थित असे. विशेष. बहुत दिवस स्वामीकडील पत्रें येत नाहींत याजमुळें चिंता लागली आहे. तरी सविस्तर लिहावयासीं आज्ञा केली पाहिजे. इकडील साकल्य वृत्त श्रीमंत राजश्री तात्यासाहेबीं लिहिलें आहे त्यावरून विदित होईल. करवीरकर व इचलकरंजीकर यांची लढाई दोन चार रोजांनीं होत असते. श्रीमंत मातुश्री बाई येथें वाड्यांतच राहिली आहेत. लोक नवे ठेवितात. लवकर यांचा त्यांचा गुंता उरकेलसा दिसत नाहीं. वरकड चहूंकडे दंगा झाला आहे. कर्नाटकांत गडबड फार आहे. साष्टी इंग्रजानें घेतली यामुळें कोकणांतील लोक गडबडले आहेत. फिरंगी व हैदरखानाकडील आरमार विजयदुर्गास येणार ह्मणून वर्तमान आहे. कोणीकडेही स्वस्थ नाहीं. ईश्वर काय करील पहावें! स्वामीस कळावें ह्मणून लिहिलें आहे. बहुत काय लिहिणें कृपा करावी हे विज्ञापना. राजश्री अंताजीपंत गोखले, जिवाजीपंत जोसी, यांस साष्टांग नमस्कार. विनंती उपरी तुह्मांस दोन तीन पत्रें पाठविलीं परंतु उत्तर आलें नाहीं. तर सविस्तर लिहावें हे विनंती. सेवेशीं विसाजी तानदेव साष्टांग नमस्कार.

नं० १४३७ श्री (९ फेब्रुवारी

सकल श्रियास्पद राजमान्य राजश्रिया विराजित अण्णासाहेब वाडिलांचे चरणास. अपत्यवत् जिवाजी रामचंद्र नासिककर करद्वय जोडून

---

१ वामनराव.

सिर साष्टांग नमस्कार विज्ञापना. अत्रत्य कुशल जाणून स्वकीय निज कुशलोदंत लेखन अविस्मर असावें. येथील क्षेम श्रीकृपा प्रभावेंकडून वडिलांचें पुण्यप्रतापेंकडून माघ शुद्ध पंचमी (पर्यंत) यथास्थित असे विशेष. वडिलांची आज्ञा घेऊन निघालों त्या तागायत कांहींच आशीर्वाद पत्र येऊन बाळकाचा सांभाळ होत नाहीं. तरी सदैव आशीर्वाद पत्रें संतोषवीत असावें. या नंतर राजकीय वर्तमान तरी श्रीमंत तीर्थस्वरूप बाबांची व भाऊची व दाजींची भेटी श्रीभीमातीरीं नाना फडणीस व बापू या उभयतांची जाहली. सा रोज श्रीगंगातीर पावेतों समागमेंच होते. त्यांस त्यांनीं आज्ञा केली कीं राजश्री हरीपंत यांजकडेस जाणें. त्यावरून तीर्थस्वरूपानीं दर मजल करून कासारबारीपाशीं राजश्री हरीपंताची भेटी जाहली. धौशाही समागमेंच होता. तेथून दर मजल श्रीमंत राजश्री दादासाहेबाचें मागें चालले. रेवातीरपर्यंत समागमें सारे होतो. तेथें धौशा मात्र राहिला. धौशाबरोबर कांहीं सरकारची हजार एक फौज बाळोजी पलांडे राहिले.. रेवातीराहून दर कूच धारेच्या सुमारें श्रीमंताचा पाठलाग करीत आलों. धारेनजीक राजश्री महादजी शिंदे व तुकोजी होळकर भेटले. दादासाहेब सोळा कोस वीस कोस मजल करून गुजराथ प्रांतास गेले. तेव्हां साऱ्या सरदारानीं मनसबा करून पाठीस लागावें ऐसा इत्यर्थ करून तमाम सरदार लहान मोठे यांसीं दिल भरंवसा देऊन गुजराथ प्रांतांत बडोद्यास आलों. तों श्रीमंत दादासाहेब व गोविंदराव गाईकवाड असे मिळोन कूच करून अमदाबादेच्या सुमारें चालले. तों फौजा ही मागें चालल्या. तों अकस्मात् माघारे उलटोन पंधरा हजार फौज व दहा हजार अरब व गारद असे जमा करून आपण व गाइकवाड असे मिळोन महीचा घाट धरिला. हें वर्तमान हरीपंतास अगर कोणास बातमी कळली नाहीं.

१ अनुक्रमें वामनराव परशुरामभाऊ व रघुनाथराव.

तों रोजच्या कुचाप्रमाणें कूच करून गेले. तों बिनीची गांठ पडली तों इतक्यांत बातमी येतांच साऱ्या फौजा तयार होऊन गेल्या. परंतु काम कारागीर न जाहलें. जागा बळकट. काट होईना. तेव्हां फौजा व बुनगें तीन कोस माघारें आलें. तों दुसरे दिवशीं फौजा तयार होऊन जावयाच्या तों तिकडून सल्याकरितां बोलीस आबाजी महादेव आले. सल्यावर मसलत पडली. शिंदे होळकरांचे विद्यमानें बोलों लागले. मनस्वी बोलों लागले. तो जाबसाल न ठरला. तों मागाहून सदाशिव रामचंद्र आले त्यांच्या हातूनही कांहीं उलगडा पडला नाहीं. तेव्हां सल्याचा जाबसाल राहिला. तेव्हां माघारे कूच करून बडोद्यानजीक राहिले. अतःपर मसलत होईल ती मागाहून निवेदन करूं. आज छ० ४ जिल्हेजीं सडे होऊन गेले. बुनगें पाठीमागें ठेविलें. सारांश फितुरीमुळें लौकर फडशा होत नाहीं. तीर्थस्वरूप राजश्री तात्यासाहेबांस पुत्र झालेचें वर्तमान केशव सुतार आला त्यानें सांगितलें त्यावरून कळलें. परम संतोष जाहला. वडिलीं पत्रीं सांभाळ करावा. आपली शरीर भावना कशी आहे ती लिहून पाठवावी. बहुत काय लिहिणें कृपालोभ असो दीजे हे विनंती.

नंबर १४३८. **श्रीगणराज** (माघ शु. ९
९ फेब्रुवारी)

चिरंजीव राजश्री बळवंतराव यांसीं प्रती वामनराव गोविंद आशिर्वाद उपरी येथील कुशल तागायत छ० ४ जिल्हेज मुक्काम बसमसरचा [?] मठ नजीक बडोदें वर्तमान यथास्थित असे. विशेष. इकडील वर्तमान तर ऐशजी जोडीसमागमें सविस्तर लिहिलें आहे. श्रीमंत राजश्री दादासाहेबांची गांठ महीपलीकडे पडली. महीच्या खळ्या भाला दोन भाले खोल. एकामागें एकानें जावें.अशी अडचणीची वाट. श्रीमंत इकडील

बातमी राखोन महीचा उतार बंद करावा ह्मणोन पंधरा कोस पुढें गेले, त्याची बातमीही आली, असें असतां पाईचें माणूस पुढें घालोन माहीत गारिनें उतारास येत असतां आमचीं निशाणें पांच सहाशें लोक पलीकडे पार होऊन मेले त्यांचीच गांठ पडली. मागून कुमक फौजेची नाहीं. एकामागें एकानें जावें, ज्यानें उठावें त्यानेंच जायां व्हावें, अशी कुबल जागा! माणूस मारून काम व्हावयाचें नाहीं ह्मणून नदीपलीकडे होळकर कडील थोडें बहुत बुनगें दोन हत्ती गेले होते ते आह्माकडील लोकांनीं पुढें घालोन आणिले. फौजा जमोन अलीकडेच राहिल्या व ते ही पलीकडे उतार धरून राहिले. इकडील व तिकडील मारगिरी चार घटका बरीच जाहली. नदीजवळ मुक्काम करावा तर पाणी नाहीं. फिरोन तळावरच बुनगें लावून दिलें. रात्रींच्या फौजा तोंडावर तशाच होत्या. तीन कोसांच्या तफावतीनें सतरा दिवस जवळ मुक्काम होता. सलुखाचें बोलणें होळकरांचे विद्यमानें बोलत होते तें ही बनेना. याज करितां जवळ आंगास आंग लाऊन असों नये ह्मणून पांच कोस माघारें नजीक बडोदें दीड कोस येथें येऊन राहिलों. याजउपर सडे व्हावें अशी मसलत आहे. काल सडे झालों. सविस्तर वर्तमान चिरंजीव राजश्री तात्यास लिहिलें आहे त्याजवरून कळेल. तुमची शरीरप्रकृत हल्लीं कशी आहे लिहिणें. चिरंजीव सौभाग्यवती लक्ष्मीबाई[1] दिवस जाहले असतां कोनीं निघाल्याची[2] बातमी कळत नव्हती त्यास केशव सुतार तुह्मां पासून आला त्यानें पुत्र जाहला ह्मणून सांगितलेवरून संतोष जाहला. बाहेर जाणें तर एकटें एकंदर न जाणें. बहुत सावध रहात जाणें. बहुत काय लिहिणें हे आशिर्वाद.

---

१ पांडुरंगरावाची स्त्री. २ कोनीं निघाल्याची-बाळंत झाल्याची.

नंबर १४३९ श्री (७ फेब्रुवारी)

सेवेशीं शिवाजी बाबाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल तागायत माघ शुद्ध सप्तमी इंदुवासरे मुक्काम नजीक पुरंदर वर्तमान यथास्थित असे. विशेष. तापीपासून बऱ्हाणपुराच्या पलीकडे ह्मणतां तीन चार पत्रें पाठविलीं परंतु पत्राचीं उत्तरें न आलीं. तस्मात् पत्रें पावलीं किंवा न पावलीं न कळे. इकडील वर्तमान तर उभयतां कारभारी यांनीं नबाब निजामअल्लीखान यांस भोजनास डेऱ्यास बलावून वस्त्रें व जवाहीर व हत्ती व घोडे दिले. बोलणें चालणें पहिल्यापासून पक्कें आहे त्याचें दृढीकरण करोन कसेंही जाहलें तत्रापि जुमस[२] खाऊं नये येणें प्रमाणें पक्केपणें जाहलें. दौलताबाद किल्ला नबाबास द्यावा, औरंगाबादेस नबाबानीं छावणीस नेहमीं रहावें, जवळ किल्ला, माणसामाणसीं कलागत पडेल, याजकरितां किल्ला दौलताबाद द्यावा असें ठरलें. महिन्या दोन महिन्यांत रिकामा करून द्यावा असें ठरलें. नबाब अलजपुरास जावयास बऱ्हाणपुरावरून निरोप घेऊन गेले. कारभारी यांचें मानस व मनसबियास उपयोग याजकरितां चांदवडच्या रोखें गुजराथचा रोख धरावा ह्मणजे आपल्या फौजांस पुष्टिबळ याजकरितां तिकडील रोखें ऱ्हा. असें ठरोन बऱ्हाणपुराहून कूच जाहल्यावर मनसबा [कारभारी यानीं] केला कीं, देशीं फौजा (व) उभयतां नव्हतों याजकरितां साष्टी गेली आतां कर्नाटकांत फौज पाठवावयाची ती राहिली. ती साष्टीकडे गेल्यामुळें कर्नाटकांत अगदींच गेली नाहीं. कोणीकडे पेंच दुसरा पडेल न कळे. याजकरितां व साष्टीस फौज पाठवावी, पाईचें माणूस व तोफा पाठवाव्या, आणि यत्न करून पहावा, हा मनसबा चित्तांत आणून लांब

---

१ पत्र पांडुरंगरावास. २ जुमस खाणें– कचकरणें.

लांब मजली करून अमावास्येचा मात्र गंगेवर मुक्काम जाहला. नाहीं तर बारा कोस चौदा कोस येणें प्रमाणें मजली करून काल दोन प्रहरीं पुरंधरास दाखल जाहले. राजश्री विसाजी कृष्ण यांस कर्नाटकांत पाठवावयाकरितां आणविले आहेत. मुंबईला फौजा साष्टीच्या पाठविणार. साष्टीच्या टांपूत बाराशें माणूस सरकारचें उतरलें. आणखी वरचेवरी पाठविणार. अशांत सामान चांगलें असल्यास व तोफांचें सामान असल्यास यत्नें करून साष्टी हस्तगत होईल असे तिकडे जे गेले आहेत त्यांचें लिहिणें आहे. याजकरितां तोफाची वगैरे रवानगी करणार. बळ पाडावें आणि यत्न करून पहावा असा मनसबा आहे. यांत घडेल तें प्रमाण. श्रीमंत राजश्री दादासाहेबाकडील वर्तमान तर बडोद्यास गेले राजश्री गोविंदराव गाइकवाड यांची भेटी जाहल्यानंतर पंधरा दिवस राहिले राजश्री हरीपंत तात्याच्या व होळकर व शिंदे यांच्या भेटी होऊन मागाहून यावयास पंधरा दिवस लागले. (ते) बारा कोसांच्या अंतरानें आल्याचें वर्तमान कळतांच गोविंदराव सुद्धां (श्रीमंत) कूच करून महीपार होऊन गेले. आपल्या फौजा बडोद्याजवळ येऊन राजश्री फत्तेसिंग गाइकवाड यांची भेटी जाहल्यावरी बडोद्याच्या तीन तोफा थोरल्या किल्यावरील उतरोन समागमें घेतल्या. फत्तेसिंग यांची फौज दोन तीन हजार परंतु पाईचें माणूस दहा बारा हजार आहे. बडोद्याहून कूच करून महीच्या रोखें गेले. श्रीमंत महीच्या पलीकडे अडचणीची जागा धरून राहिले आहेत. श्रीमंतांजवळ फौज तीन हजार आहे. व गोविंदराव गाइकवाड याची फौज दहा हजार व पाईचें माणूस आठ नऊ हजार आहे. इकडील फौजा व पाईचें माणूस ह्मणतां फारच आहे. परंतु आवळ्यांची मोट! त्यांत धन्याचा दाब नाहीं. राजश्री हरीपंत (मात्र) कारस्थानीस चुकत

---

१ स्वार.

नाहीं. उभयतां सरदारांचा तर गुदस्तांपासून भरंवसा आहे नाहीं तो समजला आहे! गुदस्तांचा मनसवा बरा ह्मणावयास जाहला! श्रीमंतांच्या पुण्यप्रतापेंकरून सर्व ही नीट होईल. करावयाचे प्रकार ह्मणावे तरी एक प्रकारचे दिसतात. ईश्वर कृपा करून पार पाडील, मनसब्याचा समारोप होईल, तरच ठीक. नाहीं तरी वर्षानुवर्ष कठीण. पैक्याची ओढ, मुलुखाचे निसंतान, असें आहे. महीपलीकडे आमची फौज व होळकर व हुजरात थोडी बहुत गेली होती. अडचणीच्या जागा धरून दबा श्रीमंतांच्या फौजांनीं धरिला होता. एकाएकींच फौजा गेल्या तेव्हां गोळा-गोळी जाहली. दोनशें पावेतों माणस जाया जखमी इकडील तिकडील जाहले, ते पलीकडे गेले. आपली फौज राजश्री हरीपंताजवळ आली. आपल्या फौजा व पुढें गेल्या फौजांस अंतर फार नव्हतें. साऱ्या फौजा तयार होऊन त्यांजवर महीपार होऊन जाणार होते. येणें प्रमाणें बडोद्या-हून पत्र एका गृहस्थाचें आलें. राजश्री हरीपंतांकडील पत्रें आलीं नाहींत. आल्यावरी सविस्तर कळेल. लिहून पाठवितों. श्रीमंत. राजश्री दादासाहेबांस[1] पुत्र पौष शुद्ध नवमीस झाला. राजश्री नानास व बापूस पत्रें घोरहून आलीं होतीं. पुरंधरासही पत्रें आलीं होतीं. हिंदुस्थानचें वर्तमान सुजाउद्दौला यास रोहिल्याचे लेकीनें मारिला. (तिला) घरांत घालून जुलूम जबरदस्ती करितांच तिनें कटार चालवून मारिला! आपण ही पोटकट्यारी करून घेऊन मेली. अशा प्रसंगांत दहा हजार फौज हिंदुस्थानांत जाती तर बंदोबस्तच होता! या प्रकारचें वर्तमान आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

१ राज्य बुडविणारे बाजीराव रघुनाथ.

नंबर १४४० श्री (१३ फेब्रुवारी)

सेवेशीं शिवाजी बाबाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल तागायत माघ शुद्ध त्रयोदशी इंदुवासरे मुक्काम भिवंडी वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपण सुलतानाबरोबर पत्रें पाठविलीं तीं पावोन लिहिला मजकूर कळला. श्रीमंत राजश्री नाना फडणीस यांचें पत्र व राजश्री व्यंकटराव दादांचें व दाजीचें येणें प्रमाणें पत्रें प्रविष्ट केलीं. गुणाजी जासूद याजबरोबर पत्रें अगोदरचीं पाठविलीं तीं सुलताना आल्यावरी मागाहून आलीं. पत्रें पावलीं. राजश्री नानांचें पत्र एकांतीं लिहिल्याप्रमाणें दिलें. 'लष्करचें वगैरे सविस्तर लिहावें व बरडोलाकडे बेरडाचा उपद्रव लागला आहे याजकरितां तेथें राऊत आहेत ते मंगळवेढ्याकडे पाठवावे, ह्मणून लिहिलें त्यावरून उभयतांस सांगितलें. उत्तर केलें कीं, 'नाना मेणवलीस काल गेले आहेत. आल्यानंतर दीडशें राऊतांस निरोप देऊन रवाना करावें.' येणें प्रमाणें सांगितलें आहे. आठा दहा दिवशीं नाना येतील. आले ह्मणजे राउतांची रवानगी करून जरूर रवाना करावे असें असल्यास तसेंच लिहावें. कर्नाटकांत जावयास राजश्री विसाजी कृष्ण यास वारंवार पत्रें गेलीं आहेत. आले ह्मणजे रवाना करणार. कळावें. लष्करांकडील पत्रें आलीं होतीं तीं आपणाकडे पाठविलींच आहेत. पावलीं असतील. अलीकडील वर्तमान तर पत्रें राजश्री हरीपंत तात्यांचीं आलीं. श्रीमंत मही पार आहेत. आपल्या फ़ौजा मही अलीकडे तळ्याच्या पाण्यावर चार कोसाच्या अंतरानें आहेत. पलीकडे उतरून जावयाची कस्त करीत होते इतक्यांत तिकडून राजश्री सदाशिव रामचंद्र व आबाजी महादेव व लक्ष्मणपंत नातु येणें प्रमाणें तहाचें बोलणें बोलावयास होळकरांकडे आले. तहाचा प्रकार होणें कळतच आहे. सल्ल्यावर चालून दगा मात्र न केला ह्मणजे झालें! आपले गृहस्थ[1]

---

[1] पटवर्धन मंडळी.

साबाजी भोंसल्याचा मृत्यु

सावधपणें आहेत असें लिहिण्यांत आहे. हें तिकडील वर्तमान. भोंसल्याकडील वर्तमान तर राजश्री मुधोजी भोंसले साबाजीवर चालून गेले. महमद इसफ सुद्धां गाडदी दोन हजार मुधोजीकडे होते. नागपुरानजीक हे गेले. साबाजी भोंसले नागपुराजवळ होते ते अलीकडे कूच करून मुधोजीवर आले. नागपुरापासून सहा कोसांवर गांठ पडली. आर्धा सल्ल्याचा प्रकार मधील ह्मणत असतां एकाएकींच गांठ पडली. साबाजीनें मोठी अंगेजणी[1] करून मुधोजीस मोडून दोन हजार गाडदी व दोन हजार फौजेंतील माणूस मारिलें. दोन प्रहर पावेतों युद्ध झालें. साबाजीस यश आलें होतें. शहाजानें वाजलीं. साबाजीकडील लोक लुटीस गुंतले. मुधोजी दोनशें राउतानिशीं एका टोळींत होताच. साबाजी हत्तीवरच होते. ती टोळी पहातांच (साबाजीनें तीवर) हत्ती बेलाशक चालविला. मुधोजी हत्तीवरच होता. हत्तीस हत्ती भिडला. साबाजीसांग मुधोजीस लागला व एक तीराचा जखम अशा दोन जखमा लागल्या. तेव्हां साबाजी ह्मणों लागले कीं मुधोजीस मारूं नका. वांचवावें. असें ह्मणत आहेत तों जोडगोळ्या साबाजीस बसोन साबाजी भोंसले ठार जहाले नाना जोशी यांसही गोळी लागोन ठार झाले. त्यांचे पुत्र व राजश्री बाबूराव वैद्य नागपुरास दर्याबाई याजपाशीं गेले. त्यानीं सविस्तर वर्तमान लिहून पाठविलें. युद्ध तुंबळ जहालें. साबाजीनें शर्त केली परंतु शेवटीं अशी गोष्ट झाली. होणार त्यास इलाज नाहीं. साबाजीचें असें झालें येणें करून आपेली[2] खांमी[3] झाली. मुधोजी त्यांजकडील सूत्रांतील. त्यांची शेर बाजू जहाली. ईश्वराच्या चित्तास असेंच आलें. इलाज नाहीं. नबाब निजामअलीखान आलजपुरास जावयास गेले ते बाळपुरा-

---

१ मर्दुमी. २ सवाई माधवराव यांच्या बाजूची. ३ नुकसानी.

नजीक गेले तों (साबाजीचें) वर्तमान आलें. साबाजीकडील लोकांस पत्रें नबाबानीं पाठविलीं कीं, तुह्मी इकडे येऊन रुजू होणें. तुमचें चालविलें जाईल. असे कौल पाठविले आहेत. नबाबच तिकडील बंदोबस्त करतीलसें दिसतें. राजश्री मुधोजी भोसले यांनीं सूत्र इकडे निखालसपणें चालविलें तरी नबाबास इकडून पत्रें जातील. कसें होतें पहावें. गोष्ट तर अवघड झाली आहे. नारो शंकर यांस देवाज्ञा जहाली. स्त्री समागमें गेली. मातबर माणूस गेला. कळावें. लष्काराहून पत्रें आलीं ह्मणजे सविस्तर लिहून पाठवितों. श्रीमंत राजश्री नाना मेणवलीहून आले ह्मणजे पत्रांचीं उत्तरें पाठवितों. अलीकडील इचलकरंजीकडील मजकूर कसा आहे तो लिहावा. आपण फौज नवी ठेविल्याचा प्रकार लिहिला तो कळला. खर्चाचा पेंच भारी आहे हें सविस्तर उभयतांस श्रवण केलें. श्रीमंत राजश्री दाजीकडील पत्रांचीं उत्तरें उदईक पाठवितों. श्रीमंत राजश्री भवानराव निरोप घेऊन आजच किनईस गेले. इंग्रजांचें मातबर पालें वगैरे वसईच्या बाऱ्यावर आहेत. सरकारच्या एक पालाच्या पाठीस इंग्रजाकडील पाल लागलें. निकड झाली तेव्हां आपल्याकडील लोकांनीं बारुदखान्यांस[3] आग लावून जाळिला. त्यांच्या हातास लागूं दिला नाहीं. माणसें कांहीं आलीं. फारकरून मेलीं. वलंदेजांचें[4] राजकारण इकडे लागलें आहे. 'साष्टी घेऊन देतों. इंग्रजाप्रमाणें आपला सलूख असावा.' असें राजकारण आहे. यानीं करार करूस वस्त्र व शिरपेंच पाठविला आहे. मागाहून होईल वर्तमान ते लिहून पाठवूं. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

१ करवीरकरांच्या उपद्रवासंबंधें. २ तिर्कटी तारू. ३ दारूखान्यास. ४ डच लोकांचें.

महीची लढाई

नं० १४४१ श्रीगणराज [२१ फेब्रुवारी]

चिरंजीव राजश्री बळवंतराव यांसीं प्रती वामनराव गोविंद आशीर्वाद उपरी येथील कुशल माघ वद्य ६ मुक्काम नजीक पेटलाद वर्तमान यथास्थित असे विशेष. श्रीमंतांची गांठ पडोन महिनाभर युद्धाचा योग नव्हता ह्मणून दिवस घालविले. द्वितीयेस योग होता ह्मणून महीपार जाहलों. श्रीमंत चालोन आले. संध्याकाळचे सा घटका दिवसास. त्या संधी प्रमाणें लढाई सुरू झाली. सरकारच्या तोफा सुरू करून खळ्यांचें रान अवघड असतां धनी यांचें नांव घेऊन सर्वांनीं मिळोन घोडीं घातलीं. श्रीमंतांची लढाई बिघडली. तोफा झाडून चवदा पंधरा, हत्ती, कांहीं अंबारीचे, कांहीं कोतवाल, मिळोन निशाण पतक्यांचें, हत्तीवरील निशाण एक, [इतकें आह्मांस] सांपडलें. बाबूराव पाटणकर व गणेश विठ्ठल आणखी दहा वीस माणूस लहान मोठे पाडाव आले. आणखी दोन घटका दिवस असता तर साराच उलगडा होता. अवशीचा काळोख, खळ्याचें रान, असतांही एक कोस पाठलाग केला. रात्रीचा खळ्यांपुढें काट होईना ह्मणून श्रीमंत एकटे दोन तीनशेंनिशीं निघोन खंबायताकडे गेले ह्मणून आह्मांस पिछावर रवाना केलें आहे. खंबायत येथून आठ कोस. तेथूनही श्रीमंत निघोन घोग्याकडून दर्याकिनारा धुंदुकेस गेल्याची बातमी आली. मोठ्या हैराणगतीनें जात आहेत. माणूस शागीर्द पेशाचें होतें त्यांस निरोप देऊन पांच खिजमतगार घोड्यावर होते तेवढे समागमें आहेत. खाडींतून जाताना हत्ती हिरावले वर्तमान आलें आहे. आज मजलीस गेल्यानंतर सर्व कळेल. श्रीमंत रावसाहेबांचें दैव विचित्र ! यश सर्वांस आलें. आमची मंडळी सर्व सुखरूप आहे. गोविंदराव गाइकवाड यांचे पिछेवरही फौज रवाना झाली आहे. सविस्तर

चिरंजीव राजश्री तात्यांस लिहिलें आहे त्यावरून कळेल. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं० १४४२ श्रीगणराज (२१ फेब्रुवारी)

तीर्थरूप मातुश्री जानकीकाकू वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें वामनानें शिर साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत माघ व० ६ नजीक पेटलाद वर्तमान यथास्थित असे. विशेष– इकडील वर्तमान तरी श्रीमंत राजश्री दादासाहेबांची लढाई माघ वद्य द्वितीया भृगुवारी जाहली. त्यांचा मोड जाहला. तोफा व हत्ती इकडे पाडाव झाले आहेत. रात्र झाली ह्मणोन श्रीमंत पळून गेले. आमची सर्व मंडळी सुखरूप आहे. कांहीं चिंता न करावी. वरकड सविस्तर मजकूर चिरंजीव राजश्री भाऊ-नीं लिहिला आहे त्याजवरून वडिलांस कळोन येईल. आह्मांस श्रीमंतांचे पिछावर दहा हजार फौजेनिशीं रवाना केलें असें. आह्मीं जात आहों. बहुत काय लिहिणें हे विनंती. चिरंजीव अप्पा व हरीबास आशीर्वाद.

नं० १४४३ श्री [२६ फेब्रुवारी

सेवेशीं शिवाजी बाबाजी. साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल तागायत माघ कृष्ण ११ रविवासरे मुक्काम भिवंडी यथास्थित असे. विशेष आपण वेदमूर्ती राजश्री नारायणभट खाडीलकर यांजबरोबर पत्रें पाठविलीं तीं पावोन लिहिला मजकूर कळला. प्यादे मिरजेचे आपणाकडे पाठविले आहेत. पावले असतील. राऊत पाठवावयाचे त्यास मिरजेसच पाठवावे इकडून रवाना करूं, ह्मणोन आज्ञा; त्यास श्रीमंत राजश्री नानास पुसिलें

१ परशुरामभाऊची आई. २ प्रसिद्ध रामचंद्रपंत आपा व हरीपंत बाबा हे परशुरामभाऊचे मुलगे.

होतें. त्यांनीं सांगितलें कीं आह्मीं पांच सात रोजांत (मेणवलीहून) फिरोन येतों. आल्यानंतर सांगों. अद्यापि आले नाहींत. पत्र लिहिल्यास उत्तर पाठवितात 'आह्मीं आल्यावरी जावसाल सांगों. राऊत उंटाकडील चौकी पाहाऱ्यास पाहिजेत, तत्रापि थोडे बहुत पाठवावयासी सांगों त्या प्रमाणें रवानगी करणें' असें सांगतात. ते आल्यावरी श्रीमंत राजश्री दाजी व कोन्हेरराव पुसोन रवानगी करितील. इचलकरंजीकडील फौज करवीरकरांची उठोन गेली परंतु करार कसा ठरला ह्मणून लिहिलें, त्यास लाट रांगोळी व पहिल्यापासून गांवखेडी वतनबाब सुदामत प्रमाणें चालवावी. तिकडील लढे किरकोळी असतील. ते वाणीं विल्हे लावावे. त्यांजकडे वाजवी कजियांतील जखातेचा वगैरे गुंता असल्यास वारून द्यावा. त्यांजकडील कोणास आसरा न द्यावा, येणें प्रमाणें ठराव झाला आहे. नरसिंगराव जिवाजी कडूलकर यांजविशींचा मजकूर लिहिला व ताकीद पत्राविशीं लिहिलें, त्यास आह्मीं तातडीनें मंगळवेढ्यास गेलों. पत्र श्रीमंत राजश्री दाजी व कोन्हेरराव यांजवळ ठेविलें आहे. ताकीदपत्रें करून घेऊन पाठवितील. लग्नास घरीं पांच सात दिवस अवकाश राहिला इतक्यांत पत्रें आलीं कीं, पत्रें पावतांच येणे. फाल्गुन शुद्ध त्रितीयेचें लग्न. यांजकरितां आजच निघोन मंगळवेढ्यास गेलों. राजश्री हरीपंततात्याकडील पत्रें आलीं असल्यास सविस्तर लिहावें ह्मणून आज्ञा, त्यास मशारनिल्हेकडील पत्रें आलीं व श्रीमंत राजश्री भाऊचीं पत्रें श्रीमंत राजश्री नानास आलीं तोतीं. त्यांतील अर्थ श्रीमंत महीपार अडचणींत राहिले आहेत. अलीकडे आपल्या फौजा आल्या आहेत. कितीएक इकडील फौजेंत फितवे आहेत. ह्मसाजी थोरात व सुभानजी इंदलकर यांचे फितल्याचीं पत्रें सांपडलीं. त्याजवरून त्यांस कैद करून घोडीं पागेस लाविलीं. किरकोळी फितव्यांत आहेत. व होळकर शिंदे यांचा

हरीपंताच्या फौजेंत फितूर.

फितवा तर पहिल्यापासून आहेच. सलुखाची बोली लागली त्यांतील अर्थ ' बत्तीस लक्ष रुपये फौजेचे चढले आहेत ते द्यावे व दहा लक्षांची जहागीर वसुली द्यावी ' येणें प्रमाणें बोलत होते. तेव्हां राजश्री हरीपंततात्यानीं उभयतां सरदारांवर रुष्ट होऊन सांगितलें कीं " गुदस्तांपासून तुह्मी सलुख करितां, मनस्वी रुपये देवविलेत व पुढें ही द्यावे ह्मणतां त्यास आह्मीं फडणीसांचे कारकून. आमची योग्यता इतकी नाहीं! आपण सरदार आहां. मनसबा, देणें घेणें, द्यावयाची योग्यता, आपणास आहे. आपणास श्रीमंत पावले. आह्मीं कूच करून जातों. " ह्मणून कूच करून बडोद्यांस आले. मागाहून उभयतां सरदार कूच करून आले आणि बोलिले कीं आह्मीं पुढें होतों. आपण पाठीवर असावें. सडे व्हावें. त्याजवरून सडे होऊन पहिल्या जाग्यास गेले तों त्यांस कळतांच राजश्री आबाजी महादेव बोलीस पाठविले कीं, ' सलुख करावा. ' याजवरून मागती बोली लागली आहे. ' झांशी व करेरा किल्ला द्यावा, जहागीर हिंदुस्थानांतच द्यावी, कांहीं फौजेची शिबंदी चढली आहे ती द्यावी, ' येणें प्रमाणें उभयतां सरदार व रास्ते यांचे विद्यमानें बोलणें लागलें आहे. शेवटास जाणें कळतच आहे. शेवटास न गेल्यास सडे झाले आहेत, एक वेळ निकड करणार, ह्मणून लिहिलें होतें. फितूर भारी आहे परंतु आपली फौज भारी आहे याजकारितां मात्र जरब त्यांजकडील चालत नाहीं! परंतु चित्तानुरूप मनसबे शेवटास जाणें कठीण आहे असें लिहिण्यांत आहे. नबाब[1] अलजपुराजवळ आहेत. राजश्री मुधोजी भोंसले बारा हजारपर्यंत जमा होऊन वर्धेवर मुक्काम करून राहिला आहे. कोंकणचें[2] वर्तमान आहे तेंच आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

१ निजामअली. २ साष्टीचें.

नं० १४२४ श्री माघ व० ११
२६ फेब्रुवारी)

सेवेशीं शिवाजी बाबाजी साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल तागायत छ० २८ जिल्हेज मु० भिवंडी[2] वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपण पत्रें पाठविलीं तीं पावोन सविस्तर मजकूर कळला. लक्ष्मेश्वर हुबळीच्या पत्रांच्या नकला पाठविल्या त्या राजश्री बापूस दाखविल्या आणि मेणवलीस श्रीमंत राजश्री नानाकडे पत्र व नकला पाठविल्या. त्यांचे उत्तर आह्मांस लिहिलें आलें कीं, आह्मीं दोन तीन रोजांनीं येतों आणि तिकडे फौज पाठवावयाची तजवीज करूं; ह्मणून लिहून पाठविलें. ते ही दोन तीन रोजांत येणार. आल्यावरी तजवीज करितील. त्याप्रमाणें लिहून पाठवूं. श्रीमंत राजश्री वामनरावबाबाकडून पत्रें आलीं तींच ऐन जिन्नस आपणाकडे पाठविलीं आहेत त्याजवरून सविस्तर कळेल. दुसरीं सरकारचीं पत्रें आलीं त्यांतील अर्थ ' बडोद्यांस बुनगें ठेऊन सडे होऊन मही उतरोन पलीकडे जावें असा मनसबा केला आहे. सलुखाची बोलणी लागली आहे. शेवटास जाणें कळतच आहे, ' असें लिहिलें आहे. वऱ्हाडाकडील वर्तमान साबाजी भोंसले पडले त्यांची फौज व राजश्री मुधोजी भोंसले यांची मिळोन वीस हजार फौज जमा झाली आहे. नबाब अलजपुरापासून दहा कोसांवर आहेत. अलजपूर तालुक्याचीं ठाणीं बसवीतच पुढें गेले. त्यास अलजपुरकरांचें व मुधोजीचें सूत्र आहेच. अलजपुरास मोर्चे लाविल्यास वीस हजार फौज उपराळ्यास असतां मोर्चें लावणें कठीण आहे. याजकरितां नवा मनसबा काय करतील पहावें. भोंसल्याचे फौजे इतकी फौज त्याच्या तोंडावर ठेऊन मोर्चाचें सामान असावें

१ पत्र पांडुरंगरावास २ हें खेडें पुरंदराजवळ आहे.

तरी मोर्चे ! नाहींतरी ठीक नाहीं काय मनसबा करितील पहावें. दौलताबाद किल्ला नबाबास द्यावासें ठरल्यावरी आह्मांस श्रीमंत राजश्री नानांनीं लिहिलें कीं, तोतया मिरजेस पाठविल्यास कसें ? त्यास आह्मीं उत्तर केलें कीं, तेथें सान्यांचीं कुटुंबें असतात. तेथें ठेवावयाची सोय नाहीं. तितकेंच राहिलें. तोतया दौलताबादेंतून काढल्यावर सोलापुरास पाठवावासा निश्चय ठरला होता. अलीकडे वर्तमान ' मिरजेस पाठविला. बारामतीजवळ करकंबच्या जासुदास आढळला, ' ह्मणोन वर्तमान सांगितलें. आह्मांस खरें वाटलें नाहीं. तत्राप न कळे. आज उद्यां श्रीमंत राजश्री नाना येणार. आल्यावरी सोलापुरची तजवीज राहिली आणि हीच जाहली हें कसें काय हें सविस्तर लिहून पाठवूं. आमचे घरीं लग्नाचा प्रकार आहे. निश्चयाचें पत्र आल्यावर जावें लागेल. चार महिने भोयांचा रोजमुरा व घोडीं उंट भोजनखर्च ह्मणतां साशें रुपये खर्च झाला आहे. याजकरितां राजश्री बापूजी नाईक याजवर चिठी पाठवावी. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

पै॥ छ० २९ जिल्हेज सुहूर सन खमस सबैन मय्या व अल्लुफ.

नं० १४५९ **श्रीगणपति** [२७ फेब्रुवारी]

चिरंजीव राजश्री पांडुरंगराव तात्या यांसीं प्रती पुरुषोत्तम कृष्ण. आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत माघ वद्य द्वादशी इंदुवासरें तिसरा प्रहर मुक्काम पुरंधर वर्तमान यथास्थित असे. विशेष. लष्करचीं पत्रें आतांच येथें आलीं तीं पाहून आपणाकडे रवाना केलीं आहेत. पावतील. लष्करची बातमी सावकारी लिहिलीं आलीं त्याची नक्कल करून पाठविली आहे त्यावरून कळेल. श्रीमंत दादासाहेबांचे फौजेचा मोड जाहला. फत्तेसिंग गाइकवाड यानीं फार कस्त केली. श्रीमंताकडील बाबूराव

पाटणकर पाडाव सांपडले. हत्ती दहा व तोफा दहा व उंटें घोडीं वगैरे लूट सांपडली. श्रीमंत बुणगेंत होते त्याजवर सडे होऊन आमच्या फौजा गेल्या आहेत ह्मणोन लिहिलें आलें त्याची व जिन्नस नक्कल करून पाठविली आहे. मागाहून तपशीलवार वर्तमान आलें ह्मणजे लिहून पाठवितों. राजश्री रामचंद्र कृष्ण लिमये यांस बरें वाटत नाहीं. पुणतांबेस आहेत. अलीकडे समाधान वाटों लागलें ह्मणून वर्तमान आलें त्यावरून मंगळवेढेंत लग्नाची तयारी झाली आहे. शुद्ध सप्तमीस आनंदरावजी निघोन जात आहेत. श्रीमंत नाना मेणवलीहून तृतीयेस येणार. चतुर्थीस निरोप घेऊन लग्नाचे दिवशीं जाऊन पोचावें असें आहे. ऋणानुबंध प्रमाण! येथें राजश्री कोन्हेरराव व धोंडोबा दादा आहेत. कळावें. एकोणीस महिने होईल ती थोडीसी सेवा किरकोळ झाली ती करून घरास लग्नास जावयास जातों. आपणास कळावें यास्तव लिहिलें आहे. सदैव पत्र पाठवीत जावें. श्रीमंत रावसाहेब सुखरूप आहेत. तीर्थस्वरूप कैलासवासी नानांचे आशीर्वादें येथें त्यांचे सेवकानें कमी पडूं दिलें नाहीं! वडिलांचे जागां तुह्मीं त्रिवर्ग व तीर्थरूप कैलासवासी अप्पांचे जागां राजश्री भाऊ आहेत. आपला लौकिक असावा हीच इच्छा करून आज पावेतों येथें आहों. इश्वरें आपलीं कल्याणें सदैव करावी. आपण जसी कृपा कराल तसे सेवेशीं हजर आहों. विशेष सेवा व्हावयाची नाहीं, थोडा बहुत जोडा धरावयाचें करूं! मागें वडिलांची ही थोडा बहुत जोडा धरावयाची केली असेल. आपली घडावी अशी इच्छा आहे. ईश्वर इच्छा प्रमाण! बहुत काय लिहिणें कृपा लोभ करावा हे आशीर्वाद.

---

१ धोंडो भास्कर पटवर्धन. २ वामनराव, गंगाधरराव व तुह्मी. ३ गोविंद हरीचे. ४ रामचंद्र हरीचे.

नं० १४४६ श्रीगणपति [१३ फेब्रुवारी.]

चिरंजीव राजश्री पांडुरंगराव तात्या यां प्रती पुरुषोत्तम कृष्ण आशीर्वाद उपरी येथील कुशल वर्तमान तरी माघ शुद्ध त्रयोदशी पावेतों सुखरूप असो विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावलें. श्रीमंत सौ॥ मातुश्री बाईस पत्र वाचून दाखविलें. मान्य केलें ह्मणून त्यांनीं सांगितलें. श्रीमंत नानास सांगितलें. मेणवलीस ग्रहणास गेले. काल द्वादशीस गेले. राजकी वर्तमान श्रीमंत दादासाहेब महीपार आहेत. अलीकडे हरीपंत आहेत. नवचे रोजीं पत्रें सांडणीस्वाराबरोबर आलीं. सल्लेची बोली श्रीमंतीं लाविली आहे. लढाईचें वर्तमान कांहीं नाहीं. नागपुराकडील बातमी मुधोजीची व साबाजीची लढाई झाली. मुधोजीचा मोड झाला. लोक लुटीस लागलें. शहाजनें वाजूं लागलीं. फितवा जाहला. मुधोजी दोन दीडशेंनिशीं व साबाजी लढाईंत शंभरानिशीं उभा होता. हौद्यांत नाना जोशी अंबारींत होता. मुधोजी चालून आला असें वर्तमान साबाजीस कळतांच तो हत्तीवर होताच, त्याचे हत्तीस साबाजीनें आपला हत्ती टकरविला. मुधोजीनें गोळी गार[1] भांडेची जवळून मारून ठार केला. नाना जोशी ठार अंबारींच जाहला. दोन हजार गाडदी (सह) महमद इसफ मुधोजीकडे होता. पहिला मस्त हत्ती साबाजीकडील होता, तो गाडद्यांत घालून गाडदी तुडविले. यानीं घोडे घालून दोन हजार गाडदी ठार केले. महमद इसफास जखमा भारी आहेत. वांचणार नाहीं असें झालें. पत्रें आलीं. नबाब अलजपुरकराचें पारिपत्य करून 'साबाजी आपला, त्याचा घात मुधोजीनें केला,' असें जाणून साबाजीकडील सरदारांस पत्रें पाठवून मुलुख त्यांस देणार. अशीं पत्रें नबाबाचीं आलीं.

---

१ गारभांडें-गारेची बंदूक. २ सखाराम बापू व नाना फडणीस.

मुधोजीशीं तुह्मीं अनुसंधान न करावें ह्मणून यांसे पत्रें आलीं. कळावें बहुत काय लिहिणें लोभ करावा हे आशीर्वाद.

नं० १४४७ श्री (३ मार्च)

चिरंजीव राजश्री सुभेदार व गणपतराव यांसीं पुरुषोत्तमराव कृष्ण व कोन्हेरराव त्रिंबक. आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत फाल्गुन शुद्ध द्वितीया पावेतों यथास्थित असे. विशेष. लष्कराहून चिरंजीवाचें पत्र आलें तेच व जिन्नस पाठविलें आहे त्यावरून कळेल. सरकारचे पत्रांतील वर्तमान श्रीमंत राजश्री दादासाहेब यानीं नडियादेस गेले. तेथें गोविंदराव गायकवाड व खंडेराव ऐसे बुनगे घेऊन तेथेंच राहिले. श्रीमंत खासा पांच सातशानिशीं खंबायतेस गेले. तेथें एक राजा भागडपरगण्याचा होता तेथें श्रीमंतानीं आपले जवळील घोडीं हत्ती वगैरे लोकही सारे त्याचे स्वाधीन करीत असतां त्यानीं हत्ती वगैरे कांहीं हवाला करून घेतलें नाहीं. मग श्रीमंतानीं तेथें सलेतनत[२] टाकून सुरतेचे बाऱ्यास पाय उतारा दोन तीनफें माणसानिशीं पळून जहाजायर आले. तेथून त्या बारीकरानीं जहाजावर घेऊन इंग्रजास लिहून पाठविलें आहे. त्याचा हुकूम येईल त्या प्रमाणें करितील. छ० १६ रोजीं व छ० १७ रोजीं व छ० १८ रोजीं एकूण तीन पत्रें एकेवेळेसच आलीं. सुरतेचा कमावीसदार याणीं ही बातमी लिहिली. आणखी वातमी येईल ती ही वरचेवर लिहीत जाऊं या प्रमाणें लिहिलें आहे. चिरंजीव राजश्री बामनरावबाबा व रास्ते वगैरे यांस खंबायताकडे रवाना केलें. आप्पा बळवंत व आनंदराव गोपाळ व मलबा

---

१ अनुक्रमें शिवराव निळकंठ व गणपतराव कोन्हेर पटवर्धन कुरुंदवाडकर. २ फौज सामानासह, दौलत.

पानसे यांसीं नडियादेकडे रवाना केलें. खंबायताकडे राजश्री हरीपंत व उभयतां सरदार हे ही बराबर जात आहेत. मागाहून वर्तमान येईल तें लिहून पाठवितों. श्रीमंत चतुःष्पादाचा त्याग करून द्विपादांत जलामध्यें ' प्रायोपेरी वेष ' होऊन स्तंभन करणार! याप्रमाणें प्रसंग घडला आहे बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं० १४४८

(फाल्गुन शुद्ध १०
११ मार्च

वामनराव गोविंद यांचें जिवाजी रामचंद्र यांस पत्र ८ मोहरमचें.

" आह्मीं भावनगरापर्यंत आलों. श्रीमंत राजश्री दादासाहेब गलबतांत बसून समुद्रांतून सुरतेस गेले. सात हत्ती व शेंपन्नास घोडीं भावनगरीं होतीं तीं घेऊन आह्मीं लष्करास यावयास फिरलों. "

नं० १४४९

(फाल्गुन वद्य
मार्च दु० पंधरवडा)

वामनरावाचें पांडुरंगरावास पत्र.

" श्रीमंत दादासाहेब इंग्रजांचें सामान सुरतेस मुंबईहून आलें तें घेऊन छ० १० मोहरमीं खंबायतास आले. सात आठ हजार गाडदी व गोरा फिरंगी सात आठशें व तोफा तीस चाळीस समागमें आहेत. गोविंदराव गायकवाड यांजवळ सदाशिव रामचंद्र व सखाराम हरी व मानाजी फांकडा व आबाजी महादव आहेत त्यांस गायकवाड सहीत जलद यावें

१ तिकडे गोविंदराव गायकवाड वगैरे पळून गेले होते त्यांच्या पाठलागास. २ ' प्रायोपरी वेष ' हें ' प्रायोपवेशन ' याचें अपभ्रष्टरूप. येथें दादासाहेबांच्या स्थितीशीं गदापर्वातील सुयोधनाच्या स्थितीशीं तुलना केली आहे!

ह्मणून श्रीमंतानीं पत्र पाठविलें. ही बातमी कळतांच आह्मीं राजश्री हरीपंताजवळ आलों. गोविंदराव गायकवाड याजकडील कारभारी येथें आहेत. बोलणें पक्कें आहे. लक्ष प्रकारें [इकडेच] येतील असें वाटतें. श्रीमंताकडील मंडळी तेथें आहे त्यानीं कांहीं बीर भरल्यामुळें बशा खाल्ला तर न कळे! श्रीमंत खंबायतास आल्याची बातमी येतांच हरीपंतही कपट बंदाहून कूच करून खेडानजीक आले. आमची व त्यांची गांठ छ०२३ मोहरमीं पडली. तेथून कूच करून व भाव (?) साबरमती या नजीक संगम येथें आलों. येथून खंबायत बारा कोस आहे. ”

नं० १४५० श्री (१२ एप्रिल)

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री विष्णुपंत दादा
स्वामीचे सेवेशीं.

पोष्य अंताजी राम. कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील वर्तमान तागायत चैत्र शुद्ध द्वादशी सौम्यवासरे मुक्काम वेठे परगणें ढवलकें नजीक साबरमती उत्तरतीर येथें आपले कृपे करून वर्तमान यथास्थित असे. विशेष आपणाकडून पत्रें वरचेवरी आलीं तीं पावलीं. लिहिलें वर्तमान सविस्तर कळलें. ऐसेंच निरंतर आशीर्वादयुक्त पत्र पाठवून सांभाळीत जावें. या नंतर पत्रीं आज्ञा, लष्करचें कच्चें वर्तमान लिहून पाठविणें. त्यास दूरपंथ पत्रें पावतील कीं न पावतील, याकरितां पाठविलीं नाहींत. हल्लीं पत्र पाठविलें आहे. सविस्तर वृत्त लिहिलें आहे. माघ वद्य द्वितियेस श्रीमंतांचें व सरकारच्या फौजांचें युद्ध झालें. श्रीमंतांचा मोड झाला. ते दिवशीं सांपडावे परंतु रात्र पडली यामुळें ईश्वरें त्यांस पार केलें. महीच्या कांठीं मोड झाला. तेथून रातोरात निघून मागील पाठलाग येईल या करितां हत्तीच्या घांटा वर घेऊन पंचवीस राउतानिशीं निघोन अंबारींत

बसोन खंबायतेस आले. बरोबर चिरंजीव होते. नाटकशाळा सातजणी होत्या. हत्ती सात होते. येणें प्रमाणें खंबायतानजीक येऊन खंबायत वाल्यास सांगोन पाठविलें. त्यांनीं आंतून सांगून पाठविलें कीं, आमच्या किल्ल्यांत येतां नये. बाहेर रहावें. असें साफ सांगितल्यावरून यानीं मनसबा करून आपला येथें राहून परिणाम लागत नाहीं, इंग्रजाशीं बोलून जहाजांत बसोन मुंबईस जावें, असा मनसबा करून इंग्रजांच्या वखारींत सांगोन पाठविलें. त्यानीं आपल्या तरांड्यास सांगून भावनगरास पाठविलें श्रीमंत पाय वाटेनें भावनगरास जाऊन तेथून सुरतेस गेले. आह्मांकडील वर्तमान तरी युद्ध जाहलेनंतर ते दिवशीं युद्धाच्या जागांच सारी रात्र होतों. दुसरे दिवशीं माघारे महीवर येऊन भोजन करून कूच करून श्रीमंत गेले त्या वाटेनें आलों. एक मजल सारे सरदार व हरीपंत बरोबर आलों. तेथून दुसरे दिवशीं हरिपंतानीं आमच्या यजमानास बरोबर १२ हजार फौज रास्ते सुद्धां देऊन खंबायतास रवाना केलें. आपण सारी फौज देखील शिंदे होळकर अमदाबाद डावी टाकून कपटबंदास गाइकवाड गेले त्या समारें आपण गेले. आह्मीं त्यांजवळून निघोन तीन मजलीनीं याच मुक्कामीं आलों. येथून मजल दर मजल भावनगरास गेलों. श्रीमंतांचा पत्ता तहकीक लागला कीं सुरतेस गेले. हत्ती सात तेथे होते, घोडीं शंभर होतीं, ऐतीं आह्मांकडील फौज जाऊन भावनगराहून आणिलें. तेथें दोन चार रोज राहून काठेवाडांत गेलों. काठ्यांचे दोन चार गांव मारिले. हरीपंताजवळून आलियावरी एक महिना काठेवाडांत होतों. मशारनिल्हेची पत्रें वरचेवरी आलीं तेव्हां निघोन फिरोन याच मुक्कामीं हरीपंताजवळ आलों. तों अगोदरच श्रीमंत फिरोन खंबायतास आले. बरोबर इंग्रजांचें माणूस चार हजार आहे. तोफा पंचवीस आहेत. खासे किल्ल्यांत आहेत. परवानगी रसानगी किल्लेदाराची आहे. तूर्त त्याचे सर्व

त आहेत. सुरतेहून आले ते समयीं " आपली फौज पंधरा वीस हजार कपटबंदास आहे ती आपणाकडे येईल. तेव्हां आह्मीं तुह्मीं मिळोन फिरोन लढाई करून आपला अम्मल बसवूं. " येणें प्रमाणें इंग्रजाशीं बोलून तेथून जमाव घेऊन आले. येथें आले तों बोललेला प्रकार कांहींच नाहीं! तेव्हां इंग्रजाकडील लोक येऊन फसलेसे जाहले. सरकारच्या फौजेचा शह भारी जवळ. येथून खंबायत बारा कोस आहे. येणें प्रमाणें श्रीमंतांचें वर्तमान गायकवाड कपटबंदाकडे गेले होते. बरोबर श्रीमंताबरोबरची फौज जरी पटके सुद्धां चार हजार, गोविंदराव चार हजार, खंडेराव दोन, येणें प्रमाणें दहा बारा हजार फौज व श्रीमंतांचे बुनगें जामदारखाना वगैरे व आबाजी महादेव व सखाराम हरी व मानाजी फाकडे सदाशिव रामचंद्र असे एकत्र होऊन मनसबा करून जैतपुराकडे जावें असें करून दोन मजली गेले. पुढें झाडी फार, निभाव होईना, तेव्हां खंडेराव गायकवाड यांचे गुजारतीनें बोली लाविली. ' आपला बंदोबस्त करून द्यावा. सर्वांचा ज्याचा त्या प्रमाणें बंदोबस्त करून द्यावा. ' ये विशीं राजश्री खंडोपंत निसबत खंडेराव गाइकवाड यांसी पाठवून बोलणें बोलून माघारीं पत्रें गेलीं. कराराप्रमाणें कबूल करून दोन मजली अलीकडे आले. तेथून वीस कोसांवरी आले आहेत. मशारनिल्हेकडील गुंता आठ चार रोजानीं उरकेलसें दिसतें. अत:पर गुंता नाहीं. हा गुंता उरकल्यावरी श्रीमंताकडील मनसबा जो करणें तो होईल. त्यानीं देहावरी येऊन सल्ल्याचें बोलून गुंता उरकिला तरी उत्तम आहे. नाहीं तरी कांहीं फौज फत्तेसिंग गाइकवाड याजपाशीं ठेऊन बंदोबस्त करून वैशाखमासीं माघारे फिरतील. या प्रमाणें वर्तमान आहे. शिंदे मात्र निरोप घेऊन गेले. होळकर येथेंच आहेत. बरकड लष्करांत खर्चाचे-

१ राजपुतान्यांत.

चाविशीं कांहीं चिंता न करावी. येथें रुपये घेऊन पुण्यास चिठ्या दिल्या. पंचवीस (हजार) पर्यंत घेतले. आतां कांहीं प्रयोजन नाहीं. लष्करांत लूट (मिळत) आहे. दाणा आठ पायली दर रुपयास आहे. काटे मात्र दररोज दहा वीस घोडीं नेतात! चोरांचा व काऱ्यांचा उपद्रव फार! वरकड कांहीं चिंता नाहीं. आमच्या यजमानाच्या शरीर भावनेचें वृत्त लिहिणें ह्मणून लिहिलें, त्यांस आर्षांची पीडा झाली होती. सध्यां आरोग्य आहे. फार नव्हतें. त्या जागेस दाह मात्र होत होता. आठ दिवस फारच वाखा झाला होता. आतां कांहीं चिंता नाहीं. विशेष जाहलें नाहीं. किंचित आग जळत्ये. औषधें अद्याप वर चालतात. औषधें चालतात ह्मणून आपण चिंता करतील तरी न करावी. कार्याकारण औषध देतों. पथ्यही कार्याकारण करितात. शरीरेंकरून चांगले आहेत. लग्न करणेंविशीं नित्य चर्चा काढितों. परंतु यंदा दुसरे वर्षीं लग्न करूं नये आणि दुखणें निःशेष झालें नाहीं, याकरितां लग्न करीत नाहीं असें ह्मणतात. परंतु नवरीच्या शोधांत असावें. दुसऱ्या वर्षाचा गुंता नसिला तरी परिछिन्न नवरी आणावी. इकडील गुंता वैशाखी पौर्णिमेपर्यंत उरकिला तरी जेष्ठ वद्यांत लग्न होईल असें आहे. कळावें. वरकड सविस्तर वर्तमान यजमानाच्या पत्रावरून कळेल. येथून खंबायत दक्षिणेस बारा कोस आहे. अमदाबाद उत्तरेस बारा कोस आहे. आजच रास्ते यांसीं सुरतेच्या सुमारें रवाना केले. तिकडे सरकारच्या तालुक्यास कांहीं उपद्रव इंग्रज लावील याजकरितां त्यांची रवानगी झाली. त्याणीं जाऊन अंकलेश्वरच्या सुमारें रहावें. इकडील गुंता उरकल्यावरी बरोबरच देशास येतो. छावणी होत नाहीं. चिंता न करावी. बहुत काय

१ काठेवाडचे लोक. २ मूळव्याधीची. ३ वामनरावाची पहिली स्त्री आदले वर्षीं मेली होती सबब.

लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

नं० १४५१ (२० एप्रिल.)

विष्णु नारायण हैसकर मुक्काम कल्याण यांचें
पांडुरंगरावास पत्र. चैत्र वद्य ९ चें.

" साष्टीस इंग्रज आहे. सरकारची फौज बाहेर तीन कोसांवर आहे परंतु खाडी पलीकडे जाऊन त्यांस अद्यापि जरब पोंचत नाहीं. इंग्रज ह्मणावा तरी साष्टींत पांचशें जमाव आहे. या प्रांतीं कोळी यांची धामधूम फार झाली आहे. कोळवण प्रांतांतील एक दोन किल्ले त्यानीं घेतले.

नं० १४५२ (चैत्र वद्य १४
२८ एप्रिल.)

विनंती सेवक महादाजी बल्लाळ कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ता० छ० २७ सफर पावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. काल पुरंधराहून पत्रें आलीं त्यांत ' श्रीमंत राजश्री दादासाहेब खंबायतास आहेत. वरकड इकडील फौजा राजश्री हरीपंत फडके व आमची मंडळी भावनगरीं आहेत. राजश्री गोविंदराव गाइकवाड व सखाराम हरी व आबाजी महादेव वगैरे हरीपंताकडे यावयाचा विचार झाला आहे. सुरतेनजीक अंकलेश्वर वगैरे तीन ठाणीं सरकारचीं होतीं तीं सुरतेच्यानीं घेतलीं त्यांजवर हरीपंतानीं राजश्री नारोपंत केसकर यांसीं दीड हजार स्वारांनिशीं रवाना केले आहेत. कांगोरीचे किल्लेवर वासुदेव बाबा होते तेथून बाणकोटास इंग्रजांचें ठाणे हरेश्वराजवळ आहे तेथें गेले. या प्रमाणें पुरंदराहून पत्रें आलीं. अशेरीच्या किल्ल्यास सौभाग्यवती आनंदीबाईनीं फितूर केला होता ते लोक सांपडले. त्यांतील दहा वीस लोक जगन्नाथपंत यानीं जिवें मारिले. राजश्री शिदोपंत पिंपळखरे यांस अशेरीस ठेविले

---

१ हा कुरुंदवाडकरांचा कारभारी. याचें हें कोन्हेररावास पत्र.

आहेत ते ही फितुरीच्या फंदांत होते. त्यांसही अटकेंत ठेविलें. या प्रमाणें वर्तमान. उत्तुरकरानीं ठांसून राखिलें. काल आजी बातमी आली नाहीं. स्वामीचे आज्ञेप्रमाणें कापशीचे जाबसाल लिहून दिले. राजश्री विठ्ठलपंत सांगतां विदित होय हे विज्ञापना.

नं० १४५३ श्री (२ मे)

चिरंजीव राजश्री दादा यांसीं प्रती लेक्ष्मीबाई अनेक आशीर्वाद उपरी येथील क्षेम तागायत वैशाख शुद्ध ३ पर्यंत वर्तमान यथास्थित असे. विशेष. राजश्री येसाजी शिंदे नि॥ करवीरवासी महाराज याणीं फौज सुद्धां चालून येऊन नित्य आमचीं व त्यांचीं झुंजें होत आहेत. प्रसंग फार कठिण. याजकरिता तेथें राजश्री नानाच्या कानावर घालून लौकर बंदोबस्त होय तें करावें. ये विशीं तुह्मांस वरचेवर लिहीत गेलों त्याजवरून तिकडून राजश्री कोन्हेरराव यांची नेमणूक होऊन येथें येतांच करवीरची फौज येथील शह सोडून निघाली. तों कोन्हेररावही फौज सुद्धां त्यांचे पाठीस लागले. तेव्हां त्यांची व यांची गांठ तांदुळवाडीवर पडोन काल दोन प्रहरीं मोठें झुंज जाहलें. त्यांत कोन्हेरराव यांचे डाव्या पायास मांडीस गोळीची जखम लागली. खैर आहेत. आणखी किती एक बारगीर वगैरे दहा पांच माणूस कोन्हेरराव यांजकडील ठार पडले व जखमाही लागल्या. तसेंच करवीरकराकडील ही पांच पंचवीस मनुष्य जखमी व ठार मिळोन खराब जाहलें. शेवटीं कोन्हेरराव यांचा सरंजाम थोडा असतांही मोठी मर्दुमी करून करवीरकरांचा अगदीं मोड करून पळविलें आणि आज येथें नदीवर मुक्कामास आले. आह्मी ही गेलों

१ आजरें परगण्यांतील उत्तूर हें ठाणें करवीरकरांनीं वेढिलें होतें तेथील लोकानीं. हा परगणा इचलकरंजीकरांचा. २ नारायणराव व्यंकटेश यांची स्त्री.

होतों. भेट जाहली. त्यांत फारप्रकारें पूर्व स्मरोन अगत्याचेंच भाषण त्यानीं केलें. नंतर "सरकार आज्ञा तो आहेच, परंतु आमच्याकरितां जखम वगैरे लागून आपणास बहुत हैराणगत जाहली" ह्मणोन आह्मी ही बोललों. इतकें ऐकून "असें आपण कधीं ह्मणों नये. काय तो आशीर्वाद मातुश्री बाईचा. त्यांच्या पुण्यानें आह्मांस यश येणें तें यावयाचें श्रीमंतांचें पाय ही बाईच्या योगें, त्या पेक्षां आपल्या कार्याविशीं शरीर ही खर्च जाहलें तथापि अवघड नाहीं." असें (ते) बोलिलेवर आह्मीं निघोन आलों. जाहला मजकूर तुह्मांस कळावयाकरितां लिहिला आहे. राजश्री नानाच्या ही कानावर घालावा. आतां करवीरकराच्या उपद्रवाविशीं काळजी करूं नये. लौकरच तह ही होईल. दोन दिवशीं जखम शेजेस येतांच कोन्हेरराव येथून कूच करून करवीराकडे जाणार आहेत. या समयीं स्थळ राहणें कठीण होतें. शिबंदी खर्चाच्या पेचांत सर्वस्व जिनगानी भरीस घातली तरी खर्चास नाहीं अशी अवस्था जाहली; तेव्हां मिरजेहून राजश्री तात्या याणीं आमच्या सूचनेची ही वाट न पाहतां लागेल तितका पैका पुरवून हरएक रीतीनें कुमक केली. समयास तुह्मीं येथें नाहीं ह्मणोन कोणतेही राहिलें नाहीं. व राजश्री नानास ही त्यांणीं मजकूर लिहिला आहे. तुह्मी ही कळवावें. सारांश तात्यानीं अभिमान धरून जागा राखिली याचा तपशील किती लिहावा! वडील मिरजेस सुखरूप आहेत. येथें चिरंजीव सौभाग्यवती बैया व सगुणा उभयतां सुखरूप आहेत. तिकडील वृत्त सविस्तर लिहावें. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

मिती वैशाख शु० १० सन खमस सबैन.

---

१ इचलकरंजी. २ पांडुरंगराव गोविंद. ३ अनूबाई. ४ या दोघीही पत्र लिहिणारी लक्ष्मीबाई हिच्या मुली ह्मणजे अर्थात् व्यंकटरावाच्या बहिणी.

नं० १४९४ श्री (३ मे.)

श्रियासह चिरंजीव राजश्री नाना फडणीस यां प्रती अनूबाई. अनेक आशीर्वाद. उपरी येथील कुशल तागायत वैशाख शुद्ध ४ जाणून स्वकीय कुशल लेखन करीत गेलें पाहिजे. विशेष. राजश्री येसाजी शिंदे यानीं पत्रें पाठविलीं तीं आपणाकडे पाठविलीं आहेत. बापूंचे[1] पत्रांतील आशय व आपाजीपंताचे पहातां सर्वही येथून कळूनच होतें! पत्रांत निमित्य ह्मणावें तर, आमचा कारकून शाकभाजी घेऊन भेटीस गेला असतां कैद करून ठेविला! तेंव्हां लिहिला प्रकार सर्वही लबाड दिसतो. त्यांचा मनसबा इचलकरंजी आदिकरून सर्वही ध्यावीं. दोनवेळ आह्मीं पेंचांत आलों. आमची अब्रू रक्षण करणारें एक आपणा-शिवाय दैवत जाणत नाहीं. वृद्धापकाळीं आह्मांस काल आला. त्या पेक्षां मरण उत्तम होतें. परंतु मी दैवहीन! चिरंजीव नाना[2] भाऊ माधवराव नारायणराव जाऊन आमची अशी अवस्था व्हावी!! दैवास इलाज नाहीं. आतां आपणावर सर्वही भार आहे. त्यांची फौज जमली. आमचा जथ पाडिला पाहिजे. चिरंजीव राजश्री पांडुरंगराव[3] तात्यास आपण कुमेकविशीं पत्र दिलें. त्यानीं ही पूर्वीं आह्मीं कोण कोणाचीं हें समजून यथाशक्तीनें पेशजी ही उत्तम प्रकारें साहित्य केलें. व हल्लीं करीतच आहेत. मुख्य गोष्ट विस्तार कोठवर लिहावा! मिरजकर व इचलकरंजीकर व पुरंदरकर ह्मणून आपाजीपंताचे पत्रांत आशय. त्यांतील अर्थ पहातां आह्मीं व मिरजकर एक, तुह्मीं ही कृपा आह्मांवर करितां, तेंव्हां त्रिवर्ग एकत्र केलीं असें दिसतें. आपण सुज्ञ. पत्रें वाचून पाहिलेवर सर्वही कल्पना व आशय समजतील. आमचीं ठाणींठुणीं घेतलीं तीं त्यानीं सर्वही देऊन पूर्ववत प्रमाणें चालेसें पक्कें केलें शिवाय

---

१ सखाराम बापू. २ नानासाहेब पेशवे वगैरे. ३ पटवर्धन मिरजकर.

जमाव सोडता नये; तेव्हां पैका शिबंदीस कोठील? माझा भरंवसा प्रमाण असलेस वस्तभाव आदिकरून मोडिली. सरकार तालुकेंत रोखेपत्र करावें याचा आशय करवीरकरांच्या पत्रांत आहे. पत्र सरकारचें व आपलें त्यानीं मानिलें नाहीं त्याजवरून आह्मीं खेडेंवर स्वारी केली. जमाव थोडा. आपण कुमक जलद पाठवावी व तेथें उभयतां आहेत त्यांस उत्तम प्रकारें नेट बसवावा व पत्रें आलीं आहेत हीं त्यास दाखवून निषेध करावें. बहुत काय लिहिणें कृपा लोभ कीजे हे आशीर्वाद.

नं० १४५९ श्री (९ मे.)

चिरंजीव राजश्री दादा यां प्रती अनूबाई आशीर्वाद. उपरी ता॥ चैत्र शुद्ध पंचमी बुधवार पर्यंत वर्तमान यथास्थित असे. विशेष. दोन तीन पत्रें तुह्मांस पाठविलीं त्याचें उत्तरच नाहीं! इकडील वर्तमान तरी राजमंडळची[1] फौज सालवणाहून कूच करून भुदरगडानजीक गारगोटीस जाऊन उतरले होते. भुदरगडकर याणीं सामोरे येऊन राजे यांस किल्लेवर घेऊन गेले. राजश्री राणोजी शिंदे किल्लेवर सांपडले. थोडकी फौज कापशी अलीकडे गलगलेचे नदीवर उतरली होती. त्याणीं कापूस घोळचे गांव झाडून जाळून टाकिले. कापशी मात्र राखली आहे. श्रीमंत राजश्री सेनापती कुटुंबसुद्धां राजदर्शनाकरितां गारगोटीचे मुक्कामास गेले तंव राजे अगोदरच किल्लेवर चढले. त्यावर दोन तीन रोज "भेटीस येतों" ह्मणोन यांजकडून संधान लागलें परंतु राजे यांची आज्ञा नाहीं! काल मंगळवारी गडावरून कुच करून सामानगडाकडे गिजवणेचे मुक्कामास गेले. सेनापती शेणगांवचे मुक्कामीं होते ते आज गिजवणेचे मुक्कामास जाणार होते. अद्याप भेट जाहली नाहीं. या प्रमाणें मनुष्याची अनास्था आणि अनादर आहे! गिजवणेचे मुक्कामास जाताना उत्तुरावरून

१ राजमंडळच्या खेड्यांवर. २ करवीरकरांचे वकील.

खासा स्वारी गेली. उत्तूरचे तळेवर खासे उतरून दोन घटका बसले होते या करितां राजश्री बाबूराव शंकर भेटीचा जिन्नस घेऊन भेटीस गेले. नजर ठेविली. भेटीचा जिन्नस ही राजे यानीं घेतला आणि मुक्कामास येणें ह्मणोन आज्ञा केली. व आह्मीं महाराजांस विनंती पत्र लिहून राजश्री बाळ सावंत कारकून यांस पाठविलें होतें ते ही तेच दिवशीं अगोदर जाऊन भेटले होते. गिजवणेचे मुक्कामास दोघांस ही नेऊन "आजरें उत्तूर दोन्हीं ठाणीं खालीं करून देणें" ह्मणोन बसविले आहेत. आजरें प्रांतीं दुतर्फी खेडीं जमीदारांकडे दोन्हीं अमलदारांकडे होतीं त्यास सर्वांनीं सरकारचीं ठाणीं घेतलीं. मौजे आरदाळ एक तर्फी आह्मांकडील गांव त्यास ही निशाण पाठविलें होतें. त्याणीं निशाण घेतलें नाहीं. परंतु त्यांची फौज भारी. तोफेचे सलाबतीमुळें ठाणीं अवसान सोडिनात. या प्रमाणें जाहलें वर्तमान तुह्मांस कळावें ह्मणोन लिहिलें आहे. कागदपत्र घेऊन कारकून जातात त्यास कोणी कैदींत ठेवितात हें ऐकिलें नाहीं! परंतु सांप्रत यांची वर्तणूक या रीतीची आहे. राजश्री सखारामपंतांचें ताकीदपत्र व कारकून घेऊन पाठवणें ह्मणोन तुह्मांस लिहिलें होतें परंतु अद्याप पाठविलेत नाहीं. आह्मी दरबारचे भरंवसेवर शिबंदी दूर करून मोकळे दरवाजेनें आहों. कोणास कुमक अगर पत्रही पाठवीत नाहीं. देशमुखीचे रोखे करीत नाहीं. असें असतां त्यांजकडूनच उपसर्ग जाहल्यास पुढें उपाय काय? आजरें प्रांत कोंकणी खेडीं. लष्करचे दळणवळणेंच खराब जाहलीं. ठाणी मात्र जतन करून आहेत तेथें ही या प्रकारचा उपसर्ग होतो. हा मजकूर तुह्मी राजश्री नाना फडणीस यांस पुसोन कारकून पत्रें घेऊन जलदीनें पाठवावें. नाहीं तर यांचा विश्वास पुरत नाहीं. आजपर्यंत शिबंदीचे पेंचांत येऊन ठाणी जतन केली ते आतां गमावलेवर सर्व गोष्टी निर्फळ

व लौकिक ही विरुद्ध जाहला आहे. या उपर पत्र पावतांच आधी ताकिदी घेऊल पाठवणें. श्रीमंत राजश्री सेनापतींचें पत्र आह्मांस आलें तेंच बजिन्नस पाठविलें आहे त्यावरून निवेदन होईल. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

पै॥ दशमी.

नं० १४५६ श्री मे. प० पंधरवडा.

राजश्री येसाजी शिंदे गोसावी यांस.

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्नेहांकित सखाराम भगवंत. आशीर्वाद विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय लिहीत गेलें पाहिजे. विशेष. राजश्री व्यंकटराव घोरपडे यांजकडे मौजे लाट व रांगोळी हे दोन गांव इनाम व देशमुखी व सरदेशमुखी व शेतें कमतें आहेत यांस तुह्मी एकंदर उपद्रव न देणें ह्मणून पेशजी तुह्मांस पत्र लिहून पाठविलें असतां तुह्मी उपद्रव देऊं नये. त्यास हल्लीं तुह्मांकडून स्वारी होऊन मशारनिल्हेचे खड्यांची कैही शेतें कापून नेली, व गुरें नेली, व वतन जप्त केलें. व मौजे उत्तूर येथें मोर्चे लाविले आहेत ह्मणोन कळलें. तरी हे गोष्ट उत्तम नव्हे. मशारनिल्हेचे खड्यांस व वतनदारीस व शेतां कमतांस या उपरी उपद्रव एकंदर न देणें. मागें उपद्रवामुळें वसूल घेतला अगर गुरें ढोरें नेली असतील तीं माघारी देविणें. एक दोनदां लिहिलें असोन लिहिल्यान्वयें करण्यांत न आल्यास ती गोष्ट चांगली नव्हे. आह्मी पहिलेंदां लिहिलें होतें की, आह्मासाठीं हे गोष्टी जरूर ऐकावी; ह्मणून लिहिलें असतां या प्रकारें करितां हें कांहीं ठीक नव्हे. या उपरी आह्मी कांहीं भीड घालणार नाहीं. यांचा बोभाटा नये ऐसें जरूर

१ दाणावैरण. २ येथून खास दस्तुरचा मजकूर. अक्षर अगदीं वाईट आहे.

करावें. मातुश्री अनूबाईचा वृद्धापकाळ, भिडेकरितां ऐकावें लागेल, हें जरूर जाणूनच लिहिलें होतें व हल्लीं ही लिहिलें आहे. तर या उपरी एकंदर बोभाट न येईसें करावें. हें आमचें ऐकून शेवटास न्यावें लागेल. अगत्य जाणून विस्तारें लिहिलें आहे. कळावें. बहुत काय लिहिणें लोभ असो देणें हे विनंती.

नं० १४९७ (१० मे.)

लक्ष्मीबाईचें रघुनाथराव नीलकंठ यांस पत्र— वैशाख शु. १० चें— "करवीरवासी महाराज याणीं येऊन इचलकरंजीस वेढा घातला. रोज गोळागोळी होतच होती. तों नाना फडणीस याणीं पुरंदराहून महाराजांच्या बंदोबस्ताकरितां राजश्री कोन्हेरराव यांस पाठविलें. ते येतांच वेढा उठवून चालिले. कोन्हेररावानीं पाठलाग करून काल दोन प्रहरीं तांदुळवाडीवर महाराजांच्या फौजेशी गांठ घालून त्यांचा पराजय केला. त्याच्या डाव्या मांडीस गोळीची जखम लागली आहे पण खैर आहेत. इकडील पांच पंचवीस लोक ठार झाले व कांहीं जखमी ही आहेत. परंतु महाराजांचा रेंच चांगलाच मोडिला.

नं० १४९८ श्री (मे. प० पंधरवडा.)

चिरंजीव राजश्री नाना फडणीस यांसीं प्रती अनूबाई आशीर्वाद. उपरी येथील कुशल तागायत वैशाख शु० जाणून स्वकीय कुशल लेखन

---

१ नारायणराव व्यंकटेश घोरपडे इचलकरंजीकर यांची स्त्री. २ कुरुंदवाडकर. ३ अनूबाई घोरपडे इचलकरंजीकर ही पहिले बाजीराव पेशव्यांची बहीण. हा तिनें पाठविलेल्या पत्राचा मसुदा पांडुरंगराव पटवर्धन यांचे हातचा आहे.

करीत असलें पाहिजे. विशेष. राजश्री येसाजी शिंदे यांनीं पत्रें पाठविलीं तीं आपणाकडे पाठविलीं आहेत. बापूंचें पत्रांतील आशय व आपाजीपंताचे पहातां सर्वही तेथून कळूनच होतें. (येसाजी शिंद्याच्या) पत्रांतील खरें ह्मणावें तर आमचा कारकून शाकभाजी घेऊन भेटीस गेला असतां कैद करून ठेविला तेन्हां लिहिला प्रकार सर्व ही लबाड दिसतो. त्यांचा मनसबा इचलकरंजी आदिकरून सर्व ही घ्यावें. दोन वेळ आह्मीं पेंचांत आलों. आमची अब्रू रक्षणें एक आपणा शिवाय दुसरें दैवत नाहीं. नाना! वृद्धापकाळीं आह्मांस (असा संकटाचा) काल आला त्यापेक्षां मरण ही उत्तम होतें! परंतु मी दैवहीन! चिरंजीव नाना, भाऊ, माधवराव, नारायणराव जाऊन आमची अशी अवस्था व्हावी!!! दैवास इलाज नाहीं! आतां आपणावर सर्व ही भार आहे. त्यांची फौज जमली. आमचा नवा जथ पाडिला पाहिजे. चिरंजीव राजश्री पांडुरंगराव तात्यास आपण कुमकेविशीं पत्र दिलें. त्यानीं ही पूर्वी आह्मी कोण, कोणाचीं, हें समजोन यथाशक्तीनें पेशजी ही उत्तम प्रकारें साहित्य केलें व हल्लीं ही करीत आहेत. मुख्य गोष्ट, विस्तार कोठवर लिहावा! ' मिरजकर व इचलकजींकर व पुरंदरकर ' ह्मणून आपाजीपंताचे पत्रांत आशय; त्यांतील अर्थ पाहतां आह्मीं व मिरजकर एक. तुह्मी ही कृपा आह्मावर करितां तेन्हां त्रिवर्ग एकत्र केलीं असें दिसतें! आपण सूज्ञ. पत्रें वाचून पाहिलेवर सर्व ही कल्पना व आशय समजतील. आमचीं ठाणीं ठुणीं सर्वही [परत] घेऊन पूर्ववत प्रमाणें चालेसें पक्कें केले शिवाय जमाव सोडतां नये. तेन्हां पैका शिबंदीस कोठील? माझा भरवसा असल्यास [आह्मी जवळची] वस्तभाव आदिकरून [सुद्धां] मोडिली.

१ करवीरकरांचा मुख्य सरदार.

सरकार तालुक्यांत ही रोखें पत्र करावें याचाही आशय (त्यांच्या) पत्रांत आहे. त्यानीं सरकारचें व आपलें मानिलें नाहीं त्याजवरून [आह्मी] त्यांच्या खेड्यावर स्वारी केली. [आमचा] जमाव थोडा. आपण कुमक जलद पाठवावी व तेथें उभयतां[1] आहेत त्यांस उत्तम प्रकारें नेट बसवावें.

नं० १४९९ श्री वैशाख वद्य ३

१८ मे)

सेवेशीं शिवाजी बाबाजी साष्टांग नमस्कार विनंती: राजश्री हरीपंततात्यांचीं पत्रें छ· १७ रबिलावलचीं काल अमावास्येस संध्याकाळीं आलीं त्यांतील प्रकार--श्रीमंत राजश्री दादासाहेब नडियादेवर होते. आपल्या फौजा भोंवताल्या होत्या. ज्या दिवशीं कूच होईल त्या दिवशीं युद्ध करावें असा निश्चय होता. त्यास कूच माघारें करून खंबायतच्या रोखें चालिले. त्या दिवशीं युद्ध हुजरातीचेंच फार करून झालें. इंग्रज तिनशें पावेतों कापून काढिले. जखमी ही फार झाले. (इंग्रजाच्या) तोफा सोडविल्या. परंतु (आपले) लोक लुटीस लागले, बैल सोडुन आणिले तोफा सोडुन आणावयास फुरसत झाली नाहीं. गाड्यांस आगी दिल्या. इतक्यांत इंग्रजानीं सावर खाऊन तोफांपाशीं पावले. तोफा तशांतच सांभाळून ओढून[2] त्यानीं नेल्या. युद्ध मोठें झालें. राजश्री आनंदराव गोपाळ व मालोजी घोरपडे वगैरे पांच सात हुजरातीचे जखमी आहेत. फार करून हुजरातीचें कामकाज जहालें. हुजराती प्रमाणें वरकड सरदारानीं निकड केली असती तरी कामच झालें होतें असें लिहिण्यांत आहे· तोंड झुजाचें

१ करवीरकरांचे वकील महादेवशास्त्री व आपाजी शामजी तेथें पुरंदरास आहेत त्यास. २ हिसकून घेतल्या.

इंग्रजांशीं बिघाड.

लागलें तेव्हां एकी बाजूनें एक टोळी आपल्या फौजेची गेली तेव्हां इंग्रजानीं हरी भिडे व रामचंद्र तुळपुळे यांसीं पुसिलें. त्यांनीं न समजोन टोळी मानाजी शिंदे यांची ह्मणून सांगितलें. त्यांनीं दाटी करून हत्यार लाविलें तेव्हां इकडील असें समजल्यानंतर उभयतां फितव्यांत आहेत हें चित्तांत आणून गळे कापिले! आणि श्रीमंताकडे सांगोन पाठविलें कीं फितव्यांत होते ह्मणून पारपत्य केलें. त्याणीं उत्तम ह्मणोन सांगितलें! त्याजवरून तिकडील सर्वत्रांस इंग्रजांचें भय प्राप्त झालें आहे ह्मणून बातमीच्या पत्रांत आहे. कळावें सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं० १४६०

[वैशाख वद्य मे दु० पंधरवडा.]

वामनरावाचें पांडुरंगरावास पत्र.

" जेष्ट अखेर आह्मी देशास येत आहों. सात आठ हजार फौज व बाजीपंत अण्णा यांस येथें छावणीस ठेवणार. "

नं० १४६१ श्री (१९ मे)

अपत्यें[1] बाळाजी जनार्दन. साष्टांग नमस्कार विनंती तागायत छ० १४ रबिलावल पावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपण दोन तीन पत्रें पाठविलीं तीं पावलीं. करवीरकरांचे उपद्रवाविशीं लिहिलें, त्यास येथून राजश्री कोन्हेरराव पांच हजार फौजेनिशीं रवाना केले आहेत. व त्यांकडील[2] बोलणेंही लागलें आहे. लौकरच बंदोबस्त होईल. आपण

१ नाना फडणीस यांचें अनुबाईस पत्र. २ करवीरकरांकडील. ३ त्र्यंकटरावदादा

काळजी करूं नये. सविस्तर राजश्री दादा[1] लिहितील त्यावरून कळेल लोभ करावा हे विनंती.

नं० १४६२ [वैशाख वद्य ११
२५ मे]

रघुनाथराव निळकंठ यांचें पांडुरंगरावास पत्र
छ० २४ रबिलावलचें—

" श्रीमंत राजश्री दादासाहेब इंग्रजास अनुकूल करून घेऊन आल्यानंतर एक दोनदां लढाई बरीच झाली. त्यांत वैशाख वद्य चतुर्थीस लढाई चांगलीच झाली. दोनशें तीनशें माणूस फिरंगी व गारदी मिळोन जिवेंच मारिलें. शें दोनशें जखमी ही झालें. सरकारचे फौजेनें बाडगांचें रान अडचणीचें असतां घोडीं घातली याजमुळें इंग्रज फार जाया झाला. आह्मी श्रीमंतांच्या पिछावर जातच आहों. दोन तीन झुजांत आमची सर्व मंडळी खैर आहे. "

नं० १४६३ [२६ मे]

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके १०१ मन्मथनाम संवत्सरे वैशाख बहुल द्वादशी भृगुवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिव छत्रपती स्वामी यांणीं पुण्यशील अनूबाई यांस आज्ञा केली ऐसीजे, राजश्री प्रधान पंताकडील मुळींपासून करार व क्रिया पत्रें ज्या ज्या कारकीर्दीस जसजशीं आहेत तीं तुह्मांस सर्व दखल असतां व प्रधानपंतांच्या घराण्यांत तुह्मी वडील असतां ज्यांत क्रियेस त्यांच्या अंतर न पडे आणि स्वामी मर्यादा राहे अशी रीत जे असेल ती समजोन देऊन तदनुरूप वर्तणूक घडे असें करावें हें तुमच्या

---

१ व्यंकटरावदादा.

वयास योग्य, आणि तुह्मांवरी सरकार कृपा होणेंचें ही कारण; परंतु तें ध्यानांत न आणितां त्यास गैर समजाऊन प्रधानपंत निसबत कारभारी यांजकडून अमर्यादेचेंच प्रवर्त करवितां. सरकारी तालुकियांतील फितूर वखेडेखोर मानाजी बागुल वगैरे यांसीं आश्रा व कुमक देऊन अमर्यादा करविली त्याचाही करार मदार उभयतां कारभारी याणीं पंधरा दिवसांचा करार ठरावून दिला त्याप्रमाणें ही मानाजी बागुल वगैरे तुह्मांकडील जाबसालाचा फडशा झाला नाहीं. उत्तुरांतील लोकांकडून गैर जाबसाल जाहला याजमुळें फिरोन लढा पडला तो एकीकडे ठेऊन राजश्री रामचंद्र मोरेश्वर पुरंदराहून तुह्मी आणविले ते येतांच तुमचे निसबतीच्या तालुक्यांतून फौज आणवून उपसर्ग बंद जाहला असतां अद्यापि तुह्मांकडून अमर्यादा होणें ते होतच आहे! आणि पुरंदराहून वेदशास्त्र संपन्न राजश्री महादेव शास्त्री आले त्याणीं विनंती केली तदनुरूप उभयतां कारभारी यांसीं आज्ञा होणें ती जाहलीच आहे. परंतु तेथून जावसाल ठराऊन येई तंव पावेतों तुह्मांकडून अमर्यादेचा बंदोबस्त होणें आहे किंवा हल्लीं चालतें त्या प्रमाणें वर्तणूक करावयाची आहे हें समजोन विनंती लिहिणें ती लिहावी. तुमचे प्रत्योत्तराची विनंती आले प्रमाणें येथोन ही होणें तें होईल. पूर्वीं बाळाजी[1] पंडित व बाजीराव पंडित याणीं सरकार मर्यादा कशी रक्षिली आणि फळें ही तदनुरूप स्वामीकृपेंकरून ईश्वरें कोणत्या प्रकारें दाखविलीं हें तुह्मांस समजतच आहे. अलीकडे तुह्मां लोकांच्या सांगण्यामुळें लोभास प्रवर्तोन बाळाजी पंडित व माधवराव पंडित व नारायणराव पंडित याणीं ज्या ज्या समयीं अमर्यादा करावयाची चित्तांत आणोन निकर्ष केला त्या त्या समयीं हें राज्य श्री भवानी शंकरें कोणत्या रीतीनें रक्षिलें हें सर्व तुह्मांस न समजेसें नाहीं! आतांही तुमच्याच मनोदयानुरूप

१ बाळाजी विश्वनाथ.

भवानी शंकर सरकार उपेक्षा करील असें समजोन न घेणें! यांत तुह्मांस योग्य दिसेल तेंच करणें. येथील सविस्तर पेशजी राजश्री बाबूराव जगजिवन यांसीं आज्ञा केली.

वार सुरु सु॥ वार संमत सुरुबार.

नं० १४६४

[वैशाख वद्य १२
२६ मे]

वामनराव गोविंद यांचें पांडुरंगरावास छ० २५ रबिलावलचें
बडोदे नजीकच्या मुक्कामाहून

" श्रीमंत दादासाहेब खंबायतेंतून बाहेर आल्यावर दोन लढाया झाल्याचें वर्तमान लिहून पत्रें पुरंदरास पाठविलीं आहेत तो मजकूर तुह्मांस समजलाच असेल. वैशाख वद्य चतुर्थीस श्रीमंतांशीं लढाई मातबर झाली. हुजरात व साऱ्या फौजानीं घोडीं घातलीं. तीन चारशें इंग्रज व गारदी मिळोन जिवेंच मारिलें. तीन चारशें जखमी झाले. इंग्रजाची हिंमत बरीच मोडिली. हुजरांत वगैरे मिळोन शें दीडशें घोडे सरकारचे जायां जाहले. मालोजी घोरपडे याणीं शिपाइगिरीची शर्थ केली. त्यांकडील खाशांच्या घोड्यासहीत दहा पांच घोडे ठार झाले. त्यांचे बंधु राणोजी घोरपडे ठार झाले. खाशांस गोळीची व तरवारेची जखम लागली परंतु खैर आहेत. घोड्यास व खाशास मिळून वेबीस जखमा लागल्या! घोडा ठार झाला. मालोजी बावानीं आपल्या लौकिकाप्रमाणें शिपाईगिरी केली! राजश्री जयवंतराव पानसे यांस गोळी लागली. इजा फार आहे. खैर होईलसे वाटतें. राजश्री आनंदराव गोपाळ यांस गोळ्याचा धबका लागला आहे परंतु खैर आहेत. त्यांच्या चिरंजीवास ही दोन गोळ्या लागून सलामत आहेत. आणखी हुजुरातींत शें पन्नास लोक जायां जखमी

आहेत. आह्माकडील तिन्ही पथकांचे मिळून दहा पंधरा घोडे ठार झाले व कांहीं जखमी आहेत. चिरंजीव राजश्री जनोबा यांस गुडघ्याचे खालीं संगीन लागोन जखम झाली. चिरंजीवानीं तरवार चांगली केली. हरीपंत भिडे श्रीमंतांकडील यांस इंग्रजानीं जिवें मारिलें. याचें कारण इंग्रजाची कैद अशी कीं, श्रीमंतांकडील स्वारानीं तमाम झाडपाल्याचे तुरे लावावे ह्मणजे आपले ओळखीचे अशी खूण करावी ह्मणून सांगितलें होतें. लढाईचे दिवशीं इंग्रजाजवळ हरीपंत भिडे लढाई पहावयासाठीं आले. तों आह्माकडील स्वार झाडपाल्याचे तुरे लावून इंग्रजांचे फौजेत शिरले. तों इंग्रजानें हरीपंतास हे स्वार कोणाचे ह्मणून पुशिलें तों हे स्वार आपलेच असतील असें बोलले. तों आमचे स्वारानीं जाऊन इंग्रजास मारिले. तेव्हां हरीपंतानींच दगाबाजी केली ह्मणोन दादासाहेबांस सांगून त्यांचे रुबरू इंग्रजानीं श्रीमंतांचें ह्मणणें मान्य न करितां हरीपंत भिडे यास जिवें मारिलें. श्रीमंतानीं व गोविंदराव गायकवाड यांनीं इंग्रजांची कुमक कांहींच केली नाहीं त्यामुळें इंग्रज त्यांजवर बहुत रुष्ट आहेत. इंग्रजाकडील चार पांच मातबर सरदार ठार झाले त्यांची घोडी दोन एक चिरंजीव भाऊकडे व एक सरकारचे सुतर स्वारांनीं पाडाव आणिलीं. सय्यद गोलंदाज सरकारचा चांगला होता तो ठार झाला. त्याचें इंग्रजानें डोचकें कापिलें! लढाईचे दिवशीं बाडगीचें रान अडचणीचें होतें. मैदानांत गांठ इंग्रजांची पडती तर फडशाच होता! या उपर गांठ पडल्या घरी चिकाटी सुटणार नाहीं असें समजून इंग्रजांनीं भडोजचा आसरा करावा ह्मणून मही उतरून दोन मजली जलद अलीकडे आले. आतां आह्मी श्रीमंत दादासाहेबांचे पिच्छावर आहों. महीचा आसरा धरितील,

---

१ वामनरावाच्या आणखी एका पत्रांत ' इंग्रजाकडील निशाण पाडाव आलें तें गारदी यांजसमागमें पाठविलें आहे. ' असा मजकूर आहे.

घांट बंद करितील असें वाटलें होतें. महीस मुक्काम न करितां निघाले तेव्हां इंग्रजाचा मनसबा भडोजचा आसरा करण्याचा आहे असें वाटतें. येथून भडोज तीस चाळीस कोस आहे. सर्वांनीं मिळोन आज उद्यां फिरोन इंग्रजाशी गांठ घालावी असें आहे. यांत श्रीसत्ता प्रमाण। इंग्रजाकडील दोन तोफा सोडविल्या होत्या परंतु तोफांचे बैल सोडून त्यांनीं नेले याजमुळें तोफा काढावयास फावले नाहीं. दारुगोळ्याच्या दोन पेव्या सांपडल्या त्या सरकारांत आणिल्या. तोफांचे कान्यांत खिळे मारून जायां करून टाकिल्या. तोफांचे गाडे जाळून टाकिले. माणसांनीं तोफा काढाव्या त्यास इंग्रजाची निकड झाली ह्मणून टाकिल्या. फिरंगी याची पलटणें दोन तांबड्या कुडत्याची, दोन काळे कुडत्याचीं, व दोन छिटाचे कुडत्याचीं. एकूण सहा पलटणें. दर पलटणास एक हजार माणूस या प्रमाणें सहा हजार माणूस व दहा बारा तोफा व गोरा पांच सहाशें असेल. बाकीचे माणूस गारदी व पंचमेळ कवाइतीचें तयार केलेलें आहे. एक पलटण शेलकें होतें तेंच अघाडीस आलें होतें तेच मारिलें गेलें. इंग्रजाची धमक बरीच होती परंतु त्यास (अमच्या) फौजेची कवाईत समजली. कोणी कोणी तिकडून एक दुसरें माणूस बातमीचें सांपडतें व गांवखेड्याचें येतें तें सांगतें कीं, इंग्रज याज उपर दम धरून राहत नाहीं. श्रीमंत दादासाहेब यांच्या फौजेचा इतबार नाहीं, कुमक करीत नाहींत, ह्मणून भडोजचा आसरा करावयास जातात ह्मणून सांगतात. पिच्छावर आह्मीं जातच आहों. मागाहून होईल तें लिहूं.”

नं० १४६९ **श्रीगणराज.** (वैशाख व. १४
२८ मे.)

चिरंजीव राजश्री तात्या व बळवंतराव यांसीं प्रती वामनराव गोविंद. आशीर्वाद उपरी येथील कुशल तागायत छ०२७ रबिलावल

मुक्काम डोकरे परगणे बडोदें वर्तमान यथास्थित असे. विशेष. मही उतरून आल्यानंतर चवदा पंधरा रुपये हुंडणावळ[1] झाली आहे. याज प्रमाणें आह्मीं पंधरा हजार रुपये घेऊन वरात पुणियास दिली. श्रीमंतास व आह्मांस तीन कोसांची तफावत होती. ते आज कूच करून भडोजचे सुमारें पांच कोस पुढें गेले. आह्मी पिच्छावर आजच कूच करून जावें तर मध्यें पाणी लष्करास पुरावयाजोगें नव्हतें ह्मणून कूच केलें नाहीं. उद्यां कूच करून पिच्छावर जात आहों. सविस्तर वर्तमान अलाहिदा पत्रीं लिहिलें आहे त्याजवरून कळेल. राजश्री मुधोजी भोंसले यांची व नबाबाची भेट झाली. नबाबाकडील फौज इकडे यावयाची आहे. मृगास तर चार दिवस राहिले. मनसबा तर अद्याप दीर्घच दिसतो! एका दो दिवशीं श्रीमंतांचा डौल कोणीकडे सरतात हें कळेल. भडोज येथून दहा कोस आहे. नर्मदेशिवाय दुसरें पाणी नाहीं. भडोज नर्मदा तीरीं आहे. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं० १४६६ (ज्येष्ठ शुद्ध १
३० मे)

परशुरामभाऊचें पांडुरंगरावास पत्र. २९ रबिलावलचें—

" श्रीमंत दादासाहेब इंग्रजास सामील करून घेऊन आलेवर एक दोन लढाया झाल्या. दोनही वेळ रेंच त्यांचा मोडला हें वर्तमान पूर्वीं लिहिलेंच आहे. श्रीमंत भडोचेस गेल्यावर त्यांची मसलत आहे कीं तेथून सरंजाम करून घेऊन पुण्यावर चालून जावें. पुण्यास न जातां इकडेच राहिले तर आह्मांसही छावणी करणें प्राप्तच होईल. पावसाळ्यांतच पुण्या-

---

1 शेंकडा कीं हजारी. बहुधा हजारी असेल.

कडे चालले तर आह्मांस नदी नाल्याची अडचण पडणार याकरितां नर्मदा दक्षिणतीरींच छावणी होईल. ”

नं० १४६७ [३० मे]

रघुनाथराव निळकंठ यांचें गंगाधररावास पत्र
ज्येष्ठ शुद्ध १ चें

“ श्रीमंत खंबाइतापासून निघाले त्या तागाईत श्रीमंत राजश्री दादासाहेब यांच्या व आमच्या दोन तीन लढाया झाल्या. परंतु ईश्वरें सर्वांस खैर केलें. नावालिनपाड्यावर लढाई झाली ते दिवशीं प्रातःकाळींच भोजन करून सारे निघालों. तों श्रीमंत आपला तळ सोडून आद कोसावर गेले तों आह्मीही पोंचलों. आह्मी व बाजीपंत आणा पुढें होतों. व राजश्री हरीपंततात्याही फौजेस लगतच पाठीमागें होते. तों अघाडीस राजश्री बाजीपंत अण्णानीं पुढें तोफा लाविल्या. तोफांचे दहा वीस बार होतांच इंग्रज चालून आले. मग आमच्या तोफा माघाऱ्या काढिल्या. इतक्यांत त्यानीं चालून घेतलें. मग त्यावर हुजरात उठली व बाजीपंत अण्णा व मालोजी घोरपडे ही उठले. जरी पटक्याचा हत्ती होता त्याव-रील महातास तोफेचा गोळा लागला व निशाणदारासही गोळ्या लागल्या. हत्तीसही दहा गोळ्या लागल्या. मालोजी घोरपडे यास पांच जखमा आहेत. आह्माकडील दहा वीस घोडे पडले. हुजरातीकडील दोनशें घोडे व शंभर माणूस ठार झालें. जयवंतराव तोफखाने यास गोळीची जखम आहे. ती० रा० बळवंतराव व जनोबा सुभेदार हे उभयतां लढा-ईत होते. उभयतांनीं काम काज उत्तम प्रकारें केलें. सुभेदाराच्या घोडीस गोळ्या लागल्या. बळवंतराव यास हातावर कराचलीचा वार लागला आहे. सुभेदारांस पाठीवर जखम आहे परंतु खैर आहेत. वडि-

त्यांचे आशीर्वादें करून यश आलें. "

नं० १४६८ श्री ४ जून १७७६.

विनंती सेवक महादाजी विठ्ठल. साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता॥ छ० ९ रबिलाखर सप्तमीपर्यंत स्वामीचे कृपावलोकनें करून वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामींनीं छ० २८ रबिलावलचें पत्र पाठविलें तें काल छ० ४ रबिलाखरीं पावलें. लिहिला मजकूर सविस्तर कळला. "राजश्री कोन्हेरराव फौजसुद्धां सरकारांतून रवाना केले या उपरी जीवादारभ्य श्रमसाहस करून आपलें कार्य करून घेणें." ह्मणून कितेक बुद्धिवाद निरोपिला. अशास जें होणें तें धण्याचें पुण्यप्रतापेंच होईल. आह्मीं सेवक. श्रमास अंतर करूं नये एवढाच प्रकार आहे. सेवक श्रमसाहसास किमपि अंतर करीत नाहीं. इकडील वर्तमान तर राजश्री कोन्हेरराव फौज सुद्धां छ०२८ रबिलावल मंगळवारीं कृष्णेवर मिरजेस आले. बुधवारीं प्रातःकाळीं राजश्री पांडुरंगराव तात्या मिरजेहून फौज व तोफा घेऊन येऊन अर्जुनवाड हल्लेनें घेतलें. ठाणेंतील प्यादे कापून काढिले. गांवत ठाणें घालून गुरुवारी कूच करून धरणगुत्तीस आले. तें ही ठाणें हल्ला करून घेतलें. शुक्रवारी प्रातःकाळीं मौजे हरोलीवर येऊन हल्ला केला. दोन वेळ निकड केली परंतु गांवांत तीनशें प्यादे होते त्यामुळें हल्ला लागू जाहला नाहीं. मग रात्रौ छबिना गांवा भोंवता ठेऊन दुसरे दिवशीं मोर्चेबंदी करणार इतकेंत गांवकरी प्यादे कौलास आले त्यामुळें प्यादे उतरून गांवांत ठाणें घातलें. रविवारीं काल तेथून कूच करून येथें आले. गांवानजीक गंगातीरानें मुक्काम केला आहे. काल

१ महादाजी विठ्ठल दातार फडणीस यांचें पुण्यास व्यंकटराव घोरपडे यांस पत्र इचलकरंजीहून.

सडी स्वारी रुईपर्यंत गेली होती. त्यांची फौज कांहीं बाहीर निघाली नाहीं. राजमंडळाकडील वर्तमान तरी कोडोलीचे ठाणेंत महाराज व कार्यभागी शिंदे आहेत. वरकड फौज वाडेचे व नदीचे मध्यें अडचणींत उतरली आहे. कालपर्यंत फौजेचा दंगा होता. पडे[१] घोडीं व रोजमुरें तटले या करितां शिलेदारांनी चार रोज अडवून बसविलें होतें. त्यांची समजाविशीं जाहली. ज्यास द्यावयाचें तें देऊन एक महिना पर्यंत दंगा करूं नये. असा करार करून शनवारी संध्याकाळी येसाजी शिंदे फौज सुद्धां निघोन तारदाळपर्यंत आले होते. हरोली घेतलेचें वर्तमान कळतांच माघारे आळतेस जाऊन उतरले शिंदे माघारे कोडोलीस गेले. त्याचे चित्तांत विवेक करावयाचा नाहीं. राजश्री कोन्हेरराव याणीं महाराजांस व मादभटजीस दोन तीन पत्रें पाठविलीं परंतु भटजीचे विचारें " पुरंदरची आज्ञाच नाहीं. असें असतां हे अमर्यादा करितात. त्यास पुरंदरचीं पत्रें आणून लाऊं. " ह्मणून धमक आहे! भटजीनीं नाना प्रकारें इकडील गिल्ला दरबारांत लिहिला आहे. तिकडून उत्तर येईल तदनुसार वर्तणूक करणार ह्मणतात. याकरितां दरबारीं आपण शोध करून उत्तरें काय देतात हें मनास आणावें. मनाचिठ्ठी न येई तो अर्थ करावा. अगोदर प्रांतांत ठाणीं घालावीं ते शहास गुंतलों याचें कारण काय ह्मणाल तरी शिरोळ जागा मातब्बर. तेथें चारशें प्यादा आहे. आठ चार रोज शहास बसावें लागल. त्याशिवाय आणखी बोरगांव वगैरे ठाणीं घालणार हा मनसबा होता. परंतु आह्मीं ठाणीं घालावयास शहास गुंतलों ह्मणजे करवीरकर फौज मिरज प्रांतांत पाठवून गांव मारावें गुरें वळावीं या मनसुबेंत होते. याकरितां मुख्यासींच गांठ घालून भ्रम काय असेल तो फेडावा याकरितांच या मुक्कामास कोन्हेरराव वगैरे आले आहेत. त्यांचा संशय

१ लढाईंत शिलेदारांचीं घोडीं पडल्यास त्यांचा पैका सरकारांतून मिळत असे.

फडलेशिवाय येथून दुसरे जागां जात नाहीं. शिबंदीचा प्रकार तरी खुद्द आमचे निसबत चार हजार राऊत व तीन हजार प्यादा आहे. खर्च अनिवार वाढला आहे. कर्ज या प्रांतांत मिळत नाहीं. स्वामींनीं तिकडून ऐवज पाठवावा तेव्हां नित्य खर्च चालावा. त्याशिवाय गत्यंतर नाहीं याकरितां जास्ती तरतूद करून ऐवज पाठवावा. आमची फौज व कोन्हेरराव व मिरजकर असे राऊत व प्यादे मिळोन बारा हजारपर्यंत जमले आहेत. आज इंदुवारीं सडी फौज तयार होऊन गेलों होतों. त्यांची फौज इंगळीचे खालीं अगोदर येऊन राहिली होती. तोफेच्या गोळागोळीचें युद्ध जाहलें. आह्माकडील एक घोडें जखमी जाहलें. या उपरी उदईक काय होतें तें लिहून पाठवितों. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं० १४६९ श्री [९ जून १७७५]

श्रियासह चिरंजीव राजश्री नाना[1] यांप्रती अनूबाई[2] आशीर्वाद उपरी तागायत जेष्ठ शुद्ध ११ पर्यंत वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपणाकडून राजश्री सदाशिवपंत आले त्याणीं सविस्तर मजकूर सांगितलेवरून कळला. राजश्री कोन्हेरराव यास आपण रवाना केले ते छ० २८ रबिलावल मंगळवारीं फौज सुद्धां मिरजेस येऊन तेथून इचलकरंजीचे मुक्कामास आले. मार्गीं करवीरकराकडील दोन तीन खेडीं उजाड होतीं तीं लष्करचे दंगेनें खराब जाहली. येथें आलेवर सडे फौजा तयार होऊन करवीरकर यांची फौज कोडोलीस आहे तेथपर्यंत जाऊन तलावा करून येतात. छ० ८ रबिलाखर बुधवारीं हे गोटापर्यंत जाऊन तोफांची मारगिरी करीत असतां त्यांची फौज चढाई करून यांजवर आले. युद्ध जाहलें. हे सांवर धरून माघारें आले. ते पाठीवर चढोन पंचगंगेपर्यंत एक कोस

१ नाना फडणीस. २ अनूबाई घोरपडे इचलकरंजीकर यांचें मिरजेहून पत्र.

आले. त्यांचें बळ भारी फौज आहे. व त्यांचे चित्तांत विवेक करावयाचा नाहीं. सरकारची फौज आणखी आली तरी युद्ध करणार हा त्यांचा मनसबा आहे. याकरितां आपण आणखी फौज पाठवून राजश्री कोन्हेरराव यांचा पुस्तपन्हा करून आमचा निर्वेध होय ते करावें. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं० १४७० श्री (१० जून)

सेवेशीं शिवाजी बाबाजी साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल तागायत जेष्ट शुद्ध द्वादशी मंदवासरे वर्तमान यथास्थित असे. विशेष. लष्करांहून पत्रें आलीं तीं ऐन जिनसी पाठविलीं आहेत. त्याजवरून सविस्तर कळेल. बाजारी वर्तमान युद्ध जाहल्याचें आलें होतें परंतु तें लटकें वर्तमान. श्रीमंत इंग्रज सुद्धां भडोजेस दाखल झाले. श्रीमंतां भोंवतालीं चौकी इंग्रजांची आहे. उभयतां खेरीज[1] कोणाशीं गोष्ट बोलतां नये असा बंदोबस्त आहे. हरी भिड्याचें तरी पारिपत्य गळाच कापिला. असेंच फितुरांत आहेत त्यांचें करावयाचें असें बोलतांच धास्त बसली. परवां तोफखानेवाल्यांचें पत्र आलें त्यांत मजकूर लिहिला आहे जे, सखाराम हरी व आबाजी महादेव यांस कैद करून बेड्या घातल्या ह्मणोन लिहिलें आहे. सत्य मिथ्या न कळे. सारांश इंग्रजांचा रेच चांगलाच मोडला. आतां कोणी ही फौज बाहेर निघावयाची उमेद राहिली नाहीं व विलायतेहून इंग्रजास लिहिलीं आलीं कीं घर कलह श्रीमंतामध्यें लागला आहे त्यांत तुह्मीं न पडणें. अशीं पत्रें आलीं त्याजवरून ते ही सर्द जाहले आहेत. मुंबईस पाल[2] सावकारी फार विकाऊ तटला. सावकाऱ्यांत रुपया नाहीं.

---

१ दादासाहेब व अमृतराव यांखेरीज ह्मणजे यांच्या आज्ञेखेरीज! २ विलायतेहून व चीन देशाहून माल भरलेलीं तिर्कट तारवें मुंबईच्या बंदरांत गिऱ्हाईक नाहीं ह्मणून तटून राहिलीं आहेत.

सोन्याचे तुकडे रुप्याच्या सोन्यापुरते करून श्रीमंतासमागमें इंग्रज आहेत त्यांस खर्चास पाठवितात. मुंबईस रुपयाचा ताण मोठा बसला आहे. पुण्यांतील सावकार चाळीस पन्नास निदान पावणा लाख रुपये पावेतों नजर द्यावयास रजावंद जाहले आहेत कीं मुंबईचा माल आणावयास मोकळीक द्यावी. परंतु नजर घेऊन [कारभारी] परवानगी देत नाहींत. कळावें. नबाबाचीं पत्रें राजश्री रघोजी भोंसले यांचे नांवचीं सेनासाहेब सुभ्याचीं वस्त्रें पाठवावीं ह्मणोन लिहिल्यावरून वस्त्रें पाठविलीं. राजश्रीमुधोजी भोंसले यांचा व नबाब यांचा दारमदार झाला. बारा लक्ष रूपये नबाबास द्यावेसें ठरोन तह जाहला. नबाब औरंगाबादेस छावणीस येणार. दौलताबाद नबाबास द्यावयाचा करार पेशजीच ठरला आहे त्याप्रमाणें द्यावी असें ठरलें. कागदपत्र करून दिले. किल्ला हवालीं करून द्यावयास कारकून सरकारचे गेले. कळावें. श्रीमंत राजश्री पुरुषोत्तमराव दाजी परवां [मंगळवेढ्याहून] आले. किल्ल्यावरच पूर्ववत् प्रमाणें राहिले आहेत. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं० १४७१ श्री (ज्येष्ट शुद्ध १९

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री कोन्हेररावजी[1]

स्वामीचे सेवेशीं.

पोष्य येसाजी राम कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल तागायत छ० १४ रबिलाखर भौमवार मु॥ धारवाड जाणून स्वकीय कुशल लिहित असिलें पाहिजे. विशेष. आपण छ० १० रबिलाखरचें पत्र पाठविलें तें काल पावलें. लिहिला मजकूर सविस्तर कळला. करवीरकरांचें व आपलें युद्ध छ० ८ रबिलाखरी जाहल्याचें वर्तमान लिहिलें तें

---

१ धारवाडचा मामलेदार.

कितूरकरांचा दंगा.

कळलें. तिसरे दिवशीं आणखी तयार होऊन त्यांजवर गेलां होतां त्यास ते तयार होऊन आले किंवा न येतां आपणच माघारें आलां हें सविस्तर लिहावें. आपण तेथील गुंता उलगडल्याखेरीज इकडे येत नाहीं. येथील विचार पहातां बरा दिसत नाहीं. काल इंदुवारी कित्तूरकर देसाई याणें कसूरच्या मुक्कामाहून कूच करून प्रातःकाळीं बुनगें सुद्धां निघाला तो कसूरचा वोढा धरून दोडवाड पावेतों फरा धरून उभा राहिला. आणि पुढें तोफा लाऊन गोळे टाकिले. इकडूनही तोफांचे गोळे त्याजवर टाकिळे. संध्याकाळीं वोढ्यांत तीन चार हजार प्यादे घालून फौजपाठीमागें ठेऊन नीट चालोन आला. आमचे लोक वोढ्यांत तीन चारशें पावेतों होते त्यानीं एक दोन हल्ले मारून काढिलें. परंतु त्याचा जमाव भारी! निकड करून चालून आले, वोढा धरला, तेव्हां फौज आह्माकडील उभी होती त्याणीं घोडीं घातलीं. परंतु रात्रीचा समय, फौजेचा काट प्याद्यापुढें न चाले, पाच चार घोडीं जखमी झाली, एक दोन ठार जाहलीं, माणूस ही दहा पावेतों जखमी व सात आठ ठार झालें. प्याद्यांचें बळ आह्मांकडे कमी, तेव्हां ठराव न होय (असें) समजोन तोफा सुद्धां निघावें लागलें. तोफा किल्ल्याजवळ बाहेर आणून ठेविल्या होत्या. त्या, अडचणीची जागा, [ह्मणून] काढावयास फार यत्न लागला. त्याजकडील लोक गांवांत आल्यावर निघालों. वाईटांत बरें! तोफा घेऊन सर्व क्षेम धारवाडास आलों ठाण्याचा बंदोबस्त केला होता. आह्मी निघोन येतांच ठाण्यांतील लोकही निघाले. शें पन्नास होते त्यांनीं दोन प्रहर रात्रपर्यंत दम धरिला. उपरांत ठाणें स्वाधीन करून आले. कित्तूरकर शेर जाहला! दहा बारा हजार प्यादा व चार तोफा व दीड हजार पावेतों स्वार याप्रमाणें आहे. पुढें काय करतो पहावें. आह्मीं

आपला मार्ग पहात आहों. दुसरा उपाय दिसत नाहीं........हे विनंती.

पै॥ छ० २१ रबिलाखर.

नं० १४७२ श्री १३ जून १७७५

यादी नि॥ करवीर श्रीमंत महाराज राजश्री छत्रपती स्वामी वि॥ आपाजी शामराव सु॥ सीत सबैन मय्या अल्लुफ. कलमें. बि तपशील.

१ फौज दूर करून पूर्ववत् प्रमाणें असावें. सरकारचा करार मदार ठरला आहे त्यांत दिक्कत आली तरी येथें[1] कारकून पाठऊन बोलून चालून जावसाल असेल तो करून घ्यावा व मातुश्री अनूबाई यांच्या तालुक्याच्या बंदोबस्ताविशीं सरकारचे फौजेस व बाईकडील फौजेस वगैरे खर्च लागला असेल तो द्यावा.

१ फौज विसा रोजांत दूर करावी ह्मणून आपाजी शामराऊ यांणीं करार केला आहे त्यास आठा रोजांत निमे शिम्मे फौज दूर जाली ह्मण

२ पंत आमात्य व प्रतिनिधी व सेनापती यांजकडील तालुका कोट किल्ले सुद्धां वतनदारी व अम्मल खेडीं वगैरे पुरातन पासून त्यांजकडे चालत आलीं असतील त्या प्रमाणें चालवावें. महाराजांच्या सरकारांत गांव वगैरे घेतलें असेल तें माघारें द्यावें.

२ सदरहू प्रमाणें चालवावें व घेतलें असेल तें सोडून द्यावें. शेषो नारायण यांचे कारकीर्दीप्रमाणें नजरेच्या ऐवजाचा फडशा पडे तोंवर एक एक गांव मातब्बर आपाजी शामराऊ

---

१ पुरंदर मुक्कामीं. याद पुरंदरचे मुक्कामीं पेशव्यांचे कारभारी सखारामबापू व नाना फडणीस व करवीरकरांचे वकील यामध्यें ठरलेली आहे. येथें प्रत्येक कलमास निराळा आंकडा घालून त्याच्या त्याच्या मखलासीस ही तोंच आंकडा आह्मी घातला आहे. मूळ यादींत असे आंकडे नाहींत. कलमें नाना फडणीस व सखारामबापू यानीं लिहिलेली असून त्यांजकडील मखलासी करवीरकरांचे वकील यानीं केलेली आहे.

जे कोन्हेरराव त्रिंबक याणीं महाराजांच्या तालुकियांतून कूच करून पुढें जावें. आठ रोज राहणें तें महाराजांच्या तालुकियांत उपसर्ग न देतां सहा कोसांच्या तफावतीनें माघारें यांच तालुकियांत मुक्काम असावा. फौजेचा पैका मागों नये. येणें प्रमाणें करार करावा.

२ व्यंकटराव नारायण घोरपडे यांजकडील (कलमें)

१ इनाम गांव देखील लाट रांगोळी व देशमुखी व सरदेशमुखी व वतन संबंधें हक्क इनाम शेतें कमतें वगैरे पुरातन चालत आल्याप्रमाणें चालवावें. वतन संबंधें वसूल घेतला असेल तो माघारा द्यावा.

२ उत्तूर वगैरे ठाणीं घेतलीं असतील तीं माघारीं द्यावीं व ठाणीं पाडलीं असतील तीं बांधोन द्यावीं.

३ सरकारांतून तह जाहला असतां कलह करून आजपर्यंत शियांचे स्वाधीन असावा. नजरेचा फडशा जाहलियावर ते ही गांवें सोडून द्यावी. अमात्यांच्या गांवचा वसूल अलीकडे घेतला असेल तो गांव गन्ना रुजू होईल त्यांत नजरेचा ऐवज वजा करून बाकी निघाली तर माघारे देवावी. त्यांचा गांव आपाजी शामराव यांजकडे ठेऊं नये. झाडून त्याचे हवालीं करावें. करार करावा.

६ महादजी शितोळे यांजकडे का॥ मांजरी व का॥ नेज व मौजे अंकली हे गांव मजरे सुद्धां मशारनिल्हेकडे चालत आल्याप्रमाणें चालवावें साल मजकुरीं तें सरकारांत चाकरी करीत असतां रुपये व गुरें वळून नेली असतील तीं माघारे देवावीं.

६ महादजी शितोळे याचे गांव त्यांजकडे चालवावें गुरें मेंढरें नेलीं असतील तीं शितोळे याणीं ठिकाणीं लाऊन सांगितलें ह्मणजे सोडावीं. शितोळे चाकरीवर इकडे आहेत ते आलियावर त्यांजकडे लढे काय व

१ पेशव्यांच्या हद्दींत.

बंदीच्या पेंचांत आणिलें तो खर्च आजपर्यंत लागला असेल तो द्यावा व गांव खेडीं लुटलीं आहेत त्याचा नागावा द्यावा.

४ सदरहू प्रमाणें फडशा करून द्यावा पुढें निबंधपणें चालवावें याप्रमाणें महाराजानीं बेल भंडार द्यावा. इकडून त्यांच्या तालुक्यास उपद्रव लागू नये ह्मणून बेल भंडार द्यावा.

३ मातुश्री अनूबाईकडे लाट व रांगोळी सुद्धां गांव इनाम व देशमुखी व सरदेशमुखी व वतन वगैरे सुदामत सालाबाद चालत आल्याप्रमाणें चालवावें. लढा तिलमात्र करूं नये. वतन जप्त आहे त्याची मोकळ चिठी द्यावी. वतनाचे जप्तीचे ऐवज वसूल घेतला असेल तो आपाजी शामराऊ याणीं हुजूर जाऊन विनंती करून माघारें मातुश्रीकडे देवावा येणें प्रमाणें करार करावें.

५ सोलापूर चांदगड व कित्तूर येथें दांसदाण्याचें रोखें करून वसाले घेत्यांचे गांवचा पैका महाराजानीं किती घेतला तो अर्थ वाजवी समजोन विनंती लिहून पाठवूं. त्याप्रमाणें करावें. करार करावें.

७ श्री शंकराचार्य स्वामी यांजकडे इनाम गांवचे कुळास वगैरे उपद्रव करून कुळें धरून नेऊन रुपये घेतले आहेत ते माघारे घ्यावे व कुळें धरून नेलीं आहेत ती सोडून द्यावीं.

१ कसोपुर (?) येथील मकसुद्या सराफ यांजपासून रुपये अठरा हजार घेतलें आहेत ते माघार द्यावे.

२ हळदीच्या वाण्यापासून रुपये घेतले आहेत ते माघारे द्यावे.

संकेश्वरचीं कुळें धरून नेलीं आहेत तीं सोडून द्यावीं महाराजानीं वाजवी मनास आणून फडशा करावा. तेथें समजी न पडे तरी येथें मनास आणून विनंती लेहूं त्याप्रमाणें अमलांत आणावें.

७ येणें प्रमाणें करार करावें.

८ ममदापूर श्री सत्यबोध स्वामीचा

१ लूट.

तले, त्यास सरकार निसबत महाल असतां मसाला घेतला तो माघारा द्यावा व मसाला करावयाचे व घास दाण्याचे रोखे करावयाचें कारण काय याचा जाबसाल करावा.

५ सोलापूर चांदगड व कित्तूर येथील मसाला व घासदाणा व खर्च घेतला असेल तो रुजुवातीनें ठरेल तो माघारा द्यावा. येणें प्रमाणें करार करावें.

११ आपाजी शिंदे देसाई प॥ रायबाग यांचा इनामगांव मौजे घोसरवाड प॥ मजकूर येथील दुसाला नजर करार करून द्यावी ऐसा करार असतां गांवांत ठाणें गुदस्ता घालून दुसाला वसूल घेतला तो गांव त्यांचा त्यांजकडे कराराप्रमाणें सोडून देववा. पेशजीच्या कराराप्रमाणें गांव शिंदे देसाई याचे हवाला करावा.

११ करार करावें.

१२ शेषो नारायण व भगवंत आपाजी व शेषो त्रिमल यांजकडे सरकारांतून गांव तोडमोड होऊन करार करून दिले त्यापैकीं गांव जबरदस्तीनें घेतले ते माघारे द्यावें.

इनाम गांव त्याचा घासदाणा दोनशें रुपये घेऊन आणी गांवांत ठाणें घातलें आहे ते रुपये माघारे देऊन गाव पूर्ववत आपण्णाचार्य यांचे हवालीं करून द्यावा.

८ सत्यबोध स्वामीचें पत्र गांवाविशीं येईल त्याप्रमाणें करावें. येणें प्रमाणें करार करावें.

९ वामनराव गोविंद यांजकडील—

१ घोडीं दोन वेळां मिळोन चार चोरून नेलीं त्यांचा माग त्यांच्या तालुक्यांत गेला आहे त्यांची वाट करून दिली नाहीं ती करून द्यावी.

२ तळीखोर पाटील यांच्या तालुक्यांत शिरोळास वगैरे आहेत ते द्यावे.

३ बैल कोठीचे नेले आहेत ते द्यावे.

४ रेणदाळचा तस नस केला आहे तो भरून द्यावा.

५ शिरोळकर याणीं घोडीं नेलीं आहेत तीं द्यावीं.

मिरजेकडील लढे करवीराकडे व करवीरकरांकडील मिरजेकडे आहेत ते

१ भगवंत आपाजी हेरलें.
२ शेषो नारायण
१ रुईचें ठाणें विशीं जामीन घेतला व अडीच हजार रुपये घेतले ते माघारे द्यावे.
२ मौंजे बलिंगे.
३ मौंजे माहाकवें [?]
३ शेषो त्रिमल यांजकडील
हंचीनाल
४ मौंजे—

१२ या त्रिवर्गांनीं येथें यावें ह्मणजे पेशजीच्या करारा प्रमाणें चालवावें. त्याकडे लढे असतील ते मनास आणून वाजवी ठरेल त्याप्रमाणें फडशा करून देववूं. येणें प्रमाणें करार करावें.

१३ दानवाड बाबाजी सावंत याजकडे आहे ते येथें चाकरी करितात. त्यांचा गांव त्यांजकडे चालवावा.

१३ सदरहू गांव घेतला असिला तर माघारे बाबाजी सावंतास देऊन पेशजीच्या कराराप्रमाणें निर्वेध चालवा येथें मनास आणून वाजवी ठरेल त्या प्रमाणें विनंती लिहूं त्या अन्वयें विल्हे लावावें.

९ येणें प्रमाणें करार करावें.

१० ब्राह्मण भगवंत गोविंद यांचा भाऊ वगैरे बंदखानीं घातले आहेत ते येथें पाठवून द्यावे. त्यांचा अन्याय पाहून कर्तव्य ते करावें. भगवंत गोविंद तो मेलेच आहेत. बाकी जे असतील ते हवालीं करावें. सदरहूचे गुण दोष न पाहतां ब्राह्मण अटकेंतून मोकळे येथें पाठवावे.

१० येणेंप्रमाणें करार करावें.

११ येथून विनंती पत्रें येतील तीं अलक्ष करूं नयेत. त्या प्रमाणें वर्तणुकेंत आणावें.

११ येणें प्रमाणें करार करावें.

१२ मानाजी बागुल याणें गांवें खाऊन चाकरी करावी ऐसे असतां त्याजवर निमित्य ठेऊन गांव घेतला आहे तो करारा प्रमाणें एका खासे याने चाकरी महाराजांचे सेवेशीं क-

---

१ येलगूड.

चा. येणें प्रमाणें करार करावें.

१४ पेशजीचा करार आहे त्यांत लाट रांगोळी खेरीज करून वरकड करारा प्रमाणें करावें येणें प्रमाणें चालवावें. सेवकाकडून ही लाट रांगोळी खेरीज करून पेशजीच्या करारांत अंतर होणार नाहीं स्वामींनीं ही सदरहू करारांत अंतर करूं नये व सेवकाचें लक्ष सोडूं नये.

१४ येणें प्रमाणें करार करावें.

१५ राजमंडळकरी पतके यांचें पुरातन चालत आल्याप्रमाणें चालवावें असा करार असतां त्यांजवर घास दाण्याचे रोखें वगैरे उपद्रव करावयाचें कारण काय याचा जाबसाल करावा. पेशजीच्या कराराप्रमाणें चाकरी सेवकाकडे करितात. पुढें करितील. त्यांचे वाटेस जाऊं नये. त्यांपासून कांहीं घेतले असेल तें रुजुवातीनें होईल त्या प्रमाणें ऐवज माघारे द्यावा.

१५ येणें प्रमाणें करार करावें.

रून गांव पूर्ववत् प्रमाणें इनाम आहे तसा चालवावा.

१२ बागुलाचा मजकूर सेवकानीं बोलूं नये.

येणें प्रमाणें करार करावें.

१६ कोन्हेरराव त्रिंबक यांणीं अलीकडे गांव खेडीं घेतलीं असतील तीं महाराजांच्या तालुकियांतून कूच करून जातील तेव्हां सोडून द्यावीं.

१६ येणें प्रमाणें करार करावें.

१७ एकूण सतरा कलमाखालें मखलासी लिहिली आहे त्यांत शेषो नारायण व शंकराचार्यस्वामी व मिरजेकडील लढे व अनूबाईकडीस वतनाचे जप्तीचा ऐवज इतके कलमें मखलासी प्रमाणें अमलांत तिकडून येतील.

परंतु या कलमाकरितां कोन्हेरराव याणीं तट धरूं नये. या खेरीज वरकड मजकुराचा फडशा मखलासी प्रमाणें त्याणीं करून आठा दिवसांत दिला ह्मणजे त्यांच्या तालुकियांतून कोन्हेरराव त्रिंबक याणीं कूच करून पुढें जावें. येणें प्रमाणें करवीराकडील राजमंडळचे फौजेचा पैका इकडून देऊं नये व मातुश्री अनूबाईनींही देऊं नये. इकडील फोजेचा व अनूबाईच्या फौजेचा पैका करवीरकरांहीं देऊं नये.

१७ येणें प्रमाणें करार करावें सद-
रहू कलमाची तोड मोड विद्यमान छ० १४ रबिलाखर जेष्ठ
आपाजी शामराव नि॥ श्रीमंत महाराज सन सीत सबैन.
राजश्री छत्रपती स्वामी हस्ताक्षरें खुद्द.

नं० १४७३ श्री जून दु० पंधरवडा,

यादी. " पुरंदराहून सतरा कलमाची याद करार होऊन आली त्या पैकीं राजश्री व्यंकटराव नरायण यांजकडील फडशा करून दिला. अतःपर म॥ [?] बाकी कलमें राहिलीं त्या पैकीं पंत अमात्य व प्रतिनिधी सेनापती व घोसरवाडकर देसाई यांजकडील कोणी बोलावयास आले तर बादीचे अन्वयें फडशा करून देवूं. जर करितां येथें फडशास न आले तर पुरंदरीं करून देऊं. फौज आह्मी दूर करावी त्यास फौजेची समजूत पाडून एका महिनेंत फौज दूर करवूं व ब्राह्मण पन्हाळेस कैदेंत आहेत ते सोडवून आह्मीं खालीं कोडोली अगर वडगांवास घेऊन येऊं. ब्राह्मणापासून हाजीर जामीन घेऊन ब्राह्मणांस तूर्त सोडून देऊं. वरकड कलमांचा फडशा पुरंदरीं व्हावयाचा तो येथेंच होईल. सदरहू कलमें लिहिलें अन्वयें आह्मीं निभाऊन देऊं. " ह्मणोन महादेवशास्त्री व नागोजी शामराव याणीं श्रीमंतांचे नांवें पत्र लिहून द्यावें.

श्री

यादी कलमें तहाची.

नि॥ राजश्री व्यंकटराव नारायण घोरपडे

१ देशमुखी व सरदेशमुखी व हक्क व इनाम सालाबाद चालत आल्याप्रमाणें चालवावें. हल्लीं जप्तीच्या मोकळ चिठ्या द्याव्या.

क॥ वडगांव येथील सरदेशमुखी हक्क व इनाम आकार बमोजीब चालत नाहीं. त्यास हल्लीं ताकीद करून आकाराबमोजीब द्यावें.

१ मौजे पट्टण कोडोली क॥ इचलकरंजी येथील देशमुखी व सरदेशमुखी परगणेचे शिरस्तेनें चालत नाहीं तर हल्लीं ताकीद करून प्र॥ बमोजीबें देवावें.

१ आजरे येथील सरदेशमुखीचे इनाम गांवास ठाणीं घातलीं आहेत तीं सोडून द्यावीं.

१ मौजे देवडें

१ मौजे बळगुंदी

१ ता॥ आजरें येथील दुतर्फी

१ फौज विसां रोजांत दूर करावी ह्मणोन आपाजी शामराव याणीं करार केला आहे. त्यास आठा रोजांत निम्मे फौज दूर करावी ह्मणजे ईकडील फौज कूच करवूं. त्यास तुह्मी ह्मणतां जे फौजेचा निकाल काढावयास एक महिना लागेल ह्मणतां येविशींची खातरजमा करून द्यावी. किंवा फौज दूर होय पर्यंत अळतेचें ठाणें ठेऊन घेऊं.

१ ब्राह्मण कैदेंत आहेत ते सोडवून शास्त्री नागोजीपंत याणीं आपणापाशीं आणावे. ब्राह्मणापासून हाजीर जामीनाची खातरजमा करून देववावी.

१ पंत आमात्य व प्रतिनिधी व सेनापती यांचा करार पुरंदरचे यादींत आहे त्या प्रमाणें फडशास आणावें.

---

१ पेशव्यांची. २ प्र॥मोजीब परगणेच्या शिरस्त्या प्रमाणें.

व एकतर्फी ठाणीं पेशजीपासून आह्मांकडे आहेत त्याप्रमाणें आमचीं आह्मांकडे द्यावीं. पेशजी प्रमाणें जिकडील तिकडे अम्मल चालेल.

१ गावगन्नाचे कमावीसदार जमीन घेऊन ठेविले आहेत त्यास जमीन कतबा सुद्धां सोडून द्यावें.

१ बाबुराव शंकर उत्तूर.
२ रुद्रो मल्हार कोळिंद्र.
३ आपाजी तिमाजी शिर्दवाड
४ रायगोंडा पाटील शिर्दवाडकर (यास) कागलांत वेडी घातली आहे.

१ उत्तूरच्या रयता पळोन जातां लष्करांत सांपडल्या त्यांस अटकेंत ठेऊन वेदमूर्ति राजश्री विष्णु दीक्षीत श्रोत्री जामीन घेतले आहेत. त्याचा कतबा माघारे द्यावा.

उत्तूर देवर्डे व कोळिंद्रे तिन्ही गांवांत इस्ताद व दास्तान असेल तें माघारें द्यावें.

१ सोलापूर व चांदगड व कित्तूर येथें घासदाणा मसाला घेतला असेल तो माघारे द्यावा.

१ आपाजी शिंदे देसाई पा॥ रायबाग यांचा इनाम गांव घोसरवाड सरकारांत घेतलें तें सोडून द्यावें. नजरेच्या ऐवजी दुसाला गांवचा वसूल घेतला तो वजा करून जाजती ऐवज जाहला असेल तो माघारा द्यावा.

---

१ इचलकरंजीकर घोरपडे यांजकडे.

नं० १४७४ श्री (ज्येष्ठ वद्य
जून दु० पंधरवडा)

सेवेशीं साष्टांग नमस्कार विनंती. लक्ष्मेश्वराहून राजश्री रामचंद्र-पंताचें पत्र आलें त्याची नक्कल व राजश्री शिवाजी गोपाळ यांचें पत्र हीं श्रीमंत राजश्री नानास दाखविलीं. हैदरखानाकडील व कितूरकराचें सूत्र मिळालें यांत संशय नाहीं ही खातरजमा [त्यांची] झाली. परंतु फौजेचा भारी भरणा तिकडे पाठवावा हा मनसबा करितां दिसत नाहीं. राजश्री कोन्हेरराव याणीं सत्वर तिकडे जावें हेंच नित्य बोलणें! मोठी तरतूद फौज पाठवावयाची करीत नाहींत. आह्मीं नित्य हांका मारावयास चुकत नाहीं. हैदरखानाकडील सूत्र कितूरकराकडे असल्यास आह्मी विचार आपणास लिहिला आहे तो घडणार नाहींसा दिसतो. हैदरखानाकडील सूत्र नसल्यास (कितूरकर तहाचें बोलणें) मान्य करील. चालना करून काय तो मजकूर लिहून पाठवावा. तैनात जाबता राजश्री संताजी भोइटे याचा पाठविला तो पावला. हैदरखानाकडील सामान येणार हें पुरतेपणें समजलें असतां [कारभारी] मातबर फौजेची तरतूद करितां दिसत नाहींत! करवीरकर तहाचा प्रकार बोलत नाहींत ह्मणून लिहिलें आळत्याचें ठाणें घेतल्याचा व घोडीं माणसें जायां जाहल्याचा मजकूर लिहिला तो कळला. विवेकाचा प्रकार नाहीं तेव्हां संकटाची गोष्ट आहे कितूरकरानें लबाडी फारच केली. धारवाडच्या पेठेंत बसला आहे. आतां बाकी काय राहिली! तिकडे जाण्याची (कोन्हेररावास) निकड आणि करवीरकरांचा प्रकार तर असा संकटाचा आहे. श्रीमंत राजश्री नानांचें ह्मणणें जे, तुह्मी पांचशें राऊत करवीरच्या बंदोबस्ताकरितां ह्मणत होतां,

१ पत्र शिवाजी बाबाजीचें पुरंदराहून पांडुरंगराव तात्यास मिरजेस.

आणि इतकी फौज दिली असतां लांबणीवर पडलें! झूज जाहलें ते समयीं अंगेजणी झाली नाहीं ह्मणून नाना प्रकारें व्यंगोक्तीच्या गोष्टी बोलतात! कोन्हेररायानीं ते समयीं कमी केली असें लहान थोर ह्मणतात. तिकडे कसें झालें आंतील वर्म ईश्वर जाणें! हे आह्मांस बोलूं देत नाहींत! सरंजामी काल आले आहेत (त्यांचा) मजकूर मनास आणितों. राजश्री गंगाधरराव विश्वनाथ यांजविशीं लिहिले त्यांस विनंती करून पाठवितों. खर्चाचेही मनास आणून लिहून पाठवितों. बचाजीपंत फौजेंत चाकरी चुकरीस आहे हे विनंती करून ठेवितों.

नं० १४७५ श्री १९ जून

सेवेशीं शिवाजी बाबाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल तागायत जेष्ट कृष्ण ६ इंदुवासरे मुक्काम भिवंडी वर्तमान यथास्थित असे विशेष. स्वामीनीं चिमाजी कासाबरोबर पत्रें पाठविलीं तीं काल सातवे दिवशीं पावलीं. सविस्तर मजकूर कळला. पुण्याचीं पत्रें चिमाजी बरोबर पाठविलीं आहेत. उत्तर आलें ह्मणजे पाठवितों. राजश्री हरीपंत तात्याकडून पत्रें आलीं त्यांतील भाव नर्मदा उतरावयासी लागले आहेत. येविशींचा अर्थ श्रीमंत राजश्री धोंडोबादादांच्या माणसाबरोबर लिहून पाठविलें आहे तीं पत्रें पावलींच असतील. अलीकडे पत्रें आलीं नाहींत. आल्याबरी सविस्तर लिहून पाठवूं. राजश्री सखारामपंतानीं किल्ल्यावरी घर चांगलें बांधलें आहे. श्रीमंत राजश्री नानानीं घर बांधिलें नाहीं. ‘किल्ल्यावरी घर बांधावयाचें नाहीं हा निश्चयच आहे’ असें [त्यांचे] बोलण्यांत. ज्या घरांत किल्ल्यावर असतात तें अगदीं लहान, राज्य कारभार, महालकरी वगैरे येणार, बसावयास जागा नाहीं व कि-

१ पराक्रम.

ल्यावरी महालकरी हैराण होतात, याजकरितां श्रीमंत राजश्री नानांचे मतें आठ पंधरा दिवस पुण्यास रहावें. मोन्या मनसब्याचें बोलणें चालणें झाल्यास किल्ल्यावर येऊन चार दिवस राहून जावें. किरकोळ जाबसाल चिठींत लिहून जाबसाल आणवावा असें ठरोन नाना काल पुण्यास गेले. पंधरा दिवस राहून मागती येऊन जातील. श्रावणमासाचा देकार व महालकरी यांचा फडशा होय तों फार करून पुण्यांत राहणार. याप्रमाणें उभयतांचे विचारें ठरलें. लौकिकांत उभयतांमध्यें वांकडें ह्मणून गेले असें होईल, परंतु तसा प्रकार नाहीं. समाधान संतोषेंकरूनच गेले आहेत. आह्मीं आज भोजनोत्तर पुण्यास जातो. श्रीमंत मातुश्री पार्वतीबाई यांसी पुण्यांत फार बरें वाटत नाहीं याजकरितां श्रीमंत राजश्री दाजी परवां पुण्यास गेले आहेत. दोन तीन रोजांत येतील. राजश्री विसाजी केशव याणीं दोन हजार माणूस साष्टीच्या टापूंत खाडी उतरून पाठविलें होतें त्यांनीं इंग्रजाकडील दोन तीनशें माणूस चौकीचें मारिलें. ती चौकी बळाऊन बसले होते. पांच सात रोज जाहल्यावर मुंबईहून हजार दीड हजार माणूस आलें व साष्टींचें मिळोन हजार पावेतों आलें आणि या लोकांशीं गांठ घातली. इकडील माहागिऱ्या तर त्या होता. इकडील शें दोनशें माणूस मारलें गेलें. वरकड महागिऱ्यांत बसोन अलीकडे आले. आतां टापूंत उतरणें तरी पांच सात हजार माणूस असल्यास उतरतील. थोडक्या माणसानीं जाऊन परिणाम नाहीं. राजश्री विसाजी केशव पाईचें माणूस जमा करितात. साष्टीच्या मसलतीचा भार मशारनिल्हेवरच आहे. राजश्री आनंदरावदादा रास्ते वाईहून येऊन भेटी घेऊन पांच सा दिवस राहून वाईस गेले. जमीदाराकडील वगैरे जाबसाल करून गेले. जमीदाराकडील ऐवजाची यादी पंधरा दिवसा अलीकडे पाठवितों. वराता कमजास्त होतील त्या पहाव्या, तूर्त मोघम वराता कराव्या, ह्मणोन सांगोन

गेले. कमाविसीचे महालसुद्धां पावणा लक्षाच्या वराता त्यांजवर जहाल्या. आह्माकडील जमीदाराचे ऐवजी साठ हजार रुपयांच्या वराता झाल्या आहेत नबाब निजामअल्लीखान औरंगाबादेस छावणीस येणार. राजश्री मुधोजी भोंसले याचें लक्ष इकडे निक्षूनपणें आहे. मध्यस्त नबाब आहेत. श्रीमंत राजश्री दादासाहेब इंग्रजाकडे गुंतले ह्मणजे राजश्री मुधोजी भोंसले या लक्षांत आहेत. नाहींतरी इमान प्रमाण दिले तत्राप भरंवसा नाहीं! सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं० १४७६ श्री [२४ जून]

सेवेशीं शिवाजी बाबाजी ह्मसकर साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल तागायत जेष्ट कृष्ण १२ मंदवासरे मु॥ पुणे वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपण पत्रें पाठविलीं तीं पावोन सविस्तर मजकूर कळला. करवीरकराच्या यादींत हुपरीकरांच्या गांवचें व राजश्री दादाजीपंत यांच्या गांवचें नांव यादीत नाहीं. तो जाबसाल करून घ्यावा व
श्रीमंत राजश्री कोन्हेरराव यांच्या लिहिण्यांत (करवीरकरांस) पाठीवर घेतलें, नदीपावेतों वाढून मग लढाई केली, घोडीं त्यांजकडील जाया झालीं, ह्मणून तपशील लिहिला; परंतु अर्थ ठीक दिसून आला नाहीं. आह्मी यादीस अवकाश लाविला इतक्यांत त्यांचें पारिपत्य झालें ह्मणजे जसें ह्मणतील तसें ऐकतील याजकारितां वोढ धरली होती. तों वर्तमान बाजारीं येतांच यादीचा करार करून घेतला आणि पाठविली. जर करून रायास त्याणीं मागें सारिलें असल्यास त्याचें पारिपत्य होऊन ठराव होता तर बरें होतें! असो. कित्तूराकडे जावयाची निकड आहे. जसें नीट दिसेल तसें करितील. आपण सुचवीत असतीलच. कित्तूराकडे जाणें तर सारें फौजसुद्धां गेले तरच कांहीं काम होईल. अलीकडे राजश्री हरीपंततात्या-

कडील पत्रें आलीं नाहीं. नर्मदा बुणगें उतरलें. कांहीं फौजही उतरली वरचेवरी उतरतात. श्रीमंत इंग्रज सुद्धां सुरतेस जाणार. बुणगें नर्मदा अलीकडे आलें त्याजवर दाटी करावी असा मनसबा इंग्रजानीं केला होता. तेव्हां राजश्री नारोपंत केसकर सुरत अठ्ठाविसी तालुक्यांत होते त्यांस बुणग्याजवळ आणविले व फौज पलीकडूनही पाठविली आणि बंदोबस्तही केला श्रीमंताजवळ चौकी अगदीं इंग्रजांचे दुभाष्ये जवळ असतात त्या शिवाय कोणाशीं बोलूं नये असें केलें आहे. राजश्री लक्ष्मण अप्पाजी आंबेकर यांचा पुत्र श्रीमंताजवळ असतो त्यानें दुभाष्यास कळों न देतां पत्रावर शिक्के केले. तें निमित्य ठेवून इंग्रजानीं त्याचा हात तोडिला! श्रीमंत कैद दाखल इंग्रजाजवळ आहेत. इंग्रज फार विचारांत पडले आहेत. परंतु केला मनसबा तो एकाएकी कसा सोडावा याजकरितां खटपट करून पाहतात! या प्रकारचें तिकडील वर्तमान. श्रीमंत नानास येऊन आठ दिवस झाले. पुरंधरास जाऊन येतील आणि श्रावणमासचा देकार करून मागती जाणें तरी जाऊन येतील. जरूर मनसब्याच्या बोलण्यासाठीं जाणें तरी जावें, चार दिवस राहून मागती यावें, या प्रमाणें करणार. पर्जन्य इकडे तूर्त बराच जाहला. राजश्री विसाजी कृष्ण घांटाखालीं होते, परवां फौज सुद्धां आले. श्रीमंत सौभाग्यवती मातुश्री पार्वतीबाईस जरा समाधान आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं० १४७७ श्री [२८ जून]

श्रीमंत राजश्री कोन्हेररावजी स्वामीचे सेवेशीं. पोष्य शिवाजी होसकर साष्टांग नमस्कार. विनंती येथील कुशल तागायत आषाढ शुद्ध प्रतिपदा सौम्यवासरे मुक्काम भिवंडी वर्तमान यथास्थित असे. विशेष. श्रीमंत राजश्री नानानीं आह्मांस बोलावून नेऊन आपणास पत्र पाठवावयास

आज्ञा केली कीं, • कित्तूरकरांचें पारिपत्य करावयाचे मुख्यत्वें. जातां जातां आठ पंधरा दिवसांत•करवीरकरास तंबी पोहोचवावी. मातोश्री अनूबाई-च्या गांवखेड्यांचा व वतन बाबेचा बंदोबस्त करून पुढें जावें. त्यास आपण गेलां, त्यांनीं गांवखेडीं घेतलीं. त्यांच्या फौजेशीं गांठ घातली. लढाई ही झाली. पुर्तेपणें रेच मोडावा तर गांवचा आसरा करून राहिले. त्यांत नदीस पाणी आलें. त्यामुळें फौजेशीं गांठ घालावयाची राहिली. त्यास इलाज नाहीं. असो. आतां समेटून घ्यावें. आणि कित्तूरकरा-कडे जावयाचें करावें. यादी कलमवार आपणाकडे पाठविली आहे. व करवीरकराकडेही पाठविली त्या प्रमाणें फडशा करून घ्यावा. एक दुसरे किरकोळ काम राहिल्यास तितक्यासाठीं लढा पाडून मातबर कामास जाण्यास दिवसगत पडते. कित्तूरकरानीं धारवाडच्या आसपास ठाणीं फार करून घेतलीं. याजकरितां करवीरकरांची फौज दूर व्हावी, व मातोश्री अनुबाईकडील पुरतेपणें बंदोबस्त, व सरकार तालुक्यांत ऐवज घेतला आहे तो घ्यावा. तोन कलमें मुख्यत्वें करारांत आणावीं. समेटून घ्यावीं. आणि मोकळे व्हावें. अतःपर निकालावर घेऊन लवकर लवकर मोकळे व्हावें. विलंब तिळमात्र लावूं नये. येणेंप्रमाणें रूबरू सांगोन पत्रें लिहिवलीं आहेत. दिकत पडूं न देतां जलदीनें विल्हे लावावीं. आणि पंचगंगा उतरून तिकडील रोंख धरावा. किरकोळ शिरकोळ बंदोबस्त करावयाचा खरा, परंतु कित्तूरकराच्या पारिपत्यास जाणें जरूर याजकरितां यादी प्रमाणें फडशा करून निकालावर घ्यावें. आणि तिकडे जाण्याचें करावें. समेटून घेतलें, तिकडे जाण्यास नदी उतरावयास लागलों, असें पत्र पाठवावें. बहुत काय लिहिणें कृपा लोभ करावा हे विनंती.

नं० १४७८ श्री [आषाढ शुद्ध ६
४ जुलई]

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री कोन्हेरराव

स्वामीचे सेवेशीं

पोष्य बाळाजी जनार्दन[1]. कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत असिलें पाहिजे. विशेष. आपण फौज सुद्धां त्या प्रांतीं गेले. करवीरकराकडील फडशाच्या यादी पाठविल्या त्या प्रमाणें फडशा करून घेतलाच असेल. त्यास कित्तूरकर पाळेगार[2] होत्सांता फौज धरून[3] प्रांतांत दंगा करून लबाडी करतो त्याचें पारपत्य करणें जरूर. एतद्विषयीं आपणास अगत्य आहेच. ऐशास त्याचें सामान फौज वगैरे भारी आहेत, तथापि त्याची पाळेगारी फौज! तुह्माबरोबर फौज चांगली निवडक व तुमची जरब पहिल्यापासून त्याजवर आहेच. त्या पक्षीं तो पुढें येऊन नमूद होईल ते गोष्ट त्याचे वस्तु होणार नाहीं. असो. आपण मनसब्याचे रीतीनें बळाबळ पाहून त्याचें पारपत्य ज्या गोष्टीनें होऊन प्रांताचा बंदोबस्त लवकर होय तें केलें पाहिजे. सारांश तो[4] मनसबा सत्वर उरकून दुसरीकडे फौजा रवाना होऊन बंदोबस्त झाला पाहिजे हे अर्थ सर्व आपले ध्यानांत आहेतच. त्या पक्षीं आह्मीं सुचवून कोठपर्यंत लिहावें? निरंतर आपले कडील वर्तमान लिहीत जावें. रवाना छ० ५ जमादिलावल. सारांश लवकर समेट झाली पाहिजे. बहुत काय लिहिणें लोभ असो दीजे हे विनंती.

---

१ नाना फडणीस. २ बंड करणारा संस्थानिक. ३ फौज धरणें फौज चाकरीस ठेवणें. ४ करवीरकरांचा.

नं० १४७९ श्री [५ जुलई १७७५

[१]तीर्थस्वरूप मातुश्री बाई वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें शिवाजी बाबाजी हैसकर. साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल तागायत आषाढ शुद्ध अष्टमी बुधवार मुक्काम [२]भिवंडी वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपण आशीर्वाद पत्र पाठविलें तें पावोन लिहिला मजकूर कळला. " सरकारची यादी करवीरकरांच्या तहाची आली ती करवीरकर मान्य करून तह करीत नाहींत. कोणी बोलावयास येत नाहीं. वे॥ राजश्री महादेवभट महाराजांस चढी देऊन झुंजावें ह्मणतात. प्रांत खराब जाहला त्याची काळजी नाहीं. रयतीस निरोप दिला. राजश्री येसाजी शिंदे कोल्हापुरास फौजेच्या समजाविसीस गेले आहेत. आह्मी कर्जदार जाहलों. पुढें कर्जही मिळत नाहीं अशी आमची अवस्था झाली आहे. याजकरितां वकिलास तेथें ताकीद करवावी " ह्मणोन आज्ञा, त्यास आपण लिहिले तितके प्रकार खरेच आहे. श्रीमंत राजश्री कोन्हेरराव गेल्यावर झुंज जाहलें त्या दिवशीं चांगला रेंच मोडता ह्मणजे ध्यानावर येऊन तह यादी प्रमाणें ठरावितें. ती गोष्ट पाहिल्यानेंच कमी पडली. चार दिवस नदीस पाणी आल्यामुळें फिरोन फौजेची गांठ न पडेसी जाहली. साऱ्याच गोष्टी बिलग पडल्या. कित्तूरकरानें तिकडे गडबड केली याजकरितां तिकडे निकड करून जावें, तहाचें लौकर उरकून जावें, ऐसें जाहलें आहे. ते तर तह करीत नाहीं. संकटाच्या गोष्टी जाहल्या आहेत. ईश्वर पार पाडील. ईश्वरावर हवाला आहे. अळतें घेतलें, मुलुखाची खराबी जाहली, आतां ध्यानावर आल्यास उत्तमच जालें! तह जाहल्याखेरीज कित्तूराकडे जाऊं नये असें आहे. परंतु दिवसगत लागले. आह्मीं दरबारच्या बंदोबस्ताकरितां रात्रंदिवस आहों. आपण लिहावें असें

१ अनूबाई. २ भिवडी हें गांव पुरंदरच्या पायथ्यास आहे.

नाहीं. इतके दिवस लांबावेसें नव्हतें. इलाज नाहीं. सदैवपत्रीं सांभाळ करावा. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं० १४८० श्री [६ जुलई]

श्रीमंत राजश्री कोन्हेररावजी स्वामीचे सेवेशीं.

पोष्य शिवाजी बाबाजी हैसकर साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल तागायत आषाढ शुद्ध अष्टमी बुधवार मुक्काम भिवंडी वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपण पत्रें पाठविलीं तीं पावोन लिहिला मजकूर कळला. युद्ध प्रसंग झाल्याचा व पुढील कर्तव्याचा व तोफा थोर असाव्या येविशींचे व श्रीमंत राजश्री भवानराव याजकडील प्रकार लिहिला तो सविस्तर कळला. त्यास थोर तोफेची विनंती करून चिठी मदलावीस घेऊन पाठविली आहे. तेथील तोफा आणवाव्या. श्रीमंत राजश्री भवानराव यांजकडील प्रकार आपण लिहिला, त्यास पूर्वसंकेत ठाऊकच नाहीं मग कशावरून समजावें? याजकरितां तो मजकूर समजेसा लिहिला ह्मणजे जाबसाल बोलून घेऊन लिहून पाठवूं. कित्तूरकराच्या पारिपत्याकरितां आपणास (कारभारी) निकड लिहितात, करवीरकरांचा तर तह होत नाहीं! कित्तूरकर धारवाडच्या पेठेंत जाऊन बसला आहे. सर्व संकटेंच आहेत. श्रीमंत राजश्री नाना पुण्याहून परवां पुरंधरास आले. श्रीमंत सौ॥ मातुश्री पार्वतीबाई काकूस फारच बरें वाटत नाहीं. पुण्यांतच आहेत. हत्ती वगैरे दानें झालीं परंतु भरंवसा वांचतील असा नाहीं. श्रीमंत राजश्री दाजी पुण्यांतच राहिले आहेत. राजश्री हरीपंततात्या बावापिराच्या घांटावर नर्मदा उतरत होते तेथें इंग्रजांचीं शिबाडें[1] आलीं आणि एक नांव वोझ्यापाझ्याची माणसें वर असतां वळवून नेली. तेव्हां तो घांट बंद

१ शिबाडें लहान मचवे.

जाहला याजकरितां चोळीमहेश्वराजवळ [नर्मदा] उतरावयास गेले. तेथें उतरोन सोनगडाजवळ छावणीस येणार. इंग्रजानीं उभईचें ठाणें नर्मदेवर आहे तें ठाणें घेतलें. नर्मदेपलीकडील अम्मल उठेलसा दिसतो. होईल वर्तमान तें मागाहून लिहून पाठवूं. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं० १४८१ श्री (६ जुलई)

सेवेशीं शिवाजी बाबाजी हैसकर साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल तागायत आषाढ शुद्ध अष्टमी बुधवासरे मुक्काम भिवंडी वर्तमान यथास्थित जाणोन स्वकीय कुशल लेखन करावयास आज्ञा केली पाहिजे. विशेष. आपण पत्रें पाठविलीं तीं पावोन सविस्तर मजकूर कळला. राजश्री हरीपंततात्याचीं लष्करचीं पत्रें आलीं असल्यास सविस्तर लिहावें ह्मणोन आज्ञा, ऐसियास पत्रें आलीं. पत्रांतील प्रकार श्रीमंत इंग्रज सुद्धां आहेत. आपली फौज बावापीराच्या घाटावर उतरत होते. बुणगें व पांच सात हजार फौज अलीकडे उतरोन बुणग्यांत आली. राजश्री नारो आनंदराव व रास्ते यांची फौज सुरत अठ्ठाविशींमधीं होती ती बुणग्यापाशीं दक्षणतीरास आलेच होते. इतक्यांत इंग्रजानीं मनसबा करून लहान जहागिऱ्यांत लोक घालून महागिऱ्या घेऊन बावापिराच्या घाटावर आले. एक नांव त्यानीं भरताडीची वळवून नेली आणि उतरावयाचा घांट बंद केला. बुणग्यावर हालचाल करावी असा मनसबा इंग्रजानीं केला. तेव्हां बुणग्यांतील फौज होती त्याणीं संभाळून बुनगें सुद्धां कूच करून सोनगडाकडून मजल दर मजल खानदेशांत आले. फौजा पलीकडे सड्या राहिल्या. जीन सामानें अलीकडे, घोडीं पलीकडे, असें लोकांचें संकट! खर्चास तर दरोबस्त नाहीं. पलीकडे फौजांनीं रहावें तरी श्रीमंत इंग्रज सुद्धां भडोचेजवळ उतरोन सुरत अठ्ठाविशीं मध्यें यावें, पुढें जेथपावेतों फावेल

तों पावेतों यावें, असा मनसबा करणार. तेव्हां फौज छावणीस राहून फलादेश नाहीं. याजकरितां नर्मदा उतरोन दक्षणतीरास येणें प्राप्त झालें तों घांट बंद जाहला याजकरितां राजश्री हरीपंततात्या सङ्या फौजानिशीं कूच करून पायागडाकडील वाटेनें चोळीमहेश्वरच्या घाटास उतरावयास गेले. तिकडे नावा जमा करून उतरोन सोनगडापाशीं छावणीस येणार. त्या फौजा उतरोन यावयास दिवसगत लागेल तों श्रीमंत इंग्रज सुद्धां भडोनेजवळ उतरोन सुरत आठाविशीं तालुक्यांत येणार. उत्तर तीरास पेटलाद ठाणें सरकारचें होतें तें श्रीमंतांनीं घेतलें. नर्मदेपलीकडील अम्मल फार करून जाईल असें दिसतें. अलीकडे आपली फौज सोनगडाजवळ लौकर आली तरी त्या तालुक्याचा बचाव होईल. नाहीं तरी अलीकडील ही ठाणीं रहातां दिसत नाहीं. गुजराथ फार करून गेली असें आजच्या प्रसंगावरून दिसतें. काय होईल पहावें. मनसब्यास गुदस्तांचें साल बरें ह्मणावयास होईल. मसलत अवघड पडली आहे. ईश्वर परिणाम कसा लावील तो खरा! श्रीमंत राजश्री नाना फडणीस पंचमीस पुरंधराहून पुण्यास आले. श्रीमंत सौभाग्यवती मातुश्री पार्वतीबाईस फारच बरें वाटत नाहीं. गज दानें वगैरे बहुत जाहलीं. परंतु गुण नाहीं. वाचतील हा भरंवसा पुरत नाहीं. क्षीण फारच झालीं आहेत. श्रीमंत राजश्री पुरुषोत्तमराव दाजीस पुण्यांत बाईनीं आठ दिवस ठेवून घेतले आहेत. इकडील कच्चें वर्तमान राजश्री नारोपंतानीं निवेदन केलें असेल. श्रीमंत राजश्री बाबाच्या पत्राची नक्कल पाठविली ती पावली. श्रीमंत राजश्री नानास दाखविली. कारकून व सरंजामी पाठविले ह्मणोन आज्ञा, त्यास अद्यापि आह्मांकडे आले नाहींत. आज किल्ल्यावर गेले होते. उदईक येतील. कारकून भेटले ह्मणजे चारशें रुपयाचें मनास आणून पावती घेतों. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं० २४८२ श्री (आषाढ शुद्ध ८
६ जुलई.)

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री पांडुरंगराव गोविंद
स्वामीचे सेवेशीं-

पोष्य माधवराव नारायण प्रधान. नमस्कार. विनंती येथील कुशल जाणोन स्वकीय लिहीत जाणें. कित्तूरकरानें जमाव करून सरकार तालुक्यास उपद्रव दिला. धारवाडाजवळ येऊन राहिला. तेथून पत्रें येतात. तुह्मांस वर्तमान कळतच आहे परंतु किमपि काळजी नाहीं! राजश्री कोन्हेरराव यांजबरोबर फौज देऊन पाठविलें. करवीरकर यांची तहाची याद करार झाली त्याप्रमाणें तेथील गुंता उरकून धारवाडास जावें ते तेथेंच गुंतोन राहिले आहेत! यादी प्रमाणें ऐकत असतां कोन्हेरराव ऐकत नाहींत असें त्याजकडील पत्रीं भाव येतात. हे कोण तऱ्हा! प्रसंग काय! तूर्त कामावर दृष्ट देऊन जाबसाल समेटून घ्यावा ते लांबणीवर घातलें! त्यास मोठमोठ्या जाबसालाची तोड पाडून निघोन लवकर जाणें. आंत बाहेर जाबसाल नाहीं. किरकोळी जाबसाल मागाहून होतील असें काल येथून कोन्हेररायास लिहिलें आहे. तर त्यास तिकडे लौकर रवाना करणें. तुह्मीं आपल्या जवळचा सरंजाम घेऊन फौजेंत जाणें. घरीं परिछिन्न न राहणें. कित्तुरकरानीं लबाडी केली व नित्य नित्य करीत असतां तुह्मांस चैन कसें पडलें आहे? सरकारच्या महालास त्यानें उपद्रव केल्यावर तुमचा तालुका स्वस्थ राहील कीं काय? त्यानें समजोनच उपद्रव न केला तर राहील[1]! असो. येविशीं तोफखान्याचें पत्र गेलेंच आहे तें घेऊन लौकर जाऊन कित्तूरकरांचा रेच बरेच रीतीनें मो-

---

१ तुह्मी त्याच्या वाटेस जात नाहीं तेव्हां तुमच्या मुलखास उपद्रव कां द्यावा अशा विचारानें.

डणें. जाणिजे. छ० ७ जमादिलावल सुरू सन सीत सब्बेन मया व अल्लफ हे विनंती.

नं० १४८३ श्री (८ जुलई)

श्रीमंत राजश्री तात्या स्वामीचे सेवेशीं

पोष्य शिवाजी बाबाजी साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल तागायत आषाढ शुद्ध दशमी मंदवासरे मुक्काम भिवंडी वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावलें. लिहिला मजकूर कळला. करवीरकराकडील फडशा न होय. आळतें घेऊन शिरोळास मोर्चे लाविल्यावर त्यांजकडील कारकून आला. इकडून तिकडे गेला आहे. ह्मणून श्रीमंत राजश्री कोन्हेररावजीनीं[1] लिहिलें, त्यास आपणही शिरोळास गेला मोठी गोष्ट केली. आपण मिरजेसच आहां. आपण मन घातल्याखेरीज मनसबा शेवटास जात नाहीं. अशा प्रसंगांत त्यांनीं[2] मन घालून करवीरकरांच्या मोठ्या मोठ्या कलमांचा फडशा करून ध्यावा आणि कित्तुरकराच्या पारिपत्यास आपण सुद्धां जावें. आपण गेल्याखेरीज बळ पडत नाहीं. आपण गेल्याचें वर्तमान कळतांच कित्तुरकर निकालावर येईल. याजकरितां आपण जावयाचें करावें 'चाळीस पन्नास हजार रुपये पर्यंत जाले तरी देऊं, परंतु प्रसंग मोठा आहे;' असें नानानीं बहुता प्रकारें सांगितलें व आपणासही भारी पत्रांवर पत्रें गेलीं आहेत आपला दबदबा अधिक आहे खराच, परंतु किल्ल्याचा प्रकार. बंदोबस्त करून धनीपणास तेथें श्रीमंत राजश्री बाळासाहेब आहेतच. असें जाहल्यानें कित्तुरकर कसेंही करून निकालावर घेऊन आपणास यश येईल यांत संशय नाहीं. कित्तुरकराकडे हैदरखानाचें राजकारण नसल्यास

१ पांडुरंगराव. २ कोन्हेररावानीं.

तिकडे फौज जाते असें जाहल्यावरच बोली चाली लावील. तिकडील सूत्र असल्यास ओढील. तिकडील सूत्र असल्यास उपेक्षा झाल्यानें आमचा तालुका तोंडीं आहे त्या तालुक्यामुळें कांहीं स्थीत राहिले आहे. नाहीं तरी मग विचार कळतच आहे ! याजकारितां [एकटा] कित्तुरकरच आहे तों गुंज मोडली तरच मोडेल. याचा विचार आपल्या चित्तांत येत नसेलसा नाहीं. राजश्री आनंदराव रास्ते यांस पत्रें व हुजरे गेले आहेत. प्रतिनिधीस फौज पाठवावयाविशीं निकडीचीं पत्रें गेलीं आहेत. येथून गाडदी तीनशें नेमिले आहेत. रवानगी करावितों. भारी फौज गेल्याखेरीज परिणाम नाहीं. शेणामेणाचें आहे तें लोखंडाचें होईल असें (कारभाऱ्यास) नित्य सांगतों. पैसा नाहीं याजमुळें यांस कांहीं सुचत नाहीं. तो तालुका राहिल्यानें सर्व फुलजी आहे. आपण तिकडे रोख केल्याखेरीज गुंज फुटत नाहीं असें यांच्या विचारें आहे. श्रीमंत मातुश्री बाई दिवसेंदिवस क्षीण होतात. दाजी पुण्यांतच आहेत. श्रीमंत राजश्री नाना काल पुण्यास गेले आहेत. आठ दिवस राहून येणार. सरंजामी यांचा जाबसाल काल पासून पडला आहे. दोन तीन दिवसांत आह्मीं पुण्यांत जाऊं. राजश्री हरीपंततात्या चोळीमहेश्वराकडे नर्मदा उतरावयास गेले. अलीकडे पत्र आलें नाहीं. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं० १४९४ श्री (आषाढ शुद्ध १२
१० जुलई)

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री कोन्हेररावजी
स्वामीचे सेवेशीं.

पोष्य येसाजी राम. कृतानेक नमस्कार. विनंती उपरी येथील कुशल

---

१ हैदराच्या तोंडावर तुंगभद्रातीरीं आमचा सरंजामाच। लक्ष्मेश्वर वगैरे तालुका आहे तो सुरक्षित आहे तों पर्यंत सर्व ठाकठीक आहे असा भाव.

ता॥ छ० ११ जमादिलावल जाणून स्वकीय कुशल लेखन करीत असलें पाहिजे. विशेष. अलीकडे आपणाकडून पत्र येऊन कुशलवृत्त कळत नाहीं तरी सविस्तर लिहिलें पाहिजे. या नंतर इकडील वर्तमान वरचेवर आपणास लिहीतच आहे. कित्तुरकरानें नवलगुंद तालुका घेतला. कलघटगीस ठाणें घालून तेथें मुक्काम करून राहिला आहे. गदगास जाणार ह्मणतात. दुसरी आवई इकडे येणार अशी आहे. कोणीकडे जातो पहावें. गुदस्तां भाद्रपदमासापासून कित्तूरकरानें लबाडी केली येविशीं सरकारांत पत्रें आज एक वर्ष लिहितां बेजार झालों. आपण फौज व तोफा घेऊन देसायाच्या पारिपत्याकरितां आलां ते करवीरच्या शहास येऊन गुंतला. दोन तीन महिने आपणास पत्रें लिहिलीं. लौकर उलगडा करून येण्याविशीं पत्रें येतच आहेत. परंतु येणें होत नाहीं! कित्तूरकर शेर होऊन तमाम प्रांत घेतला. राहतां तीन किल्ले राहिले सर्वस्वें पेंचात आलों. आपल्या येण्याचा मार्ग पहातां हे दिवस पाहिले. आतां तरी विलंब न करितां फौजेसह लौकर यावयाचें करावें. राजश्री रामचंद्रपंत आपास जमावाकरितां लिहिलें होतें त्यानीं किरकोळ जमावानें कांहीं होणें नाहीं, करितां सुरापुरकर व कनकगिरीकर यांजकडे राजकारण करून त्यांस आणावें " ऐसा करार करून लिहून पाठविलें आहे. त्यास भारी पैका पडतो. गैर सनदी खर्च करावयाची सरकारची आज्ञा नाहीं. किरकोळ खर्च होणें तों होईल. भारी खर्च कर्ज काढून करावा, सावकाराच्या पेंचांत यावें, याकरितां आपला मार्ग पहात आहे. परंतु येणें न घडलें ऐसा प्रकार घडून आला. आतां तेथील शहास न गुंततां लौकर आल्यास प्याद्यांचें वगैरे सामान नवलगुंदकर देसाई व नरगुंदकर व येथील मिळोन जथ बराच आहे. आपण आलां तर त्याचें पारिपत्य होईल जाणोन लिहिलें आहे. दिवसगतीचा मजकूर आजपर्यंत होत आला तसाच

पुढें जाहला तरी सुरापूरकर व कनकगिरीकर यांस आणावें ऐसें आपले विचारास आलें तर तैसेंच लिहोन कळवावें ह्मणजे त्या प्रमाणें करावयास येईल. सरकारांत पत्रें पाठविलीं. ते तुह्मांवर घालून लिहितात. उत्तर समर्पक येत नाहीं. येथें फुरसत राहिली नाहीं. यास्तव हें पत्र लिहिलें आहे. तर लौकर फौजेसुद्धां यावयाचें करावें. कदाचित् येण्याचा अनमान असालिया तसेंच लिहिणें. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विनंती.

पै॥ छ० ११ जमादिलावल.

नं० १४८५

(आषाढ शुद्ध जुलईचा प० पंधरवडा.)

वामनरावाचें पांडुरंगरावास पत्र.

" राजश्री फत्तेसिंग गायकवाड इंग्रजांचे विद्यमानें श्रीमंतांस जाऊन भेटले तेव्हांच वीस लक्ष रुपये फत्तेसिंग यानीं द्यावे असा ठराव होऊन श्रीमंतानीं त्याजकडे मुलुख करार करून दिला. ऐवजासही मुदत क्रमें कडून करून दिली. तूर्त दोन लाख रुपये द्यावयाचा करार केला. तो ही दिला. याचें कारण कोणतें कीं, त्यांचें लक्ष सर्व इकडे. येथून जातानां शपतपुरस्कर बोलोन गेले होते कीं, कसा प्रसंग पडेल तसें कबूल करून काळ घालवितों. श्रीमंत राजश्री रावसाहेबांचे पायांसीं दुसरा प्रकार नाहीं. "

नं० १४८६

श्री

[जुलई प० पंधरवडा

सेवेशीं शिवाजी बाबाजी हैसकर साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल तागायत आषाढ शुद्ध[१] मुक्काम भिवंडी वर्तमान यथास्थित असे. विशेष.

---

१ येथें पत्र कसरीनें खाल्ल्यामुळें मिती उमगत नाहीं.

आपण शिरोळास मोर्चे लाविल्यानंतर कारकून करवीरकराकडील आला होता. इकडून कारकून त्यांजकडे गेला होता अशीं पत्रें श्रीमंत राजश्री कोन्हेररावनीस आलीं होतीं. अलीकडे कसें जाहलें, शिरोळचा मजकूर कसा, यादी फडशा झाला किंवा नाहीं, धारवाडाकडे जावयाची त्वरा आहे याजकरितां कळेल तसें समेटून घ्यावें. ह्मणजे धारवाडाकडे त्वरेनें जावयास मोकळीक होईल. श्रीमंत राजश्री नाना नवमीस पुण्यास गेले आहेत. आज अथवा उदईक येणार आहेत. श्रीमंत राजश्री पुरुषोत्तम-राव दाजी पुण्यांत होते ते काल पुरंधरास आले. श्रीमंत मातुश्री पार्वती-बाईची प्रकृती दिवसेंदिवस अधिक होते. क्षयाची व्यथा आहे. गंगा विष्णु[1] औषध देतात. बुणगें फार करून देशास आलेंच. आह्मांकडील बुणगें मिरजकडे गेले ह्मणून वर्तमान आहे. राजश्री हरीपंततात्या सर्व्या फौजासुद्धां चोळीमहेश्वराजवळ (नर्मदा) उतरावयास गेले आहेत. तेथें पाणी थोडकें होतें. हत्ती उंटाचा उतार होता. फार करून उतरून अलीकडे आले ह्मणोन वर्तमान आहे. बुणगें फार करून घरोघर गेले, त्यापक्षीं सोनगडाजवळ छावणीस हरीपंतानीं रहावें ही गोष्ट अवघडच आहे! लोकच राहणार नाहींत. ज्या पक्षीं छावणीस न राहावेसें झा-ल्यावर नर्मदेपलीकडे व अलीकडे अम्मल इंग्रज बसवून अलीकडे शह द्यावयास चुकणार नाहीं. मग रसदेचा ऐवज येणें हें कळतच आहे. पुढें फौज जमा होणें हेंही अवघडच आहे. मनसबा नासला! श्रीमंत राजश्री रावसाहेबांच्या पुण्यप्रतापें करून काय होणें तें होईल! मनसब्याची रीत पाहतां ताळ नाहीं. कोणाचा भरंवसा कोणास पुरत नाहीं. राजश्री महादाजी शिंदे उज्जनीस आले आहेत. श्रीमंत मातुश्री आनंदीबाईस धारेस खर्चास देतात! तशीच अहिल्याबाईसही खर्चास देतात, राजश्री

---

१ त्या काळचें प्रसिद्ध वैद्य.

हरीपंतासमागमें होळकर नर्मदा उतरून अलीकडे येतां दिसत नाहीं. पलीकडे राहिले ह्मणजे शिंद्यांचें त्यांचें सूत्र एकच आहे. तिकडे जाणार नाहींत, इकडे येणार नाहींत, असा प्रकार? वरकड सरंजामी यांचे महाल फार करून गुजराथेमधींच आहेत तेव्हां ते महाल गेले ह्मणजे फौज कोणत्या ऐवजावर ठेवितील? हुजरातीस दोन महिने नालबंदी नाहीं. असें सारेंच अवघड जाहलें आहे. ईश्वरावर हवाला आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं० १४८७ श्री [आषाढ शुद्ध जुलई प० पंधरवडा]

सेवेशीं शिवाजी बाबाजी साष्टांग नमस्कार विज्ञापना. आपण पत्रीं राजश्री महादजी शिंदे यांचा मजकूर लिहिला त्या अन्वयें श्रीमंत राजश्री नानाच्या कानावर घातला. उत्तर प्रती उत्तर झालें जे, " गुदस्तां श्रीमंत राजश्री दादासाहेब नर्मदा उतरोन गेल्यापासून बंदोबस्त करून देतीलसा भरंवसा शिंद्याचा आह्मांस. त्या अन्वयें द्यावयाचें बोलणें चालणें झालें होतें. श्रीमंतास द्यावयाचें ह्मटल्याप्रमाणें निभावणी केली असतां निखालसता त्यांजकडून न झाली. पुढें श्रीमंत मागती तिकडे गेले. राजश्री हरीपंततात्याच्या सरदारांच्या भेटी जाहल्यानंतर एकरूप साऱ्यानीं होऊन पुर्तेपणें बंदोबस्त होईसा करावा ती गोष्ट न केली. होळकर तिकडे राहिले. हे उज्जनीस आले. तत्राप आह्मीं सिंदखेड वगैरे थोडे बहुत दिलेंच. मातबर दरम्यान पडले असतां कोणतीही गोष्ट शेवटास न गेली आतां आपणाकडे जें बोलतात तें पक्कें असल्यास त्यानीं सर्व प्रकारें मसलतीचा भार ध्यावा, इकडे बलाविल्यानें इकडे यावें, गेली गोष्ट सुधारावी,

१ दादासाहेबांकडे.

ह्मणजे त्यांची रदबदल न चालेल असा विचार काय आहे, आगळीक करून दाखविल्यावरी रदबदलीस जागा होते. दार मदारचा प्रकार करून घ्यावा तरी मसलतीच्या उपयोगीं न पडतां भांडावयासी जागा करून ठेवावी हे प्रकार त्यांचे. यास्तव त्याची पत एकनिष्ठेची राहिली नाहीं. ती पत मेळवून पुढें कायम करून घ्यावी हें त्यानींच मनापासून केल्या होईल. असें जाहल्यास सोईनें सर्व प्रकार घडतील." या प्रमाणें बोलणें झालें आहे आपण दस्ताऐवजी न गुंतता पत्र देणें तरी मोघम पत्र अमका ग्रहस्थ सांगतां कळों येईल असें लिहिणें तें लिहावें. आपणास तपशीलवार कळावें याजकरितां लिहिलें आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना. राजश्री हरीपंततात्याकडील पत्रें आलीं. श्रीमंत भडोजेतच आहेत. आपल्या फौजा नर्मदा उतरतात या प्रमाणें वर्तमान. श्रीमंत मातुश्री पार्वतीबाई फारच कंठलीं आहेत. हत्ती वगैरे दानें झालीं. ईश्वर कृपा करील तरच भरंवसा. नाहीं तर ताकद तिळमात्र राहिली नाहीं. वांचतील असा भरंवसा नाहीं. हे विज्ञापना.

नं० १,४८८ श्री (आषाढ शुद्ध जुलई प० पंधरवडा.)

सेवेशीं साष्टांग नमस्कार विनंती राजश्री हरीपंततात्या कडील पत्रें आलीं. नर्मदा उतरोन अलीकडे आले. तेथून कूच करून मजल दर मजल तापीवर येणार. तापी उतरोन सोनगडाजवळ छावणीस येणार. रास्ते यांजकडील फौज व राजश्री आनंदराव खानदेशाच्या लाघल्यास आहेत तेथेंच आहेत. राजश्री मलबा पानसे वगैरे पागा व बुणगे सुद्धां राहेरी नजीक आले होते त्यांस पत्रें गेलीं कीं सोनगडास छावणीस राजश्री

१ पत्र शिवाजी आबाजीचें पांडुरंगरावास.

हरीपंततात्या येणार तेथें जाणें. अशीं पत्रें गेलीं त्यावरून ते कुच करून माघारे गेले. बुनगी तो लोकांची फार करून बरोबर आली. राजश्री जिऊबा [आमचें] बुणगें घेऊन आले, त्यास सडे बुणगें श्रीमंत राजश्री वामनरावबावाजवळ राहिलें आहे किंवा नाहीं हें कळत नाहीं. सडें बुणगें राहिले असल्यास उत्तम. नाहीं तरी फजिती आहे! कांहीं सडे सामान तरी खानदेशाच्या सुमारें पाठवावयाचें करावें. श्रीमंत राजश्री दादासाहेब इंग्रजसुद्धां उभईपाशीं आहेत. उभईत नागोजी बलकवडे सरकार निसबतीनें होते. तिकडील फौजा इकडे आल्या तेव्हां त्यास आधार कोणाचा? याजकरितां श्रीमंतास भेटले. लाख रुपये खंडणी करून वसुलातीस राजाराम गोविंद गेले आहेत. राजश्री फत्तेसिंग गाइकवाड राजश्री हरीपंत तात्यापाशीं होते. फौजा इकडे यावयाच्या होत्या तेव्हां त्यानीं इकडे येऊन खावें काय? याजकारितां राजश्री खंडेराव गाइकवाड व फत्तेसिंग यांचें नीट करून राजश्री तात्यानीं दिलें आणि तिकडे ठेविलें ते बडोद्यास गेले. बडोद्यास श्रीमंत व इंग्रज यावयास सिद्ध झाले तों राजश्री गोविंदराव गाइकवाड याणीं श्रीमतासी रदबदल केली कीं, आमचा व फत्तेसिंग यांचा घर कलह आहे. आह्मी तो समजो परंतु तुह्मी जाऊन ठाणें घेऊन इंग्रजांचे हवालीं करावें हें आह्मांस कसें पुरवेल? इंग्रजांचे स्वाधीन ठाणें झाल्यावर सुटावयाचें नाहीं. असें सांगोन बडोद्यास जावयाचें रहाविलें. मनसबा पहातां गाइकवाड एक होऊन आपलीं ठाणीं राखतील. घर कलह वाढवून इंग्रजांचे घरीं दौलत घालतील असें होणार नाहीं. मनसबा उमजला! तालुका जतन करतीलसें दिसतें. सरकारचे महाल आहेत ते दरोबस्त जातील! त्यास त्राताच कोणी नाहीं! महालकरी यानीं काय करावें! त्यांस भेटतील आणि खंडण्या करून ऐवज देऊन

१ पटवर्धनांचा पोतनीस व बुणग्यावरील कारकून जिवाजी रामचंद्र जोशी.

आपला बचाव करून घेतील असा प्रसंग दिसतो. आज चार दिवस पुण्यांत पर्जन्य चांगला पडतो. हा पर्जन्य सर्वत्र असावासा दिसतो. नदीस पाणी फार आलें आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं० १४८९ श्री [आषाढ शुद्ध जुलई ४० पंधरवडा]

सेवेशीं साष्टांग नमस्कार विनंती. इंग्रजाकडील राजकारण राजश्री आनंदराव जिवाजी यांजकडे होतें जे. ' वीस लक्ष रुपये द्यावे आणि साष्टी सरकारांत घ्यावी. व श्रीमंत राजश्री दादासाहेबांस पंधरा लक्षाची जहागीर द्यावी व दोन किल्ले द्यावे आणि समजावीस करावी. ' येणें प्रमाणें बोलत होते. त्यांच्या मनांत त्या प्रमाणें करावें असें नव्हतें. अलीकडे मनसबा बिघडला. गुजराथ त्यांच्या हातास लागतेसी जाहली. याजकरितां त्याप्रमाणें तह जाहल्यास करावा असें चित्तांत आणून राजश्री भिकाजीपंत काळे कागदपत्र देऊन इंग्रजाकडे रवाना केले आहेत. आठ दिवस जाऊन त्यास झाले. मान्य करितात किंवा नाहीं पहावें. दौलताबादेचे ठाणें नबाबाच्या हवालीं झालें. नबाब औरंगाबादेस पांच सात रोजांत येणार. श्रीमंत सौभाग्यवती मातुश्री पार्वतीबाईची प्रकृत पांच सात रोज बरी आहे. खोकल्याचा उपद्रव फार आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं० १४९० श्री १९ जुलई १७७५

चिरंजीव राजश्री दादा[2] यां प्रती अनुबाई. आशीर्वाद उपरी तागायत छ० १६ जमादिलावलपर्यंत वर्तमान यथास्थित असे. विशेष.

---

१ बापू व नाना यांच्या. २ व्यंकटराव दादा घोरपडे.

आपण पत्र पाठविलें पावलें. लिहिलें वर्तमान सविस्तर कळलें. राजमंडळचे तहाचा प्रकार तरी वे॥ राजश्री महादेवशास्त्री व नागोजीपंत व बाबुराव तिकडून रुईस आले होते. इकडून राजश्री जिवाजीपंत व धोंडोपंत रुईस गेले होते. दोन रोज तेथें राहून काल राजश्री बाबूराव यांस घेऊन येथें आले आहेत. आज त्यांचा करार मदार ठरोन निरोप देऊं. सध्या कित्तुराकडे जावयाची निकड व करवीरकरावर जरब ही पोंहोंचली नाहीं, असा अर्थ पाहून तूर्त निकाल काढला आहे. पुढां आणखी पुरंदरास उजूर ठेविला आहे. आणखी होईल तें वर्तमान मागाहून लिहून पाठवूं. मानाजीस माघारें लौकर पाठवून देणें. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं० १४९१ श्री (आषाढ वद्य
जुलई द० पंधरवडा)

विज्ञापना. तोतयाचा मजकूर लिहिला तो कळला. आह्मी विनंती करितों. महिना पंधरा दिवसांत दुसऱ्या स्थळास ठेवावयाचें करवितों झटल्यास उत्तमच झालें. नाहीं तर आह्मीं लिहून पाठवितों. यांस ही सांगतों. मग (दुसऱ्या स्थळास) लावून द्यावयाचें करावें. विसाजीपंत गद्रे खातरजमा करीत होते तेही मिरजेस राजश्री हरीपंतानीं पाठविले आहेत. त्यांचें महात्म्य समजते! आपण लिहितीलच. लटकी भ्रांत लोकांस आहे. दरबारी कोणासही भ्रांत नाहीं. नर्मदा उतरल्यावर श्रीमंत राजश्री भाऊंकडील जोडी आली. आह्मांस पत्र होतें. आपणास पत्रें आहेत. कालच जोडी आपणाकडे गेली बऱ्हाणपुराजवळ (लष्कर

---

१ पत्र शिवाजी बाबाजी छत्रकर यांचे पुरंदराहून मिरजेस पांडुरंगराव तात्यांस

परत) आल्याचीं पत्रें सरकारचीही आलीं. सोनगडाजवळ छावणीस खानदेशांतून जाणार. जमीदाराकडील फडशा प्रतिनिधकिर्दील झाला. रास्ते याणीं गुदस्तां दोन लाख रुपये कर्ज दिलें आहे त्यांत जमीदारांचा व जातीचे तैनातीचा ऐवज वजा करावा, बाकी राहील तो द्यावा घ्यावा या प्रमाणें ठरोन घरास गेले आहेत. फडशा करावयास आतां येणार. आह्मासही ऐवजाविशीं नित्य ह्मणतात. आह्मी ह्मणतो जे, खावंदांचें पत्र येईल त्याप्रमाणें वर्तणूक करूं. लष्करास पत्रें श्रीमंत राजश्री बाबाकडे व भाऊकडे गेलीं आहेत. उत्तरें येतील तेव्हां कळेल काय तें. सखारामपंत ह्मणत होते जे, ' तीन लक्ष रुपये जमीदाराकडील व लाख रुपये जातीच्या तैनातांचे व त्र्याणव हजार रुपये सनसलास बाबत येणें प्रमाणें ऐवज येणें असतां शिवाजीपंत गोड बोलोन जाबसाल करितात, नाना[1] निकड करीत नाहीं ! चित्तास येईल तें करूत ! ' असें परभारें ह्मणत होते. राजश्री नरसिंगराव धायगुडे यांजकडील जमीदारांच्या ऐवजीं व जातीच्या तैनातीच्या वराता तोफखान्याकडील जाहल्या. ' हुबळीच्या किल्लेदाराबद्दल ऐवज येणें, मनस्वी ऐवज येणें असतां (पटवर्धन) विल्हे लावीत नाहींत ' असें आपल्या घरीं (सखाराम बापू) ह्मणत असतात. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं० १४९२ **श्रीगणराज** (आषाढ वद्य

जुलई दु० पंधरवडा.)

चिरंजीव राजश्री तात्या यांसीं आशीर्वाद उपरी. पेशजी राजश्री फत्तेसिंग गाइकवाड इंग्रजांचे विद्यमानें श्रीमंतांस जाऊन भेटले तेव्हांच वीस लक्ष रुपये फत्तेसिंग यानीं द्यावें ह्मणून ठराव होऊन श्रीमंतांनीं कुली

१ फडणीस. २ वामनरावाचें पत्र पांडुरंगरावास.

त्यांजकडे मुलुख करार करून दिला. ऐवजासही मुदत क्रमें कडून करून दिली. तूर्त दोन लाख रुपये द्यावयाचा करार केला तोही (ऐवज त्यानें) दिला. याचें कारण कोणतें कीं त्यांचें लक्ष सर्व इकडे. जातानां शपत पुरस्कर बोलोन गेले होते कीं ' कसा प्रसंग पडेल तसें कबूल काळ घालवितों; श्रीमंत राजश्री रावसाहेबांचे पायास दुसरा प्रकार नाहीं; ' ह्मणोन राजश्री फत्तेसिंगबाबा यांचीं पत्रें ममतेचीं येतच होतीं. सांप्रत मुलूख श्रीमंतानीं त्यांजकडे करार करून दिला ह्मणून राजश्री गोविंदराव गाइकवाड रुसून जाऊन बडोदे तालुक्याचे गांव मारूं लागले. फत्तेसिंगाचे मध्यस्थ इंग्रज. त्यानीं श्रीमंतास पुसिलें कीं आमचे मध्यस्तीनें चार रुपये फत्तेसिंग यांजकडे करार करून ऐवजही कराराप्रमाणें घेतला असतां गोविंदराव मुलुख मारतात हें कामाचें नाहीं. तेव्हां श्रीमंत इंग्रजास बोलिले कीं गोविंदराव याची कांहीं तरी समजूत काढावी. असें बोलों लागले तेव्हां इंग्रजानीं साफ सांगितलें कीं ज्या कामांत आह्मी मध्यस्थ त्यांत काडीची तफावत [येतां कामा] नये. गोविंदराव याचेंच अगत्य असेल तर फत्तेसिंग यांस निरोप घेऊन स्वस्थळास लाऊन द्यावें. मग तुमचे विचारास येईल तसें करावें. अशी निकड करून इंग्रजानीं फत्तेसिंग यास निरोप देऊन त्यांस बडोद्यास लावून दिलें. ' श्रीमंतांनीं बदल खाल्ला. आतां तुमचे [1]शरीक आह्मीं आहों. ' असें बोलून लाऊन दिलें. ' श्रीमंतांनीं याजउपर स्थळाचें गळीं पडल्याचा प्रकार योजिला तर [तुमची] कुमक आह्मीं करितो ' असें पक्कें बोलोन लावून दिलें. तेव्हां इंग्रज वचनाचे साचे, ते फत्तेसिंग याचे न्यून पडों देत नाहींत. श्रीमंत बडोदे नजीक जाऊन उतरले आहेत. याजउपर गोविंदराव यास अनुकूल करून घेतील परंतु इंग्रजांचे वांकडें आलें. (इंग्रजानीं) फार करून माणूस भडोजेस पाहि-

---

१ सोबती.

लेंच लावून दिलें होतें. हजार दोन हजार माणूस श्रीमंतांजवळ होतें. तें व तोफा पांच सात बडोद्यास राजश्री फतेसिंग यांजकडे लावून दिलें ह्मणून वर्तमान आलें. मानाजी फाकडे यांचाही रुसवा होता. त्याचें कारण कोणी एक भला माणूस [श्रीमंताच्या] नाटकशाळेसी जाऊन लबाडी केली. त्याजवरून त्या भल्या माणसाचें डोचकें मारावयास नेलें तेव्हां फाकड्यानें फार अर्ज केला तो न ऐकिला याजकरितां रुसले होते. फिरोन समजावीस केली. लबाडाचें पारिपत्य केलें. बडोद्यास मोर्चे लावावे ह्मणोन इंग्रजास (श्रीमंतानीं) पुसिलें. इंग्रजानीं यास आपण अनुकूल नाहीं ह्मणोन साफ सांगितलें. इंग्रजांचा व फत्तेसिंग यांचा स्नेह पहिल्यापासून होता. यास्तव त्याचे विद्यमानें काळ घालवावयासाठीं जाऊन भेटले असतां श्रीमंतानीं बदल खाल्ला याजमुळें इंग्रज पुरते फत्तेसिंग यास अनुकूळ जाहले. सर्व बंदरावर नवा सुभा (विलायतेहून) आला तो बंगाल्यास आला. त्याचीं पत्रें परभारें मुंबईस गेलीं कीं " रघुनाथराव यांचें साहित्य बिगर हुकूम करावयास कारण काय? याजउपर तुमचें सामान असेल तें घेऊन जाणें " ह्मणून पत्रें आलीं. व पुरंधरासही पत्रें आलीं कीं " मुंबईस या प्रमाणें आह्मीं लिहून पाठविलें. तुमचा आमचा स्नेह पूर्वीपासून चालत आला त्याजमध्यें गुंता नाहीं. " ह्मणून पत्रें आलीं त्याच्या नकला मुंबईस पाठविल्या आहेत. त्याचें उत्तर अद्याप आलें नाहीं नवा सुभा आल्याची बातमी कळोन इंग्रज फत्तेसिंगावर उपकार दाखवून आपल्या स्थळास जावयाचा मजकूर करितात कीं काय कळेना. फिरोन बातमी आल्यानंतर कळेल. श्रीमंतानीं अमदाबादेस अमीनसाहेब यांस रवाना केलें होतें, त्यास राजश्री अप्पाजी गणेश व खंडेराव गाइकवाड यानीं मिळोन आमीनसाहेबांचें पारिपत्य चांगलें केलें ह्मणून पत्रें आलीं. श्रीमंत रावसाहेबांचे पुण्यप्रतापें इंग्रजानीं हात सोडिला तर मग श्रीमंतांचा

मनसबा कळतच आहे! आणखी वर्तमान येईल तें मागाहून लिहून पाठवूं. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं० १४९३ श्री (१६ जलई)

सेवेशीं शिवाजी बाबाजी. साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल तागायत आषाढ वद्य चतुर्थी भानुवासरे मुक्काम पुणें वर्तमान यथास्थित जाणून स्वकीय लेखन करावयासी आज्ञा केली पाहिजे. विशेष. आपण पत्रें शेटी व संताजी यांजबरोबर छ० ७ जमादिलावलचीं पाठविलीं तीं छ० १२ मिनहूस पावलीं. अगोदर पुरंदरास श्रीमंत राजश्री दाजीकडे गेले होते, लाखोटा फाडून पत्रें वाचून पाहून आह्माकडे पाठविले. पत्रांतील मजकूर सविस्तर कळला. राजश्री सखारामपंतास दाजीनीं वर्तमान सांगितलें. त्याजवरून उत्तर केलें कीं, " छापा संभाळून त्यांजवर जरब दिली ही मोठीच गोष्ट केली. त्यानीं सामान शिरोळांत घालून गेले, गोटावर गोळे मारू लागले, तेव्हां कूच करावें लागले. कूच केलें. उत्तम केलें. परंतु गोळ्याचा मार चुकवून राहून मोर्चें कायम करावयाचें होतें ती गोष्ट न झाली त्या पक्षीं मोर्चें उठल्यावर तरी सडी फौज करून त्यांजवरच जावयाचें होतें ते न गेले! खासा तात्या मिरजेस आले ही गोष्ट फारच वाईट केली. त्यानीं मोर्चे उठविल्यासारखे त्यांच्याच गळीं पडावयाचें होतें. लौकिक मिरजेस आल्यानें फारच वाईट गोष्ट झाली. असें झालें असतां मिरजेस यावयाची निकड काय होती! त्यांची फौज भारी ह्मणावी तरी सारी तीन साडेतीन हजार व प्यादे हजार पावेतों. आपली फौज व इचलकरंजी व मिरज मिळोन सा सात हजार. शिवाय प्यादे. इतकें सामान असतां त्यांचें पारिपत्य होत नाहीं! काल महिमेस काय

---

१ करवीरकरांवर.

करावें ! तुमच्या भरंवशावर आह्मीं नेट धरला. मनोगतासारखें पारिपत्य होईलसा भरंवसा होता ती गोष्ट न झाली. मोर्चे उठल्यावर त्यांचे गळीं पडावें ही काळजी त्यांस असावी ती त्यानीं मनांत न आणितां घरास आले ही गोष्ट उत्तम न केली. " ह्मणून बहुत विस्मय करीत होते. फितव्या-चे प्रकार सर्व समजाविले परंतु ते त्यांच्या ध्यानांत येत नाहींत. " इक-डील लोकांपैकीं फितवा असेल त्यांस निराळे करून आपली फौज मिरजेची व इचलकरंजीची व पागा होत्या तितक्यानिशींच नेट धरून पारिपत्य क-रावयाचें होतें. राजश्री हरीपततात्यापाशीं फौज किती आहे! त्यांत फि-तवेखोर किती आहेत! परंतु तितक्यास नजरेस राखून मनसबा करावयाचा करीत असतात कीं नाहीं? त्यांचें[1] सामान भारी ह्मणावें तरी तीन साडे तीन हजार फौज व हजार प्यादे येणें प्रमाणें सामान आहे. इकडील सामान दुपट आहे. असें असतां केल्यास सारेंच होईल. " असें नाना प्रकारें ह्मणत होते. " मोर्चे उठल्याची इरे न धरितां मिरजेस आले त्या पेक्षां आतां कोन्हेरराव यास तिकडे ठेवून फलादेश नाहीं. धारवाडचा किल्ला गेल्यानें फिरोन येणें कळतच आहे. याजकरितां कोन्हेररायानीं तेथें राहू नये. परिछिन्न निघोन जावें ह्मणोन पत्र लिहून परभारें पाठवितों. अतःपर तुमचे भरंवसे आह्मांस सर्व समजले! " आह्मी उत्तर केलें कीं, तुह्मां कारभारी यांत फूट. एकानें आंतून करवीरकराशीं राजकारण राखीत असावें फौजेंत फितवा त्यापक्षीं ज्यानें अंगेजणी करावी त्यानेंच मरावें इतका प्रकार. आपणाकडे धनीपणा ह्मणोन आपण ह्मणतात. ऐकावें इतकाच प्रकार. उत्तर प्रतिउत्तर बहुतच झालें. हैदरखानाकडील बातमी येते ती सांगितल्यास यांच्या चित्तांत येनच नाहीं त्यास इलाज काय करावा? बुडत्याचे पाय खोली असा प्रकार दिसतो. श्रीमंत राजश्री भवानराव व

१ करवीरकरांचें.

रास्ते यांस पाठवावें तरच कित्तूरकरांचें पारपत्य होईल. नाहीं तरी फितुरी फौज घेऊन जाणें आणि पारिपत्य करणें हें कोन्हेरराव याजकडून घडणें कळतच आहे. आह्मी बोलावयास चुकत नाहीं परंतु यांच्या चित्तांत येत नाहीं! वृद्ध ह्मणतात त्याप्रमाणें होतें असा येथील प्रकार आहे. उदईक हे[1] पुरंधरास जाणार आहेत. सारांश करवीरकरांचे फौजेचा एक वेळां रेच चांगला मोडता तर बरें होतें. फौज आपली धारवाडाकडे जाणार त्यापक्षीं इचलकरंजी व नांदणी वगैरे बाईकडील गांव आहेत त्यांत ठाणीं सरकारचीं घालावीं आणि फौज तिकडे रवाना करावी ह्मणोन सांगितलें, तत्राप गोष्ट यांच्या ध्यानांत येत नाहीं. "हीं ठाणीं आह्मीं सरकारचीं घालीत नाहीं. करवीरकरानीं ठाणीं घेतलीं तरी समजोन घेऊं. परंतु कित्तुरकर व हैदरखान एक होतील हें पुरवणार नाहीं." असें ह्मणणें कर्त्ते आहे. आपण लिहिलें कीं वानरतले निघावयाचा प्रकार तो यथार्थ. कोणी कोणाचा ना धणी ना कोणाचा गोसावी असा प्रकार झाला आहे. श्रीमंत राजश्री भवानराव यांस पाठवावें ह्मणोन बहुतच रदबदल केली परंतु "त्यांस समाधान नाहीं याजकारितां त्यांस कसें पाठवावें? फौज त्यांजकडील पाठवावयाविशीं लिहिलें आहे," असें ह्मणतात. गाडदी पाठवावेसा निश्चय झाला होता परंतु कोंकणांतून बातमी आली कीं मुंबईस मनसबा जाहला आहे कीं पांच हजार माणूस पुण्यास पाठवून गडबड करावी असा मनसबा झाल्याची बातमी आली. त्याजकारितां दोन हजार पाईचें माणूस व दहा तोफा घाट माथा पाठविणार. याजकारितां गाडदी पाठवावयाचे राहिलें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

१ सखारामबापू. २ नाना फडणीस.

नं० १४९४ श्री (१९ जुलई)

सेवेशीं शिवाजी बाबाजी साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल तागायत आषाढ वद्य ७ बुधवासरे मुक्काम भिवंडी वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपण पत्रें श्रीमंत राजश्री कोन्हेररायाच्या जासुदा बरोबर पाठविलीं तीं पावोन सविस्तर मजकूर कळला. श्रीमंत राजश्री नाना काल पुण्याहून आले. आह्मी समागमेंच आलों. शिंदे[1] यांचा प्रकार आपण लिहिला त्या अन्वयें श्रीमंत राजश्री नानास विनंती केली. त्यासीं त्याणीं उत्तर केलें कीं, " गुदस्तांपासून आह्मीं त्याजकडील लक्ष कोणे तऱ्हेनें राखित देऊं घेऊं केलें, (आशा होती कीं,) सर्व प्रकारें आमचे लगामीं लागतील. मातबर सरदार. मर्द माणूस. इतक्या गोष्टी समजोनच करीत होतों. तीन चार मध्यस्त झाले. त्यांच्या हातच्या स्वदस्तूरच्या चिठ्या आह्मांस आल्या त्या भरंवशावर श्रीमंतास पंधरा लक्ष रुपये त्यांच्या बचनावर दिले. त्यांच्या खर्चाची ओढ ह्मणोन लाख पन्नास हजार रुपये त्यांसही दिले. असें असतां आपल्या गुणास चुकले नाहींत! असो! पुढें राजश्री हरीपंततात्याची भेटी झाल्यानंतर वचन प्रमाण देऊन सर्वेच त्यांस टाकून उज्जनीस आले! त्याची प्रामाणिकता कळोन तुह्मीं रदबदल काय ह्मणोन करितां? तुह्मांकडे नाद असावा याजकरितां रदबदलही कांहीं लाविली आहे (इतकेंच!) तेथील क्षणभंगुर प्रकार. राजश्री बाळाराव त्यांजकडून येथें वकील ह्मणून आले असतां त्यांजवर (त्यांचा) विश्वास नाहीं! असो. त्यांचा प्रकार आपणाप्रमाणें प्रामाणिकता पाहतां ती गोष्ट

१ दादासाहेबांच्या मसलतींस महादजी शिंद्यानें लबाडी करून हिसके दिल्यामुळें त्याजवर सखारामबापू व नाना फडणीस यांची फारच नाराजी झाली होती. ती दूर करून पूर्वीप्रमाणें कारभाऱ्याची कृपा संपादन करून घेण्याकरितां महादजी शिंद्यानें पांडुरंगराव पटवर्धन यास मध्यस्थीस घातलें होतें त्याप्रकरणीं पुढील मजकूर आहे.
२ महादजी शिंद्याच्या.

त्या गांवीं नाहीं! आह्मीं करार करूं त्या अन्वयें त्यानीं मान्य करावें आणि उज्जनीहून कूच करून यावें अशी खातरजमा पुरत असल्यास तुह्मीं आमची निशा पुरती कराल तर पूर्ववत प्रमाणें निशा द्यावयाची चिंता नाहीं. ते बेइमानी करीत असतां त्यांस थोडे बहुत दिलेंच आहे. आपणास त्यांच्या वचनाचा भरंवसा कशावरून ती खातरजमा करून घ्यावी आणि आमची तुह्मीं करावी. उपरांत समर्पक सांगणें तें सांगों!" या प्रमाणें ह्मणतात राजश्री बाळाराव यांजकडील गृहस्थ (आपणाकडे आला) असल्यास मशारनिल्हेचें तेथें[1] ठीक नाहीं. मुख्याकडील[2] तिकडे कोणी आला असल्यास तसेंच लिहावें त्या सारखी खातरजमा करावयासी येईल. हैदरखान येणार येविशींची बातमीचीं पत्रें आपण पाठवितां तीं पाहतात, तो येणार नाहीं असेंच ह्मणतात, परंतु तरतूद फौजेची करावी ही गोष्ट होत नाहीं! आतां सर्व चिंता ईश्वरास असावी! यांच्या बुद्धि, यांचे प्रकार, सर्वही समजत चालले! राजश्री हरीपंततात्या नर्मदा उतरोन अलीकडे आल्याचीं पत्रें आलीं. तापीवर येऊन तापी उतरोन सोनगडाजवळ छावणीस येणार. छावणी सोनगडाजवळ करावी येणें प्रमाणें याणीं लिहून पत्रें त्यांजकडे पाठविलीं. छावणी तिकडे केल्याखेरीज खानदेशची रसद येणें कठीण व पुढें परिणामही नाहीं. छावणीस न राहिल्या उद्यां होणार तें आजच होईल! श्रीमंत राजश्री कोन्हेरराव यांजवळ फौज आहे त्यांत फितवा आहे ह्मणोन बातमी आपण लिहितात व रावही लिहितात तें आह्मीं उभयतांस सांगतों. उभयतां ह्मणतात जे, " तीन हजार फौज करवीरकरांची आहे. ह्मणून तुमच्या लष्करांतून पत्रें येतात त्यापक्षीं फितव्या खेरीज चार हजार फौज मिरज व इचलकरंजी व पागा मिळोन निघेल कीं नाहीं? निवड करून त्या फौजेनिशींच गांठ घालावी होती सारा तपशीलच लिहि-

१ शिंद्याशीं. २ खुद्द महादजी शिंद्याकडून.

तात! उत्तर काय करावें! फितव्याचा दस्तऐवज असल्यास आजची मसलत त्याजपासून भरून घेऊं " असें धणीपणानें ह्मणतात! छापा संभाळूले समयींच त्यांजवरच जरब दिली ही तर मोठीच गोष्ट आपण केली. फितव्यास इलाज नाहीं खराच. दस्तऐवज सांपडला असें एक पत्रांत होतें त्यास तेवढें पत्र पाठवावें. श्रीमंत सौ॥ मातुश्री बाईस जरा जरा समाधान दिवसेंदिवस होत आहे. श्रीमंत इंग्रज सुद्धां डभई नेजिक आहेत. गुजराथप्रांताची बंदोबस्ती करितात. श्रीमंत राजश्री नाना पुण्याहून आले. उभयतांचें बोलणें चालणें होऊन ठराव होईल तो लिहून पाठविलों. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं० १४९९ श्री (२६ जुलई)

सेवेशीं शिवाजी बाबाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल तागायत आषाढ वद्य १४ बुधवासरे मुक्काम भिवंडी वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपण पत्रें व यादी पाठविलीं तीं पावलीं. त्यास शिरोळचे मोर्चे उठल्यावर आपाजी शामजी फजित करून त्या करवीं राजश्री बापूनीं पत्रें पाठविलीं आहेत त्या प्रमाणें फडशा यादीप्रमाणें होऊन दोन हजार फौज व हजार प्यादे कित्तुरकरांच्या पारिपत्यास करवीरकरानीं श्रीमंत राजश्री कोन्हेरराव या समागमें द्यावें येणें प्रमाणें ठरोन पत्रें गेलीं आहेत. तिकडे कसें होतें पहावें. यथास्थित विल्हे लागल्यास उत्तमच जाहलें. नाहीं त्यापक्षीं श्रीमंत मातुश्री अनूबाईंचा बंदोबस्त पक्का यादी प्रमाणें करून ध्यावा. वरकड जसे होतील तसे घोरपडे[1], अमात्य व विशाळगडकर प्रतिनिधी, यांचे पुरंदरीं विल्हे लावावे. (कैदेंत असलेले) ब्राह्मण पुरंधरास पाठवावे. येथून बंदोबस्त करून सोडून द्यावे. घेतले

---

१ घोरपडे इचलकरंजीकर.

मसाले वगैरे त्यांचे पुरंधरों सांगतील तसे दुतर्फेचे विल्हे लागेल. येणें प्रमाणें करून विल्हे लावावें ह्मणोन आज्ञा झाली आहे. नाहीं पेक्षां इकडील लिहिण्यावरून चांगले विल्हे लागलें असल्यास उत्तमच झालें. लष्करचे जासूद रवाना केले. लष्कर बऱ्हाणपुरापाशीं आलें. तापी उतरतात, तापी उतरोन खानदेशांतून सोनगडाजवळ छावणीस जाणार. महमद इसफ भोंसल्याजवळ होता त्यास निरोप त्यानीं दिला. तो दोन हजार गाडदी व हजार राऊतांनिशीं गेला. तो सातपुड्याहून मार्गीं उपद्रव करीत गेला. तो खरगोणाजवळ गेला तेथें उपद्रव मांडिला. याजकरितां पांच हजार फौजेनिशीं राजश्री कृष्णराव बळवंत त्याच्या पारिपत्यास गेले आहेत. गांठ पडली तरी पारिपत्य होईल. हिंदुस्थानांत जाट व गोसावी प्रबळ झाले होते त्यास राजश्री बाळाजी गोविंद[1] व रघुनाथ हरी[2] यांनीं जमाव करून त्यासीं झुंजले. गोसावी व जाट मोडले. गोसावी फार कापून काढिले. अशांत दहा हजार फौज आल्ही तर सारा बंदोबस्त करूं असें लिहिलें आहे. श्रीमंत इंग्रज सुद्धां डभईपासीं आहेत. तिकडील ठाण्याचा बंदोबस्त करितात. राजश्री व्यंकापा नाईक यांजकडील मजकूर लिहिला तो कळला. कित्तूरकर लांव भारी झाला आहे. तो ऐकणार नाहीं. वरकड आह्मीं लिहिलें त्या अन्वयें डंश सरकारच्या पत्रांत होते ह्मणोन आपण विस्तारे लिहिला तो मजकूर कळला. एकनिष्ठेनें आहेत त्यांस ईश्वर पार पाडितो. हरामखोराचे निर्वंश होतात ते आह्मीं आपण पहातच आहों, चिंता काय आहे? राजश्री नानानीं पत्र पाहून आह्मांजवळ दिलें आहे. राजश्री महादजी शिंदे यांजकडून बोलोन चालोन गुरुजी आले आहेत. पुन्हां त्यांस आणावयास गुरुजी पाठविणार व

१ बुंदेले. २ नेवाळकर. यांच्याच घराण्यांतील लक्ष्मीबाई ही झांशीची राणी या नांवें १८५७ च्या बंडांत प्रसिद्धीस आली.

होळकर आणावयास राजश्री विष्णुपंत गद्रे यांस पाठविणार. तयारी होते. राजश्री कृष्णराव औरंगाबादेस गेले. राजश्री कुसाजी रुद्र याजवळ ताकीदपत्र दिल्यावर ते फिरोन आले नाहींत. राजश्री शिवराव यासीं ताकीद निक्षून करवितों, परंतु मशारनिल्हे आह्माकडे आले पाहिजेत. ह्मणजे रुबरू करून घेऊं. रुपये माघारे दोविले. पत्र घेऊन गेल्यावर विसाजीपंत पुन्हां आले नाहीं. राजश्री नागोजी शामजीचें पत्र आल्यावरी त्यांजकडे निकडीचीं पत्र गेलीं आहेत. तह यथास्थित झाला असावा. नाहींतरी होईल. यादीप्रमाणें करवीरकर जात नाहींत, लबाड्या करितात, ही खातरजमा तेथें झाली आणि रागें आपाजी शामजीवर भरले व रागें भरोन तिकडे शिंदे[2] व शास्त्री यांस पत्रें मागेंच गेलीं आहेत. फौजेंत फितव्याचा प्रकार तरी कागदपत्र सांपडल्याचा प्रकार पेशजी आपण लिहिलें होतें. कागदपत्र असल्यास पाठवावें. तिकडे जाण्याचा प्रकार नद्या उतरावयाच्या व कर्जाखालें नाना प्रकारचे पेच हें खरेंच. परंतु नांवाचा माणूस गेल्यानंतर आतां मागें पुढें घेतां नये. कसें ही असो. गेले पाहिजे. रोजमरा वगैरे अतःपर राजश्री जिवाजीपंत देतील. मागील कर्जवाम कळेल तसें उगवावयास येईल. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं० १४९६ श्री

(२९ जुलई)

सेवेशीं शिवाजी बाबाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल तागायत श्रावण शुद्ध द्वितीया मंदवासरे मु० भिवंडी वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपण पत्रें पाठविलीं त्यांत स्वदस्तूरचे पत्रांत फार मजकूर लिहिला तो सविस्तर कळला. " त्यांजकडे[3] धनीपणाचें नातें याजकरितां बोलतात. फितव्याची गोष्ट असल्यानंतर इतबार कोणाचा

---

१ करवीरकराकडे. २ येसाजी शिंदे व महादेव शास्त्री. ३ बापू व नाना यांकडे.

पुरत नाहीं. श्रीमंत नारायणराव मारले गेले ते वेळेस फौज अथवा गाड-दी श्रीमंतांच्या ममतेचे व कारभारी यांच्या लक्षांत होते. ते वेळेस इतबार धरून वाड्याकडे कां चालोन न घेतलें? कां चावडीवर पळोन गेले? ताकद झाली नाहीं! किल्ल्यावर बसोन फुलेशा[1] गोष्टी सांगावयास काय जाते! असो. कोठें उभयतांस वांकडें पडेल, मसलत नासेल, याजक-रितां आह्मीं चाल ढकल करितों." असो. करवीरकरांच्या तहाविषयीं पत्रें वारंवार गेलींच आहेत. तह उरकल्यावरी श्रीमंत राजश्री कोन्हेरराव अनमान करितील तर आपण त्यांस सांगावें. धारवाडास जावें. पुढें जसा प्रसंग पडेल तसें करावें परंतु तेथें जावें. नाहीं तरी लौकिकांत फार वाईट दिसेल. शिरोळावरून आपण आला त्याचीं कारणें लिहिलीं तीं वाजवी आहेत. आलां ही मोठी गोष्ट केली. यांचें ह्मटलें आमच्या उपयोगी काय? स्थळ[2] व तालुक्याचा बंदोबस्त जाला ह्मणजे सारें उत्तम. नाहीं तरी हे तसेंही ह्मणावयाचे! राजश्री महिपतराव कवडे याचा प्रकार लिहिला तो कळला. तो मद्यपीत्यांची वर्तणूक चांगली नाहीं. राजश्री बाळाजीपंतानीं आह्मांस लिहिल्यावर आह्मीं विनंती करून 'वाड्याचें व बुरुजाचें काम बंद करावें. या बदमामलीच्या गोष्टी करितां ही गोष्ट ठीक नाहीं;' ह्मणोन सरकारांतून रागें भरोन पत्र व हुजरे पाठविलें आहेत, वाडा बुरूज बांधणें बंद करून येतील. मद्यपी आहे! सालमजकुरीं धार-वाडाकडून त्याचें पथक चाकरी सोडून उठून आलें. या समयांत गुर[3]-साल्याची जप्ती करूं ह्मटल्यास सनद देतील. परंतु पारिपत्य केल्याविना ठाण्याची जप्ती होणार नाहीं.

---

१ खुशालीच्या. २ मिरजेचा किल्ला. ३ हें कवडे याचें गांव.

नं० १४९७ श्री (श्रावण शुद्ध ८
४ आगष्ट)

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री हरीपंत स्वामींचे सेवेशीं. पोष्य बाळाजी जनार्दन. साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल तागायत छ० ६ जमादिलाखर जाणोन स्वकीय कुशल लिहीत जावें. विशेष. सरकारांत ऐवजाची ओढ मोठी. यास्तव महालानिहाय देखील सरंजामी महालांच्या जमीदाराचा हक्क रुसुमाचा ऐवज एकसाला देखील इनाम गांव व जमिनीचा घ्यावयाचा करार करून महालोमहालीं व सरंजामी सरदारांस पत्रें गेलीं. त्याजवरून राजश्री सखारामपंत व महादाजी निळकंठ व आनंदराव भिकाजी यानीं आपले महालचे कमावीसदारांस लिहून ऐवज आणविला. त्यांपैकीं कांहीं भरणा केला. कांहीं करणार. रास्ते यानीं राजश्री वामनराव व परशुरामपंत भाऊ यांचे महालांचा ऐवज आला ह्मणजे आपण द्यावा असें बोलोन ठेविला. भरणा चालीस लाविला नाहीं राजश्री पांडुरंगराव यांस सरकारचीं पत्रें गेलीं त्यानीं वामनराव यांचे पत्राचा आक्षेप धरिला. त्याजवरून सरकारचीं व आमचीं तीन चार पत्रें लष्करांत गेलीं. त्यांपैकीं हल्लीं पत्रें पावोन वामनराव व परशुरामपंत भाऊ व रघुनाथराव यांचें पत्र सरकारांत आलें त्यांत सारे महालांचा तपशीलच लिहून पाठविला! तेव्हां वरकड सरंजामी रास्ते आदिकरून कैसा ऐवज देतात? या कामास अघाडी त्रिवर्गांची आधीं असावी. यांचे महालांचा दाखला आह्मीं दुसऱ्यांस द्यावा तेथील प्रकार असा, तेव्हां दुसऱ्याजवळ काय बोलावें! एकादे दुसरे महालीं दंगा व जमीदार बाटगे असल्यास

१ पुरंदरे. २ रास्ते.

तेथील ऐवज तूर्त राहू द्यावा. पुढें ब्यावयासीं येईल. वरकड साळसूद महालांचा ऐवज देण्याविशीं पांडुरंगराव यांस पत्र यावयाचें होतें; त्यास ते गोष्ट न केली! असो. हल्लीं आह्मीं आपले नांवें पत्र त्यास लिहिलें आहे तें त्यांस देऊन वोढीचा प्रकार हें त्यांस समजावून त्यांचें पत्र घेऊन सत्वर पाठवावें. यांचें पत्र असें आलें यामुळें आह्मांस खालीं पहावें लागलें. मी ही त्यांस विस्तारें लिहिलें आहे. तुह्मींही चार गोष्टी समजाऊन सांगाव्या. बहुत काय लिहिणें लोभ असो दीजे हे विनंती.

पै॥ छ० १६ जमादिलाखर सुरू सन सीत श्रावण.

नं० १४९८ श्री (९ आगष्ट १७७५)

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री कोन्हेरराव व राजश्री
जिवाजीपंत अण्णा स्वामीचे सेवेशीं.

पोष्य नागो शामराव व बाबूराव जगजीवन कृतानेक साष्टांग नमस्कार विंनंती येथील कुशल तागायत छ० ६ जमादिलाखर जाणोन स्वकीय कुशल लिहीत असावें विशेष. राजश्री व्यंकटराव नारायण यांजकडील ठाणीं सालगुदस्त महाराजांचे स्वारीमुळें मौजे देवंड व बेळगुंदी वगैरे आजरे प्रांतातील ठाणीं घेतलीं आहेत ते व्यंकटराव यांचे स्वाधीन होईपर्यंत आपण ठाणें आळतें व चिपरी अमानत आमचे स्वाधीन केली असेत. तरी सदरहू ठाणीं आजरें प्रांतांतील राव मशारनिल्हेचे कमावीसदाराचे स्वाधीन करून त्याचीं कबजे हुजूर आणवून आह्मांकडे आलेवर आळतेंचें व चिपरी-

---

१ कारण कीं नाना फडणीस याच्या फळींत मुख्य काय ते पटवर्धन! त्यानींच असा कुचरपणा केल्यावर सखारामबापू वगैरेच्या उपहासास नाना पात्र होणार.

चें ठाणें महाराजांचे सरकारांत सेवेशीं देऊन ठाणीं रावजीचे स्वाधीन न जाहलीं तरी आळतें व चिपरीचें ठाणें व्यंकटराव याजकडे बिनदिक्कत देऊं. यासीं मुदत इ॥ पासून पंधरा रोजा अलीकडे ठाणीं हवाले करून कबजें आणून दाखविल्यावर आमचा कतवा माघारे द्यावा. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

पै॥ छ० १३ जमादिलाखर.

नं० १४९९ श्री ९ आगष्ट १७७५

तीर्थस्वरूप मातुश्री अनूबाई वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें माधवराव नारायण प्रधान. नमस्कार. विनती येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जावें. विशेष. श्रीमंत महाराज राजश्री छत्रपती स्वामी यांजकडील तालुकियांतील कमावीसदाराची व तुह्मांकडील कटकट गांवखेड्यांवरून लागली आहे. त्यास तुह्मी ते प्रांतीचे सरकारचे सरदार व मामलेदार यांजकडून कुमक आणून महाराजांचे तालुक्यांत उपसर्ग करितां ह्मणोन कळलें. ऐशास ये विशींचे जाबसालास कारकून पाठवून फडशा करून घ्यावा ह्मणून सांगितलें असतां अद्याप न पाठविला, आणि उपद्रव करितां, हें उचित नाहीं. याजकरितां तालुकियास तोसीस लावावयाची नाहीं. तरी या उपरी तोसीस न लागे तें करावें. लोकांकडील कुमक आणली असेल ते माघारे लावावी. आपला कारकून येथें पाठवून काय जाबसाल असेल त्याचा फडशा करून घ्यावा. आपले कमावीसदारांस निक्षून ताकीद उपसर्ग न लावणें ह्मणून करावी. रवाना

---

१ देऊं.

छ० ७ जमादिलाखर. बहुत काय लिहिणें हे विनंती.

नं० १६००

[श्रावण शुद्ध ११
७ आगष्ट]

पांडुरंगरावास वामनरावाचें पत्र ९ जमादिलाखरचें मुक्काम पलाशी परगणें सावळी ता॥ सरद वऱ्हाड व भुपाळ व नेमाड.

आह्मी महमद इसफ याच्या पारिपत्याकरितां हरीपंत तात्यापासून निघाल्यानंतर तुह्मांकडे पत्रें पाठविलीं आहेत. गाडदी मजकूर शिवणीस होता तेथून कूच करून चिखली ह्मणून गांव आहे. झाडीचें रान जागा खुबाळ पाहून राहिला आहे. येथून चार कोसांची तफावत आहे. ही फौज आल्यानंतर गाडद्यानें दम धरून रहावें असें नाहीं. दम धरून रहावयाचें कारण राजश्री मुधोजी भोंसल्याजवळ हा गाडदी होता तेव्हांच नबाबानीं लुटून टाकण्याचा मनसबा केला होता. तेव्हां मुधोजीबावानीं गाडदी आपल्या कामास आला- ये समयीं निरोप देऊन लावून द्यावा ह्मणून भीड घातली. याजकरितां नबाबानीं नर्मदापार जावें ह्मणून गाडदी यासीं करार करून समागमें आपले दहा राउत रेवेपर्यंत देऊन लष्कराहून लावून दिला असतां मध्यें तीन चार हजार माणूस हजार दीड हजार राऊत जमा करून नेमाड तालुक्यांत येऊन सरकारचे कारकुनास धरून नेऊन तीस चाळीस हजार रुपये वसूल घेऊन फारच फैलावा मांडला. यावरून आमचे इकडे येणें झालें आहे. गाडद्यास फिरोन आपण वऱ्हाड तालुक्यांत गेलों तर आसरा देतील कीं नाहीं हा भरंवसा नाहीं यामुळें अडचणीची जागा धरून बसला आहे.

नं० १६०१ (१० आगष्ट)

पांडुरंगरावास पुरुषोत्तम कृष्ण याचें श्रावण शुद्ध १९ चें पत्र पुरंदराहून.

महमद इसफ हांडे जवळ नदी उतरून जातो ही बातमी राखोन त्याजवर चिरंजीव वामनराव बाबा व परशुरामपंतभाऊ व अप्पा बळवंत हे गेले आहेत ते अद्यापि आले नाहींत. बंगालकर इंग्रजानीं मुंबईकरास निषेध करून लिहिलें आहे कीं श्रीमंतांचा आमचा स्नेह बहुत दिवसाचा असतां त्यांशीं बिघाड केला हें युक्त नव्हे. श्रीमंत राजश्री दादासाहेब तूर्त भडोचेस आहेत. एका दो दिवशीं पुण्यास श्रीमंत मातुश्री पार्वतीबाईकडे जावयाविशीं नानांची आज्ञा झाली आहे. तेथें आठ चार दिवस राहून परत येईन.

नं० १६०२ श्री [श्रावण शुद्ध आगष्ट प० पंधरवडा]

विज्ञापना. राजश्री महादजी शिंदे यांचे मध्यस्तीचा प्रकार " ते बहुचक (?) आहेत. त्याच्या वर्तणुकी प्रमाणेंच त्यांशीं वागणें करावें लागेल. तुह्मांसीं बोलिल्यानंतर त्या प्रमाणें निभावलेंच पाहिजे असा प्रकार आहे. याजकरितां या मध्यस्तींत पडों नये. " ह्मणोन श्रीमंत राजश्री नानानीं आह्मांस सांगितलें. त्यांजकडील कारकून तेथें आला असेल त्यास तिळमात्र हें कळों नये ह्मणोन खलबतांत सांगितलें याजकरितां परिस्फुट न व्हावें. सनांतच असावें. " दोन सालचा सरंजामाचा पैका फौज न ठेवितां खालीं पैका घातला आहे! तत्राप आह्मी आज जसें ह्मणतील तसें कबूल करूं परंतु पुढें जसा प्रसंग तसें बोलूं व करूं. या

१ शिवाजी बाबाजीचें पांडुरंगरायास पत्र.

जकारितां मध्यस्तीस पडूं नये." असें यांचें ह्मणणें आहे. पत्र वाचून फाडून टाकावें हें विनंती.

नं० १५०३

(श्रवण वद्य आगष्ट प० पंधरवडा.)

आशीर्वाद उपरी. राजश्री रामचंद्र नारायण यानीं गजेंद्रगडकर व कनकगिरी व अनेगुंदी, सुरापुर व हरपनहळी येथील जमाव आणिला व तीर्थस्वरूप राजश्री कोन्हेररावही तूर्त तिकडेच जातात. त्या पक्षीं सारें एकत्र झाले तर कित्तूरकरापुर्ते सामान मिळेल. यांत कर्ता व हिंमतीचा असेल तर त्यास पायबंद चांगला बसेल. हैदरखानच आला तर या फौजानीं कांहींच व्हावयाचें नाहीं. इकडील बंदोबस्त जाहल्याविना कोणतेही नीट होत नाहीं. श्रीमंत नर्मदा उतरले. सुरतेचा रोख आहे. कोणीकडे जातात पहावें. नबाबाचें लक्ष पुरतें आहे. त्याजकडे राजश्री कृष्णराव बल्लाळ पुरंधराहून गेले आहेत. राजश्री मुधोजी भोंसलेही नबाबाचे विद्यमानें सरकारचे लक्षांत आहेत. याचा निर्देश स्वल्प दिवसांत कळेल! बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं० १५०४ श्री ११ आगष्ट १७७५

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके १०२ मन्मथनाम संवत्सरे श्रावण शुद्ध पौर्णिमा गुरुवासेर क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिव छत्रपती स्वामी याणीं राजमान्य राजश्री बाळाजी जनार्दन यांस आज्ञा केली ऐसीजे, राजश्री व्यंकटराव नारायण यांजकडील वतनबाब व गांव खेडीं चालत होतीं तीं कांहीं कजियामुळें गुदस्तां सरकारांतून जप्त केलीं होतीं. त्यास हल्लीं तु-

१ छावणींतून वामनरावाचें पांडुरंगरावास पत्र.

ह्यांकडून राजश्री जिवाजी गोपाळ आले त्याणीं विनंती केली त्याजवरून वेदशास्त्रसंपन्न राजश्री महादेव शास्त्री व मशारनिल्हे यांचे विद्यमानें करार ठरला. त्याजवरून पेशजी प्रमाणें मामलेस चिठ्या देऊन वतनबाब व गांवखेडीं स्वाधीन केलीं असेत. येविशींचें तुह्मांसीं कितेक बोलणें आहे याजकरितां शास्त्री मशारनिल्हे यांसीं आज्ञा जाहली आहे. तुह्मांपाशीं येऊन बोलतील. तें समजून त्यांचे तुमचे विचारें ठरेल त्या प्रमाणें सरकारांतून आज्ञा होईल. तों पावेतों त्यांजकडून सरकार तालुकियांत हर एक अमर्यादा न जालेस सरकारांतून त्यांजकडील गांव खेडीं लाट रांगोळी सुद्धां वतन बाबेस उपद्रवाविशीं आज्ञा होणार नाहीं. जाणिजे बहुत काय लिहिणें.

नं० १५०९ श्री (२० आगष्ट)

सेवेशीं[1] शिवाजी बाबाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल तागायत श्रावण वद्य दशमी रविवासरे मुक्काम गोकाक वर्तमान यथास्थित असे. विशेष. आह्मीं आपला निरोप घेऊन निघालों ते ऐनापुरास आलों. दुसरे दिवशीं तेरदाळास भोजन करून तेरदाळच्या खेड्यांत येऊन राहिलों. तिसरे दिवशीं प्रहर दिवसास येथें आलों. श्रीमंत राजश्री कोन्हेरराव जमाखिंडीचा उलगडा कालानुसार करून आले. घटणेस पाणी फार. पाण्यास चढच आहे. कित्तुरकराकडील वर्तमान तर दावनकोपेवरून एकाएकीं कूच करून दुसरे मजलीस वणुराजवळ येऊन गोकाकचे बारींत खानापूर आहे तें तोफा लावून घेऊन बारी बंद केली आणि तेथून कूच करून गची कुरबेटास आला. आणि गांवास तोफा लाविल्या.

---

१ शिवाजीपंत हा या वेळीं कितूरचे स्वारींत कोन्हेरराव गुंतले होते त्याजकडे पुरंदराहून कारभारी यांचा कांहीं निरोप घेऊन आला होता. त्याचें हें पांडुरंगरावास पत्र.

कुरबेट तीन कोस येथून आहे. गोकाक देखील गडबडली आहे. फौज पलीकडे तरी उतरावयाचा प्रकार तरी परवां शंभर राऊत उतरले. काल पासून उतरावयास सनापासून लागले. चारशें पावेतों उतरून पलीकडे गेले तों तिकडून आवई कित्तुरकराची आली कीं, फौज आली. त्याज-वरून राजश्री मानसिंग खलाटे यांचें बुनगें अलीकडे उतरावयास येऊं लागलें. तेव्हां पलीकडे फौज सडी जावयाची ती तटली. कालचा दिवस घोळच पडला. आज उतरावयास लागले. संध्याकाळ पावेतों फार करून सडी फौज पलीकडे जाईल. उद्ईक तोफखाना व बुनगें उतरेल. सारांश फौजेंत ताळ नाहीं. सारे मीर पीर आहेत! बोलतील तें सोसावें मात्र. परंतु बोलणें सोसल्यावरी तसें कार्य करतील ह्मणावें तरी तसें ही नाहीं. पलीकडे उतरावयासच तट! रोजमरा तिराश द्यावा, नालबंदी पैकीं द्यावें, तरी पलीकडे उतरों; असे आडमुद्दे घातले! राजश्री भवानराव शामराव रुसले. कूच करून जात होते. शेवटीं समजावीस करून ठेविले. सलई सान्यांची आहे. ते उतरले तेव्हां आह्मीं उतरों असें एकावर एक घालितात. या प्रकारचें वर्तमान आहे. नवे राऊत मिळतात. तमाम पत्रें पाठविलीं आहेत. शिलेदार ते ठेवणार. राजश्री त्रिंबकराव वगैरे सामान संवदत्तीस आहे. त्यांनीं पाटीवर यावें ते न आले. त्यांजकडील वर्तमानच नाहीं. करास काहीं मिळत नाहीं! नवी फौज हजार पांचशें मिळाले ह्मणजे हे बारभाई सारे दबोन राहतील. आह्मीं उद्ईक निरोप घेऊन येणार. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

१ दंगा करण्याची मसलत. २ घटप्रभा उतरतील तर.

नं० १५०६ श्री (२२ आगष्ट)

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री विष्णुपंत दादा व
केसोपंत अण्णा स्वामीचे सेवेशीं.

विनंती[1] सेवक अंताजी रामचंद्र कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल तागायत श्रावण वद्य द्वादशी भोमवारपर्यंत मुक्काम नजीक चारवे येथें सुखरूप जाणोन स्वकीय लिहीत जावें विशेष. यानंतर आपण छ० २४ जमादिलावलचें पत्र पाठविलें तें पावलें परम समाधान जाहलें. ऐसेंच निरंतर पत्र पाठवून समाधान करीत जावें. वरकड इकडील वर्तमान तरी पेशजी श्रीमंतांच्या पत्रावरून वरचेवरी निवेदन जाहलेंच असेल. अलीकडील वर्तमान तरी महमद इसफ याच्या पारिपत्याकारितां या प्रांतीं आलों. येथें आलों तों तो पळोन डोंगरावरी गेला. अडचणीची जागा, उपाय नाहीं, याजकरितां तोफखाना अशेरीहून आणिला. आणि दुसरे दिवशीं तोफा वेऊन जावें तों तोफांचे दहशतीनें रात्रीस पळोन गेला तो रातोरात सात कोस निलकडी ह्मणोन गोंडाचा किल्ला होता, हल्लीं वसती नाहीं, तेथें जाऊन राहिला आहे. फार कठीण जागा! तेथें गेल्यावरी आह्मींही कूच करून किल्ल्यापासून दोन कोसांवर येऊन राहिलों दुसरे दिवशीं सारी फौजसुद्धां तयार होऊन किल्ल्याखालीं गेलों पुढील लोकांची एक दुसरी हिरीरी झाली. दोन चार माणसें जखमी झाली. दोन चार घोडीं जखमी जहाली. एक घोडे आह्मांकडील ठार जहालें. झाडी फार, फौज उभी रहावयासी जागा नाहीं, रात्रीस तेथें राहूं ह्मटल्या सोय नाहीं. तोफा लाविणार होते परंतु तोफा लावून फिरोनें येऊं नये याजकरितां त्या दिवशीं तोफा लाविल्या नाहींत. त्या दिवशीं माघारे आलों- दुसरे

---

१ हें वामनरावाच्या लष्करांतून मिरजेस पाठविलेलें पत्र आहे. २ काम झाल्या खेरीज.

दिवशीं तोफा लावणार तों पर्जन्य फार दिवसभरी पडला. याबकरितां मुक्काम झाला. संध्याकाळीं दोन घटका दिवसास पाऊस उघडला. बातमी आली कीं इसफ पळोन गेला. त्याजवरून फिरोन सडी स्वारीची तयारी करून त्याचे पाठीवर गेले तों त्यानें आपले बुनगें मागें टाकून सडा निघोन मजल दर मजल गेला. आमचे यजमान फौज सुद्धां पांच गांवें गेले. त्याचा पत्ता न लागे तेव्हां मुक्काम करून राहिले. पुढें लुंगारे[1] गेले होते त्यानीं कांहीं बुणगें लुटून आणिलें. एक हत्ती आणिला तो गढेमंडळाकडे नर्मदा उतरावयासी गेला अशी बातमी आल्यावरी निघोन माघारे आले. तेथून काल एकादशीस कूच करून माघारे ब्‍र्‍हाणपुराकडे मजल दर मजल येत आहों. या प्रमाणें वर्तमान आहे. आपल्या जिवादारभ्य (काय होईल ती चाकरी) करावी, त्यास तेथील प्रकार तो फार करून फकार विल्हे[2] आहे. जो कोणी पुढारीपणा घेऊन चाकरी करील तो सर्वांचा वाईट होईल असें ध्यान आहे! सारांश गोष्ट कीं, श्रीमंत राजश्री रावसाहेबांचे प्रालब्धयोगें जें होणें तें बरें होईल. छावण्या करार जाहल्या. अत:पर गुंता नाहीं. कोणत्या सुमारें होती तें मागाहून लिहून पाठवूं. नबाबाची निखालसता आहे खामखा यंदा फौजेची बंदोबस्ती करून इंग्रजांचा मोड करावा अशी कस्त आहे यांत अंतर नाहीं- ज्या पक्षीं नबाबाची निखालसता आहे त्या पक्षीं वरकडांनीं काय होणें कळतच आहे! राजश्री कृष्णराव बल्लाळ नबाबाकडे आले आहेत. मागाहून उभयतां कारभारी यांतून एकजण येणार आहेत. या प्रमाणे इकडील वर्तमान. श्रीमंत दादासाहेब डभईस आहेत. राजश्री फत्तेसिंग गाइकवाड श्रीमंतास भेटले, परंतु कालावरी दृष्टि देऊन भेटले. आपल्या फौजा फिरोन गेल्यावरी आपलेच आहेत. गुंता नाहीं. शिंदे होळकर आपल्या

१ लुटारू स्वार. २ फकारविल्हे म्हणजे फुकट.

जागां आहेत. जिकडील जमेत भर पडेल तिकडे जातील या प्रमाणें आहे. राजश्री जिवाजीपंत बुणगें घेऊन गेले या करितां श्रीमंत रागें भरले. आज्ञा होती कीं सरकारचे बुणगें जिकडे जाईल तिकडे जावें व त्यांचाही कागद आला होता कीं सरकारचें बुणगें देशास गेलें तरी आह्मीं जाऊं. नाहीं तरी ते जिकडे जातील तिकडे जाऊं. या प्रमाणें त्यांचें पत्र आलें असतां वरास गेले यावरून अपूर्व वाटतें. कोणे गोष्टीचें न्यून होतें असें ही नाहीं. इतकें असून गेले, बरें! झाले गोष्टीस उपाय नाहीं. अत:पर तरी बुणगें लौकर पाठवावें. पर्जन्य भारी. आज तीन महिने हाल झाले ते कोठवर लिहावें? सर्व गोष्टीची अनुपत. राजश्री जिवाजीपंत आज दोन वर्षे घरीं नव्हतें. त्यांस घरीं ठेवावें. आपण यावें. आपणास कन्या झाली ह्मणून परस्परें ऐकिलें त्यांस सविस्तर लिहावें. चिरंजीव बाबू खुशाल आहे. चिंता न करावी. वरकड सविस्तर श्रीमंतांच्या पत्रावरून कळेल. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

नं० १५०७

[श्रावण वद्य १३
२३ आगष्ट.]

वामनरावाचें[1] बळवंतरावास पत्र २९ जमादिलाखरचें—

" करवीरकरांनीं व कित्तूरकरानें दंगा मांडल्याचा व शिरोळास मोर्चे लाविले होते, छापा करवीरकराचा आला, फौजेंत फितवा असतां आपली मंडळी होती ह्मणून चिरंजीव राजश्री तात्या निभावून आले ह्मणून मजकूर लिहिला तो कळला. इकडे मनसबा लांबला. फौजा इकडे गुंतल्या. ह्मणून तिकडे दंगा झाला. महमद इसफ अवघड जागा धरून बसला होता परंतु आह्मीं तोफा आणविल्या ही बातमी कळतांच इसफ पडल्या

१ वामनराव.

पावसांत पळोन गेला. आह्मीं दोन मजली पाठलाग केला. बुणगें कांहीं व एक हत्ती सांपडला. तो गढेमंडळाकडे झाडींत पळोन गेला. त्याचे पाठीवर कोठपावेतों जावें ह्मणून परतून माघारे आलों. आतां राजश्री हरीपंत यांजकडे जात आहों."

नं० १९०८ श्री (२३ आगष्ट)

सेवेशीं शिवाजी बाबाजी कृतानेक साष्टांग नमस्कार. विनंती येथील कुशल तागायत श्रावण कृष्ण त्रयोदशी बुधवासरे मुक्काम गोकाक वर्तमान यथास्थित असे विशेष. आह्मी येथें आल्यानंतर आपणाकडे पत्रें पाठविलीं आहेत तीं पावलीं असतील अलीकडील वर्तमान तर कित्तूरकरानें गची कुरबेट मालधनी गोकाकेपासून दीड कोस आहे तेथील मुक्कामास आला. लष्कर अलीकडे नदीच्या राहिलें होतें. पलीकडे उतरावयाचें महत् संकट जहालें. एक दुसरे पथक पलीकडे गेलें व राजश्री मानसिंग खलाटे राजश्री जिवाजी गोपाळ याजबरोबर पूर्वीचे बुणग्यासुद्धां श्रीमंत राजश्री कोन्हेरराव जमखंडीस गेले होते तेव्हां ते पलीकडेच होते त्या सुद्धां ते अलीकडे आले तेव्हां इकडून बुणग्यासुद्धां गेले होते. त्यानीं बुनगें अलीकडे उतरलें. त्याजबरोबर उथळ पाथळ राऊतही अलीकडे येऊं लागले. ठाण्याचा प्रकार ह्मणावा तर दरोबस्त गोकाक प्रांतचे काटक गोकाककर देसाइणीचें व कित्तुरकराचें एक सूत्र. याजकारितां काटकांचा भरंवसा नाहीं. तेव्हां निकडीनें सडी फौज उतरावयाचा विचार झाला. श्रीमंत राजश्री कोन्हेरराव खासा पलीकडे सडू गेले तेव्हां थोडके थोडके सडे पलीकडे उतरावयास लागले. दोन दिवसांत हजार बाराशें राऊत पलीकडे गेले, तोफा उतरावयाच्या आहेत, तोंच कित्तूरकर

१ पत्र पांडुरंगरावास कित्तूरचे स्वारींतून.

मालधनीची लढाई.

इंदुवारीं परवां चालोन आला. आपली फौज पलीकडे खडी होती ती तोंडावर गेली. त्याजकडील तोफांची मारागिरी होऊं लागली. आपल्या तोफा नव्हत्या. तत्राप फौजेनें तोंड लाविलें. गोळा गोळी दाट जहाली. राजश्री भगवंतराव बरगे यांच्या डाव्या हातास गोळा लागला. राजश्री मानसिंग खलाटे याजकडील घोडें ठार जाहलें. वरकड फारसे जाया जखमी झाले नाहीं. संध्याकाळ झाला- तो रात्रीं निघोन मुक्कामास गेला. काल थोरल्या दोन तोफा पलीकडे दोन प्रहर पावेतों गेल्या तदनंतर कित्तूरकरानें सारा जथ पाडून तोफां सुद्धां चालोन आला. डोंगर कटारीनें तोफांसुद्धा एक टोळी मातबर केली व एक नदीकडील आगें केली. आणि गाहा करून चोंहोंकडून चालोन घ्यावें आणि फौज रगडून गोकाकेच्या पेठेकडून हल्ला करावी असा मनसबा करून आला. इकडील तोफा तिकडे उतरल्या ही बातमी त्यास पुरती नव्हती ह्मणोन मोठ्या उमेदीनें आला तों आपल्या तोफा व फौजेची तयारी होऊन तोंडावर गेली. त्यानें दोन टोळ्या केल्या होत्या त्या प्रमाणें आपल्या फौजेच्या दोन टोळ्या जाहल्या व तोफाजवळ फौज राहिली. येणें प्रमाणें बंदोबस्त करून तोफां तोफांचे लढाईस प्रारंभ संध्याकाळच्या प्रहर दिवसास झाला तों संध्याकाळ पावेतों लढाई झाली. इकडील तोफा थोर. या तोफांच्या गोळ्यांनीं काट फार केला. त्याचा नाश फार जाहला. उजवे बाजूस फौज राजश्री शाहाजी भोंसले यांची व राजश्री भवानराव शामराव यांची पागा होती. तिकडून कित्तूरकरानें दाटी केली तेव्हां कराचलीसीं गांठ पडली. चांगली घटकाभर लढाई झाली. इकडील चार पांच घोडीं ठार झालीं व एक भला माणूस ठार झाला. दहा पांच माणूस व घोडीं जाया जखमी झालीं. कित्तूरकराचा रेंच चांगलाच मोडला. धारवाडाक-

डील सामान येऊन मिळालें असतें तरी कालच कित्तूरकराचा फडशा जाहला असता. काल संध्याकाळीं मुक्कामास गेला. त्याजकडील घोडीं माणसें फार जाया जखमी झालीं. त्यांस श्रीमंतांची फौज व तोफा इतकें पुरतें समजलें. आज चालोन आला तर चांगलेंच होईल. आज उद्यांत धारवाडाकडील सामान आलें तरी पारिपत्य होईल. शेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं० १५०९

(२९ आगष्ट.)

पै॥ छ २९ जमादिलावर.

श्री.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री कोन्हेरराव
स्वामींचे सेवेशीं.

सेवक नारो बाबूराव फडणीस पा। शहापूर. कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील क्षेम तागायत श्रावण वद्य चतुर्दशी शुक्रवार मुक्काम कुलगोंड येथें सुखरूप असों. विशेष. कित्तूरकराचे लष्करचा मजकूर सोमवारीं कुरबावीहून कूच करून गोकाकेस गेला तेव्हां तुमचे लढाईमुळें फार श्रमी होऊन प्रहर रात्रीस बहुत कष्टी होऊन मालधनीच्या वोढ्या पलीकडे राहिला आहे. मंगळवारीं तेथून कूच करून गोकाकेस जाऊन राहावें ह्मणोन डेरे तमाम पाडून बरोबर घेऊन गेला. तेव्हां लढाई होऊन प्रहररात्रीस मालधनीस आला. प्रातःकाळीं बुधवारीं लष्करांत लोकांनीं रोजमुऱ्यासाठीं दंगा केला. दहा रोज राऊतांस व प्याद्यांस रोजमुरा दिला नाहीं. यास्तव बुधवारीं रोजमुरा दिला, व तमाम राऊतांस व प्याद्यांस बोलावून आणून आण शपथ केली कीं, एक वेळ लढाई करावी. लूट तुह्मांस मिळेल ती माफ आहे ह्मणोन करार करून सर्वत्रांच्या क्रिया

घेतल्या. लष्करांत बंदोबस्त ह्मणावा तर रात्रीं डेऱ्याजवळ शंभर प्यादा मात्र असतो. वरकड प्यादे वोढ्यामध्यें व मालधनी गांवामध्यें आहेत. तेही शें पन्नास प्याद्यांस एक पाल देऊन राहिले असें नाहीं. वोढ्याच्या कडेनें जिकडे तिकडे राहिले आहेत. प्यादे आड हत्यारी व बंदुखी मिळोन पंधरा हजार पावेतों असतीलसें वाटतें. राऊत मुधोळकराचे दोन तीनशें चांगले आहेत व पागेचीं घोडीं पांचशें आहेत. परंतु जय्यत राऊत शंभर दीडशें पर्यंत असतील. घोडे राऊत दीड हजार पावेतों असतीलसें वाटतें. लष्करांत बंदोबस्त काडीमात्र नाहीं. बुधवारच्या झुजामुळें तोंड उतरून फार श्रमी आहे. एखादी लढाई करून पळून जाईलसें दिसतें. रात्रीच्या चौकीस मालधनीपुढें दोनशें प्यादे चौकीस मात्र असतात वरकड बंदोबस्त कांहींच नाहीं. लढाईस निघतो ते समयीं बंदोबस्तीनें निघतो. असा प्रकार नाहीं. आपण एकटा घोड्यावर निघतो. मग सर्वत्र पाठीमागून येतात. आपण बातमी राखोन रात्रीस छापा घातला तर कामास येईल. लष्करांत बंदोबस्त कांहींच नाहीं. तोफा दोन आठ शेर कच्या वजनाच्या गोळ्याच्या आहेत. व दोन रेकले आहेत. तोफा व बाजार मालधनी गांवाजवळ पाठीमागें आहे. बहुत काय लिहिणें कृपा लोभ असों द्यावा हे विनंती.

नं० १५१०

[भाद्रपद शुद्ध २]

श्रीगणराज.

(२८ आगस्ट)

पै॥ छ० ३ रज्जब सन सीत सबैन बुधवार

चिरंजीव राजश्री तात्या यांस कोन्हेराव त्रिंबक आशीर्वाद उपरी येथील कुशल तागायत छ० १ रज्जब सोमवार प्रातःकाल वर्तमान यथास्थित असे. विशेष. कित्तूरकर देसाई गचीकुरबेटा अलीकडे मालधनी

नजीक वोढ्यावर आहे. एक वोढा गचीकुरबेटा कडून आला. दुसरा वोढा मालधनी गांवाकडून. या दोही ओढ्यांच्या चिमऱ्यास बिकट जागा बघून गांव पाठीशीं घालून तेथें राहिला आहे. त्याजवर आम्ही काल चा लोन सडी फौज व तोफा घेऊन गेलों होतों. आमच्या डाव्या बाजूस राजश्री त्रिंबकराव आपा व नरगुंदकर यांची फौज व हुजराथ पैकीं राजश्री भवानराव शामराव यांचें पथक असे उभे करविलें आणि उजव्या बाजूस श्रीमंत राजश्री शहाजी भोंसले यांची फौज व मानसिग खलाटे वगैरे हुजराथची पथकें उभीं करवून मध्यें तिन्ही तोफा एके जागां ठेऊन त्याजवर तोफांचा मार भारी केला. तेव्हां कित्तूरकर तयार होऊन वोढा धरून त्यांनेंही दोन तोफा लागू करून होता. त्याची आमची तोफांची मारामार होतां होतां डाव्या बाजूंच्यावर राजश्री त्रिंबकराव अण्णा व नरगुंदकर यांणीं तोंड लाविलें. त्यांची यांची लढाई बरीच झाली. त्यानंतर कित्तूरकर नीट चालून आमच्या तोफांकडे येऊं लागला. तेव्हां आमच्या भले लोकांनीं बेजरब घोडीं घालून कित्तूरकरास मोडून वोढ्यापर्यंत नेऊन घातला. तसेंच पाठीवर आमचे लोक जात होते. परंतु कित्तूरकरांनें त्वरा करून आपली तोफ इकडे आणून आमच्या लोकांवर गोळे टाकिले. तेव्हां माघारे फिरले. नाहीं तर त्याच्या गोटापर्यंत तुडवीत तोडीत जाते. कालच्या झुजाची शर्त जाहली. आमच्या लोकांनीं हुजरातच्या व शहाजीबावांच्यानीं काल कामें फारच चांगलीं केलीं. घोडीं माणसें मिळून जाया फार झाली. पंधरा वीस घोडीं ठार. पंचवीस तीस घोडीं जखमी.. दहा पंधरा भले लोक ठार. तीस चाळीस जखमी. या प्रमाणें जहाले. त्यांजकडील घोडीं माणसें फारच ठार व जखमी जाहलीं. आपणास कळावें ह्मणून लिहिलें असे. घोडीं पडलेलीं अद्यापि ठिकाणीं लागलीं नाहीं.

१ अक्कलकोटकर.

यादी तयार करावयास कारकून पाठविले आहेत. त्यांजकडून यादी आलेवर तपशीलवार लिहून पाठवूं. कित्तूरकराचा रेंच या झुजांत चांगलाच मोडला. बातमीस माणसें त्याचे लष्करांत पाठविलीं आहेत. बातमी आल्यावर लिहून पाठवूं. पेशजी जमखंडीचे तळावरून लिहिलें होतें (या प्रमाणें) पांच सातशें पर्यंत जादा दोन तीनशें पर्यंत स्वार ऐसें पाठवून द्यावें. देसाई याजकडील निशाण पाडाव शहाजी भोंसले यांजकडे आलें. आम्ही आपले जागां सावधपणें आहों. देसाई याणें येऊन आह्मावर चालोन घ्यावें अशी कांहीं त्याची उमेद राहिली नाहीं गोकाकेचा किल्लेचा बंदोबस्त करून एक दोन दिवसांत कूच करून पुढें जातों. कळावें. बहुत काय लिहिणें. गोकाककर देसाईण त्याजकडे मिळाली. गोकाककर काटक याजमुळें अगदीं हातीं लागत नाहीं. येथील बातमी नेऊन पोंचवितात. या प्रमाणें काटकांची गत आहे. हे आशीर्वाद. कितूरकराकडील देसाइ याचे प्यादे दोन तीनशें पर्यंत ठार झाले. आमचे लोकांनीं शें दोनशें हत्यारें पात्यारें देखील आणिलीं. आणखी आज तयार होऊन जातों. हे आशीर्वाद. देसाई याजकडील घोडीं चार पांच पाडाव करून आणिलीं. हे आशीर्वाद.

नं० १९११ [२९ आगस्ट]

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री कोन्हेरराबजी
स्वामींचे शेवेसी.

पोष्य येसाजी राम कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल तागायत भाद्रपद शुद्ध ३ इंदुवार पर्यंत मुक्काम सौंदत्ती. यथास्थित जाणून कुशल लेखन करीत असले पाहिजे. विशेष. आपणाकडून पत्र येऊन

वर्तमान कळत नाहीं. चिरंजीव राजश्री त्रिंबकराव आपा कटकोळास होता तंव पत्र येऊन वर्तमान कळवीत होता. अलीकडे चार पांच दिवस पत्र येऊन कांहींच कळत नाहीं. तर लिहून कळविलें पाहिजे. यानंतर चिरंजीव तुह्मांजवळ फौज व जमाव सुद्धां पावल्यावर आपला जथ भारीच झाला असावा. तोफखाना सामान जंगी चांगलेच आहे. दोन तीनदां देसाई याची व आपली गोळा गोळी झाली परंतु देसाई याचा काट चाल॰ ला नाहीं. हल्ली तों चिरंजीव पावल्यावर जथ जाजतीच झाला. देसाई मैदानांत आहे तेव्हां आपणाकडील काट चांगलाच होईल. त्याचा अधिकोत्तर होणार नाहीं. ऐशियास आह्मीं जमाव सुद्धां आज निघोन कलघटगीस गेलों. येथील ही सुमार आहे. सत्वरच उरकोन बेटगिरीचे सुमारें येतों. दुरोख शह बसल्याखेरीज देसाई आटोक्यांत येणार नाहीं. इकडील शह बसला ह्मणजे कांहीं जमाव तो कइडे रवाना करील. तितका तुह्मांस हलका होईल. राजश्री रामचंद्रपंत आपा काल दोन प्रहरीं तेथें आलें. कलमजारीकरितां दोन हजार पर्यंत प्यादा बरोबर आहे. मागाहून येतच आहेत. राजश्री दौलतराव घोरपडे यांचे चि० बाबासाहेब नरगुंदास आले. सारी फौज त्यांची आली नाहीं. दोन चार रोजांत येईल. सावनूरचाही जमाव येणार. इतक्यांत आपलें पत्र येईल. त्याजप्रमाणें करावयास येईल. आमची दृष्टी आपणाकडे आहे. आपल्या उत्तरानरूप कर्तव्यता. कळावें. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

नं० १५१२

(भाद्रपद शु० ३)

श्री

२९ आगष्ट.

सेवेशीं शिवाजी बाबजी कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील

कुशळ तागायत छ० २ रज्जब भौमवासरे वर्तमान यथास्थित असे विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावोन लिहिला मजकूर कळला. कित्तूरकराची लढाई रविवारीं जाहल्यावर त्यानें गोटास जाऊन मुर्दें पाहून आणविलें व जखमी यांस खर्चा वेंचास दिलें आणि प्रातःकाळीं कूच करून गचीकुरबेटा वरून बारीच्या तोंडास गेला. वणुरास गेला ह्मणून बातमी आली आहे. त्याच्या लष्करांतून दोन तीन बातम्या जे, वणूर मल्लापा याचा भाचा ठार जाहला व ईटनाळकरा कडील मातबर माणूस पडला. खासा देसाई याच्या मानेस गोळी लागली. गोळी कापून काढावयासीं न ये परंतु जखम थोडकी आहे म्हणून सांगतात. जखम लागली ते समयीं घोड्याखालीं आला. बसती घोडी पडली पागोटें पडलें. पागोटें व चवरी आमचे लोकांस सांपडलीं. जखम भारी आहे किंवा हलकी इतकें पुरतें समजत नाहीं. आज उद्यांत तहकीक समजेल. सारांश कित्तूरकरांचा दम सुलाख जाहला. आतां दम धरून झुजेल असें दिसत नाहीं. झाडीच्या आसऱ्यास राहून संधान लावील असा प्रकार दिसतो. आज भौमवारीं कूच दोन कोसांचें आहे. बुनगें नदी पलीकडे आहे तें उतरावयाचें याजकरितां दोन कोसांचें कूच करणार. उदईक पुढें कूच करून जाणार. आम्हीं निरोप घेऊन येतों कलघटगी राजश्री येसाजीपंत आपानीं घेतली आणि मोरबेस मोर्चे लाविले आहेत ह्मणोन वर्तमान आहे. राजश्री रामचंद्रपंत आपा आज अथवा उदईक येतील. कित्तूरकराकडील बोलणें लागेलच ते समयीं खंडणीचा ऐवज मागील राहिला आहे त्याचा जाबसाल उलगडून घेतला पाहिजे. याजकारितां ऐवज किती राहिला आहे त्यांची यादी श्रीमंत राजश्री कोन्हेररावजीकडे पाठवावी. आम्ही उदईक निरोप घेऊन येतों. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं० १८१३ (भाद्रपद शु० ४)

श्री (३० आगस्ट)

पै॥ छ० ३ रज्जब सुरू सन सीत सबैन मय्या व अल्लफ.

सेवेशीं शिवाजी बाबाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील कूशल तागायत भाद्रपद शुद्ध द्वितीया इंदुवासरे मुकाम गोकाक वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपण छ० २७ जमादिलाखर भृगुवारचें पत्र पाठविलें तें काल संध्याकाळीं पावलें सविस्तर मजकूर कळला. तेथें आज्ञा केली कीं, बुधवारची पत्रें आलीं त्या अलीकडील वर्तमान व धारवाडाकडील सामान आल्याचें व अमीनबावीचें ठाणें घेतल्याचें व फिरोन कित्तूरकर आल्याचें सविस्तर लिहावें ह्मणून आज्ञा ऐशियास राजश्री त्रिंबकरावआण्णा धारवाडचा जमाव घेऊन सौंदत्तीस होते. नवलगुंदकरांचें सामान त्याज बरोबर होतें. इकडे पत्रें वारंवार त्यांजकडे गेलीं तों राजश्री येसाजीपंतआपा धारवाडाहून आमीनबावीचें ठाणें घेऊन एकोडीस आले सौंदत्तीचें सामान त्याजकडे जाऊन एकोडीचें ठाणें घेतलें. आणि राजश्री येसाजीपंतआपा व नवलगुंदकर खासा सौंदत्तीस गेले. राजश्री त्रिंबकराव आण्णा नवलगुंद व नरगुंदचें सामान घेऊन मनोळीस आले. तेथून कट कोळास आले आणि बातमी पुढें पाठविली. तेव्हां इकडून राऊत त्यांजकडे पाठवून त्यांस आणविले ते मंदवारीं परवां उजाडतां आलें. हजार बाराशें राऊत आहेत व तीन हजार प्यादे येणें प्रमाणें येऊन पोंहोचले' राजश्री रामचंद्रपंत आपा राजश्री बहिरजी घोरपडे व तिकडील प्यादे व कनकगिरीकर येणें प्रमाणें नरगुंदास आले त्यांस इकडेच बोलाविलें आहेत येतील तेव्हां खरें. त्यांजबरोबर पांचशें राऊत व दोन हजार प्यादे येणें प्रमाणें सामान आहे त्यांस इकडे बोलाविलें आहे. राजश्री येसाजीपंत आपा व खासा नवलगुंदकर व सावनूरकराकडील दोनशें स्वार व हजार

दीड हजार प्यादे व थोरली तोफ येणें प्रमाणें सामान घेऊन कलघटगी वगैरे ठाणीं घ्यावयास तिकडे गेले आहेत. कित्तूरकर मालधनी गांव पाठीशीं देऊन वोढ्याच्या चिमढ्यांत अवघड जागा पाहून राहिला होता. बुधवारापासून जागा सोडून पुढें आला नव्हता याजकरितां काल रविवारीं आपल्या फौजा तयार होऊन तोफां सुद्धां त्याजवर गेल्या आणि मालधनीच्या अलीकडून तोफा लाविल्या. गोळे तिकडे जाऊन पडत होते. त्यांनीं दम खाऊन गांवचे उत्तरेस ओढ्यापलीकडून त्यांजकडील तोफा सुरू झाल्या. तोफा तोफांचेच प्रहर पावेतों गोळागोळी झाली. तदनंतर धारवाडकर डावे बाजूस राहिले होते तिकडून जरासें तोंड लागलें. इकडून एक दोन हिंरिऱ्या जाहल्या तेव्हां तिकडून भरणा उजवे बाजूकडे आणून तोफांकडे चालोन घ्यावें ह्मणोन देसाई खासा निवडक सामान घेऊन आले. तेव्हां इकडून तोफांचे गोळे त्याजवर लागू जाहल्यावर कातरतें घेऊन तोफांचे गोळे टाळून आपली फौज पोटासी घ्यावी असा मनसबा त्याचा होता. उजवे बाजूस अक्कलकोटकर भोंसले व खलाटे व चासकर वगैरे हुजरात होती. तिकडे झुंज मोठें जाहलें. हातघाई तीन घटकापावेतों झाली. त्यांस मोडून नामोहरम करून पाठीस लागले. गोळीचा टप्पा पाठीस लागले. हत्ती त्याचा होता त्याजवर आपल्या लोकांनीं निकड केली त्यांनीं जलदी करून तोफा दोन आणून आपल्या फौजेचा बचाव करून इकडील फौजेवर गोळे लागू केले. तेव्हां हत्तीचा लाग सोडून माघारे आले. फिरोन-मोठी लढाई झाली. पंचवीस घोडीं इकडील जाग्यावरच ठार व गोटास आल्यावर पंचवीस होतील. चाळीस पन्नास घोडीं जखमी जाहलीं पंधरा सतरा भोंसल्याकडील व हुजरातीचे व धारवाडाकडील मिळोन भले माणूस ठार व प्यादे पांच सात ठार. चाळीस पन्नास माणूस शिलेदार व दहा पांच प्यादे येणें प्रमाणें जखमी जाहले. कित्तूरकराकडील चाळीस पन्नास

घोडीं ठार झालीं व दीडशें दोनशें माणूस ठार कितूरकराकडील झालें. त्याजकडील (कोणा) मातबरास गोळी लागली. खालीं आल्यावर उड्या टाकून कस्त करून झोळी करून काढिला. वरकड ठार व जखमी जागां जागां पडले. त्यास काढावयासही त्यास फुरसत सांपडली नाहीं. रात्रौं नेले असतील. त्याजकडील सफेत निशाण राजश्री भवानजी भोंसले यांजकडे पाडाव आले. अत:पर त्यानें या फौजेवर तोंड करावें अशी ताकद राहली नाहीं. इकडील जमाव नित्यानीं जमत जातों. त्याणीं मुधोळकराकडे कारकून पाठविले आहेत परंतु त्याच्या कुमकेस येणार नाहींत. इकडून त्यांजकडे नाद लावावा या अर्थें कारकून तिकडील आणविला आहे या प्रकारचें वर्तमान. आज चार दिवस त्याजवर आम्ही जात नाहीं. उदईक मागती जाणार. आम्ही येणार होतों त्यास चार दिवस श्रीमंत राजश्री रायानीं राहविलें याजकरितां राहिलों. दोन चार दिवसांत निरोप घेऊन येतों. श्रीमंताचे पुण्यप्रतापेंकरून कित्तूरकरांचे पारिपत्य पुरतें व्हावें असें आहे. त्यांत घडेल तें खरें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं० १५१४

(१ सप्तंबर)

श्री.

पौ॥ छ० ७ रजब

श्रीमंत राजश्री राव[१] स्वामीचे सेवेशी

पोष्य अंताजी सखदेव. कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील वर्तमान तागायत भाद्रपद शुद्ध षष्टी भृगुवार प्रात:काळ पर्यंत यथास्थित असे. विशेष. कित्तूरकराच्या लष्करांतून बातमीचा माणूस आला. मलोन मुज (?) च्या ओढ्यावरच मुक्काम आहे. तूर्त तेथून उठत नाहीं. लोक

१ कोन्हेरराव.

झाडून ओढ्याच्या आश्रयास घातले आहेत. बाहेरून लोक नजरेस देखील दिसत नाहींत. स्वार मात्र दिसतात. बाण वगैरे सरंजाम तयार करून पुन: एक वेळ आणखी लढावयाची हिंमत धरली आहे. त्याचे लोक कित्तूरांतून ऐवज व दारूगोळी व दोन तोफा घेऊन संगोलीस आले होते. तेथून लष्करास घेऊन गेले. ये विशीचा मजकूर कालचे पत्रीं लिहिलाच आहे. दवगांवचे (?) बारीस कांहीं लोक ठेविले आहेत. कहीकबाड मुरगोड प्रांतांतून आणितात. मुधोळकर व सुरापूरकर व हैदरनाईक यांस पत्रें कुमकेस यावयाविशीं पाठविलीं आहेत. ऐशी योजना बहुतच आहे. परंतु घडेल तें प्रमाण. माणूस जाऊन बातमी आणून सांगतों. याप्रमाणें वर्तमान सेवेशीं लिहिलें आहे. एक दुसरें लटकें असो कीं खरें असो. परंतु वर्तमान आलें तें सेवेशीं कळावयाकारितां लिहिलें आहे. फुरसत पडल्यास जथ भारी होईल. हे विज्ञापना.

नं० १५१९ (भाद्रपद शु० ६)
(१ सप्तंबर)

सेवेशी साष्टांग नमस्कार विज्ञापना. कित्तूरकराचे लष्करची बातमी आणून पाठवणें म्हणून आज्ञा त्यास कित्तूरच्या लष्करचें वर्तमान तर पाणी नाहीं. तोटा पडला आहे. लोक नित्य पंचवीस तीस चाळीस पर्यंत जातात. मुधोळकर स्वांर पन्नास पर्यंत आहेत, त्याणीं दोन दिवस दंगा केला होता. सारी रात्र घोड्यावर जीन घालून असतात. त्याजवळ दोन हजार स्वांर आहेत. त्याजपैकीं कारकून व गांवगन्नाचे कमावीसदार वगैरे हजार घोडे आहे. हजार स्वांर मात्र राऊत घोडे आहे. स्वांर व प्यादे अगदीं कंटाळले आहेत. जुने त्याचे प्यादे आहेत त्यांसही नित्य पीठ देतात. नवे आहेत त्यास तीन दिवसास दहा पैसे देतात. लोक

रजाबंद नाहीं. स्वामींचा जमाव भारी होत चालिला. त्याची बातमी नेहमीं गोकाकेस आहे. जंगम व ब्राह्मण वगैरे बातमी घेऊन जातात. कित्तूरकरानें सरकारी तालुक्यास उपद्रव फारच मांडला आहे. त्याचे पारिपत्य झालें पाहिजे. आपला जथ भारी आहे राजश्री रामचंद्रपंत व दौलतराव घोरपडे यांची फौज स्वामीजवळ गोकाकेस येऊन पोंहचल्यावर एकदां जोर केला म्हणजे कित्तूरकर राहात नाहींत. याचे पारिपत्य चांगलें च करावें ह्मणजे फिरोन डोकी वर काढणार नाहीं. निकड झाली ह्मणजे तोफाही टाकून जातो. सेवेशी श्रुत होय हे विज्ञापना.

नं० १५१६

श्री. (४ सप्टंबर)

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री कोन्हेरराव
स्वामींचे शेवेशीं.

पोष्य गंगाधर विश्वनाथ कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल तागायत भाद्रपद शुद्ध १० इंदुवार पर्यंत मुक्काम मजकुरीं सुखरूप असो. विशेष. आपण जमखिंडीकर देसाई याचें पारिपत्य करून फौज सुद्धां निघून कित्तूरकराचे पारिपत्याकरितां गोकाकेस गेला तिकडून राजश्री त्रिंबकराव आपा व बचोपंत ऐसे * त्याची खराबी बहुतच झाली. आपणास यश आलें, हें वर्तमान कळोन चित्ताचे ठाई बहुतच संतोष जाहला. एक वेळ शत्रूचें पारिपत्य जाहलें तेणेंकरून बहुतांस दबाव पडला. बहुत काय लिहिणें कृपा लोभ असों दिला पाहिजे हे विनंती.

---

* येथें मूळपत्र फाटल्यामुळें अक्षरें गेलीं आहेत.

नं०१९१७ [९ सप्तंबर]

श्री.

श्रीमंत राजश्री कोन्हेरराव स्वामी गोसावी यासीं.

आश्रित रामचंद्रभट[1] वाटवे, अनेक अशीर्वाद उपरी येथील क्षेम तागायत भाद्रपदीं पूर्णिमेपर्यंत सुखरूप असो विशेष. आपण दहावे तारखेचें पत्र पाठविलें तें पावलें. आपण कित्तूरकरांचे पाठीवर चढून तसेंच गेला तें बरेंच जाहलें. अडचण रानांतून मैदानांत गेला. तो आतां कित्तूरावांचून रहात नाहींसें दिसतें. तहाचें राजकारण लागोन सल्ला होईल तरी उभयपक्षीं उत्तम आहे. करवीराहून आमचा एक ग्रहस्थ त्रयोदशीस आला. तेथील वर्तमान लोकांची समजाविशी हरकशी त्यांनीं पाडून निरोप दिला. पुढें करारपत्रें लोकांचे हातें लिहून घेतलीं जे दसरा होतांच चाकरीस पुढें यावें. खासे सातशें पर्यंत कोल्हापुरीं ठेऊन घेतले आहेत. हर कोणीकडे जावें यावें ही मसलत किमपि नाहीं. कित्तुराकडे जावें ही बोली कोणाशीं बोलले नाहींत. तुह्माकडे उडतें वर्तमान आलें असेल. आणखी शहाणा माणूस पाठवून बातमी पक्की आणवून तुह्माकडे पाठवितों. आपण तो सावध राहतच आहां, परंतु श्री कृपेनें यश आलें आहे. तें रक्षण करावें हे अशिर्वाद.

नं० १९१८ श्री. (कार्तिक शु०)

(सप्तंबर दु० पंधरवडा)

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री पांडुरंगराव स्वामींचे शेवेशी.

पोष्य बाळाजी जनार्दन साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल

---

1 उपाध्ये.

तागायत छ० जाणोन स्वकीय कुशल लिहित जावें विशेष. तुह्माकडील सरंजामचे महालचा जमीदारांचा हक्क रुसुमाचा देखील इनाम गांवचा ऐवज देखील एक साला सरकारांत सर्वा बरोबर घ्यावयाचा ठराव करून लष्करचीं व आमचीं पत्रें तुह्मांस बहुत नडीचीं गेलीं. त्यास 'राजश्री वामनराव व परशरामपंत यांचे पत्र आल्याविना देतां नये' ह्मणोन लिहीत गेलां. त्याज वरून येथून वामनराव व परशुरामपंत यांस जमीदाराकडील ऐवजाविशीं पत्रें गेलीं. त्यास जमीदाराकडील ऐवजाचा भरणा सरकारांत करून देण्याविशीं तुह्मांस वामनराव व परशुरामपंत व रघुनाथराव यांनीं पत्र पाठविलें तें व येथून सरकारचें पत्र लिहिलें आहे तें ऐसीं अलाहिदा पाठविलीं आहेत. त्यांत तुमचे लष्करचे पत्रांत कर्नाटकचे प्रांताकडे दंगा आहे तेथील ऐवज तुम्हीं देशीं आल्यावर द्यावयास येईल. महाल मिरज मंगळवेढे पुणतांबे करकंब रहिमतपूर वगैरे येथील ऐवजाचा भरणा करून देणें ह्मणोन लिहिलें आहे. त्यास कित्तूरकराचा उपद्रव झाला होता ह्मणोन त्यानीं असें पत्रांत लिहिलें होतें. आतां राजश्री कोन्हेरराव याणीं व हुजूरचे पथकांनीं व धारवाडकरानीं बर्दुमी करून दोन तीन लढाया मारून कित्तूरकरांचा चांगला रेंच मोडला. त्याचा मोड होऊन तो आपल्या ठिकाणीं गेला. सरकार महालास त्याचा उपद्रव जाहला होता तो निर्वेध झाला. तेव्हां तुह्मांकडील ही निर्वेध जाहलें. आतां कांहीं लढा बोलावयाचा राहिला नाहीं. यास्तव आमचे महालचा ऐवज निकडीनें वसूल करून शिलेदारांच्या वराता जाहल्या आहेत त्यांस ऐवज पावता करावा. सर्व सरंजामी सरदार यांनीं आपणाकडील महालचा ऐवजाचा निकाल केला. तुह्माकडील इतके रोज राहिला हीच अपूर्व गोष्ट आहे! समयास द्यावा ती गोष्ट अमलांत न आली या उपरी दंग्याचा वगैरे खिस्सा न लिहितां कुल ऐवजाचा भरणा सत्वर करावा. सर्वांपेक्षां काळजी तुह्मांस अधिक त्यापक्षीं विस्तारें कशास लिहा

वें? बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

नं० १५१९ [भाद्रपद व० ९]

श्रीगणराज (१८ सप्तंबर)

पै॥ छ०२७ रजब सन सीत सबैन

चिरंजीव राजश्री तात्या यांसी प्रति कोन्हेरराय त्रिंबक आशीर्वाद. उपरी येथील कुशल तागायत छ० २२ रजब जाणून स्वकीय कुशल लेखन करीत जावें. विशेष. अलीकडे तुह्माकडून पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. सविस्तर लिहित असावें. छ० १४ रजबीं कित्तूरकराची लढाई जाहली याचें वृत्त लिहिलेंच आहे. त्यावरून सविस्तर कळलें असेल. त्या अलीकडील वर्तमान आम्ही छ० १६ रोजीं साणीकोपावरून कूच करून हेंगलास गेलों. छ० १७ रोजीं तोफा गांवास लाविल्या. दोन प्रहर पर्यंत मार देतांच ठाण्यांतील लोक कौल मागूं लागले. त्यावरून त्यांस कौल देऊन लोक ठाण्यांतील काढून लावून दिलें आणि ठाण्यांत लोक घातले. नंतर कित्तूरकराच्या तोफा येथें आहेत ह्मणून सूचना कळली त्यावरून विहिरी तळीं येथें बहुत शोध करविला. एक तोफ विहिरी मध्यें बुडविली होती ती सांपडली व एक रेकला सांपडला. तोफांचें सामान सारें सांपडलें. आणखी येथें तोफा असतील ह्मणोन एक दोन मुक्काम करून तलाश केला परंतु ठिकाण लागत नाहीं कित्तूरकर गडबडीनें पळून गेला ते समयीं एकच तोफ येथें ठेऊन दोन तोफा बरोबर घेऊन गेला म्हणोन सांगतात. आम्ही तो शोध करविला. ठिकाण नाहीं. सागलचें ठाणें ध्यावयाकरितां फौज व तोफा पाठविल्या होत्या. काल ठाणें घालून माघाऱ्या आल्या. आम्ही आज येथून कूच करून नागनूरच्या मुकामास जातों. नागनुरास ठाणें घालून देसणूर वणूर इकडे जाणार.

तीं दोन ठाणीं घेतलीं म्हणजे नदी अलीकडील साराच मुलुख सुटला. तिगढी हुबगली हींगल वगैरे दहा पांच ठाणीं घेतलीं. ; बाकी देसनूर वणूर आहेत हीं हस्तगत जाहल्यानंतर उपरांत नदीपार व्हावयाचें करूं. राजश्री येसाजीपंत आपा यांणीं धारवाड तालुक्यांतील सारीं ठाणीं सोडवून दोड-वाडावर लष्करचा मुक्काम करून सड्या स्वारीनिशीं सोगलावर काल आले. आज भेटी करितां येथें येणार आहेत. आज येतील. राजश्री येसाजीपंत आपा आतांच प्रात:काळच्या प्रहर दिवसास आले. भेटी जाहल्या. दोड-वाडावर राजश्री रामचंद्र आपा जमाव सुद्धां आहेत. त्यांस इकडे नदी उतरून येणें ह्मणोन पत्रें लिहून आतांच रवाना केलीं. आपणास कळावें. वरचेवर वर्तमान लिहीत असावें. तुम्ही तेरदळच्या माणसाबरोबर पत्र पाठविलें तें पावलें. आम्ही हींगलाहून नागनुरास आलों. नागनूरचें ठाणें छ० २२ रोजीं घेऊन, नागनुरावरून कूच करून वणुरास गेलों. कळावें ह्मणून लिहिलें असे. बहुत काय लिहिणें हे अशिर्वाद-

नं० १९२०

[आश्विन शु० ६]
[३० सप्तंबर]

पुरुषोत्तमरावाचें पुरंधराहून पांडुरंगरावास पत्र.

४ साबान घटका रात्र अवशीची.

" घटका दिवस असतां पुण्याहून नागोराम आले. श्रीमंत सौ॥ पार्वतीबाई[1] यांचा निरोप आला आपणास लिहिणें म्हणून; त्याजवरून हें पत्र हेच वेळेस लिहिलें आहे. त्यांचें[2] मानस ' तीन चार दिवस मजवर दृष्ट देऊन (तोतयास मिरजेसच) ठेवणें, परंतु रवाना न करणें. आपली

१ पानपतांत पडलेले सदाशीवराव भाऊ यांची स्त्री. तोतयाविषयींचा तिला अद्यापि भ्रम होता. २ बाईचें मानस.

वाट जाहली पाहिजे जावयाची परलोकांस.' यास्तव त्यांचें मानस 'आपणास पत्र लिहिणें.' त्यावरून लिहिलें. त्यांनीं सांगितलें त्याजवरून लिहिलें आहे. याचें उत्तर आपण समजून लिहावें. त्यानीं इतकें सांगून पाठविलें आहे. यास्तव लिहिणें तें त्यांस कडूपण न वाटे असें लिहिणें. तोतयास चार दिवस ठेऊन घ्यावें यांत उत्तम आहे. यांस कांहींच लिहूं नये आपण ठेवितों असें लिहिलें ह्मणजे श्रीमंत नानाजवळ उत्तर करून आपणास पत्र पाठवीन. हें पत्र मी कांहीं लटकाच प्रकार चित्तांत चवघे सांगतात त्याजवरून लिहिलें नाहीं. त्यांचा निरोप आला ह्मणोन लिहिलें. तीर्थरूप कैलासवासी यांच्या पायाची शपथ असे. अन्यथा लिहिलें नाहीं. त्यांचे निरोपावरून लिहिलें आहे. अन्यत्र पाठविण्यास बाहेर काढिला असला तरी ठेवणें.'

नं० १९२१ [अश्वीन वद्य]

(अक्टोबर दु० पंधरवडा)

पांडुरंगरावाचें परशुरामभाऊस पत्र.

" तोतयाचा मजकूर राजश्री गोविंदपंत अभ्यंकर यांणीं सविस्तर सांगितल्यावरून कळला. त्याजवरून अन्यत्र स्थलास पाठविण्याविशीं राजश्री नानांस लिहिलें आहे. बर्‍याचीं मुलें माणसें सुवर्णदुर्गास पाठविण्याचीं पत्रें पेशजी पाठविलीं असतां लावून दिलीं नाहींत तरी तोतया व बर्‍याचीं माणसें लावून द्यावीं ह्मणून लिहिलें, ऐशास तोतयाविशीं आपण पुरंदरास लिहिलें व आह्मीही दरपत्रीं पुरंदरास लिहितच गेलों. त्यावरून तोतयास रत्नागिरीस रवाना करावयाचीं पत्रें आलीं. त्यावरून तोतयाची रवानगी रत्नागिरीस केली. वडिलांस कळावें. बर्‍याचीं मुलें माणसें

१ कारभाऱ्यांस.

लावून द्यावी त्यास त्याचा मूल होता तो देवी येऊन मृत्यु पावला. दोघी बायका आहेत त्यांस नेऊं लागल्यास बहुतच श्रमी होऊन फारच कष्टू लागल्या यास्तव रवानगी न केली. तोतया लावून दिल्यावर दोन चार पत्रें दाजींचीं आलीं कीं, लावून न द्यावा. ठेवून घ्यावा. श्रीमंत सौभाग्यवती पार्वतीबाईनीं सांगितलें आहे. परंतु गेला. मग काय करावें? आम्ही चौकशी करण्याची हद्द केली. आमचे जातीचाच नव्हे. तथापि सर्वत्रांस भ्रम आहे. थोर आहेत! आमची निशा पुर्ती झाली. कोणाचे तोंडास हात लावितां येत नाहीं. हरप्रकारें बोलतात. भेटीअंती सर्व कळेल."

नं० १९२२ (कार्तिक शु० ९)
(२९ अक्टोबर)

पुरुषोत्तमरावाचें पुरंधराहून पांडुरंगरावास पत्र ४ रमजानचें.
"काल आपणास पत्र पाठविलें आहे. त्यास त्या[1] गृहस्थाची रवानगी न करावी. मजला पत्र त्यास हगवण लागली आहे म्हणून लिहावें. आज रामचंद्रभट वैद्य आले त्यांजबरोबर (बाईकडून) आपणांस लिहिणें म्हणोन निरोप आला. त्या गृहस्थाची तयारी केली असेल तरी ठेवावें. मागाहून सविस्तर लिहितों. पुण्यास मजला (बाईनीं) बोलाविलें आहे. जाऊन आल्यावर विस्तारें लिहितों.

नं० १९२३ (कार्तिक शु० १२)
(४ नोवेंबर)

पुरुषोत्तमरावाचें पुरंधराहून पांडुरंगरावास पत्र १० रमजानचें.

---
१ तोतयाची.

शुद्ध नवमीस पुण्यास श्रीमंत सौ॥ मातुश्री बाईनीं बोलाविलें होतें. वैरागीपणाचीं सोंगें घेऊन हिंडतात. त्यांतून एक ब्राह्मण आला. त्याची माझी भेटी झाली. त्याची रवानगी आपणाकडे करून देतों. तद्रू, दोन माणसें सह रवानगी करितों. त्याची भेटी आठ दिवस दोघांचीच खोलींत होय असें करावें. तिसरा कोणी कारकून अथवा माणूस न बसवावा. या प्रमाणें त्यांनीं सांगितलेवरून लिहिलें आहे. स्थापना चार दिवस करावी. श्रीमंत नाना पुण्यास गेले आहेत. कैपी तेथेंच आहेत.

नं० १५२४ (आश्विन व० ३)
(११ अक्टोबर)

श्री

राजश्री कोन्हेरराव दाजी गोसावी यांस.

सकल गुणालंकरण अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य.

स्नेहांकित महाण्णा कोइमतूर. दंडवत विनंती उपरी येथील कुशल तागायत छ० १९ साबान पारियंत वर्तमान यथास्थित जाणून स्वकीय लेखन करीत असलें पाहिजे. विशेष. अलीकडे बहुत दिवस पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. निरंतर पत्र कुशल वृत्त लेखन परामर्षास अविस्मर असलें पाहिजे. सांप्रत आह्मांकडील वृत्त तरी कैलासवासी त्रिंबकराव मामा व राजश्री वामनराव कर्नाटकांत छावणीस असतां आह्मीं संस्थान सोडोन त्यांपाशीं आलों होतों तेव्हां थोडींबहुत कामें आह्मांपासून घेऊन तदोतर श्रीमंत राजश्री पंत प्रधान यांची आज्ञा घेऊन आह्मांकडील बंदोबस्त होऊन राजश्री बाबूराव यांचे हातीं देऊन कैलासवासी मामा गेले. त्या नंतर गृहकलहामुळें आजवर आमचा बंदोबस्त नव्हता. प्रस्तुत रावजींच्या स्थळीं आपण आहां. याचा अर्थ

१ पार्वतीबाईनीं. २ वृद्ध सखारामबापू.

राजश्री वामनराव व पांडुरंगराव यांस सर्व विदित आहे. आपल्यास श्रुत नाहीं यास्तव किंचित् लिहावें ऐसें जाहलें. श्रीमंताकडून कर्नाटकाचा बं. दोबस्त जे समयीं होईल तेव्हां आमचाही बंदोबस्त होणें तो होईल. त्यासही साहित्य करणार आपणच आहां. सध्यां बिदनूर राज्याचे गुरु राजश्री वसंतस्वामी युक्तीच्या वाटे विश्वासानें आणून कित्तूरचा देसाई यानें कैद करून ठेविले आहेत. सांप्रत आपला व देसायाचा तह होणार ह्मणून वर्तमान ऐकिलें. येविशीं राजश्री बाबूरावजीनीं आपणांस लिहिलें आहे. तह होईल ते समयीं आपण स्मरण करून राजश्री वसंतस्वामीस आपणापाशीं आणवून आह्मांस लिहून पाठवावें. आह्मी भेटीस येऊन सर्व मजकूर आपणास विदित करितों. त्याजवरून महत्कार्यें यांचे हातून होतील. समयावर दृष्टि देऊन राजश्री स्वामींस अगत्य त्याच्या कैदेंतून सोडवून आपल्यापाशीं आणवावें. आपण द्यावें (?) पुढें कित्येक कार्यांवर स्वामी उपयोगी पडतील हें चित्तांत आणून अगत्यवादें राजश्री रावजीनीं आपणांस लिहिलें आहे. कैलासवासी मामानीं राजश्री नरसिंगराव घायगुडे व आह्मांस मध्यस्थ देऊन स्वामींस आणविलें होतें. एवढ्यास्तव आपणास सूचनार्थ ह्मणून लिहिलें आहे. त्यांचे कित्येक पर्याय राजश्री रावजीनीं लिहिले आहेत. आणि राजश्री बाळाजी गोविंद मुखतः कित्येक अर्थ स्वामीस निवेदन करितील त्याजवरून मनन होईल. कित्तूरकराचें पारिपत्य होऊन कार्य यशस्कर जाहलें. यानंतर आपलें आगमन तुंगभद्रानदी पलीकडे दक्षिणेस जाहलें तर पेशजी मामांजवळ थोडींबहुत कामें केलीं आहेत तद्वत् आपली सेवा किंचित् आह्मांकडून घडेल. कृपा मात्र आपली पाहिजे. विशेष काय लिहिणें लोभ असों दीजे हे विनंती.

नं०१५२९ श्रीशंकर प्रसन्न. (१२ अक्टोबर)

पै॥छ०२२साबान सुरू सन खमस

सबैन मया व अलुफ.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री वामनरावबाबा व राजश्री परशरामरावभाऊ स्वामींचे सेवेशी पोष्य गंगाधरराव भिकाजी[1] व रामचंद्र राव भिकाजी साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखन करीत गेलें पाहिजे. विशेष. सांप्रत आपणाकडून पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं तर सदैव पत्रीं सविस्तर लिहीत जावें या नंतर इकडील वर्तमान तर चिमणराव देशमुख सोनगडाकडे होता तेथून दीड दोन हजारपर्यंत गाडदी सिद्दी अरब व भिल्ल वगैरे मिळोन व पन्नास पाऊणशें स्वार या प्रमाणें जमाव करून निघोन घांटाखालीं आह्मांपासून सोळा वीस कोसांचे तफावतीनें येऊन राहिला. रात बिरात लष्करावर अगर कहींवर घालावें, तालुक्यांत दंगा करावा, या अर्थें येऊन राहिला. तों आश्विन वद्य ३ स दोनप्रहर दिवसा आह्मांस बातमी कळली. वर्तमान येतांच आह्मीं सडे फौजेनिशीं निवून रातवा खपोन उजाडतां प्रातःकाळीं त्याची गांठ घातली. तों तो ही तयार झाला होता. आह्मी सारे फौजेनिशीं त्याजवर हल्ला केली. चार घटका लढाई बरीच झाली. शेवटीं त्याचा मोड झाला. दोन अडीचशें गाडदी कापून काढिले. व शें दोनशें जखमी जाले. नगारा निशाण त्याचें पाडाव आलें. पन्नास पाऊणशें घोडे लहान मोठे पाडाव जाले. गाडद्यांच्या बंदुका व हत्यारें सहस्रावधि लष्करचे लोकांस सांपडली. चिमणराव देशमुख यास जखमा लागून घोड्याखालीं आला. झाडी अडचण, गवत भारी, त्या अडचणींत लपोन चुकावून पायउतारा पळोन गेला. त्याचा शोध फार केला परंतु सांपडला नाहीं.

---

१ पत्र लिहिणारे उभयतां आनंदराव रास्त्याचे बंधु.

वरकड त्याचें लष्कर अवघें लुटोन पस्त केलें. येविशींचा मजकूर सविस्तर राजश्री हरीपंततात्या यांचे पत्रीं लिहिला आहे त्याजवरून कळों येईल. तीर्थस्वरूप राजश्री दादा घरास जातानां आह्मांस आपले स्वाधिन करून गेले आहेत. आपण त्यांचे स्थळीं आह्मांस वडील असोन आह्मांस वेगळे काढिलें, उपाय नाहीं! आपणासन्निध ठेवावें, चाकरी घ्यावी, हें विहित आहे. ही चाकरी आपणासमक्ष होती ह्मणजे आह्मांस समाधान होतें. बहुत काय लिहिणें कृपा लोभ करीत जावें हे विनंती. राजश्री रघुनाथरावजींस साष्टांगनमस्कार. विनंती लिहिली परिसीजे. बाबांसे आरोग्यता जाहालियाचें लिहिणें हे विनंती. सेवेशीं चिटको शंकर व कृष्णाजी अनंत साष्टांग नमस्कार विज्ञापना.

नं. १९२६ श्री (१७ आक्टोबर.)

पै॥छ. २८ साबान सन सीतसबैन.

श्रीमंत राजश्री तात्यासाहेब स्वामींचें सेवेशी.

विनंती सेवक रामचंद्र कृष्णे[2] कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील क्षेम तागायन आश्वीन वद्य नवमीपर्यंत सेवकाचें व परगणे मजकूरचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. अलीकडे स्वारीकडून पत्र येऊन सांभाळ होत नाहीं तेणेंकरून चित्त सापेक्षित आहे. असें न करावें. सदैव पत्रद्वारें सांभाळिलें पाहिजे. या नंतर इकडील वर्तमान तरी हैदरखान याजकडील फौज येऊन हरिहर घेतल्याचें विनंती पत्र पेशजी पाठविलें आहे त्याजवरून कळलेंच असेल. अलीकडील ठाणें त्याजकडे जाहल्यापासून इकडील जितके लुच्चे तितके त्यास मिळाले. तमाम तळीस[3] प्रारंभ केला. आज दोन चार वर्षें लक्ष्मणपंत[4] याचे

१ वामनराव. २ हा लक्ष्मेश्वरचा मामलेदार. उपनांव दातार. ३ तळी = बंडावा. पुंडाई. ४ लक्ष्मणहरी लागू मामलेदार होते तेव्हां.

अमलांतच निर्वान गेले होते, परंतु हरिहरमध्यें होते त्यामुळें त्यांस राजकारणें करावयास उपयोग पडला नाहीं. हल्लीं तें घेतल्यावर मध्यें श्रीमंतांचें ठाणें नाहीं. सावनूरकराचा मुलुख, त्या अलीकडे लक्ष्मीश्वर परगणा. सावनूरकराचें त्याचें सूत्र तेव्हां ते येणारास आडकाठी करणार नाहींत. तेव्हां आमच्या परगण्यांची खराबी होईल. ऐसें पाहोन राजश्री खंडेराव[१] यांस कांहीं स्वामीचें भय, कांहीं आमच्या मायममतेचा प्रकार दाखवून त्याजकडूनच नबाबाचे भेटीस यावें ह्मणोन राजकारण आणून आह्मी सावनुरास गेलों. न जातां परिणाम नाहीं ऐसें पाहोन गेलों. राजश्रीची व नबाबाची भेटी जाहली. त्यांस वस्त्रें व तेथील कार्यभागीं यांस वस्त्रें आह्मी दिलीं. खंडेराव यांचें व आमचें व नबाबाचें स्नेहाचें बोलणें कितक लागलें. राजश्री खंडेराव यांचे हातून शपत घेतली जे लक्ष्मेश्वर परगणेवर राजकारण जाहलें तरी शें दोनशें आलियास वाट देऊं नये. व हरएक प्रकारें आमची कुमक करावी. सरकारांतून हरएक राजकारण सावनुरावर जाहलें तरी आह्मी स्वामीस लिहून बंदोबस्त करवावा. याज प्रमाणें उभय पक्षी भाषण होऊन राजश्री खंडेराव यांची शपत घेतली. अतःपर त्याचे कानावर पडोन एकाएकी कोणी येऊन लक्ष्मेश्वर परगणेवर पडणार नाहीं. मातबर फौज आल्यास उपायच नाहीं. या प्रमाणें तेथील बंदोबस्त करून राजश्री व्यंकापानाईक तट्टी व कलकिरी यांस बिदनुरास राजश्री तम्माणानाईक यांजकडे रवाना करून आह्मी आलों. येथें कांहीं एक दोन गांवचे पाटील व कुलकर्णी फाटिंग होते त्यांणीं कांहीं हैदरनाईक याजकडे सूत्र केलें ह्मणोन गुणगुण उठली आहे. त्यांच्या शोधास लागलों आहों. त्यांतील एक राजश्री लक्ष्मण पंत यांनीं हल्याळांत ठेविला आहे. सारा राजकारण्या मादरचोद

१ सावनूरचा दिवाण.

तोच. आहे. त्याजविशीं आह्मीं राजश्री लक्ष्मणपंतांस लिहिले आहे. त्याणीं पाठविल्यास उत्तम. नाहीं तरी आपले एक पत्र असावें जे "मानापा शानभोग यानें हदैरअलीची फौज आणून परगण्यांत स्वारी करावी याजप्रमाणें फितवा केला असतां बजिन्नस धरमगौंडा याचीं पत्रें असतां न पाठविला, रामचंद्रपंत याणी पाठवून देणें ह्मणोन लिहिलें असतां न पाठविला, तरी पत्रदर्शनी मशारनिल्हेकडे पाठवून देणें· तुह्मांस तेथें पाठवावयास न पुरवे तरी हुजूर पाठवून देणें." याप्रमाणें लक्ष्मणपंतांस पत्रें लिहून देऊन दोन ढालाईत बेमुरवत काम करीता-पाठवावे हें वर्तमान कांहीं उगेंच नव्हे. दस्ताऐवजच सांपडले आहेत. एव्हांच बोभाट करितां नये. याजकरितां आह्मी वरकडांचे शोधास लागोन हें पत्र स्वामीस लिहिलें असे· तर ताकीद अगत्यरूप पाठवावी. हरिहरांत फौज खरीजमा झाली आहे. तुंगभद्रेस उतार झाला होता परंतु अलीकडे मल्लाडांत पाऊस पडला. त्यामुळें उतार मोडला आहे, याजकरितां फौज दमखाऊन त्या जागांत राहिली आहे. आठ चार दिवसांत उतार होईल. फौज अलीकडे उतरल्यावर सावनूरचे राज्यांत राजकारण करावें, त्यांस त्यांचा त्यांचा अंतर्यामीं सुलुख आहे. तेव्हां तूर्त त्यांजवर राजकारण करणार नाहींत. त्यांस सोडून पुढें आल्यास तोंडीं आह्मींच आहों. स्वामीचें पुण्य समर्थ आहे. कांहीं चिंता नाहीं मातबर ठाण्याठुण्यांस तो त्याचें हातें काहीं होणें नाहीं. खेड्यापाड्यांचा नाश करितील. यविशीं आह्मी श्रीमंत राजश्री कोन्हेरराव यांस लिहिलें होतें. त्याणी आह्मांस लिहिलें आहे जे, तुह्मांकडे फौज येते ऐसी पुरती बातमी आणून आह्मांस लिहावें ह्मणजे तुह्मी लिहाल त्या सुमारे आह्मी येतों· त्याजवरून आह्मी बातमी आणून परराँनाची श्रीमंत रावजीस

१ शत्रूच्या राज्यांतील.

लिहीत असतो. लष्करांत राजश्री जनार्दनपंत मजमदार मुद्दाम बातमी पोंचविणें विशीं ठेविले आहेत. माझें हांतून जितकी हुषारी होईल त्यास चुकत नाहीं. आलें विघ्र सर्व परिहार स्वामींचे पुण्यें आज तागायत होतच आलें. पुढेंही होईल· राजश्री अंतोबानाईक काळे याजकडून चार हजार होन तेथें घेऊन आह्मांवर वरात केली त्या प्रमाणें नाईकाचें मुतालीक राजश्री जिवराज व मल्हार नाईक यांचे पदरीं घातले· आणखीही हजार दोन हजार त्यांचें पदरी घालून चिटी घेऊन स्वामीकडे पाठवून देतो व आज्ञेप्रमाणें नाईकाचे मुतालीक याजबरोबर प्यादे देऊन पोंचवितों. पाऊस कमी· पिकें तमाम वाळतात. त्यामध्यें रयत रजावंतीनें वसूल घेतच आहों. हुसेन नाईक व रुमालें[1] राजश्री हरीपंत जोशी याजबरोबर रवाना करितों. ठेवीत अतःपर नाहीं. आमचीं ठाणीं सरदेस मातबर. दुसऱ्याच्या हातास गेल्यावर तोफांशिवाय येणें नाहीं. ऐशियास बिदरहळी व इटगी व सिगली दोड्डूर वगैरे ठाणीं मिळोन दोनशें प्यादे ठेऊन बंदोबस्त केला. कळावें हे विज्ञापना.

नं. १९२७ (२९ अक्टोबर)

जिवाजी रामचंद्र यांचें गंगाधररावास पत्र.

आश्विन वद्य १३ मंदवासर मुक्काम एदलाबादचें.

" सोनगडाजवळ रास्ते होते त्यांवर इंग्रजाकडील दोनहजार· गाडदी छापा घालावयास आले होते. ही बातमी रास्त्यानीं राखून रातोरात जाऊन तळावर गाडद्यांस गांठून हजार दीड हजार गाडदी कापून काढिला. त्यांतील खासाजखमी वोळख न पुरतां पळोन गेला.

१ जमाखर्ची वगैरे कागदांचा. × २ रास्त्यानीं पराजित केलेल्या गाडद्यांशीं इंग्रजाचा कांहीं संबंध असावा असें वाटत नाहीं.

या प्रसंगीं यश चांगलें मिळविलें. हरीपंत फडके प्रस्तुत सोनगडचे सुमारें जातात. ;,

नं. १६२८ श्री (२३ अक्टोबर)

पै ॥ छ० १ रमजान सनसीत सबैन.

श्रीमंत राजश्री तात्यासाहेब स्वामींचे सेवेशीं.

विनंती सेवक रामचंद्र कृष्ण कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना येथील कुशल तागायत आश्वीन वद्य १४ पर्यंत सेवकाचें व परगणे मजकूरचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. अलीकडे स्वामीकडून पत्र येऊन समाचार कळत नाहीं तर सविस्तर लिहावयास आज्ञा करणार धणी समर्थ असां. यानंतर इकडील वर्तमान तरी अमित्राकडील पेशजी फौज हरिहरास आली होती त्याणीं येऊन सारथीचें ठाणें काल मंदवारीं रात्रीं घेतलें. हल्याळास येणार आहेत. त्यांची आमचीं शिवेस शीव लागली आहे. बाकी कांहीं राहिलेली नाहीं. एक दोन दिवसांत त्याचें आमचें तोंड लागतें. त्यास साहेबीं सत्वर या प्रांतीं फौज येई तो अर्थ करावा. आह्मीं येथून श्रीमंत राजश्री कोन्हेररावजी यांजकडे पत्रें पाठविलीं आहेत. फौजसुद्धां येतील. परंतु वरचेवरी फौजेचा जथ पडल्यास उत्तम आहे. खुद्द हैदरखानेही मजल दर मजल येतो ह्मणोन वदंता आहे. वरकड मजकूर पेशजी शेवेशीं लिहिलें आहे. त्यावरून कळेल. राजश्री लक्ष्मण हरी कुंदगोळाहून निघोन हल्याळास जावयास गेले. तुंगभद्रेसही उतार झाला आहे. आतां बातमीचें पत्र आलें आहे कीं, आजच हल्याळास येणार ह्मणोन फार आवई आहे. हल्याळकरानीं ठाण्यानजीक घरें होतीं तीं जाळून धमक भारीच धरली आहे. हल्याळ गेल्यानंतर मग दुसरें गांव नाहीं. आमचे परगणेचें

खेडें इटगें ह्मणोन अलीकडे कोसावर आहे तें. हल्याळास आल्यानंतर आमच्या परगण्यांत स्वारी शिकारी करतीलसें दिसतें. आह्मीं ठाण्याठुण्यांत प्यादे ठेऊन बंदोबस्त केलाच आहे. परंतु गुरें ढोरांस उपद्रव होईलसा दिसतो. आमच्या बातमीचे पत्रांत लिहिलें आहे कीं, रिपू पांच हजार स्वार व दहा हजार बार व दहा तोफा ऐसें घेऊन हरिहरानजीक आला आहे ह्मणून त्यांनीं लिहिलें आहे. सेवेशीं कळावें करितां लिहिलें असें पत्रें तिकडोन घेऊन येणें ह्मणोन प्याद्यांस सांगितलें आहे. तरी पत्रांचा जाबसाल लौकर द्यावयास आज्ञा करावी. राजश्री अंतोबा नाईक काळे यांची वरात होन धारवाडी नाणें ४००० चार हजारची केली त्याप्रमाणें मशारनिल्हे यांचे गुमास्ते यांचे पदरीं घालून कबज घेतलें. त्याची नक्कल सेवेशीं पाठविली आहे. हेरपनहळ्ळीकर याचे हजार प्यादे व दोनशें स्वार येऊन अमित्राचे फौजेंत मिळाले. हे विज्ञापना.

नं. १६९९ श्री (कार्तिक शु. १०)

२ नोवेंबर.

पै॥ छ० १९ रमजान सन सीत सबैन.

श्रीमंत राजश्री तात्यासाहेब स्वामींचे सेवेशीं.

विनंती. सेवक रामचंद्र कृष्ण कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० ८ रमजान पावेतों सेवकाचें व महालचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावलें. लिहिलें वर्तमान कळलें इकडील वर्तमान कार्तिक शुद्ध त्रयोदशीस हैदरखाना कडील फौज कृष्णराव व श्रीपादराव यांनीं येऊन हल्याळास वेढा दिला. ते दुसरे दिवशीं आमचें ठाणें इटगें ह्मणून नदीतीरीं सरदेस

आहे. तेथील पाटील निघोन गेला आहे. त्यानें गांवांत फितवा करून कांहीं राऊत व प्यादे घेऊन नदीवर आला. नदीस उतार नाहीं याजकारितां पैलातिरींच राहिलें. इतक्यांत आह्मांस वर्तमान कळोन आह्मीं येथून शें दोनशें प्यादे पाठवून बंदोबस्ती केली. तें सरदेचें ठाणें गेलें ह्मणजे हा मुलुखच आमचे हातचा गेला. शिरट्टी व श्रीमंतगड व थेलवंती हे तीन ठाणीं मात्र जुमस खाणार नाहींत. परंतु वसुलाचे दिवस. मुलुख अगदीं हातचा गेला होता. याजकारितां हल्लीं तीस चाळीस कामाठी चाकर ठेऊन त्या गढीची करामत करावयास लाविले आहे. दारूगोळी सामानसुद्धां तीनशें प्यादा त्या सरदेस ठेविला आहे. हल्याळचे वर्तमान तरी आह्मीं पन्नास प्यादा पहिलाच घातला आहे व राजश्री लक्ष्मणपंत यानीं कुंदगोळ सांवशीचा प्यादा शंभर घातला आहे. हावनूरकराचा पन्नास प्यादा आहे. एकूण अडीचशे प्यादे आहेत. त्यानीं मोर्चेवर पडोन मोर्चे माघारे सारले. चांगले झुजतात. परंतु कुमक जाहली पाहिजे. त्यास श्रीमंत राजश्री कोन्हेरराव यांस आह्मीं किती वेळां पत्रें लिहिलीं व राजश्री लक्ष्मणपंत याणीं ही पत्रें लिहिलीं. परंतु त्याचा येखत्यार नाहीं. बारभाई कारभार आहे. राजश्री जिवाजी गोपाळ याचा मनसबा एक राजश्री येसाजीपंत आपा यांचा मनसबा एक. राजश्री रामचंद्रपंत आपा यांचा मनसबा एक! एकाचा पायपोस ऐकाचे पायास येत नाहीं! असें असतां कुमक कोण करितो! राजश्री खंडेराव सावनूरचे दिवाण ह्मणत होते कीं श्रीमंत राजश्री कोन्हेरराव याणीं या प्रांतीं यावें ह्मणजे आपण दोन हजार फौज ठेवितों व त्यां जवळ सात आठ हजार फौज आहे. त्याणीं आणखी हजार दोन हजार फौज ठेवावी. ह्मणजे दहा बारा हजार फौज होती. देसक व पाळगार यांस लिहून पाठवून दहा पांच हजार प्यादा जमा करावा.

ह्मणजे हैदरनाईक आला तरी पाहून घेऊं असें ह्मणत होते. परंतु त्यांचें येणेंच इकडे होईना! कित्तूर घरोन बसले आहेत. बरें त्याचें तरी पारिपत्य यथास्थित होतें ह्मणावें तर ते ही नाहीं! या प्रांतीं फौज ठेऊन होती ते इभ्रत गमाविली! फौज यावयाचे अगोदर भ्रम होता तोंही गेला. असें असतां आमची ते कुमक काय करितात! स्वामीची कृपा मात्र सेवकावर आहे तेंच वज्रकवच. त्या धैर्येंकडून सेवकानें ठाणेंठुणेचा बंदोबस्त जो करावयाचा तो केला आहे. पहिला हजार प्यादा ठेविला होता. हल्लीं दोन तीनशें प्यादा ठेविला आहे. शिरहट्टीवगैरे ठाणे-ची बंदोबस्ती दारुगोळी जकिरा प्यादे जवादे यथास्थित केली आहे. खुद हैदरनाईक आला तरी गोळी उडविल्याखेरीजठाणें देत नाहीं. स्वामीचे चरण पहावयाचा ऋणानुबंध असला तर पाहतों. नाहीं तर स्वामीनीं आजपर्यंत पोषण केल्यासारिखें स्वामी कार्यावर शीर गेलें तरी सार्थक झालें! त्या गोष्टीचा काळजी किमपि करीत नाहीं! परंतु फौज या प्रांतीं येऊन उपयोगी पडली नाहीं. श्रीमंत राजश्री कोन्हेरराव यांस आह्मीं काल निक्षून पत्र लिहिलें आहे कीं तुमचें येणें न होय तर शेवटीं हजार स्वार तरी पाठवावे ह्मणजे हल्याळची कुमक करितों. त्यास हल्याळ नाकेची जागा. किल्ला चांगला आहे. सरदेची गढी कायम राहिली ह्मणजे आमचा मुलुख पोटीसीं पडला. यास्तव यत्न करितों. तें ही ठाणें खावंदाचें. हीं ही ठाणीं खावंदाचीं. राजश्री लक्ष्मणपंत ही आतां उमजले. पोटांतील किल्मिष सोडून कागदपत्र साळसूद लिहितात. तेही येथें येणार आहेत. हजार फौज त्याणीं पाठविली तर लक्ष्मणपंत व आह्मीं मिळोन आणखी कांहीं प्यादे जवादे मिळवून हल्याळचा वेढा उठवितों. त्यांजवळ सामान भारी नाहीं. हजार बाराशें स्वार व तीन चार हजार प्यादा चार पांच तोफा आहेत. हावनूरकर देसाई त्याकडे मिळाला आहे.

त्याचा तरी इलाज काय! आपला बचाव करून घ्यावया करितां मिळाले आहेत. आमची फौज आली तर आह्मांकडे मिळतील जमीदारांचा हा दस्तूरच आहे! हल्याळांत आणखी शें दोनशें प्यादे घालावे ह्मणोन यत्न करितों. परंतु नदीस उतार नाहीं याजकारितां उपाय चालत नाहीं. हैदरनाईक खुद्द पट्टण सोडून आश्विन शुद्ध अष्टमीस बाहेर निघाला. त्या लष्करांत गृहस्थ आहेत त्याचे आप्त या प्रांतीं आहेत. त्यांस त्याणीं लिहिलें होतें कीं लष्कर त्या प्रांतीं सत्वर येत आहे. तुह्मीं मुलें मनुष्यें चांगला जागा पाहून तेथें ठेवणें. व राजश्री आपाजी राम यांचें पत्र यशवंतराव बडणीकर यांस आलें होतें कीं तुह्मीं मुलें माणसें चांगला जागा पाहून ठेवणें. परंतु त्यांचा मनसबा काय तो कळत नाहीं. सामान यंदा भारी समागमें घेतलें आहे. बंकापुरास धारवाडास येतो ह्मणोन एक आवई. दुसरी कोपळ डावें टाकून पंचमहालाकडून विजापुरास जातो असें एक वर्तमान. त्याचे चित्तीं विजापुरच्या तक्तावर बसोन पातशहा ह्मणवावें असें विश्वतोमुखीं वर्तमान! मुलूख तमाम घाबरा झाला आहे. सर्वत्रांस कोठें जावें हेच काळजी लागली आहे. यंदा या प्रांतीं पाऊस कमी झाला त्या मुळें पीक यथास्थित झालें नाहीं. अशात लष्करची आवई. दाणादुणा सर्वही रानांत पडला आहे. अद्यापि शेतें कापिलीं नाहींत. हंगामाचे दिवस. हाप्ता वसूल करावा त्यास रयत गुळेंस जाती. च्यार ढोरें पोरें आहेत ते तरी जतन करावें असें सर्वांस लागलें आहे. अशाही मध्यें आह्मीं एक हप्ता वसूल केला. राजश्री अंतोबा नाईकास पहिले चार हजार होन दिले. हल्लीं दोन हजार होन दिले. एकूण सहा हजार होन पावते केले. हल्याळचा शह मात्र वारला तर दुसरा हप्ता वसुलास लावितों. शिबंदी ठेवावी लागली त्यामुळें खर्च वाढला. न ठेवितां परिणाम नाहीं. महिना पंधरा

दिवसांत तरी फौज यावयाची असती तर शिबंदी कमी करावयास येती. परंतु ते कांहीं दिसत नाहीं. तेव्हां शिबंदी दूर करितां नये. स्वामीची कृपा मात्र सेवकावर पूर्ण आहे तेवढाच आसरा. ते कृपाच सेवकास पार करील. वसुलासही सुस्ती करीत नाहीं. सोय पाहून निकड करीतच आहों. रुमाल पाठवून देणें ह्मणोन आज्ञा, त्यास तूर्त गडबड झाली आहे त्या मुळें रुमाल स्थलांतरीं ठेविले आहेत गडबड शांत होतांच पाठवून देतों. राजश्री खंडेराव दिवाण सावनूर याणीं स्वामीस पत्र लिहिलें आहे. त्यांचा भाव जे ' आपला पुत्र हजार पांचशे स्वारानिशीं सरकारांत अगर स्वामीकडे ठेवावें. सरकार सेवा करून दाखवून आपलें उर्जित स्वामीचे हांतून करून घ्यावें. हा दरबार मोंगलाई. याजकरितां मातबराचे पदरीं एक मूल असावा असा मानस आहे. ' त्यास स्वामीनीं फार माय ममतेनें पत्रें लिहून पाठवावीं जे, ' प्रसंग पडलेस रामचंद्रपंत यांचें साहित्य तुह्मीं करीत जावें. तुमचे कार्यास दुसरा प्रकार होणार नाहीं. लष्कर देशीं आलेवर तुमचे मनोदयानरूप घडेल. ' तूर्त आह्मांसीं तो फारच स्नेह करितो. खंडेराव थोर माणूस आहेत. समयास चुकणार नाहीं ही आमची निशा आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापणा. हल्लीं दोन हजार होनांची पावती लिहून राजश्री मल्हारनाईक याची राजश्री अंतोबा नाईक यासीं पाठविली आहे. एकूण सहा हजारांची पावती पाठवावयास आज्ञा करावी. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. १५३० श्रीगणराज. (कार्तिक व. १)
८नोवेंबर.

पै॥छ. २४ रमजान सनसीत सबैन.

चिरंजीव राजश्री वामनरावबाबा यासी प्रती कोन्हेरराव त्रिंबक

आशीर्वाद उपरी येथील कुशल तागायत छ. १४ रमजान मुक्काम संगोळी परगणे कित्तूर वर्तमान यथास्थित असे. विशेष. तुह्मी आश्विन वद्य चतुर्थीचें जैनाबादचे मुक्कामचें पत्र पाठविलें तें पावोन लिहिला मजकूर सविस्तर कळला. कित्तूरकर देसाई यानें सात्याचा पैगाम लाविला असेल, ठराव झाल्यानंतर आमचा ऐवज दुसाला नजरी येणें आहे तो उगवून घ्यावा. व राजश्री रामचंद्रपंत कोपळकर यांजकडे अदवानीचा खंडणीचा ऐवज सन खमसचा येणें. सावकार निशे दाखल ऐवज असतां ऐवजाचा निकाल करून देत नाहींत तर तुह्मीं त्यांस बोलोन निकाल पडे तें करावे ह्मणोन लिहिलें, त्यास कित्तूरकर देसाई याजकडील पैगाम आह्मी देशनूरच्या मुक्कामी असतां बाहिरंग निमित्तास त्यानें कारकून संधान करावें ह्मणोन पाठविला. त्यास आह्मीं बोलावयाचे रीतीनें बोललों. तेव्हां कित्तूरास जाऊन बोलून येतो ह्मणोन गेला. त्यास आज तागायत आला नाहीं. हैदरखान याची फौज येऊन हरिहरचें ठाणें घेतलें तेव्हां देसाई. याजकडील वकील तिकडे गेले. त्यानीं ही भरंवसा दिला. इतक्यावरूनच विवेक चित्तापासून करावा हें त्याच्या मनांत नाहीं कित्तूर तालुक्यांतील ठाणीं कित्तूरसुद्धां चार पांच राहिलीं त्यांपैकी संगोळीचें ठाणें जबरदस्त होतें आंत प्यादे हजार दीड हजारपर्यंत होते. तें छ. २ रमजानीं ठाणें हस्तगत जाहलें. आज उद्यां येथून कूच करून सिगनहळीस जातों. तेथून कित्तूर कोसावर राहते. त्यावर स्वारी शिकारी करून तंबी पोंहावितो इतक्यांत तो ध्यानावर येऊन सत्याचा प्रकार लाविला तर उरकोन घेतो. व आपल्या ऐवजाचा ही मार्ग करून घेऊं. अदवानीबद्दल ऐवज राजश्री रामचंद्रपंताकडे येणें त्यास ते येथें आले होते. हैदरखानाकडील फौज येऊन तिकडे गडबड झाली याजमुळें कोपळास निघोन गेले. आपलें पत्र मशारनिल्हेस आलें तें व आमचें पत्र असें कोपळास रवाना केलें

आहे. ते लिहितील त्या वरून त्यांची आमची भेट होईल ते समई ऐवजाचें पुसोन मिरजेस पाठवून द्यावयाचें करूं कित्तूरकराचा बंदोबस्त झाल्या नंतर अदवानीकडे जाऊन गुदस्तसाल व साल मजकूरचा ऐवज येणें त्याचा निकाल करून घ्यावा ह्मणोन लिहिलें, त्यास चंहूकडे धामधूम झाली याजमुळें अदवानीकर बावरा आहे. तशांत आह्मीं येथील गुंता उरकोन हरिहरचे रोखें जाणार. गेल्यानंतर त्यांस पत्रें लिहून रवाना करितों. त्यावर त्यांनीं निकाल करून दिल्यास उत्तम. नाहीं पक्षीं आमचें जाणें तिकडे जाहल्यास ऐवज उगवेल. चिंता नाहीं. हैदरखानाकडील जमाव येऊन हरिहरचें ठाणें घेतल्यावर सारथी वगैरे ठाणीं हावनूरकरांचीं घेऊन प्रस्तुत हल्याळास मोर्चे लाविले आहेत ठाणें लढत आहे ठाण्याचे कुमकेस जावें तर आज तागायत संगोलीस गुंतलों होतों येथील ही फडशा जाहला. अत:पर आह्मी इकडे शहास कोठें न गुंतता येथून एक दोन मजल पुढें जातों. आमचे फौजेच्या दबावानें त्याचा वेढा उठोन गेल्यास बरेंच होईल. नाहीं पक्षीं तुंगभद्रा पार होऊन जातों. आपले शरीरीं समाधान नाहीं. ज्वर येतो, देवी मानवी, उपाय होत आहे, व तुळा ही केली, इतक्यावरून उतार पडेल ह्मणोन लिहिलें तें कळलें. आपणा-कडील चिंता लागली आहे. शरीरीं आरोग्य जाहालियाचें वर्तमान लिहून पाठवावें. औषधी उपाय वरचेवर करीत जावें. सन सलासपासून दरबार खर्चाचा ऐवज दरसाल दहा हजार राजश्री बापूजी नारायण यांच्या विद्यमानें येणें आहे तो ही उगवावा ह्मणोन लिहिलें, त्यास तिकडे गेल्यावर सर्व फडशे होतील. मागें फिरते समयीं जमखंडीकराचा बंदोबस्त अर्धा राहिला आहे त्याचा करावा ह्मणोन लिहिलें, त्यास मागें फिरते समयीं त्याचा ही बंदोबस्त करितों. 'कलकत्याहून इंग्रजाचा वकील सरकारांत रवाना झाला तो कालपींत हिंदुस्थानांत आला. सरकारांत आल्या नंतर ठराव होईल.

श्रीमंत राजश्री दादासाहेब बडोदें नजीक आहेत. राजश्री मुधोजी भोंसले याचें पुरतें लक्ष इकडे आहे ' ह्मणोन लिहिलें तें सर्व कळलें. अलीकडे मजकूर कसा काय जाहला तो सविस्तर लिहून पाठवावा. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे आशीर्वाद.

वे॥ राजश्री गोविंदभट वाटवे यांस साष्टांग नमस्कार समस्त कारकून मंडळीस नमस्कार.

नं. १६३१ श्रीगणराज. (कार्तिक व. १)
८ नोवेंबर.
पै॥ छ. ९ सवाल.

चिरंजीव राजश्री भाऊ व राघोबा बाळ यांसीं प्रती कोन्हेरराव त्रिंबक आशीर्वाद. उपरी येथील कुशल तागायत छ. १४ रमजान मुक्काम संगोली परगणे कित्तूर वर्तमान यथास्थित असे विशेष. बहुत दिवस तुह्मांकडून पत्र येऊन वर्तमान कळत नव्हतें. चिरंजीव राजश्री वामनराव यांचें पत्र आश्विन वद्य चतुर्थी जैनाबादच्या मुक्कामचें आलें त्या वरून सविस्तर कळोन आलें. इकडील वर्तमान चिरंजीव राजश्री बाबांस लिहिलें आहे त्या वरून सविस्तर कळों येईल. कित्तूरकर अद्याप ध्याना-वर येऊन विवेक करीत नाहीं. कित्तूर प्रांत सारा खराब जाहला. किरकोळ ठाणींठुणींही घेतलीं. परंतु त्याचे चित्तीं विवेक करावयाचें नाहीं. हैदरखानाच्या फौजेचा भरंवसा त्यानें धरिला आहे. हैदरखा-नाची फौज येऊन हरिहर घेतलें. हावनूरकरांचीं ही ठाणीं घेतलीं. प्रस्तुत हल्याळास मोर्चे लाविले आहेत. हल्याळावर त्याणीं दोन वेळां हल्ला केलीच होती परंतु आंतील लोकांनीं मारून काढिली. ठाण्यांचा बंदोबस्त राजश्री लक्ष्मणपंत यानीं चांगला केला आहे. लोकांचा दम

बराच आहे. एकाएकीं ठाणें जात नाहीं. आह्मीं तिकडे जावें तर संगोलीस गुंतलों होतों. आतां मोकळे जाहलों. येथून कूच करून पुढें जातों. इकडील फौजेच्या दाबानें बहुधा उठोन जातील. न गेल्यास आह्मीं बातमी पाहून त्याजवर जाऊं. कळावें आपल्याकडील वर्तमान वरचेवरी लिहीत असावें. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे आशीर्वाद.

नं. १९३२ श्रीगणराज. (कार्तिक व. १)
८ नोवेंबर.

पै॥छ. २४ रमजान सन सीत सबैन कार्तिकमास.

चिरंजीव राजश्री तात्या यांसीं प्रती कोन्हेरराव त्रिंबक आशीर्वाद उपरी येथील कुशल तागायत छ. १४ रमजान मुक्काम संगोली परगणे कित्तूर वर्तमान यथास्थित असे विशेश. तुह्मी पत्र पाठविलें तें पावलें चिरंजिव राजश्री वामनरावबाबा याचीं पत्रें लष्कराहून आलेलीं पाठविलीं तीं पावलीं. सविस्तर मजकूर कळला. 'प्रस्तुत आपला मुक्काम कोणेस्थळीं आहे. तिकडील कित्तूरकराचे व हैदरखानाचे फौजेचें वर्तमान सविस्तर लिहावें,' ह्मणोन लिहिलें त्यास आह्मी देसनुराहून कूच करून संगोलीस आलों. येथील फडशा लौकरच होईल ह्मणून शहास गुंतलों. ठाण्यांत प्यादे पंधराशें पावेतों होते. वीस दिवस मोर्चे बसले. काल छ. १२ रमजानीं ठाणें हस्तगत झालें. हैदरखानाकडील फौज येऊन हल्याळास मोर्चे लाविले. आह्मीं तिकडे जावें तर शह टाकून जातां नये. यास्तव आतां येथून कूच करून मजल दर मजल बंकापूरचें सुमारें जातों. इतक्यांत ठाणें सोडून गेला तर उत्तम. नाहीं पक्षीं आह्मींच सडी स्वारी करून मोर्चे उठवून येतों. अत:पर इकडे गुंतत नाहीं. 'चिरंजीव

राजश्री बाबांस ज्वर येतो, देवी मानवी उपाय केला, तुळाही केली त्यावरून उतार पडेल. चिंता न करावी. ' ह्मणोन लिहिलें तें कळलें. तुह्मीं हा अनुष्ठानास ब्राह्मण सांगोन ग्रह जप करवावा. उतार पडेल चिंता नाहीं. आरोग्य जाहल्याचें वर्तमान येईल तें आह्मांकडे पाठवावें. आह्मीं लष्करास पत्रें लिहिलीं आहेत तीं प्रविष्ट करावीं. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं. १५३३ श्री. (९ नोवेंबर.)

पै ॥ छ० १८ सवाल सुरु सन सीत सबैन मया व अलुफ.

सेवेशीं शिवाजी बाबाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल तागायत कार्तिक वद्य द्वितिया भृगुवासरे मुक्काम भिवंडी वर्तमान यथास्थित असे विशेष. आपण छ० १० साबानचें पत्र पाठविलें तें आज तृतीय प्रहरीं पावलें. सविस्तर मजकूर कळला. श्रीमंत राजश्री नाना फडणीस यांचे नांवचे दोन लखोटे पाठविले ते पावले. ते मेणवलीस गेले आहेत. त्यांजकडे लाखोटे रवाना करितों. श्रीमंत राजश्री पुरुषोत्तम रावजी पुण्यास श्रीमंत सौभाग्यवती मातुश्री पार्वती बाईनीं बलाविलें याजकरितां आजच गेले. त्यांचे लाखोटे व राजश्री बापूजी नाईक यांचे लाखोटे पुण्यास रवाना करितों. सर्व तयारी झाली आहे ह्मणोन आज्ञा, त्यास येथून नवरा आणावयास हत्ती अंबाऱ्या घोडीं उंटें पालख्या राजश्री हरी शंकर यांजबरोबर पाठविल्या आहेत येऊन पावल्या असतील. घर वाड्याची सोय चांगली पहावी ह्मणोन आज्ञा, त्यास पाणी नजीक, लग्न घर नजीक, सोईचा वाडा पाहून तयार करविला. मंडप घालावयासी लाविले आहेत. आह्मीं नित्य जात असतों. पुण्याहून

हक्क रुसूमाचा तगादा.

सामान तांदूळ कणीक वगैरे सामान आलें तें सांठवून चौकीचा बंदोबस्त करून ठेविलें. दुसरा वाडा बिऱ्हाडें निराळीं उतरावयास व घोडीं व कारखाना रहावयासीं नवा वाडा राजश्री आपा बळवंत यांचा आहे तो तयार करविला. जरासा लांब आहे परंतु चांगला निर्मळ. आपणा समागमें येतील त्यांस बिऱ्हाडास जागा आहे. कोठी दाण्यादुण्याची निराळी करविली आहे. सामानाची कोठी जानवसा वरींच केली. सर्व बंदोबस्त आहे. आपण मात्र मुहूर्त साधावयास त्वरा करून यावें. प्रतिनिधींचा कलह न व्हावा, राजश्री भगवंतराव याणीं स्वस्थ रहावें, राजश्री भवानराव याणीं पुढें कर्नाटकांत जावें, येणें प्रमाणें येथून बंदोबस्त करून कारकून उभयतांकडे गेले आहेत. कलहाचें निवारण झालें म्हणजे पंत मजल दर मजल जाणार. गुंता तिळमात्र नाहीं. वरचेवरी पत्रें ही येथून गेलीं आहेत. वाणाविशीं लिहिलें, त्यास श्रीमंत राजश्री नाना मेणवलीहून आले म्हणजे विनंती दाजी करतील. आम्हीं ही करूं. मिळतील ते रवाना करितों. करवीरकरांचा मजकूर लिहिला तो कळला. नाना आले म्हणजे पत्रें आपण लिहिल्या प्रमाणें घेऊन पाठवितों. आपणाजवळ असों द्यावीं. बाळ बाळंतीण स्वस्तिक्षेम आहेत. श्रीमंत राजश्री दादासाहेब सुरतेच्या व सोनगडच्या दरम्यान आहेत. इंग्रज वकील कलकत्त्याचा दाखल होऊन ठराव होय तों युद्ध प्रसंगास उभे राहत नाहीं म्हणोन पक्की बातमी येत असते. तत्राप विश्वास पुरत नाहीं. राजश्री हरीपंत तात्या सडे होऊन पुढें सोनगडच्या आसऱ्यास जाणार होते. कोळ्यांनी दंगा फार केला आहे. त्यानीं अलग व तुरग वगैरे चार किल्ले घेतले. याजकरितां राजश्री रामचंद्र गणेश यांस ऐतूरच्या रोखें जावयास सांगितलें व पुढें गाडदी हजार कोळ्यांच्या रोखावर पाठविले आहेत. सरकारांत खर्चास नाहीं याजकरितां पाटील कुलकर्णी यांचा

हक्क व वाणी उदमी यांस शंभराच्या उदिमांस रुपया येक व तमाम कमाविसीचे महाल व सरंजामी व दुमाले आदिकरून दरसदे दहा येणें प्रमाणें पट्टी करून तमाम वराता करून वसूल घेतात. वृद्धांनीं[1] आह्मांस बलाऊन नेऊन सांगितलें कीं, तुह्मीं अजमास करून वराता शिलेदारांच्या कबूल कराव्या. आह्मीं साफच उत्तर सांगितलें कीं, जशी सरकारांत ओढ त्या पेक्षां आमची ओढ भारी आहे. महाल फार करून दंग्यांत मिरज व मंगळवेढें करकंब मात्र निर्वेध. त्यास सरंजामात बेरजा लिहून दिल्या आहेत त्यांस रुपयाचा पावणा रुपया वसूल होत नाहीं. आह्मांस दर सदे द्यावयासी परिछिन्न गांठ पडत नाहीं. दर सदेचें देणें असल्यास आमची फौज परत आणवावी. कर्ज वाम करून उणें न पडावें ह्मणोन चाकरी करीत असतां नित्य कटकटीस कारण! याचें प्रयोजन नाहीं. ह्मणोन साफ उत्तर सांगितलें. आह्मीं उठून आल्यावर मागें ह्मणत होते कीं, 'रास्ते व हे[2] साराच कारभार बिघडितात! चित्तास येईल तें करून! आह्मीं आपला रुपया दुमाल्यासुद्धां पोत्यास लावितों. दौलतसुद्धां रहावी असें ज्याच्या चित्तांत असेल ते वांकडें पडों देणार नाहींत. गुदस्तांचा रुपया हक्क रुसुमाचा अद्यापि देतच आहेत! आतां तिकडे दंगा ह्मणोन तपशील सांगतात!' 'पावणे तीन लक्ष रुपये जमीदाराचे आहेत ह्मणोन आपणास मोरोबांनीं[3] यादी दाखविली होती. त्यांत बाळापूर हरिहर गेलें त्याची बेरीज वजा करून बाकी बेरीज समजावणें' ह्मणोन बोलूं लागले. आह्मीं उत्तर केलें कीं, आह्मांस यादी ठाऊक नाहीं व कर्णोपकर्णीं ऐकिलें ही नाहीं. आपण ह्मणतात (तें) लटकें कशास ह्मणतील! यादी कोठें असेल ती दाखवावी. जाबसाल करूं. उगेंच ह्मटल्यास ह्मणून फलादेश नाहीं, ह्मणून उत्तर केलें. आह्मीं मिरजेहून

---

१ सखारास बापूनीं. २ पटवर्धन. ३ कैलासवासी मोरो बल्लाळ पटवर्धन.

आल्यावरी लग्नाचे निश्चयाचे पूर्वींच पालखी मंगळवेढ्यास पाठविली आहे ती आज उद्यां आली ह्मणजे सेवेशीं रवाना करितों. वाढेस येऊन पोंहचेल. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. १५३४ (९ अक्टोबर.)

रघुनाथरावांचें पांडुरंगरावांस पत्र कार्तिक शु० १३ चे.

" तीर्थरूप वामनरावबाबास मध्यें चांगला उतार पडला होता परंतु अलीकडे एकाएकींच प्रकृती बिघडत गेली. कार्तिक शुद्ध ९ स देवाधीन जाले. "

नं. १५३५ (कार्तिक व.)
(नोवेंबर दु. पंधरवडा.)

परशुरामभाऊचें पांडुरंगरावास पत्र--

" चिरंजीव मनीच्या* लग्नाचा निश्चय करून राजश्री हरीपंत तात्याचीं पत्रें वडील असतांच पाठविलीं होतीं. तों वडिलांचा असा प्रकार झाला. आतां गोविंदपंत अभ्यंकर अनमान करतील असें दिसतें. बरें ईश्वरी सूत्र असेल तसें घडेल. काय करावें! मूल थोर फार जाली.

* मनी ही नुकतेच वारलेले वामनरावबाबा यांची एकुलती कन्या. तिचें लग्न बाप जिवंत असतांच अभ्यंकराच्या मुलाशीं ठरलें होतें. पण आतां 'प्रति कुळ झाले.' या सबबीवर लग्न मोडतें कीं काय ही परशुरामभाऊस काळजी. वामनराव वारल्यामुळें सरदारीचा व वडीलपणानें मिरजकरांच्या घर प्रपंच प्रकरणीं सल्ला देण्याचा बोजा परशुरामभाऊवर पडला तेव्हां पोरक्या मनीच्या लग्नासंबंधें त्यानें काळजी करावी हें ठीकच. पण तिला नववें वर्ष टेंकलें नाहीं तोंच 'मूल थोर झाली, फार थोर झाली' ह्मणून कोण ही हाकाटी ! १ वामनराव.

एका वर्षांनंतर करावें असें तेथें जाहल्यास पुढें दहावें वरीस लागेल. त्यास सर्वांचे बिचारास आल्यास यंदा होईल तर फार बरें. नाहीं तर मूल फारच थोर होईल. चिरंजीव बाळाची प्रकृती नीट असली तर त्याची इकडे रवानगी करावी. चिरंजीव येथें असलें ह्मणजे चांगलें दिसतें. चिरंजीव येथें नाहींत यास्तव मी यांचे डेऱ्यांत आहे. चिरंजीव (गंगाधरराव) बाळाचे रवानगीविशीं फार काय लिहावें! तात्या! कांहीं सुचत नाहीं. बाबानीं. दुसरा अर्थ कळूं दिला नव्हता. ते गेले. लहानपणापासून सोबती होतों. आतां अंतर पडलें. काय करावें! श्रीईच्छा प्रमाण. ”

नं. १५३६ श्रीगणपति. (कार्तिक शु० नोवेंबर.
(प० पंधरवडा.)

चिरंजीवें[2] राजश्री तात्या यांसीं उपरी. येथें फौजेंत धणी असल्याशिवाय आळा ठीक बसणार नाहीं. लौकिकाची सरदारी[1] त्यांत काल या प्रकारचा. तुह्मांस या ह्मणून लिहावें तर तेथील खटला भारी. स्थलपदरीं मातबर. दुसरियाचे वस्तु निभावयाचें नाहीं. याजकरितां तूर्त चिरंजीव राजश्री बळवंतराव याची रवानगी करून पाठवावी. लोक नवे चार पांचशें ठेऊन पाठवावयाचा प्रकार पेशजी बाबानीं तुह्मांस लिहिलाच आहे. त्याजप्रमाणें लोक ठेवावयाचे काम चालीस लागलेंच असेल. जे ठेविले असतील तितक्यानिशींच चिरंजिवाची रवानगी करावी. राहतील ते मागाहून ठेऊन लवकर पाठवून द्यावें. पुणतांबेंपर्यंत यावयास कांहीं फिकीर नाहीं. तेथें आल्यानंतर येथून ही राऊत पाठवावयाचा प्रकार दिसल्यास पाठवून देऊं. त्याची चिंता नाहीं. चिरंजीव तेथून

---

१ सरदारी मिरज घराण्याकडे मुख्यपणानें कुरुंदवाड व तासगांव येथील घराणीं त्यांच्या पोटांत. असे असूनही मी मिरजकरांच्या जागीं बसत असतो.
२ वामनरावाच्या सुतकांत पत्र लिहिलें आहे सबब ‘ आशीर्वाद ’ लिहिला नाहीं.

निघाल्यानंतर तुमचीं पत्रें पुढें येतीलच. आमचा जावयाचा सुमार दिसेल तसें चिरंजीवाकडे लिहून पाठवून सुभत्तेचे वाटेनें लष्करांत येत असें करूं ते विशींची काळजी न करावी. तुह्मी ह्मणाल, 'तेथें आपण असतां आणीक आह्मीं अधिक काय?' त्यास हें घरांत खरेंच आहे. परंतु लौकीक वडिलांचा मोठा. फौज मातबर. कारखाना पागा वगैरे लहान नव्हे. सर्व तुह्मांस समजतच आहे. मी आहें खरा परंतु चिरंजीव. येतील त्यांचे हातांखालीं ते सांगतील त्या प्रमाणें चाकरी करीन. आपणाकडून व्यंग पडूं देणार नाहीं. हें लिहिणें उपरोधिक नव्हे. पुरता विचार करून चिरंजिवास जें सामान ठेविलें असेल तें बरोबर देऊन रवाना करावें. सारांश आर्षाची मात्र पीडा नसावी. घोड्यावर चांगलें बसावयाचें सामर्थ्य असिलें पाहिजे. नाहीं तरी प्रवासीं संकटांत न पडो असें पाहून कर्तव्य तें करावें. त्या प्रमाणें वर्तणूक करूं. आतां तुह्मां उभयतांवर आह्मीं नजर ठेऊन दुतर्फाचें काम करीत आहों. यांनीं सांभाळ करून चालविलें त्या प्रकारें तुह्मीं ही चालवावें. विस्तारें काय लिहिणें बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं. १६३७ श्रीगणपति. (कार्तिक वद्य.)

नोवेंबर प. पंधरवडा.

आशीर्वाद उपरी. इसफ दहाविसांनिशीं निघोन गेला ह्मणून आह्मी माघारे आलों. तो गढेमंडळाच्या उतारास रेवा उतरावयासीं गेला तेव्हां गढे मंडळकरानीं सांगितलें कीं तूं सरकारचा गुन्हेगार, तुला उतरोन दिलें तर सरकारचा शब्द लागेल याजकरितां उतरून देत नाहीं, ह्मणून साफ सांगितलें. राजश्री मुधोजी भोंसले यांस इसफ यानें मगदुरीचा

१ गोपाळराव व वामनराव याणीं. २ पत्र परशुरामभाऊचें पांडुरंगराव तात्यांस.

जाबसाल असा सांगून पाठविला कीं, तुह्मी माझी कुमक कराल असा भरंवसा होता. ती गोष्ट तुह्माकडून जाहली नाहीं. साबाजीस मारून तुह्मास राज्यावर बसविलें तेव्हां निमे राज्याचा खावंद मी. श्रीमंत दादासाहेबाचा बोलबाला झाल्यानंतर पाहून घेईन! तुह्मापासून इतका प्रकार व्हावयाचा नाहीं, परंतु देवाजीपंत तुमचे कारभारी त्यांनीं इतकें केलें. तें आह्मी पाहून घेऊं! असें सांगून पाठविलें तेव्हां हा लहान मनुष्य खरा याचें पारिपत्य केल्यानें सरकारचा व नबाबाचा स्नेह वृद्धिगत होईल, असें समजोन ताजखान रोहिला भोंसल्यांनीं इसफावर रवाना केला. गढेमंडळच्यानीं नर्मदा उतरूं दिलें नाहीं ह्मणून इसफ माघारा शिवणी ताजखान रोहिल्याची इकडे येत असतां वाटेंत इसफाची व ताजखान रोहिल्याची गांठ पडली. तेव्हां इसफानें घोड्यावरून उडी टाकून आतां आपली अब्रू वांचीव ह्मणून ताजखानाचे पाय धरिले त्याजवरून इसफास ताजखान यानें शिवणींत कैद करून नागपुरास लिहून पाठविलें. तेथून पांचवे दिवशीं धरिला ह्मणून सरकारचे वकिलांचीं पत्रें आली. राजश्री मुधोजीबाबानीं ये समयीं फारच निखालसपण दाखविलें. इसफास येथें पाठवून द्यावा ह्मणून पत्रें गेलीं आहेत॰ धणीयांचें पुण्य समर्थ व गाडद्यांचें पापही तसेंच, ह्मणून जामियत विसकटून जीव घेऊन पळाला तो सांपडला? मोठी गोष्ट झाली, चिरंजीव राजश्री परशुरामपंत कोलटकर यांजविशीं मुजरद जोडी भोंसलें यांजकडे पाठविली आहे. उत्तर आल्या नंतर तो मजकूर तुह्मास लिहून पाठवूं. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे आशीर्वाद.

नं. १९३८ **श्रीगणपति.** (कार्तिक वद्य. नोवेंबर)
(प० पंधरवडा)

चिरंजीव राजश्री तात्या यांसी आशीर्वाद उपरी छ० ९ रमजानीं धौशा डेरे दाखल जाहले. सामानसुद्धां त्यांस नबाब इकडे रवाना करितात. नबाबाचे स्नेहांत दुसरा विचार किमपि नाहीं. राजश्री मुधोजी भोंसले याची ही बाहेर निघावयाची तयारी होत आहे. श्रीमंत राजश्री दादासाहेब बावापिराचे घांटानें नर्मदा उतरोन सुरतेस जाणार ह्मणोन वर्तमान आलें याजकरितां राजश्री हरीपंततात्या नवापूरचें सुमारें गेलें. आह्मीं आज दोन दिवस इसिफोसाठीं कोसा दोन कोसाचें कूच केलें. इ. सीफही आज आह्मांजवळ आला. याजउपर आह्मीं लांब लांब मजली करून तात्यांकडे जात आहों. तुह्मीं चार पांचशें पावेतों नेव लोक ठेविलें ह्मणोन देशाहून लोक येतात ते सांगतात. तुह्मीं लोकांस बलावू पाठविलें होतें. समाजाविसीचें काम आटपलें असेल. याजउपर लोकांस ताकीद करून लौकर लावून द्यावें. आह्मीं ही पांच सात दिवसांत जाऊन त्यांजजवळ पोंहचतों. तीर्थस्वरूपांचा काल झाल्यानंतर चिरंजीव राजश्री आपा बळवंत आह्मांकडे आले होते. चार पांच दिवस होते. आह्मीं कूच केल्यानंतर मग ते पुढें गेले. ते जातात तों आह्मीं ही जातों. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे आशीर्वाद.

---

१ पत्र परशुराम भाऊचें पांडुरंगरावास. २ नारायणरावांचा खून करणारा महमदइसफ यास मुधोजी भोंसल्यानीं पकडून हरिपंतांच्या लष्करास पाठविलें होतें तो अद्यापि यावयाचा होता ह्मणून. ३ वामनरावांचा. ते कार्तिक शु० ९ स वरणगांव येथें लष्करचा मुक्काम असतां वारलें.

नं. १५२९ श्री (२६ नोवेंबर.

सेवेशीं शिवाजी बाबाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल तागायत मार्गशीर्ष शुद्ध चतुर्थी भानुवासरे मुक्काम पुरंधर वर्तमान यथास्थित असे विशेष. आह्मीं श्रीमंत राजश्री कोन्हेररावजींकडे गेलों होतों. कित्तूरकराचें पारिपत्य जाहल्यावर मिरजस आलों तो कित्तूरकराचें पत्र श्रीमंत राजश्री तात्यांस आलें कीं, 'श्रीमंत कैलासवासी रायांचे स्थापित आहों. आतां माझे अपराध चित्तांत न आणितां वांचवावें.' त्याजवरून पुन्हां तिकडे गेलों. तिकडे पावणामास राहिलों होतों. बोली चाली ही त्यानें लाविली होती. परंतु हैदरखान याजकडे त्यानें सूत्र लाविलें. तिकडून कुमक येते असें समजोन लबाडीस आला. तेव्हां संगोलीस मोर्चे लाविले. आठ पंधरा दिवसांत संगोली घेतली. आह्मी मिरजेस आलों. तों श्रीमंत बामनरावबाबा कैलासवासी जाहल्याचें वर्तमान आल्यावर आठ चार दिवस राहून श्रीमंत राजश्री तात्यानीं पुरंधरास रवाना केले ते काल येथें आलों. श्रीमंत वामनरावबाबा गेले. मोठा घात झाला? यास पारच नाहीं. अशी गोष्ट ईश्वरें अनुचित घडविली! होणारास इलाज नाहीं. आतां सर्वभार आपल्यावर आहे. श्रीमंत राजश्री तात्यांस आपण लिहितील त्या अन्वयें करितील. श्रीमंत राजश्री गंगाधररावबाळ यांस तिकडे पाठवावें येविशीं यत्न आह्मीं सर्वत्रानीं करून पाहिला. त्यांचे शरीरीं समाधान नाहीं. श्रीमंत राजश्री पुरुषोत्तमराव दाजी मिरजेस गेले आहेत. आठ दिवसांत येतील. हैदरानें हरिहर घेतल्याचें वर्तमान आपणास पेशजी लिहिलें गेलें होतें. हल्याळास मोर्चे त्यानीं लाविले. पंधरा वीस दिवस झुजले. शेवटीं त्याणीं ठाणें घेतलें. बसालतजंग याणीं बल्लारीस मोर्चे लाविले होते. बल्लारी जेर जाहली होती. हें वर्तमान कृष्णापीनाईक

१ पत्र परशुरामभाऊस. २ गोपाळरावानीं स्थापिलेले. ३ रायदुर्गचा संस्थानिक.

यार्णी हैदरखान यांस सुचवून त्याचा जमावसुद्धां खासा हैदरखान पट्टणाहून लांब लांब मजली करून येऊन छापा घातला. सर्व सलतनत लुटली देवीचंद दिवाण धरला. वरकड हत्ती तोफा वगैरे लुटली. खासा हैदरखान जमावानिशीं आलासें समजोन बल्लारीकर पळोन गेला. बल्लारींत हैदरखान याणें ठाणें घातलें. तेथील बंदोबस्त करून तुंगभद्रा उतरोन अलीकडे येणार. इकडून मातबर फौज तिकडे गेल्याखेरीज परिणाम नाहीं याजकरितां आह्मीं जलदीनें येथें आलों. कारभाऱ्यांस विनंती केली. तरतूद करून पाठवितों ह्मणतात. प्रतिनिधीस पुढें बागडकोटच्या सेखें जावें ह्मणोन पत्रें गेलीं आहेत. त्यांचा मुक्काम पुसे सावळीस आहे. पुढें जात जात जातील. इकडून मातबर फौज जावयाचा सुमार कळतच आहे! तेव्हां कोणतीं ठाणीं राहात नाहींत असा विचार आहे. लक्ष्मेश्वराकडे पांच सातशें राऊत श्रीमंत राजश्री तात्या रवाना करणार होते. श्रीमंत राजश्री कोन्हेररावही धारवाडच्या लगत्यास गेले आहेत. पुढें कसें होतें पहावें. अलग किल्ला कोळ्यानीं घेतला. नबाब निज़ाम अल्लीखान याणीं आड घालून परगण्याची यादी लिहून पाठविली. गाडापूर वैजापूर, पैठण, जालनापूर, आवसें, आंबें, आलंद, गुंज़ोटी, सतरा लक्ष जहागीर जी मागितली ती याणीं दिली. जहागीर मागितल्यास चिंता नाहीं परंतु जे परगणे जीव तेच घाल तर घेऊं येणें प्रमाणें बोलून आढीनें परगणे घेतले. सारांश कर्नाटकांत ही दंगा, तेव्हां विचार ठीक दिसत नाहीं. हवाला ईश्वरावर आहे. होईल वर्तमान तें मागाहून सविस्तर लिहून पाठवूं. तिकडील वर्तमान सविस्तर लिहिलें पाहिजे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. १५४० (२६ नोवेंबर.)

जिवाजी रामचंद्र याचें गंगाधररावास पत्र
मार्गशीर्ष शु० ४ रविवारचें धुळ्याहून--

" श्रीमंत राजश्री दादासाहेब सोनगडच्या अलीकडे चार कोस नवापुर ह्मणोन गांव आहे तेथें आल्याची बातमी आली. इतके जवळ यावयास कारण --गणेश विठ्ठल वाघमारे याचें पत्र गेलें कीं, " वामनराव देवाज्ञा पावले. येथील किरकोळ सरदार आहेत हे आह्मीं आपल्या मायेंत मेळविले आहेत. मार्गशीर्ष शु० ८ अष्टमीस राजश्री हरीपंतास दगा करितों. तुह्मीं रात्रीं दिवसा चाल करून जलद यावें. " तों इतक्यांत गणेश विठ्ठल याचें कृत्य प्रकट जालें. शृंखला घालून किल्यावर पाठविलें. महमदइसफ गाडदी यास राजश्री केसोपंत ओक आणावयास नागपुरास गेले होते ते त्यास घेऊन आले. सर्वेच दुसरे दिवशीं पांच पाट काढून डोईवर शेंदूर तेल घालून उंटावर बसवोन शेणमार करून तोफेच्या तोंडीं देऊन उडविला. बरोबर त्याचा मामा दिवाण होता त्यासही तोफेच्या तोंडीं उडविलें. "

नं. १५४१ श्री. (२७ नोवेंबर.)

पै॥ छ० ५ रमजान सीत सबैन.

सेवेशीं जिवाजी बाबाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल तागायत मार्गशीर्ष शुद्ध पंचमी इंदुवासर मुक्काम भिवंडी वर्तमान यथास्थित असे. विशेष. आह्मीं स्वामींचा निरोप घेऊन निघालों ते परवां मंदवारीं प्रातःकाळच्या प्रहर दिवसास पावलों. मार्गीं पर्जन्यानें फार हैराण केलें याजकरितां एक दिवस अधिक लागला. आलों त्याच दिवशीं किल्ल्यावर जाऊन उभयतां कारभारी यांची भेटी

जाहली. कर्नाटकाचें वर्तमान सविस्तर सांगितलें. त्यास प्रतिनिधि यांसीं गलगल्याच्या रोखें जावयाविशीं पत्रें रवाना झालीं. राजश्री विसाजी कृष्ण यांची रवानगी करावी असा मनसबा आहे, परंतु त्यांच्या सरंजामाचे महाल आलंद गुंजोटी मोंगलांस द्यावी लागली याजकरितां ते खट्ट आहेत. त्यांच्या मुबद्‍ला सरंजाम द्यावा तेव्हां त्यांची तयारी होऊन जाणार दिवसगतीचा प्रकार आहे. " फौज न पाठविली तरी कर्नाटक झाडून जातें. अलीकडे वेध लागतो. तरतूद करावी. स्थळें गेल्यावरी फिरोन येणें कळतच आहे. " ह्मणोन बहुत प्रकारें सांगितलें. बसालतजंग यास पत्रें लिहून थैली करून पाठवावीं त्यास पारसनीस पुण्यास गेला आहे. उदईक आला ह्मणजे पत्रें लिहून थैली करून आपणाकडे पाठवितों. येथील तरतुदेचा प्रकार समजलाच आहे. श्रीमंतांचे पुण्यप्रतापें काय होईल तें खरें! तिकडील वर्तमान जसें येईल तसें आपण लिहितीलच. प्रतिनिधि कोणत्या रोखें जातात हें ही वरचेवरी लिहावें ह्मणून कारभारी यानीं आपणास लिहावयास सांगितलें आहे. श्रीमंताकडील मजकूर तरी नर्मदा पार होते. अलीकडे यावयाचें कारण— राजश्री गणेश विठ्ठल गुदस्तां श्रीमंताच्या लढाईतून इकडे आले. त्यांस राजश्री हरीपंतानीं खातरजमा करून घेऊन आपणाजवळच त्या वेळेपासून ठेऊन घेतलें होतें. त्याणीं श्रीमंतांकडे लिहून पाठविलें कीं, " फौज फार करून उठून गेली. लष्करांत मरीनें फार माणसें मरतात. वामनराव दुखण्यास पडले आहेत. त्यांची फौज मागेंच आहे. अशांत आपण निकड करून यावें ह्मणजे काम होईल. राजश्री हरीपंतास आह्मीं कैद करूं, ह्मणजे मनसबा हातीं लागेल. " येणें प्रमाणें पत्रें जात होतीं. त्याजवरून

---

१ दादासाहेबां कडील.

ते नर्मदा उतरून सुरतेजवळ आलें. इतक्यांत गणेश विठ्ठल यांचें फितुराचें पत्र सांपडलें. त्याजवरून सावधता करून गणेश विठ्ठल यांस कैद करून बेडी घातली आणि पट्टयाच्या किल्ल्यावरी पाठविलें. सूचें झाल्याचें वर्तमान श्रीमंतांस कळल्यानंतर गळ्याकांबळ्याजवळ मुक्काम करून राहिले आहेत. सुरतेस व त्यांस दहा कोसांची तफावत आहे. इंग्रजानीं लग्नाचें निमित्य करून सुरतेस गेले आहेत. तयारी करून येतों असें त्यांस ह्मणतात. इकडे ही बोलणें लाविलें आहे. ह्मणतात जे, 'आह्मीं सामान त्यांजकडून आणविलें, आतां पाठवीत नाहीं,' असें ह्मणतात. परंतु केवळ प्रमाणच असें ह्मणतां येत नाहीं. कलकत्याहून वकील आला तो छ० १९ रमजानीं काल्पीस दाखल झाल्याचें पत्र वकीलाचेंच आलें कीं, मजल दरमजल येतों. कांहीं राऊत पाठवावे ह्मणजे समागमें सामान आणिलें आहे तें माघारें लावून देऊं. येणें प्रमाणें पत्रें आलीं. पंधरा दिवसांत यावासा आहे. तो आल्यावरी इंग्रजाकडील पुर्ता अर्थ समजेल. तों पावेतों पुर्ता विचार समजत नाहीं. मोंगलास गुदस्तां साडेबारांची[1] जहागीर दिलीच होती. रुकनुद्दौला मारला गेला. आतां दुसरा कारभारी जाहला नाहीं. खासाच कारभारी तेव्हां बोलणें लाविलें कीं, "गुदस्त सुद्धां तिसा लक्षांची भरती करून द्यावी. 'तिसांची सालमजकुरीं व पेस्तर मिळोन बापू व नाना भरती करून देतील' येणें प्रमाणें रुकनुद्दौला आपणासीं बोलिला होता. त्या प्रमाणें साडे सत्रांची राहिली ती द्यावी ह्मणजे त्या ऐवजीं रसद घेऊन तयारी करून धौशाची रवानगी राजश्री हरीपंताकडे करूं. नाहीं तरी तयारी पैक्याकरितां होत नाहीं. साडेसत्रांत महाल गाडापूर, वैजापूर, पैठण, जालनापूर, ओंदें, जोगा-

१ साडेबारा लक्षांची.

ईचें आंबें, आळंद, गुंजोटी, पडदूर, हेच महाल द्याल तरच घेऊं." येणें प्रमाणें मोहरेनिशीं यादी पाठविली तेव्हां हे विचारांत पडले, न द्यावी जहागीर तर आजच बिघडतें. तेव्हां द्यावीसें ठरलें. महाल दुसरे लावून द्यावे असें यांचें मानस परंतु ती गोष्ट त्यानें मान्य न केली. 'सदरहू महालच द्याल तरच घेऊं. नाहीं तरी तयारी होत नाहीं. येणें प्रमाणें जाहल्यावरी महाल सदरहु प्रमाणें दिले. सनदा त्याजकडे गेल्या. धौशास तयार करून राजश्री हरीपंताकडे पाठवितात. बाहेर निघाला आहे. रुकनुद्दौला मारला गेला याजमुळें इतकी जहागीर द्यावी लागली! पुढें शेवट कसा लाविता पहावें. राजश्री हरीपंततात्या मालेगांवच्या पलीकडे बारा कोसांवर आहेत लोकांस नालबंदी नाहीं याजकरितां उठोन आले आहेत ते फिरोन जात नाहींत. पोटचे राऊत सरदार लष्करांत आहेत त्यांचे मात्र लोक जातात. पाटास रोजमुऱ्यास सहा लक्ष रुपये राजश्री हरीपंताकडे रवाना झाले. मागील रोजमुरे याचा ऐवज पावलासा जाहला. पुढें रोजमऱ्यास ऐवज पाहिजेच. पैक्याकरितां आतां अगदींच बिघडावयाचा समय दिसतो. लोकांचा फितूर ही तिकडे[1] फार आहे. ईश्वरावर हवाला आहे! कोळी याणीं फार दंगा केला आहे. आलग किल्ला कोळ्यांनीं घेतला. आणखी कितीयेक किल्ल्यांच्या राजकारणांत आहेत. माळा लावून दग्यानें किल्ले घेतात. कोळ्यांच्या बंदोबस्तास हजार गाडदी रवाना करणार आहेत. महमदइसफ यासीं आणावयास राजश्री केसोपंत ओक राजश्री मुधोजी भोंसल यांजकडे गेले होते. त्यास घेऊन लष्करांत आल्यावरी इकडे पाठवावा असा विचार होता. परंतु याणीं लिहून पाठविलें कीं तेथेंच पारिपत्य करणें. त्याजवरून पाट काढून गाढवावर बसवून लष्करांतून

१ दादासाहेबांकडे.

फिरविला आणि तोफेच्या तोंडीं दिला. येणें प्रमाणें काल पत्रें आलीं नारो बाबाजी कान्हेरास होते त्यांस एकाएकींच पुळी जाहल्याचें निमित्य होऊन मृत्यु पावले. चार दिवस झाले. जुनीं माणसें फार करून चाललीं. जमीदाराकडील रुसुलाचा तपशील सांगितला. यादी उदयीक समजाऊं ह्मणोन सांगितलें व कारकुनास मनाचिठी द्यावी ह्मणोन बोलिलें. त्यास मनास गोष्ट आली नाहीं. यादी पाहून मनाचिठीचें सांगणें तें सांगों ह्मणोन बोलिले आहेत. यादी समजावून मनाचिठीचे पुसोन घेतों. मिरजेच्या फडणीसीचे वगैरे— असामीचें पुसों लागले कीं, ' दुसरे रदबदल करीत होते परंतु तुह्मी नव्हतां. तुह्मी जाते समयीं बोलून गेलां कीं आह्मी आल्यावरी उत्तर सांगों. त्यास फार दिवस जाहले. तुह्मांस तिकडेच फार दिवस लागले. आतां विल्हेस लावणें. ' तेव्हां आह्मीं उत्तर केलें कीं, ' चित्तास येईल त्यास सांगाव्या. मिरजेच्या मात्र फडणीसीस पांच हजार निदान सहा हजार रुपये नजराणा आह्मी देऊं. या पक्षां जाजती दुसरा देत असल्यास दुसऱ्यास सांगावी. तेव्हां बोलिले कीं, ' दहा हजार रुपये दुसरा देतो. तेणें प्रमाणें द्यावें. नाहीं तरी काय तें सांगावें. दुसरीकडे विल्हेस लावूं. ' आपण तर पांच सहा पावेतों सांगितलें होतें. आठ पावेतों निदानीं जाहल्यास करून द्यावें अशी मर्जी असल्यास लिहावें. नाहीं तरी तसेंच लिहावें. यांस सांगों कीं चित्तास येईल त्यास सांगावी. येणें प्रमाणें सांगों. उत्तर मात्र पाठवणें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

१ नगरकर.

नं. १५४२ (२९ नोवेंबर.)

वासुदेव धोंडदेव यांचें पांडुरंगरावास पत्र--

मार्गशीर्ष शुद्ध ७ चें मुक्काम साखरी प्रांत बागलण येथून--
" श्रीमंत राजश्री दादासाहेब यांचें कूच होऊन तीन कोस अलीकडे आले. या फौजेस व सोनगडास चार गांवें तफावत आहे. तेथून पलीकडे श्रीमंत दहा कोस आहेत. इकडील सारे फौजेची गणती जाली. तीस हजार फौज गणतीची भरली. धौशाही येत आहे. येथून कोंडाईबारी सोनगडास जावयाची नव कोस लांब आहे. "

नं. १५४३ (३० नोवेंबर.)

वासुदेव धोंडदेव यांचें पांडुरंगरावास पत्र--

मार्गशीर्ष शु. ८ चें.

" नरसिंगराव धायगुडे यांचा लाख रुपये वसुलीचा महाल आंबें हा होता तो साल मजकुरीं १८ लाखांची जहागीर नबाबास दिली त्या मध्यें तो महाल दिला यास्तव मशारनिल्हे रुसोन देशास जात होते. (कुचाचा) नगाराही केला होता. मग राजश्री हरीपंततात्या येऊन मशारनिल्हेची समजाविशी केली. ' तुमचा लाख रुपयांचा महाल गेला त्या ऐवजीं आह्मीं पोत्यांतून तुह्मांस ऐवज देत जाऊं ' येणेंप्रमाणें समजाविशी केली. १० हजार फौज बेरोजगारी झाली आहे. आणि दररोज शें दोनशें येत आहेत. येथें कोणी ठेवीत नाहींत. रोजमुरेवर सरकारांत हुजरातीस लोक ठेवितात. दोन तीन हजार ठेविलें. आणखी वरचेवर ठेवीत आहेत. श्रीमंतांस व या फौजास सात गांवांची तफावत आहे. "

नं. १९४४ (मार्गशीर्ष शु.)

श्री. (नोवेंबर दु· पंधरवडा.)

राजश्री नरसिंगरावबाबा स्वामीस.

विनंती उपरी. आपणांस राग आला. बोलणें जालें. त्याजवर मी संध्येस गेलों. आपण तेथें आले, मी बसा ह्मणोन सांगितलें असतां न पुसतां उठोन गेला. ही गोष्ट चांगली कीं काय? कित्येक गोष्ट आपणासीं बोलणें (आहेत.) आपण गेले, राग पुरता आला, ऐसीयास अस्मान कडाडलें तरी आपण जुमसे[2] खाऊं नये· आह्मी आपल्यास वडील ह्मणतों. आह्मांस सल्ला मसलत पुसणें ती आपल्यास पुसली आहे. असें असतां आह्मांस रानांत टाकून जावें हीच गोष्ट वडीलपणास आली असली तर ईश्वरी इच्छा ह्मणावी! उतावळी कोणे गोष्टीची न करावी. मी सकाळीं येतों. कित्येक गोष्टी बोलणें आहेत. माझी भेट झाल्या खेरीज उतावळी कराल तर तुह्मांस तुमचे कुलस्वामीची व श्रीमंत रावसाहेब[3] यांचे पायांची शपथ असे· हे विनंती.

नं. १९४५ श्री. (दिसेंबर.)

पौ।छ. १२ सवाल सुम सन सीत सबैन मय्या व अल्लफ.

सेवेशीं शिवाजी बाबाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल तागायत मार्गशीर्ष शु. द्वादशी इंदुवासरे मुक्काम भिवंडी वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपण आष्टमी गुरुवारचें पत्र पाठविलें तें मंदवारीं संध्याकाळीं किल्ल्यावरी[4] असतां पावलें सविस्तर मजकूर कळला.

---

१ हरीपंत फडके यांची नरसिंगराव धायगुडे यांस ही चिठी आहे. २ जुमस खाऊं नये = कचकरूं नये. ३ सवाई माधवराव यांची. ४ पुरंदरावर.

सविस्तर मजकूर श्रीमंत राजश्री नानास श्रवण केला. सौ॥ कृष्णीबाई क्षेमरूप बाळबाळंतीणसुद्धां आहेत. ईश्वर पार पाडील, चिंता नाहीं श्रीमंत राजश्री पुरुषोत्तमराव दाजी काल संध्याकाळीं आले. लग्नाच्या साहित्याविशीं आपण राजश्री बापूजी नाईक यांस पत्र पाठविलें तें जासूद पावतें करून उत्तर घेऊन आला. आज मशारनिल्हे येणार. आज्ञे-प्रमाणें घर वाडे उदक समीप असेंच पाहून घेतों. घोडीं पन्नास, उंटें पंधरा, पालख्या पांच, अंबाऱ्या दोन खुले हत्ती तीन, येणें प्रमाणें राजश्री हरी शंकर यांजबरोबर आपणाकडे पाठविलें आहे. चार दिवसांत येऊन पावतील. कारकुनास मनाचिठी पाठविली आहे. कर्जाच्या ऐवजाचें नानां आदिकरून एक दोन स्थळीं मनास आणिलें. त्यांस सर्व जागां नकाराचाच विचार आहे. एक दुसरी जागा आहे. मनास आणून पाहतों. राजश्री नाना स्त्रीच्या वर्षश्राद्धासाठीं आजच मेणोलीस गेले. पौर्णिमा करून येणार. कर्नाटकांत फौज रवाना करावी ह्मणोन बहुत प्रकारें सांगितलें परंतु डोळे उघडत नाहींत! राजश्री पंतांस रवाना केलें होतें. त्यास राजश्री भगवंतराव याचा वेध लागला आहे. त्यांजकडे कारकुन सरकारचे गेले आहेत. वेध मना जाहला ह्मणजे जातील. दुसरी तरतूद प्रस्तुत होतां दिसत नाहीं. हिंदुस्थान सहजच गेलें. गुजराथ तर त्यांणीं आटोपिली. देशचे महाल मोंगलानें घेतले. कर्नाटक राहिलें होतें त्यास पाय फुटले! सारांश बुडता पाया दिसतो. एक श्रीमंतांच्या प्रतापें करून मात्र होणें तें होईल!—तरतुदेचा विचार

१ पुरुषोत्तमराव दाजी पटवर्धन यांची स्त्री किल्लेपुरंदरीं बाळंत झाली होती ती २ पांडुरंगराव यांचा पुत्र हरिहरराव याचें लग्न सासवड मुक्कामीं व्हावयाचें होतें. नवरी आपा बळवंत यांची कन्या ठरली होती. ३ उपनांव जोशी. धंदा सराफीचा ४ नानाफडणीस यांजवळ आपले यजमानांसाठीं पत्र लिहिणारानें कर्ज मागितलें. ५ भवानराव प्रतिनिधीस ६ भगवंतरावाकडे. ७ इंग्रजांनीं.

कळतच आहे. पाटील कुलकर्णी यांचें उत्पन्न व सावकार वाणी उदमी ज्याचा उदीम असेल त्यास शेंकडा एक रुपया घ्यावा, रयतीस दर सदे रुपये १० प्रमाणें आकारास जाजती घ्यावे, येणेंप्रमाणें ठरोन ताकीदी जाहल्या आहेत. वराता करितात असा प्रकार जाहला आहे. राजश्री हरीपंततात्या माळेगांवच्या पलीकडे दहा कोसांवर आहेत. श्रीमंत राजश्री भाऊ सामील जाहल्याचें पत्रच आलें. सारी फौज हुजरात व पथकें मिळोन गणतीची वीस हजार आहे. श्रीमंत राजश्री दादासाहेब सुरतेच्या व सोनगडच्या दरम्यान आहेत. इंग्रज फार करून सुरतेस गेले आहेत. इंग्रज जमेत सुद्धां सामील न जाहल्यास पुढें यावयास काट होत नाहीं. राजश्री हरीपंततात्या सडे होऊन पुढें सोनगडच्या आसऱ्यास जाणार. मोंगलाकडील सनदापत्रांचा गुंता उरकला. राजश्री नानाजीपंत वकील मोंगलाकडील काल निरोप घेऊन सासवडाजवळ राहिला आहे. एक दोन दिवसांत नबाबाकडे जाणार. जातीच्या तैनातीविशीं सर्वत्रांस तगादा फार लागला आहे. आह्मांस पुसत होते. आह्मीं उत्तर केलें. त्यास आपण आल्यावरी समक्ष बोलूं ह्मणोन बोलिलें. कर्नाटकचीं ठाणीं दम धरतील असा भरंवसा दिसत नाहीं. राजश्री रामचंद्रपंत नरगुंदास आले तेव्हां कोपळची काळजी करावयाचें कारणच नाहीं! श्रीमंत राजश्री कोन्हेरराव यांस आपण सावधते विषयीं लिहावें हैदरखान पट्टणाहून येऊन बल्लारीस गांठ घातली तसी दौड करावयास चुकणार नाहीं याजकरितां सावधपणाविशीं लिहावें. सरंजामी यांजबद्दल साडेएकावन हजार रुपये हुकेरी. त्यास चाळीस हजार रुपये श्रीमंत राजश्री कोन्हेरराव यांजकडे घ्यावे. साडेअकरा हजार रुपयांच्या वराता करूं त्याप्रमाणें द्यावे ह्मणोन राजश्री नानानीं सांगितलें, याजकरितां चाळीस हजार रुपये कुरुंदवाडास द्यावे. रायानीं व्याजें रुपये काढले

आहेत. व्याज चढेल याजकरितां द्यावे. राजश्री धोंडोबादादांचे पांच हजार रुपये वजा जाहले आहेत त्यांस तूर्त निम्मे द्यावे. निम्मे राजश्री कृष्णराव सातारकर यांस येसाजीदेव कांते यांच्या वरातांबद्दल देविले आहेत. अडीच हजार रुपयेची चिठी व आमचें पत्र घेऊन येतील तेव्हां द्यावें. दादास अडीच हजार द्यावे. मिरज व अष्टे येथील दरकदार असामी अजी वजा आहेत. त्यांचा एक साला ऐवज ध्यावा ह्मणोन आज्ञा त्यांची यादी पाठविली आहे. एक साला ऐवज घेतला पाहिजे. राजश्री वासुदेव[१] अनंत यांजकडे सावडें कर्यात आहे ती जप्त करावी ह्मणोन सांगितलें आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना'

नं. १५४६ (मार्ग. शु. १२)
(४ दिसेंबर.)

पुरुषोत्तमरावाचें पत्र पांडुरंगरावास
पुरंधर मुक्कामचें १० सवालचें—

" श्रीमंत राजश्री दादासाहेब सोनगडा पलीकडे तीन कोसांवर आहेत. समागमें सात आठ हजार फौज व इंग्रज दोन हजार व यांजकडील हजार दीड हजार पायदळ या प्रमाणें आहे. नबाबाकडील विकारदौला आला होता त्यास कालच वस्त्रें देऊन निरोप दिला. चिरंजीव भाऊ[२] व राघोबा[३] हरीपंततात्यास जाऊन मिळाले. सोनगडा अलीकडे पंचवीस कोसांवर आहेत. "

१ प्रतिनिधीचे मुतालीक. कांगोरीच्या किल्ल्यावर कैदेंत होते तेथून पळून हल्लीं बाणकोटास इंग्रजाकडे गेले होते सबब. २ परशुरामभाऊ. ३ रघुनाथराव कुरुंदवाडकर.

नं. २९४७ (११ दिसेंबर.)

पुरुषोत्तमरावाचें परशुरामभाऊस पत्र–

मार्गशीर्ष वद्य ४ रविवार प्रातःकाळचें पुण्याहून–

" हैदरखान फौजसुद्धां तुंगभद्रेवरच आहे. विजापुराकडे येण्याची दाट आवाई आहे. श्रीमंत राजश्री भवानराव व भगवंतराव या मध्यें कलह लागला आहे. कारभाऱ्यांनीं कारकून मध्यस्तीस पाठविला आहे. श्रीमंत सौभाग्यवती पार्वतीबाईनीं बहुत श्रमी होऊन बोललीं, " ईश्वरें आह्मांस अशा संकटांत घातलें! यांचा बंदोबस्त बराच खर्चावेचाचा झाला आहे! " त्यानीं स्वमुखें कांहीं बोलली नाहीं. बारकाईनें समजलें. असा प्रकार येथील आहे.

नं. १९४८ (मार्गं० व० ७)

श्री (१४ दिसेंबर.)

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री परशुरामपंतभाऊ स्वामींचें सेवेशीं.

पोष्य बाळाजी जनार्दन साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल तागायत छ. २० सवाल जाणोन स्वकीय लिहीत जावें. विशेष. सालमजकुरीं कमाल जमिनीवर दहा रुपये दरसेंदे एक सालां नजरपट्टी व पाटील कुलकर्णी यांचा हक्क घ्यावयाचा करार केला आहे त्या प्रमाणें सरकारच्या महालचा वगैरे लोकांकडील फडशा होत चालिले. राजश्री सखारामपंतबापू याणीं आपल्या महालाचा फडशा करून ऐवज दिला. तुह्मीं मातबर सरदार. तुमचा फडशा जाहला ह्मणजे सर्वांनीं करावा असें पाहतात. त्यास तुह्मीच दिवसगतीवर घालितां तेव्हां वरकडांचें कसें

१ मिरजेच्या किल्ल्यांत त्या वर्षी तोतया कैदेंत होता त्याचा. २ दरशेकडा.

होतें! जातीचे तैनातीविशीं लिहिलें पासून बहुतवेळ लिहिलें परंतु अद्याप मर्जीस न ये हे गोष्ट तुह्मांस उचित नाहीं. सरकारांत पैक्याची ओढ पडली या मुळें हरएक तऱ्हा काढावी लागते, त्याची आंगेजणी तुह्मीं करून लहान मोठ्यास सांगावें येणें करून सरकार काम होतें. त्यास नजरपट्टीस पाटीलकुलकर्णी यांचा हक्क व जातीचे तैनातेचा ऐवज येणेविशीं राजश्री पांडुरंगराव यांस लेहून ऐवज लवकर देववावा. दिवसगतीवर सहसा घालूं नये. तुमचा जाबसाल लांबणीवर पडलियानें वरकडाकडील हिसके फार बसतात. यास्तव तुह्मीं आपणाकडील फडशा करावा. तुह्मांकडे सरदारीचें थोरपण आहे याजमुळें तुह्मीं फडशा आधीं करावा हें उचित. बाहेरून तो मुलुखास उपद्रव लागतो ते समयीं कितीएक नुकसानी होतच आहेत. हें तर एक सालां सरकारांतून जाहलें. परभारें रयतेवर आहे. वोढूं नये. भाऊ! आघाडी आपण घ्यावी असें असतां अनमान होतो त्याजमुळें आह्मांस खालीं पहावें लागतें. असें नसावें. अवघे क़बूल करून देतात. आपणाकडील तो अगोदर व्हावें. या करितां जातीची बेरीज व दाहोत्रा एकसाला नजरपट्टी व पाटीलकुलकर्णी यांचा हक्क ऐवज घ्यावयाविशीं निक्षून पत्र पाठवावें. शत्रू कोणी उपद्रव करूं लागला तर एक गांव पांच हजारांचा वीस हजार देतो. आणि हें हलकें, विशेष नसतां द्यावयास हिसका पडतो, काम नासतें, असें आहे. बहुत काय लिहिणें लोभ असो दीजे हे विनंती.

नं. १५४९ श्री (१६ दिसेंबर)

पै॥ छ. १६ सवाल सनसीत सबैन मया व अल्लफ.

* सेवेशीं शिवाजी बाबाजी साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत

---

* पत्र पांडुरंगरावास.

मार्गशीर्ष वद्य नवमी मंदवासरे मुक्काम सासवड वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपण पत्रें पाठविलीं तीं पावोन सविस्तर मजकूर कळला. हैदरखानाच्या बातमीचीं पत्रें श्रीमंत राजश्री नानांस दाखवून आपले आज्ञेप्रमाणें श्रीमत राजश्री भाऊसाहेबांकडे पाठविलीं. कलकत्याचा वकील इंग्रजाकडील बऱ्हाणपुरास दाखल झाला. आत्तां सत्वरच येईल. भलता प्रकार सल्ल्याचा अथवा पुरता बिघाडाचा होणें तो महिन्या अलीकडे होईल. परंतु भलता विचार होऊन ठरावांतच गोष्ट यावीसें मनसब्याचे रीतीनें दिसतें. श्रीमंत राजश्री भवानराव पलसदेवाजवळ भीमा उतरोन पार झाले. राजश्री बाबूजीनाईक याचे तीनशें स्वार यांच्या लिहिल्यावरून सामील जाहले. राजश्री विसाजी कृष्ण ही पंताकडे जाणार. लौकर उरकलें ह्मणजे कर्नाटकांत पाठवूं ह्मणतात. ईश्वरावर हवाला आहे. श्रीमंत राजश्री हरिहरराव यांचें लग्न भृगुवारीं अष्टमीस गोधूळ लग्न झालें श्रीमंत राजश्री नाना आले होते. मातबर फार आले होते. सभारंभ चांगलाच जाहला. सविस्तर मागाहून लिहून पाठवूं. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. १९५०

श्री

[२१ दिसेंबर.]

पै॥ छ. १३ जिल्काद सन सीत सबैन पौषमास.

चिरंजीव राजश्री तात्यासाहेब यांसीं प्रती वासुदेव धोंडदेव आशीर्वाद उपरी येथील कुशल तागायत मार्गशीर्ष वद्य १४ पावेतों मुक्काम का॥ साकरी प्रांत बागलाण यथास्थित असे. विशेष. आपण छ. ११ सवालचें पत्र पाठविलें तें छ. २६ सवालीं मुक्काम मजकुरीं पावलें. "प्रस्तुत हैदरखान केंचनगुड घेऊन तेथेंच आहे. बल्लारीचें गांव घेतों व अदवानी व राव सेनापती यांजपाशीं खंडणी मागतो. पुढें

विजापुरास यावें. कोपळास जावें (असा बेत करितो.) हरिहराकडील जमाव सावनूर प्रांतीं आला. नदीस पाणी आलें याजमुळें तोफखाना पलीकडे आहे. पाणी उतरले नंतर तोफा येतील. मग लक्ष्मेश्वराकडे येणार. कोन्हेरराव जिवाजी गोपाळ यांचे विचारें कित्तूरकराचे तालुकेंत आहेत. बाळासाहेबांस (सासवडास) लग्नास पाठविणार " ह्मणून विस्तारें मजकूर लिहिला तो सविस्तर कळला. इकडील वर्तमान तर ताल्यांसुद्धां सार्‍या फौजा एकत्र मिळोन गणतीस तीस हजार फौज लागली. तीन हजार गाडदी आहेत. बारा तोफा आहेत. धौशाही येत आहे शिंदे होळकर व भोंसले हे स्वस्थळींच आहेत. पत्रें वरचेवर येतात जे, आह्मीं लवकरच येतों अशीं त्रिवर्गांचीं पत्रें येतात. श्रीमंत दादासाहेब तापी तीरासच आहेत. त्यांस व यांस तफावत सात आठ गांवची आहे. इंग्रज सुरतेस आले नाहींत. त्रिंबक सूर्याजी सप्तशृंगाकडे येऊन एक किल्ला घेतला. तमाम श्रीत्रिंबकेश्वरापर्यंत प्रांत वोस होत चालिला आहे. गंगापुरास हजार स्वार येथून गेले व पुरंधराहून हजार हशम गाडदी मिळोन पाठविले आहेत. कलकत्याहून इंग्रजाचा वकील आला तो पहावयास येथून जासूद जोडी पाठविली होती. सहा पालख्या व हत्ती बारा व गोरा शंभर रांगडे वगैरे असें सामान आहे. तीस उंट आहेत. दरमजल पुण्यास गेला. येथून बारी नवकोस आहे. धौशा आलेविना पुढें कूच होत नाहीं. राजश्री नारो शंकर यांजपासून

१ कनिष्टबंधु गंगाधरराव यांस. २ हरीपंतफडके यांची फौज सुद्धां. ३ हा दादासाहेबांचा अनुयायी. जातीनें परभू. ४ तेथें कै. नानासाहेब पेशवे यांची बायको गोपिकाबाई रहात होती तिच्या संरक्षणार्थ. ५ कर्नल अप्टन. ६ कोंडाईची बारी. ७ नारोशंकर मयत झाले त्यांच्या मुलांकडे सरदारी कायम करण्यासंबंधें दरबारांतून नजर घेतली.

नजरेचा ऐवज घेतला त्यामध्यें पक्कें पावणेदोनमण सोनें आलें. त्या पैकीं चौरंग एक, कमल एक, संपुष्ट एक येणेंप्रमाणें चारशें तोळे वजन आहे. पुतळीचें सोनें. घडाई नाहीं! दर तोळेस रुपये सव्वापंधरा प्रमाणें चिरंजीव राजश्री राघोबादादानें घेतले. समया तबकें तामनें कोणी कोणी घेतलीं. पैका असल्यास जिन्नसवार दागिना घ्यावयास येतो. बाकीचे दागिने सरकारांतून मोडून शिलेदारांस दिले. दहा लक्ष रुपयांस जिन्नस पडले. हजार स्वार आपण ठेविले थोर गोष्ट केली. आपण किल्ल्यांत असोन बंदोबस्त जो होईल तो करावा. कर्नाटकांतील बातमी चांगली रहावी. कोन्हेरराव यांस वरचेवर पत्रें पाठवावीं. पेशजी महिपतगडाविशीं आपणास लिहिलें होतें त्याप्रमाणें शिवाजीपंतास व दाजीस आपण लिहून या प्रसंगीं पहाडी किल्ला एक जरूर घ्यावा. बल कुबलीस अन्नजोगीं जागा तेवढीच आहे. जरूर मागून घ्यावी. चिरंजीव बाबांचें लग्न जाहलें, आतां पुढें मुलींचीं लग्नें उरकोन घ्यावीं. पुढें कसे दिवस येतात याचा भरंवसा नाहीं. गुदस्तपासून पुण्यास वराता सालमजकूर छ. १३ सवालपर्यंत जाहल्या त्यांचा झाडा पेशजी महादाजीपंत निंबाळकर याजसमागमें पाठविला आहे. पावेल. अलीकडे चार हजार रुपयेची वरात नवी केली आहे. येथून वराता होतात, आपण कसेंही करून ऐवज देतां याजमुळें मोठी पत आपली राहिली आहे. संकटें एकवेळच प्राप्त झालीं आहेत. बातमी वगैरे बंदोबस्ताविशीं फार जपत जावें. येथील बंदोबस्त व एकंदराचें समाधान भाऊंचे आज्ञेप्रमाणें वर्तणूक करीत आहों. सर्वांस निराळे नमस्कार नांवनिशीवार सांगितले. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

---

१ कुरुंदवाडकर २ हरिहरराव बाबांचें.

नं. १६६१ (२३ दिसेंबर)

कुसाजी गोविंद याचें बळवंतरावास पत्र—
पौष शुद्ध १ भृगुवारचें.

" श्रीमंत राजश्री भगवंतराव दहा हजार फौजेनिशीं आले आहेत वाई फार गडबडली आहे. रास्ते झाडून वस्तभावसुद्धां पांडवगडास गेले आहेत. वांकेड वगैरे कुळें होतीं तीं झाडून पळून गेलीं. "

नं. १६६२ (पौष शु० १)
(२३ दिसेंबर.)

मेघश्यामराव यांचें पांडुरंगरावास पत्र २९ सवाल
मंदवारचें. मंगळवेढ्याहून—

भवानराव प्रतिनिधी व भगवंतराव प्रतिनिधी यांजमध्यें कलह लागला आहे. उभयतांनीं जमाव केला आहे. राजश्री भवानराव श्री क्षेत्रांस दशमी रविवारीं आले. चार मुक्काम क्षेत्रीं होते. गुरुवारीं कूच करून शिवणीचे मुक्कामीं सांगोलें नजीक गेलें. पुढें नाझऱ्यांकडे जावयाची बोली आहे. फौज तीन हजारपर्यंत जमा जाली आहे. भगवंतराव पांच हजार फौजेनिशीं कोरेगांवावर आहेत. "

नं. १६६३ श्री. (पौष शु० ४ दिसेंबर २६)

पै॥ छ. ६ जिल्काद सुरू सन सीत सबैन भृगुवार अष्टमी.

सेवेशीं शिवाजी बाबाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ. ३ जिल्काद्र भौमवासरे मुक्काम भिवंडी वर्तमान यथास्थित असे विशेष. आपण पत्रें पाठविलीं तीं पावलीं सविस्तर मजकूर कळला.

१ पंढरपुरास. २ पत्र पांडुरंगरावास,

संतोष झाला. आज्ञे प्रमाणें राजश्री सदाशीवपंत खाडीलकर यांजपासून ऐवज मागून घेतों. लग्न येणार त्यास पालखी द्यावी व उंटाची वगैरे तरतूद करून रवानगी करून द्यावी ह्मणोन आज्ञा, त्यास परस्वाधीन प्रकार. एक श्रीमंत राजश्री नानास अगत्य. त्याणीं तरतूद बरीच करून दिली. काल बेलसरेंचा मुक्काम झाला. हलक्या हलक्या मजली करीत घांटपावेतों जातील. तेथून पुढें लांब मजली करितील. अलीकडे हलक्या मजली करावयाचें कारण राजश्री भगवंतराव प्रतिनिधि यांजकडे राजश्री हणमंतराव गुंडो पाठविले आहेत त्यांजकडून पत्र येई तों हलक्या मजली कराव्या असें सर्वांच्या विचारें ठरलें. पंढरपुरावरून जावें असाहा मनसबा होता, परतु राजश्री भवानराव तिकडे आहेत त्यांजवर राजश्री भगवंतराव यांजकडील तीन हजार फौज तिकडे रवाना जाहली आहे. याजकरितां तिकडे जावें तरी ठीक नाहीं याजकरितां कारकून पाठविला आहे. त्याच्या आंगावरूनच जावें हेंच उत्तम असें नानांच्या विचारें ठरलें. ईश्वरकृपेंकरून सुखरूप पावतील. चिंता नाहीं, राजश्री केसोपंताकडील पाटीलकुलकर्णी आले ते न आले ह्मणोन आज्ञा, ऐशियास हुलीकडील कांहीं गुंता पडला तो उरकून सत्वरच येतों ह्मणून आह्मांस पत्र लिहिलें होतें. आठ चार दिवसांत येतील. इकडील वर्तमान वकील इंग्रजाकडील कलकत्याहून आला तो काल गणेगांव वाघोली येथें आला. दोन दिवसांत जवळ चार कोसांवर येणार पायींचें माणूस शागीर्द पेशा आदी करून दीड हजार माणूस सम्मागमें आहे. मुंबईकर इंग्रजाकडील लिहिलीं पाहिल्यानें गेलीं कीं " राज्याचें खावंद श्रीमंत राजश्री दादासाहेब. त्यांचे पाठीस कारभारी लागले आहेत. राज्यास खावंद नसतां उगेंच मुलाचें निमित्य करून कारभारी याणीं दगा माजविला. याजकरितां श्रीमंत राजश्री दादासाहेब यांचा पक्ष

आह्मीं धरिला. " अशीं पत्रें गुदस्तांपासून गेलीं त्या वरून त्यांस[१] संशय पडून वकील पाठविला. वकिलानें श्रीमंतांस समक्ष पाहिल्यावरी दादासाहेबांचा पक्ष इंग्रजानीं सोडावा असा कलकत्याहून जाबसाल ठरोन वकील आला आहे. वकील आल्याचे पूर्वीं श्रीमंत राजश्री रावसाहेब व कारभारी डेऱ्यास दाखल व्हावे, दहा हजार फौज जमा करावी, येणें प्रमाणें ठरोन काल डेरे करेवर दिले. श्रीमंतानीं निघावें त्यास श्रीमंत मातुश्री गंगाबाईस, शिवों नये याजकरितां काल श्रीमंत डेरा दाखल न जाहले. श्रीमंत राजश्री नाना फडणीस डेरा दाखल जाहले. वृद्ध[२] श्रीमंत निघतील तेव्हां डेरा दाखल होणार. श्रीमंत राजश्री नानाचें मानस जे, " वकील येतो त्या पक्षीं जवळ भेटी समयीं फौजेचा गाहा असावा व मोठे मोठे सरदार असावे. केवळ फौजेवरच मजकूर नाहीं. नांवाचे सरदार जवळ असावे. महिन्या अलीकडे भलता वकीलाचा ठराव होणे तो होईल तों पावेतों (श्रीमंत राजश्री) गंगाधरराव यानीं शंभर स्वारांनिशीं रहावें. दाजीनीं मिरजेस लग्न पोंहचवून दोन तीनशें स्वार घेऊन यावें. श्रीमंत वामनरावबावा परलोकास गेले. तिकडे कोणी गेला नाहीं. बरें तिकडील कारभार भाऊनीं आटपिला आहे. तुह्मीं महिना पंधरा दिवस राहिलां ह्मणजे श्रीमंत खासा डेरा दाखल झाले त्यांजवळ चाकरी केली असें होईल. हें जरूर करावें. ह्मणोन बहुतां प्रकारें घरोब्याचे रीतीनें सांगितलें व सरकारचें बोलणें बोलिलें. तुह्मांकडील उणें पडावें असें बहुतांचे मतें आहे याजकरितां कोणाचे बोलण्यास दरज न चालेसें करावें असें सांगितलें. " श्रीमंत राजश्री दाजीच्याही विचारें रहावें, आपण पोचवावयास[३] जातों ह्मणत होतें. श्रीमंत राजश्री बाळासाहेब यांनीं

१ कलकत्तेकरांस. २ सखारामबापू. ३ लष्करांत.

मानस लग्न सुद्धां मिरजेस जाऊन पोंहचल्यावर येथून वडील आज्ञा करितील त्या प्रमाणें यावयाचें जाहलें तरी येऊं ह्मणोन उत्तर जाहल्याचें नानास समजल्यावरी परम खट्ट जाहले. " अतःपर तुमच्या विचारास येईल तें तुह्मीं करावें. तुमच्या बऱ्यासाठीं आह्मी सांगतों. " ह्मणोन नाना प्रकारें घरोब्याचे रीतीनें बोलिलें. श्रीमंत राजश्री " तात्या येते त्यांस आह्मीं ह्मणतों तरी राहते श्रीमंत खासा खालीं[२] उतरत असतां तुह्मीं नांवाचे सरदार, मायेचे, न राहा त्या पक्षीं आमच्या सांगण्याची सीमा जाहली! " नानांचें बोलणें दाजी व आह्मीं ऐकिलें. श्रीमंत राजश्री बाळासाहेबांची मर्जी ठीक नाहीं. इलाज नाहीं. लग्न पोंहचल्यावरी तरी त्यांची रवानगी करून दिलिया उत्तमच आहे. नाहीं तरी येथील बंदोबस्त करून आपण आला तरी उत्तम आहे. आह्मीं काल श्रीमंत राजश्री नाना डेऱ्यास आल्यावरी गेलों होतों तेव्हां आह्मांजवळ बोलिले कीं, " अतःपर आह्मांस कोणती गोष्ट न पुसावी. आह्मांकडे न यावें. " ह्मणोन बहुतच रागें भरलें. आह्मीं उत्तर प्रतिउत्तर केलें परंतु मर्जीस न आलें. राजश्री लक्ष्मणराव आणि सात आठशें स्वारांनिशीं वाईहून आले. आज येथें येणार. कळें वृत्त आपणास कळावें ह्मणोन विनंती लिहिली आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. १९९४

(पौष श्रु. ९)
(२७ दिसेंबर.)

नारो त्रिंबक पोंक्षे यांचें पांडुरंगरावास पत्र.
जिल्कादचें हणमसागराहून--

१ ज्येष्ठबंधु पांडुरंगराव. २ पुरंदराखालीं. ३ रास्ते,

" मी अमावास्या करून दुसरे दिवशीं निघालों तों इतक्यांत सुरापुरकरांची चार हजार फौज व तीन हजार प्यादे सड्यानिशीं येऊन मार्गशीर्ष वद्य १० स रात्रौं दग्यानें कपाटसंगमाजवळ कृष्णा उतरोन अमीनगड सबंध लुटून टाकिला! साठ सत्तर हजार रुपयांची माल-मालीयत सांपडली. दाणागोटा सर्वांनीं दग्यानें लुटून मागतीं रुपयाविशीं बोलें साठ सत्तर माणसांस वेऊन परवां कूच करून लष्कर माघारें गेलें. कोणी दाता पुसता नाहीं! पेशवाई बुडाली असेंच काटक लोक मानतात त्यामुळें भलताच डोई उचलितो! हैदरखानाकडील वर्तमान तर अदवानीकरांचा सह्रा लाख होनांवर उरकला. बसालतजंगाच्या व त्याच्या भेटी झाल्या. समागमें फौज सुद्धां आहे. कर्नोळकरांचाही तह तीन लक्ष रुपयांवर उरकला. तेथून कूच करून गुत्ती नजीक पांच कोसांवर उतरला आहे. लाख होन खंडणी सेनापतीजवळ मागतो. व भेटीसही बोलावितो. परंतु सेनापतींनीं अद्यापि दम टाकिला नाहीं. "

नं. १९९९ श्री. (पौष शु. ९ दिसेंबर, ३०)

पै॥छ० १२ जिल्काद सन ११७६

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री हरीपंत स्वामींचे सेवेशीं. पोष्य बाळाजी जनार्दन. साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल तागायत छ० ७ जिल्काद पावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. सरकारांत ऐवजाची ओढ याजकरितां सरकारी महाल व सरदारांकडे सरंजामास महाल आहेत तेथील कमाल आकारास दरसद्दे रुपये दहा प्रमाणें दहक व गांवगन्नांचे पाटील कुलकर्णी व चौगुले शेटे महाजन वगैरे यांचा हक्क मुशाहिरा इनामसुद्धां एक साला ऐवज सरकारांत घ्यावयाचा ठराव जाहला आहे. त्यास राजश्री परशुरामपंतभाऊ व

पांडुरंगराव व रघुनाथराव यांजकडील सरंजामाचे महालांचा भरणा जाहला पाहिजे. त्यास येविशींचें पत्र परशुरामपंतभाऊ यांचें पांडुरंगराव यांस आलें ह्मणजे ते ऐवज देतील. याजकरितां मशार निल्हेचें पत्र घेऊन सत्वर पाठवावें. मिरजकरांकडील जाबसालाची वाट सर्व सरंजामी पहातात. यांचा जाबसाल कसा ठरतो त्याप्रमाणें आपण करावा हें बरकड सरदारांचें मानस आहे. भरणा करावयासी मागें पुढें घेतात. रगडून सांगितल्यास मिरजकरानीं ऐवज कोठें दिला आहे ह्मणोन बोलतात! त्यास त्या कामास आघाडी यांची असावी, यांचे दाखले दुसऱ्यास द्यावे, ती गोष्ट होत नाहीं तेव्हां कसें करावें? ऐवजाची ओढ कोणे प्रकारची हें तुह्मांस ठाऊक आहे व त्यांचे ही समजण्यांत आहे. असें असोन दिवसगत लावितात हें उत्तम नाहीं. तरी हल्लीं त्यांस चांगलें समजाऊन व आह्मीं पत्र लिहून पाठविलें आहे हें त्यांस देऊन पत्र घेऊन पाठवून द्यावें. व साल गुदस्त सर्वांपासून जातीचे तैनातेचा ऐवज एक-साला सरकारांत घेतला. पांडुरंगराव व परशुरामपंतभाऊ व रघुनाथराव यांचे जातींचे तैनातेच्या ऐवजाचा भरणा सरकारांत व्हावा. त्यास परशुरामपंतभाऊ यांचे पत्राचा आक्षेप पांडुरंगराव करितात यास्तव त्यांचें पत्र मशारनिल्हेस यावें. येविशीं सरकारचीं व आमचीं पत्रें दोन चार वेळां गेलीं परंतु ऐवज भरण्याविशीं पत्र न आलें. त्यास या ऐवजाचा भरणा करावयाचें पत्र मशारनिल्हेचें पांडुरंगराव यांस घेऊन पाठवून द्यावें. लिहितां लिहितां थकलों. परंतु तुह्मीं त्यांस चांगलें मनांत येई असें सांगाना व त्यांचें पत्र येईना! काम यांचे मुळें बहुत नासतें असें दिसतें. आह्मांस अवघड होतें. असें नसावें. (ते) थोर सरंजामी आहेत. (त्यानीं) आघाडी ध्यावी. हर कोठें याची सोय निघोन

येईल. तूर्त समय रक्षावा. त्यांचेंच आंगेजणी या मनसब्यास आणि आतां न करितां गत्यंतर काय आहे? असें सारे विचार मनांत आणून पत्रें घेऊन पाठवावीं. बहुत काय लिहिणें लोभ असो दीजे हे विनंती.

नं. १९९६ श्री. (३१ दिसेंबर)

पै ॥ छ० १३ जिल्काद सन सति सबैन.

सेवेशीं शिवाजी बाबाशी. कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल तागायत पौष शुद्ध ९ रविवासरे मुक्काम भिवंडी वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपण पत्रें पाठविलीं तीं पावोन लिहिला मजकूर कळला. 'लग्न रवाना झालेंच असेल. येऊन पोंहचेल' ह्मणोन आज्ञा, त्यास सोमवारीं निरेवर लग्न गेलें. पुढें लांब लांब मजली करून जाणार होते. गेले असतील. आज उद्यां सुरक्षीतपणें पावतील. करवीरकरांकडील मजकूर फौज ठेवितात ह्मणोन लिहिलें, त्यास फौज ठेवावी अशी ताकत राहिली नसतां ठेवितात कोणत्या मनसब्यावर कळत नाहीं! या प्रसंगीं जो फौज ठेऊन बळकट होऊन मुलुख मारील त्यास कोणी पुसत नाहीं! तथापि अशाही दिवसांत पुरता अंदेशा करणार, ज्यांची नजर लांब पावेतों, ते जागां स्वस्थ असतात. आपण फौज ठेविल्यास कोण पुसतो ह्मणोन लिहिलें, त्यास आपण श्रीमंतांची बाजू. आपण केल्यास श्रीमंतानींच केलें असें होईल. श्रीमंतांनीं करावें तेंच आपण पायाशुद्ध करितील. 'प्रतिनिधींत कलह वाढला आहे. भगवंतराव सप्तर्षीस[३] वस्त्रें घ्यावयास जाणार ह्मणून वदंता आहे' ह्मणोन लिहिलें, त्यास वस्त्रें प्राप्त कशीं

१ दादासहेबांस पदच्युत करण्याच्या वगैरे कामीं आह्मांस मुख्य बळ पटवर्धनांचें. अंगेजणी = पराक्रम. २ पत्र पांडुरंगरावास. ३ सातार्‍यास.

होतील? तेथील बंदोबस्त उत्तम प्रकारें लेखकाकडील[1] आहे, गुंता पडावयाचा नाहीं. तेथील बंदोबस्त पक्का आहे. सुरापुरकरानें अमीनगड घेतला ह्मणोन लिहिलें तें कळलें. श्रीमंत राजश्री नानास पत्रें दाखविलीं. येथें पांच सहा हजार फौज जमा झाली आहे. कलकत्त्याहून वकील आला तो काल येथें करेवर आला. भेटी आज होणार. भेटी झाल्यानंतर बोलणें चालणें होईल. ठराव होईल तो लिहून पाठवूं ठराव जाहला ह्मणजे हीच फौज पाठवून राजश्री भगवंतराव यांजकडील बंदोबस्त करून फौज पुढें हैदरखान याजवर पाठविणार. हैदरखान पट्टणाकडे फिरला ह्मणोन वर्तमान येथें बोलतात. सत्य मिथ्या नकळे. कित्तूरकराचा तह दोन लाख रुपये सरकारचे व आपल्या सरंजामाचा ऐवज द्यावा येणें प्रमाणें ठराव झाला ह्मणोन राजश्री आपाजी शामजी आह्मांजवळ बोलत होते. खरेंच असेल. आपणाकडे पत्रें येतच असतील. ' सरंजामाचा पैसा येत नाहीं. कर्ज मिळत नाहीं. इजत कशी राहील! तेथें कर्जाची तरतूद करावी ' ह्मणून आज्ञा, त्यास वर्षानें वर्ष कठीण येत आहे. श्रीमंत राजश्री नानांस कर्जा करितां विनंती केली. तूर्त पैसा मिळत नाहीं. पहिल्या ऐवजीं निम्मेशिम्मे[2] आह्मांस द्यावें असेंच त्यांचे ह्मणणें तेव्हां आह्मांस देणें कळतच आहे! लष्करांतून हुंड्या आल्या ह्मणोन बापूजी नाईक यांचें पत्र आलें त्याजवरून राजश्री नारोपंत पोंक्षे यांजकडे पंचवीस हजार रुपये करार केले होते तो ऐवज नाईकाकडे देविला. आणखी ही तरतूद होईल ती करितों. परंतु मिळतां संकटच आहे. राजश्री बैजाबा व त्यांचे बंधु कनिष्ट नातुरास[3] पागा आहे ती पहावयास ह्मणोन गेले आहेत. वकिलाकडील ठराव हाणें तो होईल तों पावेतों तिकडेच राहणार. प्रतिनिधीच्या मनसब्यांत आहेत

१ नानाफडणिसांकडील. २ पुर्वीच्या कर्जापैकीं. ३ पुरंदरे.

इंग्रजांचा वकील.

अशी जनचर्चा आहे परंतु लटकी. खरें भासत नाहीं. राजश्री मोरोबा दादाचे स्त्रीस समाधान नाहीं याजकरितां पुण्यास येणार आहेत. श्रीमंत राजश्री दादासाहेबांकडील व राजश्री हरीपंततात्याकडील अधिक उत्तर लिहावेसें नाहीं. राजश्री सदाशिवपंत खाडीलकर दारूचे रुपये दिले ह्मणतात. कोणाकडे दिले, तसलमात कोणाची, काय मजकूर तो समजावणें ह्मणोन सांगितलें त्यास हिसेब आणून तसलमात कोणाची तें समजावितों ह्मणतात. पुरतें समजून घेऊन लिहितों अथवा ऐवजाची निकड करितों. श्रीमंत राजश्री गंगाधरराव राहिले नाहींत याजकरितां श्रीमंत राजश्री नाना आह्मांवर परम खट्टे. दरबारास गेल्यानें आह्मांशीं बोलत नाहींत. आह्मी फारसें त्यांजकडे जात नाहीं. लग्न सुरक्षितपणें पावलेंच असेल. आपल्या मर्जीस आल्यास त्यांची[1] तरी रवानगी करावी अथवा आपण यावें. प्रसंग आहे. समयास येऊन पावलां असें होईल. पौष मास गेल्यावरी वस्त्रांचाही[2] प्रकार होईल. हा विचार बरा आहे. आपल्या मर्जीस येईल तें खरें. श्रीमंत राजश्री रावसाहेब[3] डेऱ्यास येऊन काल पुन्हां किल्ल्यावर गेले. उभयतां कारभारी केरवर मुक्काम करून आहेत. हुजरात रास्ते व विसाजी कृष्ण वगैरे मिळोन सहा सात हजार फौज आहे. श्रीमंत राजश्री भाऊसाहेबांकडून जासूद आला तो आपणाकडे पाठविला आहे. आह्मांस पत्र नव्हतें. आपल्या पत्रीं सविस्तर असेल. राजश्री शंकराजी घोरपडे जमावसुद्धां राजश्री भगवंतराव याजकडे आले व वळण फार जमा झालें आहे. कलह लवकर तुटावासा दिसत नाहीं. मागाहून होईल वर्तमान तें लिहून पाठवूं. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

१ गंगाधररावांची. २ वामनराव वारल्यामुळें सरदारीचीं वस्त्रें आतां पांडुरंगराव तात्यास मिळावयाचीं त्यांचा. ३ पेशवे.

नं. १६९७ श्रीगणराज.

(पोष वॅ.)
(जाने. प. पंधरवडा.)

अपत्यें साष्टांग नमस्कार विज्ञापना. सरकारांतून सरंजामावर दाहिंजा व जातीच्या तैनाती व हक्क रुसूम व पाटील कुलकर्णी वगैरे यांचा हक्क व मुशाहिरा एक साल सरकारांत द्यावयाचा निक्षून........चे मोबदला ऐवज पाठवून देणेविशीं पत्रें आलीं त्याजवरून वडिलीं आह्मांस पत्र लिहिलें होतें जे, कोणी कारकून पाठवून देणें. त्याजवरून राजश्री गोविंद त्रिंबक लेले यांस पाठविलें होतें. त्यांस वडिलीं सरकारचीं पत्रें दाखविलीं. त्या पत्रांत फिरून जाबसाल करावा ही बाकी ठेविली नाहीं. " हुजूर महाल व किरकोळ सरंजामांचा फडशा करून ऐवज पोत्यास आला. तुमची वाट जाहले खेरीज रास्ते वगैरे सरदार कबूल करीत नाहींत. तुह्मांमुळें हिसका बसला आहे. सरकारांत ऐवजाची निकड भारी. या ऐवजावर सालमजकूरची मसलत मारून नेणार. तुह्मीं मातबर सरदार सर्व भिस्त तुह्मांवर आहे. मसलत सिद्धीस गेले नंतर हा ऐवज पुढें हर कसाही समजून द्यावयास येईल. तूर्त कबूल न कराल ते पक्षीं मसलत बिघडली तर आह्मां तुह्मांवरच पेंच भारी आहे. श्रीमंतांचे प्रारब्धें करून मसलत सिद्धीस गेली तरी श्रीमंतांचे... पडेल जे प्रसंगास कार्यास आहे नाहींत... प्रमाणें सविस्तर मजकूर कितेक वडिलांस लिहिले आहेत. सरकारांतून तीर्थस्वरूप राजश्री भाऊंसही मजकूर लिहून पाठविला होता. त्याचें उत्तर दिलें जे, मिरजेंत तात्या वडील आहेत. त्यांखेरीज कांहीं नाहीं. त्याजवरून वडिलीं ऐवज द्यावयाचा

---

१ शिवराव नीलकंठ याचें रघुनाथराव नीलकंठ यांस किंवा कोन्हेररावास
पत्र. २ पांडुरंगरावानीं.

कबूल करून सरंजामाची वसुली सन आर्बाचा आकार करावयास लाविलें आहे. आह्मांकडील सरंजामाचा आकार करून दाहिज्याचा ऐवज तूर्त पाठवून देणें ह्मणोन आज्ञा केली आहे. आकार करून वडिलांस लिहून पाठवितों. वडिलीं आज्ञा करणें ती करावी. विदित होय हे विज्ञापना.

---

१ आर्बा सबैन मय्या व अलफ. इ. स. १७७३|७४

गतवर्षी करवीरकरांचें व कोन्हेररावाचें युद्ध होऊन पुरंदरास करवीरकरांचे वकील जाऊन तह ठरला होता त्याची तपशील-वार हकीकत मागें आलीच आहे. त्या तहानें करवीरकरांचें समा-धान न झाल्यामुळें यंदां त्यांनीं पुनः दंगा केला. चिकोडी व मनोळी हे त्यांचे तालुके पूर्वीं पेशव्यांनीं घेतले होते व रामचंद्रनाईक

जानेवारी

पराजपे या सावकारापासून कर्ज घेऊन त्याकडे गहाण टाकिले होते. हल्लीं ते तालुके जबरीनें परत घेण्याचा निश्चय करून करवीरकरांनीं चिकोडीवर स्वारी केली व तें ठाणें घेऊन तेथून विरुपाक्ष शामजी, बाबूराव जगजीवन, महादेव शास्त्री व सौंदत्तीकर गोसावी हे गृहस्थ धरून नेलें. तें वर्तमान पुरंदरास जातांच रामचंद्र नाईक यांनीं चिकोडीं परत घेण्यासाठीं कारभाऱ्यांजवळ कुमक मागितली. त्यावरून त्यांनीं रामचंद्र गणेश यास दोन चार हजार फौज व तोफा बरोबर देऊन रामचंद्र नाईक याजबरोबर चिकोडीकडे रवाना केलें. ते दोघे निरेवर येतात तों करवीरकरांनीं आणखी एक जय मिळविला त्यांनीं बंडावा सुरू केल्याचें ऐकून कोन्हेरराव पटवर्धन कित्तूरच्या लगत्यास राहिला होता तो तत्काळ माघारा येऊं लागला. तो तारीख ३१ जानेवारी रोजीं बागेवाडी प्रांत हुकेरी या मुक्कामास जात असतां करवी-रकर सामानगडच्या पायथ्यास होते त्यांनीं येऊन बेधडक गांठ घातली. त्या लढाईंत कोन्हेररावाच्या दोन तोफा व जिवाजी गोपाळ व बळवंतराव बर्गे हे दोन सरदार करवीरकरांनीं पाडाव करून नेले-कोन्हेररावाचा मोड झाला. ही लढाई झाल्यावर कोन्हेररावाच्या कु-मकेस पुरंदराहून रामचंद्र गणेश येत आहे असें पाहून करवीरकरांनीं आपणास अनुकूल होण्याविषयीं भगवंतराव प्रतिनिधीकडे संदर्भ लाविला.

भवानराव प्रतिनिधी माधवराव पेशव्यांच्या मनाप्रमाणें वागत नसल्यामुळें त्यानीं त्याचें· प्रतिनिधीचें पद काढून भगवंतराव प्रतिनिधीस दिलें होतें. ती घालमेल त्या वेळीं सखारामबापूच्या मार्फतीनें झालेली होती. पुढें गंगाबाईची अधिकारावर स्थापना करण्याच्या मसलतींत भवानराव याचा बराच उपयोग झाल्यामुळें कारभाऱ्यानीं त्यास भगवंतरावाच्या जहागिरींत हिस्सा दिला. ती गोष्ट भगवंतरावास न खपल्यामुळें उभयता बंधूंत लढाई सुरू झाली. भगवंतरावानें पंधरा हजार फौज गोळा केल्यामुळें त्याचा जोर विशेष झाला. भवानरावाची फौज सारी पांच सहा हजार असल्यामुळें तो लढाईस उभा राहण्याचे टाळीत होता. त्या मुळें भवानराव पुढें व भगवंतराव पाठीमागें या प्रमाणें या दोन फौजा सातारा व पंढरपूर या प्रांतांत धुमाकूळ घालीत फिरत होत्या. दोन्ही फौजा लुटीवर पोट भरीत असल्यामुळें त्यांच्या पायमल्ली खालीं रयत फार हैराण झाली. हल्लीं भगवंतराव करवीरकरांस मिळणार असें पहातांच भवानराव पटवर्धनांच्या आश्रयास आला. भगवंतरावाचा मुक्काम वारणातीरीं तांदुळवाडीवर होता तेथून त्याचें करवीरकरांशीं बोलणें महिना पंधरा दिवस चाललें होतें. तें बोलणें जमलें नाहीं व लुटीवर सुद्धां पोट भरेनासें झालें तेव्हां भगवंतरावाची फौज त्यास सोडून घरोघर निघून गेली व तो मलकापुरास जाऊन राहिला.

फेब्रुवारी.

इकडे भवानराव, कोन्हेरराव व रामचंद्र गणेश यांची फौज बारा पंधरा हजार पर्यंत जमा झाली होती ती करवीरावर चालून येऊं लागली. तिच्या मुकाबल्यास करवीरकर महाराज व येसाजी शिंदा फौज व तोफा घेऊन मुकाबल्यास आले. वडगांवाजवळ दोंफौजांची गांठ पडून युद्ध झालें. त्या युद्धांत करवीरक-

१ मार्च. रांचा मोड होऊन त्यांचे दोन हत्ती, चार तोफा व पांचशें घोडे पेशव्यांच्या फौजे कडे पाडाव सांपडले. महाराज व शिंदा पळून पन्हाळ्यास गेले. पेशव्यांच्या फौजेस मिरजेहून पांडुरंगराव येऊन मिळाले. युद्ध झाल्यावर तिसरे दिवशीं वडगांवची पेठ जाळून ही फौज कोडोलीस गेली व ते ठाणें घेऊन तिनें करवीरास वेढा घातला. दोन दिवस तोफांचा मारा केल्यावर या फौजेनें शहरावर हल्ला करून आदितवार पेठ घेऊन लुटून फस्त केली. तेथें शंकराचार्य स्वामीचा मठ आहे त्यांत हजारों ब्राह्मण आपापला वित्त विषय घेऊन राहिले होते. लष्करचे पेंढारी मठाच्या आसपास गेल्यावर मठांतून त्यांवर गोळ्या आल्या. तेंच निमित्त करून पेंढाऱ्यांनीं मठांत शिरून दरोबस्त मठ लुटला! हे पेंढारी कोन्हेररावाच्या लष्करापैकीं असल्यामुळें मठ लुटल्याचें अपेश त्या सरदाराच्या माथीं आलें. शहरांत दोन हजार स्वार व तीन चार हजार प्यादे होते त्यामुळें शहर काबीज करण्याचें काम मोठ्या प्रयासाचें होतें. तें लक्षांत घेऊन आंतील ब्राह्मण भेटीस आले त्यांनीं ही त्या श्रीमहालक्ष्मीच्या क्षेत्राचा बचाव करण्याविषयीं प्रार्थना केली तीस मान देऊन कोन्हेरराव, रामचंद्र गणेश व भवानराव हे फौजेचा तळ उठऊन कागलास गेले. तें ठाणें घेतल्यावर भगवंतराव प्रतिनिधी मलकापुराहून कऱ्हाडास गेल्याचें वर्तमान आलें, त्यावरून आपली जहागीर सांभाळण्याकरितां भवानराव निघून गेले. बाकी रामचंद्र गणेश व कोन्हेरराव यांचीच फौज राहिली. तिनें जाऊन चिकोडी, एकसंबें, भोज, खडकलाट इत्यादि ठाणीं घेतलीं. पुण्याहून कृष्णराव पानशे थोड्याशा फौजेसह या दोन सरदारांच्या मदतीस नुकतेच आले होते. ही सर्व फौज वर सांगितलेलीं ठाणीं

घेतल्यावर चिकोडी जवळ जाऊन राहिली.

स. १७७५ च्या अखेरीस हैदरानें बल्लारींचें संस्थान घेतल्याचें मागें लिहिलेंच आहे. तें संस्थान घेतल्यावर मराठ्यांचा सरदार मुराररावं घोरपडे एवढाच एकटा काय तो तुंगभद्रे पलीकडच्या मुलखांत हैदरास जिंकावयाचा राहिला. त्याचें संस्थान घेण्यास ही उत्तम संधी आहे असें पाहून हैदरानें त्याच्या संस्थानावर स्वारी केली व त्यास सांगून पाठविलें कीं, तूं शरण येऊन खंडणी देण्याचें कबूल कर व आमची नोकरी करण्याकरितां आपल्या फौजे सहीत आमच्या लष्करांत हजर हो. असें न करिशील तर तुझें संस्थान घेतों. त्यावर मुराररावानें उत्तर पाठविलें कीं, तूं हल्लीं एवढ्या वैभवास चढला आहेस तरी मूळच्या पांच प्याद्यांवरचा नाईक होतास. किती हीन दशेला पोंचलों असलों तरी मी मराठी साम्राज्याचा सेनापती आहें. तुजपुढें मान वाकविणें हें माझ्या हातून कसें घडेल? तूं खुशाल चालून ये. मी लढाईस तयार आहें. हें उत्तर आल्याबरोबर हैदरानें गुत्तीवर स्वारी केली. मुराररावानें आपली फौज व कुटुंबाचीं माणसें शिवराव घोरपडे याच्या हवालीं करून त्यास मडकशिऱ्यांच्या ठाण्यांत ठेविलें. व आपण निवडक व विश्वासू अशा तीन चार हजार लोकांस गुत्तीच्या किल्ल्यावर

जानेवारी.

राहिला. तेथें हैदरानें येऊन वेढा घातला. मुराररावानें पराकाष्ठेचा पराक्रम करून तीन महिने किल्ला झुजविला. पुणें दरबाराकडून किंवा निजामअल्ली कडून आपणास कुमक येईल ही मुराररावास फार आशा होती. परंतु कोणीकडून ही कुमक आली नाहीं. नानाफडनविसानीं गुत्तीच्या रोखें फौज पाठविण्यासाठीं फार खटपट केली पण ती सारी व्यर्थ झाली.

मुराररावानें हैदराशीं एक दोनदां सल्लयाचा पैगाम लावून पाहिला परंतु सल्ला होण्याचा योग जुळून आला नाहीं. मुराररावानें अशा शौर्यानें लढाई चालविली होती कीं जेणें करून सारा महाराष्ट्र देश त्याची वाहवा करीत राहिला! इतकें ही करून शेवटीं किल्लयावर-चें पाणी संपलें तेव्हां मुराररावास किल्लयासुद्धां शत्रूच्या
मार्च. स्वाधीन व्हावें लागलें. हैदरानें त्यास रुप्याच्या बिड्या घालून कपालदुर्गावर कैदेंत ठेविलें, त्याचा सारा मुलूख काबीज केला व शिवराव घोरपड्यावर छापा घालून त्याची फौज लुटिली व त्यास तुंगभद्रेपार हसकून लाविलें. इतकें झाल्यावर त्यानें मीररेझा व श्रीपतराव शिवमोघे या दोन सरदारांबरोबर सात आठ हजार फौज देऊन त्यांस धारवाड प्रांतीं पाठविलें. ते
मे. बंकापुरास येऊन राहिले.

हरीपंततात्या गुजराथेकडे निघाले तों इंग्रजाशीं तहाचा संदर्भ लागल्यामुळें लढाई बंद झाली. तहाचें बोलणें तीन महिने चाललें होतें तेथपर्यंत हरीपंतांस स्वस्थ बसणें भाग पडलें. मध्यंतरीं दादासाहेबानीं मानाजी फांकड्यास पाठवून नवापुरचें ठाणें जाळविलें व लुटालुट करविली. तेव्हां तिकडील बंदोबस्तासाठीं पटवर्धन, रास्ते, धायगुडे, आपा बळवंत वगैरे पंधरा वीस हजार फौज
जानेवारी. घांटाखालीं दादासाहेबांच्या तोंडावर जाऊन राहिली. बाकी फौजेसह हरीपंत घांटावरच होते. निजामअल्ली-कडून वीसपंचवीस हजार फौज व तोफा घेऊन इब्राहिमखान धौशा आला तो हरीपंतांस येऊन मिळाला. इंग्रजाशीं तह न ठरता तर पुणे दरबारानें मोहीम सुरू करण्याची तजवीज केली होती. परंतु मार्च महिन्यांत पुरंदरचा तह इंग्रजाशीं पक्का ठरला त्यामुळें पुढें मोहीम कर-

ण्याचें कारणच राहिलें नाहीं. दादासाहेबांस कारभाऱ्यांचा विश्वास येईना यामुळें ते सुरतेस राहिले. परंतु इंग्रजांनीं दादासाहेबांस साफ सांगितलें कीं तुह्मांस सुरतेंत राहणें असल, तर फक्त शागीर्द पेशांची दोनसें व इतर थोडे किरकोळ लोक एवढ्यांनिशीं मात्र शहरांत राहूं देऊं. बाकीची तुमची फौज व लवाजमा आहे त्यास फांटा द्यावा. त्याप्रमाणें करून दादासाहेब सुरतेंत जाऊन राहिले तेव्हां त्यांची फौज व सरंजाम हरीपंतास येऊन मिळाला. तो बरोबर घेऊन व धौशास निरोप देऊन व गुजराथच्या जुजवी बंदोबस्तापुरती फौज तिकडे ठेऊन हरीपंत बाकी सर्व फौजेसह जून महिन्यांत परत पुरंदरास आले.

गतवर्षापासून कोळ्यांचा दंगा सुरू झाला होता तो अद्यापि चालूंच होता. कोळ्यानीं कित्येक डोंगरी किल्ले काबीज करून व चोंहोंकडे, लुटालूट करून फारच फैलावा मांडिला होता. तो इतका कीं पुण्यापासून तीन कोसांवरच्या गांवावर त्यानीं खंडणी बद्दल रोखे पाठविले होते! इतकें झालें तेव्हां कारभाऱ्यांस त्यांचें पारिपत्य करणें जरूर झालें. मग त्यानीं त्या कामावर स्वार व पायदळ बरोबर देऊन विसाजी केशव लेले यांस पाठविलें व त्यांच्या मदतीस होळकराचे दिवाण नारो गणेश यांस नेमिलें. त्या दोघांनीं जाऊन कोळ्यांवर हल्ला करून दोन तीनशें लोक ठार मारिले व बाकीच्या लोकांची दाणादाण करून त्यांस पळवून लाविलें. याप्रमाणें झाल्यावर कोळ्यांचें

मार्च. बंड मोडलें व त्यानीं घेतलेले किल्ले पुनः सरकारच्या स्वाधीन झाले.

सखारामबापू व नाना फडनवीस यांस राज्यांतल्या राज्यांत पुष्कळ गुप्त शत्रु होते व त्यांचीं कारस्थानें उभयता कारभाऱ्यांचा नाश करण्यासाठीं

गुप्तपणें चालूच होतीं. त्या पैकीं विष्णु नरहर व खंडेराव निंबाजी यांनीं उभयतां कारभाऱ्यांस कैद करण्याची मसलत केली होती ती उघडकीस आली. तत्काळ कारभाऱ्यांनीं त्या दोघा फितुरी
मार्च. मुत्सद्यांस कैद करून बिड्या घालून डोंगरी किल्ल्यांवर रवाना केलें. तें पहातांच भयभीत होऊन बजाबा पुरंदरे
मे. व मोरोबादादा हे काभाऱ्यांस शरण आले. मोरोबाचें ह्मणणें आपणास राज्यकारभारांत घ्यावें असें होतें, त्यांवर तुमची सहा महिनें पर्यंत वर्तणूक पाहून याचा जबाब सांगूं असें उभयतां कारभाऱ्यानीं उत्तर दिलें.

हरीपंततात्या फौजेसह देशीं आले तेव्हां बरोबर दादासाहेबांकडील फौज व सरदारही त्यानीं आणिले असें वर लिहिलेंच आहे. पुरंदरास दाखल झाल्यावर फौजेंतील तमाम सरदारांच्या व श्रीमंतांच्या भेटी झाल्या त्यांबरोबर दादासाहेबांकडील सरदार मानाजी फांकडे यांची मात्र भेट झाली' ते फक्त नोकरी संबंधानें प्रतिपक्षाकडे होते, एरवीं कोणचाही फितूर अगर दगाफटका त्यानीं केलेला नव्हता. परंतु सखाराम हरी व सदाशिव रामचंद्र हे नारायणरावांचा खून करण्याच्या, निदान त्यांस धरण्याच्या मसलतींत तरी अग्रगण्य होते; याकरितां सर्वांबरोबर श्रीमंतांच्या भेटीचा लाभ या उभयतां फितवेखोरांस कारभाऱ्यानीं होऊं दिला नाहीं. पुढें लवकरच सखाराम हरीनें दादासाहेबांस पत्र पाठविलें कीं, तुह्माकरितां येथें आह्मी फौजेंत फितूर केला आहे व नवी फौजही चाकरीस ठेविली आहे! तें पत्र कारभारी यांच्या हातीं लागल्यावरून त्यानीं सखाराम
आगष्ट. हरीस कैद करून बिड्या घालून किल्ल्यावर रवाना केलें.

हरीपंताच्या फौजेचें देणें दोन वर्षांचें तुंबलें होतें त्याचा निकाल काढण्यासाठीं कारभाऱ्यांच्या खटपटी सुरू होत्या, पण या वर्षाच्या

अखेरीपर्यंत सुद्धांही भानगड मिटावेिणें त्यांच्या हातून झालें नाहीं.

आजपर्यंत कारभाऱ्यांशीं शिंदे होळकर उदासीनपणें वागत होते. परंतु इंग्रजाशीं पुरंदरचा तह ठरलेला ऐकतांच याउपर फटकून वागणें नीट नव्हे असें त्यांचें त्यांसच वाटूं लागलें, व ते थोडथोडी फौज बरोबर घेऊन देशीं आले. त्यांच्या व श्रीमंतांच्या भेटी होऊन
जून. कारभाऱ्यांशीं पुढील मसलतीं संबंधें खलबतें झालीं व
आगष्ट. श्रीमंतांच्या पायांशीं एकनिष्टपणें वागूं असें त्यानीं इमानप्रमाणही दिलें. परंतु मसलतीचें ओझें शिरावर घेऊन सरकारचें कांहीं काम करून दाखवावें इकडे त्यांच्या मनाचा कल दिसून आला नाहीं ते कारभाऱ्यांजवळ नानाप्रकारच्या मागण्या करूं लागले व त्या त्यानीं मान्य करण्याचें नाकारल्यामुळें त्यांवर रुसवा करून बसले.

धारेस बाळंतपणासाठीं आनंदीबाई राहिली होती, ती फौज चाकरीस ठेऊन दंगा करूं लागली तेव्हां तिच्या बंदोबस्ताकरितां कारभाऱ्यानीं फौज पाठविली, तिनें जाऊन धारेस वेढा घातला. त्या बाईनें पुष्कळ महिने पर्यंत लढाई केली. शेवटीं तिचा उपाय थकला तेव्हां ती फौजे-
दिसेंबर. च्या स्वाधीन झाली. तिला आणून देशीं ठेवावें तर ती श्रीमंतांच्या जिवास अपाय करील या भयानें कारभाऱ्यानीं तिला नर्मदातीरीं मंडलेश्वर येथें बंदोबस्तानें ठेविलें.

पूर्वीं तोतयास मिरजेंतून काढून रत्नागिरीस पाठविण्यांत आलें होते. रत्नागिरीचा सुभा रामचंद्र नाईक पराजपे या सावकाराकडे होता, व त्याची स्त्री, भाऊ व मुलगा हीं तेथेंच होतीं, रामचंद्र नाइकाकडून इशारा गेल्यावरून त्याच्या कुटुंबांतल्या माणसानीं तोतयास
एप्रिल. मुक्त केलें व त्याच्या नांवाची द्वाही फिरविली.

सदाशिवराव भाऊसाहेबांसच तोतया ठरवून माजी पेशव्यांनीं व हल्लींच्या कारभाऱ्यानीं लबाडीनें कैदेंत टाकिलें होतें, तेच आतां मुक्त होऊन पूर्वीप्रमाणें राज्यकाभार पाहूं लागले असें वर्तमान चोंहींकडे प्रसिद्ध होऊन त्या तोतयास हजारों अनुयायी मिळाले व त्यानें फौज चाकरीस ठेऊन कोकणप्रांत काबीज करण्याची झपाट्यानें सुरुवात केली. विजयदुर्ग व देवगड हे किल्ले त्याच्या स्वाधीन झाले.

जून. पेशवे सरकारचें आरमार धुळप या सरदाराच्या ताब्यांत होतें त्यानें तें निमूटपणें तोतयाच्या हवालीं केलें. नंतर तोतयानें अंजनवेल व गोवळकोट हे किल्ले घेतले. त्याच्या पारिपत्याकरितां कारभाऱ्यानीं हजार दोन हजार गारदी व आरब एका परभू सरदाराच्या हाताखालीं देऊन पाठविले. ते अंजनवेळीच्या आसपास पोंचून आतां लढाईस सुरुवात व्हावी तों आयत्या वेळीं ते गारदी कोकणचे राहणारे असल्यामुळें तोतयानें फितवून आपणाकडे वळवून नेले! असें झालें तेव्हां तो

जुलई. परभू सरदार व त्याचे आरब मारामार करीत निसटून घांट चढून प्रतापगडच्या आसऱ्यास आले. नंतर तोतयानें सुवर्णदुर्गावर स्वारी केली. तो किल्ला हरीपंत फडक्यांच्या पुतण्याच्या हवालीं होता व सुवर्णदुर्ग तालुक्याची मामलत बचाजीपंत बर्वे याजकडे होती. तोतयानें तो किल्ला घेऊन त्या दोघांही अमलदारांस कैदेंत टाकिलें. त्याच्या फौजेपैकीं एका टोळीनें देवरुखचें ठाणें घेऊन आंबाघांट चढून मलकापुरांत ठाणें बसविलें. इकडे तोतयानें उत्तरकोक-

सप्टेंबर. णावर स्वारी करून तो सर्व मुलूख घेतला. त्या प्रांतीं माणकर व सुर्वे वगैरे पेशवे सरकारच्या पायदळावरचे सरदार होते ते तोतयास जाऊन भेटले. पटवर्धन सरदारांपैकीं हरीभास्कर उर्फ हरबाआण्णा व इचलकरंजीचे व्यंकटराव घोरपडे व दुसरे कित्येक

वजनदार लोक त्यास यापूर्वीच मिळाले होते. मुंबईचे इंग्रज, करवीरकर व हैदरअल्ली या सर्वांकडून त्यास उत्तेजन मिळालें होतें.
अक्टोबर. त्याजवळ वीस हजार फौज जमा झाल्यामुळें धैर्य येऊन त्यानें बोरघांट चढून राजमाची घेतली व सिंहगडचा किल्लेदार त्यास अनुकूळ होण्याचा रंग दिसूं लागला.

इतकें झालें तेव्हां तोतयाच्या बंदोबस्ताचें काम हातीं घेणें
अक्टोबर. कारभाऱ्यांस भाग पडलें. त्यानीं कांहीं पायबळ व तोफा देऊन भिवराव पानशे यांस त्या कामावर पाठविलें व शिंदे होळकरांस पानशांची कुमक करण्यास सांगितलें. त्या सरदारांपैकीं नानाफडनवीस यांस महादजी शिंदे अधिक अनुकूळ होते. नानानीं सांगतांच शिंद्यानीं या मोहिमेचा सर्व भार खुषीनें शिरावर घेतला. होळकरानीं ही थोडाबहुत हातभार लाविला पण तो मनापासून नव्हता. महादजी शिंद्यानीं सिंहगडाखालीं तोतयाकडील आरबांची चौकी होती ती मोडून पुष्कळ आरब मारिले व बाकीचे उधळून लाविले. नंतर सिंहगडच्या किल्लेदारास वठणीस आणण्याचें काम होळकरावर सोंपवून ते बोरघांटाकडे वळले. तिकडे ते जाण्यापूर्वीच भिवराव पानशानीं तोतयाशीं दोन तीन लढाया मारून त्यास मागें सारिलेंच होतें. इतक्यांत महादजी शिंदे आले त्यानीं राजमाचीच्या पायथ्यास तोतयाचा गोट
२७ अक्टोबर. होता त्यावर हल्ला करून व शेंकडों लोक मारून दाणादाण उडविली. तोतयाचे लोक सैरावैरा पळत सुटले तेव्हां तो दोन तीनशें लोकांनिशीं कोंकणांत पळून गेला. त्याच्या पाठलागास शिंद्याचा दिवाण बाळाराव गोविंद हा फौजेसह तत्काळ निघून तोतयाचा माग काढीत चालला.

इकडे तोतया बेलापुरास येऊन गलबतांत बसून मुंबईस इंग्रजांच्या

आश्रयास जाण्यासाठीं निघाला. राघोजी आंग्रे यांस ती बातमी आगाऊ कळल्यामुळें ते टपणीवर होतेच. त्यानीं जाऊन तोतयाचें गलबत धरिलें तेव्हां तो व त्याचे अनुयायी अर्थातच आंग्रे याच्या हवालीं
१ नोवेंबर. झाले. माझी पुनः चौकशी झाल्या खेरीज मला शिक्षा होऊं नये असें तोतयानें आंग्रे या पासून वचन घेतलें. त्या बरोबर व्यंकटराव घोरपडे व हरबा अण्णा हे होते त्यांस आंग्रे यानीं सोडून दिलें व बाकीचें लोकांसह तोतयास घेऊन ते पुण्यास येण्यास निघालें. तों महादजी शिंदे त्यांस वाटेंत मिळाले. नंतर उभयतां तोतयास घेऊन पुण्यास आले.

नंतर तोतयाची चौकशी सुरू झाली तींत रामशास्त्री, गोपीनाथ दीक्षित, हरीपंत फडके, बाबूजी नाईक बारामतीकर वगैरे पंच होते. सर्वानुमतें तोतया खोटा असें ठरल्यावर त्याची धिंड काढून
१८दिसेंबर. शहरांत सर्व लोकांस दाखवून नंतर मेखसूनें डोचकें फोडून त्यास देहांत शासन देण्यांत आलें. तोतयाचा संसर्ग हजारों ब्राह्मणांस झाला होता त्यांस सरकारांतून प्रायश्चित्तें देण्यांत आलीं. जे लोक या फितुरांत होते त्यांचे सरंजाम जप्त झाले! कोणास दंड व कोणास कैद याप्रमाणें शिक्षा झाल्या. तोतयाचें बंड मोडल्यावर सरकारच्या फौजेच्या टोळ्या निरनिराळ्या घांटानीं कोकणांत उतरून त्यानीं महिन्या दोन महिन्यांत पुनः सर्वत्र अंमल बसविला.

मराठ्यांशीं तह झाला त्यांत दादासाहेबांस इंग्रजानीं आश्रय देऊं नये असें कलम होतें, परंतु आपण करभाऱ्यांच्या हातीं सांपडलों तर ते आपला जीव घेतील असा दादासाहेबानीं बहाणा केल्यावरून इंग्रजानीं त्यांस फक्त दोनशें लोकांनिशीं सुरतेंत ठेवून घेतलें. तेथें स्वस्थ राहून चैन पडेना, सबब तापीतीरीं अश्विनिकुमार येथें स्नानास जातों असें मिष

करून ते बाहेर पडून फिरत फिरत दवण्याच्या आसऱ्यास आले. दवणें या स्थळास हल्लीं दमाण असें ह्मणतात. तो मुलूख पोर्च्यु-
सप्टेंबर. गीज लोकांचा. तेथील अधिकाऱ्यामार्फत श्रीमंतांनीं गोंव्याच्या गव्हर्नराशीं बोलणें लाविलें कीं आपणास तुमच्या मुलखांत राहण्यास जागा द्यावी, नाहीं तर जळमार्गें हैदरअल्लीकडे पोंचतें करून द्यावें. ती बातमी कारभाऱ्यांस कळतांच त्यानीं पोर्च्युगीज लोकांचा पुण्यास वकील होता त्यास बेलावून आणून तंबी दिली. त्यावरून गोंव्याच्या गव्हर्नरानें दादासाहेबांस साफ सांगितलें कीं, तुह्मास पाहिजे असेल तर फक्त पंचवीस माणसांनिशीं दवण्याच्या किल्यांत येऊन रहावें. तुह्मास जळमार्गें हैदरअल्लीकडे पोचाविणें आपले हातून होत नाहीं! तेव्हां निराश होऊन श्रीमंत मुंबईस येऊन राहिले. त्यांचे दत्तकपुत्र अमृतराव हे दोन तीन हजार फौज व लवाजमा व तोफा असा सरंजाम घेऊन तारापुरच्या ठाण्यांत राहिले. त्यांची उपेक्षा करणें धोक्याचें असल्यामुळें त्यांच्या बंदोबस्तास कारभाऱ्यांनीं भिवराव पानशे यांची
डिसेंबर. रवानगी केली. तों ते जाऊन पोंचण्यापूर्वींच अमृतरावानीं पलायन करून मुंबई गांठली होती. त्यांची फौज व तोफा वैगेरे सामान तारापुरच्या ठाण्यांत होतें तें भिवरावानीं तारापुरास वेढा घालून स्वाधीन करून घेतलें.

गुजराथच्या स्वारीचें काम आटपल्यावर फौजेसह हरीपंततात्या परत आले तेव्हां पटवर्धनांची फौज घेऊन परशुरामभाऊ परत घरीं आले. पटवर्धनांत मिरजेचें घराणें मुख्य असून त्याच्याच नांवें मुख्य सरदारीच्या सनदा होत असत. त्या घराण्यांतले गोपाळराव व वामनराव हे वडीलबंधु वारल्यावर पांडुरंगराव यांचे नांवें सरदारीचीं वस्त्रें झालेलीं होतीं. तासगांव व कुरुंदवाड येथील घराणीं पोट हिस्सेदार होतीं. मिरजेच्या घराण्यानें चार

हजार स्वार बाळगावें, तासगांवच्या व कुरुंदवाडच्या घराण्यानीं अनुक्रमें अडीच हजार व पंधराशें स्वार बाळगून मिरजेच्या घराण्याच्या हाताखालीं सरदारीचें काम करावें असा करार असून त्यास अनसरून दरस्वांरास तीनशें रुपये दरसाल धरून आठ हजार स्वांरांच्या बेगमीचा मुलूख पेशवे सरकारांतून पटवर्धनांस जहागीर मिळाला होता. आतां पटवर्धनांत परशुराम भाऊं इतका शूर व अनुभवी सरदार दुसरा न राहिल्यामुळें तेच गुजराथच्या स्वारींत पांडुरंगरावाच्या तर्फेनें मुख्य सरदारी करीत होते. त्या स्वारींत पुष्कळ कर्ज झालें त्याबद्दल घरीं आल्यावर परशुरामभाऊ व पांडुरंगराव यांत तंटा झाला. पांडुरंगरावाचें ह्मणणें कीं तुह्मी सरदारीस पोटहिस्सेदार आहां त्या अर्थीं स्वारी संबंधें अधिक उणा खर्च

आगष्ट.

होऊन कर्ज होतें त्याचा ही हिस्सा तुह्मी ध्यावा. परशुरामभाऊंचें ह्मणणें कीं सर्व फौज आमच्या हाताखालीं असल्ये तथापि काटकसरीनें जपूनच आह्मी खर्च करीत असतों. अधिक खर्च होऊन कर्ज होतें त्याची मुख्य सरदारी तुमची असल्यामुळें तुह्माकडे आहे. तुह्मी आज्ञा कराल त्याप्रमाणें सरकारची चाकरी बजावून दाखवावी एवढेंच आमचें काम आहे. कर्जास आह्मी अगर रघुनाथराव कुरुंदवाडकर जबाबदार नाहीं. आजपर्यंत अशीच वहिवाट चालत आली त्या प्रमाणें पुढें ही चालावी. पांडुरंगरावास हें बोलणें मान्य झालें नाहीं. त्यानीं सांगितलें कीं याउपर आमची सरदारी आह्मीच करीत जाऊं. तुह्मी व रघुनाथराव यानीं निराळी चाकरी करावी. तें बोलणें भाऊनीं व रघुनाथरावानीं मान्य केलें. नंतर पांडुरंगरावानीं पुण्यास कारभाऱ्यांकडे लिहून पाठविलें कीं, सरकारांतून हैदरअल्लीच्या बंदोबस्तास हरीपंततात्यांची रवानगी होत आहे व मोंगल ही या मसलतीवर रुजू होण्याचें ठरलें आहे ते उभयतां कर्नाटकांत फौजेसह जात पर्यंत उशीर लागेल. हैदरअल्लीचे सरदार श्रीपतराव शिव-

मोंघे हे सात आठ हजार फौजेसह धारवाडप्रांतीं येऊन लुटालूट करीत आहेत. त्यानीं आमच्या जहागिरीपैकीं बहुतेक ठाणीं घेतलीं व सरकारचा मुलूखही काबीज केला. त्यांची उपेक्षा करावी तर ते धारवाड घेतील. या करितां आह्मी फौजेसह त्या प्रांतीं जातों. करवीरकरांच्या बंदोबस्ताकरितां कोन्हेरराव पटवर्धन, कृष्णराव पानशे व रामचंद्र गणेश हे चिकोडीस आहेत त्यांत रामचंद्र गणेश यांचें बाकीच्या दोघा सरदारांशीं बनत नाहीं. या करितां त्यांस परत बोलावून न्यावें व कोन्हेरराव व कृष्णराव यांस आह्माबरोबर द्यावें. त्यांच्या जागयावर चिकोडीस परशुरामभाऊ व रघुनाथराव हे राहतील. तें बोलणें कारभाऱ्यानीं मान्य करून कोन्हे-

अक्टोबर. रराव व कृष्णराव यांस घेऊन पांडुरंगरावांस कर्नाटकांत जाण्याचा हुकूम केला व परशुरामभाऊ व रघुनाथराव यांस चिक्रोडीस पाठविलें. त्यांजवळ फौज थोडी होती या करितां त्यांच्या मदतीस आनंदराव रास्ते व बाजीपंत अण्णा यांची रवानगी केली. बाजीपंत अण्णा त्या वेळीं तोतयाचें बंड मोडण्याच्या कामीं कोकणांत गुंतले होते. ते कारभाऱ्यांचा हुकूम येतांच परशुरामभाऊंस मिळण्याकरितां चिकोडीकडे येऊं लागले. ते आंबाघांट चढल्यावर एके मुक्कामीं करवीरकर येसाजी शिंदे यानें येऊन त्यांवर छापा घातला. परंतु बाजीपंत

दिसेंबर. सावध होते त्यामुळें त्यानीं शिंद्याचा पूर्ण पराजय करून त्यास पिटून लाविलें.

इकडे पांडुरंगराव, कोन्हेरराव व कृष्णराव पानशे स्वारीस गेले होते ते धारवाडच्या सुमारें जातांच त्यांस शिवराव घोरपडे गुत्तीकर व दौलतराव घोरपडे गजेंद्रगडकर हे येऊन मिळाले. एकंदर फौजेचा जमाव दहाहजार पर्यंत असून पांडुरंगराव मुख्य सरदार होते. त्यांस लष्करी कामाचा अनुभव नव्हता ह्मणून ते प्रायः कोन्हेरराव व शिवराव

दिसेंबर. यांच्या सल्याप्रमाणें वागत, या फौजेनें लक्ष्मेश्वर, बेटगिरी, मिश्रीकोट, कलघटगी, नवी व जुनी हुबळी हीं ठाणीं घेतलीं. ती फौज पुढें येत चाललीसें पाहून श्रीपतराव शिवमोघे मागें सरून बंकापुरास तळ देऊन राहिला. तेथून त्यानें कुमक पाठविण्याविषयीं हैदरास पत्रें लिहिलीं. त्यावरून त्यानें महमदअल्ली कुमदान थास सात आठ हजार कवाइती पायदळ व तोफा बरोबर देऊन श्रीपतरावाच्या कुमकेकरितां बंकापुरास पाठविलें. शिवाय दादासाहेबांचे सरदार बाजी गोविंद बर्वे व आबाजी महादेव हे दोन तीन हजार मराठी फौजेसह कुमदानास मिळाले होते. अशी ती मोठी फौज जमली तेव्हां तिशीं टक्कर देऊन आपला निभाव लागणार नाहींसें पाहून पांडुरंगरावानीं हरीपंततात्यांची त्वरेनें आपणाकडे रवानगी करण्याविषयीं पुण्यांस कारभाऱ्यांकडे वारंवार निकडीचीं पत्रें पाठविलीं.

नं. १७९८ (१ जानेवारी.)

भिवराव गोपाळ यांचें पांडुरंगरावास पत्र पौष शुद्ध १२ चें.

" हैदरखान कर्नोळ प्रांतीं आहे. कर्नोळकरांचा सल्ला झाला. निशा जाल्यावर गुत्तीस येणार. घोरपडे यांचा अद्यापि तह नाहीं. हैदरखानाचे कागदपत्रही सेनापतीस गेले आहेत. त्यांतील मजकूर कैलासवासी त्रिंबकराव मामा यांणीं लढाईत तोफा घेतल्या आहेत त्या द्याव्या व अलीकडील ठाणीं घेतलीं आहेत तीं द्यावीं. शिवाय घासदाणा द्यावा सेनापती लढाईचा निश्चय करून गुत्तीचा बंदोबस्त करून स्वस्थ बसले आहेत. "

नं. १७९९ (पौष व० २ जानेवारी ७)

श्री

पै॥ छ० २३ जिल्काद सन सीत सबैन. पौषमास.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
पांडुरंगराव गोविंद स्वामी गोसावी यांसीं.

पोष्य माधवराव नारायण प्रधान नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहिणें. विशेष सालमजकुरीं साऱ्या प्रांतांत कमाल जमेवर रयत निसबत दरसदे दहा रुपये व पाटील कुलकर्णी शेटे महाजन वगैरे यांचा बदल मुशाहिरा इनाम सुद्धां व वाणी उदमी यांजपासून कांहीं ऐवज या प्रमाणें एक साला सरकारांत घ्यावयाचा करार केला; त्याप्रमाणें सरकारचे महालीं तमाम वसूल जाहला. सरंजामी यांचे ही महालचा फडशा कांहीं जाहला. तुह्मांकडील महालांचा सदरहू ऐवज लिहिल्याप्रमाणें ऐवज येणें व जातीचे तैनातीचा ऐवज सालगुदस्त घ्यावयचा लिहिलेप्रमाणें व जातीची तैनात इतका ऐवज येणें. त्याची तरतूद करून

लौकर पाठविणें. या प्रसंगीं तुह्मीं दिवसगतीवर घालूं नये. राजश्री परशुराम रामचंद्र यांचा उजूर करीत असाल तर मशारनिल्हेस येथून लिहिलें होतें त्याचें उत्तर त्यांनीं लिहिलें कीं, ' घरीं पांडुरंगराव आहेत त्यांस आज्ञा करणें ती करावी. ते करितील तें आपणास मान्य आहे. असें पत्र आलें तेव्हां त्यांचा उजूर नाहीं. तर दहकाचा व पाटील कुलकर्णी यांचा वगैरे व जातीचे तैनातीचा ऐवज सदरीं लिहिले प्रमाणें लौकर पाठवून देणें. जाणिजे छ० १५ जिल्काद सुरु सन सीत सबैन मया व अल्लफ. बहुत काय लिहिणें हे विनंती.

...

नं. १७६० (पौष शु० १४)
(४ जानेवारी)

मेघःशामराव यांचें पांडुरंगरावास पत्र १२ जिल्कादचें.

" भगवंतराव प्रतिनिधी सातारा वाई येथून जबरदस्तीनें खंडण्या घेऊन कातरखटावावर आले. त्या फौजेची एक टोळी कांसेगांवावर यावया भाळवणीवर आली आहे. मंगळवेढे प्रांत बेचिराख करावा असा त्याचा बेत आहे. खासा भगवंतराव आठपाडीवर आहे. "

नं. १७६१ श्री
(७ जानेवारी.)

पै॥ छ० १९ जिल्काद सुरु सन सीत सबैन मया व अलफ.

सेवेशीं जिवाजी बाबाजी कृतानेक साष्टांग नमस्कार. विनंती येथील कुशल तागायत पौष वद्य द्वितीया भानुवासरे मुक्काम भिवंडी वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपण आपाजी जासुदाबरोबर पत्रें पाठविलीं

१ पत्र पांडुरंगरावास.

तीं पावोन सविस्तर मजकूर कळला. इकडील वर्तमान तर इंग्रजाकडील वकीलांच्या भेटी जाहल्यानंतर दोन तीन दिवस एक सतत खलबतें जाहलीं. त्यांतील मुख्य भाव इंग्रजाचा मुख्य आहे त्याचीं पत्रें येथें आलीं आहेत कीं, " ज्यांस पाठविले आहेत हे अखत्यारी पाठविले आहेत. हे करितील तें मुंबई व सुरत व चेनापट्टण मच्छलीबंदर आदीकरून ठिकाणच्या इंग्रजांस मान्य. सलुख करितील त्या प्रमाणें चालेल. कोणेविशीं गुंता पडणार नाहीं. " ह्मणोन बहुत तऱ्हेनें खातरजमा पटावी अशीं पत्रें लिहिलीं आहेत. श्रीमंतांस जवाहीर वगैरे पाठविलें आहे. यांचे रवानगी समयींच मुंबईस व सुरतेस व चेनापट्टण व मच्छलीबंदरवाले यांस पत्रें त्यानीं पाठविलीं कीं, " वकील पुरंदरास जातात तों तुह्मीं आपला अखत्यारी वकिलाजवळ पाठवणें. ते तह करून देतील त्या प्रमाणें वर्तणूक करणें. " अशीं पत्रें गेलीं आहेत. वकील आल्यावरी पत्रें गेलीं त्यास मुंबईवाले चार दिवसांत येणार. सुरतवाले वगैरे आठ पंधरा दिवसांत येतील. सारांश त्यावाचा भाव श्रीमंत राजश्री दादासाहेब राज्याचे खावंद असतां तुह्मीं कारभारी याणीं त्यांस बाहेर घातलें याजकरितां आह्मांस पुस्तपन्हा करावा लागला. राज्यास अधिकारी जाहले हें वर्तमान ठाऊक नाहीं. ठाऊक जाहल्यावरी खरें लटकें पाहून खरें असल्यास पक्का सलुख करून देतों. येणें प्रमाणें बोलणें. यानीं उत्तर केलें कीं राज्यास अधिकारी जाहल्याचें वर्तमान मुंबईवाल्यांस कळलें असतां त्यानीं असें केलें! मुख्यास कळेल तसें प्रमाण! तेव्हां मुंबईवाल्यास सखारामपंतीहून आह्मीं श्रीमंतांकरितां पेशवाईचीं वस्त्रें घेऊन आल्यावर पत्रें पाठविलीं होतीं त्यांचीं उत्तरें मुंबईहून आलीं आहेत. असें याणीं सांगितल्यावरी ते वकील बोलिले कीं, पत्र कोठें आहे तें काढावें, ह्मणजे त्यांस काईल करूं. व त्यानीं मुख्य

१ मद्रास.

स्थळीं राज्यास खावंद दादासाहेब, दुसरा नाहीं, असें लिहिलें याजकरितां पत्र काढावें ह्मणतात. यांचें पत्र गैर विल्हेस पडलें. सांपडत नाहीं. रुमाल पाहतात. सलुखाचा भाव– " कसेंही असो. आह्मीं त्यांचा पक्ष धरिला. वाजवी असो अथवा गैर वाजवी असो, परंतु आह्मीं सावकार. आह्मीं नफा तोटा पाहतों. त्यास दादासाहेबांबरोबर फिरल्यास त्याजकडून पावलें तें वजा करून बाकी ऐवज व साष्टीमुळें लागला ऐवज तो द्यावा, साष्टी घ्यावी. ऐवज ठरेल तो द्यावयास अनुकूल नसल्यास सुरत अठ्ठाविसी परगणे श्रीमंतानीं पंधरा लक्षांचे महाल दिले आहेत ते ऐवज फिटे तों पावेतों ठेवावे. ऐवज फिटल्यावर महाल हवालीं करूं. नाहीं तरी ऐवजाचा निकाल झाल्यास उत्तमच आहे. माजी श्रीमंतानीं किल्ले व जहागीर श्रीमंत राजश्री दादासाहेबांस दिली होती त्याप्रमाणें तुमच्या विचारास आल्यास द्यावी. आह्मीं जामीन राहून त्यांस वर्तवूं. ती गोष्ट तुमच्या चित्तांत करावयाची नसल्यास आमचा आग्रह नाहीं. त्यांस आसरा कोणत्या बंदरास देऊं नये येणे प्रमाणें बंदोबस्त करूं. " अशा मोठ्या मोठ्या गोष्टी बोलतात! आठ पंधरा दिवसांत ठराव होणें तो होईल. श्रीमंत राजश्री रावसाहेब खासा आज दोन प्रहरीं किल्ल्यावरून निघाले, तृतीय प्रहरीं डेरा दाखल होणार. वकिलास मेजवानी होईल. इंग्रज वकिलानीं श्रीमंतांस नजर जवाहीर वगैरे आणिलें आहे तें नजर करून खातरजमा करून घेतील. अशा प्रसंगांत आपण अथवा श्रीमंत राजश्री गंगाधरराव यानीं पांचशें स्वारांनिशीं समीप असावें हा उत्तम प्रकार. कालदेश वर्तमान एक प्रकारचा. पौष मास गेल्यावर वस्त्रें घ्यावीं हें मनसबियाच्या रीतीस उत्तम दिसतें ह्मणून आह्मीं लिहितों. यांत खावंदाची मर्जी! श्रीमंत राजश्री बाळासाहेबांस

१ वामनराव वारल्यामुळें पांडुरंगरावास सरदारीचीं वस्त्रें नवीन मिळावयाचीं तीं.

येथें ठेऊन आपण यावयाचें करावें. राजश्री हरीपंततात्याकडून पत्रें आलीं. " खर्चाची मोठी ओढ. मनसबा तोंडास आला असतां जुमस[1] खाल्ला तरी आमचा इलाज नाहीं. श्रीमंतांस व आपल्या फौजांस अंतर फार नाहीं. कित्येक लोकांचीं राजकारणें श्रीमंताकडे आहेत. खर्चास नाहीं हें ध्यानास आणून तिकडे सूत्र बळावितील. आठ नऊ रोजमुरे तटले आहेत. कसें ही करून ऐवज पाठवावा. नाहीं तरी आह्मांस शब्द मग ठेवाल तरी न ठेवावा. " ह्मणोन हरीपंतानीं स्पष्ट लिहिलें. तीं पत्रेंच आह्मीं पाठविलीं. " होळकर शिंदे बाहेर निघाले, इकडे येणार, अतःपर गुंता नाहीं, " ह्मणोन राजश्री नारो शिवदेव शिद्याकडे गेले आहेत त्याचीं पत्रें आलीं. झांसीकडे उभयतां सरदारांनीं कांहीं फौज पाठविली. इंग्रजाकडील तहावर साऱ्यांचीं लक्षें आहेत. कोळ्यानीं आंवढ्यास[2] माळ लाविली होती परंतु मारून काढले. कोळ्यांनीं फारच गडबड मांडली आहे. तिकडे गाडदी व कांहीं फौज गेली आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. १७६२ श्री (पौष व० ३)
(८ जानेवारी.)

पै॥ छ. २३ जिल्काद सन सीत सबैन पौषमास.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री पांडुरंगराव
स्वामीचे सेवेशीं.

पोष्य बाळाजी[3] जनार्दन. साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय लिहीत जावें. विशेष. जमीदारांचा हक्क रुसूम इनाम एकसाला सरकारांत घ्यावयाचा करार ठरला त्याप्रमाणें सरकारी

---

१ जुमस खाणें = धीर खचणें. २ आंवढा हें किल्याचें नांव. ३ नाना फडनवीस.

महाल व सरंजामी सरकाराकडील महालांचा ऐवज बहुत करून आला. तुह्मांकडील फडशा होईना याकरितां रास्ते वगैरे एक दोन तुह्मांकरितां राहिले. तुह्मीं कैलासवासी वामनरावबाबा यांचे पत्राचा आक्षेप केला, त्याणीं पत्र ऐवज देण्याविषयीं पाठविलें, अद्याप तुह्मांकडून महालचे जमीदाराचा ऐवज आला नाहीं! सर्वांनीं फडशे वैशाख जेष्टांत केले तुह्मांकडील राजश्री शिवाजीपंत याणीं श्रावण मासीं कमावीसदार आणून फडशा करून देऊं असें बोलले असतां अमलांत न आलें. त्याणीं याद दाखविली त्यांत कर्नाटकचे महालांचें हैदराचे पेंचामुळें वगैरे घेतां नये ह्मणोन सांगितलें, त्यास हैदराचा पेंच श्रावण पावेतों कोठें होता! व ऐवज परभारा जमीनदारांपासून घ्यावयाचा. कांहीं तुमची नुकसान नसतां दिकती खालीं घालून टाळिलें, यामुळें सर्वांनीं दिलें त्यांस एकप्रकार[1] वाटतें. व जातीचे तैनातीची बेरीज सर्वांनीं एक साला द्यावी तो ऐवज तुह्मांकडील आला नाहीं. राजश्री सखारामपंत व महादाजी नीलकंठ वगैरे याणीं दिले. रास्ते व नारो शंकराचे चिरंजीव वगैरे तुह्मीं दिल्या शिवाय देत नाहींत. व सालमजकुरीं आकार बेरजेवर दरसदे दहा रुपये, पाटील कुलकर्ण्यांचे हक्क एक साला, सरकारांत घ्यावयाचा ठरला त्या प्रमाणें सरकारी महाल व सरंजामाचे महालचे फडशा तो झाला. तुह्मांकडील होत नाहीं. याजकरितां कांहीं सरंजामी करीत नाहींत. यामुळें दरबारांत वाईट वाईट पडतें आपण राजश्री भाऊंचे पत्राचा बहाना लावितील या करितां भाऊस पत्र लिहिलें होतें कीं 'जातीचा ऐवज तैनातेचा व दरसदे दहा रुपये; महालाचा व पाटील कुलकर्णी यांचा हक्क या ऐवजाचा फडशा करून द्यावयाविशीं तुह्मांस पत्र पाठवावें.' त्याचें उत्तर आलें कीं, पांडुरंगराव वडील आहेत ते करतील तें मान्य.'

---

१ एकप्रकार- चमत्कारिक.

तेव्हां त्याकडील गुंता राहिला नाहीं. तें पत्रच शिवाजीपंतास दाखविलें. असो. सरकारांत पैक्याची ओढ भारी. तुमचे जाबसालाकरितां रास्ते वगैरे वाट पाहतात. तुह्मांकडील जाबसाल नाहीं तेव्हां आह्मांस पेंच पडतो. आह्मीं ममतेनें आपणास लिहितों, आपले ध्यानांत नाहीं! परंतु पुढें फार वाईट पडेल. मग आपण आह्मांस शब्द ठेवतील तर मजकडे इतःपर शब्द नाहीं. परभारें महालांत चिठ्या करून ऐवज घ्यावा असें सखारामपंताचें मानस आहे. त्यास होय ह्मणावें लागेल. लौकिकांत वाईट दिसेल. सर्वांवर बसलें आहे तें तुह्मांस सुटणार नाहीं. त्यांत तुह्मीं एकनिष्ठ मातबर सरदार. तुह्मीं अगोदर अघाडी घ्यावी. तुमचे दाखल्यानीं लोकांनीं करावें ते दुसरे अगोदर करितात आणि तुमचें कांहींच नाहीं यामुळें आह्मांस खालीं पहावें लागतें. तुह्मीं ह्मणाल, कर्ज सरदारीस आहे वगैरे तपशील लिहाल, तर तुमचे पेक्षां अधिक कर्जदार सरंजामीदार दुसरे आहेत, परंतु असा प्रसंग वारंवार येत नाहीं. ही मसलत चांगली शेवटास गेली तर पुढें सर्व संभाळून घ्यावयास येईल. नाहीं तर अवघेंच लयास जातें! त्यांत आपलें घर व आह्मांवर गुदरेल तेंच तुह्मांवर हें ही पुरतें ध्यानांत असावें. एक आपला जाबसाल उरकला असतां रास्ते रघुपतराव वगैरे ऐवज देतात, मसलत शेवटास जाते. नाहीं तर हे कोणी ऐवज देत नाहीं, मसलत नासते. आणि श्रीमंतांचे दैवें मसलत शेवटास गेली तरी पुढें तुह्मांस पेंच कीं ' याणीं समयास ऐवज न दिला, आणि यामुळें वरकडाचा हिसका बसला.' हा ही पेंच पडेल. अलीकडे दरबारची माहीतगारी आपणास नाहीं. एक विश्वास आह्मांवर असावा. आह्मीं आपल्या बऱ्यांत आहों. परिणामपर्यंत चांगलें तेंच सांगूं त्या प्रकारें करीत असावें. अथवा आपणच आपले मतें करीत असावें, त्यानें ही संतोष आहे! आणि दोन्ही नाहीं तर उपाय काय!

जसें होणार तसें होईल! इतकें आह्मीं ममते करितां लिहिलें आहे. याचें उत्तर समर्पक यावें. नाहीं त्यापक्षीं तुमचे थोरपणास उचित दिसेल तें करावें. राजश्री शिवाजीपंतासीं सविस्तर प्रकार बोललों आहों. ते विस्तारें लिहितील त्या वरून कळेल. या उपर वारंवार किती लिहावें! रवाना छ० १६ जिल्काद बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे विनंती.

नं १७६३

श्री.

(९ जानेवारी.)

सेवेशीं शिवाजी बाबाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल तागायत पौष वद्य चतुर्थी भौमवासरे मुक्काम भिवंडी वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपण पत्रें पाठविलीं तीं पावोन लिहिला मजकूर कळला. हैदरखानाकडील व राजश्री भवानरावाकडील वगैरे सविस्तर लिहावें ह्मणोन आज्ञा, त्यास हैदरखान एकाएकींच येऊन, बसालतजंग याची फौज बुडवून, बल्लारी घेऊन, बल्लारी तालुक्याचीं केरूर कुरुगोड आदिकरून ठाणीं घेऊन, राजश्री कृष्णापानाईक याचे हवालीं करून, कंचनगुडची खंडणी मनस्वी करून, आनेगुंदी व कनकागिरीची खंडणी करून, अदवानी तालुक्यांत जाऊन तेथील खंडणी तीन लक्ष रुपये करून, कर्नोळाकडे गेला. तेथील खंडणी झाली ह्मणजे गुत्तीस येणार. राजश्री राव सेनापती यांचीं ठाणींठुणीं घ्यावयास फौज व तोफखाना व कृष्णापा नाईक यास ठेविलें आहे. कुडतणी हिरेहाळ वगैरे ठाणीं त्याणीं घेतली. राव सेनापतीस हैदरखान ह्मणतो कीं ' मातबर खंडणी देणें. तोफा मोतीतलावावरून घेतल्या आहेत त्या व कडपेकराकडील ताडमरी वगैरे तालुका घेतला आहे तो सोडून देणें. व मामाचे वेळेस नेहमीचा ह्मणोन ऐवज घेतला आहे तो

१ पत्र परशुरामभाऊस. २ हा संस्थान रायदुर्ग येथील संस्थानिक.

देणें. येणे प्रमाणें द्यावें. भेटीस यावें. तुंगभद्रे पलीकडे अघाडी तुह्मी कबूल करावी. नाहीं तरी तुमचा तालुका घेतों.' त्याजवरून राव सेनापती याणीं साफ उत्तर दिलें कीं 'चित्तास येईल तें करणें. श्रीमंतांच्या लक्षांत अंतर करावयास येत नाहीं!' येणें प्रमाणें सांगोन तालुका व गुत्तीची पेठ वोस करून किल्ल्यावर गुत्तीच्या वसले आहेत. फौज खालीं आहे हैदरखान गुत्तीस बसतोसें झाल्यावर फौज तुंगभद्रेच्या अलीकडे कोपळच्या रोखें पाठविणार. कोपळच्या रोखें श्रीमंत राजश्री कोन्हेरराव याणीं यावें ह्मणोन लिहिलें आहे. कित्तूरकराची खंडणी दोन लक्ष रुपये सरकारची खंडणी शिवाय सालाबादची व मागील बाकी येणें प्रमाणें द्यावी ह्मणोन ठराव झाला आहे. पैक्यांचा निकाल पडणें कठीण, परंतु आला फिरलासा झाला? तो गुंता उरकून राव सेनापतिकडील फौज कोपळच्या रोखें येते असा निश्चय असल्यास जावें ह्मणोन यांनीं येथून लिहिलें आहे. कर्नोळाकडून फिरल्यानंतर हैदरखान कोणीकडे येतो पहावें. तिकडील फारकरून गुंता उरकला असतां तुंगभद्रा उत्तर. तरास येईलसा दिसतो. राव सेनापतीचा कृतनिश्चय 'दौलत गेली तरी जाऊ, परंतु श्रीमंतांच्या लक्षांत तिळमात्र न्यून करूं नये' असें ही वेळ पावेतों आहे. पुढें शेवट पावेतों निभावेल तेव्हां खरें. परंतु निभावेल असें दिसत नाहीं. गुत्तीस हैदरखान आलाच तरी अवघड सेनापतीस पडेल. कसें होतें पहावें. राजश्री भवानराव सुरकुंड्या खेळतात! पांच हजार फौज जमा झाली आहे. प्रस्तुत नरसिंगपुराजवळ आहेत. राजश्री भगवंतराव दहा बारा हजार आहेत. शंकराजी घोरपडे आदि करून मिळोन आहेत. त्यानीं वाईदेशीं वगैरे खंडण्या घेत रान चारीत त्याच प्रांतांत होते. प्रस्तुत महादेवाच्या रोखें आले आहेत. पंत गांठ तोडितात, तेंही निसंगपणें पाठीस लागोन फडशा करावा हे करीत

नाहींत. देशीं खूळ चांगलें झालें! कांहीं आसऱ्याशिवाय ही गोष्ट झाली नाहींसी दिसते. राजश्री विसाजी कृष्ण पंताच्या कुमकेस रवाना करीत होते इतक्यांत वकील कलकत्याचा आला तेव्हां श्रीमंत व कारभारी करेवर आले. याजकरितां फौज पांच सहा हजार जमा केली याजकरितां त्यांसही ठेऊन घेतलें आहे. तहाचा ठराव झाला ह्मणजे फौज पांच हजार सुद्धां विसाजी कृष्ण यांसी रवाना करून राजश्री भगवंतराव याचें खूळ मोडून राजश्री भवानराव सुद्धां कर्नाटकांत रवाना करावें या मनसुब्यांत आहेत. कारभारी फौजफाटे सुद्धां कोंडितावर करेच्या पाण्यावर आहेत. दोन वेळां डेरा दाखल होऊन पुन्हां किल्ल्यावरी जात असतात. वकील आले त्याच्या व कारभारी यांच्या भेटी जाहल्या. दोन तीन दिवस खलबतें जाहलीं. सारांश मुख्य स्थलच्या लिहिण्यांत " हे अखत्यारी पाठविले आहेत, हे करितील तें मुंबई सुरत चेनापट्टण मच्छलीबंदर आदिकरून सर्वांस मान्य. तुमचा सलुख असावा. बिघाडींत आपला तोटा फार आहे. " ह्मणोन बहुतां प्रकारें लिहिलें आहे. तेथील लिहिलीं मुंबईवाल्यास वगैरे जागां जागां आलींच आहेत. त्या अन्वयें याणीं त्यांस बोलावूं पाठविलें आहे. आठ चार दिवसांत येतील. सारांश अर्थ " आह्मी सावकार. करूं नये तो अर्थ केला. नफा तोटा पाहिला पाहिजे. आमचा पैका खर्च झाला आहे तो द्यावा, आणि साष्टी सुद्धां हवालीं करून घ्यावी. पैका द्यावयास नसल्यास सुरत अठ्ठाविसीचे महाल श्रीमंतानीं दिले आहेत ते ऐवज फिटे तो पावेतों ठेवावें. श्रीमंतांस पहिले किल्ले व जहागीर दिल्ही होती त्या प्रमाणें दिलीया उत्तम. आह्मी त्यांची वळकटी करून देऊं. फंद फितूर होऊं देणार नाहीं. विचारास न ये तरी आग्रह नाहीं. त्यांस आह्माकडून लावून देऊं. पुन्हां त्याचा पुस्तपन्हा इंग्रजाकडील कोणत्याही बंदरीं होणार नाहीं,

या प्रमाणें पक्का बंदोबस्त करून देऊं. मुंबईवाले आले ह्मणजे ऐवज किती काय तो सांगों. " अशीं सदरें घालून ठेविलीं आहेत. मुंबईवाले आले ह्मणजे ठराव होणें तो होईल. बहुता प्रकारें चार अलीकडे पलीकडे, परंतु तह पक्का व्हावासा दिसतो. मागाहून होईल तें लिहून पाठवूं. लग्न सुरक्षीतपणें मिरजेस पावलें. श्रीमंत राजश्री आपा सर्व कुटुंबसुद्धां मिरजेस सुखरूप पावले. श्रीमंत राजश्री गंगाधरराव यांस दोन तीनशें राऊतांनिशीं वकीलाचा फडशा होय तों राहणें ह्मणोन श्रीमंत राजश्री नाना बहुतां प्रकारें ह्मणत होते, परंतु मर्जीस न ये; याजकरितां परम खट्ट नाना आहेत. आह्मांकडील जाबसाल आंगा निराळे टाकूं लागले. ' तुह्मांस आमचें न ऐकणें त्या पक्षीं तुमच्या विचारास येईल तें करावें, ' येणेंप्रमाणें रुष्टपणें बोलतात. आह्मीं जातों परंतु आह्मांसी ममतेनें बोलत होते त्या प्रमाणें बोलत नाहीं. वृद्धानीं फारच तांडव आह्मांस बोलावून नेऊन केलें. " दरसदे वगैरे ऐवज वरकडा प्रमाणें तुह्मीं न द्याल तरी कारभार तुह्मींच आटपणें. आह्मीं व नाना सोडितों. तें मान्य करावें. न होय तरी दरसदेच्या वगैरे वराता महालावरी करूं. खट्ट जाहलां तरी चिंता नाहीं. सुभत्ता झाला ह्मणजे सर्वांचें मनोगत रक्षूं. इतकें केल्याचें रक्षण करावयाचा समय हा. या मनसब्यास तुह्मीं अग्रेसर असतां तुह्मीं वोढावें हे तुह्मांस योग्य नाहीं. इतकें असून वोढलें तरी आह्मीं भीड धरीत नाहीं. " ह्मणोन फारच तांडव करून वराता कराव्या ह्मणोन सांगितलें! आह्मीं युक्तीनेंच पड घेऊन जाबसाल केले, परंतु मर्जीस आले नाहीं. पिसाळल्यासारखा झाला आहे! सविस्तर मिरजेस लिहून पाठविलें आहे. आपणास ही कळलें असावें याजकरितां लिहिलें आहे. आपणास पत्रें सरकारचीं व राजश्री नानाचें आलें होतें त्यांचीं उत्तरें पाठविलीं त्यांचा भाव लिहिला तो कळला. पैक्याविशीं हे कोणाची भीड धरीत नाहींत!

पहाडी स्थळाविशीं विनंती वारंवार लेखकास करितों, परंतु वृद्धाच्या ध्यानास परिछिन्न येत नाहीं. 'स्वस्थ जाहल्यावर ज्यास पाहिजे त्याणीं घ्यावें' असें ह्मणतात. नानाणें बोलणें कीं 'विचारें करून आह्मी करून देऊं. तातड मात्र न करणें.' ह्मणोन समाधानाचें बोलणें बोलतात. आह्मीं विनंती वरचे वरी करितों. मागाहून होईल तें सविस्तर लिहून पाठवितों. लग्न मिरजेस गेल्यावर एकजण यावें ह्मणोन लिहिलें होतें, परंतु मर्जीस आलें नाहीं! पंधरा दिवस महिना एक येथें असतें ह्मणजे फार गोड दिसतें. आह्मीं विनंती करावयास व लिहावयास चुकलों नाहीं. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. १७६४ **श्रीगणपति.**

(पौष व. ४)

(१० जानेवारी.)

चिरंजीव राजश्री भाऊ यांसीं प्रती पुरुषोत्तम कृष्ण आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत छ० १८ जिल्काद मुक्काम किल्ले पुरंदर. वर्तमान यथास्थित असे. विशेष. तुह्मीं पत्र छ० २६ सवालचें व छ० ६ जिल्कादचें पाठविलीं तीं दोन्हीं पत्रें पावलीं. लिहिला मजकूर सविस्तर कळला. 'श्रीमंत दादासाहेब आहेत तेथेंच आहेत, धौशाची रवानगी करून देतों ह्मणून नबाबाचीं पत्रें आलीं होतीं,' ह्मणोन लिहिलें तें कळलें श्रीमंतांकडील कांहीं विशेष चढ नाहीं ह्मणोन लिहिलें तें कळलें. उत्तम आहे. इंग्रजाकडील वकील आले आहेत त्यांच्या व उभयतां कारभारी यांच्या भेटी दशमी रविवारीं जाहल्या. नवमी मंदवारीं आदले दिवशीं श्रीमंत राजश्री रावसाहेबांची स्वारी खालीं गेली होती. श्रीदेव

१ नानाफडनविसांस. २ पांडुरंगराव अगर गंगाधरराव या दोघांतून एकजण. ३ पत्र परशुरामभाऊस.

नारायणाचें दर्शन घेऊन डेरा दाखल जाहले. तेथें नजरा झाल्या. उपरांत सर्वच किल्ल्यावर आले. उभयतां कारभारी तेच दिवशीं किल्ल्याखालीं गेले. कोडीतावर मुक्काम आहेत. वकिलांची व उभयतां कारभारी यांचीं खलबतें मध्यान मध्यान रात्र पर्यंत रोज होत होतें. विलायताहून[1] इंग्रजांचे कारभारी आले आहेत ते येथून करून जातील तें त्यांस विलायतवाल्या इंग्रजास प्रमाण आहे. मुंबईवाल्यास हीं पत्रें आहेत कीं, हे पाठविले आहेत. हे करतील त्या प्रमाणें ऐकणें ह्मणोन पत्रें आहेत. वकील आले आहेत. त्यानीं आपला एक शहाणा माणूस मुंबईस पाठविला आहे. त्यांजकडील शहाणा माणूस आणविला आहे तो आल्यावर बोली ठरेल. आज पावेतों बोलतात यांत सल्ला करावा अशीं निर्मळपणाचींच बोलणीं आहेत. गवस गवसूं देत नाहीं. हे ही त्यांस गवस गवसूं देत नाहींत. ते आले आहेत त्यांत दोन असामी आहेत ते फार शहाणे थोर माणूस आहेत. विलायतवाल्या इंग्रजांचा इतबार त्यांजवर आहे. हे करून जातील तें त्यांस प्रमाण आहे. कंदिलें आणिलीं आहेत त्यांजवर वकील बसत असतात व उभयतां कारभारी हीं बसत असतात. फार भागले ह्मणजे भुईवरही बसत असतात। मुंबईहून मुंबईवाल्याकडून शहाणा माणूस आल्यावर बोली ठरल्यावर सविस्तर लिहून पाठवूं. परवां आणखी श्रीमंत राजश्री रावसाहेबांची स्वारी खालीं गेली होती. श्रीदेव नारायणाचें दर्शन घेऊन तेथेंच उत्तरेकडे डेरा जवळच दिला आहे. तेथें गेले. तों कोडिताहून श्रीमंत राजश्री नाना आले. तेथें डेऱ्यांत श्रीमंत दरबार करून चार घटका बसले होते. तेथें नजरा जाहल्या. श्रीमंत राजश्री नानानीं ही लोकांबरोबर नजर केली. इंग्रजा कडील वकील आले आहेत त्यांच्या श्रीमंताच्या भेटी व्हावयाच्या, यास्तव

[1] पत्र लिहिणारा कलकत्यास विलायत समजतो!

टोप्या कुडतानें घालून माणसें पुढें बसविलीं होतीं. पुढें भेटीचे समयीं भितील यास्तव अगोदरच धीट करितात! पागोटें शिरपेंच श्रीमंत राजश्री रावसाहेबांस घालीत असतात. कळावें. उभयतां श्रीमंत राजश्री भवानराव प्रतिनिधीमध्यें व राजश्री भगवंतराव यां मध्यें कलह लागला आहे. भगवंतराव दिगीर्जावर आहे त्याचे हजार एक राऊत कासेगांव घ्यावयाकरितां आले आहेत. त्याज कडील दहा बारा हजार फौज आहे. भवानराव चार हजार फौजेनिशीं इंदापूर परगणेंत आहेत. भगवतरायास येथील सरकारचीं पत्रें जातात, परंतु ऐकण्याचा प्रकार दिसत नाहीं. जिकडे, तिकडे फौज पाठवून रोखे करून धामधूम मांडली आहे. मुख्यांजवळ[1] फौज असती ह्मणजे चोहीकडे दबाव बसता! मिरजेचें लग्न मंगळवारीं द्वादशीस मिरजेस जाऊन पोहचल्याचें पत्र आलें. आह्मीं त्यांस नीरे पर्यंत पोंचवावयास गेलों होतों. चिरंजीव सौभाग्यवती राधाबाई[2] व आपा[3] व बावा[4] जोगाचे घरीं लग्नास आलीं होतीं. येथें ही सासवडीं आलीं होतीं. सवेंच लग्नाबरोबर तासगांवास गेलीं. वरकड लग्नास आलेले मंडळींचा तपशील—

१ तीर्थस्वरूप सौभाग्यवती सावित्रीकाकू.
१ तीर्थस्वरूप सौभाग्यवती बया.
१ सौभाग्यवती मामी पाटणकरीण.
१ श्रीपतराव दंपत्यसहवर्तमान.
१ कुरुंदवाडकर सुभेदार व गणपतराव-उभयतां सडे.
१ सौभाग्यवती कुसाबाई कोलटकरीण.
१ विनोबा आबा.
१ रामचंद्र.
१ बाबा.
१ गंगाधरपंताची स्त्री व पुत्रसहवर्तमान.
१ सौभाग्यवती लक्ष्मीबाई धोंडोबा दादाची स्त्री.

---

१ पेशव्यांजवळ. २ परशुरामभाऊची स्त्री. ३ भाऊंचा पहिला मुलगा रामचंद्रपंत आपा. ४ भाऊंचा दुसरा मुलगा हरीपंतबावा.

१ सौ॥ पळणीटकरीण पुत्र सहवर्तमान.
१ ती॥ मातुश्री साळूअक्का.
१ ती॥ मातुश्री वयनी.
१ सौभाग्यवती लक्ष्मीबाई.
१ सौभाग्यवती उमाबाई.
१ ती॥ मातुश्री राधाबाई गाडगीळीण.
१ लक्ष्मणपंत मजमदार दंपत्यसहवर्तमान, व त्यांची भावजय.
१ चि० यमुनाबाई तळेगांवकरीण सून सहवर्तमान.
१ गिरमाजी कोन्हेर सडे.
१ ब्रह्मनाळकर गोसावी.
१ धोंडोपंत रहिमतपुरकर.
१ बाळाजी विठ्ठल.
१ श्रीधरपंत.
१ शिवाजीपंत हिंसकर पुरुष स्त्री सहवर्तमान.
१ गोविंदराव मामा.
१ भिकाजीपंत गडबोले.
१ शागीर्द आचारी व पुण्यांतील सर्व मंडळी रोज अडीचशें तीनशें पात्रें होत होतीं.

१ अमृतराव टकले चुलते पुतणे.
१ केशव दीक्षित जावयांचे बंधु.
१ सौ० बाई अक्कलकोटकरीण पुत्र सून सहवर्तमान.
१ रामाजीपंत आपटे दंपत्यसहवर्तमान.
१ बाबूमामा.
१ मोरभट वाटवे पुत्रसहवर्तमान सडे.
१ विद्याधर जोसी.
१ विष्णुपंत पुतण्या सहवर्तमान.
१ बचाजीपंत सहस्रबुध्ये.
१ मोरोबा अभ्यंकर दंपत्यसहवर्तमान.
१ भिड्याचे घरची.
१ बाळोबा नाईकाचे पुत्र.
१ रामाजी नाईकाचे पुत्र.
१ उभयतां मातुश्री.
१ कारकून मंडळी.
१ वामनाजीपंत.
१ बापूजी नाईक चिरंजीवसहवर्तमान.
१ महादेव ताटक्या मुलें स्त्री सहवर्तमान समागमें आले होते त्यांचा उपद्रव नाहीं.

येणें प्रमाणें मंडळ्या आल्या होत्या. तुह्मांस कळावें ह्मणून लिहिलें आहे. चिरंजीव राजश्री कोन्हेरराव यांचीं पत्रें आलीं होतीं. चुरमुरीवर आहेत. कित्तूरकराचे खंडणीची बोली लागली आहे. कोपळाकडे जाणें ह्मणून त्यांस सरकारचीं पत्रें गेलीं आहेत. करवीरकरानीं नवी फौज ठेविली ते कित्तूरकरास मिळोन खंडणीची बोली बिघडली ह्मणोन काल वर्तमान आलें आहे. सत्य मिथ्या न कळे. सत्य मिथ्या कळल्यावर लिहून पाठवितों. नव्याणव वाड्यानें इंग्रजाकडील वकील बोलले आहेत हें खरेंच होईल. काळच एक प्रकारचा आला असल्या योग घडणार नाहीं! मुंबईस याचा एकजण गेला आहे. त्याजकडील गृहस्थ येथें आणणार. येथून बोलून मुंबईस जाऊन पत्र येईल उपरांतिक ठराव होईल असें आहे. दोन महिने लागतील. कनिष्ट एक मास तरी लागेल. श्रीमंत राजश्री बजाबा उभयतां बंधु कांहीं वकिलाचे भेटीस आले नाहींत. मेजवानीचें व बसावयाचें सामान बजाबानीं आपले वाड्यांत केलें होतें. लग्नांत कांहीं कटकट झाली नाहीं. त्यानीं सर्वांस वस्त्रें दिलीं. समारंभ चांगला झाला कळावें. हैदरखान कर्नोळाकडे गेला आहे. मागतीं माघारा येणार ह्मणोन काल पत्रें मिरजेहून आलीं आहेत. तीर्थरूप मातुश्री जानकीकाकू सुखरूप आहेत. फाल्गून मासीं चिरंजीव मनीचें लग्न करावयाचें आहे. आठवे महिनेंत बाळंत झाली या चिंतेंत आहे. रामचंद्रभट वैद्य औषध देत आहे. कळलें पाहिजे बहुत काय लिहिणें कृपा लोभ करावा हे आशीर्वाद.

१ पत्र लिहिणारा हें स्वतःच्या स्त्रीस अनुलक्षून लिहितो.

नं. १७६९ श्री.

(पौष व० ७)
(१३ जानेवारी.)

पै॥ छ० २९ जिल्काद सन सीत सबैन पौष मास.

सेवेसीं शिवाजी बाबाजी. कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० २१ जिल्काद वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपण पत्रें निंबाजी बरोबर पाठविलीं तीं पावोन साविस्तर मजकूर कळला. श्रीमंत राजश्री भाऊसाहेबांस पत्र लिहून देऊन रवानगी केली. करवीर-करानीं जमाव करून चिकोडी आदिकरून ठाणीं घेतल्याचा तपशील " राजश्री महादेवशास्त्री व विरूपाक्ष शामजी व बाबुराव जगजीवन व सवदुत्तीकर गोसावी येणेंप्रमाणें कैद केले, ठाणीं घेतलीं, गृहस्थ धरलें, येणें करून फार शेर जाहलें; " ह्मणोन लिहिलें, त्यास स्वारी बाहेर निघतांच ही गोष्ट झाली तेव्हां हावभरी होतील यांत गुंता नाहीं. राजश्री भगवंतराव यांजकडे सूत्र असेल यांत संशय नाहीं. व कित्तूरकराकडे ही सूत्र आहेच. वर्तमान राजश्री रामचंद्र नाईक यांस कळल्यानंतर फारच घाबरे होऊन फौजेची तरतूद करून पाठवावी ह्मणोन उभयतां कारभारी यांसीं फार प्रकारें रदबदल करीत आहेत. कारभारी तर कांहीं विनोदाखालीं नेतात, कांहीं तरतूद करावी असे ह्मणतात! तरतूद होईल तेव्हां खरी. करवीरकर हावभरी झाले आहेत त्या पक्षीं पुढें ठाणींठुणीं राहिलीं घेतील असा प्रकार दिसतो. येथें सारा विचार कबेजी प्रमाणें झाला आहे. सारेंच बुडवावें असा प्रकार वृद्धाचे वर्तणुकीवरून दिसतो. ' ते काय करतात, हे काय करतात, आठा दिवसांत पहा, पंधरा दिवसांत पहा, काय करतों तें पहावें, असें ह्मणतो; उपेक्षा करून सारें

१ पत्र पांडुरंगरावास. २ संभाजीचा प्रधान कलुषा.

बुडवितो असा प्रकार चालण्या चालण्या वरून दिसतें. पारिपत्य करणें तव्हां पुतेंच करावें असें तोंडानें ह्मणतात. तरी तरतूद करीत नाहींत! आह्मीं बातमीचें पत्र सविस्तर निवेदन करून तरतुदेसाठीं ही बहुत सांगितलें. उदईक याचें उत्तर सांगों, तरतूद करितों, ह्मणतात. तरतूद होईल ती मागाहून लिहून पाठवितों. राजश्री भगवंतरावाची फौज कासेगांवाकडे गेली ह्मणून लिहिलें, त्यास ' कासेगांव घेतलें, मंगळवेढ्याकडे उपद्रव होणार, ह्मणोन वर्तमान आहे. राजश्री भवानराव भीमा दक्षिण तीरास होते ते टेंबुरणी जवळ उतरोन वांगी राशीनच्या आसपास गेले. सात हजार फौज जमा झाली आहे. विना सरकारची कांहीं फौज गेल्याखेरीज माघारे उलटत नाहीं. इंग्रजाकडील मजकूर लिहावा ह्मणोन लिहिलें, त्यास मुंबईवाले व सुरतवाले यांस पत्रें गेलीं आहेत. त्यांजकडून आल्यावरी बोलणें चालणेंचा प्रसंग पक्केपणाचा होणार. " श्रीमंत कैलासवासी नारायणरावसाहेबांस पुत्र जाहला, राज्यास अधिकारी झालें, हें आपणास ठाऊक नाहीं. दादासाहेबच खरे. कारभारी खावंदाचे पाठीस लागले, याजकरितां सबळ पक्ष तोच आह्मीं धरला आहे " ह्मणोन वारंवार मुंबईकर मुख्य स्थलीं लिहीत गेले, परंतु त्यांची बातमी ' पुत्र जाहला, राज्यास अधिकारी जाहले, हें समजले नंतर वकीलाची रवानगी करून पाठविले. पत्रांतही लिहिलें आहे कीं, ' अकत्यारी पाठविले आहेत हे जें करतील तें सर्वांस मान्य. ' येणें प्रमाणें पत्रें आहेत. मुंबईवाल्यास काईल केलें पाहिजे, त्यास श्रीमंत झाल्यावर वस्त्रें सप्तर्षीचीं झालीं तदोत्तर पत्रें पाठविलीं असतील व त्यांचीं उत्तरें आलीं असतील त्यांतील पत्र पाहिजे, त्यावरून कागदपत्र पहात होतें. पहातां तेंच पत्र सप्तर्षीहून वस्त्रें घेऊन आल्यानंतर पाठविलें त्याचें उत्तर " संतोष जाहला " ह्मणोन बहुत प्रकारें मुंबईकरानीं लिहिलें होतें

तेंच पत्र सांपडलें आहे! त्यांजकडील कोणी आला ह्मणजे ठरावाच्या बोलण्यास प्रारंभ होणार. राजश्री हरीपंततात्याकडील मजकूर पंधरा हजार सडी फौज करून घांटाखालीं सुरत अट्ठाविसी मधीं गेली. त्यांजकडील सोनगडाजवळ फौज मानाजी फाकडे वगैरे आले होते ते माघारे फिरोन गेले. आतां कोठें गांठ पडेल किंवा सुरतेच्या आसऱ्यास होतील पहावें! धौंशा अद्यापि दौलताबादे जवळच आहे. पुढें जाईल तेव्हां खरा. राजश्री भगवंतराव याजविशींचा बोभाट रहिमतपुर व मंगळवेढ्याकडील वगैरे सांगितल्यास कारभारी ह्मणतात जे ' पारपत्य पुरतेंच करणार, इंग्रजाकडील जाबसाल ठरल्याखेरीज कोणताही विचार करीत नाहीं ' ह्मणोन बोलतात. राजश्री आपाजी शामजी याच्या मुलां माणसांस मिरजेंत जागा दिली, उत्तम गोष्ट आहे. कित्तूरकराची खंडणी दोन लाख रुपयेवर जाहली ह्मणोन वर्तमान होतें. अलीकडे बिघडलें ऐसेंही ऐकतों त्यांस आपणास तिकडून पत्रें येत असतील. ठराव जाहला तोच शेवटास गेला किंवा बिघडला तें लिहावें. राजश्री सेनापतीनीं हिंमत धरल्यासारखी फौज इकडून जाती तर फार उत्तम होतें. तो प्रकार घडतां दिसत नाहीं. चहूकडे दंगे. शिबंदीचा पेंच भारी. सरंजामाचा पैसा येत नाहीं. कर्ज मिळत नाहीं. मोठें संकट प्राप्त भगवंतें केलें आहे. इतक्यांत इंग्रजाकडील ठराव जाहल्यास सारीं खुळें मोडतील. नाहीं तरी जो बळी मारून खाईल तो खाईल. टोंगपण? करील तो करील. असा प्रसंग होईल. राजश्री सखारामपंत एका गृहस्थाजवळ ह्मणत होते कीं, करवीरकर चिकोडी वगैरे ठाणीं घेतात त्यास मिरजकरांचा कानाडोळा आहे! गृहस्थ नाहीं ह्मणत होता. त्याजवळ बोलिले कीं निदर्शनास आणून पंधरा दिवसांत देतों असें ह्मणत होते! गृहस्थानें आह्मांजवळ सांगितलें. कळावें सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. १७६६ श्री.

(१४ जानेवारी.)

तीर्थस्वरूप राजश्री काका वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें निऊबानें दोन्ही कर जोडून शिर साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत पौष वद्य अष्टमी मंदवासर मु॥ इसरवाडी– येथून सोनगड सोळा कोस– सुखरूप असों. विशेष. वडिलांकडून आशीर्वाद पत्र येऊन सांभाळ होत नाहीं तर सदैव पत्र पाठवून सांभाळ करावा. इकडील वर्तमान तर भडगांवास आमचे मुक्काम दहा बारा होते. शुद्ध एकादशीस घाटाखालून बातमी आली कीं, मानाजी फाकडा येऊन नवापुर सरकारचें ठाणें होतें तें जाळून सर्वेच गेला. तेव्हां बातमी येतांच आमची फौज च आपा बळवंत व रास्ते, नारोपंत केसकर व सटवाजी भोसले, धायगुडे असे रातोरात रवाना केले. पहाटेच्या प्रहर रात्रीं येथें मुक्कामास आले. दोन तीन रोज येथेंच मुक्काम होता. तदनंतर कूच करून सोनगडपर्यंत जावें अशी मसलत केली तेव्हां कोणी यावयास धजेनात. तेव्हां तीर्थस्वरूप राजश्री भाऊसाहेबानीं एक निश्चय केला कीं खामखा जावें. तेव्हां मग बरोबर नारोपंत केसकर व सटवोजी भोसले व धायगुडे असे मात्र आले. ते दिवशीं जाऊन नवापुरास मुक्काम केला. दुसरे दिवशीं सोनगडच्या पेठेपर्यंत जावयास निघाले तों वाटेस लमाण चार पांच हजार भरताड भरून श्रीमंत राजश्री दादासाहेबांकडून येत होतें तें मार्गीं लुटून टाकिलें. लष्करांत बैल पुष्कळ झाले. सोनगडच्या पेठेपर्यंत जाऊन आले तों उभयतां कारभारी पुरंधरकर यांचीं पत्रें आलीं कीं इंग्रजाकडील सलुखाचें बोलणें लागलें आहे. तुह्मीं तूर्त त्यांजकडे न जाणें. त्याजवरून येथेंच मुकाम करून आहेत. आपणा कारणें संक्रमणाचे तीळ शर्करायुक्त पाठविले आहेत. स्वीकारावे. बहुत काय लिहिणें कृपा

लोभ असों द्यावा हे विज्ञापना.

चिरंजीव राजश्री रघोबा व सदाशीव यांस आशीर्वाद. सविस्तर मजकूर वडिलांचे पत्रावरून कळेल. तीळ शर्करा संक्रमणाची पाठविली आहे. स्वीकारून पावलियाचें उत्तर यावें. निराळी पिशवी पाठविली आहे. सर्व मंडळी गोंदजी जामदास यांस देखील देणें. हे आशीर्वाद.

राजश्री सदाशीव धोंडदेव साष्टांग नमस्कार विनंती. इकडील वर्तमान राजश्री जिवाजीपंतानीं लिहिलें त्याजवरून कळेल. सर्वदां पत्र पाठऊन सांभाळ करीत जावा हे विनंती.

नं. १७६७ श्री.

(१४ जानेवारी.)

पै॥ छ० ७ जिल्हेज. सुरू सन सीत सबैन. माघ मास.

चिरंजीव राजश्री तात्यासाहेब यांसीं प्रती वासुदेव धोंडदेव आशीर्वाद विनंती येथील कुशल तागायत पौष वद्य अष्टमी पावेतों मुक्काम मौजे इसरवाडी परगणे नवापूर. यथास्थित असे. विशेष. दोन तीन पत्रें आपण पाठविलीं तीं पावोन लिहिलें वर्तमान कळलें. 'पौष वद्य एकादशीस श्रीमंत दादासाहेबांची फौज हजार बाराशें समागमें बहिरजी कदम घेऊन सोंनगडचे अलीकडे आठ कोस नवापुरास आले. गांवांत शंकराजी खंडेराव होते ते व पन्नास स्वार असे निघोन आले. चाळीस घोडे त्यांणीं पाडाव करून घेतले. गोटास अग्न लाविली. गढीचा दरवाजा जाळून टाकिला.' येणें प्रमाणें बातमी एकादशीस तिसरे प्रहरीं आली त्याजवरून राजश्री तात्यांनीं विचार सर्वांचे मतें वरून राजश्री आपा बळवंत यांच्या बरोबर हुजरात व आपलीं तीन पथकें व

१ पत्र पांडुरंगरावास. २ हरीपंततात्या.

नरसिंगराव धायगुडे, नारोपंत केसकर, रास्ते, चांगोजी कदम सारे मिळोन पंधरा अठरा हजार फौजेनिशीं कोंडाईची बारी उतरोन मुक्काम मजकुरी यावें असें ठरविलें. त्या पैकीं आपा खेरीज सारे रातोरात अघाडीस आमचे फौजेसह आलों. दुसरे दिवशीं आपाही आले. नवापुरचें ठाणें रहावें, त्यासी गाडदी शिवाय कोणी ठाणेंत रहावयास नाहींत. तेव्हां तात्यांस पत्र लिहून गाडदी दोन तीनशें आणून ठाण्यांत घातले. सटवोजी भोसलेही समागमेंत आले. मुक्काम मजकुरापासून नवापूर सहा कोस. तेथूल सोनगड नऊ कोस. फौज घांटाखालीं उतरोन सोनगडापावेतों तलावा केल्याशिवाय फौजेचा लौकिक रहात नाहीं असें जाणोन भाऊनीं आपांस व सर्वांस रास्ते आदिकरून सांगितलें जे सोनगडास फौज सुद्धां जावें. त्याजवरून आपा आदि रास्ते वगैरे कोणी चित्तावर घेऊन सोनगडास जावें असें ह्मणेनात. एक नारोपंत केसकर मात्र कबूल झाले. तेव्हां भाऊनीं आपले विचारें निश्चय केला जे, कोणाची वाट न पाहतां आपण निर्वान गडा पावेतों जावें. कोण आले तरी उत्तम. असा विचार करोन रविवारीं पुष्य नक्षत्र चांगला मुहूर्त पाहून प्रातःकाळीं निघोन चालिलों. नारोपंत व धायगुडे यांस सांगोन पाठविलें. ते ही सवेंच निर्वान आले. भाऊनीं आह्मांस पुढें चला ह्मणोन सांगितलें, त्याजवरून आह्मीं निसबतसुद्धां व जाखोजी कदम व गणेश बाजीराव व सदोजी भोंसले येणें प्रमाणें आघाडीस चालिलों. नवापुरचे मुक्कामीं भाऊस नारोपंत व धायगुडे यांणीं येथेंच मुक्काम करावा ह्मणोन राहून घेतलें. आह्मीं आज्ञे प्रमाणें पुढें सहा कोसांवर अनंतपूर ह्मणोन गांव होता— सोनगडाचे अलीकडे दोन कोस— तेथपावेतों आह्मीं व भोंसले चालोन गेलों. तों अनंतपुरांत अकस्मात् दहा हजार लमाणांचा तांडा येऊन

उतरला होता. आह्मां समागमें पांच सातशें लुगारे[1] होते. अघाडीचे तोंडीं लुगारे राऊतास लमाणांनीं मार दिला. मागाहून भोंसले व आह्मी पोंचलों तेव्हां तांडा लुटिला. सहा सात हजार बैल आह्मांकडे लष्करांत आले. पांच हजार पावेतों बैल सोनगडास गेले. लुटीस लागले तेव्हां आह्मांसमागमें चाळीस पन्नास व भोंसले समागमें तीस पस्तीस पावेतों होते गडाच्या तोफा झाल्या. लमाणांचे लागास राऊत येतील यास्तव जपोन होतों. परंतु सोनगडास स्वार दोनशें पावेतों होते त्यांच्यानें काट झाला नाहीं. सायंकाळ पावेतों आह्मी व भोंसले त्या जाग्यास उभे राहून माघारे सहा कोस मुक्कामास आलों. लष्करांत बैल सात हजार आला. आमचे कोठीस दोनशें बैल आणले होते. लष्कर जवळ गांवाशेजारीं आलें तों गोटांतील सारे लहान मोठे मिळोन आमचे सुद्धां सारे बैल लुटिले. आणिले व्यर्थ झाहले. पन्नास बैल मात्र कोठीस लागला. परंतु लष्करची आमदानी जाहली. मीठ व खोबरें, तुरटी, खारीक, जिन्नस होता तो तीन चार रोज लुटून आणीत होते. गांटास आलों तों सर्वेच भाऊ ह्मणूं लागले जे, मध्य रात्रीस जिनें ठेऊन सूर्योदयास सोनगडास जावें असा विचार केला. त्याजप्रमाणें मध्यरात्रीस जीन ठेविलें ते दोन तीन घटका रात्र होती तों अनंतपुरास सहा कोस आलों. तेथें भाऊ राहिले. पुढें आह्मी व चिरंजीव बळवंतराव मामा व चिरंजीव सुभेदार असे उभयतां गडचे गोळ्यांचे मारांत गेलों. पानमळे होते त्यांचे कुंपास अग्न लाविली. वीस पंचवीस तोफ गडच्या जाहल्या. सहा घटका दिवस येईपावेतों तेथेंच होतों. राऊत आंत दोनशें होते ते बाहेर निघाले नाहींत. बैल सुद्धां आंत होते. जर करोन आपा[2], रास्ते, चांगोजी, कदम फौज सुद्धां येते तर पेठ लुटिली असती. सयाजी गायकवाड यांचे हत्ती आंत आहेत. आपांचे

---

१ लुटारू स्वांर. पेंढारी. २ आपा बळवंत.

चित्तीं मेहनत करावी हें तिलमात्र नाहीं. तैसेंच रास्ते. असे विचार येथील आहेत. पुढें अघाडी घेईल त्यांस फसवावें ही वासना सर्वांची आहे! सोनगडापलीकडे बारा कोस कच्चे श्रीमंतांचा मुक्काम आहे. सोनगडाहून माघारे मुक्कामास आलों. दुसरे दिवशीं बैल आणिले हे सोडावे ह्मणोन आपानीं सांगून पाठविलें व हरीपंताचीं ही पत्रें पाठविलीं. परंतु भाऊनीं साफ सांगितलें जे आह्मीं बैल सोडून देत नाहीं असें सांगितलें. सोडावे असें ते ह्मणतच आहेत. इंग्रजांचा वकील पुण्यास गेला व मुंबईचाही पुण्यास आला. पुरंधराहून पत्रें आलीं जे, तुह्मीं होऊन कलागत फौजेची न लावणें असें पत्र आलें आहे. आतां मुक्काम आहे येथून कच्चे सोळा कोस सोनगड आहे. प्रस्तुत धारण चांगली आहे. गुरूंढोर सांपडले याजमुळें लोक खुशाल आहेत. आपणास कर्नाटक व इकडील चोहोंकडून काळजी लागली आहे. खर्चाचा पेंच तो भारीच आहे. सर्व गोष्टीची लज्जा श्री गजाननास आहे! भगवंतराव भवानराव यांचें खूळ देशींच निर्माण झालें त्यांनीं देशची धूळ मांडिली आहे. एक वेळ इंग्रज आले याचा तह ठरल्यास सारी अरिष्टें निरसन होतील. आपण बहुत सावधपणें रहावें. इकडील चिंता तिलमात्र न करावी. कर्नाटक व करवीरकर व प्रतिनिधी तिहीं कडील बातमी पक्की राखावी. बातमी ह्मणजे सारी लढाई आहे. आपण जाणतच आहां तेथें विचार काय लिहावा. चंदावरच्या राजानें हत्ती दिला तो मस्तीस आला आहे. यादवजी पवार भाऊंचे पागेचे बारगीर यांचा पुत्र हत्तीनें जिवें मारिला. आणखी एक माणसाचा हात मोडिला. हत्ती चांगला आहे. आमचें व नारोपंत केसकर यांचें बुणगें सुद्धां बारी उतरोन आलों. आपा व रास्ते, चांगोजी कदम वगैरे सडेच आहेत. बुणगे आणवीत नाहींत. तात्या येतील तेव्हां त्यांचें बुणगें येईल.

बाबासाहेबांमागें सर्वांची मनोधारणा जसें लक्ष पुरविलें होतें तसेंच चालत आहों. तत्रापि कोणास कसें वाटेल, एकादा पत्र लिहील, येविशीं समक्ष गांठ पडेल तेव्हां सर्व अर्थ समजेल. सर्वांचे आज्ञेप्रमाणें चालत आहों. युद्ध प्रसंगाचा योग घडोन आल्यास बाबांमागें भाऊंची समक्ष आपली निशा होय असा लौकीक व्हावा हीच काळजी. आणखी इतर चिंता बाळगीत नाहीं. सविस्तर भाऊंनीं लिहिलें आहे त्याजवरून श्रुत होईल. घरीं खर्चास व दुभतें पाठविलेंच असेल. बहुत काय लिहिणें लोभ असावा हे आशीर्वाद.

नं. १७६८

(१७ जानेवारी.)

भिवराव गोपाळ यांचें पांडुरंगरावास पत्र पौष वद्य ११ चें.

" हैदरखानानें गुत्तीस वेढा घालून बेवीस रोज जाहले. लष्कर गुत्ती सोडून ३ कोस अंतरावर उतरलें आहे. किल्ल्यांत दहा हजार पर्यंत पठाण वगैरे नामी नामी लोक आहेत. श्रीमंत सेनापतीं यानीं बरीच हिंमत धरिली आहे. हैदरखानानीं चार पांच वेळ पेठेवर हल्ला केली परंतु मोर्चे लागू झाले नाहींत. किल्ल्यावरील तोफांचा व जेजालांचा व रेकल्याचा वगैरे दारूचा मार भारी होत आहे. या मुळें हल्ले माघारे फिरले. "

नं. १७६९ श्री.

(माघ शु०जानेवारी)

(द्वु० पंधरवडा.)

पै॥ छ० ८ जिल्हेज सन सीत सबैन.

विज्ञापना. आपण पत्रीं आज्ञा केली कीं राजश्री हरीपंताकडील

---

१ वामनराव वारल्यानंतर. २ शिवाजीबावाजीचें पांडुरंगरावास पत्र.

व इंग्रजाकडील तहाचा मजकूर कसा तो तपशीलवार लिहून पाठवावा ह्मणून आज्ञा, त्यास श्रीमंत राजश्री दादासाहेब गळ्या कांबळ्यावर मुक्काम आहे. आठ नऊ हजार फौज आहे. इंग्रज थोडके हजार दीड हजार पहिल्यापासून आहेत त्या प्रमाणेंच आहेत. वरकड फार करून सुरतेस गेले ते आले नाहींत. आतां यावयाचे नाहींत. राजश्री हरीपंततात्या बारीच्या अलीकडे आहेत. राजश्री आपा बळवंत व राजश्री भाऊसाहेब व रास्ते वगैरे पंधरा हजार फौज सडी पुढें गेली ती घांटबारी उतरोन पलीकडे गेली. त्यांस यांस अंतर विसा कोसांचें आहे. इकडील तहाचा प्रकार ठरे तों पावेतों युद्ध प्रसंगाचा प्रकार घडत नाहीं. त्यानीं आपल्या जागां असावें, याणीं आपल्या जागां असावें. इंग्रजाचें बोलणें श्रीमंत मान्य करीत नाहींत असें जाहल्यास ' पुढें त्यांच्या चित्तास येईल तें करोत. तुह्मीं त्यांची कुमक करूं नये ' येणें प्रमाणें वकील त्यांस[1] लिहून पाठविणार. श्रीमंत राजश्री रावसाहेब किल्ल्याखालीं डेऱ्यास आले होते. वकील भेटीस गेले. भेटी जाहल्या. हत्ती व जवाहीर नजर श्रीमंतांस केलें. तहाचा प्रकार फार करून बोलण्यांत आला. मुंबईवाल्याकडून कोणी येणार तो आला नाहीं. दोन चार दिवसांत येणार. तो आला ह्मणजे ठरावाची यादी होणार. श्रीमंत राजश्री नाना मोरोबादादाच्या घरीं लग्नास गेले आहेत त्यांस यावयास पांच सहा दिवस लागतील. ते आले ह्मणजे यादीचाही ठराव होईल. कोंकण पट्टीस कोळ्यानीं फारच उपद्रव मांडिला आहे. करवीरकरांच्या पारिपत्यासाठीं राजश्री रामचंद्र गणेश दोन चार हजार फौज व तोफखान्यासुद्धां तिकडे मजल दर मजल येतात. श्रीमंत राजश्री कोन्हेरराव कोपळच्या सुमारें जावयास कूच करून गेले असल्यास उत्तमच जाहलें. गेले नसल्यास त्यांस लिहून पाठवून

1 इंग्रजांस.

कूच करून जात तो प्रकार जाहला पाहिजे. सखाराम केशव तुळजापुर प्रांतीं फौज ठेवितो त्याच्या पारपत्यास राजश्री सटवोजी गावडे नेमिले आहेत. चहूंकडे खुळें उठलीं आहेत! श्रीमंतांच्या प्रतापें करून खुळें मोडतील तरच बंदोबस्त होईल. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. १७७०

(२३ जानेवारी.)

मेघःशामराव यांचें पांडुरंगरावास[1] पत्र

माघ शुद्ध ३ चें मंगळवेढ्याहून.

" भगवंतरावाचा मुक्काम गुस्सालेवर आहे. रविवार सोमवार दोन मुक्काम तेथें झाले. श्री० रा० भवानराव प्रतिनिधी नाझऱ्यांकडे गेले होते ते माईणीस गेले. भगवंतराव त्यांचा पाठलाग करीत फिरणार. एक बेत मिरजेकडे जावें व दुसरा विजापुराकडे जावें असा आहे. प्रतिनिधींची झोंडी विजापुराकडे आली तर मोठेंच संकट आहे. "

नं. १७७१ श्रीगणपति.

(माघ व० ७)

(२७ जानेवारी.)

पै॥ छ० २१ जिल्हेज सुरू सन सीत सबैन मया व अल्लफ.

चिरंजीव तात्या व बळवंतराव[2] यांसीं प्रती परशुराम रामचंद्र आशीर्वाद. उपरी येथील कुशल तागायत छ. ६ जिल्हेज मुक्काम इसरवाडी नजीक परगणे नवापूर. वर्तमान यथास्थित असे. विशेष. तुह्मीं छ. १४ जिल्कादचीं पत्रें पाठविलीं तीं छ. २९ मिनहूस प्रविष्ट

१ पांडुरंगराव गोविंद. २ गंगाधरराव गोविंद.

झालीं. " हैदरखान अदवानीकडे येऊन कर्नोळ येथील खंडणी घेऊन तूर्त गुत्ती तालुक्यांतील ठाणीं घेत आहे. राजश्री सेनापतीस कुमक न पोंहचल्यास तिकडील गुत्ता उरकून तुंगभद्रा उतरून अलीकडे येतो " याजप्रमाणें बातमीचीं पत्रें कोपळाहून आलीं तीं पाठविलीं त्याजवरून सर्व भाव कळला " कित्तूरकराचा तह दोन लक्षावर ठरोव निशा व्हावी याजमुळें तट पडला आहे. प्रतिनिधीचे दंग्यामुळें ढालगांव कर्यातीचें गांवकरी पळोन चहूंकडे गेले असा दंगा! कोणी कोणास पुसत नाहीं. " ह्मणून लिहिलें तें कळलें. तसा विचारणार असता तर दंगा कोणता? विलग प्रकार पडला ह्मणून जागा जागां दगा झाला आहे. असो. याची काळजी कोठपावेतों करावी! धणियाचें पुण्य समर्थ्य, त्या योगें जें होणें तें होईल. आह्मीं घांटाखालीं आल्यानंतर दोन तीन पत्रें तुह्मांकडे पाठविलीं आहेत. कृष्णाजी जासुदा समागमें पत्र पाठविलें तें प्रविष्ट जालें त्याचें उत्तर यादवाडचे माणसा समागमें पाठविलें आहे ' इंग्रजाकडील वकील सलुखाचें बोलणें बोलत आहे, मुंबईचाही वकील आणविला आहे, याजकरितां श्रीमंताशीं कलागत लावूं नये ' ह्मणून सरकारचीं पत्रें राजश्री हरीपंततात्यास येत आहेत याजकरितां आज पंधरा वीस दिवस स्वस्थ बसलों आहों. धौशाही मालेगांवचे सुमारें आलें. आठ चार दिवसांत भेटी होतील. अशांत श्रीमंताशीं गांठ घालावयाचा प्रकार असता तर तिकडे सामान थोडकें काम होतें. आतां सरकारचे पत्राशिवाय पुढें पाऊल टाकितां कामा नये. काय करावें! इंग्रजांचे विद्यमानें तह जाहल्यास उत्तमच आहे. लवकर जाहल्यास जागां जागां खूळ जाहलें आहे हे थंड होईल. आणि हैदरखानासही शह बसेल. दिवसगत जाहल्यास शत्रु बळावतो. प्रस्तुत आह्मांस श्रीमंतांचे मनसब्याची काळजी नाहीं. हैदरखान बळावत पुढें आला तर कठीण आहे. महिना पंधरा दिवस

आणखी तिकडेच गुंतला तर बरें आहे. इतक्यांत इंग्रजांचा तह जाहलियाची बातमी त्यास कळल्यानंतर त्यासही पुढें यावयाचा विचार पडेल. राजश्री रामचंद्र नाईका समागमें दोन तीन हजार फौज व दोन तोफा देऊन रवानगी लवकरच होणार ह्मणून तीर्थस्वरूप दादाजींनीं लिहिलें होतें. तेव्हां रवानगी झालीच असेल. तिकडील फौजेंत कार्यभागी कोण जातो न कळे. कर्ता माणूस गेल्यास काम करील. तेथेंही राजश्री बाबूराव जमाव करीत आहेतच. त हे मिळोन कार्य करतील अथवा विवेक तरी होईल असें आहे. तुह्मांकडीलच मोठी काळजी लागली आहे. ईश्वर काय करतो न कळे! इकडे कांहीं अधिकोत्तर नाहीं. धोशा जवळ आला. लवकरच भेटी होतील. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे आशीर्वाद.

नं. १७७२

(२९ जानेवारी.)

पुरुषोत्तमरावांचें पत्र पांडुरंगरावास. माघ शुद्ध ९
इंदुवासरचें पुरंधराहून.

" इकडे कोळ्यांनीं कांहीं बाकी ठेविली नाहीं. बंधारीच चार पांच किल्ले घेतले. मुलुखांत खंडण्या बांधारीच्या आसपास दहा कोस पर्यंत घेतात. या प्रमाणें अनर्थ मांडिला आहे. "

नं. १७७३

(माघ शु० ८)
(२८ जानेवारी.)

रामचंद्र नारायण यांचें पांडुरंगरावास पत्र ६ जिल्हेजचें.

---

१ पुरुषोत्तमरावानीं पुरंदराहून.

" हैदरखानानें गुत्तीची पेठ घेतली. १७ जिल्कादीं. "

नं. १७७४

(२९ जानेवारी.)

पुरुषोत्तमरावाचें पांडुरंगरावास पत्र माघ शु० ९ चें.

" करवीरकरांचे पारिपत्यास सरकारांतून फौज आल्याविना रेच मोडत नाहीं ह्मणोन लिहिलें त्यास राजश्री रामचंद्र गणेश यांस पाठविणार अशी बोलवा आहे. श्रीमंतांची व इंग्रजांचे वकीलांची माघ शुद्ध ९ स भेट जाहली. किल्ल्याखालीं नारायण देवाजवळ डेरे दिले आहेत तेथें भेटी जाहल्या. राजश्री नाना पुण्यास राजश्री मोरोबादादांचे घरीं लग्नास गेले आहेत. आह्मांस लग्नाकरितां नानानीं अगत्य बोलाविलें होतें. त्यास श्रीमंत इंग्रजांचे भेटीस खालीं जावयाचे यास्तव आह्मांस जावयास फावलें नाहीं. कोळ्यांनीं आज पावेतों सात आठ किल्ले घेतले. "

नं. १७७५

(माघ शु०९)

(२९ जानेवारी.)

पुरुषोत्तमरावाचें पत्र पांडुरंगरावास—

" माघ शुद्ध ९ स श्रीमंतांची व इंग्रजाचे वकिलाचीं भेट किल्ल्याखालीं डेऱ्यांत झाली. येथून इंग्रजांचे वकीलांचा एक शहाणा गृहस्थ मुंबईस गेला आहे. तो व मुंबईवाल्याचा गृहस्थ असे लवकरच येणार आहेत. आलेवर तह ठरेल श्रीमंत रावसाहेब खुशाल आहेत. "

नं. १७७६ श्रीगणराज.

(माघ शु० १२)
(१ फेब्रुवारी.)

चिरंजीव राजश्री सुभेदार यांसीं प्रती कोन्हेरराव त्रिंबक. आशीर्वाद. उपरी येथील कुशल तागायत छ० १० जिल्हेज मुक्काम बागेवाडी परगणे हुकेरी. वर्तमान यथास्थित असे. विशेष. राजमंडळची फौज सामानगडच्या आश्रयास येऊन राहिली होती. आमचा मुक्काम हसुरानजीक होता. तेथून काल छ०९ जिल्हेजीं कूच करून बुणगें पुढें घालून आह्मीं पाठीमागें होतों. लष्करचें कूच जाहल्याचें पाहून त्यांची फौज नीट चालोन नदीपावेतों आली. आह्मींही तयार होऊन राहिलों. त्यांची आमची गोळा गोळी जाहली. ते नीट चालून आमच्या तोफांवर आले तेव्हां आमचे लोक गडबडले. धर न धरितां चालिले. आह्मीं कांहीं लोकांनिशीं तोफाजवळ होतों तेथें त्यांची आमची लढाई जाहली. तोफांवर मिठी त्यांची बसली. तोफा माघाऱ्या काढावयास अवकाश न पडूं देतां मुसंडा देऊन एका एकीं येऊन त्यानीं गांठ घातली. तोफा दोन जाग्यावरच राहिल्या. भले लोक व घोडीं जखमी जाहलीं. राजश्री जिवाजी गोपाळ यांस जखमा लागल्या. त्यांजकडे पाडाव गेले. बळवंतराव बर्गे यांसही जखमा लागोन तिकडे पाडाव गेले. इटमालकर यांचा हत्ती नेला. या प्रमाणें काल जाहलें. ऐसें व्हावयाचें नव्हतें, परंतु ईश्वरी सत्तेस उपाय नाहीं! आमची फौज मोडलीसी पाहून पाठीवर येत होते. आह्मीं कणगलें नजीक वोढ्याची ढासण धरून लोकांचा जथ करून उभे राहतांच ते निघोन माघारे गडाकडे गेले. आह्मीं काल बागेवाडीच्या मुक्कामास आलों. आह्मांकडील मंडळी खैर आहे. चिंता

१ शिवराव निळकंठ पटवर्धन कुरुंदवाडकर.

न करणें. यश येणें हें श्रींचें स्वाधीन, परंतु तोफा दोन नेल्या हेच फटकळ गोष्ट झाली! बरें! काय चिंता आहे! श्री गजानन समर्थ आहे. तोफा सहजच परत येतील. चिंता नाही. पुरंधराहून फौज घेऊन राजश्री रामचंद्र नाईक व रामचंद्र गणेश नीरेच्या सुमारें आले ह्मणोन काल पत्रें आलीं आहेत. त्यास फौज अलीकडे आली असली तर फारच उत्तम गोष्ट आह्मीं आज पुरंधरास पत्रें लिहून सांडणीस्वार रवाना केले आहेत. मिरजेसही लिहून पाठविलें आहे. फौजा लवकरच येतील. नीरेवर फौजा आल्याची बातमी तुह्मांकडे आहे नाहीं न कळे. मुजरद माणसें तिकडे पाठवून लष्करची बातमी अणून पाठविणें. आह्मांविशीं फिकीर न करणें. खुशाल आहों तुह्मीं आपलें जागां बहुत सावधपणें असावें. विश्वास कोणाचाही न धरावा. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं. १७७७

(९ फेब्रुवारी.)

महादेवभट पटवर्धन यांचें मुक्काम कोळंबे नजीक
रत्नागिरी येथून पत्र पांडुरंगरावास माघ वद्य ५ चें.

" मिरजेंतून गृहस्थ आणिला तो खरा यास संशय नाहीं. इंग्रजाचा काफला सावकरी समुद्रांतून जात होता त्यास रत्नागिरीकर सुभेदार यानीं स्वारी पाठविली. काफल्यांतून सहा गलबतें सावकारीचीं धरून आणिलीं. दोन लक्षांचा माल वर आहे असें ह्मणतात. रत्नागिरींत कारभारी सकार नामकाच्या कारभारांत आहे. सुभेदार किल्ल्याबाहेर येत नाहीं. दोन चार रोजानीं चतुर्थ प्रहरीं वरचेवर येतात. किल्ल्यांत प्रवेश कोणासही नाहीं. बैरागी पांच सात आले होते. सकार नामकाची व बैराग्यांची

भेट जाली. पुण्याहून दोन गृहस्थ आले होते. तेतयानें खूण मुद्रा सांगितल्या त्या उतरल्या. तो गृहस्थ खरा असाच ठराव झाला. ऐसें वर्तमान होतांच राजश्री रामचंद्र नाईक यांचे पुत्र आले कीं शृंखला काढावी. मुहूर्त पाहिला. तों त्या गृहस्थानें साफ सांगितलें कीं हा कारभार तुमच्यानें तडीस जावयाचा नाहीं तुह्मीं या विचारांत न पडावें. ऐसें सांगितलें त्या वरून रामचंद्र नाईकाचा पुत्र पुण्यास गेला. हें पत्र दुसऱ्या कोणास न दाखवावें. "

नं १७७८ श्री

(१० फेब्रुवारी.)

श्रीमंत राजश्री कोन्हेरराव स्वामी गोसावी यासीं.

आश्रित रामचंद्रभट वाटवे. अनेक आशीर्वाद उपरी येथील क्षेम तागायत माघ वद्य षष्ठीपर्यंत क्षेम असे. विशेष. हिंगलेजच्या मुक्कामावरून पत्रें पाठविलीं त्या वरून विस्तारें वर्तमान श्रवण जाहलें होतें. त्या अलीकडे सोमवारीं युद्ध जाहलें. लढाई मातबर झाली. समयानुसार लढाई बिघडली. लोक चांगले नामी होते, परंतु ते समयीं कोणी अंगेजणी करावी ही उमेद राहिली नाहीं. आपण स्वतः क्षात्र कर्मास प्रवर्तल्या प्रमाणें खस्त बहुत केलें, अंगेजणी एकाकी युद्ध केलें, ही शिपाइगिरीची कीर्ति दोनी लष्करांमध्यें जाहली. श्री कृपेंकरून खेर जाहली हें आह्मीं फार मिळविलें! बहुतांचे अदृष्टेंकरून ईश्वरें क्षेम केलें. तोफा गेल्या आहेत ही ईर्षा सर्वांस आहे. मागती तरतूद होऊन प्रत्युपकार घडेल. येवढी फौज मिळाली आहे तेव्हां पारिपत्य होऊन कार्यसिद्धि होईल. झगडा रगडा आहे, लढाई बिघडली, ह्मणून क्लेश किमपि न मानावा. पुन्हा उमेद धरून तरतूद करावी. पुरंदराहून

फौज येणार हें वर्तमान बित्तीम आहे. शत्रूचे लष्करची बातमी दिवसा येणेंविशीं तरतूद असावी. वारंवार पत्रीं परामर्ष करावा. वरचेवर तळ ढाळीत असावें. एक जागां राहिलेनें बातमी त्याजकडे जाते. मातबर जागेस बुनगें ठेवून सडेनिशीं गांवगन्ना उपसर्ग लागले वांचून त्यांस भय प्राप्त होत नाहीं. पुरंदरची फौज येईल, परंतु तोच मार्ग पाहिला तरी मागती त्यांजकडे जथ पडेल. फौज तवानी राहून बुनगेंचा बचाव होय तोच अर्थ करावा. आपणाजवळ मातबर मनसब्रेस दहा पांच असामी बुद्धिवानच आहेत, आह्मीं लिहावेंसें नाहीं. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे आशीर्वाद.

नं. १७७९ श्री.

(१२ फेब्रुवारी.)

श्रीमंत राजश्री राव स्वामीचे सेवेशीं.

आश्रित रामचंद्रभट वाटवे. अनेक आशीर्वाद उपरी येथील क्षेम तागायत माघ वद्य अष्टमी पर्यंत क्षेम असो विशेष शनिवार रविवार दोन दिवसाचें वर्तमान कळलें नाहीं. तरी सविस्तर लिहावें. यापुढें कोणीकडे जाणें? बुनगे कोठें ठेविलें आहे; रविवारीं कूच कोण कोणे रोखें केलें, मिरजेहून चिठी भेटीस येण्याविशीं आली आहे ह्मणोन ऐकतों. तिकडे जाणें झालें तर लष्कर कोठें राहील? फुटून जाणें तेव्हां दिवसगत लागेल. इकडील फिकें पडलियाचा विचार काय तो केलाच असेल. राजश्री तात्यांची व श्रीमंत राजश्री प्रतिनिधीची भेटी होणार हा मानस बहुतच उत्तम आहे. वडगांवाकडे त्यांचा रोख होईल तेव्हां आपण या पट्टीस[1] असोत पुढें भेटी होतील हा ही एक मनसबा आहे. लाटेवर

[1] कोन्हेरराव.

करवीरकर सडे झाले आहेत, परंतु त्यांचीं खेडीं कोसास एक या प्रमाणें आसरा आहे. त्यांची गांठ तोडून दूर जावें किंवा सन्निध रहावें या दोन्हींतील मनसबा. प्रतिनिधींची फौज आलेचें वर्तमान कळलें. मिरज जवळच्या रोखानें रहावें ह्मणजे गुंततील, एकीकडील मुलुख मोकळा पडेल, या प्रकारें नानाप्रकार आहेत. चौकशीनें बातमी आल्यानंतर जें करणें तें करावें. फौजेचें तेज मागती नवें भरावें लागतें. त्यास फार विचार असावे. एका एकीं केल्याचा भरंवसा कार्याचा नव्हे, वडिलांचे पुण्य आपले पदरीं आहे. सर्वसिद्धि होती. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं. १७८० (माघ व०)

(फेब्रु. प. पंधरवडा.)

परशुरामभाऊ यांचें पांडुरंगरावास पत्र.

" भगवंतराव याचें खूळ परिछिन्न मोडावें या अर्थें नबाबास श्रीमंतानीं पत्रें पाठविलीं त्याजवरून नबाबानीं राजश्री भवानराव याचे कुमकेस तहवारजंग व खंदारकर राजे व राव रंभा निंबाळकर व सलगर व पांढरे मिळोन निवडक सात आठ हजार फौज रवाना करणार ह्मणोन नबाबाजवळ सरकारचे वकील आहेत. त्यांचें पत्र आलें होतें. तिकडून कर्नाटकांत जावें असें आहे. काय घडेल तें खरें. "

नं. १७८१ (माघ व०)

(फेब्रु. प. पंधरवडा.)

पै॥ छ १८ मोहरम.

परशुरामभाऊचें पांडुरंगरावास पत्र.

" चिरंजीव राजश्री रावोबादादास लग्नास पाठविण्याविशीं हरीपंत तात्यास पुसिलें त्यांचे युक्तीस निरोप द्यावयाचा प्रकार येत नाहीं. त्यास नवरी मुलगी आणून पुण्यास पोंचवावी तेथून पुणतांब्यास घेऊन येतील. तेथें चार दिवसांची फुरसत करून चिरंजीव राघोबास पाठवितों लग्न फाल्गुन मासांस नच ठरकलें तर वैशाख मासीं होईल. मुलीस १० वर्षे होऊन अकरावें लागेल ह्मणून ऐकतों. तेव्हां ठेवतां नये. ती मूल थोर चांगली. तीच करावी असा चिरंजीवाचा बेत आहे. "

नं. १७८२ श्री.

(माघ व०)

(फेब्रुवारी. प. पंधरवडा.)

विज्ञापना. आपण पत्रीं आज्ञा केली कीं, " श्रीमंत राजश्री प्रतिनिधीची आमची भेटी जाहली. कुमकेच्या विचारास तुमचे पत्रावरून विचार करून, त्यांस सांगितलें. ते पुढें गेले इतक्यांत करवीरकरांचे पारिपत्यास राजश्री रामचंद्र गणेश येणार या आवईवर करवीरकरानीं सूत्र राजश्री भगवंतराव यांजकडे लाविलें हें वर्तमान कळतांच श्रीमंत राजश्री पंतांस लिहून पाठविलें. ते ही जमखंडी पावेतों गेले होते. करवीरकरांची फौज लाटेवर होती तेथें कांहीं जमाव येऊन राजे राणी व शिदा रातोरात सावगांवास येऊन वडगांवास कारकून जमाव पाठवून गडावर गेलीं[२] राजश्री हणमंतभट पुढें चार हजार फौजेनिशीं गेले त्यांची व करवीरकरांची भेटी जाहली. राजश्री भगवंतराव[३] यांची भेटी माचीस होणार. सूत्र मिळालें. त्यांची कही तमाम मिरज प्रांतांत येते. नांदरें व सावडें वगैरे

१ पत्र शिवाजीपंताचें पांडुरंगरावास. २ पन्हाळ्यावर. ३ हा भगवंतराव प्रतिनिधीचा सरदार.

कर्यातीचे पाटील धरून नेतात. मोठी धूम माजली आहे. " ह्मणोन विस्तारें लिहिलें तें कळलें. ऐशियास हें खूळ माजावयाचें कारण आपणास पेशजी लिहिलें आहे त्या अन्वयें विचार दिसतो बहुतां प्रकारें करवीरकरांचा त्यांचा बनाव बसोन विश्वास दुतर्फा पुरणें गोष्टी अवघडच आहेत. तत्राप न कळे. आपण श्रीमंत राजश्री पंतांस राहविलें, युक्त मनसबा केला. श्रीमंत राजश्री कोन्हेरराव यांस जमावसुद्धां आणवावें. मिरजेची फौज सुद्धां एकत्र करावी. राजश्री रामचंद्र गणेशही येतात. सारी जमेत एकत्र करून मनसबा ऐक्त काव्या दाव्यानें आब राखोन मनसबा करावा. बहुता प्रकारें करवीरकरांचें व राजश्री भगवंतरायाचें बनत नाहींसें दिसतें त्या पक्षीं माघारे फिरोन येतील. परंतु निमित्य तरी झालेंच तेव्हां पंत सुद्धां मिळोन करवीरकरांचा तर रेंच चांगलाच मोडावा. असें साधल्यास उत्तमच आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं १७८३ **श्रीगणपति.**

(माघ शु० ९)
(९ फेब्रुवारी)

चिरंजीव राजश्री बळवंतराव यांसीं प्रती परशुराम रामचंद्र. आशीर्वाद उपरी येथील कुशल तागायत छ० १८ जिल्हेज मुक्काम इसरवाडी परगणे नवापूर वर्तमान यथास्थित असे विशेष तुम्हीं छ० १५ जिल्कादचें पत्र पाठविलें तें छ० १२ जिल्हेजीं प्रविष्ट जाहलें करवीरकर[1] व प्रतिनिधि[2] व गुत्तीकडील मजकूर लिहिला तो सर्व कळला याच प्रमाणें तिकडील वर्तमान वरचेवर लिहित जावें तूर्त राजश्री मुरारराव घोरपडे यांजवर येऊन बनली आहे ते मर्द, केलेले, हिंमतीचे चांगले लढवाई

---

१ भवानरावास. २ गंगाधरराव गोविंद.

एका एकीं जुमस खाणार नाहींत. परंतु कुमकेशिवाय वेढा उठणार नाहीं. यांत गजानन परिणाम कसा लावील पहावें! इंग्रजांचा अद्याप तह नाहीं. तहाचें बोलणें बोलतात. सरकारचें पत्र आल्याशिवाय येथून कूच करून पुढें जातां नये याजकरितां स्वस्थ बसलों आहों. इंग्रजांचा तह लवकर होता तर पुढील मनसबेचा डौल कळतां. असो. ज्या ज्या काळीं जें होणें तें चुकत नाहीं. धौशाच्या भेटी छ० १२ जिल्हेजीं जाहल्यां. याज उपर राजश्री हरीपंततात्याही घांटाखालीं येणार. सविस्तर वर्तमान चिरंजीव राजश्री तात्यांचे पत्रावरून कळेल. तुम्हीं पथ्य चांगलें करून औषध घेत जाणें. रोग फारच वाईट निर्माण झाला आहे यास्तव शरीरांस फार जपत जाणें. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे आशीर्वाद.

नं. १७८४ **श्रीगणराज.**

(माघ व० १०)

(१४ फेब्रुवारी.)

ती॥ राजश्री कोन्हेरराव वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें पांडुरंगराव गोविंद साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल तागायत छ० २३ जिल्हेज सौम्यवासरे प्रातःकाळ चार घटका दिवस जाणोन यथास्थित असे. विशेष. राजश्री भगवंतराव यांचा मुक्काम तांदुळवाडीवर जाहला. करवीरकर यांच्या व त्यांच्या भेटी जाल्या. सरकारचा वकील राजश्री भगवंतराव यांच्या लष्करांत आला आहे त्याचें पत्र आतांच आह्मांस आलें. व जिन्नस नकल करून आपणाकडे पहावयास पाठविली आहे त्यावरून सविस्तर कळेल. सारांश उभयतां एकत्र झाले याजमुळें मनसबा भारी पडला. जासुदांचें जबानी वर्तमान आधीं तुह्मांवर करवीरकरांची फौज रवाना होणार, मग राजश्री भवानराव

प्रतिनिधी यांवर जाणार, अशी बोलवा लष्करांत आहे. राजश्री भवानराव प्रतिनिधीलाही पत्रें पाठविलीं आहेत. आणावयाचें करितों. मग आपणासही आणविणेंचें आहे. आपण सुमार पाहून आसन्यास रहावें. बहुत काय लिहिणें. सावधपणें रहावें. येथील पत्राप्रमाणें पुढील कर्तव्य करावें. सर्व खेळे[1] आहेत. कळसुत्रे खळविणार वेगळाच आहे! हे विनंती.

नं. १७८५ (माघ व० १०)
(१४ फेब्रुवारी.)

मेघःशामराव यांचें पांडुरंगरावास पत्र २३ जिल्हेजचें.

" शंकराजी घोरपडे यानें बागेवाडीस ठाणें घातलें. तेथील कमावीसदार निघोन ठाणें टाकून गेले. तमाम खेड्यास खंडणीचा तगादा लाविला आहे. तेथील गुंता उरकोन विजापुराकडे जाणार होता. इतक्यांत भवानराव प्रतिनिधी फौजेवर आपणाकडे येतात हें ऐकून शंकराजी मुधोळाकडे गेले. भवानरावांचा पाठलाग करीत भगवंतराव सुमारें सा हजार फौज घेऊन कऱ्हाडापाशीं आले तेव्हां भवानराव मिरजे जवळच मुक्काम करून राहिले. भवानराव तांदुळवाडीवरच आहेत ह्मणोन लिहिलें तें कळलें. "

नं. १७८६ (माघ व० १२)
(१६ फेब्रुवारी.)

अंताजी विठ्ठल यादवाडकर याचें पांडुरंगरावास
पत्र २५ जिल्हेजचें.

" शंकराजी घोरपडे भगवंतरावाकडे चाकरीस आहे. भगवंतरावानें

१ सर्व खेळ सखारामबापूचे आहेत असा अभिप्राय।

त्यास बिळगी परगण्यावर पाठविलें आहे. बिळगी परगणा लुटून फस्त केला. मालोजी घोरपडे भवानराव यांजकडे आहेत भवानरावाच्या इरेनें कैळीची लढाई होणार. ”

नं. १७८७

(फाल्गुन शु० १)
(२० फेब्रुवारी.)

अंताजी विठ्ठल यादवाडकर यांचें पांडुरंगरावास
पत्र २९ जिल्हेजचें.

“ हैदरखान याचा व सव सेनापतींचा सल्ला जाला होता परंतु खंडणीच्या ऐवजाच्या भानगडीमुळें पुन्हा लढाई सुरू झाली आहे. तुह्मीं प्रतिनिधींच्या व करवीरकरांच्या दंग्याविषयीं लिहिलें तें सर्व कळलें राजश्री शंकराजी घोरपडे चार हजार फौज घेऊन मुलखांत खंडण्या घेतात. राजश्री भवानराव प्रतिनिधी मिरजेकडे गेल्याचें ऐकून शंकराजी घोरपडे कोल्हापुराहून कूच करून अनवाल प्रांतांत गेले. बेट मुरकी तोफखान्यांची त्यांजवळून खंडणी घेऊन दोन तोफा मागत आहेत अनवालचीं खेडीं तमाम लुटलीं. चिंधी चोळा केला. रयता धरून राखेचे तोबरे देऊन जेरबंद लाविले. खंडणी देणें ह्मणून आटाआट मांडली आहे. ”

नं. १७८८

(फाल्गुन शु० ४)
(२३ फेब्रुवारी.)

अंताजी विठ्ठल यादवाडकर यांचें पांडुरंगरावास पत्र
३ मोहरमचें.

“ आपण सारे सरदारांस जमा करून फौजेचा गाहा करविला हें उत्तम जालें. रामचंद्र गणेश व तोफखानाही मिरजेच्या सुमारें आजपावेतों

आलेच असतील. आज मिरजेपासून करवीरपावेतों चाळीस हजार फौज जमा आहे परंतु कोणाचा धणी कोणी नाहीं. हैदराचा मोकाबला कोणी घेणार नाहीं मराठा सरदार त्या रानांत होता ह्मणून आजपर्यंत तड पाडिला आहे. नाहीं तरी मोकळें रान होतें. आतां ईश्वरकृपेनें करवीरकरांचा बंदोबस्त करून सत्वर फौजा तुंगभद्रेवर जातील तरी मुरारीराव यानीं शर्थ केल्याची सार्थकता होईल. शंकराजी घोरपडा माघारी गेला. ”

नं. १७८९ [फाल्गुन शु० ९]
(२४ फेब्रुवारी.)

काळो बहिरव पेठ्ये यांचें नरगुंदाहून पांडुरंगरावास पत्र
४ मोहरमचें.

“ हैदरखान गुत्तीस वेढा घालून बसले आहेत. दोन अडीच महिने जाले. राजश्री मुरारराव घोरपडे सेनापती हिम्मतीनें लढत आहेत दोन तीन वेळां बोली लागली होती परंतु सल्ला जाली नाहीं. प्रस्तुत मीर साहेब व अल्ली जमालखान उभयतां किल्ल्यावर जाऊन सेनापतीकडे जाऊन बोलीचा ठराव करून आले, सेनापतीनीं निम्म्या ऐवजाच्या भरण्याकरितां दोन लाख होनांचें जवाहीर दिलें. त्यास हैदरखान याणीं चौघांचे मतें साठ हजार होन किंमत ठरविली. जवाहीर घेऊन आलेले गृहस्थ यजमानास विचारून येतों ह्मणून गेले ते परत आले नाहींत. उभय पक्षीं गोळा गोळी बंदुकांची व जेजालांची होत आहे. तोफा मात्र बंद जाहल्या आहेत ह्मणोन अदवानीहून आज आठा दिवशींचें वर्तमान लिहून आलें आहे. ”

नं. १७९० श्री. (फाल्गुन श० ९)
[२७ फेब्रुवारी.]

सेवेशीं बापूजी नारायण. कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ ७ माहे मोहरम पावेतों सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. हैदराकडील व राजश्री सेनापतीकडील छ ७ जिल्हेज पावेतों सेवेशीं विनंती लिहिलीच आहे. त्या अलीकडील सात रोज सल्याचा पैगाम मुराररावानीं लाविला तेंव्हां बारा लक्ष रुपयेवरी सल्ला ठरला. त्यास राजश्री सेनापतीनीं मुद्दा घातला कीं सहा लक्ष रुपये पायमल्ली वजा द्यावी. राजश्री कृष्णापा नाईक रायदुर्गकर याजकडे दोन्ही वर्षांचे दोनी लक्ष रुपये द्यावे अगर त्यासीं बोपून द्यावे. हल्लीं तूर्त चार हत्ती पाठविले. चार मिळोन ऐशी हजार रुपये घ्यावे. तीन लक्ष वीस हजार रुपयेस वस्ता पाठविल्या आहेत द्या घ्याव्या. नक्त तो पैसा द्यावयास आम्हापाशीं नाहीं. असें आठ दिवस बोली लावून मारगुत्तीवर कांहीं लांकडें होतीं तीं तमाम किल्लेवर नेलीं. झुजणेची बंदोबस्ती केली. आणि आपणाकडील वकील राजश्री नरसिंगराव हावलगी व राजश्री सुबराव दिवाण वगैरेस सांगोन पाठविलें कीं हत्ती पाठविलें हे तेथें ठेऊन येणें. रुबरू बोलोन जाणें. त्या वरून हे पाल पडदळ व हत्ती खालीं ठेऊन वर गेले. तेथून तोफांचा मारा केला. सल्ला बिघडला. यांणीं मारगुत्तीस सुरंग चालविला. मारगुत्तीचे पश्चिमेकडील बुरूज मातबर होता त्यास सुरूंग लाविला. रोज तोफांचा तो मार होतच होता. छ० २९ जिल्हेज रोजीं मारगुत्तीचा बुरूज उडाविला. हल्ला केला. मारगुतींत पांच सातशें प्यादा होता तो निघोन किल्लेवर गेला. आधीं मुराररावाची तोफ खालीं केलीच होती.

१ पत्र पांडुरंगरावास अदवानीहून. २ हैदरानें. ३ मारगुत्तींतून तोफा काढून नेल्याच होत्या.

त्याज उपर हैदरानें मारगुत्ती घेतली. आतां गुत्ती किल्ला घेतों म्हणोन हैदर फार शेर जाहला. दुसरे दिवशीं किल्लेवरून फार मार झाला. किल्लेवरून मार असा नेमिला होता कीं, कोंबडें फिरवूं न शके! तेव्हां माणूस काय सहील! हैदराचे लोकांनीं मारगुत्ती सोडून बुरुज उडविला होता त्याचे व भिंतीचे आश्रेस कायम झाले. छ० २४ जिल्हेजीं तीन तोफा चौथे दरवाजेखालीं किल्लेवरून उतरून किल्लेकऱ्यानीं आडवा तिर्कस मार मारिला. भिंतीचे व बुरजाचे आश्रेस हैदराकडील लोक होते त्यांस दर गोळ्यास दहा वीस माणूस ठारच. तें सोडून माघारे पळावें तरी वरील गोळया, बंदुका व जेजालांचा मार! निघतां नये. एक प्रहर पावेतों वरील मार जाहला तो किती म्हणून तारीफ लिहावी! शत्रूचें पांचशें माणूस ठार. दोन तीनशें जखमी. भिंत ज्यांनीं सोडून उतरत होते त्यांस बंदुक व जेजालाचे गोळी याज प्रमाणें जाहलें. छ१ मोहरम पावेतों झुंज होतच होतें. हैदराकडील मारगुत्तीवरी बुरुज पाडिला तेथें बातेरी रात्रीं तयार करून मारगुत्तीचा दरवाजा मातीचा होता त्याजवर तोफांचा मार करून दोन्ही बुरूज हैदराचे तोफानीं पाडिले. त्या दरवाजाचें नांव हैदर दरवाजा. मारगुत्तीचा किल्लेचे सात दरवाजेस तो इलाजच नाहीं. कांहीं आयां आले असतील म्हणून त्यांनीं दरवाजेस जासूद पाठविला कीं, 'मार॰ गुत्ती घेतली तसें गुत्ती किल्लेवर चढतों. नाहक मारले जाल. तुमचा आमचा भाईचारा न होय.' म्हणून मगरूरीनें सांगून पाठविलें. त्यांनीं उत्तर सांगोन पाठविलें कीं. "मारगुती घेऊन हैदरदरवाजा पाडिला ऐसी मगरूरी असली तरी मारगुत्तीचे दोन दरवाजे हेच घेणेस तुम्हास फार यत्न लागला. याजवरी किल्लेचे सात दरवाजेस सात महिनेस तों खोट नाहीं! याजवरी कोणीकडील फौज कुमकेस न येच तरी बोलणें असालिया बोलू." म्हणून उत्तर येतांच हैदर आश्चर्यानें दंग झाला. इतक्यांत रात्रीं सुरापुर

करानीं सुतर स्वार पाठविला कीं " नबाब निजामअल्ली कलबुर्गेस फौज सुद्धां आले. मजल दर मजल येतात. मराठी फौज ही कुडचीचे सुमारें आली तीही येती. " असें लिहिलें. त्याचा वकील राजश्री अश्वत्थराव राजश्री गोपाळ नाईक कनकगिरीकर याचे गोटांत आहे त्यांनीं तेंच पत्र छ० १ मोहरमीं पांचवे तासीं हैदरास दिलें. त्याजवरून पांचजण सुतर स्वार तेच क्षणीं सुरापुरासीं रवाना केलें. तैसेच दहा जोड्या गोविंदराव म्हणून ब्राम्हण गजेंद्रगडावरून लष्करा पावेतों रवाना केले. कनकगिरींतच चार जोड्या व गजेंद्रगडीं दोन जोड्या एक एक कारकून असे रवाना केले. रायचुरासीं पांच जोड्या नरसिंगराव म्हणून ब्राम्हण याजबरोबर. याज प्रमाणें छ० मजकुरीचे दिवशीं तरतूद केली. आणि मिराचे[1] विद्यामानें राजश्री सेनापतीकडे सांगोन पाठविलें. छ० २ मोहरमीं मीर हाच हैदर दरवाजास राहुटीसमेत जाऊन बसला. नाना प्रकारें सांगोन घेतलें. प्रांत सोडावा. बारा लक्ष रुपयेस जिन्नस सांत लक्ष रुपयेचा द्यावा. पांच लक्ष रुपयेस वोली राजश्री व्यंकटराव पुतणे व नरसिंगराव हावलगी व पालेखान याचा पुत्र व फडणवीस याचा पुत्र आणखी दोघेजण यांचें नांव विसरलों असे सहाजण येणें प्रमाणें तह ठरला. वस्तभाव खालीं आली. रुपयेचे वस्तेस पांच रुपये यांणीं लिहिले आहेत. ते रुपयेची वस्त अर्ध रुपयास मागतात. वस्तांचा ठराव झाल्यावर सहाजण वोली घेऊन मीर उतरणार ऐसा करार ठरला आहे. थोरले नबाब कलबुर्गेपाशीं आले हें वर्तमान किल्लेवरी पोंहचलें. सल्ला करून करें तरी निघावें हा आतूर हैदरासी लागला. राजश्री सेनापतींचे चित्तीं आणखी महिना पंधरा दिवस टाळावें. याज प्रमाणें हैदरासी कोणी मिळाला नव्हता! किल्लेवरील लोक टांक्यांतील पाणी पिऊन उगींच मरतात त्याजमुळें गडबडीले आहेत.

---

१ मीररेजा हा हैदराचा मेहुणा.

आठ चार रोजांत फौज येती तर उत्तम. नाहीं तर तह होतो. राजश्री सेनापतीनीं झुंजणेची शर्त केली. किल्लेवरी गोलंदाज ऐसे मारितो कीं दहा पांच चांगले खळण पांघरूण पाहिले म्हणजे गोळा मारिलाच! दोघे चौघे ठार, एक गोळा खालीं न जाय, असा मारितो! कोणती म्हणून तारीफ लिहावी! छ० ७ मोहरम पर्यंत याज प्रमाणें वर्तमान. मागाऊन जाहलें वर्तमान सेवेशीं विनंती लिहितों. तहाची बोली लागली आहे. बोलीस राजश्री व्यंकटराव घोरपडे मात्र लष्करांत आले आहेत. वरकडही येतात म्हणून दिवसगतीवर लाविले आहेत. या समयीं फौजा येत्या म्हणजे मौज होती. त्याच्या फौजा चोहोंकडे गेल्या आहेत. चौघे पाळेगार फौजा आल्यावर काय ठरतात! खामखा लुटला जातो! याज प्रमाणें राजश्री कोन्हेररावजीस ही विनंती पत्र लिहिलें असे. उत्तरेकडील वर्तमान लिहिणार स्वामी समर्थ असां. मामलतीचा मजकूर दुसरे पत्रीं विनंती लिहिली आहे त्या वरून श्रुत होईल. बहुत लिहिणेस शक्त नव्हें. हे विज्ञापना.

नं. १७९१ श्री. (फाल्गुन शु०)

(फेब्रु० दु०पंधरवडा.)

पै ॥ छ ८ मोहरम सन सोत सबैन.

विज्ञापना आपण पत्रें पाठविलीं तीं पावोन लिहिला मजकूर कळला. यादवाड व तेरदाळचीं पत्रें व राजश्री भगवंतराव यांच्या बातमीचीं पत्रें पाठविलीं तीं पावलीं. राजश्री सेनापतीकडील सल्ला झाल्याचा प्रकार लिहिला आहे तें वर्तमान खरेंसें भासत नाहीं. चहूंकडून वर्तमान येतें जे किल्ला मोठ्या हिंमतीनें लढवितात. सल्ला करून सेनापती पैका देतील हें कळतच आहे! ज्यानीं जें वर्तमान ऐकीलें तें लिहितात! राजश्री भगवंतराव

१ फुकट. २ पत्र शिवाजी बाबाजीचें पांडुरंगरावास.

यांजकडील आपण तपशीलें लिहिलें त्यास सरकारांत काल बातमी आली कीं, करवीरकरांचा व त्यांचा बनाव बसला नाहीं. राजश्री भगवंत राव फौज सुद्धां माघारे फिरोन कासेगांवावर आले म्हणोन वर्तमान आलें आहे. सत्य मिथ्या न कळे. आपणाकडून वर्तमान येईल तें खरें आपण स्वदस्तुरें दोन बंद लिहून पाठविले ते श्रीमंत राजश्री नानास दाखविलें. तोफखानेकडील वरातेचा प्रकार लिहिला तो कळला. जाबसाल केला तो युक्तच आहे. वरात घेऊन इकडे आले तरी उत्तमच झालें, नाहीं तरी सुखरूप राहूत! ऐवज देत नाहीं. आपण साफ उत्तर केलेंच आहे. सांगलीपावेतों भगवंतरावांची कही आल्याचा प्रकार लिहिला तो कळला. जर करून करवीरकरांचें व राजश्री भगवंतरायाचे एक सूत्र जाहल्यानें होईल तें थोडकें! एक सुत्र न झाल्यास श्रीमंत राजश्री पंतांची फौज चांगलीच आहे. श्रीमंत राजश्री कोन्हेररावजींस आणवावें. राजश्री रामचंद्र गणेश ही चार दिवसांत मिरजेचे आसपास गेले असतील. सारा गाहा करून आधीं करवीरकरांचे पारिपत्य करावें. उपरांतिक राजश्री भगवंतराव यांची.[1]

नं. १७९२ श्री.

(फाल्गुन शु०)

(फेब्रुवारी. दु० पंधरवडा.)

विज्ञापना. पत्रीं आज्ञा कीं ' दिवस अखेरीचे आले. इंग्रजाकडील ठराव मजकूर कसा? सालमजकूर फौजा देशास आल्या खेरीज सोईस परिछिन्न पडणार नाहीं. ' ह्मणोन लिहिलें, त्यास इंग्रजाकडील तहाचा ठराव झालाच आहे. साष्टीचा प्रसंग- मुंबइवाल्यांच्या चित्तांत कसेही करून सांष्टी आपलेकडे राहीसी जाहल्यास उत्तम आहे- ह्मणोन मुंबईवाले

१ पत्र इतकेंच अपुरें सांपडलें. २ पत्र शिवाजी बाबाजीचें पांडुरंगरावास.

हिसके घेतात व यांच्या मनसब्यास हिसके देतात. कारभारी याणीं साफच सांगितलें कीं, ' चार रुपये खर्च लागले आहेत याचा भलता विचार होईल, साष्टी ठेऊन तह करावा ही गोष्ट परिछिन्न घडत नाहीं, ' ह्मणून सांगितलें. त्याजवरून इंग्रज विचारांत पडले आहेत. साष्टी देऊन तह करितील. चार दिवस अधिक लागतील इतकाच प्रकार. चार परगणे ऐवजाचे ओलीस ह्मणोन राहिल्यास चिंता नाहीं, कारभारी मान्य करतील. पण साष्टी घेतल्याखेरीज विल्हे लावीत नाहींत. फौजा सालमजकुरीं देशास येत तो विचार खामखा करावा असाच विचार येथून आहे. रामचंद्र गणेश नीरेवरून कूच करून पुढें मजल दर मजल येतात ते व श्रीमंत राजश्री कोन्हेरराव एकत्र होऊन करवीरकरांचा बंदोबस्त झाल्याखेरीज कोपळाकडे रावजींनीं जावयाचें नाहीं ह्मणून आपण लिहिलें तें प्रमाणच आहे. फौजेचा आब गेला तो फिरोन आल्याखेरीज पुढें जाऊन फळ नाहीं. राजश्री सखाराम केशव तुळजापुराकडे फौज ठेवीत होता त्याजवर राजश्री सटवोजी गावडे रवाना झाले होते. ते गेल्यावर सखाराम केशव याचा जथ विस्कलीत जाहला ह्मणून पत्रें आलीं. राजश्री भगवंतराव यांजकडील कारकून आले आहेत. जरकरून आमचा उपयोग पडेसें जाहल्यास आह्मी त्यांच्या बोलण्यांत मन घालून पहातों. कारकुनानीं त्यांस लेहून पाठविलें कीं " मिरज तालुकियास तिळमात्र उपद्रव न देणें. करकंब मंगलवेढें बरडोल यांसीं तुह्मीं उपद्रव दिला ह्मणोन पटवर्धन खट्टे जाहले आहेत. फौजेचे बळकट. पंताचा त्यांचा स्नेह पहिल्यापासून आहे. दोघे मिळाल्यानें आह्मांस राज्यांत रहावयासी जागा नाहीं. " असें नाना प्रकारें लेहून पाठविलें आहे. उपद्रव मना होईल. आपल्या निदर्शनास येईल तेव्हां खरें. भय प्रीत दाखवून पत्र पाठविलें आहे. भगवंतराव करवीरकरांस मिळाले. आतां आपल्या फौजा व पंत व

मोंगलाची फौज एक करावी असा मनसबा सिद्धांत जाहला आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

पै।। छ० ७ मोहरम सन सीत सबैन मय्या व अलुफ.

नं. १७९३. श्रीगणपति.

(फाल्गुन शु०)

(फेब्रु० दु० पधरवडा.)

पै।। छ० १८ मोहरम सन सीत सबैन.

चिरंजीव राजश्री तात्यांस आशीर्वाद. उपरी. राजश्री रामचंद्र गणेश व राजश्री कृष्णराव पानसे यांची रवानगी करवीराकडे सात हजार फौज व आठ दहा तोफा इतक्या सरंजामानिशीं रवानगी झाली. पुरंधराहून निघोन गेले. आजपावेतों त्या प्रांती गेलेच असतील. ही फौज व तीर्थस्वरूप राजश्री कोन्हेरराव यांजवळ ही चार पांच हजार सरंजाम असेलच. हे ते मिळोन मातबरच सरंजाम झाला. परंतु तोफखान्याजवळ पायदळ असल्यावाचून तोफांचें संरक्षण होत नाहीं. कनिष्ट पक्ष दोन हजार पायदळ असावें. गाडदी हजार पांचशेंच या कार्यास येते. ते नाहींत तेव्हां प्यादे तरी सदरहू प्रमाणें जरूर असावें. अशास कांहीं आपलेकडील, कांहीं तीर्थस्वरूप मातुश्री अनूबाईकडील, कांहीं राजश्री रामचंद्र गणेश यांजकडील, मिळोन दोन हजार प्यादा जरूर जमा करावा. ह्मणजे तोफांस पेंच पडणार नाहीं. कसाहा सरंजाम त्यांचा असला तरी पेंचांत येईल. दोन फौजा करूं नयेत. एक दुसरी चांगली लढाई होय पावेतों साराच सरंजाम एक असावा. एक दोन लढायांत करवीरकरांची फौज नामोहरम होऊन आपली फौज शेर जाहल्या नंतर मग

---

१ पत्र परशुरामभाऊचें पांडुरंगरावास.

दोन टोळ्या करून ठाण्याचे गळीं पडोन ठाणीं घ्यावीं. येणेंकरून ठाणींही लवकर येतील. अगोदर ठाणीं घेतल्यानें न कळे, रात बिरात फौजेनें ठाण्यांचा आसरा करून रात्रीची गलबल केली तरी इतका सरंजाम जाऊन ठीक होणार नाहीं; यास्तव लिहिल्याप्रमाणें आणल्यास पेंचांत येतील. गुंता नाहीं. मास पक्षांत तहही करितील आणि जसें पुरंदराहून कारभारी सांगतील तसें मान्यही करितील. हाव भरी होऊन चहूंकडे ठाण्यानीं गुंतू नये. तुह्मांजवळ स्वारांचा जमाव आहे त्यास एकाएकींच सारा सरंजाम पाठविणें. एक दुसरें झुंज होऊन ठाणीं घेत चाललें ह्मणजे आपलेकडील लोक एखादेकडे पाठवून दोन चार ठाणीं हाताखालीं घालावीं. कांहीं दोन चार रोजमऱ्या पुरतें मिळाल्यास पहावें. तुह्मी लिहिलें होतें जे ' करवीरास जाऊन श्रीचें दर्शन घ्यावें असें मानस आहे व कारभारी यांचे विचारेंही चांगलें पारिपत्य करावें. ' त्यास करवीरास राजधानी जागा आहे यास्तव एक करवीर न घेतां सारा प्रांत घेऊन किल्ल्यास उपद्रव लागल्यास एखादें स्थल हस्तगत झाल्यास तजवीज पहावी. सुचला प्रकार लिहिला आहे. यांत तेथें सर्वांचे विचारें कसें घडेल तसें करावें. पुरंधराहून कारभारी यांचीं पत्रें राजश्री हरीपंततात्यांस आलीं आहेत जे तुह्मांजवळ फौज फार आहे. देशीं फौज नाहीं. यास्तव रास्ते यांचें पथक देशास पाठवावें. त्यास रास्ते अथवा खासगत पैकीं तीन चार हजार फौज देशास रवाना करणार. धौशाचा सरंजाम मातबर. दहा हजार पायदळ सात आठ हजार फौज चांगली मोंगली. अठ्ठावीस तोफा. सरदारही चांगले. इस्मालखानाचा लेक, रुकनुदौलाचा भाऊ वगैरे सरंजाम लेस चांगला आहे. पायदळही चांगलें. दोन हजार बेजाल आहे. हजार बाराशें माणूस हपसी. येणेंप्रमाणें कट्टा सरंजाम आहे. नबाबही कर्नाटकचे रोखें यावे या विचारें धारूरच्या घांटें घांट

चढले. पुढें कोठवर जातात न कळे. तुळजापुराकडे श्रीमंतांचें नांव सांगून हजार पांचशें सरंजाम जमा झाला त्याजवरही पुरंधराहून दोन तीन पथकें रवाना झालीं; ह्मणून लिहिलें आहे. सलुखाचें फार करून ठरेल असें शिवाजीपंताचे लिहिण्यांत होतें. किती दिवस लागतात न कळे. जाबीतजंग धौशा आल्यावर त्यानीं राजश्री रघोजी भोंसले यांस पत्रें पाठविलीं आहेत. आह्मीं सरंजामसुद्धां राजश्री हरीपंत यांसीं सामील जाहलों, त्यास तुह्मीं सरंजामसुद्धां आलां नाहीं, तरी पत्र दर्शनीं सरंजामसुद्धां जलद येंणें, ह्मणोन पत्रें गेलीं आहेत. बहुतकरून येतील असें दिसतें. येथें सरंजाम तर फारच चांगला झाला आहे शिंदे होळकर यांचींही पत्रें येतात जे जलद येतों. परंतु अद्यापि आपल्या स्थळींच आहेत. पुरतें सलुखाचें पाहतात सलुख जाहल्यास येतील तरी न कळे. येथील विचार पाहतां हुजरात फारच चांगली आहे, परतु सन खमस सीत दुसाला नालबंदीस ठिकाण नाहीं, प्रस्तुत पांच सात रोजमरे तटले आहेत, खर्चाची फारच ओढ आहे, पुरंधराहून खर्चास समयास येत नाहीं, येणेंकडून खर्चाची हलाखी फार आहे. सलुख श्रीमंतासह जाहल्यास फार चांगलें, ह्मणजे वेध मातबर तुटला. हिंदुस्थानांत धौशासुद्धां जावें. उभयतां सरदार आहेत त्यांचा बंदोबस्त करावा. कांहीं त्यांजपासून खर्चास घ्यावें. मग फौजेस द्यावें. पुरंधराहून तो या उपरी पैका येत नाहीं असें पुरतें समजलें. हेंच होईल. आणि इंग्रजांचा तह जाहला, श्रीमंतांचा न झाला तरी श्रीमंत जिकडे जातील तिकडे जाणें प्राप्तच आहे. श्रीमंतासही धारे शिवाय दुसरी जागा नाहीं. उभयतां सरदार आहेत तेथपावेतों जातील असें वाटतें. काय घडेल तें खरें. सलुखास फार दिवस लागले. हे दिवस कामाकाजाचे. पुढें उष्णकालही येतो. आणि दिवसही डोईवर येतात, असें आहे. यांतें

हरिसत्ता प्रमाण! आठ चार दिवसांत सलुख जाहल्याचें पत्र आल्यास चिरंजीव राजश्री रघुनाथराव यांची रवानगी लग्नाबद्दल करितों, हैदरखान देशीं काय करतो नकळे. राजश्री मुरारराव यांचे कसें जाहलें? हैदरानें काय मनसबा केला! हें लिहावें. मोठी काळजी देशाची लागली आहे. भगवंतराव व भवानराव उभयतां कोठें आहेत व कोणाजवळ जमाव किती आहे हें सविस्तर लिहावें. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे आशीर्वाद.

नं. १७९४ श्रीगणपति. (फाल्गुन शु०)
(फेब्रु० दु० पंधरवडा)

चिरंजीव राजश्री तात्यांस आशीर्वाद उपरी. नबाब आवशावर आहेत. पुढें कर्नाटकांत जावयाचा मनसबा आहे. इंग्रजांचा तह ठरकला म्हणोन नबाबास वदरूदौला गेले त्याणीं सांगितलें. त्यावरून नबाबानीं धौशा यांस लिहिलें आहे कीं तिकडील काम जाहलें, या उपरी जलद येणें. त्याजवरून हे निरोप मागतात. येथील प्रकार तरी पुरंदरीं करार मात्र झाला, परंतु अद्यापि निदर्शनास येत नाहीं. गुदस्तापासून नबाबास तीस लक्षांची जहागीर दिली. आर्जव ही बहुत केलें. दोन महिने धौशास येथें येऊन झाले तों मागती जाणार, त्यास येथून पत्रें पुरंदरास गेलीं आहेत त्याचें उत्तर येईल व येथील इंग्रजाकडील व श्रीमंताकडील प्रकार दिसेल तसें करितील. मोंगलानें पुणतांब्याचे देवालयाचा वगैरे फारच नाश केला. पैका वास्तभाव घोडीं वगैरे नेलें होतें तें तर फार करून दिलें. तरी दहा पंधरा हजारांची नुकसानी झाली. असो. होणार तदनुसार झालें. पुढें देव ब्राम्हणाचे आशीर्वादेंकरून याचा सूड

१ पत्र परशुरामभाऊचें पांडुरंगरावास.

घ्यावा लागेल असें आहे. चिरंजीव राजश्री राघोबादादाचे नवरीस पाठवून द्यावयासीं दोन चार पत्रें पाठविलीं आहेत. त्यासीं रवानगी केली असलीया उत्तम. नाहीं तर रवानगी करावी. येथून कूच लवकर व्हावयाचा रंग दिसत नाहीं. मुधोळकर यांजकडे तीर्थरूप तात्यांस सांगून कोणी पाठवून देवून आपले ममतेंत घ्यावें. जिदीस[1] गेले तरी उठोन जातील, मसलत लांबवितील; गुत्तीची कुमक होणार नाहीं, यास्तव लिहिलें आहे. तुम्हीं घरीं नाहीं. चिरंजीव मनीचें लग्न व्हावयाचें याची तरतूद तुम्हांवांचून कशी होईल! मुल थोर झाली यास्तव काळजी लागली आहे. बहुत काय लिहिणें लोभ असों दिजे हे आशीर्वाद.

नं. १७९९ **श्रीगणपति.**

(फाल्गुन शु०)
(फेब्रुवारी. दु० पंधरवडा.)

पै॥ छ० १९ मोहरम सन सीत सबैन मया व अल्लफ.

चिरंजीवें[2] राजश्री तात्या यांसीं आशीर्वाद. उपरी. हैदरखानानें गुत्तीचे पेठेवर हल्ला करून घेतली. किल्लेस तोफा लाविल्या आहेत. हल्ल्याचे दिवसीं आंतल्यानीं फारच शर्त केली. बाहेरील माणूस फार जायां झालें, आंतलेंही जाहलें, ह्मणून बागडकोटचे पत्रीं लिहिलें होतें त्याजवरून कळलें. राजश्री राव सेनापतींनीं फारच शर्त केली. कुमकेचा प्रकारही नाहीं. आतां त्याची गत काय होती हे न कळे. ही मोठी काळजी लागली आहे. सल्ल्याची बोली ह्मणोन लक्ष्मेश्वरचे पत्रीं लिहिलें होतें ह्मणून लिहिलें तें कळलें. कुमकेचा भरंवसा नाहीं त्या पक्षीं त्यानीं तरी कोणाचे आधारावर लढावें? आतां त्यानीं तह करून

१ जिदीस गेले = हट्टास पेटले. २ पत्रें परशुरामभाऊचें पांडुरंगरावास.

बचाव करून घेतल्यास चिंता नाहीं. श्रीमंतांसीं एकनिष्ठ अशी शपथ रायाची होती त्याजप्रमाणें त्यानीं या प्रसंगें सर्वस्व गमावून लढाई चांगली केली. आतां त्यांची अब्रू गजाननानें राखावी! गुत्तीचें विल्हे लागले ह्मणजे मध्यें शत्रूस आडकाठी कोणाची नाहीं. सरकारचीं ठाणीं झुजावयाचा प्रकार दिसतच आहे! हैदर गुत्ती पासून मोकळा झाल्यावर मग क्षेप निक्षेप सरकार तालुक्यांत येतो. संदेह नाहीं. व करवीरचें पारिपत्य होऊन फौज त्या प्रांतीं कांहीं राहिली तर न कळे. नाहीं तर ठाणीं राहणें कठीण आहे. चिंता कोठवर करावी! अद्यापि इंग्रजाच्या तहाचा ठराव होऊन निश्चय होत नाहीं हें आश्चर्याचें आहे. होणार तदनुसार घडेल. काळजी कोठपावेतों करावी! बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे आशीर्वाद.

नं. १७९६ श्रीगणराज. (माघ शु०)
[फेब्रु० प० पंधरवडा

चिरंजीव राजश्री सुभेदार यांसीं पांडुरंगराव गोविंद. आशीर्वाद. " ती ॥ राजश्री कोन्हेरराव काका यांची व करवीरकर यांची लढाई होऊन त्यानीं दोन तोफा व हत्ती एक जीवाजी गोपाळ देखील पाडाव केले. जखमा मशारनिल्हेस चार लागल्या आहेत मृत्यु पावले असें ही ऐकण्यांत आहे. खिजमतगार रायाकडून आला त्याणें जबानी सांगितलें. अद्याप पत्र आलें नाहीं " म्हणून लिहिलें. बरें! होणारास उपाय नाहीं तीर्थस्वरूप खैर आहेत एवढाच लाभ. झूज भांडण आहे तेथें यश अपेशाची चिंता काय! करवीरकरानीं[1] ये समयीं यश संपादिलें आहे त्याजमुळें हांवभरी जाहले असतील. तुह्मीं आपले जागां बहुतच

१ शिवराव निलकंठ कुरुंदवाडकर.

सावधपणें राहोन बातमी जलदीनें वरचेवर आणून लिहीत जाणें. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं. १७९७ श्री.

(२ फेब्रुवारी.)

सकलगुणालंकरण अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य राजश्री व्यंकटराव नारायण[1] स्वामी गोसावी यांसीं–

पोष्य माधवराव नारायण प्रधान. नमस्कार. विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जावें. विशेष. राजश्री येसाजी शिंदे याणीं सरकारचा करार मदार मोडून चिकोडी तालुक्यांत वगैरे मनस्वी वर्तणूक करितात. त्यांचे पारिपत्यास हुजुरून राजश्री रामचंद्र गणेश यांस फौजसुद्धां रवाना केलें आहे. तरी तुह्मी आपलेकडील जमावसुद्धां जाऊन मशारनिल्हेस सामील होणें. रवाना छ० ११ जिल्हेज. सु० शीत सबैन. मय्या व अलफ. बहुत काय लिहिणें हे विनंती.

नं. १७९८ श्री.

(फेब्रु. प० पंधरवडा.)

आशीर्वाद[2]. विशेष. "संस्थान बल्लारीस अदवानीकर मोर्चे लावून बसला होता त्यास दोन महिने झाले तों हैदरखानानें बातमी राखोन चालोन येऊन छापा घातला. फौज लुटून तोफा हत्ती घेतले. संस्थानिक हैदर आलेचें वृत्त कळोन पळोन गेला. देवीचंद[3] वगैरे मारले गेले.

१ घोरपडे इचलकरंजीकर. २ पत्र परशुरामभाऊचें पांडुरंगरावास. ३ अदवानीच्या नबाबाचा दिवाण.

खासा नबाब अदवानीसच होते. बल्लारीचें ठाणेंही त्याणें घेतलें. संस्थानिक सारे त्याजकडे मिळोन जमाव भारी जाला आहे. विजापुरास यावें ही कस्त भारी. " ह्मणोन विस्तारें पत्रीं लिहिलें, ऐशास नबाबाची फौज गाफीलपणें राहिली. हैदरखानानें बातमी राखोन दगा केला ही मोठी अनुचित गोष्ट जाहली. संस्थानही गेलें. त्याप्रांतीं अगदींच फौज नाहीं तेव्हां कोपळ धारवाड लक्ष्मेश्वर नरगुंद प्रांते त्यास यावयास गुंता पडणार नाहीं. तोच येईल तेव्हां ठाणीं त्यांच्या धास्ती खालींच जातील. तिकडून हरिहराकडील जमावही पुढें येईल. झाडून कर्नाटकचा अमल परागंदा जाहला! कोपळाकडून हैदर, तिकडून हरिहरचा जमाव ह्मणतां दमानें कोणी टिकत नाहीं! अदवानी कित्तूरचा मोठा ऐवजाविशीं पेंच पडोन दहा लक्ष रुपये कर्जाखालीं आलों. कोल्हापुरच्या दंग्यामुळें फौज ठेवणें पडली. सारीं संकटें एकवेळेसच आलीं आहेत. हैदरखान कर्नाटकप्रांतें पहिल्यानेंच गुंतेल असाही अर्थ नाहीं. हरिहरचें सामान तालुक्यांत उपद्रव करितील. खुदही विजापुरची आवई घालितो, परंतु याचे विचार फार आहेत.! राज्यांत वाईट पटवर्धनांचें घर! समागमें बाजीराव बर्वे निमित्तास आहेत. फितुरी काम! पुण्यापासोन हैदरखानाची बातमी जाती. विजापुरचें नांव करोन अकस्मात् मात्रागमनी कोठें गळीं पडेल न कळे! तात्या! आपण किल्ल्याबाहेर न निघावें. आपले स्थानाचा बंदोबस्त चांगला राखावा. शत्रूची बातमी चांगली राखावी. लक्ष्मेश्वरीं राऊत पाठवून व कोन्हेरराव त्या प्रांतें गेले तरी फल नाहीं. कित्तूरकर हैदरखानाचे लक्षांत, त्यापक्षीं मध्यें फौज राहिली तर हरिहरचें सामान तिकडून, इकडून कित्तूरकर, कोपलाकडून हैदरखान स्वारी सुद्धां—

---

१ पत्र इतकेंच अपूर्ण सांपडलें.

नं. १७९९ श्री.

(१२ फेब्रुवारी)

पै॥ छ०८ जिल्हेज सन शीत सबैन.

श्रीमंत राजश्री कोन्हेरराव स्वामींचे सेवेशीं—

आश्रित रामचंद्रभट बाटवे. अनेक आशीर्वाद उपरी येथील क्षेम तागायत माघ व० ९ रात्र प्रहर जाणून क्षेम असे. विशेष. आपण अष्टमीचें पत्र पाठविलें तें पावलें. राजश्री तात्यांचें पत्र आलें. मनसब्यावर दृष्टि देऊन दोन दिवस स्वस्थ होणेचा मजकूर लिहिला तो कळला. परंतु राजश्री पंतप्रतिनिधीकडील मसलत शिथिल पडली ह्मणून आज मिरजेहून वर्तमान आलें. ते[1] निघोन कऱ्हाडाकडे गेले. राजश्री भगवंतराव गुरसाळेवर आहेत. वीस हजार फौजेची वदंता आहे. शरीरीं स्वस्थ नाहीं. पाय तोंडास शोफ आली आहे. जलोदर ह्मणतात. त्यांकडील कांहीं चार एक हजार फौज खानापुरास आली ह्मणोन हे गांठ तोडून कऱ्हाडास गेले. पुरंदराहून फौज सात हजार व पांच तोफा रवाना झाल्या. तीन हजार फौज पुढें नीरेवर आल्याचें वर्तमान मिरजेहून आलें आहे, परंतु जथ पडावयास पंधरा दिवस लागतीलसें दिसतें. तेथपर्यंत आपलें मंडळीचे मतें काय विचार केला असेल तो लिहावा. श्रीमंत राजश्री महाराज शनिवारीं पांच तास रात्री करविरास दाखल झाले. रविवारीं प्रहर दिवसास निघोन पाराशेरास[2] गेले. मातोश्री बाईसाहेब लाटेवरच आहेत. गेलीं नाहींत. करवीरप्रांतीं आपले फौजेची दहशत खाऊन तमाम गुळें झालें आहे. सर्वांस भय आहे. " तद्देशी (?) लोक आणिले, स्वामींस एकवार यश आलें, परंतु पुढें आमचा परिणाम कठिण आहे. ह्मणून काढितील " ह्मणतात. लाटेवर जमाव राऊत चार हजार

१ भयानराव. २ पन्हाळ्यास.

व प्यादे तीन हजार इतका जमाव आहे. अधिकोत्तर नाहीं. जानती फौजेचाही भर नाहीं. याप्रमाणें चार वेळ गृहस्थाकडून बातमी आली आहे. परंतु कालचक्रेंकरून त्यांचा डाव साधला आहे. बरें! एकवेळ झालें ह्मणून कांहीं गमावलें नाहीं! आपली सर्व मंडळी क्षेम आणि बुणगे शाबूत राहिलें तेणेंकरून सर्व मिळालें! मागती आपणास सर्वकाळ यशच आहे. पुण्यवानच आहां. मागती सरदारीच करितां. समयानुसार घडतच आहे. क्षिति कदापि न मानावी. आमचा एक गृहस्थ कागल कोल्हापुराकडून जाऊन आला त्याणें सर्व वर्तमान सांगितलें, त्यांतील वर्णूक आपले शिपाईगिरीची आबालवृद्ध करितात. पुढेंही कल्याण चिंतन करितात. सर्वांस अगत्य आहे. भगवत्कृपेनें घडेल तें खरें. बागेवाडीस आणखी किती मुक्काम होतील तें लिहावें. आपणाकडील फौज मातबरच आहे पण युक्तिप्रयुक्तीने भय सोडावलें पाहिजे. दूर राहून पडदा (?) तुटत नाहीं. केवळ अंगास अंग लावावें तरी त्रिंबकरावमामाची गत होईल तेंही कार्याचें नव्हे. आबदाब फौजेचा रहावा, आपला दबाव त्यांजवर चढावा, या रीतीचे मनसबे कर्तव्य तेच केले पाहिजेत. एक जागां राहोन शिथिल पडूं देऊं नये. उत्तरचे फौजेवर या राज्याचें एकवेळ तेज चढोन मागती पारिपत्य व्हावें हें पूर्वापार चालत आलें आहे. भगवत्सत्तेनें त्याच अन्वयें घडेल. उद्योग करावा. कर्नाटकांत नाणेंविशीं आपणास सरकारचीं पत्रें आलीं ह्मणून वर्तमान आलें आहे. आपणही त्यांचीं उत्तरें लिहिलीं कीं ' येथील कार्यभाग उरकलेविना जात नाहीं ' हेंही वर्तमान ऐकतों. उत्तम लिहिलें. तीन वेळां त्यानीं दाब चढविला. अतःपर अंगास अंग न लागतां पोक्त मनसबा करून पारिपत्याचा विचार करावा. पुरंदरचे फौजेचा एक जागां बसोन मार्ग पाहणें येणें करून शिथिल पडेल. कांहीं हालचाल असावी. परंतु सावधता असली पाहिजे. अतःपर

कोणाचा भरंवसा धरूं नये. सर्व मजकूर आपला आपणच पहावा. ये समयीं दुसरा कोणी साहित्यास दिसत नाहीं. .... कुरुंदवाडचें गुळें होत होतें परंतु धीर भरंवसा देऊन गुळें होऊं दिलें नाहीं. हंगामाचे दिवस. रानांत माल आहे. वसूल चालला पाहिजे. आणि आपली फौज आठ कोसांवर असतां त्याणीं येऊन ठाणें घेत नाहींत. तत्रापि आले तरी कुमक होतच आहे. प्यादेही बरेच आहेत, तेपक्षीं चिंता काय आहे? ही कलागत मास पक्ष विज्ञत नाहीं, श्रीकृपेनें घडणें तें घडेल. अतःपर सावधतेनें असावें. बहुत काय लिहिणें वारंवार परामर्ष करावा हे विनंती.

लं. १८००

श्री.

(१६ फेब्रु०)

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री अंताजीपंत स्वामींचे सेवेशीं—

पो॰ष्य रामचंद्र नारायण. साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल तागायत छ० २५ जिल्हेज. भृगुवार. जाणोन वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपण छ० २० रोजचें पत्र पाठविलें तें काल येथें पावलें. दागिने चार पाठविले प्रमाणें पावले. रुपये सव्वाआठ वजनाप्रमाणें पाठवून द्यावे त्यास कांहीं कार्यनिमित्त हंचनाळास आलों. कनकगिरीस जातों. आपण लिहियाप्रमाणें धोतरजोडे सरस करमासी लांब रुंद रेशीम थोडें किंमत सरस लिहिले प्रमाणेंच करून पाठवून देतों. चार दिवस अधिक लागतील. येथें पूर्णिमे सुमारें राहणें पडेल. तेथुन कनकगिरीचा रथोत्सव आहे तो जाहलिया नंतर करवून पाठवून देतों. बातमीचा मजकूर— श्रीमंत राजश्री सेनापतीनीं सल्ला बारा लक्षांवर उरकला होता त्याप्रमाणें पायमल्ली सहा लक्ष रुपये वजा द्यावे, हत्ती घोडे पाडाव केले

त्याचे दोन लक्ष वजा द्यावे, दोन लक्ष रुपये कृष्णापा नाईक रायदुर्गकर याजकडे चौथाई फार दिवस राहिली ते वजा द्यावे, एकूण दहा लक्ष रुपये वजा द्यावे. दोन लक्ष रुपये नक्कच द्यावे. त्यास ऐवज मोत्यांच्या कंठ्या दोन व जडाव कंठी दोन हत्ती दोन याप्रमाणें हैदराकडे पाठवून दिलें. त्याजप्रमाणें त्यानीं ठेऊन घेतलेवर चिजा जडताचे दागिने परत लावून दिले कीं आह्मास नक्क ऐवज द्यावा. त्यास राजश्री सेनापतींनीं सांगून पाठविलें कीं कांहीं जरूर बोलणें आहे. तुह्माकडील मातबरास किल्ल्यावर पाठवून द्यावा बोलून सर्वच माघारा लावून देऊं. त्यास हैदराने आपला मेहुणा मीररेजा यासच किल्ल्यावर पाठवून दिलें. तो किल्ल्यावर सर्पणाचा मात्र तोटा होता तो मारगुत्तीस इमारती व लकडखाना होता त्यास चार पांच हजार कामाठी वगैरे लावून तमाम किल्ल्यावर घेऊन गेले. चार दिवस चार रात्र पर्यंत फुरसत पडल्यास सर्पणाची बेगमी पांच चार महिन्याची करून घेतली. मिरास एक दिवस ठेऊन घेऊन सन्मान करून वस्त्रें पात्रें देऊन त्या समागमें दहा वीस माणूस गेलें होतें— दहा बारा पेटारे भरून किल्ली कुलूप करून मोहर करून मिराबरोबरचे माणसां बरोबर देऊन निरोप दिला; कीं ' बाकीच्या ऐवजाचा सरंजाम पेटाऱ्यांत आहे. आह्मी वकील मागून एक दोन रोजांत पाठवून देतों तोंपर्यंत पेटाऱ्याची किल्ली कुलूप काढावयाची गरज नाहीं. ' याप्रमाणें मिरासीं बोलेन लष्करास किल्ल्याखालीं पाठवून दिलें. त्यानें येऊन सर्व वृतांत सांगोन ' ऐवजाचे पेटारे दोन लक्ष रुपयेचा भरणा करोन पाठविला, त्याचे वकील मागून एक दोन रोजांत येणार, ते आल्यावर कुलूप काढून ऐवजाचा भरणा जरूर करून घ्यावा. ' त्यास वकिलाचा दोन रोज मार्ग पाहून मागती हरकारे जोडी दरवाजास हैदरानें पाठविली कीं तीन रोज झाले. अद्यापवर वकील येत नाहीं याचा मजकूर काय आहे! त्यास

खाशानींच सांगून पाठविलें कीं, 'आणखी दोन दिवस सबुरी करणें. काय तुमचा जीव जातो? काहिली काय निमित्त करितां? " हें वर्तमान हरकारे जोडा याणीं येऊन हैदरजवळ सांगितलें. त्यानें क्रोधायमान होऊन सरकार जामदारखान्यास पेटारे आणून कुलपें काढून पाहिलें तों चार पेटारे गारगोट्या व चार पेटारे खापरीचे, बाकी चार पेटारे कळवंतिणीच्या जुन्या पादरक्षा!!! याजप्रमाणें आपले दर्शनें पाहोन तोच संताप आला तोफा दुतर्फा लाविल्या. दोन दिवस दोन रात्र तोफा मारितां गोलंदाज शिणोन गेले! तिसरे दिवशीं हल्ला केली. मारगुत्तीच्या सुमारास येऊं दिला तों किल्ल्यावरून मार जाहला तों हजार बाराशें माणूस ठार झालें. दोन अडीच हजार माणूस जखमी होऊन लष्कर कच खाऊन माघारें तोफांचे गोळे चुकावून राहिले कांहीं कारागिरी चालत नाहीं चार पांच रोज सल्ल्याची बोली लावून मुराररावानीं शेवट याजप्रमाणें केलें ह्मणोन हैदर दांत ओठ खातो. उपाय एकजात चालत नाहीं. परवां निजामन अल्लीचीं पत्रें राजश्री सेनापतीस आलीं तीं प्रविष्ट होऊन सवेंच तेच समयीं उत्तर देखील मागती त्यास पाठवून दिलें. याजप्रमाणें कच्ची बातमी वडिलांस लष्कराहून आली तीं पत्रेंच वडिलानीं येथें पाठवून दिलीं. तपशीलवार याजप्रमाणें आहे. परवां मंगळवारचीं पत्रें आहेत. पुढें कसें घडतें पहावें याजउपरी सल्ला होणें नाहीं. तेथून पादरक्षा भरून पेटारे पाठविले तेथें रुपये देणें कळतच आहे! राजश्री राव सेनापतीनीं तो शर्त केली. यांचे पराक्रमास जोडा नाहीं. शेवट यश त्यांजकडेच आहे विश्वतोमुखें आहे. पुण्याकडील फौजेचा मार्ग पहातात वीस पंचवीस हजार फौज कृष्णातीरास आली हे बातमी कळतांच हैदर उठोन जातो लष्कर फार कचकरलें आहे. याजप्रमाणें नेटानीं कागदोपत्रीं वर्तमान आलें तें आपणास लिहिलें आहे बहुत काय

लिहिणें कृपा कीजे हे विनंती.

नं. १८०१ श्रीगणपतिर्जयति.

(२० फेब्रु०

पै॥ छ० १ मोहरम सन शीत सबैन.

चिरंजीव राजश्री पांडुरंगरावतात्या यांसीं प्रती अंताजी विठ्ठल आशीर्वाद उपरी ता०छ० २९ जिल्हेज रोज मंगळवार पावेतों मुक्काम यादवाड वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपण छ० २६ रोजचीं पत्रें पाठविलीं तीं आतांच पावलीं. लिहिला मजकूर सविस्तर विदित जाहला. राजश्री भगवंतराव व राजमंडळकरांच्या भेटी होणार. राजश्री रामचंद्र गणेश नीरेवर आले आहेत. सर्वत्र एक होऊन भारी मसलत करणार ह्मणून लिहिलें ते कळलें. इकडील वर्तमान राजश्री शंकराजी घोरपडे यांणीं अनवाल प्रांतांतील खेडीं घेऊन तमाम रयता धरून दंड बांधून परगण्याची खराबी केली. सरकारचें ठाणें येडिगिरें [?] एक मात्र राहिलें. तमाम रान लुटलें गेलें. बाकी कांहीं राहिली नाहीं. मुलें मनुष्यें सर्वत्र ऐनापुरास पाठवून द्यावीं, तेथून स्वार पाठवून घेऊन जाऊं, ह्मणोन लिहिलें; त्यास तूर्त रवाना करावीं तरी शंकराजी घोरपडे माघारे येऊन उतरले आहेत. याजकरितां जवळ धामधूम, याजकरिता चार रोज न पाठविलीं. शंकराजीचा शह चुकल्यावर रवाना करितों. हैदरखान व घोरपडे याचा सल्ला झाला होता तो मागती बिघडला. किं निमित्त ह्मणाल तरी हैदर रोकड रुपये मागूं लागला, घोरपडे जवाहीर व कापड देऊं ह्मणाले. याजकरितां अनुसंधान तुटलें. मागती लढाई होत आहे. शंकराजी घोरपडे आज मौजे कुदनाहाळ (?) प॥ यादवाड येथें

१ पटवर्धन यादवाडकर. २ गुत्तीकर मुरारराव.

मुक्काम नेमिला आहे. फौज दोन तीन हजार आहे. फौजेमध्यें भगवंतराव याचा काका (?) आहे. याप्रमाणें बातमी आहे. कळावें. सध्या या प्रांतीं घोरपडे यांस विचारणारा कोणी नाहीं. मुलामाणसांची रवानगी करितों. चिरंजीव राजश्री जनोबाचे कन्येस बरें वाटत नाहीं. संग्रहणी लागली आहे. फार जेर आहे. यास्तव सुमार पाहून पाठवून देतों. राजश्री भवानराव प्रतिनिधी हैसाळावरी गेले व चिरंजीव राजश्री कोन्हेररावही तुह्माकडे येणार. त्यास इकडे याल त्यास कोणीच फौज नाहींसें जाहलें आहे. राजश्री शंकराजी घोरपडे याणीं मुलखांत धामधूम मांडिली आहे. खंडणी घेतो. आज दासेबाव तोरगलकरांचा गांव तेथें मुक्काम आहे. खंडणी घेतो. यादवाड व तेरदाळ व गोकाक तमाम खंडणी घेऊन मुलूख दरोबस्त लुटणार. नाहक परगणे खराब होतील यास्तव त्याचे तोंडावर चिरंजीव राजश्री कोन्हेरराव फौजसुद्धां घटप्रेवर राहतील तर घोरपड्यावर दबाव असेल ऐसा विचार आहे. चिरंजीव कोन्हेरराव फौजसुद्धां अगदीं तिकडे गेले तरी परिछिन्न काटक लोक व देसाई तमाम सामील होऊन भारी जथ त्याचा मागती पडतो. याप्रमाणें त्याणीं मसलत केली आहे. तूर्त खंडणी घेतो आणि मुलूख मारितो हा बंदोबस्त करून तिकडे जय पाडिला नाहीं तर हा इकडे बळ धरितो. जमाव ठेवितो. मुलखांत पैका मिळण्यास लागल्यावर अगाध काय आहे? ऐसा विचार आहे यांत आपले मनसबेस येईल तसें करावें. सेवेशीं फार काय लिहावें बहुत काय लिहिणे कृपा कीजे हे आशीर्वाद. शंकराजीचा जमाव भारी जथत चालला. जमखंडीकर देसाई व गलगलेकर देसाई व येदिगिरीकर व बिसूरकर तमाम मिळाले. कौजलगीकराचा व मुधोळकराचा दावा यास्तव हा मिळत नाहीं. कौजलगीकर देसाई यास पांचशें प्यादेनिशीं यादवाडास आणिलें. आह्मी

हजार प्यादा मिळविला आहे. शंकराजी घोरपडे दगाबाज आहे. यास्तव सावधपणानें असतों. परंतु तमाम कांटक लोक जमा करितो, स्वारही ठेवितो. धारवाड, नवलगुंद, नरगुंद, बागलकोट, इकडे यादवाड, तेरदाळ, गोकाकपर्यंत स्वारी करणार याप्रमाणें केलें आहे. याची तरतूद कोणती करावी? सेवेशीं श्रुत होय हे आशीर्वाद. कित्तूरकराचेंही राजकारण शंकराजी कडे लागलें आहे. कारकून आले आहेत. परंतु बळ पाहून कित्तूरकर येणार. हे आशीर्वाद.

नं. १८०२ श्री. (२० फेब्रु०

पै ॥ छ ०७ मोहरम सुरुसन शीत सबैन मय्या व अल्लफ

सेवेशीं शिवाजी बावाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील ता ॥ फाल्गुन शुद्ध प्रतिपदा भौमवासरे वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावलें. लिहिला मजकूर समजला. भगवंतराव याच्या लष्करांत गृहस्थ आहे त्याच्या पत्राची नक्कल करून पाठविली ती पावली. उभयतां कारभारी यांस दाखविली. आज पावेतों उभयतां बंधूची कलागत होती, आतां सरकारांत विरुद्ध त्या गोष्टी आचरों लागले. आतां (त्यांस) मिळाले त्यासुद्धां पारिपत्य जाहल्या शिवाय ठीक पडत नाहीं. याजकरितां याची तारतुद करितों (असें कारभारी) म्हणतात. त्याची तारतुद राजश्री रामचंद्र गणेश रवाना जाहले. शिवरात्र महादेवाजवळ करून पुढें मजल दरमजल येतात. त्यास फौज जी मिळेल ती मिळवावी. येथून राजश्री बाबुराव पाटणकर व निंबाळकर, हुजरातीचे महादजी शितोळे येणें प्रमाणें पाठविणार. ही फौज व राजश्री पंतांची व श्रीमंत राजश्री कोन्हेरराव असें म्हणतां वीस हजारांचा गाहा होतो.

१ पत्र पांडुरंगरावास.

नबाबाकडील दहा हजार फौज नबाबाकडून आणविली. डांक बसली आहे. पत्रें निकडीचीं नबाबाकडे सरकारचीं व वखारुद्दौला यांचीं गेलीं. गुंता न पडतां फौज यावी असा प्रकार जाहला आहे. राजश्री भगवंतराव करवीरकरांस सामील झाले. आतां पारिपत्यास गुंता नाहीं. मिरजेस ही फौज आहे. मिरज प्रांतास ते रोखे पत्रें घेऊन येतील त्यांस धरून आणावें. कही कबाडावर फौज पाठवावी. घोडीं तट्टें उंटें मिळतील तितकीं मेळवावीं अत:पर गुंता नाहीं. होईल तितकें करावें, म्हणोन उभयतानीं सांगितलें व श्रीमंत राजश्री कोन्हेरराव लांब आहेत त्याणीं मिरजेच्या आसऱ्यास यावें येणें प्रमाणें पत्र त्यांस सरकारचें गेलें आहे. आपण जलद त्यांस लेहून ऐनापुरचें सुमारें आणवावें. तों राजश्री रामचंद्र गणेश येऊन मिळतात. राजश्री पंतांसही आपण पत्रें पाठवावीं. सरकारचींही पत्रें गेलीं आहेत. (कोन्हेरराव) संकराजी घोरपडे याजवर गेले, घोरपडे लुटल्याचें वर्तमान उडतें आलें आहे. सत्यमिथ्या न कळे. [करवीरकर] इचलकर्जी व कुरुंदवाड यांस उपद्रव करणार ह्मणोन लिहिलें, त्यास आह्मी लिहिल्या अन्वयें जथ पडल्याचे पूर्वींच काय करितील तें करिसील. सारी फौज एकत्र जाहल्याने मग त्यांजकडून कांहीं होणें नाहीं. मागाहून सविस्तर लिहून पाठवितों. शेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. १८०३

श्री.

(२२ फेब्रु०)

पै॥ छ० ६ मोहरम सन सीत सबैन.

सेवेशीं शिवाजी बावाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत फाल्गुन शु० ३ गुरुवासरे मु० भिवडी वर्तमान यथास्थित

जाणून स्वकीय कुशल लेखन करावयास आज्ञा केली पाहिजे. श्रीमंत राजश्री भाऊसाहेबांकडून पत्रें आलीं. आमचीं वाचून पाहिलीं त्यांतील अर्थ विशेष नाहीं. राजश्री हरीपंततात्या आहेत तेथेंच आहेत. [घांटा] खालीं गेले नाहींत. पहिलीं पत्रें [इकडून] गेलीं होतीं कीं घांटाखालीं जाऊन आपल्या साऱ्या फौजा एकत्र होऊन पुढें जावें ह्मणजे श्रीमंत (दादासाहेब) माघारे सरतील असा मानस करून पत्रें पाठविलीं होतीं. हें वर्तमान इंग्रजांकडील वकिलास कळतांच यांसीं बोलले कीं बोलणें चालणें होत असतां कलह प्राप्त जाहलियानें आह्मी बोलतों यास विरुद्ध पडेल. तूर्त करूं नये. यावरून ती गोष्ट राहिली. पुनः पत्रें गेलीं कीं घांटावरच राहणें. त्यावरून धौशासुद्धां घांटावरच राहिले. राजश्री आपा बळवंत व श्रीमंत राजश्री भाऊसाहेब घांटाखालीं पहिल्या ठिकाणींच आहेत. सविस्तर तिकडील पत्रावरून कळेल. इकडील वर्तमान तरी काल उभयता कारभारी किल्ल्यावर आले. खालीं बोलणें चालणें अथवा कोणास निरोप देणें तरी सरकारचे डेरे श्रीनारायणाचे देवळाजवळ दिले आहेत तेथें येतील, पुनः किल्ल्यावर जातील. पहिल्याप्रमाणें खालींच राहत नाहींत. याचें कारण खालीं फौज थोडकी, काल एक प्रकारचा, विश्वास कोणाचा येत नाहीं, येविशीं श्रीमंत राजश्री भाऊनीं लिहिल्यावरून विनंती केली व याणींही विचार पहातां खरें असें दिसोन किल्ल्यावर गेले. आज वखारुदौला याच्या डेऱ्यास [कारभारी] जाणार. एक दोन दिवसांत वखारुदौला यास निरोप देणार. नबाबास जहागीर पहिली दिलीच आहे. करारापैकीं पन्नास हजारांची राहिली होती त्यास वरणगांव खानदेशामधीं पुरंदरे यांचे सरंजामांत परगणा आहे तो मागतात तेव्हां तोच दिला पाहिजे. वरणगांव फार चांगला याकरितां वृद्ध फार खट्टे आहेत. परंतु दिल्याखेरीज गत्यंतर नाहीं. देतील. इंग्रजांकडील

जाबसाल चौथांखेरीज कळों नये असा पहिलाच करार आण शपथ जाहली आहे. उभयतां कारभारी व माधवराव जाधवराव व कृष्णराव येणेंप्रमाणें चौघे. त्यास खलबतांतील [मजकूर] फुटत नाहीं. सांगतही नाहींत त्यास श्रीमंत राजश्री नाना अंशेंकरून आह्मांस सांगत असतात. त्यास काल रात्रीं विनंती केली, त्यास शपथेसाठीं तपशीलवार सांगत नाहींत. परंतु आंतील भाव साष्टीसुद्धां आमच्या मनोगताप्रमाणें ठराव जाहला. श्रीमंत राजश्री दादासाहेबांचे समजुतीविशींचें बोलणें मुंबई-वाल्यांच्या विद्यमानें लागलें आहे तें ठरावांत आल्यास उत्तमच जाहलें, नाहीं तर या आठ दिवसांत तो प्रकार समजण्यांत यावा. बनत नसल्यास त्यांपासून झाडून इंग्रजानीं निघावें. उपरांतिक फौजा श्रीमंतांच्या पाठीवर जाव्या. जेथपावेतों इंग्रजांचीं बंदरें व ज्यांशीं सलूख इंग्रजाचा त्याणीं श्रीमंतांस जागा न द्यावा येणेंप्रमाणें बोलण्यांत आलें. इंग्रजास साष्टीविशीं देण्याचें मात्र काय ठरलें तें सांगितलें नाहीं. सारांश इंग्रजाचा ठराव जाहला. गुंता राहिला नाहीं. आठ दिवसां अलीकडे यादीचा ठराव होईल. यादी जाहली ह्मणजे सविस्तर लिहून पाठवितों. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. १८०४

श्री.

(१८ फेब्रु०)

पै॥ छ० ३ मोहरम. सुरू सन शीत सबैन.

मया व अलफ.

विज्ञापना. राजश्री भगवंतराव याणीं इतका मनसबा केला त्यास आधार काय? मनसब्यांत कोणी आहेत असा भास होतो. त्यास निरोप शिरोप बहुतांचे होते व आहेत. परंतु त्यावरच मनसबा केला ही गोष्ट

जाहली नाहीं. खानापुर राजश्री भगवंतराव यांजकडे होतें त्याविशीं आग्रह पताचा होता. याणीं सांगितलें कीं अशा प्रसंगांत खानापुरची गोष्ट काढूं नये. पुढें विचार करून होईल ह्मणून न ह्मणत असतां आग्रह करून सनद करून घेतली. त्यांस सनदेचा प्रकार समजतांच यांसीं येऊन बोललें कीं खानापुरची सनद दिलीत, आमची वाट काय? तेव्हां याणीं पडल्या फळाची परवानगी दिली कीं तुह्मी जरासे बळकट असलां ह्मणजे ते तुमच्या गळां पडणार नाहींत! इतक्या बोलण्यावरून (भगवंतरावानीं) व्यूह रचिला! शिलेदार (यांस) पुसावयासीं आले त्यांस सांगितलें कीं ते सरकारच्या लक्षांत आहेत. तुह्मी तिकडे गेल्यास चिंता नाहीं! " (त्यानीं) सरकारचें लक्ष सोडिलें. आतां उठोन येणें" ह्मटल्यास (शिलेदार) येत नाहींत! त्याणीं सरकार लक्ष सोडून मनस्वी करूं लागले. दोघे कारभारी. एकाने मनसबा चित्तानुरूप करून दुसऱ्याशीं सहजांत बोलले. असा मनसबा ज़ाहला. सारांश हिंदुस्थानांत सरंजामी यांचा सरंजाम तजावजा जाहला. आमचा सरंजाम निखालसपणें पेंचांत यावा असा मनसबा बूट बाहेर निघों लागले आहेत! ताराबाईप्रमाणें मनसबा वर्तणूक सारा प्रकार आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. १८०६ श्री.

(२२ फेब्रु०)

पै॥ छ० ३ मोहरम. सन शीत सबैन.

विज्ञापना. राजश्री हरीपंततात्याजवळ फौज चाळीस हजार जमा जाहली आहे. आतां तिकडे इतक्या फौजेचें प्रयोजन नाहीं.

---

१ सखारामबापूनीं. २ पत्र शिवाजी बाबाजीचें पांडुरंगरावास.

याजकरितां तिकडील फौजेपैकीं पांच सात हजार फौज आणवावयाची तरतूद जाहली आहे. पत्रें पाठवून फौज तिकडील आणवितात. पत्रें जातांच गुंता न पडतां फौज यावी याप्रमाणें योजून आणविणार. रास्ते वगैरे किरकोळ पथकें मिळोन पांच हजार आणवितात. श्रीमंत राजश्री भाऊस आणवावें ह्मणोन आह्मी बहुत प्रकारें सांगितलें, त्यास उभयतांच्या विचारास येत नाहीं. राजश्री हरीपंततात्याची पत्रें वारंवार येतात कीं ' आह्मास भरंवसा भाऊचा, दुसऱ्याचा इतबारच पुरत नाहीं, ' ह्मणून येतात; याजकरितां त्यांस आणवितां नये ह्मणून त्यांस आणवावयाचें राहिलें. रास्ते वगैरे आणवितात. इंग्रजाकडील वाकिलांपैकीं एक असामी मुंबईस गेली होती ती परवां आली. पहिलीं पत्रें आलींच होतीं. त्यास इंग्रज श्रीमंत असतां साष्टी वखारीस जागा मागत होते ती दिली नाहीं. आतां हातास चढली आहे तेंव्हां ओढून ताणून साष्टी आपणांकडे राहावी हें मुंबईवाल्याचें मानस आहे. सलुखास तर आतुर जाहले आहेत. साष्टी आमची आह्मांकडे दिल्याखेरीज आह्मी सलुख करीत नाहीं ह्मणून साफच जाबसाल इकडून आहे, याजकरितां ओढून धरिलें आहे. साष्टी दिल्याखेरीज हे सलूख करीत नाहींत. आठ पंधरा दिवस अधिक उणे लागतील इतकाच प्रकार. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. १८०६

श्री.

(२३ फेब्रु०)

पै॥ छ० ३ मोहरम सन शीत सबैन.

सेवेशीं[2] शिवाजी बावाजी. कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल ता॥ माघ कृष्ण चतुर्दशी भानुवासरे मुक्काम भिवडी वर्तमान

१ माधवराव बल्लाळ पेशवे हयात असतां. २ पत्र पांडुरंगरावास.

यथास्थित असे. विशेष. आपण पत्रें नाईकजी जासूद याजबरोबर पाठविलीं तीं पावलीं. लष्करांत जावयाच्या जासुदा समागमें पाठविलीं व रहिमतपुरच्या प्याद्या बरोबर पाठविलीं तीं सारींच पत्रें पावलीं. मजकूर सविस्तर कळला. पुण्याचीं पत्रें पुण्यास वरचेवर पाठविलीं. साऱ्याच पत्रांचीं उत्तरें रहिमतपुरच्या प्याद्या बरोबर पाठवितों. प्यादा पुण्यास गेला आहे. लष्करच्या जासुदास पत्रें लिहून देऊन व बातमीचीं पत्रेंसुद्धां लाखोटा करून दिला. श्रीमंत राजश्री हरीहरराव यांची रवानगी करावी ह्मणून लिहिलें होतें, त्यास श्रीमंत राजश्री चिंतामणराव यांसीं[1] किंचित् समाधान नाहीं याजकरितां चार दिवस राहिलीं होती. आज पत्रें आलीं कीं भौमवारीं प्रतिपदेस सासवडास येतों ह्मणून लिहिलें आहे. भौमवारीं आलीं ह्मणजे पुढें रवाना करून देतों. रा॥ रामचंद्र नाईकही आज निघोन लष्करास गेले. अतःपर मधीं मुक्काम न करितां मजल दर मजल तिकडे येतात. राजश्री भगवंतराव प्रतिनिधी करवीरकरांस सामील होतात तेव्हां अवघडच गोष्ट दिसते. राजश्री भगवंतराव यांजकडील कारकून येथें आले आहेत. हरएक प्रकारें विवेक करून घ्यावा या अर्थें आले आहेत. फौज मनस्वी ठेविली आहे त्याची तोड निघावयाची नाहीं. विना मातबर फौज त्यांजवर जरब बसेशी पाहिजे याची तरतूद येथून करितात. पंधरा दिवस लागतील. अलाहिदा पुरवणी पत्रीं लिहिलें आहे त्याजवरून कळेल. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

---

१ हरिहरराव व चिंतामणराव यांची आई व पांडुरंगरावाची स्त्री लक्ष्मीबाई पुण्यास माहेरीं भिड्यांकडे राहिली होती.

नं. १८०७ श्री.

[२३ फेब्रु०]

पै॥ छ० ३ मोहरम. सन शीत सबैन.

विज्ञापना. नबाब निजामअल्लीखान धारुराजवळ आले त्यांचीं पत्रें आलीं व त्यांजकडील रुकनुदौलाचे ऐवजीं वखारदौला हजार दीढ हजार फौजेनिशीं आले आहेत. श्रीमंताची भेट जाहली. [दौला याणीं] हत्ती वस्त्र दागिने नजर केले. त्यांस परवां सरकारच्या डेऱ्यास मेजवानी जाहली खलबतें जाहलीं. नबाबाच्या लिहिण्यांतील व त्यांच्या बोलण्यांतील भाव कीं " तुह्मी मनसबा कराल, आह्मास जिकडे या ह्मणाल तिकडे येतों, फौज पाठवा ह्मणाल तिकडे पाठवितों. " त्याजवरून ठरावांत आलें कीं नबाब निजामअल्लीखान यांणीं सुरापुरच्या रोखें यावें दहा हजार फौज चांगली निवडक राजश्री भवानराव यांच्या कुमकेस द्यावी. ती फौज व पंताची व आपली फौज राजश्री रामचंद्र गणेश व कोन्हेरराव सारे एकत्र करून करवीरकरसुद्धां राजश्री भगवंतराव सुद्धां पारपत्य करावें. येणें प्रमाणें ठरावांत येऊन नबाबाकडे पत्रें गेलीं. त्याची फौज आलमेज्याचे सुमारें यावी. राजश्री भवानराव याणीं विजापुरच्या आसपास जाऊन फौज सामील करून घ्यावी आणि उलटी स्वारी करावी असा सिद्धांत जाहला आहे. हा विचार घडलाच आहे. गुंता नाहीं. राजश्री भगवंतराव यानकडील कारकून आले आहेत त्यांच्या बोलण्यांतील भाव " आह्मी करवीरकरांस मिळाल्यास चिंता नाहीं. तुमचे असें समजावें. त्यांत शिरोन तुमचीं कामें करून देतों. तुमचें लक्ष आमचे ठायीं असावें राजश्री भवानराव यांची कुमक आपण करूं नये. आह्मी ते समजोन घेतों! " अशीं बोलणीं लागलीं आहेत. सिद्धांत ठरेल

१ पत्र शिवाजी बावाजीचें पांडुरंगरावास.

तो लिहून पाठवितों. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. १८०८ श्री.

[२४ फेब्रु०]

पै॥ छ० ९ मोहरम. सन शीत सबैन.

विज्ञापना[1]. ता॥ फाल्गुन शुद्ध पंचमी मंदवासरे वर्तमान यथास्थित असे. विशेष. वखारदौला नबाबाकडून आले होते त्यांस काल निरोप जाहला. नबाबाकडे जातात. नबाब सुरापुराकडे येणार. दहा हजार फौज श्रीमंत राजश्री पंताच्या कुमकेस आणविली आहे. लौकरच येईल. इंग्रजाकडील तहाचा प्रकार ठरावांत आल्याचा विचार काल पत्रीं लिहिलाच आहे. इंग्रजाकडील वकील काल भेटण्यास गेलेच होते. श्रीमंत खालीं किल्ल्यावरून डेऱ्यास आले होते. घड्याळी वगैरे जिन्नस उंच पाहिल्यापसून पद्धत आहे त्या प्रमाणें इंग्रजानीं नजर केला. यादीचा ठराव जाहला ह्मणजे लिहून पाठवितों. श्रीमंत राजश्री हरीहरराव परवां सासवडास आले. आज पुढें निघोन गेले. पालखी व उंट मागितला तो दिला. राजश्री रामचंद्र गणेश महादेवाच्या आसपास आहेत तों जाऊन मिळतील. श्रीमंत राजश्री पुरुषोत्तमराव दाजीचे कन्येचें फाल्गुन वद्य द्वितियेस लग्न सासवडास होणार. दाजीबा सोवनी बावधनकर यांच्या पुत्रास द्यावयाचा निश्चय जाहला. आपणास कळावें. उभयता कारभारी किल्ल्यावरच असतात. काम कारभारास डेऱ्यास खालीं परकी दरबारचा कारभार असल्यास येतात. निंबळककरांची वरात आपल्या नांवाची जाहली होती त्यास गांवावर समजोन घेणें. वरातदारास चिठी लिहोन घेतली होती ती विसरोन राहिली होती. हल्लीं पाठविली आहे.

1 पत्र शिवाजी बावाजीचें पांडुरंगरावास.

शहापूर व किल्लेनिहाय येथील मोकास बाबेचा ऐवज तोरगलास पावत असतो त्याची जप्ती करावीसी ठरोन आपल्या नांवें सनद जाहली ती पाठविली आहे. राजश्री अंताजोपंत मामास लिहून पाठवावें आणि ऐवज जप्त करवावा. श्रीमंत राजश्री कोन्हेरराव यासीं मिरजेच्या आसपास आणवावें. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना. श्रीमंत राजश्री पंतांस राजश्री जगन्नाथपंतानीं पत्र लिहिलें आहे. पावतें केलें पाहिजे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. १८०९ श्री.

(२४ फेब्रु०)

चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांसीं प्रती वासुदेव धोंडदेव. आशीर्वाद उपरी. येथील कुशल ता॥ फाल्गुन शु. पंचमी पावेतों मुक्काम मौजे ईसरवाडी प्रांत नवापूर यथास्थित असो. विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावलें. लिहिलें वर्तमान कळलें. इकडील वर्तमान तर श्रीमंत दादासाहेब सोनगडापलीकडे दहा कोस आहेत. इकडील फौज याच मुक्कामीं आहे. येथून आठ कोस नवापूर आहे. तेथून व्याईटें (?) ह्मणोन तीन कोस आहे. दोहीं जाग्यांस छबिनें नेहमीं राहतात. दोहीं फौजांचे मध्यें दहा कोसांचे तफावतीनें सोनगड आहे. घोशाच्या व हरिपंताच्या भेटी जाहल्या. युद्धप्रसंगाचा विचार पुरंदरची आज्ञा होईल त्याप्रमाणें करितील. प्रस्तुत दक्षिणचे यवनाचीच काळजी लागली आहे. उभयतां प्रतिनिधींची व कोल्हापुरची कलागत तमाम कलागतींतच मिरज प्रांतीं प्रतिनिधीनीं राखे केले. अशी पीडा जाहली आहे. आपणांस चहूंकडून काळजी लागली आहे. श्रीमंतांचे पुण्यें वडिलांच्या आशीर्वादें

निकोस. २ गंगाधरराव गोविंद.

पार पडेल तें खरें. पागा हत्ती उंटें शिलेदार सारे क्षेम आहेत. इकडील वर्तमान भाऊनीं आपणांस लिहिलें आहे त्याजवरोन कळेल. बाळाजी महादेव यांची रवानगी इकडे राघोबादादाची नवरी येईल तेव्हां करावी. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं. १८१० **श्रीगणराज.**

(२९ फेब्रु०)

अपत्यें पांडुरंगानें साष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ छ० ६ रबिलाखर पर्यंत यथास्थित असों विशेष. तोतयाकडील भ्रम तीर्थस्वरूप राजश्री भास्करपंतआप्पा व धोंडोबादादा आदिकरून बंधु मंडळीस त्याचा भ्रम विशेषच होता. यंदा तोतयाचा चळवळाट भारी जाहला. चिरंजीव राजश्री हरबाआण्णा– आज चार दिवस जाहले– येथून वे॥ काशीराव जरेडीकर यांस समाधान नाहीं, त्यांचे परामर्षास जातों, असा डौल घालून तोतयाकडे निघून गेले. आतां आण्णा तीर्थस्वरूप राजश्री दाजी जवळ ह्मणत होते जे ' आह्मांस टाकून गेले' असें सांगतात; परंतु न कळतां जाणें कळतच आहे! परंतु मोठें वाईट केलें. दरबारीं हे गोष्टीनें काय ह्मणतील हें चित्तीं न आणतां लावून दिलें! आह्मां सर्वांस हे गोष्टीचें संकट जाहलें. मोठी काळोखी आह्मांस लागली. पुढें कसें संकट दरबारांतून येईल हें नकळे. इलाज काय आहे? वृद्धपणीं आप्पानीं फारच डाग लावून घेतला! यांची बुद्धि गेली. पुढें कसें करावें? नेहमीं (यांचें तोतयाकडे) बातमी व लिहिणें आहेच. किल्याचा विषय. हें खरीं मोठें भय प्राप्त जाहलें! बहुत काय लिहिणें हे विनंती.

---

१ कुरुंदवाडकर रघुनाथराव नीलकंठ. २ पत्र परशुरामभाऊस.

नं. १९११ श्री.

(२६ फेब्रु०)

विज्ञापना. राजश्री रामचंद्र गणेश शिवरात्र श्री महादेवास करून दुसरे दिवशीं कूच करून पुढें गेले. येथून निकडीनें पत्रें गेलीं कीं जलदीनें जाणें. राजश्री रामचंद्र नाईकही तिकडे जावयास गेले. राजश्री भगवंतराव याचा कलह बंधूचा होता ह्मणोन कुमक करूं नये ह्मणोन आज पावेतों तसा विचार जाहला होता. आतां राजश्री भगवंतराव करवीरकरांस मिळाले. आतां गुंता तिळमात्र राहिला नाहीं. तेव्हां जे तरतूद करावयाची ती कारभारी करितात. नबाबाला लिहून फौज आणविली आहे. श्रीमंत राजश्री कोन्हेरराव यांस पत्र आपण पाठवून मिरजेच्या आसपास आणवावें. श्रीमंत राजश्री पंत विजापुराकडे गेले आहेत त्यांस जलदीनें आपण पत्रें पाठविलींच असतील. आले असल्यास उत्तमच जाहलें नसले आले तरी निकडीनें पत्रे घालून त्यांस आणवावें. ते व श्रीमंत राजश्री कोन्हेरराव येकत्र करावे. इतकीयांत राजश्री रामचंद्र गणेश पोहोंचतात, मिरजेस फौज आहे ती, येणेंप्रमाणें सारच जथ पाडून जसें बनेल तसें करावें, येणेंप्रमाणें उभयतांची आज्ञा जाहली आहे. आपणास पूर्वीं विनंती रहिमतपुरच्या माणसाबरोबर लिहून पाठविली आहे. अतःपर ज्या रीतीनें त्यांस पेंच पडे ती गोष्ट करावी. इकडील सारी फौज येकत्र जाहली ह्मणजे फार होईल. राजश्री भगवंतराव याजकडील फौजेंत दंगे फार आहेत. प्रांत आपला आहे. आसन्यानें सध्या फौजांनीं आपला आब राखोन कार्य होईल तितकें करावें. श्रीमंत राजश्री कोन्हेरराव यांस येकवेळां हिसका बसला तो फिरोन सावर ध्यावयासीं नवीन फौज आंत मिळाल्याखेरीज ठीक

पत्र शिवाजी बावाजीचें पांडुरंगरावास.

न पडे. ही तर रीत आपल्या मराठ्या फौजांची आहे. जर करून पोकळ लागल्यास मर्दपणास चुकावयाचे नाहींत. बरा तसा विचार दिसला तरी झाडास बांधिल्यानें झाडाचें झाड घेऊन जातील! मग सरदारांची वाट पाहणें कळतच आहे! उतावळी न होतां सरंजामाप्रमाणें जरब बसत बसत वजन त्यांजवर दिवसें दिवस पडे अशी गोष्ट जाहली पाहिजे आह्मांस सुचले ती विनंती लिहिली. तेथें जसा प्रसंग पडेल तसें आपण करितील व करवितील. तिकडील बातमी वरचेवरी कळावी ह्मणोन श्रीमंत राजश्री नानांनीं आज्ञा केली आहे याजकरितां पत्रें वरचेवर पाठवावीं. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. १८१२ श्री.

(२७ फेब्रु०)

विज्ञापना. गुत्तीकडील व हैदरखानाकडील मजकूर आपण तपशीलवार लिहिला तो कळला. या समयीं सेनापति याणीं फार शर्त केली. त्यांची निष्ठा श्रीमंतांच्या ठायीं आहे तेव्हां भगवंत पार पाडील. श्रीमंत राजश्री कोन्हेरराव तळ ढाळून घोडगिरी जवळ गेले ह्मणून लिहिलें तें कळलें. राजश्री रामचंद्र गणेशही गेले. करवीरकरांचा व राजश्री भगवंतराव ह्यांचा तपशीलवार मजकूर लिहिला तो कळला. इतकाही प्रकार श्रीमंत राजश्री नानास समजाविला. पत्रें बातमीचीं आलेलीं सारींच नानास दाखविलीं. 'मनसबा करणार जाणत!' ह्मणून विस्तारें आपण स्वदस्तुरें लिहिलें त्यास राजश्री भगवंतराव यांजकडे सूत्रें बहुतांचीं आहेत हें प्रमाणच. परंतु चार रुपये द्यावे असा प्रकार कोणचाच नाहीं. उत्कर्ष जाहल्यास ' आह्मी बोलिलोंच होतों. ' फजीत पावल्यास ' तेच

१ पत्र शिवाजी बावाजीचें पांडुरंगरावास.

पावले ' असा प्रकार. दुसरा प्रकार इतका व्यूह रचायाचें कारण कोठून जाहलें, काय मनसबा. पुढें पल्ला कसा काय, ये विशींचा प्रकार बारकाईनें ठिकाण लाविलें. श्रीमंत राजश्री नानाच्या निदर्शनास आणून दिलें. पाउलें उमगत चाललीं. ये विशींचा विस्तार पत्रीं लिहितां नये. व या समयीं आपणासही कळल्यानें विशेष नाहीं. समजावयाचे समयीं समजाऊं. देशास फौजा आल्यावरी सर्व अर्थ समजताल. बंदोबस्तही होईल. राजश्री भगवंतराव यासीं भरंवसा पुरता आहे इतकें समजण्यांत आलें. परंतु आतां विचार करून होईल तसेंच नीट जाहलें पाहिजे. राजश्री भगवंतराव याजकडील गृहस्थ आले आहेत यांचें आमचें बोलणें जाहलें आहे. सरकार उपयोगी, आमच्या उपयोगी, पुढें मनसब्यास ठीक, असा विचार बोलण्यांत आला आहे तो पक्का जाहल्यावर कारकून राजश्री भगवंतराव यांजकडे जाणार. परंतु आतां करवीरकरासीं मिळाले तेव्हां भरंवसा आहे न कळे! करवीरकर इचलकरंजी व कुरुंदवाडच्या गळीं पडणारसी आवाई आहे ह्मणोन लिहिलें तें कळलें. करवीरकरांची लाटेवर दोन हजार फौज मात्र आहे ह्मणोन लिहिलें तें कळलें. राजश्री भवानराव यांजकडील मजकूर बागेवाडीकडे गेल्याचा मजकूर व आपले त्याचें बोलणे जाहल्याचा मजकूर लिहिला तो कळला. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. १९१२ श्री.

(२७ फेब्रु०)

पौ। छ० १३ मोहरम सुरू सन सीत सबैन मय्या व अलुफ.

विज्ञापना. येथील कुशल तागायत फाल्गुन शुद्ध नवमी भौम वासरे वर्तमान यथास्थित असे. विशेष. करवीरकरांचें व राजश्री

भगवंतराव यांचें राजकारण लागलें होतें याजकरितां आपण पत्रें पाठवून श्रीमंत राजश्री मधानराव यांस आणविलें व श्रीमंत राजश्री कोन्हेरराव यांस आणविलें ही मोठी गोष्ट केली. करवीरकरांचें व त्यांचें राजकारण बनलें नाहीं व यादव व निंबाळकर व माने वगैरे पांच हजार फौज उठोन गेली. नांवाचे धणी गेल्यावर आणखी फौज फुटोन गेले असतील त्यास प्रतिनिधीचा व आपली फौज व रावं सुद्धां इतक्यानिशीं गांठ घालून राजश्री भगवंतराव यांचा रेंच पुरता मोडेसा असल्यास उत्तमच आहे. मोठ्या मजबुदीनें दमानें कार्य साधावें. त्यांचें कार्य जाहलें ह्मणजे करवीरकरांचें सहजांत होईल. दुसरा विचार– करवीरकरांचें व राजश्री भगवंतराव यांचें राजकारण न बनावयाचें कारण, हे भारी, ते थोडे, आपणांस तोंडांत टाकितील. हे अर्थ ध्यानांत आणून राजकारण बनलें नसेल. आतां ह्यांची फौज फुटली. आतां उभयतांस विचार पडेल कीं दोघे दोहींकडे राहिल्यानें निराळें निराळें पारिपत्य करितील 'त्यापक्षीं तुह्मी आह्मी एक जागा राहिल्यानें मजबूद होऊं.' तुमचा आमचा बचाव.' ते एक जाहल्यास आपण केवळ उतावळी करूं नये. नबाब वाजरेच्या पाण्यानें मजल दर मजल सुरापूर डावें टाकून येतात दहा हजार फौज पुढें रवाना करितात. या आठ दिवसांतच जवळ पास येतील. तेव्हां पुरें पारिपत्य उभयतांचें होईल. चिंता नाहीं. फौज फुटली. निराळे निराळे राहिले असल्यास पुरें पारिपत्य मनोगता प्रमाणें होयसें सांच्याचे विचारें ठरल्यास कार्य केल्यानें मोठीच गोष्ट आहे. राजश्री भगवंतराव यांजकडील कारकून येथें आले होते त्यासी नाद लाऊन फौज फुटावयाचे विचार उभयतांच्या विचारें जाहले होते. त्याप्रमाणें बोलणें होत होतें. त्या अन्वयें मानकऱ्यांपैकीं बरीच फौज फुटली. राहिली ती फुटेल. आपणास पत्र राजश्री भगवंतराव यांणीं काय ह्मणोन पाठविलें होतें? आपण

जासुदास मार दिला, आमच्या स्पर्ध्यास पाठीशीं घातले आहेत तेव्हा त्यांसुद्धां पारिपत्य करणें ज़रूर आहे, काय चिंता, ह्मणोन उभयता कारभारी यांस पत्रें भगवंतराव याणीं पाठविलीं. ' आज पावेतों सरकार लक्ष सोडिलें नव्हतें. आतां मिरजकरांनीं त्यांस आसरा दिला तेव्हां त्यांसुद्धां समज़ोन घेतों अशीं पत्रें आलीं. फ़ौज़ फुटल्याचे पूर्वींची पत्रें दमाचीं आहेत. फ़ौज फुटली, आतां हिंमत राहिली नसेल. वरचेवर तिकडील ल्याहावें ह्मणोन श्रीमंत राजश्री नानाची आज्ञा आहे त्याजवरून विनंती लिहिली आहे. श्रीमंत राजश्री पुरुषोत्तमराव दाज़ीचे कन्येचें लग्न फाल्गुन वद्य द्वितिया. शरीर संबंध राजश्री दाजीबा विसाजी कृष्ण यांजकडे असतात त्यांच्या पुत्रांस. त्याचें उपनांव सोवनी. सासवडांत लग्न होत आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. १८१४ श्री.

(२७ फ़ेब्रु०)

पै॥ छ० ७ मोहरम. सन सीत सबैन.

विज्ञापना. हक्क रुसुमाचा व दहकाचा वगैरे मजकूर आपण लिहिला तो कळला. त्यास तालुक्यांत दंगा, आह्मांस पैसा द्यावयास गांठ पडत नाहीं, ह्मणोन सांगितलें. वराता माघाऱ्या टाकिल्या. आपणाकडे तोफखान्याची मात्र वरात आली असल्यास पत्र लिहून द्यावें आणि आह्माकडे पाठवावें. जात नाहीं ह्मटल्यास वरातदार गांवांत सुखरूप राहतील. निंबळकची अडीचशें रुपयांची वरात- (गांव) वोस आहे- त्यास नानानीं आज्ञा केली कीं ' गावांवर वरात द्यावी. वस्ती जाहल्यावर वरात घेतील ह्मणून लिहावें.' आपल्या नावची वरात

१ शिवाजी बाबाजीचें पांडुरंगरावास पत्र.

आनंदीबाई
होती याजकरितां मना चिट्ठी घेऊन पाठविली आहे. आपण गावांवर चिट्ठी करून द्यावी. राजश्री हरीपंत तात्याकडील पत्रें येत असतात. घांटावरच आहेत. श्रीमंत राजश्री भाऊसाहेब घांटाखालींच आहेत. श्रीमंत राजश्री दादासाहेब ओढ्याचे पाण्यावर होते तें पाणी नासलें ह्मणोन तापीवर तसेच बैल खांदे जाहले हिंदुस्थानांत श्रीमंत सौ॥ आनंदीबाईनीं फौज ठेऊन भेलसें वगैरे महालांत दंगे फार केले होते. त्यास राजश्री त्रिंबकराव शिवदेव यांचे पुत्र गेले आहेत व विसाजी गोविंद चार हजार फौजनिशीं आले. सारे जमा होऊन बाईजवळ फौज मिळाली आहे तिचा रेंच मोडणार. जाट इकडील सलुखांत आहेत. त्यांजवर रोहिले आले होते तेव्हां होळकर व शिंदे यांस पत्रें आलीं. याणी फौज त्यांकडे पाठविली. जाट व ही फौज मिळोन रोहिल्यास मोडून दहा हत्ती, सात आठ तोफा, व लष्कर तमाम लुटलें. होळकराकडील फौज व जाट एकत्र आहेत. या लक्षाखेरीज जाट नाहींत. श्रीमंत राजश्री कोन्हेरराव यांजकडे पंचेचाळीस हजार रुपये दिले. त्याची यादी पाठविली ती पावली. दीड हजार वसूल करून पाठवितों ह्मणोन आज्ञा, उत्तम आहे. राजश्री रावजी कडील दोनशें रुपये वसूल करून राजश्री बापूजी नाईक यांजकडे पावते करावे ह्मणोन लिहिलें, उत्तम आहे. हुकेरी रुपये घेतले आहेत त्या प्रमाणें वरातेचा ऐवज आला ह्मणजे देतों ह्मणतात. हुकेरी दिले किंवा कसे तें लिहून पाठवावें. दुमाले यांचा प्रकार आपण लिहिला तो कळला. सरकारांत विनंती करून परभारें जाबसाल उगवून घ्यावा ह्मणोन सांगितलें. गुंता ठेविला नाहीं. पेशजी आह्मी यादी पाठविली होती त्याचा ऐवज वजा करून वराता करितील तत्राप एक दुसरी वरात चुकोन गेली तरी आह्माकडे पाठवावी. आह्मी समजावून दूर करूं. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. १९१५ श्री पांडुरंग प्र॥.

(२८ फेब्रु.)

(फाल्गुन शुद्ध१०)

पै॥ छ० ९ मोहरम. सन शीत सबैन. फाल्गुन मास.

श्रीमंत राजश्री तात्या

स्वामीचे सेवेसीं.

विनंती सेवक आनंदराव शेषगीर दोन्ही कर जोडून साष्टांग नमस्कार विज्ञापना ऐसीजे बुधवार प्रातःकाळ मुक्काम लष्कर दर जागा मौजे तांदुळवाडी वारणातीर जाणून स्वानंद लेखन आज्ञा केली पाहिजे. विशेष. स्वामीचा निरोप घेऊन आलों ते मौजे कवठें पिरान येथें वस्तीस राहून दुसरे दिवशीं पहिले प्रहरीं भगवंतराव यांच्या लष्करांत दाखल झालों. भोजन उत्तर दोन प्रहरा श्रीमंताची भेट झाली. वर्तमान त्यानीं विचारिलें तें सांगितलें. येथील वर्तमान बी॥ कलम.

१ भगवंतराव यांची शरीर भावना पूर्वीपेक्षां अधिकोत्तर. पोटास गुळ दिले होते त्यांतून पू निघत असतो. आपल्या आपण उठून बसावयाचा प्रकार राहिला. परस्वाधीन आयुष्याचे दिवस घालवितात. कलम १

२ सौ॥ उभयतां बाया सोमवारच्या रात्रीं दोन प्रहरा कांहीं चीज वस्त पागेचीं घोडीं असें घेऊन चिरंजीवाकडे[1] विशाळगडास गेल्या. समयाचे सोबती कोणी नाहींत! आपलाले मायेस गुंतून निघून गेल्या. कलम १

३ राणूजी नाईक निंबाळकर वगैरे व घाटगे याणीं श्रीमंत राजश्री भगवंतराव प्रतिनिधी यांसीं बोलिले जे, " करवीरकरांशी तुह्मी संधान

---

१ पांडुरंगराव.

करून तिकडेस मिळालिया आमचीं घरें रांडा पोरें देशीं सरकारांतून जप्ती ठेवून आमची अब्रू कशी राहील? परिछिन्न करवीरकरांकडेस आह्मी येत नाहीं. श्रीमंतांसीं झुजावें तरी आजपर्यंत शिबंदी झाली ते देणें. मग झूज करूं. तें न घडे तरी कोणत्या स्थळीं जात असाल तेथें पोहोंचवितों. भवानरावाच्या भेटीचा प्रसंग करीत असाल, तर भेटवितों. हें दोन्ही घडत नाहीं तेव्हां आह्मासीं निरोप देणें" ह्मणून आज चार रोज तट घातला आहे. कलम १

४ रामचंद्र गणेश यांजकडून कारकून पत्र घेऊन आला आहे त्यांतील आविर्भाव जे, करवीरकरांकडे तुह्मी सामील झालिया राजश्री सखारामबापूचें लक्ष चुकतें. आह्मास करवीरकरांचे पारिपत्यास त्यांनीं रवाना केलें आहे. ऐशास करवीरकराचें लक्ष न धरावें. आह्मी येतों भेटीनंतर उभयपक्षींचा मजकूर समजेल. त्यास त्याचें उत्तर दिलें कीं राजश्री बापूचें लक्ष तेंच आह्मास जरूर. भेटीचा योग घडून यावा ह्मणून. कलम १

५ या फौजेंतून जाधव व जगदेवराव निंबाळकर व गंगाजी राजे जितीकर भोंसले असे तिघे सरदार व किरकोळ तीन हजार परियंत छ० २९ जिल्हेजीं येथून गेले. त्या अलीकडे छ० ३ मोहरमीं पाठणकर चारशें जमांवानिशीं कऱ्हाडावरून जात होते. मार्गीं कऱ्हाडकरांनीं पाठणकरांचा हत्ती एक व कांहीं बुणगे व तट्टें पाडाव करून घेतलीं. कलम १

६ करवीरकरांकडे येथील एकांडे हुजरात शिलेदार दोन हजार फौज गेली होती. तेथें चाकरीचा बनाव बसला नाहीं. माघारे निघोन आले. आपल्या देशास जावें तरी वाटेचें या प्रकारें घडतें ह्मणून येथेंच

१ पटवर्धनांशीं अगर भवानरावाशीं.

आहेत. तेही जाणार. कलम १

७ श्रीमंत राजश्री पंतांकडून निरोप आला होता. शिवाजी थोरात स्वामीकडे त्यास दोनवार तेथें आला आहे. त्यास आणखी परभारें इकडून पंताकडेस कारकून जातात. आपाजी शामजी येथून गेला आहे. ऐशास संधान ज्या अर्थी करणें तें आपल्या विचाराखेरीज हरगीज होऊं नये. लोकांक स्वामींनीं उभयतां प्रातिनिधींचें रहस्य करून दिलें ऐसें जाहलें तरीच रहस्य करावें. तूर्त दोन रोज उतावळी करूं नये. वरचेवर जमाव येथील जत्रा फुटती. दिवसांत हुलड दोन चार वेळां लष्करांत पडती. दबाव राहून एक वेळ लोकांचें पारिपत्य करून रहस्य करावें. कलम १

८ माणको भैरव रहिमतपरकर यासीं स्वामीकडेस भेटी उभयताच्या होऊन विवेक करावा ह्मणून येथून रवाना करितात, त्यासीं किल्यांत येऊं न देतां बाहेर जावसाल उपेक्षेचा करून माघारा लावून द्यावा. रहस्य विना या फौजेतील हजार पांचशें तट्टें हिरावून घेतल्या खेरीज करूं नये. कलम १

९ लष्कर एकंदर हवालदील झालें आहे. यांत स्वामीस विनंती केलेली स्मरणांत आणावयाचा प्रसंग आहे. चित्तास येईल तें प्रमाण! कलम १

१० करवीरकरांकडे नाईकजी घाटगे व मोरो महादेव वगैरे पाठविले होते त्यास रामचंद्र गणेश यांचें पत्र आलें या करितां त्यांस ' उठून येणें. राजश्री कोन्हेरराव व रामचंद्र गणेश वगैरे जमा जाहले आहेत. एका दो रोजांत झूज होणार. पत्र पावतांच येणें; ' ह्मणून मंगळवारीं तिसरे प्रहरांत कारकुनाबरोबर पत्र देऊन पन्हाळ्यास घाडगे मजकुराकडे पाठविलें आहे. कलम १

११ या मुक्कामावरून माघारें दोन कोस जावें ह्मणतात. तुह्माकडील आवई लष्करांत फार! यांसीं थोडातरी चमत्कार दाखवावा! कलम १.

१२ श्रीमंत राजश्री पंतांचा[1] निरोप येथें आला होता जे बाबाचे स्वदस्तुरचें पत्र व सौ॥ राजसबाई ताई यांच्या नांवें पत्र आल्यानें दोनशें रावतांनिशीं येऊन राणोजी नाईक निंबाळकर यांचे मध्यस्तीनें भेटीचा योग घडेल. उभयतांचें पत्र यावें ऐसा करार, त्यास सौ॥ ताई येथून निघून गेलीं त्या अर्थी राणजी नाईक निंबाळकरास बोलणें लवाड ऐसें दिसून आलें. मागतीस ताईस आणविणार सत्य मिथ्या कळेना. कलम १

येणेंप्रमाणें स्वामींनीं एकांतीं मनन करून पत्र दुसरेकडे दृष्टीस न पडे ऐसें करावें. वरकड अर्थ चिरंजीव मुखत: निवेदन करितां श्रुत होईल. येथील जत्रो फुटून[2] गोपाळकाला होत आहे. बहुत काय लिहिणें कृपा वर्धमान असावी हे विज्ञापना.

लं. १८१६[3] श्री.

(१ मार्च.)

पै॥ छ० १४ मोहरम सन सीत सबैन.

सेवेशीं शिवाजी बाबाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल तागायत फाल्गुन शुद्ध ११ गुरुवासरे वर्तमान यथास्थित असे. विशेष. अलीकडे आपणाकडून पत्र येत नाहीं त्याजवरून श्रीमंत राजश्री नाना वारंवार पुसतात कीं ' तुमचें पत्र बरोबर यावें तें न यावयास

---

१ भवानराव प्रतिनिधीचा. २ जत्रा फुटणें = फौजेची पांगापांग होणें. ३ पत्र पांडुरंगरावास.

कारण काय! तर वरचेवरी तिकडील सविस्तर लिहावें ' म्हणून पत्र पाठवावें. व दुसरा प्रकार आज्ञा केली जे, राजश्री भगवंतराव याचे मातबर व (?) करवीरकरानीं ही जमाव करून चिकोडी तालुक्याचीं ठाणीं घेतलीं. राजश्री भगवंतराव व करवीरकर एकत्र व्हावयाचा मनसबा दिसों लागला याजकरितां मोठें सामान असल्याखेरीज ठीक पडणार नाहीं याजकरितां नबाबास पत्रें पाठविलीं. व वखारुद्दौला यासीं बोलून चालून रवानगी करून नबाबाकडे पाठविलें. नबाब सुरापुरच्या आसपास येऊन दहा हजार फौज पुढें पाठवावी येणेंप्रमाणें ठराव झाला आहे त्या प्रमाणें होईलच. गुंता नाहीं. इकडील मजकूर उभयतां तर एकत्र झाले नाहींत. व राजश्री भगवंतराव याची फौज फारकरून फुटली. चांगलें चांगलें माणूस आंतील निघालें. नथ विस्कळीत झाला. आपल्याकडील विचार श्रीमंत राजश्री पंताची फौज व मिरजेची व श्रीमंत राजश्री कोन्हेरराव व राजश्री रामचंद्र गणेशसुद्धां वीस हजारांचा अजमास जाहला त्यास गांठ मजबूतीनें घातल्यानें राजश्री भगवंतराव याचें पारिपत्य होईल असा विचार दिसतो. नबाबाची फौज आल्याचे पूर्वीं ही गोष्ट जाहल्यानें फार उत्तम आहे. नबाबाची फौज सामील जाहल्यानें यश त्यास येईल. याजकरितां जरकरून सार्‍यांच्या विचारें एकदिलपणें गांठ घातल्यानें कार्य साधेसें असल्यास जरूर करावें. म्हणोन आपणास लिहावयासी सांगितलें व श्रीमंत राजश्री पंतांसही लिहावयासीं त्यांच्या कार्यभागी यांसी सांगितलें त्याजवरून त्यांस राजश्री जगन्नाथपंत याणीं लिहिलेंच आहे. तरी साधेसें असल्यास जरूर जरूर नबाबाची फौज आल्याचे पूर्वीं जाहल्यास फार उत्तम आहे. परंतु पक्केपणीं होईलसें असल्यास करावें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

१ भवानराव प्रतिनिधीस.

नं. १८१७ **श्रीगणराज.**

(फाल्गुन शु० १२)
(२ मार्च.)

चिरंजीव राजश्री सुभेदार व गणपतराव यांसीं कोन्हेरराव त्रिंबक. आशीर्वाद उपरी. येथील कुशल ता॥ छ० ११ मोहरम संध्याकाळ दोन घटिका दिवस वर्तमान यथास्थित असे. विशेष. काल तिसरे प्रहरीं राजमंडळकरांची फौज तयार होऊन नीट चालून कुंभोजवर आली तेव्हां आह्मीं त्रिवर्ग फौजसुद्धां हिंगणगांवच्या पुढें राहिलों. दोहींकडील तोफा अस्तमानपर्यंत लागू होत होत्या. अस्तमान झाल्यानंतर येसाजी शिंदे निघोन वडगांवाकडे जाऊं लागले. आह्मीं पाठीवर आहों. येसाजी शिंदे निकड करून वडगांवास आले. मागाहून आह्मींही वडगांव नजीक येऊन वडगांवावर चालून घ्यावयाची मसलत केली, तों तेच नीट चालोन जरीपटकेसुद्धां चालून आले. डावे बाजूस श्रीमंत राजश्री पंत फौजसुद्धां उभे होते त्यांजवर प्रथमतः त्यांनीं तोंड टाकिलें. लढाई मातबरच झाली. आह्मीं व रामचंद्र गणेश उजवे बाजूस होतों. इकडून जाऊन गांठ घातली तेव्हां त्यांचा मोड झाला. व हत्ती एक मानसिंग खलाटे यांजकडे व घोडीं पांच सातशेंपर्यंत वगैरे पेंढारी याणीं पाडाव करून आणिलीं. शिवाजी भोंसले वगैरे नामी दहा पांच माणूस पाडाव आले. बळवंतराव पाटणकर यांस जखमा भारी लागल्या. येसाजी शिंदे निशाणा पाठीमागील ओळींत होता. हत्ती निशाणसुद्धां पाडाव केले ते समयीं शिंदा व कांहीं फौज निघोन गेली. तोफा आज त्यानें स्वारीबरोबर आणिल्या नव्हत्या. वडगांवीं ठेविल्या होत्या. श्रीमंतांचे पुण्येंकरून महद्यश संपादिलें. आह्मांकडील सारे खैर आहेत. कळावें बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

श्री.

नं. १८१८

(९ मार्च.

पै॥ छ० १७ मोहरम सन सीत सबैन.

सेवेशीं साष्टांग नमस्कार विनंती. तगायत फाल्गुन शुद्ध १९ इटुवासरे वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपण पत्रें तासगांवच्या जासुदासमागमें पाठविलीं तीं पावोन लिहिला मजकूर कळला. गुत्तीकडील वगैरे बातमीचें वृत्त उभयतांस श्रवण करून इंग्रजाकडील ठरावाचा मजकूर लिहून व बातमीचीं पत्रें श्रीमंत राजश्री भाऊसाहेबांकडे रवाना केलीं. श्रीमंत राजश्री नाना पुण्यास काल गेले. पंधरा दिवस तेथें संवत्सर प्रतिपदेपर्यंत राहातील. राजश्री रामचंद्र गणेश यांच्या जासुदाबरोबर छ० ९ मोहरमचें पत्र पाठविलें तें काल पावलें. सविस्तर कळलें. सारी फौज एकत्र जाहल्याचा प्रकार लिहिला तो कळला राजश्री भगवंतराव याचें राजकारण करवीरकरांकडे आहे खरें, परंतु बनत नाहीं. तत्राप बनलें तरी आतां दोघे मिळाले तरी दहा बारा हजार होतील. आपली फौज आतां भारी जमली. आतां यांच्या विचारें राजकारण करवीराकडील बनलें नाहीं तों गांठ घालून आधीं राजश्री भगवंतराव याचें पारिपत्य करावें. उपरांतिक करवीरकरांचें करावें. नबाबाची फौज न आल्याचे पूर्वीं दोन ही कार्यें साधावीं असें उभयतांचें मानस, त्या अन्वयें राजश्री रामचंद्रपंततात्यांस पत्रें गेलीं आहेत. सारांश उभयतां दुष्टांचें पारपत्य अविलंबें झाल्यानें राजश्री सेनापतींच्या उपराळ्यास फौज पाठवावी असें मानस उभयतां कारभारी यांचें आहे आपणास व राजश्री कोन्हेरराव जी यांस तर सेनापतीच्या कुमकेसाठीं मोठीच उत्कंठा आहे.

१पत्र शिवाजी बाबाजीचें पांडुरंगरावास. २ परशुरामभाऊंकडे गुजराथेंत ३ कारभारी बापू व नाना यांचें.

श्रीमंत राजश्री भाऊसाहेबाचीं पत्रें कारभारी यांसीं बहुत प्रकारें गुत्तीच्या उपराळ्यासाठीं येतात. आतां साऱ्या फौजांचा जथ तिकडेच पडला आहे. आपण तिकडील मनसब्याचा समारोप लौकर केला ह्मणजे गुत्तीकडे फौज पाठवावयाची आपल्या विचारें होईल ती पाठवावी ह्मणोन कारभारी लिहून पाठवितील. नबाब सुरापुराकडे आल्यावरी कर्नाटकांत शह पडेल, परंतु श्रीमंतांकडून फौज जाऊन उपराळा झाला ह्मणजे मोठी गोष्ट आहे. आपण ही सेनापतीचे बंधु, घरोबा श्रीमंत कैलासवासी रावसाहेबापासून चालत आला व तीर्थस्वरूप कैलासवासी वामनरावबाबा असतां त्यांनीं मोठीच अंगेजणी करून बचाव केला हें सर्व आपल्या ध्यानांतच आहे. होईल त्यास आपणही चुकत नाहींच. विनंती लिहावीसी नाहीं. तोरगलकरानीं लबाडी करून कृष्णाबाईचे गांव घेतले होते त्यांचें पारिपत्य झालें, मोठी गोष्ट झाली. तोरगलकरांचें पारिपत्य करावें असें मानस उभयतांचें आहे. यांत घडेल तें खरें. आतां तिकडे फौज भारी जमली आहे. या समयीं एक विचारानें जाहल्यानें चित्तानुरूपच कार्यें होतील. राजश्री भगवंतराव याचे शरीरभावनेचा प्रकार व फौज फुटल्याचा विचार राहिला तो कळला. आपण लिहिल्या अन्वयें राजश्री रामचंद्रपंततात्यांस पत्रें रवाना झालीं. पावतील. आपण श्रीमंत राजश्री पंतांसवें कोन्हेररावजींस आणून जथ पाडिला ही गोष्ट मोठी केली. आतां तर जथ चांगलाच पडला. आतां चिंता नाहीं. पत्रें वरचेवर पाठवीत जावीं ह्मणोन शब्द ठेविला, त्यास आह्मांजवळ जासूद चार असामी आहेत. त्यांपैकीं मिरजेकडे पाठवितों ते फिरोन तिकडे यावयास दिवसगत होते याजकरितां आणखी दोन जोड्या पाठविल्यास उत्तम आहे. चार दिवसांत पत्र पाठवीत जाऊं. प्रांताचे खराबीचा प्रकार लिहिला तो कळला. कितेकांचे

१ मुराररावानीं.

मतें आमचा तालुका चांगला निर्वेध जवळ असें होतें, आतां डोळे निवले! संकराजी घोरपडे यानीं धूम फार मांडली आहे. त्यांचें पारिपत्य होतें तरी फार उत्तम गोष्ट होती. राजश्री भगवंतराव याजकडील कारकून बोलण्यासाठीं आले होते त्यांचें बोलणें ठरलें नाहीं. आतां बोलावयाचें प्रयोजन नाहीं, प्रजा बुडाली, ह्मणोन लिहिलें, त्यास हे दिवस सुगीचे. बारा महिन्याचें अन्न. त्यांत घाला! रयतेचा इलाज नाहीं. कोळी याणीं दंगा फार केला होता. पुण्यापासून तीन कोसांवर रोखे आले होते. राजश्री विसाजीपंतदादा तळेगांवाजवळ आहेत. राजश्री विसाजी केशव फौज व पायदळ घेऊन कोळ्यांवर गेले. व नारो गणेश होळकराकडील, त्यांजकडील फौज चोहोंकडे पाठविली. व पांडुरंगपंत गडबोले व बापूजीपंत गाडदीसुद्धां. असा चोहोंकडून येलगार करून दोन तीनशें कोळी जिवें मारिले. कित्येक जखमी झाले. गांवचे हरसाल मिळाले होते रयतसुद्धां ते सारे फुटोन गेले. जिकडील तिकडे तारांगण झालें. आतां किल्ल्यासुद्धां बोली लाविली आहे. सारांश कोळ्यांचा बंदोबस्त जाहल्यासारखाच आहे. श्रीमंतांचें पुण्य विचित्र आहे. आपले आपण बंदोबस्त होत आहे. देशीं गडबड याजकरितां हरीपंततात्यांस पत्रें गेलीं होतीं कीं फौज तेथें फार आहे, कांहीं पाठविणें, त्याजवरून हुजरातपैकीं तीन हजार फौज पाठवितों ह्मणोन पत्रें आलीं आहेत. ' प्रांताची खराबी या प्रकारची झाली. दहकासाठीं वगैरे ऐवज द्यावयाचा असें मानस कारभारी याचें. जीवादारम्य श्रम करितो तें ईश्वरास विदित आहे ' ह्मणोन लिहिलें, त्यास तीन पिढ्या श्रीमंतांची सेवा एकनिष्ठपणें झाली ह्मणोन ईश्वर कृपा करीत आला. तिगस्तांपासून ज्या गोष्टी झाल्या आहेत त्या ईश्वरास मानवल्या त्या पक्षीं सर्व संकटें निवारण होतील! दुलगपणें आहेत तेच फजित पावतील यांत संशय

नाहीं कधीं कधीं हिसके बसतात त्यास इलाज नाहीं! सर्व निवारण होतील. संवत्सर प्रतिपदेपासून सर्व निवारण व्हावेंत असे योग आहेत. श्रीमंत राजश्री कोन्हेररावजींस युद्ध झाल्यापासून सरकारचीं पत्रें येत नाहींत ह्मणोन लिहिलें, त्यास पत्र येत नाहीं हें कशावरून लिहिलें? पत्रें उभयतांचीं व सरकारचीं मुजरत गेलीं आहेत. ते पत्रें पाठवीत नाहींत ह्मणोन उभयतां शब्द ठेवितात. 'लढाई बिघडली ह्मणोन पत्र पाठवीत नाहीं, त्याच लढाया मोठ्या मोठ्या बिघडतात. त्यांनीं चित्तांत कांहीं न आणावें. श्रमी कोणी व्हावें? पारपत्य करावयास समर्थ नाहीं त्यानीं श्रमी व्हावें! याणीं श्रमी न व्हावें. ह्मणोन बहुत प्रकारें आह्मांजवळ ह्मणत होते. य पत्रें लिहिलीं आहेत. कळावें. राजश्री रामाजी गोसावी येथें आले आहेत यांचें अगत्य मोरो हरीस त्या योगें बापूंस पुर्तेपणें अगत्य. याजकरितां त्यांस बोलावूं पाठविलें. न आल्यामुळें वृद्धांस मोठा राग आला. मसाला करावा ह्मणोन निश्चय जाहल्याचें वृत्त आह्मांस कळतांच जाऊन फार बोलिलों. श्रीमंतांच्या पत्राप्रमाणें मान्य असतां मसाला करावयाचें प्रयोजन काय? पत्राप्रमाणें मान्य असेल तरी यावें, पत्राप्रमाणें निर्गम करून घ्यावा. दरम्यान तुह्मीं बोलतच आहां. जास्ती जाहल्यास तुह्मीं मान्य करणें. परंतु त्यांस आणवणें. मसाल्याचा आग्रह होता तो राहविला. आह्मीं करार केला कीं पंधरा दिवसांत राजश्री त्रिंबक गोसावी यांसीं आणवितों. पंधरा दिवसांत न आले तरी चित्तास येईल तें करावें. त्याजवरून विनंती लिहिली आहे. तरी त्यांस पाठवावें. आह्मीं प्रसंगीं असतां जुलूम जास्ती अथवा गैर वाजवी होणार नाहीं. ते आल्यानें उत्तम. नाहीं तरीं मसाला करावयासीं चुकणार नाहींत. रामाजी गोसावी चार रुपये खर्च करावयास चुकत नाहींत. राजश्री धारराव शिंदे गुदस्तां श्रीमंत राजश्री कोन्हेरराव यांजपासून रुसोन आले

त्यापासून रिकामे इतराजीमधींच बसले होते. आतां तिकडे जावें येणेंप्रमाणें समजावीस आमचे विद्यमानें करून तिकडे पाठविलें आहेत. आपण रावजींस सांगोन पहिल्यापेक्षां ममता फार करीत ती गोष्ट जाहली पाहिजे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. १८१९ श्रीनाथजी.

(९ मार्च.)

आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत फाल्गुन वद्य चतुर्थी शनिवार प्रथम प्रहर रात्रीपर्यंत यथास्थित असे. विशेष. प्रस्तुत राजमंडळकरांचा मोड झाला. ईश्वरें श्रीमंतांस यश दिलें, वडगांवचें ठाणें हस्तगत झालें ह्मणजे त्याचें अवसान केवळ खत्ता जाहलें. मग करवीरास जावयास कांहीं अडथळा पडावयाचा नाहीं. यानीं फौज नेऊन मुलुखाचें रक्षण केलें तर उत्तम आहे. नाहीं तरी मुलूख लुटूं लागले तरी मग कांहीं पेंढारी रया राहूं देत नाहींत. गुळ्यांस तरी कोठें जावयास स्थळ आहे? बखेडे स्वामींच्या गांवीं इतका प्रकार मात्र आहे पेंढारी अनिवार. मुलखाचें मातेरें केलें. वडगांवचा तळ सोडून पुढें गेलेवर कोंकण्या खेडियांचा बचाव व्हावयाचा दिसत नाहीं. काय होणार असेल तें होवो. चिंता करून परिणाम नाहीं. सध्यां गरिबास भोग आला आहे! विवेक जाहला तर उत्तम आहे. विवेक न होय तरी मुलखाचें अगत्य कोणास आहे? राज्य बुडविलें! तो[२] आपल्या गुणास गेला. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे आशीर्वाद.

१ पत्र कोणी कोणास लिहिलें तें समजत नाहीं. २ येसाजी शिंदे.

लं. १८२०

श्री.

(६ मार्च.)

पै॥ छ० २० मोहरम. सन सीत सबैन. मय्या व अलफ.

सेवेसी शिवाजी बाबाजी. कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल तागायत फाल्गुन कृष्ण १ भौमवासरे वर्तमान यथास्थित असे. विशेष. अलीकडे आपणाकडील पत्र येत नाहीं. राजश्री भगवंतराव विशाळगडास निघोन गेले. फौज फारकरून फुटली. दोन हजार फौज राहिली ती राजश्री हणमंतभट घेऊन राजश्री येसाजी शिंदे यासीं जाऊन सामील जाहले ह्मणोन वर्तमान आहे. सविस्तर लिहावयासीं आज्ञा झाली पाहिजे. ज्या पक्षीं राजश्री भगवंतराव गेले हे प्रमाण असल्यास तो गुंता उरकला. आतां करवीरकरांचा मात्र गुंता. त्यांत जाऊन राजश्री हणमंतभट मिळाले आहेत त्यांसुद्धां आठ नऊ हजार फौज त्यांची. इकडील पहातां विसांत कमी नाहीं असा विचार दिसतो. दोन मजली पुढें गेल्यानें त्यांचा दम समजेल. जागा धरून राहिल्यास चार दिवस लागतील, त्यापक्षीं ठाणींठुणीं तमाम त्यांजकडील घ्यावीं. करवीरकरांच्या पारिपत्याचें आतां संकट नाहीं. परंतु गुत्तीकडील मजकूर पहातां केवळ घाईस आल्यासारखा प्रकार दिसतो. तिकडील कुमक झाल्याखेरीज त्यांचा बचाव होत नाहीं. नाहीं तरी जिवानिशीं जातील. स्थळ त्यांच्या हातास जाईल. याजकरितां तिकडील कसेंही करून कुमक झाली पाहिजे. नबाबाकडून पत्रें तेरदाकीच्या मुक्कामचीं आलीं.

१ पत्र पांडुरंगरावास. २ हणमंतभट हा भगवंतराव प्रतिनिधीचा सरदार. ३ मुराररावं घोरपडे सेनापती यांस हैदरअल्लीनें गुत्तीच्या किल्ल्यांत कोंडिलें होतें तिकडचा. ४ गुत्तीचा किल्ला हैदराच्या हातीं जाईल.

चार दिवस मोहरमासाठीं मुक्काम जाहले. याउपरी दर मजल सुरापुराकडून कृष्णेवर येतों ' ह्मणोन लिहिलें आहे. त्याची फौज इकडे दहा हजार कुमकेस आणविली होती, परंतु आतां प्रयोजन नाहीं. आतां त्यानीं रोख कर्नाटकाचा दाखवावा. येणप्रमाणेंच पत्रें येथून गेलीं आहेत. राजश्री सेनापतीस नबाबाचीं पत्रें गेलीं कीं आह्मीं आलों असें समजावें. ते जातील, परंतु कांहीं सरकारची फौज गेल्यानें युक्तीस पडते याजकरितां कारभारी यांचे मतें चार दिवसांत करवीरकरांचा फडशा जाहल्यास श्रीमंत राजश्री पंतांबरोबर पांच हजार फौज आणखी द्यावी आणि रवाना करावी हा विचार. करवीरकरांची चार दिवस गुंज बळाविलीसी जाहल्यास राजश्री रामचंद्र गणेश अथवा श्रीमंत राजश्री कोन्हेररावजींस पाठवावें. मातबर फौज गेल्यास स्वतंत्रपणें तुंगभद्रेवर जावी. थोडकी पांच हजार गेल्यास नबाबाच्या लगत्यास जावी. ह्मणजे सरकारची फौज पाठविली असें होईल व नबाबास पुढें जाणें प्राप्त होईल; असें यांच्या विचारें आहे. परंतु तिकडील अर्थ समजल्याखेरीज यांणीं लिहितां येत नाहीं. आह्मांसच आज्ञा केली कीं करवीरकरांचें पारिपत्य होऊन तिकडील उपराळ्यास राजश्री पंत गेल्यास वरकड फौज राहील इतक्यानिशींच पारिपत्य जाहल्यास उत्तम. पंतास जाणें ह्मणोन पत्रें पाठवितात. पंत येथील सांभाळी तसें असल्यास राजश्री रामचंद्रपंतास व रावजींस तिकडे जावयाविशीं पत्रें पाठवितील. पंत व दोघांतील एक राहिला पाहिजे तरी याचा विचार आपण सर्वत्रानीं तेथून करून पत्र पाठवावें ह्मणजे त्याअन्वयें सरकारचीं पत्रें पाठवितों. या समयीं राजश्री सेनापतीचा*

---

* पत्र इतकेंच अपूर्ण सांपडलें.

मं. १९२१ श्री.

(७ मार्च.)

पै॥ छ० २० मोहरम. सन शीत सबैन.

सेवेशीं शिवाजी बावाजी. कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल तागायत फाल्गुन कृष्ण २ सौम्यवासरे वर्तमान यथास्थित असे. विशेष. राजश्री सखारामपंतबापूनीं आपणास चिठी लिहिली आहे त्यांतील भाव काय कीं " राजश्री भगवंतराव यांजकडील जथ विस्कलित पडला. ते विशाळगडास गेले. राजश्री हणमंतभट दीड हजार फौजेनिशीं करवीरकरांस सामील झाले तत्राप त्यांसुद्धां करवीरकर आठ नव हजार होतील. आपली फौज वीस हजारांवर होईल. तेव्हां करवीरकरांचा रेंच मोडावयाचें संकट नाहीं. दुप्पट फौज आपली जाहली आहे. पहिल्यानें ठाणीं घ्यावयाचा मनसबा करितील तर करूं नये. आधीं त्यांच्या फौजेचा मुकाबिला घेऊन फौजेचा विसकट पाडावा. फौजेचा आब गेला ह्मणजे ठाणींठुणीं घ्यावयास संकट नाहीं. तिकडील मनसबा आहारीं आला ह्मणजे सेनापतीकडे फौज कुमकेस जरूर पाठविली पाहिजे याचा विचार जाहला पाहिजे. विना करवीरकरांचा जथ विस्कलित झाल्याखेरीज टिपून लिहितां येत नाहीं. याजकरितां तिकडील पत्रें येतात. उपराळयास फौज पाठवावयाची ती नेमून पाठविणार. " राजश्री भगवंतराव यानीं फौज फार ठेविली ही सखारामबापूच्या आसऱ्याखेरीज नसेल असें बहुत मतें. परंतु याणीं नबाबाकडील फौज आणविली व राजश्री रामचंद्र गणेश रवाना केले. याच्या चित्तांत तसा विचार असतां तरी तरतूद न करिते. तेव्हां तो दोष नाहीं. लोकांच्या सांगण्यावरून श्रीमंत राजश्री पंताच्या चित्तांत संशय आले असतील, आपली त्यांची भेटी

---

१ पत्र पांडुरंगरावास. २ कुमक पाठविण्यासाठीं गुत्तीहून.

जाहल्यापासून उद्गार निघालेच असतील, तरी आपण त्याचे संशय निकारण करावे. दुसरा प्रकार करवीरकराचे फौजेचा जथ विस्कलित जाहला ह्मणजे ठाणीठुणीं घ्यावयासीं व राहिला बंदोबस्त करावयासीं राजश्री रामचंद्र गणेश व श्रीमंत राजश्री कोन्हेरराव व आपली फौज आहे. पंताची फौज फार आहे, एक हातीं, याजकरितां त्यांसच गुत्तीकडे पाठवावें असा मनसबा आहे. याजकरितां इकडील भाव त्यांस न समजतां आपणच मनसब्याचे रीतीनें बोलतां बोलतां ' सेनापतीचा उपराळा जरूर जाहला पाहिजे त्यास पंत, आपण गेल्याखेरीज ही गोष्ट होत नाहीं. आपणास जावें लागेल. सेनापतीची कुमक जरूर जाहली पाहिजे. ' अशीं बोलणीं त्यांजवळ काढावीं. तेव्हां ते काय ह्मणतात हें समजलें पाहिजें. अगोदर बोलण्यांत आलें असिलें ह्मणजे याणीं लिहितांच जातील. गुंता पडणार नाहीं. नाहीं तरी याणीं लिहिलें आणि ते न गेले तरी याच्या मातबरीस अयोग्य. याजकरितां इतके विचार आपणास लिहावे ते इकडील अर्थ त्यांस कळों न देता घराऊ रीतीनें पंतासी बोलून त्यांचे भाव घेऊन लिहून पाठवितील. तुह्मीं येणें प्रमाणे लिहावें. आंह्मीं मोघम लिहितों, ह्मणोन चिठ्ठी लिहोन दिली आहे. तरी आह्मीं लिहिलें आहे. हे अन्वय सहजांत यांसीं बोलून खुलासा लिहून त्वरेनें पाठवावा. करवीरकरांचे फौजेसीं गांठ घालावयाची आतां दिवसगत नसावी असा यांचा विचार. श्रीमंत राजश्री नाना पुण्यास गेले आहेत. पंचमी करून यावें ह्मणोन पत्र यांचें गेलें आहे. पंचमी करून येतील. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. १८२२ श्री.

(फाल्गुन शु०)
(मार्च. प० पंधरवडा.)

पै॥ छ० १७ मोहरम सन सीत सबैन.

विज्ञापना. पत्रीं आज्ञा कीं ' इंग्रजाकडील तहाचा ठराव कसा झाला तो लिहून पाठवावा. ' त्यास परवां सिद्धांत ठरोन यादी जाहल्या. पहिल्यापासून वकील आल्यावर त्यांनीं आडमुद्दे फारच घातले होते. " साष्टी घेतलीच आहे. वसई द्यावी. श्रीमंतां समागमें सामान आपलें आहे त्यास ऐवज चाळीस पन्नास लक्ष रुपये लागले आहेत ते द्यावे, सुरत अठ्ठाविसांचे वगैरे महाल राजश्री फत्तेसिंगराव गायकवाड याजपासून महाल त्याच्या बचावासाठीं त्यानीं आह्मास दिले आहेत त्यांचा गुंता नाहीं. " असा फारच फैलाव होता. चार वेळां रुसवेही मधीं जाहले. निरोप ही मागत होते. कारभारी याणीं निरोप दिला. जितकें त्यानीं ओढावयाचें तितकें त्यानीं वोढिलें. याणीं थांग लागों दिला नाहीं. आणखी वोढून त्यांस कांहीं न देतां तह करावा असें मानस कारभारी यांचें होतें. परंतु तहाचें बोलणें सुरू होऊन दिवस फार झाले, फौजेस पोटास नाहीं, फौज फार हैराण, दिवस अखेरीचे येत चालिले, याजकरितां कांहीं इंग्रजांचें ऐकावें याजकरितां इतका विचार चित्तांत आणून तह करून घेतला. सर्वत्रांस पत्रें इंग्रजाकडील तह झाला इतकाच मजकूर कागदोपत्रीं लिहिला. यादी प्रगट केल्या नाहींत. परंतु आह्मीं श्रीमंत राजश्री नानास विनंती केली कीं " मिरजेस व श्रीमंत राजश्री भाऊसाहेब यांस लिहावें लागतें. संकलित अर्थ सांगावा. लिहून पाठवूं ते प्रगट करणार नाहींत. " त्याजवरून सांगितलें जेः—

१ शिवाजी बाबाजीचें पांडुरंगरावास पत्र.

१ श्रीमंतांपाशीं इंग्रज राहिले. शिबंदी भारी चढली. त्यापैकीं तोड मोड करून निदान बारा लक्ष रुपये इंग्रजास द्यावे—

६०००००	श्रावण मासीं.
३०००००	पेस्तर सालीं.
३०००००	तिगस्त सालीं.
१२०००००	येणेंप्रमाणें

बारा लक्ष रुपये द्यावे. शिबंदीचा गुंता उरकला. १

२ जहागीर मनस्वी मागत होते. राजश्री फत्तेसिंग गायकवाड यांचें व गोविंदराव यांचें विरुद्ध यानकरितां इंग्रजाकडे सूत्र लाविलें. ते समयीं पांच लक्षाचे महाल फत्तेसिंगांनीं दिले ते सरकारचे समजोन इंग्रजाकडेच रहावे. घेऊं नयेत. गोविंदराव गायकवाड यांसीं आसरा न द्यावा. फत्तेसिंगाचें साहित्य करावें. पांच लक्षांचे महाल दिले ते घेऊं नयेत व सरकारांतून कांहीं न द्यावें येणेंप्रमाणें ठरलें. फत्तेसिंग याणीं आपले वांटणीपैकीं महाल दिले तो द्यावयास कोण असें ह्मणोन

४ सुरत अठ्ठाविसी व गुजराथ पैकीं ठाणीं इंग्रजानीं घेतलीं आहेत तीं सारीं सोडावीं, बंदरें मोकळीं करावीं. १

५ श्रीमंतांची समजूत करावी. दरमहा पंचवीस हजार रुपये द्यावे. दोनशें माणूस शागीर्द पेशाचें, त्यांस सरसाल पंधरा हजार रुपये द्यावे. गंगातीरास ठेऊं तेथें रहावें. हजार पांचशें माणूस व हजार फौज बंदोबस्तास असावी. राजकारणें करूं नयेत. फौज जवळ आहे त्यांच्या चित्तास येईल तिकडे जावें. आबाजी महादेव, तुळाजी पवार, व खरगसिंग व नूरखान गाडदी यांचा जमादार येणेंप्रमाणें श्रीमंतांच्या राज्यांत राहूं नये. राज्य सोडून जावें. येणेंप्रमाणें ठराव. दहा दिवसांचा करार. न बनल्यास इंग्रजानीं आपलें सामान तोफखाना सुरतेस न्यावा. सुचना राजश्री हरिपंतास करावी. दहा कोसांचे तफावतीनें आपल्या फौजा असाव्या. फौजानीं समजोन ध्यावें. येणेंप्रमाणें

त्यांतच समजावीस पाडली.

३ साक्षी द्यावी परंतु एक वेळ पत्र पाठवून उत्तर कलकत्याहून आणून मग द्यावी. येणेंप्रमाणें ठरलें. १

ठरलें. सदरहू वर्तमान फारसें प्रगट करूं नये. हे विज्ञापना.

नं. १८२३ श्रीगणराज.

(फाल्गुन. व० ४)
(९ मार्च.)

* अपत्यें शिवरामानें साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० १८ माहे मोहरम पर्यंत यथास्थित असे. विशेष. इकडील राजकी वर्तमान पेशजी लिहिलें आहे त्याजवरून विदित जाहलेंच असेल. वडगांवानजीक करवीरकर यांचें व ती॥ रा० काकांचे झूज जाहलें. करवीरकरांचा मोड जाला. शिंदा पळोन पन्हाळेस गेला. दोन हत्ती व चार तोफा व पांचशें घोडे सांपडलें. एक हत्ती व जरीपटका प्रतिनिधीकडे सांपडला. दुसरा हत्ती खलाटे यांस सांपडला होता तो प्रतिनिधीची कलागत जाली सबब त्यांजकडेच दिला. घोडीं शिलेदार व पेंढारी यांस सांपडलीं. फारकरून जखमी व ठार कोणी जाहले नाहींत. वडिलांकडील कोणी जायां जखमी जाले नाहींत. झूज जालेनंतर ती॥ रा० तात्या फौजेसुद्धां आले. वडिलानीं मनसबा केल्यासारखें करवीरकराचें पारिपत्य चांगलेंच जाहलें. दुसरे दिवशीं वडगांवाहून कूच केलें नाहीं परंतु वडगांवानजीक पाणी नाहीं याजकरितां ठाणें सोडून पेठ जाळून तेथून कूच तिसरे दिवशीं करून कडोलीस आले. तें ठाणें लुटून फस्त केलें. करवीरकरांत

* शिवराव नीलकंठ पटवर्धन कुरुंदवाडकर यांचे वडील बंधु रघुनाथराव नीलकंठ यांस पत्र. १ कोन्हेररावाचें. २ येसाजी शिंदा.

गुळें फारच भरलें होतें. दोन चार हजार प्यादे व दोन हजार दीड हजार पर्यंत स्वांरही होते. एक दोन रोज तोफांचा मार जाला. तिसरे दिवशीं हल्ला केली. आदितवार पेठ घेऊन जाळून दरवाजेपर्यंत गेले. स्वामींचे मठाकडून हल्ला जाली तेव्हां पेंढारी याणीं मठ लुटला. गुळें आंत फारच भरलें होतें. बहुत नाश जाला. ते समयीं मठांतून गोळ्या उडाल्या मग निकड केली. होणार त्या सारखें मठांत नाश जाला. सर्वांचे मतें रक्षण करावयाचें होतें परंतु पेंढारी अनिवार, फारच नाश झाला. श्री स्वामी हसून पुरंधरास जाण्यास गेले आहेत. हल्ला जाहलेनंतर संध्याकाळ झाला. माघारे आले. शहरांत फारच गडबड झाली. दुसरे दिवशीं सारे ब्राह्मण मिळून वडिलांकडे आले. निशाण घेतों ह्मणून संधान लाविलें. तेच दिवशीं रात्री गांवांत कुमकही आली. परंतु गांवांत कांहीं दम नव्हता. श्रींचें व ब्राह्मणांचें क्षेत्र. गोळ्याने ब्राह्मण, बायका व गुरें मरूं लागलीं. प्यादे तटाचे आसऱ्यानें झुजणार. हल्ला केली तर शहर घेते, परंतु ब्राह्मणांची बाकी राहात नव्हती. असें संकट जाणोन करवीर सोडून कागलाकडे गेले. कागलाचे ठाणें बसविलें. तेथून ती॥ उभयतां व राजश्री रामचंद्र गणेश फौजेसुद्धा चिकोडीस गेले. हणमंतभट व भगवंतराव हजार पांचशें फौजेनिशीं कऱ्हाडप्रांतीं दंगा करूं लागले यास्तव प्रतिनिधि फौजसुद्धां कागलावरून कऱ्हाडाकडे गेले. वडिलानीं येलगुड, भोज, बोरगाव, दत्तवाड, एकसंबे, चिकोडी, खडकलाट वगैरे तमाम ठाणीं बसविलीं. कोणतें ठाणें झुजलें नाहीं. सेंडूर, मुरगुड वगैरे तिकडील ठाणीं चार रोजांत बसवून इकडे येणार. अकिवाट व शिरोळ, आळतें वडगांव चार ठाणीं राहिलीं आहेत तीं ही घेणार. उपरांतिक काय मनसबा घडतो पहावें. शिरोळांत हजार

१ कोन्हेरराव व पांडुरंगराव. २ भवानराव.

प्यादे व शेंदोनशें राउत आहेत त्यांनीं फारच लबाडी मांडली आहे. त्यांच्या मिरज प्रांतावर करून मिरजेचीं गुरें शंभर व बुबनाळचीं पंचवीस तीस नेलीं. वाण्यांचे पायमार्गी दहा वीस बैल नेले. जुगुळावर रात्रीं स्वारी गेली होती. गांवांत घुसले होते. परंतु गांवचे प्यादे व दांडगे मिळून मारून काढिले. बाहेर वाणी उतरले होते त्यांचे तीस बैल घेऊन गेले. गांवांतील पांच सात असामी जखमी झाले. यंदां गांवच्या भोंवतीं भिताड बांधविलेमुळें गांवचा बचाव झाला शिरोळकर नित्य स्वारीस निघूं लागले. आमच्या खेड्यांवर स्वारी केली यास्तव आमचे प्यादे शें दीडशें नेहमीं शिरोळचे उतारास चौकीस ज़ात होते. बातमी राखून शिरोळचीं गुरें शंभर आणिलीं. त्यांत कांहीं नांदणीचींही होतीं तीं सोडावीं लागतात. वडिलांकडून स्वार पन्नास रखवालीस येथें आणविले आहेत. सावधपणें आहों. सेंडूर वगैरे घेऊन फौजा इकडे आले नंतर मग चिंता नाहीं. अकिवाट व शिरोळ घेतले नंतर निर्वेध होईल. शिद्याचें[1] पारिपत्य यथास्थित जाहलें परंतु गुंज मोडली नाहीं. पन्हाळ्यांत व करवीरांत मिळोन पांच हजार फौज राहिली आहे. ते सल्ला करीत नाहीं तेव्हां या राज्यांत नेहमीं फौज राहिली तर उत्तम. ठाणीं घेतलीं त्यांपैकीं हरोली, हेरलें, बोरगांव, घोसरवाड, दत्तवाड, व सेंडूर इतकीं आह्मांकडे आहेत. रेंदाळ वगैरे मिळून हजार बाराशें प्यादे आहेत पुढें काय होतें पहावें. इकडील बंदोबस्त जाहल्यानंतर सत्वरच कर्नाटकांत जाणार आहेत. तिकडील वर्तमान हैदरनाईक गुत्तीस वेढा देऊन बसला होता. मुरारजी घोरपडे आंत होते. चार महिने चांगले लढले. बाहेरून कुमक नाहीं, हैदराचा मार भारी, आणि किल्ल्यावर पाणीही नाहींसें झालें, तेव्हां संधान लाविलें परंतु हैदरानें ऐकिलें नाहीं. फार निकड केली.

---

[1] करवीरकरांच्या राज्यांत.

तेव्हां किल्लेदार मुसलमान होता त्यानें सेनापतीस खालीं उतरून आणिलें. कबिले व कारभारी पेठेंत आले. टिपू फौजेसुद्धां किल्ल्यावर जाऊन बंदोबस्ती केली. हैदरखानाकडील लोकांनीं हजार पखाला लावून पाणी भरिलें. सेनापती हस्तगत झाले किंवा न झाले. बहुतकरून हस्तगत झालेच आहेत. त्यांनीं चौकी बसवून बंदोबस्त पक्काच केला. याप्रमाणें बित्तीम वर्तमान आलें श्रीमंताचे राज्यांतील कर्नाटकांतील मातबर सरदार हैदरानें बुडविला! मुलूख किल्लेसुद्धां शत्रूस हस्तगत झाले. याजउपर हैदर तुंगभद्रा उतरून येतोकीं काय पहावें. त्याचें सामान भारी आहे राजश्री रामचंद्र गणेश व तीर्थस्वरूप राजश्री तात्यासुद्धां दहा हजार फौज आहे. पेंढारी व लमाण मनस्वी मिळालें आहे. इकडील फडशा जाहलें नंतर पुढें तुंगभद्रेपर्यंत जाणार आहेत. गुत्ती झुजत होती तों पर्यंत निकड होती. परंतु मुराररावाची कुमकच झाली नाहीं याजउपर कोठपर्यंत जातात पहावें. श्रीमंत राजश्री भवानराव प्रतिनिधि यांनीं ती॥ रा॥ काकांस कागलचे मुकामीं मेजवानी करून कंठी व शिरपेंच व हत्ती बक्षीस दिला. वडिलांस कळावें यास्तव लिहिलें आहे. वरकड सविस्तर तें मागाहून लिहून पाठवितों. चिरंजीव राजश्री आपा खुशाल आहे. वडिलांच्या लष्करचा मुक्काम कोठें आहे तें, आणि तिकडील सविस्तर वरचेवर लिहिलें पाहिजे. आह्मीं सावध आहों. वडिलीं इकडील काळजी न करावी. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. १८२४

श्रीगणपति.

(फाल्गुन व०)

(मार्च. द्वु० पंधरवडा.)

पै॥ छ० ७ सफर सन सीत सबैन मु० लष्कर नजीक करवीर.

चिरंजीव राजश्री तात्यांस अशीर्वाद उपरी तुह्मीं छ० ६ मोहरमचीं पत्रें पाठविलीं तीं छ० १९ मोहरमीं पावलीं. सविस्तर मजकूर कळला. सारांश " आमच्या फौजेचा भरणा भारी जमला. आह्मी निघोन फौजेंत जातों. दोन महिने फिरतों. राजश्री भगवंतराव यांचें पारपत्य करून करवीरकरांचें पारपत्य मनोदयानुरूप करतों. " ह्मणून विस्तारें लिहिलें तें कळलें. ऐशास पुरंधराहून पत्र आलें त्यांतील अर्थ. " भगवंतराव याजपासून फौज सारी फुटोन गेली. खासा पळोन विशाळगडास गेले. हणमंतभट हजार दीड हजार फौजेनिशीं निघोन करवीराकडे गेले. राजश्री रामचंद्र गणेश व कोन्हेरराव व मिरजेची जमात एकत्र झाले. या उपरी करवीरकरांचें पारिपत्य करून गुत्तीच्या कुमकेस जातील. " तुह्मीं फौज फुटोन चालली ह्मणोन लिहिलें तेव्हां हेंही जाहलेंच असेल. करवीरकर खासा महाराज पन्हाळ्यास गेले, शिंदाही गेला, तेव्हां फौज धन्याखेरीज झुजत नाहीं. तथापि ते हांवभरी जाहले आहेत. एकदां लढाई होऊन नामोहरम होते ह्मणजे तुह्मांजवळ कितीही भरणा असता तरी चिंता नव्हती. तेथें काय घडतें न कळे. परंतु आमचे विचारें फौजेचा भरणा भारी मिळाला आहे व तोफखान्याचा सरंजामही सरकारचा चांगला आहे. आधीं शिरोळ व वडगांव कुंभोज वगैरे कागल आदिकरून सारीं ठाणीं घालावीं. एक करवीर क्षेत्राशिवाय सर्व जागे लहान मोठे ध्यावे. मग पहाडी स्थलें आहेत त्यांचे शहास गुंतों नये. स्थलें घेतल्यावर मग त्यांच्या फौजेचा पिछा करावा. फारकरून फुटलीच असेल. कांहीं राहातील ते किल्ल्यावर महाराजांजवळ जातील. तेही राजकारणी आहेत. खर्चा वर्चाची व तीर्थस्वरूप राजश्री कोन्हेरराव यांजकडील तोफा हत्ती घोडीं वगैरे नागावा व जिवाजी गोपाळ व चिकोडीहून गृहस्थ कैद करून नेले

१ गुजराथच्या स्वारींतून परशुरामभाऊचें पांडुरंगरावास पत्र.

आहेत ते सोडून देऊन आपला मुलुख वांचवितील. तुह्मींही फार आग्रहास पडूं नये. याचें कारण राज्यांत खुळें फार आहेत. श्रीमंत राजश्री भवानराव कांहीं दिवस राहून आपले बंदोबस्तास जाऊं लागतील. मध्येंच गेले तरी मनसबा नासेल. त्यांजवळ फौज फार आहे आणि भगवंतराव यांचा शह त्यांचा उलगडल्यावर फौजेचा खर्च कशावर देतील? तेव्हां निकाल काढितील असें दिसतें. रामचंद्र गणेश व कोन्हेरराव व आपण त्रिवर्ग मंडळी एके विचारें राहून कार्य जाहल्यास दहा बारा हजार फौज व दोन तीन हजार पायदळ व बारा पंधरा तोफा ह्मणतां सरंजाम कांहीं थोडा नाहीं. परंतु राजश्री पंत आंत होते आणि गेले इतकें मात्र उणें पडेल. यास्तव चाळीस पन्नास हजार रुपये पंतांस खर्चास देऊन महिनाभर ठेऊन घेऊन सारें कार्य करून घेऊन समाधानें त्यांसीं लावून द्यावें. पुढें गुत्तीच्या उपराळ्यास तीर्थस्वरूप राजश्री कोन्हेरराव व रामचंद्र गणेश जातील. पंतांचा सरंजाम आपले बंदोबस्तास जातील असें दिसतें. व असें जाहल्यास चांगलें. तुह्मीं (मिरज) बाहेर निघणार हे मोठी चिंता लागली आहे. चवेघ चहूं घरचे एक चित्तें चालणार नाहींत. आपणास साऱ्यांचीं आर्जवें करावीं लागतील. खर्चासाठीं नित्य रड गातील तेव्हां खर्चाची तरतूद करून द्यावी लागेल. खर्चास घेऊन कार्य मनोदयाप्रमाणें जाहल्यास चिंता नाहीं. तुह्मीं बाहेर निघालां आहां. बहुत सावधतेनें काम करावें. दुसरें पत्र आपणाकडील येई तों मोठी चिंता लागली आहे. संक्राजी घोरपडे बागडकोट तालुक्यांत फौजेनिशीं फिरत आहे त्याचें पारपत्य व्हावें. करवीरकरांचा फडशा जाहला ह्मणजे एकवेळ मुधोळकरांचें पारिपत्य यथास्थित जाहलें पाहिजे. कर्नाटकांत फौज जाईल तेव्हां तेंही घडेल. करवीरकरांचें राजकारण आल्यास फार हट्टास पडूं नये. रुपये चार कबूल केल्यास पुढील कार्यावर नजर देऊन विल्हेस लावावें ह्मणजे

कर्नाटकांत फौज जावयासीं ठीक पडेल. जों गुत्तीचा फडशा झाला नाहीं तों फौज जाऊन कुमक जाहल्यास लौकीक फार होईल व शत्रूही नामोहरम होईल. यांत जसें येथील समयास घडेल तसें करावें. अलीकडील काय वर्तमान तें लिहावें. करवीरकरांचें पारिपत्य जाहल्याचें पत्र आल्यावांचून समाधान होत नाहीं. तों पावेतों मोठी चिंता आहे. इंग्रजाकडे व श्रीमंतांकडे पुरंधराहून पत्रें आलीं आहेत तीं पाठविलीं आहेत परंतु अद्यापि जाब आला नाहीं. राजश्री हरीपंततात्या अद्यापि घांटावर आहेत. जाब आल्यास खालीं येतील. पुरंधराकडे कोळ्यांनीं फारच दंगा केला होता त्यास तोही शमला ह्मणोन पुरंधराहून लिहिलें आहे. श्रीमंतांचें पुण्य विचित्र आहे. सर्व यथास्थित होईल. विचारें पहातां श्रीमंत दादासाहेबही तह करितील. दूर भडकून जाणार नाहींत असें वाटतें. यांत श्रीसत्ता प्रमाण! बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे आशीर्वाद.

नं. १८२६ श्रीगणराज.

(फाल्गुन व० ८)

(१३ मार्च.)

चिरंजीव राजश्री भाऊ व राजश्री बळवंतराव यांसीं प्रती कोन्हेरराव त्रिंबक. आशीर्वाद उपरी येथील कुशल तागायत छ० २२ मोहरम सोमवासरे मुक्काम नजीक वडगांव वारणा दक्षिण तीर वर्तमान यथास्थित असे. विशेष. अलीकडे तुह्मांकडून पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं तर सदैव पत्रीं सकळार्थ लिहून संतोषवीत असावें. यानंतर इकडील वर्तमान आह्मीं बागेवाडी परगणे हुकेरी येथें फौजसुद्धां पंधरा दिवस होतों. श्रीमंत राजश्री भवानराव प्रतिनिधी कराडाकडून कृष्णातीरास मिरजेनजीक

आले. त्यांचीं पत्रें आह्मांस यावयाविशीं आलीं व चिरंजीव राजश्री तात्या यांचींही आलीं त्याजवरून आह्मीं फौजसुद्धां ढवळी नजीक मिरज येथें आलों. श्रीमंत राजश्री पंत यांची भेट छ० ३ मोहरमीं ढवळीच्या मुक्कामीं घेतली. त्यानंतर ढवळीच्या मुक्कामाहून पंत आह्मीं मिळून उदगांव कृष्णा दक्षिण तीरीं आलों. तेथें आठ दहा मुक्काम होते. राजश्री भगवंतराव वीस पंचवीस हजार फौज जमा करून स्वराज्यांत मनस्वी उपद्रव करून खंडण्या घेत फिरत होते. जिकडे श्रीमंत पंत जातील तिकडे पाठीवर जात होते.. पंतांची फौज दहा हजार. त्यांची फौज भारी. यास्तव पंतानीं त्यांची गांठ पडूं न देतां मिरजेच्या सुमारें पंत आले. भगवंतराव फौजसुद्धां तांदुळवाडीवर राहिले. त्यांस रोग प्राप्त होऊन अवस्था कठीण दिसूं लागली तेव्हां त्यांस मसलत भारी पडली. पंत व आह्मीं मिळालों. पुण्याहून राजश्री रामचंद्र गणेश फौजसुद्धां आले. येणें प्रमाणें इकडे पंताचा जथ पडूं लागला या मुळें भगवंतरायाकडील फौज दररोज फुटोन जाऊं लागली. करवीरवासी यानीं भगवंतराव यांजकडे संधान लाविलें. ‘ फौज कुमकेस पाठवावी. काम काज झाल्यानंतर ऐवज द्यावा, ’ या प्रमाणें राजकारण लाऊन त्यांजकडील राजश्री हणमंतभट यांस चार पांच हजार फौजेनिशीं करवीरकरानीं आणिलें. भगवंतराव यांची अवस्था कठीण झाली तेव्हां तांदुळवाडीहून उठोन हजार पांचशें फौजेनिशीं मलकापुरास गेले. वरकड फौज जिकडील तिकडे उठोन गेली. आह्मीं उदगांवावरून कूच करून पुढें यावयाचा मनसबा होता तों राजश्री रामचंद्र गणेश अडीच हजार फौजेनिशीं तोफा पांच लहान चार व थोर एक उदगांवच्या मुक्कामास आले. त्यांच्या व श्रीमंत राजश्री पंत यांच्या आमच्या भेटी जाहल्यानंतर उदगांवावरून कूच करून कवठें- येथील मुक्कामास आलों. आमची

फौज आली हे पाहून हणमंतभट यांजकडील लोकांनीं गवगवा करून लोक उठोन गेले. हणमंतभटही निघोन गेला. करवीरकर पांच सात हजार फौज जमा करून वडगांवास होते आह्मीं कवठें सार येथाल मुक्कामास आल्या नंतर छ० १६ मोहरमीं येसाजी शिंदे हे फौज तोफांसुद्धां चालोन तिसरे प्रहरीं कुंभोजे नजीक आले. आह्मींही तयार होऊन गेलों. इकडील तोफा सुरू झाल्या. ते दिवशीं अस्तमान पावेतों गोळागोळी झाली. अस्तमान झाल्यावर येसाजी शिंदे निकाल काढून वडगांवाकडे जाऊं लागले तेव्हां आह्मीं तिन्हीं पथकेंसुद्धां पाठीवर चालिलों. खोचीचे (?) मुक्कामास करवीरकर आले. त्यानीं घोड्यांवरील जिन उतरले. आह्मी ही पाठीवर आलों. तेथें बाणांचा मार व तोफा गोटावर सुरू केल्या त्यावरून तेथून फौज पांच सात हजार फुटोन कांहीं कांहीं बागणीचे सुमारें गेली. येसाजी शिंदे यांजकडील फौज तेथून निघोन जलदीनें वडगांवास आले. तों आह्मीं तिन्हीं पथकें व तोफांसुद्धां सूर्योदयास कवठे भादोलेस आलों. तों पेंढारी पुढें गेले होते. त्यानीं पेंढारी यांजवर शें पन्नास राऊत पाठविलें. पेंढारी यांस पिटून काढिले. आह्मीं सडे पुढें आलोंच होतों. तों राजश्री रामचंद्र गणेश व राजश्री पंत यांस सांगून पाठविलें जे येसाजी शिंदे फौज व तोफा सुद्धां वडगांवावर आहेत. त्यावरून त्यानीं फौज जमा करून पुढें यावें तों येसाजी शिंदे यांनीं वडगांवावरून तीन चार हजार फौज व दोन हत्ती ऐसे गठूनच आले. आह्मीं व जरीपटका पंताचे उजवे बाजूस होतों. तों आधीं तोफांचे बार दोन झाले. इतकेंत येसाजी शिंदेसुद्धां पंताचे फौजेवर येऊन टकरले. पंताची फौज अगदीं माघारी सरली. तों जरीपटका व आह्मीं फौजेसुद्धां पाठीवर जाऊन मारामारी केली. तेव्हां शिंदे यांची फौज अगदीं मोडली. जरीपटके करवीरकरांचे दोन, नौबती दोन, या प्रमाणें पाडाव जाहले.

लढाई त्यांची अगदीं बिघडली. पंतांकडील दहा पांच ठार घोडा व माणूस जखमी वीस येणेंप्रमाणें झालीं. आमचे फौजेंतील घोडीं माणसें मिळोन जखमी दहा वीस. तैसेंच रामचंद्र गणेश यांचेंही. या प्रमाणेंच जाहलें. करवीरकरानीं चालून येऊन चांगली शिपाईगिरीची शर्त केली. इराणी अथवा गिलजे या प्रमाणें टकरणार नाहींत अशी शिपाईगिरी केली. आमचे जरीपटकेकडील लोकांनीं चांगली केली. ईश्वरें एकदां यश दिलें. पुढें मनसबेची रीत ह्मणावी तर रामचंद्र गणेश व रामचंद्र नाईक कारभारांत आहे त्यापक्षीं पंतास व आह्मांस एक विचारें चालवावें ऐसें होणें कठीण! नाईकांचा व पुरंधराकडील गृहस्थ आले आहेत त्यांचा कारभार एक प्रकारचा, पंतांचा कारभार एक प्रकारचा, व तुह्मांस ठाऊकच आहे. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे आशीर्वाद.

नं. १८२६ श्री.

(१३ मार्च.)

पै॥ छ० २६ मोहरम सन शीत सबैन मया व अलफ.

सेवेशीं शिवाजी बाबाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल तागायत फाल्गुन वद्य अष्टमी बुधवासरे मुकाम साप वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपण पत्रें छ० १७ मोहरमचीं पाठविलीं तीं काल सालण्यास दोन प्रहरीं पावलीं. सविस्तर मजकूर कळला. युद्धाचा प्रकार विस्तारें कळला. रामचंद्र गणेश व राजश्री कोन्हेररावजीचीं पत्रें सांडणीस्वांगबरोबर युद्धाच्या मजकुराचीं रवाना झालीं तीं अडीच दिवसांत पुरंधरास पावलीं सविस्तर मजकूर कळला याजकरितां हीं पत्रें यांजकडे पाठविलीं नाहींत. आह्मांस उभयतां कारभारी यांणीं आपणाकडे

१ पत्र पांडुरंगरावास.

व श्रीमंत राजश्री पंताकडे रवाना केलें आहे. आपल्या विचारें पंताशीं बोलावें. आपल्या आमच्या विचारें ठराव करून कारभारी यांजकडे गेलें पाहिजे. त्यास आपण लष्करांत गेल्यास उत्तमच झालें नसल्यास आपण लष्करास त्वरेनें यावें. आपली गांठ पडोन बोलणें चालणें होईल तें पुरंधरास कळल्याखेरीज त्यांचें चित्त स्वस्थ रहात नाहीं. याजकरितां आपण फार लौकर यावयाचें करावें. भेटीनंतर बारीक मोठे सरेच अर्थ समजतील. युद्ध झालें, शिंदा मोडला, येणेंकरून कारभारी यास मोठा संतोष झाला. आतां तिकडील बंदोबस्त करून पांडुरंगराव फौजेचा(?) उपराळा करितील तरी मोठी गोष्ट होईल असें ह्मणत होते. पत्रेंही रवाना झालीं होतीं. पावलीं असतील. पालखी व उंट मिरजेस आहे तो लष्करांत पाठविला पाहिजे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. १८२७ श्रीगणराज.

(फाल्गुन व० १०)
(१९ मार्च.)

पै॥ छ० ६ सफर.

तीर्थस्वरूप राजश्री भाऊ वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें[1] पांडुरंगानें साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ० २४ मोहरम पावेतों यथास्थित असे. विशेष. करवीरकरांशीं लढाई झाली, शिंदा मोडला, हें वर्तमान सविस्तर लिहोन मुजरद्द जोडी आपणाकडे रवाना केली आहे त्यावरून सविस्तर कळलें असेल. या अलीकडील वर्तमान वडगांवास तोफा लाविल्या आहेत त्या तोंडीं फौजेस पाणी वडगांवा बाहेर नाहीं. याजमुळें तेथून कूच करून आद कोसावर वारणेवर

१ गुजराथच्या स्वारींत परशुरामभाऊ होते त्यांस पांडुरंगरावाचें पत्र.

पाहिल्या तळावरच येऊन मुक्काम झाला. लढाई होऊन आज आठ दिवस झाले. सा मुक्काम तर वारणेवरच झाले. त्यांत एक दिवस राजश्री भवानराव प्रतिनिधी यांचेथें श्राध्ध याजकरितां मुक्काम. बाकी पांच रोज " आह्मीं लष्करांत जावें, मग कूच मुक्काम व पुढील मनसबा कर्तव्य तो करावा, तों पर्यंत कूच करीत नाहीं, " ह्मणोन राजश्री पंतानीं आड घातला. तेंव्हां राजश्री रामचंद्र गणेश व तीर्थस्वरूप राजश्री कोन्हेरराव यांच्या चिठया नित्य येऊं लागल्या कीं " आपण आल्याशिवाय कोणासही मसलत सुचत नाहीं. आपण आल्याशिवाय पंत प्रतिनिधी कूच करीत नाहींत यास्तव आपण यावें " ह्मणून पत्रें येऊं लागलीं. राजश्री पंतानींही सांगून पाठविलें कीं " आह्मीं तुमच्या गोष्टीवरून यांजबरोबर आलों. तुह्मीं यावें. आणि आह्मांस समागमें न्यावें अथवा निरोप द्यावा. " त्यावरून दुसरेच दिवशीं जावें तर दिनशुद्धि नव्हती. तिसरे दिवशीं व्यतिपात. चवथें दिवशीं वर्ज्यवार. याजमुळें तीन दिवस गेले. आज मुहूर्तें करून निघोन लष्करास गेलों. राजश्री गंगाधरपंत फडणीस यांजबरोबर जमाव अगोदर रवाना केलाच आहे. आज आह्मींही निघोन गेलों. वारंवार लष्करचा मुक्काम होतो, त्यास आह्मीं खामखा येतों ह्मणोन लिहोन पाठविलें. त्यावरून काल कूच करून पंचगंगेवर कडोली पारगांवच्या मुक्कामास गेले. करवीरकरांचा जमाव चार हजारांपर्यंत पन्हाळ्याच्या माचीस आहे. फिरोन समरांगणीं येऊन मुकाबला त्यांनीं द्यावा ही जुरत त्यांत राहिली नाहीं. संधाना-करितां लष्करांत त्यांजकडून वकील आले आहेत. आह्मीं गेल्यानंतर सर्व समजेल. मागाहून सविस्तर लिहून पाठवितों. राजश्री पंतांस पंधरवड्याची बेजमी खर्चाची केली होती त्यास अमावास्येस पंधरा दिवस भरतात. पुढें मागती खर्चास द्यावें लागतें तें परभारें राजश्री रामचंद्र गणेश यांनीं

द्यावें या प्रमाणें केलें आहे. सरकारचीं पत्रें व उभयतां कारभारी यांचीं पत्रें आह्मांस येतात कीं " मसलत यथास्थित करून करवीरकरांचें पारिपत्य बरे वजेनें होऊन गुत्तीच्या उपराळ्यास साऱ्या फौजा जात तो प्रकार करणें; " ह्मणोन लिहितात. आमच्याही चित्तांत हेंच आहे. इकडील गुंता उरकतांच राजश्री राव सेनापतीच्या उपराळ्यास साऱ्या फौजा जावयाच्या यत्नांत आहों. गुत्ती अद्याप लढत आहे. आणखी महिना पंधरा दिवस दम धरल्यास उपराळाही होईल. पांच सात मजली फौजा गेल्यानंतर हैदरखान वेढा उठवून पट्टणासच जाईल. शंकराजी घोरपडे व मालोजी घोरपडे उभयतां मुधोळांतच आहेत. फौज बिलगीवरच होती ती माघारी आणविली. येसाजी शिंदा मोडल्यापासून मुधोळकर नरम आहे. राजश्री नागोजीरावनाना येथेंच आहेत. करवीरकराचा रेंच चांगलाच मोडला, परंतु एक हातीं कारभार असता तर सर्वही लौकरच उरकतें! सारा बंडाळीचाच कारभार! कोणी कोणाचें ऐकत नाहीं. पैका देणेंस कोणी आहे तों या फौजेच्या नेटानें हैदरही उठोन जातो. करवीरकरांकडील गुंता उरकल्यावर सविस्तर तपशीलवार लिहून पाठवितों. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विनंती.

नं. १८२९ श्री.

(१६ मार्च.)

चिरंजीव राजश्री तात्यासाहेब यांसी प्रती वासुदेव धोंडदेव. आशीर्वाद उपरी येथील कुशल तागायत फाल्गुन वद्य एकादशी पावेतों मुक्काम हसरवाडी यथास्थित असे. विशेष. आपण पत्र पाठविलें तें

१ गुत्तीकर मुरारराव घोरपड्यांचा कारभारी. २ पांडुरंगरावास पत्र गुजराथच्या स्वारींतून.

पावलें. भाऊंचीं पत्रें वाचून पाहिलीं सविस्तर वृत्त कळलें. इकडील वर्तमान तर इंग्रजांचे वकील आले, श्रीमंताकडे याच वाटेनें गेले. समागमें येथून सरकारचा कारकूनही दिला. पुरंदरची आज्ञा होती जे, " वकील तुम्हांस भेटून पुढें जातील. तुम्हांस व श्रीमंतांस तफावत फार आहे. हलके हलके बारी उतरून सोनगडास दाखल होणें. इंग्रजांचें पत्र दादांचें सलुखाचें आल्यास उत्तम. नाहीं तर इंग्रज कूच करोन जातील, तुम्हीं जलद श्रीमंतांसीं गांठ घालावी. " असें पत्र आलें तत्रापि हरिपंतांचे डोळे उघडत नाहीं! रास्ते व आनंदराव गोपाळ वगैरे या आदिकरून बारी उतरों नये अशी मसलत देतात त्या प्रमाणें तात्या ऐकतात! बारी उतरून येण्याविषयीं पांच चिठ्ठया भाऊनीं पाठविल्या तत्रापि कूच करून मागती बारीचे तोंडाहून तोफा माघारे घेऊन गेले! पुढें ईश्वर इच्छेनें व श्रीमंतांचे पुण्यें काय घडेल तें पहावें. भगवंतराव विशालगडास गेले. फौज फुटली, येसाजी शिंदे छ० १७ मोहरमीं मोडले ही मोठी गोष्ट जाहली. फौजेंत जखमी जाया कोण कोण जाहले असतील न कळे. आपणास मोठें यश आलें. समयास पंतही मिळाले. ते हांवभरी होऊन चालोन आल्यामुळें फजित पावले. आतां प्रांतांत कांहीं बाकी ठेऊं नये. शिरोळ परिछिन्न घुमट व गांवांतील माळवदेंसुद्धां पाडोन जमीनदोस्त करावें. ठाणें न घालावें. रयतानीं छपरें घालून रहावें असें करावें. वडगांव पाडून टाकूं नये. ठाणेंच असावें. हजार प्यादा पांचशें स्वार तेथें असावे. करवीर खेरीजकरून कागल देखील गडांचे पश्चिमेस तालुका बाकी ठेवूं नये. सांगाव कुंभोज हे दोन गांवासभोंवतें सारें ठीक करावें. त्याचें यश आपण मनसबा केल्यास आलें. आज आठ दिवस येथें महागाई. सारे जिन्नस या प्रमाणें [?] दोन पायली झाले. तूप पावणेदोन शेर तीन छटाक. येणें प्रमाणें धारण

आहे. सविस्तर भाऊंनीं लिहिलें आहे त्याजवरून कळेल. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद. आतां संक्राजी घोरपडे यास दबाव पडेल. फौज फुटेल. सर्व कार्यसिद्धि होईल. हे आशीर्वाद.

नं. १८२९ श्री.

[चैत्र शु० ६.]

[२४ मार्च.]

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री नागोपंतनाना स्वामींचे सेवेशीं पोष्य नरसो मल्हार कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल छ० ३ सफर रविवार मुक्काम हणमसागर जाणून स्वकीय कुशल लेखन करीत असलें पाहिजे. विशेष. इकडील राजकी वर्तमान गुत्तीवर पाणी व लांकडें नसतां निर्जळें करूनही चार दिवस सेनापतींनीं युद्ध केलें. पाणी सरलेचा सुमार पाहून संधानासही लाविलें होतें. हैदरखानानें सांगोन पाठविलें जे भेट व्हावी तरीच विवेक, नाहीं तर बनाव होणार नाहींसें सांगुन पाठविलें. यानीं आपले जागां अंदेशा पाहिला. चार उपोषणें जाहलीं. चार हजार माणूस किलेवर. फार हाहाःकार उडाला. तेव्हां भेटीस येतोंसें सांगून पाठविलें. चित्तीं तजवीज योजिली कीं, भेटी होतांच किल्ला खालीं करा ह्मणेल. किलेवर उपवासी व्यर्थ मरणें पेक्षां भेटी मुखें बोलाबोलींत कजिया करून हैदरखानसुद्धां समाप्त व्हावें. याजप्रमाणें श्रीमंतानीं आपले जागीं निश्चय करून समागमें पांचजण पालेखान व त्याचा पुत्र व राजश्री सुभानराव व त्याचा पुत्र याजप्रमाणें खालीं उतरले. मार गुत्ती खालीं येतांच हैदरखानानें सांगून पाठविलें जे, मी भेटीस आलों. ह्मणून पांच सहा हजार बार व दोन डेरे अगोदर पाठविले. श्रीमंत येथें क्षणभर राहतांच सभोंवती चौकी दिली. चौकी

देऊन किल्लेवर लोक पाठविले. त्यानीं एक दिवस घेतले नाहींत. मग श्रीमंतानीं लोकांस सांगून पाठविलें जे, आह्मांस खाली चौकी दिली आणि किल्ल्यावर पाणी नाहीं, व्यर्थ मरतां यांत नफा काय? खाली उतरणेंस सांगून पाठविले नंतर हैदरखानाचा पुत्र दहा हजार लोकांनिशीं वर गेले. कांहीं लोकांस हत्यार घेऊन जिवानिशीं मात्र सोडलें, शिपाई लोक व श्रीमंताचा कबिला[1] वर सांपडला आहे. शिपाई लोक वर दीड हजार पर्यंत आहेत त्यांस हत्यारसुद्धां सोडितों, जाणें, ह्मणून सांगितलें. शिपाई ह्मणतात जे श्रीमंतांचा कबिला व त्यांचे अंगावरील वस्तभाव अब्रूनिशीं सोडलिया उतरूं. नाहीं तर कबिलेबराबर प्राण देऊं. याजप्रकारचें वर्तमान. कुमकेस येणाऱ्या फौजेचा मार्ग पाहिला परंतु समयास फौज न आली. श्रीमंत सर्वस्वीं बुडाले. हैदरखानास यश आलें. याजवर फौज या प्रांतास येणें दिनमेक लागली. कोपळास व बंकापुरास खामखा येणार. वरकड सविस्तर राजश्री अण्णाचे पत्रावरून कळेल. सर्वदा पत्रीं सांभाळ करावा. फौजसुद्धां लवकर येऊन दर्शन द्यावें हे विनंती.

नं. १८३०

(मार्च. दु० पंधरवडा.)

पांडुरंगरावाचें पत्र (पै॥ छ० १२सफर सीत सबैन चैत्र मास).

तोतयाच्या मजकुराचें पत्र बच्याजीपंताच्या तीर्थरूपांचें आलेलें तुह्मीं पाठविलें होतें. त्यावरून सविस्तर अर्थ कळलाच होता. रामचंद्र नाईकाकडील कारकून रत्नागिरीहून काल रोजीं रविवारीं लष्करांत आला. त्याच्या बोलण्यांतील भाव कीं तोतया खरा जाला..... .... ची बिडी

[1] बायका मुलें.

तोडली. प्रायश्चित घेतलें. सर्व ब्राह्मण पंक्तीस जेऊं लागले. या उपर कांहीं बाकी राहिली नाहीं. बरें श्रीसत्ता प्रमाण! रामचंद्र नाईकावर पेंच भारी पडला. भाऊ तेथें प्रत्यक्ष असतां ××××× पण केलें. नवीन संकट जाहलें. घांट दोन तीन बंद केले. चार चारशें माणूस घांटीं पाठविलें. स्वांरीही बाहेर निघेत. आज्ञा श्रीमंतांची. श्रीमंतांचे रोखें असें जालें आहे नाईकही लौकरच जाणार.

नं. १८३१ श्री.

(चैत्र शु०)
(मार्च. दु० पधरवडा.)

राजश्री हरीपंततात्या गोसावी यांसीं.

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्नेहांकित मानाजी शिंदे. दंडवत. विनंती येथील जाणून स्वकीय लेखन आज्ञा निरोपिली पाहिजे. विशेष. श्रीमंतांचा तह इंग्रजांचे विचारें ठरला, त्यास श्रीमंत ममईस जाणार. फौज झाडून देशीं यावी ये विशीं आपणास कळलें कीटण वेमस याणीं पत्र लिहिलें आहे. त्यास आपला भला माणूस कोणी दरम्यान येथें येऊन आपलें पत्र व पांच सात मराठे सरदार आपणाजवळ आहेत त्यांचीं बाहेदारीचीं पत्रें ऐशीं आलियास आह्मीं फौजेनिशीं येऊन चाकरीचा योग आपले हातीं घडलिया सेवा करूं. न घडलिया घरास जाऊं. आह्मांकडे वरकड गोष्ट नाहीं. ज्या कमानेस तीर तेथें लागेल! आह्मांपासून दुसरें घडणार नाहीं. ज्या पाशीं राहूं त्याचा शेवट याच रीतीनें असें ज्यास पुरवेल त्यानीं पदरीं बाळगावें. हें न घडल्यास ईश्वर सत्ता! सांप्रत हें पत्र आपणास लिहिलें आहे. अक्षरशः मनन करून मर्जीस गोष्ट आलिया मान्य करावी. लिहिले प्रमाणें बाहेदारीचीं

पत्रें व आपलें पत्र पाठविल्यास देशीं येण्याची सोय घडवूं. नाहीं तर ईश्वर इच्छा प्रमाण. संक्षेप विनंती लिहिली असे. कृपा करणार आपण आहेत. बहुत काय लिहिणें कृपा लोभ कीजे हे विनंती.

नं. १८३२

(एप्रिल प० पंधरवडा.)

पांडुरंगरावाचें परशुरामभाऊंस पत्र—

" गुत्ती घेतल्याचा मजकूर सविस्तर पुरवणी पत्रावरून कळेल. सारांश कर्नाटक बुडालें. शत्रू हांवभरी जाला. गुत्ती. मडकासिरें वगैरे बंदोबस्त करून चैत्र अखेर कोपळास येणार. त्याच्या धास्ती खालीं कोणतेंही संस्थान या उपर अवसान धरीत नाहीं. तमाम तिकडील मुलें गजेंद्रगड व बागडकोट सावनूर या लगत्यास येत आहे. सावनूरकर नबाबानें शेवटीं पोटापुर्ता लाख रुपयांचा सरंजाम दिल्यास कबूल करून वरघड महाल मुलुख ओपून त्यास द्यावा या पल्ल्यावर आहे. शत्रु तुंगभद्रा उतरून आल्यावर कसा प्रसंग पडतो न कळे. शिवराम घोरपडे मडकशिऱ्यावर होते त्यांजवर फौज हैदरानें रवाना केली. तेव्हां निघोन येत असतां हरपनहळी तालुक्यांत गांठ पडली. तमाम घोडीं उंटें पालख्या बुणगे अवघे लुटिलें गेलें. खासा शिवराम घोरपडा शें दोनशें स्वारांनिशीं पळोन होबळास आल्याचें त्याचें पत्रच आलें आहे. "

नं. १८३३

श्री. [चैत्र शु० १९]

[४ एप्रिल.]

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री परशरामपंतभाऊ स्वामीचे सेवेशीं.

पोष्य लक्ष्मण हरी कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल तागायत छ० १४ माहे सफर चैत्र वद्य १ पर्यंत वर्तमान यथास्थित जाणोन स्वकीय कुशल लखन करीत असिलें पाहिजे. विशेष. छ० १९ मोहरमचें पत्र पाठविलें तें छ० १२ सफरीं आह्मांस पावलें. लिहिलें वर्तमान सविस्तर कळलें. इंग्रजांचा तह झाला हें फार उत्तम झालें. श्रीमंतांपासून[१] इंग्रज गेलिया त्यांचें फारच बळ तुटलें. सहस्र गोष्टीनें विचारास येतीलसें दिसतें. त्यांजकडे गाईकवाड मात्र आहेत त्यांच्या मुलखास तुह्मीं उपद्रव केला ह्मणजे तेही निघोन येतील. ते आले ह्मणजे श्रीमंतांची हिम्मत गेली. ऐसी फोडाफाड करून पहावी. झालिया उत्तम. नाहीं तर अमदाबाद देखील गुजराथ श्रीमंतांस देऊन त्याच प्रांतीं त्यांचें राहणें जाहलिया उत्तमच आहे. गंगातीरीं[२] राहावें त्या पेक्षां बरें. दोन तीन वर्षें त्यांचा बंदोबस्त होऊन सारी फौज एक दोन वर्षें कर्नाटक प्रांतीं आली ह्मणजे हैद्रखानाचें पारिपत्य होऊन घेतला मुलख त्या पासून घेऊन बंदोबस्त केला ह्मणजे पंचवीस तीस लाख रुपये सरकारांत येतील. त्यामुळें खर्चाची ओढ मोडेल. पुढें मातबर फौज ठेवावयास सोय पडेल. तुह्मीं श्रीमंतांच्या पाठीस लागून सारा मुलख चहूंकडे गमावला. सरकारांत पैसा कमी पडला त्याजमुळें फौज तुटली. त्याजमुळें चहूंकडे सारे वनवास झाले. श्रीमंत कैलासवासी नानासाहेब व भाऊसाहेब फौज मातबर ठेऊन चहूंकडे पाठवीत होते त्याजमुळें त्यांनीं सारी पृथ्वी सोडविली होती. तुह्मीं एकच धरलें त्यामुळें सारा मुलख चहूंकडे गेला. आह्मांकडील वर्तमान हैदरखान खासा स्वारीस येऊन सारा मुलख तुंगभद्रे पलीकडे घेऊन गुत्तीस मोर्चे दिले. राजश्री राव सेनापती याणीं गुत्ती बळावून आपण खुद्द व सात आठशें बारगीर व दोन

१ दादासाहेबांपासून. २ गोदातीरीं.

तीन हजार प्यादे दारू गोळी दाणा सर्व सामान भरून आपण खुद्द गडावर राहिले. कांहीं फौज राजश्री शिवराम घोरपडे यांजबरोबर देऊन मडकशिरें प्रांतीं ठेविलें होते. राव सेनापती यांची मसलत महिना दोन महिने लढाई करावी, इतक्यांत श्रीमंतांकडून कुमक आणावी, कर्नोळकर व अद्वानीकर सर्व जमा करून मोर्चे उठवावे, जाहलिया हैदरखानाचें पारिपत्य करावें, या उमेदीनें गुत्तीवर राहिले. तीन महिनेपर्यंत झुजले. फार शर्त केली. परंतु श्रीमंतांकडून कांहीं कुमक झाली नांहीं त्यामुळें कर्नोळकर व अद्वानीकर हे ही आले नाहींत. गुत्तीवर दाणा व दारू होती. लांकूड व पाणी सरलें. दोन दिवस पर्यंत चिखल व हिरवे तांदूळ खाऊन राहिले. हैदरखानाजवळ मागें पासून दोन तीन वेळां तहाची बोली जाहलीच होती त्या प्रमाणें ठरलें नाहीं. त्याजवर पाणी व लांकूड नाहींसें झालें तेव्हां सेनापतींनीं तह करावा ह्मणून बोली लाविली. हैदरखान यांसी लांकूड व पाणी नाहीं ह्मणून बातमी लागली त्याजवरून तह करीनासा झाला. तेव्हां सेनापतीस महा संकट प्राप्त जाहलें. लोकांनींही अवसान सोडलें. तेव्हां दुर्गचे राजास सांगून राव खालते उतरले. दुर्गकराचे गोटाजवळ डेरे देऊन राहिले. किल्ला हैदरखानाचे हातीं गेला. रायाचे डेऱ्याभोंवती पांच हजार गारदी ठेऊन बंदोबस्त केला आहे. दुर्गकर रदबदली करितो परंतु हैदर त्याचें कांहीं ऐकत नाहीं. सारे रायाचे मुत्सद्दी व सरदार चौकींत ठेविले आहेत त्यांजवळ हिशेब मागतो. ' पैका कोठें आहे तो दाखवा ' ह्मणून तगादा केला आहे. गुत्तीस ठाणें पडून वीस बेवीस दिवस झाले. तेथील सर्व बंदोबस्त करून एक वर्तमान कोपळ प्रांतीं यावें, एक वर्तमान हरिहराजवळ येऊन नबाब सावनूरकर यांजपासून मातबर खंडणी घ्यावी आणि बिदनुरास जावें, ऐसें आहे. हजार गोष्टीनें कोपळास येणार

नाहीं. बिदनूराकडेच जाईल. आमची फौज करवीरकरांचे पारिपत्यास वीस पंचवीस हजार फौज मेळविली आहे त्यांनीं करवीरकरांचें पारिपत्य केलें. तह करून या प्रांतीं यावें ह्मणून आवई आहे. यामुळें नदी अलीकडे येणार नाहींसें दिसतें. ईश्वर सत्ता न कळे. तो गुत्तीस गुंतला नसता तर आजपर्यंत सारा मुलुख त्यानें घेतला असता त्यास कोणी पुसत नव्हतें. परंतु मुराररावानीं तीन महिने गोंवलें त्यामुळें सर्वांची आज पर्यंत खैर झाली. राजश्री कोन्हेरराव कित्तूरकरांचें पारिपत्य करून राजमंडळाकडे गेले ते व आणखी राजश्री रामचंद्र गणेश व राजश्री तात्या ऐसे मिळोन त्या प्रांतींच अद्याप आहेत. तेथील तह जाहालियावर काय मनसबा करितील पहावें. ती फौज तुंगभद्रा तीरास लौकर आलिया नदी अलीकडील मुलुख वांचतो. ते त्या प्रांतींच गुंतले तर हैदरखान काय करितो पहावें. या प्रकारचें प्रस्तुत वर्तमान आहे. गुत्तीहून कूच एका दो दिवशीं करणार आहे. कूच जाहलियावर जें वर्तमान होईल तें मागाहून लिहून पाठवूं. गुत्ती ठाणें गेलियावर शिवराम घोरपडे यांजवळ फौज होती ती चहूंकडे फुटून गेली. दोनशें राऊतांनिशीं शिवराम घोरपडे सिंगटाळूरावर (नदी) उतरून मिरजेकडे गेले. हैदरखानानें पांचशें पखाली लावून गुत्तीवर पाणी चढवून बंदोबस्त करीत आहे. मडकसिरें सोंडूर वगैरे ठाणीं घ्यावयाकरितां फौजा पाठविल्या आहेत. कळावें. कुंदगोळचें वर्तमान तर आज पर्यंत बेवीस हजार होन वाकी व सालमजकूर मिळून वसूल केले. त्या पैकीं वीस हजार आह्मीं सरकारांत रसद दिली होती त्या पैकीं ऐन परगण्या पैकीं पांच हजार व कर्ज आमचें पंधरा हजार या प्रमाणें भरणा केला होता. त्या पैकीं परगण्यांतील पांच हजार तेव्हांच परगण्यांत खर्च पडले. बाकी पंधरा हजार पैकीं अकरा हजार होन रदकर्ज करून घेतले. चार

हजार होन आमचें कर्ज राहिलें आहे त्यास सावे हप्त्यास वसूल काय होतो तो चार हजारांत घेत होतों; इतक्यांत तासगांवाहून श्रीमंत राजश्री आपाचें[1] पत्र ' अडीच हजार होन पाठवून देणें, ' ह्मणून पत्र आलें. त्याजवरून दोन हजार होनांची चिठी जिवणनाईक नरगुंदे याजवर दिली. एकूण आमचें कर्ज सहा हजार होन राहिले त्यांत हल्लीं सावे हप्त्यांत जो वसूल येईल तो रदकर्ज लावून घेतों. सावा हप्ता वसूल होणें फार कठीण दिसतें. लावणीचा हंगाम आला. मागील पांच हप्ते वसूल करावयास श्रम झाले आहेत ते पत्रीं लिहितां पुरवत नाहींत. पुढें जें होतां होईल तें करितों. मेहनतीस अंतर करीत नाहीं. पेशजी बाकी पैकीं दोन हजार होन अलाहिदा पावलेच आहेत. वसूल बेवीस पैकीं चार हजार होन शिबंदी व धर्मादाव खर्च झाला. येणेंप्रमाणें बेवीसांचा झाडा असे. यंदा कल्याण प्रांतीं पहिला इंग्रजांचा दंगा होता त्या अलीकडे कोळ्यांनीं चार पांच डोंगरी किल्ले घेऊन सारा कल्याण प्रांत वोस केला. त्यामुळें आमचीं मुलें माणसें सारीं पळोन कुलाब्यास गेलीं आहेत. वस्तभाव एकीकडे, घरदार एकीकडे, ऐसें झालें आहे. परंतु तें सर्व सोडून आह्मीं येथेंच बसलों आहों! इकडे मागें कित्तूरकरांचा दंगा जाहला त्या अलीकडे हैदरनाईक तुंगभद्र पलीकडे येऊन बसला आहे. कोपळ व सावनुरास आज येतो, उद्यां येतो, या प्रमाणें नित्यानीं बातमी आहे. या प्रकारचें वर्तमान आहे. श्रीमंतांचा बंदोबस्त जाहला ह्मणजे सर्व ठीक आहे. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

१ परशुरामभाऊंचे पुत्र रामचंद्रपंत आपा.

नं. १८३४ श्रीगणराज.

(१० एप्रिल.)

पै॥ छ० १ जमादिलावल. सुरु सन सीत सबैन. मया व अलुफ.

तीर्थस्वरूप राजश्री भाऊ वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें गंगाधरानें साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत चैत्र वद्य षष्ठी भौमवार जाणोन सदैव आशीर्वाद पत्र पाठवीत असिलें पाहिजे. विशेष. अलीकडे वडिलांकडील पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं तेणे करून चित्त उदास आहे. तरी सविस्तर लिहून पाठवावें. इकडील वर्तमान तरी राजश्री कोन्हो माणकेश्वर यांचे माणसांचे समागमें 'शिंद्याचा मोड वडगांवावरी होऊन करवीरास फौजा गेल्याचा मजकूर विस्तारें लिहिलाच आहे. तीं पत्रें पाहून सर्व मजकूर विदित झालाच असेल. अलीकडील वर्तमान तरी करवीराहून कूच करावयाचें कारण पन्हाळ्याहून महादेव शास्त्री संधानास कैदेंत होते त्यांसच महाराजांनीं पाठविलें जे, " लाख रुपये देतों. करवीरास उपद्रव न करावा. वरकड तहाचे बोलणें पुरंधरास बोलोन तह ठरेल तों पावेतों तुह्मांस ठाणीं येतील तीं घ्यावीं करवीरास मात्र उपद्रव करूंनये. " ऐसें बोलणें बोलावयासीं आले तें मान्य करून शास्त्री यांसीं पन्हाळ्यास पाठविलें. सारें बोलणें लबाडीचें! करार करून गेले प्रमाणें आले नाहींत. तेव्हां करवीरास जाऊन वेढा द्यावा तर ब्राह्मण बुडतात. क्षेत्राचा नाश होतो. श्रीचें स्थल. अपेशास पात्र व्हावें! यास्तव कूच करून कागलावरी येऊन कागलास तोफा लाविल्या. एक दिवस कागल झुजलें. दुसरे दिवशीं ठाणें घातलें. तेथून कूच करून चिकोडीवर येणार तों राजश्री पंत प्रतिनिधींचे डोईंत वेड आलें! कोणता अर्थ चित्तांत आला न कळे.

' आपण कऱ्हाडाकडे जातों ' ह्मणून बसले. तीर्थस्वरूपानीं सांगितलें जे, ' तुमचा करार अक्षतृतीये पर्यंत रहावयाचा. खर्चाची बेजमीही तुमची केली असतां जाणें अनुचित. ' ऐसें बहुतां प्रकारें समजोन सांगितलें, परंतु न ऐकतां मुक्काम करून राहिले. उभयतां तीर्थस्वरूप व राजश्री रामचंद्र गणेश कूच करून चिकोडीकडे आले. येतां येतां येलगुडास चार घटका तोफा लावून घेतलें. तेथून रामचंद्र गणेश खडकलाट घ्यावयासीं गेले. उभयतां तीर्थस्वरूप चिकोडीस आले. दत्तवाड, बोरगांव, घोसुरवाड हीं ठाणीं धास्तीनेंच आलीं. चिकोडी[1] ही बहुतशी झुजली नाहीं. ती घेऊन उभयतां तीर्थस्वरूप वद्य चतुर्थीस राईचंदुरावरी आले. आज तें ठाणें घेऊन शिरोळावरी येणार. शिंद्याकडील कांहीं फौज वडगांवास व कांहीं पन्हाळ्यास आहे. कुरुंदवाडांत प्यादे वगैरे बंदोबस्त आहे. चाळीस पन्नास राऊतही आहेत. शिरोळांत प्यादे वगैरे सामान घालून शिंद्यानीं बंदोबस्त केला आहे. आकीवाट-करानीं व शिरोळकरानीं मिरज प्रांतचे गांव कृष्णातीरचे आहेत त्यांस चोरून मारून रात बिरात उपद्रव करितात. गुरें ढोरें नेतात. ईश्वर इच्छेनें त्यांचेंही पारिपत्य लवकरच होईल. भवानराव प्रतिनिधि कागलावर राहिले होते तेथून कूच करून कवठेंपिरानचे मुक्कामास आले. तेथून वाळव्यावरी गेले. वाळव्यांस चौक्या दिल्या आहेत. गावगन्ना रोखे मसाले केले आहेत. थोरात वीस हजार खंडणी बोलत आहेत. प्रतिनिधि पंचवीस हजार व एक हत्ती मागतात. याजप्रमाणें मजकूर असे. भगवंतराव प्रतिनिधि चैत्र वद्य प्रतिपदा गुरुवारीं दोन प्रहर रात्रीं उपरी इन्यांत निधन पावले. धाकटी स्त्री समागमें गेली. प्रस्तुत प्रतिनिधीची दुही तुटलीसी दिसती. मग पहावें! प्रतिनिधीनीं

---

१ पांडुरंगरावानीं.

हेकडपणा करून सरकारच्या फौजा सोडून गेले इतकेंच गैर. फौजा सोडून एका एकीं कोणत्या लक्षावरी गेले हें समजत नाहीं. तीर्थस्वरूप राजश्री दाजीसही कारभारी याणीं प्रतिनिधीकडे रवाना केले आहेत ते वाळव्यावर आले आहेत. पुढें होईल मजकूर तो सेवेशीं लिहून पाठवूं. चिरंजीव मनीच्या लग्नाचा वैशाख शुद्ध द्वितियेस निश्चय झाला. वरात आणावयासीं वांईस पालख्या, हत्ती, घोडे, उंटें, बैल वगैरे सामान रवाना केलें. ईश्वर कृपेनें कार्य सिद्धि जाले उपरी लिहून पाठवूं. तीर्थस्वरूप राजश्री तात्याही लग्नास येतील. वाईत रामभट वैद्य यांचा पुत्र वर योजिला आहे ह्मणून पेशजी लिहिलेंच आहे. तीर्थस्वरूप मातुश्री जानकीकाकू अद्यापि पुण्यांतच आहेत. वडिलीं आपणाकडील सविस्तर वर्तमान लिहून पाठवावें. आतांच पत्रें आलीं. तीर्थस्वरूप आळत्यांच्या कामास आले. आळत्यास तोफा लाविल्या आहेत. गांव जाळून टाकिला. वाडा झुजत आहे. तीर्थस्वरूपांजवळून पंत निघाले; दरमहा करार तीर्थरूपांचे विद्यामानें रामचंद्र गणेश यांजकडून रुपये ७५००० पाऊण लक्ष, उगवणीस धणी तीर्थरूप, झाले. पन्नास हजार दिले. पंचवीस हजार राहिले तेही देतों म्हणाले. परंतु न ऐकितां निघाले. पूर्वी तीर्थस्वरूप रावसाहेबींही काशीस पंत जात होते तेव्हां श्रीमंत राव प्रधान यांसीं सक्त विनंती करून आनंदवल्लीच्या मुक्कामीं आणून स्थापना केली हें विदीतच आहे. यंदांही तीर्थस्वरूपानीं मोठी आंगेजै करून भगवंतराव भारी जमला, कारभारी यांचें आंग भगवंतराव याकडे, असें असतां यास ठेऊन घेऊन सर्व प्रकारें मनुष्यांत आणिलें, स्नेहही वडिलांदारभ्य चालत आला. त्याचीच अभिवृद्धि केली, शिंदा ही शिकस्त जाहला असें असतां मान न पहातां गेले! बरें! श्रीमंत पंत

१ गोपाळरावानीं माधवराव बल्लाळ यांचे कारकीर्दीत. २ पांडुरंगरावानीं. ३ हिंमत.

प्रधान यांचें दैव थोर आहे. चिंता नाहीं. पंतांचें चित्त कोणीकडील मनसबेवरी आहे समजत नाहीं. तीर्थस्वरूप बळवंतराव यांजकडे जासूद येथून पाठविलेच आहेत. पंतांचे बातमींत आहोंत. काल एक प्रकारचा आला आम्हीं किल्लेची चौकी पहारे यांचीं बंदोबस्ती करीत आहों. चहूंकडील बातमी उत्तमप्रकारें राखतों. विदित होय हे विज्ञापना.

नं० १८३९ श्रीगणराज. (चैत्र व ० ७)
(११ एप्रिल.)
पै ॥ छ० ८ रा॥ वल

अपत्यें साष्टांग नमस्कार विनंती. येथील वर्तमान तागायत छ० २१ सफरपावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष.

१ भवानराव प्रतिनिधीकरितां कोन्हेरराय व आम्हीं मिळोन नेट पाडिलें. रामचंद्र गणेश ही मिळविले. तें कार्य होतांच भवानरायानीं हिसका घेतला कीं,' खर्चास दिलें शिवाय पुढें पाऊल टाकीत नाहीं म्हणूं लागले. तेव्हा पंधरा दिवस रहावें. पंचवीस हजार रुपये द्यावे. असें ठरलें तेव्हां चोवीस हजार रुपये आम्हीं दिलें. चवथे दिवशीं लढाई झाली त्याजपासून रडच सांगूं लागले कार्य न होई. दहा आकरा रोज रुसव्याखालींच गेले, तेव्हां रुई इंगळीचे मुक्कामीं आम्हीं गेलों, पन्नास हजार रुपये द्यावे, एक महिना पावेतो त्यांनीं रहावें, असा ठराव झाला असतां सर्व फौज तयार झाली तों इतकें पुरत नाहीं म्हणूं लागले! तेव्हां आम्हीं मनांत आणिलें कीं पंचविसा करितां मसलत नासते. सारी फौज बुनग्यासुद्धां उभी राहिली तेव्हां आंगेजणी करून मसलतीस लक्ष द्यावें.'

---

१ पंत पांडुरंगरावाचे परशुरामभाऊस.

असें ठरून सत्तेचाळीस हजार रुपये तीन दिवसांत दिले. चवथे दिवसापासून खर्चास नाहीं म्हणून रड गाऊं लागले. कटकट पडली. तेव्हां आम्हीं सांगितलें कीं करार असतां लबाड बोलणें वाईट. इतकें असून पंत गेलेतरी चिंता करीत नाहीं. ऐवज सरकारचा दिला तो घेऊं. तेव्हां मदार झाला कीं अक्षतृतीयेस निरोप द्यावा. तों पावेतों बोलूं नये. स्वस्थ असावें.' मागती दुसरे दिवशीं कटकट आरंभिली. आम्हीं तिकडे लक्षच दिलें नाहीं. कूच करून गेलों तों पंत मागून येणार त्यानीं कूच न केलें. आह्मी येलगुडास गेलों तों मागाहून बातमी आली कीं, पंतांचें कूच होत नाहीं. त्यानींही आह्मांस पत्र न पाठविलें. आह्मींही आज बारा रोजांत न पाठविलें. तेथून ते गेले. तेथील वीस हज़ार खंडणी केली. तीर्थस्वरूप राजश्री दाजी पुरंधराहून पंताचे लष्करास आले आहेत. शिरोळास उद्यां भृगुवारीं येणार. आलेवर सविस्तर वर्तमान कळलेवर सेवेशीं लिहितों.

१ पंत गेलेवर आह्मीं, रामचंद्र गणेश व कोन्हेरराव चिकोडी आदि करून तमाम ठाणीं घेतलीं आणि आळतें घेऊन शिरोळास आलों. तों तोफखानेकडील[1] अनमान करूं लागले. वेडेपण दिसों लागलें याजकरितां आह्मीं राग भरून उठोन मंगळवारीं आलों. बुधवारीं शिवाजीपंत नागोजीराव यांस पाठविलें. त्याजवरून मागती आमचा करार झाला. उद्यां भृगुवारीं जाणार होईल तें मागाहून लिहितों. लग्न हीं आठ दिवस राहिलें आहे.

१ पंताकडील निखालसता कळावी याजकरितां राजश्री शिवाजीपंत पाठविले होते. पुण्यासही मनसबा घाटत होता. हे आहेत किंवा नाहीं

1 कृष्णराव पानसे.

हें समजावें करितां आले होते. अद्यापिही येथेंच आहेत. निखालसपणें बोलणें न होई तेव्हां आह्मीं बोलण्यांत समेटून शिवाजीपंतास सांगून पाठविलें.

१ बापूंचीं पत्रें आह्मांस वारंवार येतात कीं पंताची निखालसता आह्मांविशीं करावी. ऐसीं येत होतीं. परंतु पंताचें दैव हीन! आमचे सांगितलेप्रमाणें ऐकते तर उर्जितच होतें. तें न करितां गेले! असो.

१ आह्मीं उपकार केले पंतावर ते ईश्वर जाणे. ते एकीकडे राहून त्यानीं लबाडी केली. कोणीही बरें ह्मणत नाहीं. येणेंप्रमाणें वर्तमान कचें जाहलें.

नं. १८३६   श्रीगणराज.

[चैत्र व०]

[एप्रिल. प० पंधरवडा.]

सुरु सन सीत सबैन. मय्या व अलुफ.

अपत्यें साष्टांग नमस्कार विज्ञापना. राजश्री भवानराव प्रतिनिधि यांस खर्चाची बेजमी अक्षतृतीयेपर्यंत केली होती. असें असतां कागलाहून आह्मीं कूच करून चालूं लागलों तों पंताचे डेरे तसेच होते. मागाहून येतील ह्मणोन आह्मीं सदलगेंच्या मुक्कामास आलों तों मागाहून तीर्थस्वरूप राजश्री बळवंतराव यांचें पत्र आलें कीं पंत येत नाहींत. कराडाकडे जाणार, ह्मणोन आलें. त्यावरून निस्तोष येत नाहींत, गेले, असें कळलें. आह्मीं त्यांस भगवंतराव पाठीस लागले होते तेव्हां आश्रा देऊन सरकारची आज्ञा नसतां तीर्थस्वरूप राजश्री कोन्हेरराव यांची त्यांची भेटी करविली. सर्व प्रकारें त्यांची बरदास्त केली. आह्मीं आश्रा

---

१ पत्र पांडुरंगरावाचें परशुरामभाऊस.

दिला कोन्हेरराव आणोन मेळविले याजमुळें भगवंतराव यांस अवघड पडून तांदुळवाडीवर त्यांचे अकरा बारा मुक्काम झाले. तमाम लोक फुटोन गेले. तीस हजार फौजेचें बंड विघरलें. निर्वेध झाला. असें घडविलें असतां बेइमानीं करून उठोन गेला! भवानराव याजवर आह्मीं उपकार केला हें जगप्रसिद्ध चहूंकडे होऊन सरकारांत देखील आमचा मनसबा पटला. पुढें गुत्तीच्या उपराळ्यास न्यावें, तिकडील कार्य जाहल्यानंतर पंतानीं फौज भारी ठेविली, खर्चा खालीं आले याची ही सोय करून द्यावी, इतकें देखील केलें होतें. परंतु फलत्यागी! क्रियेस न जागतां मध्येंच मसलतीस धक्का देऊन गेले!बरें! आजवर श्रीमंतांच्या दौलतीस उपयोगी होते, हल्लींच गेले, ऐसा अर्थ नाहीं. श्रीमंतांचें थोर आहे. त्यांच्याच दैवेंकरून होणें तें होईल. भवानराव एका एकीं आह्मांपासून गेले तेव्हां कोणत्या मतलबावर गेले हें समजत नाहीं. करवीरकरांचा तह होतांच भवानरावसुद्धां कर्नाटकांत जावें, गुत्तीचा वेढा उठवावा, असा मनसबा केला होता. परंतु करवीरकरांचा तह जाहला नाहीं. तत्राप रामचंद्र गणेश करवीर तालुक्यांत ठेऊन पंत व कोन्हेरराव व आह्मीं असे कर्नाटकांत जावें या प्रमाणें सरकारची आज्ञा होती. आणि जातही होतों. इतक्यांत गुत्ती गेल्याचें वर्तमान आलें. तदोत्तरही तुंगभद्रेपावेतों जावें ह्मणजे हैदर पुढें येऊं पावणार नाहीं. दबोन पलीकडेच राहील, असेंही होतें. तशांत पंत निघोन गेले याजमुळें तो प्रकार राहिला. पंतानीं अक्षतृतीये पावेतों रहावें असें ठरलें होतें. पाऊण लक्ष रुपयांचा हवाला आह्मीं घेतला त्यांत पन्नास हजार पावेतों ऐवज दिला असतां चार रोज जाहले त्याजपासून त्यांचें रडगाणें लागलें! शेवटीं याजप्रमाणें ×× गमन करून गेले! चिंता काय आहे! एकवेळ गुणांची व कीर्तीची सीमा कळून चुकली.

बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

नं. १८३७ श्रीगणराज.

(चैत्र व०)

(एप्रिल. प० पंधरवडा.)

पै॥ छ० १ रबिलावल. सन सीत सबैन मय्या व अलफ.

अपत्यें गंगाधरानें साष्टांग नमस्कार विज्ञापना. गुत्तीचा किल्ला सेनापतीनें तीन अडीच महिने लढविला. परंतु पाण्यानें कमी केली या मुळें सेनापती खालीं येऊन शत्रूचे हातीं कैदेंत सांपडले. किल्ला अमित्राचे हातीं लागला. बाकी राहिलीं स्थळें सेनापतीचीं हैदर घेत आहे. तीं घेऊन तुंगभद्रा अलीकडे यावें असी मसलत भारी आहे. पुढें घडेल तें पहावें. येथून तोतया रत्नागिरीस पाठविला होता त्यास किल्ला तेथील अधिकारी यांसुद्धां वश त्यास जाहले. रामचंद्र नाईक यांचीं मुलें माणसेंही रत्नागिरीस पूर्वींच गेलीं होतीं. त्यांस किल्ल्यांतील सर्वांचे मतें पूर्व स्वरूपच खरें! किमपि भेद नाहीं! बेडी तोडून प्रायश्चित जाहले. पंक्तीस भोजन होऊं लागलें. चार हजार पावेतों प्यादे ठेविले. इटेकरी, चोपदार वगैरे शागीर्द पेशा ठेविला आहे. एक दिवस आड करून देवास स्वारी निघती. गांवांतून, किल्यांतून, बुरुजावरून फिरतात. प्रत्यही दहा वीस तोफा मारितात. घांटमाथा चारशे पावेतों प्यादे चौकीस पाठविले आहेत. सत्ता स्वामित्व सर्व त्यांचें झालें आहे! कोंकणांत कोणी भाऊसाहेबां शिवाय नांव घेतां नये. दुसरे कांहीं ह्मटल्यास गुन्हेगारी पडती! ऐसा विचार आहे, तिकडे लक्षही बहुतांचीं दिसतात. तीर्थस्वरूपांपासून फौजेसह निघाले

१ पत्र परशुरामभाऊस.

योंचें लक्ष तिकडे आहे कीं काय कळत नाहीं. व चित्रगुप्त व चिरंजीवाचे श्वशूर यांचे ग्रामचे लोकांचें लक्ष तिकडेच दिसतें. बंड माजेल कीं काय पहावें. राजश्री रामचंद्र नाईक इकडे रामचंद्र गणेश यांचे लष्करांत होते तेही रत्नागिरीस जावयासीं गेले. मिरजेस येऊन आह्मांसही भेटून गेले. त्यांच्या बोलण्यांतील अर्थ "तेथें होते त्यानीं बदमामली केली." परंतु बोलण्यांत भाव जे 'तो गृहस्थ खराच आहे' ऐसें नाईकांचें मत पुरंधरास जाऊन मग रत्नागिरीस जाऊं अगर परभारेंच जाऊं ऐसें दोन्ही भाव दर्शऊन गेले. विष्णु नरहर व खंडेराव निंबाजी हे कारभारी यांस दगा करावा या मसलतींत होते. हें त्यांचे अंगीं लागू करून कारभारी यानीं कैद केले. राजश्री शिवाजीपंत अद्यापि तीर्थस्वरूपांजवळ लष्करांतच आहेत. पुरंधरास जाणार आहेत सारांश तोतया खरा जाहला. बाकी राहिली नाहीं. ईश्वर काय करील न कळे. मागाहून होईल तो अर्थ सेवेशीं लिहींन हे विज्ञापना.

नं. १८३८ श्रीगणराज.

(चैत्र व०)

(१६ एप्रिल.)

पै॥ छ० २ रबिलावल, सन सीत सबैन.

सेवेशीं बापूजी नारायण. कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ छ० २६ माहे सफर पर्यंत मुक्काम हंचीनाळ येथें सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामीनीं छ० १४ सफरचीं पत्रें पाठविलीं तीं छ० २३ माहे मजकुरीं पावून सनाथ जाहलों. तेथें निरोपिलें कीं 'करवीरकरांचा तह अद्याप नाहीं. कागल चिकोडी वगैरे ठाणीं तमाम

१ भवानराव प्रतिनिधि. २ पत्र पांडुरंगरावास अदवानीहून.

घेतलीं. शिरोळ व वडगांव मात्र राहिलें आहे तेंही घेणार. इकडील गुंता उरकला ह्मणजे तिकडे फौजा येत आहेत,' ह्मणोन निरोपिलें. तसेंच हैदरखान याजकडील सविस्तर वर्तमान लिहून पाठवावें ह्मणोन आज्ञा निरोपिली; ऐशियास छ० १७ माहे मोहरमीं हैदरानें गुत्तीचें ठाणें घेऊन तथील बंदोबस्ती दाणादुणा पाणी किल्लेवरी दारू गोळी सर्वही घालून तेथें राजश्री बाळाजीपंत ह्मणोन त्यांसीं तालुक्याचा सुभा सांगोन ठेविलें आहे. तैसेंच संस्थान बल्लारींत राजश्री तिमराव भाऊ कुलकर्णी यांसी तेथीलही बंदोबस्ती करून ठेविलें आहे. राजश्री राव सेनापती लष्करांत दहा दिवस पाहऱ्यांत होते. तैसेंच त्यांचीं मुलें मनुष्यें एकीकडे ठेविलीं. छ० १० माहे सफरीं राजश्री सेनापती व त्यांचीं मुलें मनुष्यें व राजश्री खंडोजी घोरपडे यांसीं बेडी घालून श्रीरंगपट्टणासीं रवानगी केली. त्यांजबरोबर पांचशें स्वार व एक हजार बार व कानडे प्यादे पांच सहाशें येणें प्रमाणे समागमें देऊन गुत्तीहून त्यांची रवानगी करून दिली. तेथून निघोन पांच मजली गेले. तेथून दुसरे दिवशींच मजलीस पावगडानजीक गेले तों इतक्यांत फिरंग्यांकडोन फौजा येऊन हैदरखान याजकडील स्वार व बार व कानडे प्यादे होते त्यांसीं कापून काढोन तसेंच पालखीचे भोयांस तोडोन राजश्री सेनापतीस घेऊन गेले ऐसें वर्तमान आलें आहे. फिरंग्यांकडे पावगडकरही सामील होऊन लढाई करून घेऊन राजश्री सेनापतीस गेले. येणें प्रमाणें चहूंकडून वर्तमान आलें आहे. हें वर्तमान हैदरखान याचे लष्करांत कळून गडबड झाली. उपरांतिक आपण गुत्तीहून छ० १४ सफरीं कूच करून मजल दर मजल गेले. ताडमरी व इटगीदुर्ग व मडकाशिरें हे तीन चार किल्ले अद्यापि हैदरखान यांसीं हस्तगत जाहले नाहींत. किल्ले

१ मासकर इग्रज. त्यांनीं मुरारराबास सोडवून नेल्याची ही बातमी पुढें खोटी ठरली.

न घेतां टाकून पुढें हैदरखान कूच करून गेले. राजश्री सेनापतीस फिरंगेनीं नेलें यास्तव जलदीनें गेले किंवा आणखी कोठील पाळत आणोन त्यावरी गेले हें कांहीं अद्यापि तहकीक वर्तमान आलें नाहीं. कूच करून गेले हे निश्चयें संस्थान बल्लारीचें रामापा नाईक व हणमापा नाईक यांची बायको व लेकी राजश्री शिनापा नाईक यांजकडे पेशजी हैदरखान याणीं ओलीस दिल्या होत्या त्या ओलीस गुत्तीच्या मुक्कामीं घेऊन गेले होते. तेथें आठ पंधरा दिवस होत्या. उपरांतिक राजश्री शिनापा नाईक यांनीं बहुत प्रकारें सांगोन घेऊन बोली सोडवून घेऊन अदवानीस आले. तेथें आलेनंतर अदवानीस आह्मीं तेथें चार दिवस होतों. उपरांतिक नबाबसाहेब यांचा निरोप घेऊन छ० २३ माहे सफरीं अदवानीहून निघोन हंचीनाळासी आलों. गुत्तीवर एक मुसलमान किल्लेदार ठेविला आहे. राजश्री खंडोजी घोरपडे यांसी बेडी घालून गुत्तींतच ठेविलें आहे. त्याला पट्टणासी नेलें नाहीं. येथेंच ठेविलें आहे. राजश्री सेनापतीस रुप्याची बेडी करून घालणें निमित्य करून पाठविली. त्यास त्यानीं उत्तर दिलें जे, तूं केवळ भाऊबंद ह्मणोन तुजपाशीं आलों. ऐसें असतां बेडी काय निमित्य घालतां? ह्मणोन सांगून पाठवितांच बेडी घालणें महकूब केलें. उपरांतिक त्यांसी पांच सहा कोस लष्कराचे पलीकडे घेऊन गेले. उपरांतिक तेथें उतरोन बेडी राजश्री व्यंकटराव व नरशिंगराव यांसीं घालणेंस आले त्यांनीं डोळ्यास पाणी आणोन बापाकडे पाहूं लागले. त्यानीं सांगितलें जे, त्यांस कशास घालतां? आह्मांसी घालणें; ऐसें ह्मणतांच राजश्री सेनापतीस बेडी घातली. उपरांतिक त्या दोघा पुत्रांसही बेडी घालून घेऊन गेले. सर्वत्र मुलें बाळें देखील बरोबरच होतीं. पंधरा पालख्या छकडे व गाडे

बरोबर होते. कुणबिणी आदिकरून होत्या. मेहमदअल्लीनीं व फिरंग्यांनीं मार्गीं घेऊन गेले तेव्हां अधिकोत्तर कांहीं होते त्यांसीं पावगडांत ठेविले. आणि सडेनिशीं मजल दर मजल निघोन गेले. त्याचें वर्तमान ऐकून रात्रींच कूच करून हैदरखान लाडमरी नजीक तीन कोसांवरून कूच करून रात्रींच गेला. तेथून लष्करांतून मनुष्य आला. पुढें काय झालें हें वर्तमान कांहीं आलें नाहीं. या समयीं गुत्तीची व बल्लारीची बंदोबस्ती कांहीं नाहीं. यास्तव या समयीं फौज इकडे जलदीनें आलिया आठ चौ रोजांत ठाणीं हस्तगत होतील. राजश्री बाळाजीपंतासीं हजार स्वारांची सरदारी सांगितली आहे परंतु सध्यां तीन चारशें स्वार आहेत. फौज ठेवणेंकरितां लक्ष दीड लक्ष होन देऊन गेले आहेत. बल्लारींत रायदुर्गकरांचें ठाणें होतें तें काढिलें. आपले खुद्याचे तीनशें गाडदी व दोनशें परदेशी ऐसे किल्ल्यावरी ठेविले आहेत. वरकड सर्वत्र जुनेच प्यादे आहेत. आपलेकडील तिघे कारकून ठेविले आहेत. तैसेंच किल्लेदार आपलेकडील मुसलमान ठेविला आहे. गांव झुजेल आणि टिकेल ऐसा बंदोबस्त केला नाहीं. नदीस पाणी आलें उपरांतिक बंदोबस्त करणार. अनेगुंदीची खंडणी अद्यापि झाली नाहीं. तें ठाणें घ्यावें, तैसेंच अदवानी घ्यावी, ऐसें त्याचे चित्तीं आहे. अदवानीकरांचे वकीलापाशीं या प्रमाणें बोलिला आहे. नवाब निजामअल्लीही तिकडे कलबुर्गे पाशीं आहेत. तेथूनच सुरापुरकरांची खंडणी उरकणार अगर हरप्रकारें करून कृष्णा नदीस येतील. स्वामीकडील फौज आले तरीच इकडे येतील. नाहीं तरी त्याणें इकडे येणेंचें दिसत नाहीं. आठ पंधरा दिवसांत नदीसही पाणी येईल. उपरांतिक सहजच पलीकडील बंदोबस्त हैदर करील. अदवानीचे

---

१ अर्काटचा नवाब. २ हा हैदराने गुत्तीस ठेवलेला अधिकारी.

तालुकेपैकीं मदकेरी घेतली. अदवानीवरही नजर ठेविली आहे. नबाबही अदवानींतून मूल मनुष्य काढणेचे विचारांत आहेत. कंचनगड तो बुडालाच आहे. खंडणीचा मजकूर राजश्री शिनापानाईक यांसी नबाबजी एकांत बोलत होते. काय निवडतें पहावें. आह्मीं तो नबाबजींस सांगितलें जे परिछिन्न आह्मांकडे कांहीं गुंता नाहीं. त्यांसी नक्की देणेचा करार तुह्मीं ज्या प्रमाणें केले आहे त्या प्रमाणें निर्गम करणें. त्यानीं उत्तर दिलें जे ' आह्मीं कांहीं नक्की ऐवज देतों ऐसें कांहीं ह्मटलें नाहीं. तनखे करून देतों ऐसें बोलिलों होतों. त्यांसी अरिष्ट ऐसें आलें आहे ' ह्मणत होते. सेवेशीं कळावें करितां लिहिलें आहे. वडणगेचे घराविशीं विनंती पत्र स्वामीस लिहिलें होतें. त्यासीं उत्तर निरोपिलें कीं जाळून वडणगाव घर साफ जाहलें. याजवरून फारच संतोष पावलों! स्वामी सारिखा वशिला असतां घरें वांचविणें हें लौकिक उत्तम होता. होणारासीं यत्न काय आहे? उत्तरेकडील सविस्तर निरोपिणार स्वामी समर्थ असा. बहुत लिहिणें शक्त नाहीं. हे विज्ञापना.

नं. १८३९

[एप्रिल दु० पंधरवडा.]

पांडुरंगरावाचे परशुरामभाऊस पत्र. पै॥ छ० ८ रबिलावल.

" राजश्री नाना फडणीस यांस विष्णु नरहर व खंडेराव निंबाजी या उभयतांनीं दगा करावा अशा मतलबांत होते. तें वर्तमान नानास कळतांच विष्णु नरहर यास शृंखला जोडून सिंहगडावर घातलें. व बरदारही साताऱ्यास जप्त केलें. खंडेराव निंबाजीस रुद्रमाळेवर घातलें. कोल्हापुरास थक उठलें आहे. मरीच्या उपद्रवामुळें नित्य पंचवीस

चाळीस माणूस मरतें. देवीचा क्षोभ त्यांजवरच जाला. मी देवालयांत नाहीं या प्रमाणें क्षोभांत एक दोघांस दृष्टांतही जाला. देवीस त्यांचा कंटाळा आला आहे! ”

नं. १८४० **श्री.**

[२७ एप्रिल]

चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांसी प्रती वासुदेव धोंडदेव. आशीर्वाद. विनंती येथील कुशल तागायत वैशाख शुद्ध नवमी पावेतों मुक्काम नजीक सोनगड कच्चे दोन कोस यथास्थित असे. विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावलें. लिहिला मजकूर कळला. “ करवीराकडील[1] ठाणीं तमाम घेतलीं. आळतेचे गढीस मोर्चे लाविले. पुढें शिरोळाकडे येणार. राजश्री पंत निघोन गेले. राजश्री राव सेनापती अमित्राचे हातीं सांपडले. ” विस्तारें वर्तमान लिहिलेवरून कळलें. इकडील वर्तमान ईश्वरवाडीचे मुक्कामीं कूच जाहलें तेव्हां पत्रें गेलींच आहेत. त्याज अलीकडे राजश्री तात्यानीं[2] कूच केलें. तिसरे कुचास सोनगडच्या मुक्कामीं आले. श्रीमंतानीं व्याग्याहून कूच करून आश्विनीसुमारास सुरते पासून दोन कोसांवर मुक्काम केला आहे. कर्नल कीटण सुरतेस राहून मौजे डोबसचे उतारास सामान लावून दिलें. कारकून इंग्रजाकडील बोलावयास आले. इकडील तिकडे गेले. राजश्री आपा बळवंत यांस सखाराम हरी व सदाशीव रामचंद्र यांचीं पत्रें हमेशा येत असतात. परंतु फलितार्थ कांहींच नाहीं! इंग्रजांचें सामान उतारास गेलें होतें तें माघारें सुरतेस आलें. त्यांचें कृत्रिमसें दिसतें. सदाशिव रामचंद्र यांस श्रीमंतानीं

१ करवीरच्या महाराजांवर. २ गंगाधरराव गोविंद यांस गुजराथच्या स्वारींतून पत्र. ३ हरीपंत फडके.

दिवाणगिरीचीं वस्त्र दिलीं! जें करणें तें मशारनिल्हेनीं करावें. आठ लक्ष रुपये सदाशीव रामचंद्र याणीं श्रीमंतांस दिले. गोविंदराव गायकवाड यांजकडे श्रीमंतानीं कारकून व पन्नास स्वार पाठविले. " डभईचा किल्ला देतों पुढें सारा बंदोबस्त जाहल्यानंतर गुजराथ देऊं. तुह्मीं पत्र पावतांच निघोन फौजसुद्धां यावें. " अशीं पत्रें पाठविलीं, परंतु गोविंदराव याणीं राजश्री आपाजी गणेश व खंडेराव गायकवाड यांजकडे सूत्र लावून आपलें बरें करून घ्यावें या अर्थे अमदाबादेस गेले. भेटी जाहली. पेटलाद व ढवळकें वगैरे प्रांतांत श्रीमंतांचीं ठाणीं होतीं तीं आपाजी गणेश यानीं उठवून आपलीं ठाणीं महीपार सारीं बसलीं. फतेसिंग गायकवाड बडोद्यासच आहेत. होळकर पुरंधरास[1] जावयाकरितां चांदवडास गेले. भोसले आपले स्थळींच आहेत. नबाब अदवानीकडे जाणार यास्तव धौंशा येथून निघोन गेला. धौंशा माघारा जाताना चांदवड तालुक्यांतील बैल वगैरे उपद्रव फार केला. याजकरितां धौंशाची पिछाडी जात होती तिजवर पडोन होळकरानीं चार पांचशें गुरें ढोरें शें पन्नास घोडे लुटले. आणि धौंशास पत्रें पाठविलीं जे, आपला प्रांत लुटलास, त्याजप्रमाणें तुझा तालुका आह्मीं लुटतों. नाहीं तर दोन लक्ष रुपयांची जाहगीर (?) जाहली आहे तिचा फडशा करावा. अशीं पत्रेंही पाठविलीं आहेत. पांच हजार फौज होळकर समागमें घेऊन गडास येत आहेत. राजश्री राव सेनापती आमित्राचे हातीं लागले ही मोठी अनुचित गोष्ट जाली. प्राचीन दौलत होती, क्षणांत गेली! ईश्वर इच्छेपुढें कोणाचाही यत्न नाहीं. दादासाहेबांचे सल्लेचा प्रथम दिवस आहे. करवीरकरांचा गुंताही लवकर उरकत नाहीं. शिरोळास मोर्चे लाविले तर सारी फौज छबिन्यास असावी. आपली फौज व

---

१ पुरंदरास पेशव्यांच्या भेटीकरितां.

पायचें माणूस मिळोन मोर्चे लावावे ह्मणणे ठीक दिसतें. तेवढें यश घ्यावें आणि जसा ठरेल तसा सल्ला करावा. शहास गुंतों नये हें उत्तम आहे. पेशजी खाशा घोड्या सत्तर होत्या त्या अण्णापा समागमें पाठविल्या आहेत. पावल्या असतील. आमच्या घरीं दुभतें नव्हतें ह्मणोन वडिलीं पेशजीं पत्र पाठविलें होतें. त्याजवरून येथें गुरें सवंग होतीं तीं खरेदी करून ह्मशी व गाई १० बैल सात येणें प्रमाणें पाठविले. समागमें आळूखान बराबर आहे. तीं गुरें सुबत्तेचे वाटेनें समागमें पांच चार प्यादे देऊन घरास पावतीं करावीं. नाहीं तर पाऊणशें रुपये व्यर्थ बुडतील यास्तव विनंती लिहिली आहे. जरूर गुरें घरास पावतीं होत तो अर्थ करावा. इकडील राजकी देवकीनवल विशेष भाऊंचे पत्रावरून कळेल. आज्ञेप्रमाणें सावधगिरीनें भाऊंचे मर्जीप्रमाणें यथापद्धतीकडून वर्तणूक करीत आहों. पेंढारी कोन्हेरराव यांजसमागमें आहेत त्यांत ढाकणशेट– हिरा चौधरी याचा शेव्या याजकडे खासगीचे चारशें रुपये कर्ज बरेच (?) सालीं दिलें आहे. त्याजकडे ढालाईत पाठवून ढाकण तेथें असल्यास ऐवज उगवून घ्यावा. याविशीं कोन्हेरराव यांस पत्र लिहून पाठवावें. बहुत काय लिहिणे लोभ कीजे हे आशीर्वाद.

नं. १८४१

श्री.

(३० एप्रिल.)

पैवस्ती. छ० १ रबिलावल. सन शीत सबैन. मु० शिरोळ.

चिरंजीव राजश्री तात्यासाहेब यांसीं प्रती. वासुदेव धोंडदेव. आशीर्वाद विनंती येथील कुशल तागायत वैशाख शुद्ध १२ पावेतों

१ पत्र पांडुरंगरावास गुजराथच्या स्वारींतून.

मुक्काम नजीक सोनगड दोन कोस. यथास्थित असे. विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावलें. लिहिलें वर्तमान कळलें. व भाऊंचे[1] पत्रावरून श्रुत जाहलें. असेंच सदैव पत्र पाठवून सांभाळीत जावें. इकडील वर्तमान, श्रीमंतांचे सल्याची बोली पांच सात मास लागली आहे परंतु प्रथमच दिवस आहे! श्रीमंतांची फौज लहान थोर दहा हजार, पाईचें माणूस दीड हजार, येणें प्रमाणें सामान आहे. पांच तोफा आहेत. कर्णेल कीटण पांचशें इंग्रजांनिसी सुरतेंत आहे. पुरंदरचीं पत्रें आलीं. त्यांणीं लिहिलें होतें जे, इंग्रजांचे आमचें बोलणें पक्कें आहे. तुह्मी बेजरब दादासाहेबांशीं गांठ घालणें, इंग्रजांची कुमक होणार नाहीं, असें लिहिलें होतें. येथें फौज ह्मणावी तर येकवीस हजार हुजुरात व अकरा हजार सरंजामी. एकंदर बत्तीस हजार फौज गणतीची आहे. हुजुरातीमध्यें पागे वगैरे आहेत हे कर्जवाम वगैरे करून आपले लोकांस पैका देतात. काहीं सरकारांतून येतें. जे निसबतीस नाहींत आणि शिलेदार पथकें पागे शिवाय आहेत त्यांची दाद लागून पैका येणें या प्रसंगीं कठतच आहे! महागाई झाली आहे. लोक कोणी कामाकाजास धजावें अशी मसलत देत नाहींत. आधींच फितूर त्यांत बारा तेरा रोजमुरे तटले आहेत. बाजीपंत आणा समागमें ऐवज येतो ह्मणून सांगत होते तेही दिशाहून आले, पैसा नाहीं! काय संकटांत फौज आहे! मृगही जवळ आला. छावणी होते. वैरणही नाहीं. फारच श्रमी लोक आहेत. मोठे मोठे लोक येऊन आह्मास ह्मणतात जे, तुह्मी, रास्ते, आनंदराव गोपाळ, बापू, नाना, वगैरे सरंजामी आहां. तुमच्या फौजांस पैसा कोठून येतो? आमची हुजरातीची

१ परशुरामभाऊंच्या. २ दादासाहेबांच्या, ३ यावरून सखारामबापू व नाना फडनवीस यांचीं पथकें गुजराथच्या स्वारींत हजर होतीं हें स्पष्ट होतें.

गत काय? असें असोन ' आह्मी आपली नालबंदी मागत नाहीं, रोजमरे मात्र पोटास द्यावे, पुढें तुमचें कल्याण होईल तेव्हां नालबंदीही द्याल, ' असेंही बोलत आहेत. एकाचित्त असल्यास दोन रोज मेहनत करून यश द्यावें असेंच या समयीं आहे. आपा बळवंत सखारामहरीचे नादीं लागून आहेत. त्यांस नगारखानेचीं वस्त्रें दिलीं. लोकांचे फितवे मनस्वी आहेत. श्रीमंताचें पुण्यें जें होणें तें होत आहे! कोणा- ×

नं. १८४२ **श्री.**

(१० मे.)

सेवेशीं शिवाजी बाबाजी कृतानेक साष्टांग नमस्कार. विनंती येथील कुशल तागाइत वैशाख वद्य सप्तमी भृगुवासरे पावेतों भिवडी येथें वर्तमान यथास्थित असे. विशेष. आह्मीं शिरोळाहून मिरजेस आलों. तेथून निघालों तेच दिवशीं येथें पावलों (?) उभयतांच्या भेटी जाहल्या. तिकडील सविस्तर सांगितलें. राजश्री पंताकडील प्रकार आपण बहुत प्रकारें आंगेज़ केली व पुढें कर्नाटक्रांत ते जाते तरी रुपये पोटास द्यावयासी मागें पुढें न पाहतों, परंतु त्यांनीं सर्व येकीकडे ठेवून मोठ्या मनसब्याकडे नदर न दिली. जाहल्या गोष्टी सविस्तर सांगितल्या. त्यास त्यांचा बोलण्यांतील अर्थ- " ये समई श्रीमंत रा० तीत्यांनीं फार केली. पंत अनुकूळ होऊन मोठा मनसबा करिते तरी मोठीच कामें होतीं. ये समयीं पत चांगली पडती. परंतु ती गोष्ट न जाहली. थोर आहेत! " या प्रमाणें उत्तर झालें. राजकी वर्तमान तरी ' इंग्रजाकडील बिघडलें ' ह्मणोन श्रीमंत राजश्री भाऊंनीं लिहिलें होतें व राजश्री सदाशिव रामचंद्र यांचें पत्र राजश्री कृष्णराव बळवंत यांसीं लिहिलें होतें त्याची

× पुढील पत्राचा भाग सांपडला नाहीं. १ पत्र पांडुरंगरावास. २ पांडुरंगरावानीं.

नक्कल आपणाकडे आलचि होती त्या अन्वयें पत्रें येथें आलीं होतीं. तें वर्तमान खरें होतें. याचें कारण काय! इंग्रजाकडील वकील कलकत्याहून आले त्यांचें बोलणें येथें पहिलें लागलें होतें तेव्हां येक वेळ बिघडलें होतें. निरोप देखील द्यावासा जाहला. ते समई वकिलांनीं पत्रें कलकत्यास पाठविलीं होतीं. ' तहाचें बोलणें नाहीं. हा पक्ष सोडून दादासाहेबांकडीलच धरावा लागेल. त्यास शेवट पावेतों बोलून पाहून मागाहून लिहून पाठवितों. ' अशीं पत्रें गेलीं व मुंबईवाल्यांनीं तसेंच लिहिलें कलकत्यास ते समईच जे, ' राजश्री दादासाहेबांचा पक्ष न सोडावा. तालुका फार देतात. यांत नफा फार आहे. ' त्यावरून बिघाडाचा डौल करून कलकत्याचीं पत्रें या वकिलांस व मुंबईवाल्यांस आलीं. बंदरा बंदरास बिघाडाचीं पत्रें आलीं. त्या संधींत श्रीमंत रा० दादासाहेब सुरतेस गेले. मधीं भानगड पडली होती तों पत्रें बिघाडाचीं ' दादांचाच पक्ष धरावा ' अशीं आलीं त्याजवरून सुरतेस कीठणानें तोफा खुशालीच्या करून संतोष मानून श्रीमंत राजश्री दादासाहेबांची खातर जमा करून पुढें उद्योग लढाईचा करावा असा सिध्धांत झाला. वकिलांची पत्रें पहिलीं गेलीं होतीं त्याजवरून असें जाहलें. मागाहून पत्रें ' सल्ला पक्का झाला ' अशीं गेलीं यादी बुदी येथील दस्तऐवज घेतले होते ते सारे कलकत्यास पाठविले. पहिल्या लिहिण्यास व सल्ला पक्का झाल्याचे लिहिण्यास एक महिन्याची तफावत झाली. पक्या सल्ल्याचीं पत्रें जातांच कलकत्यास मान्य होऊन यांस पत्रें ' सल्ला मान्य ' ह्मणून व मुंबईवाल्यांस पत्रें कीं, ' सल्ला झाल्याप्रमाणें वर्तणूक कंपेश न केल्यास पारिपत्य होईल. ' अशीं आलीं. मुंबईस मुख्य आहे त्यास पत्रें आलीं कीं तुमच्यांतील अतःपर लबाडी करून मनसबा ढांबवितील त्यांचे पारिपत्य चांगलें करणें अशीं पत्रें आलीं. तेव्हां

वकिलानीं पत्रें दाखवून सुरतेस पाठविलीं आणि करार केला कीं, " आठा दिवसांत पत्रें सुरतेस पावल्यावर फौजा दादासाहेबांकडील दूर होऊन सल्ला तुह्मी ह्मणतां त्या प्रमाणें जाहल्यास करितों. नाहीं तर तुमची फौज जवळच आहे. गांठ घालवितों. तुह्मी सुरत अठ्ठाविशी मध्यें कमाविसदार पाठवून अम्मल बसवावा. " या प्रमाणें बोलून पत्रें मुंबईवाल्यांस व सुरतवाल्यांस गेलीं. किटण वगैरे सुरतवाले याणीं राजश्री हरीपंतांस लिहिलें कीं, अतःपर लढा नाहीं, आठ दिवस वायदा आहे तों पावेतों झाल्यास उत्तम. नाहीं तर आह्मी तुह्मांस अनुकूल होतों. त्यांचें पारपत्य करूं. येणेंप्रमाणें पत्रें घेऊन त्यांजकडील मनुष्य येऊन राजश्री हरीपंततात्यास बोलून गेले. कालच पत्रें आलीं. पंधरा दिवसांत मनसबा आटोपून फौजा देशास येतात. या प्रमाणें उभयतांनीं सांगितलें. या प्रमाणें आपण ल्याहावें. ह्मणोन उभयतांनीं सांगितलें. कारण आह्मी श्रीमंत राजश्री भाऊच्या-पत्रांतील अर्थ सांगितले याजकरितां त्यांस जाहला मजकूर ल्याहावा ह्मणोन सांगितलें. कळावें. उभयतां[3] गृहस्थ * जाहल्यावर सर्वांवर धास्त बसून नरम होऊन पुणें सासवडकरांनीं सूत्र लावून निखालसता करून घेतल्या व यांच्या केल्या. ' अतःपर राजकारणाचे प्रकार आढळल्यास चित्तास येईल तें करूं ' या प्रमाणें कारभाऱ्यांचें बोलणें चालणें झालें. आणा शपथांत व बोलण्यांत कसर राहिली नाहीं. पोटांतील भाव ज्यांचे ते जाणत! प्रस्तुत जागा जागांचीं खुळें मोडलींसीं आहेत. कोळ्यांचा बंदोबस्त झाला. एक कोथळा किल्ला राहिला तो दोन चार दिवसांत येईल ह्मणोन

---

* येथें पत्र फाटलेलें असल्यामुळें मधील शब्द लागत नाहींत.
१ दादासाहेबांचें. २ कारभाऱ्यानीं. ३ विष्णु नरहर व खंडेराव निंबाजी. पुण्याचे मोरोबादादा व सासवडचे बजाबा पुरंदरे.

घिसाजी केशव यांचें पत्र आलें. सिंहगडची हकीगत तर राजश्री आनंदराव यांणीं इकडील हुजूरचे लोक किल्याखालीं घातले होते. जवाहीरपैकीं दागिने मागें त्यानीं आणविले होते ते समयीं त्यांनीं आणूं दिले नाहींत. त्या वेळेपासून यांणीं भ्रम राखोनच आईब दिसों दिल्हा नाहीं. मशारनिल्हेनीं आपल्या तैनातेचे वगैरे आट पडेसे मुद्दे घातले. याणीं बोलण्या चालण्यास लाविलें. त्यानीं यांजपासून यादी लिहून घेतल्या. किल्ल्यासाठीं कांहीं कामें करून घ्यावीं अशा विचारांत होते. तों हवलदाराकडे यांचें सूत्र होतें. त्यांनीं सांगून पाठविलें कीं, आह्मी सेवक सरकारचे. ते करितील तें निमित्त आह्मावर येईल. तर लोक हुजूरचे पाठवून किल्ला हवालीं करून घ्यावा आणि आह्मास हुजूर ठेवावें. त्याजवरून याणीं तीनशें माणूस व अंताजीपंत फणसे रवाना केले. किल्यावर हवालदार यांणीं घेतलें. आनंदराव यांजकडील मनुष्य बाहेर घातलें. पहिला हवालदाराचा हवाला करार करून किल्याचा बंदोबस्त करविला. मशारनिल्हेजवळ आड मुद्यांच्या यादी आहेत त्या घेऊन बसले आहेत! पत जाऊन कामही न झालें! या प्रकारचें वर्तमान आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना. हैदरखानाकडील सविस्तर सांगितलें. तुंगभद्र अलीकडे खासा आला तरी हे तरतूद करणें ती करितील तरी न कळे! आह्मी सांगावयास चुकलों नाहीं. यांचे मतें खासा अलीकडे येणार नाहीं असें ह्मणतात. तिकडील बातमी येईल तैसी आपण लिहितीलच. हे विज्ञापना.

नं. १८४३ श्री.

(१६ मे.)

पैवस्ती. छ० २२ रबिलावल. सन शीत सबैन. ज्येष्ठमास.

सेवेशीं शिवाजी बाबाजी कृतानेक साष्टांग नमस्कार. विनंती येथील कुशल तागायत छ० २७ रबिलावल गुरुवार वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपण छ० २३ रबिलावलचें पत्र पाठविलें तें काली संध्याकाळीं पावोन सविस्तर मजकूर कळला. हैदरखान याजकडील व शिरोळाकडील मजकूर लिहिला तो कळला. तुह्मी गेल्यापासून वर्तमान कळत नाहीं ह्मणोन लिहिलें, त्यास आह्मी आल्यानंतर कारभारी यांची भेटी झाल्यानंतर वर्तमान जाहलें ते सविस्तर लिहून राउता बरोबर पाठविलें आहे. तीं सर्व पत्रें पावलींच असतील. अलीकडील वर्तमान तरी हरीपंत तात्याकडील पत्रें एक दिवसा आड येत असतात. इंग्रजांचे सामान झाडून सुरतेस गेलें. छ० २९ रबिलावल पावेतों श्रीमंताजवळची फौज झाडून दूर करून श्रीमंतांचा तह करून द्यावा असें ठरलें. कदाचित् फौज दूर न जाहली तरी वाईदा होतांच श्रीमंतांसीं आह्मी गांठ घालावी. त्यास इंग्रजांनीं अनकूल न व्हावें. इकडे अनुकूल व्हावें. या प्रमाणें ठराव होऊन फौजेची भानगड लागली आहे. सखाराम हरी करार मदार ठरोन बोलून चालून मध्यस्त गेले. श्रीमंतांसुद्धां तह व्हावा असाच विचार आहे. किटण याणें फार खेळ केले. याजकरितां त्यास गर्ळी द्यावा ह्मणून विलायतेहून हुकूम आला आहे. त्यास मुंबईस नेला. हुकमाप्रमाणें पारिपत्य करितील. श्रीमंतांजवळ फौज सा हजार आहे. राजश्री हरीपंततात्यांस व त्यांस सा सात कोसांचें अंतर आहे. आतां पळून जाऊं लागल्यास आपल्या फौजा त्यांस पळों देत नाहींत. गायकवाड उभयतां इकडील लक्षांत आहेत त्या पक्षीं आतां श्रीमंतांचा सलूख होईलच. नच झाला तरी सा कोसाचे अंतर आपल्या फौजांस आहे त्या पक्षीं गांठ घालून लुटितील यांत संशय नाहीं. मनसबा आटोक्यांत आला आहे.

१ पत्र पांडुरंगरावांस.

श्रीमंताचें दैव थोर आहे. हा तर मनसबा शेवटास गेला. आतां लढा पडावयाचा दिसत नाहीं. हैदर याचा शह भारी दिसतो. येथून फौज व गाडदी शिरोळाच्या कामास पाठवितात हें व तें सामान एकत्र करून शिरोळच्या मोर्च्यां पुरतें सामान राखून सडी फौज करून पुढें वारीचे सुमारें जावें. ह्मणजे मोठ्या स्थळास लागला नाहीं तों ज्येष्ठमासीं फौजा देशास येतात हे सोई पडेल. हजार बाराशें गाडदी व दोन तीन हजार फौज पाठवावयाची तरतूद होत आहे. कोपळास दगा झाला ह्मणून येथें वर्तमान तोंडजबानीचें आलें होतें. आपल्या पत्रीं नाहीं तेव्हां तें लटकें वर्तमान दिसोन आलें. तिकडील बातमी वरचेवर यावी ह्मणोन कारभारी यानीं आपणास लिहावयास सांगितलें आहे. विष्णुपंत व खंडेराव यांचे पारिपत्य होतांच सर्वांस धास्त बसली. राजश्री बजाबा आदीकरून सर्वांचें लक्ष श्रीमंताच्या पायांसीं एकानिष्टपणें असावें, राऊत पाठवूं नयेत, असें ठरून आण शपथ झाली. भोजनास कितीएक आले होते. मेकारनामकाचें फार करून बोलण्यांत असें आहे कीं शिवनेरी किल्ला मागतात. कारभारी यांचे मतें जशी निखालसता सा महिने पाहूं. या उपरांत देणें तर देऊं असें ह्मणतात. त्या गुंत्यासाठीं श्रीमंत राजश्री नाना आमवास्या करून पुण्यास जाणार. होळकर गंगेवरी (आले) आहेत. शिंदे अद्यापि उज्जनीस आहेत. कोळ्यांचा झाडून बंदोबस्त झाला. हैदरखानाच्या पारिपत्यास बाजदबरसात आणावें असा ठराव झाला आहे. श्रुत होय हे विज्ञापना.

नं. १८४४ श्री. [२४ मे.]

सेवेसीं शिवाजी बाबाजी. कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती.

---

१ मोरोबादादाचें. २ पत्र पांडुरंगरावास.

येथील कुशल तागाईत ज्येष्ठ शुद्ध सप्तमी भृगुवासरे वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपण छ० २७ रबिलावलचीं पत्रें पाठविलीं तीं परवां संध्याकाळीं पावलीं सविस्तर मजकूर कळला. कोकणांतील तोतयाच्या प्रकरणाचा मजकूर विस्तारें मिरजेहून लिहिला आला तींच पत्रें आपण पाठविलीं तीं पावलीं. उभयतां कारभारी यांस दाखविलीं × राजश्री भाऊकडे रवाना करितों. तोतयानें फारच × काव्र केला याजकरितां शिरोळाकडे गाडदी व फौज पाठवावयासी तयार झाली होती तीच फौज व गाडदी कोकणांत रवाना एक दोन दिवसांत होणार. हैदरखान याजकडील मजकूर लिहिला तो कळला. बंकापुरास मोर्चे लाविल्याचें वर्तमान आलें तेव्हां तिकडील तालुका गेलाच. फौजा देशास आल्या-खेरीज पोक्त मनसबा होतां दिसत नाहीं. तिकडील फौजा लवकरच येतीलशा दिसतात. राजश्री हरिपंततात्यांकडील पत्रें आलीं. सखाराम हरी व फाकडे येऊन भेटले. सर्वत्रांचे बोलणें× चालून दोन दिवसांत घेऊन येतों ह्मणून गेले. त्या प्रमाणें येतील. श्रीमंत राजश्री दादासाहेब ध्यानावर आले तरी त्यांसीं बोलून ठीक करून पाहतों. बनल्यास उत्तम, नाहीं तरी सारी फौज पवार आदी करून येतों ह्मणून मशारनिल्हे करार करून गेले. इंग्रज झाडून गेले. श्रीमंत दादासाहेब सुरतेंत राहतील. केवळ इकडे यावे तरी त्यांस जिवाचें भय आहे. विश्वास पुरत नाहीं. फारकरून येतील तर न कळे. आतां फौजा लवकर देशास येतील. सर्वत्र उठून आल्याचें वृत्त आज उद्यां यावें. येतांच लिहून पाठवितों. श्रीमंत राजश्री नाना परवां पुण्यास गेले आहेत. पंधरा दिवसांत येतील. मागाहून सविस्तर लिहून पाठवितों. शिरोळचा फडशा लवकर उरकता तर फार उत्तम गोष्ट होती. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. १८४९ श्री.

(२४ मे.)

पैवस्ती छ० ९ रबिलाखर. सन शीत सबैन. ज्येष्ठ मास.

सेवेशीं शिवाजी बाबाजी. कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल तागायत छ० ५ रबिलाखर भृगुवासरे वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपण छ० ३० रबिलावलीचीं पत्रें पाठविलीं तीं छ० ४ रबिलाखरीं पावोन सविस्तर मजकूर कळला. राजश्री शिवराव घोरपडे यांजविषयीं लिहिलें त्याअन्वयें उभयतांस विनंती आह्मी आलों तेव्हांपासून करीत आहों. हल्लींचीं पत्रें राजश्री बापू यांस प्रविष्ट केलीं. राजश्री नाना पुण्यास गेले आहेत. पत्रें रवाना करितों. गाडदी व फौज तिकडे पाठवावयास तयार होत आहे ह्मणून पेशजी लिहिलें होतें. तोतयानें फार गडबड कोकणांत केली आहे. उपेक्षा करावी तरी दिवसें दिवस भारी होत चालला. याजकरितां गाडदी व सामान फौज तिकडे रवाना आज उद्यां करणार. शिरोळचा मजकूर लिहिला तो कळला. शिरोळास फार दिवस झाले. बंकापुरास हैदरखान यानें मोर्चे वैशाख वद्य ११ स बसविले ह्मणोन लिहिलें तें कारभारी यांसीं वर्तमान सांगितलें. या उपर कशी काय तरतूद करितील पहावी. राजश्री हरिपंततात्याकडे पत्रें रवाना झालीं आहेत. तिकडील मनसुबा आटोक्यांत आला. श्रीमंत राजश्री दादासाहेबांपासून इंग्रज झाडून सुरतेस गेले. श्रीमंत सुरतेपासून कोसावर आहेत. राजश्री सखारामहरी व फाकडे राजश्री हरिपंततात्यास येऊन भेटले. सर्वत्रांचा करार करून घेऊन येतों ह्मणून गेले. दोन दिवसांचा वायदा होता. झाडून फौज पवार आदिकरून लहान मोठे सारे सरदार येणार होते. [1] श्रीमंताचा तह

---

१ पत्र पांडुरंगरावास.

बनल्यास करून त्यास आणावयाचा विचार करितों. विश्वास पुरल्यास उत्तमच झालें. विश्वास न पुरे त्यापक्षीं चित्तास येईल तें करोत.' फौज झाडून दोन दिवसांत येणार होती. आली असेल. पत्रें येतांच सविस्तर लिहून पाठवितों. श्रीमंत सुरतेंत राहणार. आतां भडकल्यानें परिणाम नाहीं हें त्यास पुरतें समजलें. मागें पुढें तह करून घेणें तोही इंग्रजांचे विचारें करून घ्यावा असा विचार दिसतो. दुसरा प्रकार– इंग्रजांशीं बोलून चालून जलमार्गें हैदरखानाकडे प्रविष्ट करून घावें; असें ह्मणून तिकडे जावयाचें सूत्र आहे. नबाबास येण्याविशीं पत्रें वारंवार पाठवितात. परस्वाधीनचा प्रकार. घडेल तें खरें. आतां श्रीमंतांकडील तेढा तुटला. फौजा झाडून देशीं येणार, त्यापक्षीं हैदरखानाचे पारपत्याचें संकट नाहीं. स्थलें तों पर्यंत राहिल्यास सर्व गोष्टी ठीकच होतील. मागाहून सविस्तर लिहून पाठवितों. सेवेशीं श्रुत होय ही विज्ञापना.

नं. १८४६ श्री.

[२७ मे.]

पैवस्ती छ० १९ रबिलाखर. सुरु सन सबासबैन.

मय्या व अलुफ.

सेवेसीं शिवाजी बाबाजी. कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल तागायत ज्येष्ठ शुद्ध दशमी इंदुवासरे मुक्काम भिवडी वर्तमान यथास्थित असे. विशेष. राजश्री हरीपंततात्यांकडे राजश्री सखाराम हरी व मानाजी फाकडे येऊन भेटले. सर्वत्रांस घेवून येतों ह्मणून करार करून गेले होते. ते करारा प्रमाणें लहान मोठे सरदार फौज सुद्धां आणिले ते आपल्या फौजे नजीक येऊन भेटले. श्रीमंत राजश्री दादासाहेबांस

१ पत्र पांडुरंगरावास.

आणावयाविसीं सखाराम हरी यांणीं खटपट फार केली. परंतु त्यांस विश्वास न पुरून जिवास नाश होईल याजकरितां सात आठ हत्ती व कांहीं उंटें व शागीर्द पेशाचीं माणसें व शागीर्द व आबाजी महादेव, व तुळाजी पवार, खरकसिंग, व नूरखान गाडदी येणें प्रमाणें अजमासें घोडीं दोनसें व पाईचें माणूस ब्राह्मण मंडळी सात आठशें सुद्धां सुरतेंत रघुनाथपुरा ह्मणोन हिंदूच तेथें राहतात त्या पुऱ्यांत जाऊन राहिले आहेत. याज उपरी इंग्रजाचे विचारें भलता ठराव जाहला तरी होईल. गुजराथच्या वगैरे बंदोबस्तासाठीं चार हजार फौज तिकडे ठेऊन वरकड झाडून फौज देशास येणें, हैदरखान याणें तुंगभद्रे अलीकडे तालुक्यांत दंगा फार केला आहे याजकरितां सत्वर फौज सुद्धां येणें, ह्मणून राजश्री हरिपंत तात्यांस पत्रें येथून वरचेवर जातात. ज्येष्ठ अखेर देशास येतील. तिकडील उपराळ्यास त्या पैकीं पागा व कांहीं फौज पाठवावी अशा तजाविजींत आहेत. अतःपर श्रीमंतांकडील तूर्त वेध तुटलासा जाहला. राजश्री तुकोजी होळकर पारनेरा जवळ आले. पौर्णिमेच्या आंत बाहेर भेटी होणार. श्रीमंत राजश्री नाना पुण्यास गेले आहेत. पंधरा दिवस तेथें राहणार होते. होळकर आले याजकरितां चार पांच दिवसांत येतील. शिंदे उज्जनीहून यावयास निघाले आहेत. सारांश महिन्या पंधरा दिवसांत स्वस्थ व्हावें असेंच होतें. परंतु कर्नाटकचा वेध मोठा. शत्रूनें तमाम ठाणीं घेतलीं. किल्ले मात्र राहिले. तिकडील उपराळा जरूर झाला पाहिजे, या धावतींत कारभारी आहेत. तोतयाचा प्रकार मधींच उत्पन्न झाला. तिकडे हजार बाराशें गाडदी व फौज हजार येणेंप्रमाणें रवाना झाली. रा० हरीपंततात्या आल्यावरी तिकडे फौज कांहीं तरी पाठवावयाची तरतूद करूं ह्मणतात. तों पर्यंत ठाणीं फार वरून किल्ले लागतीलसीं दिसतात. तत्राप श्रीमंतांचें दैव विचित्र आहे.

यांत घडेल तें खरें. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. १८४७ श्री.

(३० मे.)

पैवस्ती छ० १७ रबिलाखर. सुहूर सन सीत सबैन-मय्या व अल्लफ.

सेवेसीं शिवाजी बाबाजी. कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाइत छ० ११ रबिलाखर मुक्काम पुणें वर्तमान यथास्थित असे. विशेष. राजश्री हरिपंततात्याकडील पत्रें येत गेलीं त्या अन्वयें वरचेवरी आपणाकडे लिहीत गेलों. गुजराथेंत फार करून अमल बसला. श्रीमंत राजश्री दादासाहेबांजवळ दोनशें माणूस पाईचे असावे, जास्ती नसावें, येणेंप्रमाणें ठराव असतां दोनशें पावेतों राऊत व सात आठशें शागीर्द पेशा शागीर्द व कांहीं हत्यारबंद येणेंप्रमाणें समागमें गेले. त्याजवरून इंग्रजांनीं सांगोन पाठविलें कीं, दोनशें माणूस ठेवून बाकीचें लावून देणें. नाहीं तर सुरतेंत राहण्याचें प्रयोजन नाहीं. त्याजवरून छान करून दोनशें माणूस ठेवून घेऊन वरकड लावून देणार. तें लावून दिलें ह्मणजे पांच हजार फौज तिकडे ठेवून राजश्री हरीपंततात्या सारी फौज घेऊन ज्येष्ट अखेर पुण्यास येणार. आतां तिकडील गुंता राहिला नाहीं. श्रीमंतांचा सलुख इंग्रजाच्या मार्फतीनें महिन्या पंधरा दिवसांत होईलसा दिसतो दरमहा ऐवज द्यावा, तो खाऊन त्यांनीं स्वस्थ असावें, येणे प्रमाणें होईलसें दिसतें. राजश्री सखाराम हरी यांणीं ठराव करून श्रीमंतांस इकडे आणावयाविशीं खटपट बहुतच केली. परंतु जिवाचें भय, विश्वास न पुरे, याजकरितां ती गोष्ट राहिली.

१ पत्र पांडुरंगरावास.

आतां इंग्रजाकडून बनाव जाहल्यास विश्वास पुरेल तर न कळे. फौजा ज्येष्ठ अखेर येतील. होळकर आज उद्यां भीमेवर येणार. भेटी चार दिवसांत होणार. श्रीमंत रा० नाना पुण्यास आले आहेत. पंधरा दिवस राहणार होते, परंतु होळकराचे भेटी करितां पुरंदरास जाणार. शिंदे उज्जनीहून निघोन सत्वरच येणार. आतां कर्नाटकाखेरीज मनसबा नाहीं. फौजा देशास येतात तों ठाणीं मोठ मोठीं राहिलीं तरी उपराळा करणार. परंतु नद्यांस पाणी आल्यावर फौजांचें कळतच आहे! तो तिकडील ठाणीं झाडून घेतो. शिरोळाकडील कसें वर्तमान आहे? सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. १८४८ श्री.

(३ जून.

श्रियांसह चिरंजीव राजश्री भाऊ यांसीं प्रती जानकीबाई.[1] आशीर्वाद उपरी. येथील क्षेम तागायत छ० १९ रबिलाखर. वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपण मिरजकर सांडणी स्वार याजबरोबर पत्र पाठविलें तें पावलें. लिहिला मजकूर सविस्तर कळों आला. आमचे शरीरीं समाधान आहे. चिंता न करावी. तुह्मी सत्वर यावयाचें करावें. वाटेचें नदी नाल्यांतून बहुत खबरदारीनें यावें. चिरंजीव मुलांस देवी येऊन उत्तम प्रकारें आरोग्य झालें. चिंता न करावी. रामचंद्रभट उत्तुरकर देवाज्ञा पावले. चिरंजीव बबास ईश्वरें वाईट केलें. होणारास यत्न काय? चिरंजीव दानी व बळवंतराव येथें आले होते. आह्मास भेटून गेले. बहुत काय लिहिणें लोभ करावा हें आशीर्वाद. कोकणांत भाऊसाहेब खरे जाहले. कारभारी होय नव्हे करितील यांत तुह्मी सहसा

१ परशुरामभाऊस त्याच्या आईचें पत्र.

न पडावें. सर्वांचे मतें खरेच जाहले. तेथें जवळ दादंभट व बापूभट आपटे व शेंडे हरभट्ट याचे सर्व (?) रघुनाथ दीक्षित मनोहर याणीं खरे केले. विजयदुर्ग व रत्नागिरी त्यांजकडे जाहली. बराबर दहा हजार पायदळ आहे. प्रस्तुत राजापुरीं आहेत. देवरुखास छावणी होणार. पत्र आपण वाचून पहावें. दुसऱ्यास न दाखवावें हे आशीर्वाद.

नं. १८४९ **श्री.**

[९ जून.]

पैवस्ती तारीख २३ रबीलाखर. सुरु सन सबासबैन मय्या व आल्लफ.

सेवेशीं शिवाजी बावाजी. कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल तागायत छ० १७ रबीलाखर बुधवासरे मुक्काम पुणें. वर्तमान यथास्थित असे. विशेष. श्रीमंत राजश्री दादासाहेबांकडील कारखाने देखील फारकरून आले. चाळीस पन्नास घोडीं, दहा पंधरा उंटें, दोन हत्ती, आडीच तीनशें खास जिलबीचे व खिजमतगार व शागीर्द व किरकोळ माणूस इतकें इंग्रजांनीं ठेऊन वरकड झाडून लावून दिलें. सलुखाचें राजकारण लावून बंदोबस्त करून घेणार. सारांश मोठी गोष्ट हरएक करणें राहिली. आतां दरमहा घेऊन कोठें स्वस्थपणें रहावें असा विचार होईल. डबईत ठाणें श्रीमंत राजश्री दादासाहेबांकडील होतें त्याशिवाय झाडून अंमल सरकारचा बसला. डबाईचें ठाणें घ्यावयाचें याजकरितां तिकडे कांहीं दिवस फौज असावी यास्तव दहा हजार फौजेनिशीं राजश्री बाजीपंत अण्णा याची व राजश्री फत्तेसिंग यांची

१ पत्र पांडुरंगरावास.

गांठ घालून देऊन तिकडे ठेविलें. आणि राजश्री हरिपंततात्या कूच करून सोनगडास आले. तेथून लांब लांब मजली करून येण्याविशी पत्रें मिकडीनें गेलीं आहेत. ज्येष्ठ अखेर पर्यंत येतील. पागा वगैरे निवड करून फौज कर्नाटकांत पाठवावी येणेंप्रमाणें मनसबा. दुसरा विचार येथें फौज आहे या पैकीं मिळोन तिकडे रवाना करणार. तोतयानें फार फैलाव करून विजयदुर्ग आदिकरून किल्ल्यांचा बंदोबस्त केला. शेणा मेणाचे होते ते लोखंडाचे जाहले असें पुरतें समजलें! आतां तरतूद करावयासीं लागले! राजश्री रामचंद्र नाईक यांच्या विश्वासावर गेल्याकरितां इतकें झालें. याजउपर बंदोबस्ताचे तरतुदेस लागले. हजार गाडदी व कांहीं फौज रवाना जाहली. मागाहून पुरावा करावा या विचारांत आहेत. आतां तोतया व हैदरखान यांचा बंदोबस्त करावयाची जरूर आहे. त्यांतच करवीरकरांचाही करावा असें आहे. शिरोळचे मोर्चे उठवावयाचे जाहले तरी इकडे वर्तमान कळवून करावयाचें होतें. बदलौकिक राहून कांहीं तऱ्हा काढून मोर्चे उठविले. असें करावयास येतें. एका एकींच उठविले. आतां मोर्चे उठविल्यासारखें पुढें बारी पावेतों गेल्यास तिकडे शह पडल्यास ही गोष्ट बरी. मोर्चे उठवून मध्येंच मुक्काम करून राहिल्यास मग मोठीच गोष्ट जाहली असें ह्मणतील. आतां राजश्री हरिपंताकडील फौज येण्याच्या लक्षावर सारा मनसबा आहे. ' मिरजेहून पटवर्धन मंडळीं पैकीं एक खासा तोतयाकडे गेला हें खरें कीं काय? ह्मणून श्रीमंत राजश्री नाना पुसत होते. आह्मी उत्तर केलें कीं " आह्मांस लिहिलें आलें नाहीं. लिहिलें आलें ह्मणजे विनंती करूं. श्रीमंत राजश्री भास्करपंत आपाचे पुत्र घरीं रिकामे आहेत त्यां पैकीं एखादा गेला असेल तर न कळे. पुरतें समजल्यावर विनंती करूं. " ह्मणोन सांगितलें. होळकर आज उद्यां जेजुरीस येणार.

श्रीमंत राजश्री नाना पुरंधरास भेटी करितां दोन तीन रोजांत जाणार. शिंदे इकडे यावयासीं निघाले. आतां लवकरच येतील. राजश्री गोविंदराव गाईकवाड अहमदाबादेकडे जाऊन पठाणाचे मोर्चे उठवून पठाणसुद्धां माघारे फिरोन खेडास आले. तें ठाणें घेऊन देणें, आठा दिवसांत बशर्त ठाणें द्यावें, गोविंदराव यांणीं पन्नास हजार रुपये द्यावे, येणें प्रमाणें करार होता. आठा दिवसांत ठाणें आलें नाहीं. रुपयांचा तगादा करून त्या निमित्यें करून गोविंदराव यांशीं दगा करावा येणें प्रमाणें जाहला मजकूर कळतांच राजश्री गोविंदराव चार पांचशें राऊतांनिशीं निघून गेले. फौज पठणानें लुटिली ह्मणोन गुजराथेकडून वर्तमान बातमीचें. मागाहून तहकीम येईल तें लिहून पाठवितों, ह्मणून राजश्री हरीपंततात्यांनीं लिहिलें आहे. फौज पठाणांनीं लुटली हें प्रमाण दिसतें. राजश्री नारो शंकर यांचे पुत्र श्रीमंताचे भेटीस आले आहेत. कोळ्याकडील फारकून बंदोबस्त झाला. दोन किल्ले त्यांचेकडे राहिले होते त्याचा ठराव होऊन कौल घेऊन गेले. तूर्त तोतया, दुसरा हैदरखान, यांचा वेध मोठा आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. १८९० श्री.

[७ जून.]

सेवेसीं शिवाजी बाबाजी. कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल तागायत ज्येष्ठ कृष्ण षष्ठी भृगुवासरे मु० पुणें. वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपण पत्रें पाठविलीं तीं पावोन सविस्तर मजकूर कळला. नरगुंदचें[1] बातमीचें पत्र लिहून श्रीमंत राजश्री भाऊसाहेबाकडे रवाना केलें. श्रीमंत राजश्री कोन्हेररावजी व राजश्री

१ पत्र पांडुरंगरावास.

रामचंद्र गणेश याणीं शिरोळचे मोर्चे उठवून एक मजल पुढें गेले याजकरितां किंवा सरकारच्या फौजा माघाऱ्या फिरल्या या बातमीवरून न कळे; मीररेजा पुढें आला होता तो बंकापुराकडे गेला ह्मणून लिहिलें तें कळलें. उभयतांचा विचार पुढें जावयाचा समजलाच आहे! परंतु एक भय दोन जागां असतें! इंग्रजांचा तह होऊन श्रीमंत राजश्री दादासाहेब निराश्रित तिकडे राहून फौजा इकडे आल्या. ही बातमी त्यास असेलच. बंकापुर घेतलें परंतु आतां मातबर स्थळास लागणार नाहीं असें दिसतें. तत्राप न कळे. श्रीमंत राजश्री भाऊसाहेब लांब लांब मजली करून तिकडे येऊन पोहोंचतात. रास्त्यांची फौज तिकडे जाण्याविषयीं पत्रें गेलीं आहेत. श्रीमंत राजश्री कोन्हेररावजी वगैरे तिकडे फौजा आहेत त्यांणीं फार लांब जाऊं नये. गोकाकेच्या आसपास राहिल्यानें कोणत्याही स्थलास मोर्चे लावावयासीं हैदरखान यास विचार पडेल. इतक्यांत आपल्या फौजा येतात याच अन्वयें रावजींस श्रीमंत राजश्री नानांनीं लिहिलें आहे. राजश्री रामचंद्रपंततात्यांचे व विनायकपंत फडणीस यांचे बनत नाहीं. ते असल्यानें आपण उठून येतों ह्मणून रामचंद्र गणेश यांचीं पत्रें आलीं. याजकरितां त्यांस नाना पत्र लिहीत नाहींत. विनायकपंतांस नानांनीं आणविलें. काटक दंगा करावयाच्या विचारांत आहेत ह्मणून लिहिलें, ऐशास तिकडून फौजा न येत्या तरी आपण लिहिल्या प्रमाणेंच होतें. फौजा आल्या, आतां होणार नाहीं. करवीरकरांनीं रोख तालुक्यांत केल्याचा प्रकार लिहिला त्यास शिरोळचे मोर्चे उठले, हैदरखान यानें तिकडून दाटी केली, असें असतां करवीरकरानीं हांवभरी कां न व्हावें! हांवभरी व्हावयाजोगेंच झालें, परंतु फौजा तिकडून आल्या अशी बातमी कळल्यानंतर हांवभरी होणार

१ हैदरास. २ परशुरामभाऊ. ३ कोन्हेररावास.

नाहींत. कोकणांतील खूळ भारी झालें. पर्जन्यकाळीं फौजेचा उपाय नाहीं याजकरितां चार दिवस लांबेलसें दिसतें. राजश्री हरबाअण्णा गेले ही बातमी श्रीमंत राजश्री नानांस कळल्यावरी फारच आश्चर्य करीत होते. आह्मीं पूर्वोत्तर वृत्तांत सांगितला. कळावें. राजश्री नाना फडणीस यांचे खातीस फार समाधान नाहीं. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. १८९१ (९ जून.)

शिवाजी बाबाजीचें पत्र जेष्ट वद्य ८ भानुवासरचें
पै॥ २७ रबिलाखर.–

" राजश्री हरीपंततात्या खानदेशांत आल्याचें पूर्वीं लिहिलेंच आहे. श्रीमंत राजश्री भाऊसाहेब फौजेस निरोप न देतां पुरंधरास न येतां लांब लांब मजली करून मिरजेकडे जातात. तिकडील बंदोबस्त जाहल्यावर पुरंधरास येतील. नगर उजवें टाकून तिकडे येतील. रास्त्यांची फौज तोफखान्यासह पुढें आली त्यांस पत्रें येथून गेलीं आहेत कीं, फौजेस निरोप न देतां परशुरामभाऊंस जाऊन सामील होणें. हैदरखान यानें बंकापुर तर घेतलेंच. आतां धारवाड व कोपळ या जाग्यास बसावें तर फौजा देशीं आल्या, दादासाहेब निराश्रित होऊन सुरतेंत राहिले, या मुळें मोठ्या स्थलास गुंतणार नाहीं असे मनसब्याच्या रीतीनें दिसतें. श्रीमंत राजश्री दादासाहेबांबरोबर करारापेक्षां जाजती माणूस गेलें होतें त्यास दोनशें कराराप्रमाणें ठेऊन घेऊन जाजती होतें तें इंग्रजानीं सुरतेंतून लावून दिलें. दोनशें माणसांचा शिधा इंग्रेज देत असतात. कलकत्त्याहून वकील आले आहेत त्यांजकडून तहरह करून कांहीं पोक्त बेजमी करून

घेऊन गंगातीरास[1] येऊन रहावें अशा विचारांत आहेत. तोही विचार होणें अथवा कर्तव्य तें कारभारी यांस पुसल्याखेरीज वकिलाच्यानें होत नाहीं. बोलून चालून होणें तें दिवसगतीनें होईल. तोतयानें रत्नागिरी पलीकडे कोट किल्ल्यांचा बंदोबस्त करून अलीकडे यावयास आला. येथून सामान घांट उतरून जात आहे. अंजनवेली व गोंवळकोट यांच्या आसपास गांठ पडेलसी दिसते. पहिल्यानें अनास्था केली म्हणून बंड बळावले. "

नं. १८९२ श्री.

[१४ जून]

शिवाजी बाबाजीचें पत्र जेष्ट कृष्ण १३ भृगुवासर
मुक्काम पुणेंचें—

" कोंकणचें बंड भारी जालें. विजेदुर्ग आदिकरून घेऊन तिकडील बंदोबस्त करून चिपळोणाकडे सामान आलें. गोंवळकोट घेतला, असें ही वर्तमान आहे. गाडदी व फौज गेलीं ती पर्जन्याकारितां घांटावर राहिलें होते. पर्जन्य उघडला. आतां खालीं कूच करून गेले. बंड फारच बळावलें. देशास फौजा आल्या ही आवाई आहे. कित्येकांस तोतया असें समजूं लागलें अशीं वर्तमानें येतात. तसाच विचार असल्यास मास पक्षांत गुज मोडेलसी दिसत्ये. होळकर अद्यापि वाफगांवींच आहेत. आडमुद्दे यांची यादी मनस्वी लिहून दिली आहे. याणीं उत्तर केलें कीं श्रीमंतांजवळ राहिलें काय हें चित्तांत आणून मग बोलावें. शिंदे येणार ते आडमुद्दे काय घालतात तें पहावें. सारांश श्रीमंतांचें पुण्य विचित्र आहे येणेंकरूनच बंदोबस्त होणें तो होईल.

१ गोदातीरास.

एरवीं बारीक दृष्टीनें पहातां कोठेंच ताळ राहिला नाहीं. व सरकारचा दाब, व आह्मीं ह्मणतों काय, आह्मीं केलें काय, मागतों काय, ही लोकलज्जा ही वाटत नाहीं! असे आड घालतात! "

नं. १८९३ श्री.

(२३ जून.)

पैवस्ती छ० १२ जमादिलावल. सन शीत सबैन. आषाढमास.

सेवेसीं शिवाजी बाबाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ० ६ जमादिलावल रविवासरे मुक्काम भिवंडी वर्तमान यथास्थित असे. विशेष. राजश्री हरीपंततात्या शुद्ध द्वितीयेस किल्ल्याखालीं आले. श्रीमंत राजश्री नाना तृतीयेस प्रातःकाळींच नारायणाजवळ आले. किल्ल्याखालीं श्रीमंताचे डेरे दिले. श्रीमंत खासा व मातोश्री व राजश्री सखारामपंत तृतीया बुधवारीं दोनप्रहरीं किल्ल्याखालीं आले. डेऱ्यांत सरकारच्या भेटी झाल्या. श्रीमंतांनी लहान मोठयांस आपल्या हातीं विडे दिले. मुजरा सर्वत्रांचा घेतला. ब्राह्मण मंडळीस 'नमस्कार करावा' ह्मटलें ह्मणजे नमस्कार करावा. एक प्रहर पावेतों मोठी दाटी झाली. सर्वत्रांस पहावें अशी आस्था. याजकरितां पंढरपुराप्रमाणें दाटी असतां मधें उठावें अथवा मातोश्रीकडे जावें हें नाहीं. एक आसनीं प्रहर पावेतों बसले होते. अवतारी होत! अंतर्ज्ञान! राजश्री मानाजी शिंदे आदिकरून लहान मोठयांच्या भेटी झाल्या. मोठाच समारंभ झाला. राजश्री सदाशिव रामचंद्र व सखाराम हरी या उभयतांच्या भेटी झाल्या. अशा दाटींत त्यांच्या भेटी ठीक नाहीं हें चित्तांत आणून समजोन राहाविलें. उभयतांची भेट एक दिवस स्वतंत्रपणें करूं ह्मणोन

१ पत्र पांडुरंगरावास.

राजश्री हरीपंततात्यांस सांगितलें तें त्यांनीं त्यांस सांगितलें. उभयतांस फार वाईट वाटलें जे, लष्करा समागमें आपण आलों असतां समारंभाचे वेळीं निवड झाली ह्मणोन श्रमी फार झाले. मानाजी शिंदे पुण्याचे मोठ्या मनसब्याचे वेळेस नव्हते. पुढें नलदुर्गावर चाकरीस राहिले. त्यांनीं एकनिष्टपणें चाकरी केली. ' पुढें चाकरी करणें तेथें एकनिष्ट करूं, अंतर होणार नाहीं, ' ह्मणोन बोलले. ते श्रीमंत राजश्री दादासाहेबांचे जवळ चाकरीच्या नात्यानें फक्त होते. तेव्हां भेटीच्या समयीं त्यास आणविलें उभयतां पुण्याचे मनसब्यास अग्रगण्य याकरितां निराळे टाकिले. भेटी झाल्यास चार दिवस झाले. लोकास निरोप देतात. कारकून व खासे खासे एक दुसरा ठेवितात. नालबंदीच्या ऐवजाची तरतूद झाली पाहिजे याजकरितां विचार पाहतात. राजश्री मुधोजी भोंसले यांणीं श्रीमंतास हत्ती व वस्त्रें जवाहिर व घोडा तुर्की सामान चांगलें कडा पट्टा सांखळी सोन्याची येणेंप्रमाणें श्रीमंत खालीं भेटीच्या समयीं आले त्याचवेळेस नजर केली. राजश्री मुधोजी भोंसले या लक्षीं पुरतेपणीं आहेत. राजश्री फत्तेसिंग गाईकवाड यालक्षीं आहेतच. राजश्री गोविंदराव गाईकवाड यांजकडील कारकून आले आहेत त्यांजकडील निखालसता होईल. राजश्री तुकोजी होळकर वाफगांवींच आहेत. आडमुद्दे त्यांचे फार आहेत. राजश्री सखारामपंतांनीं कवाईत धरली आहे जे, " राज्याचा विचार या प्रकारचा झाला आहे. साऱ्यांनीं श्रीमंतांकडे पाहून निखालसपणें यांच्या पायाशीं वर्तावें. श्रीमंतांनीं कोणासही उणें केलें नाहीं. श्रीमंतांनीं आपले बरोबरीस आणलेले सरदार आहां. तुह्मीच बंदोबस्त करावा. आहे नाहीं पाहून करणें तें करावें. आपणास इच्छा कारभाराची नाहीं. समजोन ह्मणेल त्यास समजोन उत्तर करूं. न समजोन ह्मणेल त्यास उत्तर तसें केल्य

परिणाम नाहीं. " असें ह्मणतात. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. १८९४ श्री.

(२६ जून.)

आश्रित रामचंद्रभट वाटवे. अनेक आशीर्वाद उपरी येथील क्षेम तागायत आषाढ शुद्ध दशमी मुक्काम गणेशवाडीमध्यें क्षेम असों. विशेष. राजश्री भाऊ व राजश्री रघुनाथराव शुक्रवारीं रात्रीं दोन घटिकास किल्ला दाखल झाले. आह्मी शनवारीं गणेशवाडीहून दोन प्रहरां मिरजेस गेलों. तेथें सर्वांची भेटा जाहली. रविवारीं प्रातःकाळीं किल्ल्यांत जाऊन राजश्री भाऊसन्निध गेलों. माळीवर राजश्री भाऊ व तात्या असे बसोन बोलत होते त्यांतील विशेष प्रकरण तोतयाचेंच होतें. तूर्तबाहेर निघावयाचा मजकूर स्वप्नांतही नाहीं. पुरंदराहून पत्र आलेनंतर सरदारांनीं तेथें जावें हें मनास आहे. तूर्त लोकांस निरोप दिला. पागेच्या सामानाच्या दागदुजीची मात्र तरतूद आहे. रविवारीं भोजन करून राजश्री भाऊ तासगांवास गेले.... .... मिरजेमध्यें चोंहोंकडून बातम्या येत आहेत. लोकांचें देणें घेणें मागील मनास आणून फडशा करितात..... मिरजेचे निसबतीचे कारकून कोंकणांत आहेत त्यांचीं घरें तोतया लुटतो. या प्रकारें महार्णव मांडिलें आहे. कोण थरास जातें पहावें. तोतयाचे पक्षास असतील त्यांचें मिरजेमध्यें वांकडें येणारसा रंग दिसतो. घडेल तें निदर्शनास येईल.... पुरंधराहून राजश्री तात्यास पत्र आलें आहे जे, 'तुह्मीं सत्वर डेरे दाखल होणें.' परंतु येथें किमपि तरतूद नाहीं. राजश्री हरीपंततात्या गंगेवरून पुरंदरचे मार्गास गेले. ंढरपुराकडे आले. भीमेस पाणी फार होतें. कोणकोणाचीं उंटें

[१] ... त्र कोन्हेररावास. २ परशुरामभाऊ. ३ पांडुरंगराव. ४ गोदावरीवरून.

गाडदी व कांहीं फौज पाठविली आहे. त्यास प्रतापगडापलीकडे घांट चढून दोन हजार माणूस आलें होतें त्यांची व गाडद्यांची लढाई झाली. पंचवीस पावेतों माणूस त्यांजकडील ठार व चाळीस पन्नास जखमी झालें. घाटगा त्यांत होता त्यास जखमा लागल्या. ते पळोन गेले. गाडदी घांटाखालीं उतरले. गोवळकोट तोतयानें घेतला. अंजनवेलीच्या आसपास गाडदी राहून तेथेंच बळ पाडितात. अंजनवेली व सुवर्णदुर्गास चिंता नाहीं. आतां बळ अंजनवेलीस पाडून तोतयाचें पारिपत्य करावें असा विचार आहे. राजश्री रामचंद्र नाईक यांनीं नवी मसलत निर्माण केली! राजश्री हरबाअण्णा तिकडे गेले आहेत. मिरजेहून फरसावा वगैरे सामान वरचेवरी जात आहे ह्मणोन बातमी वरचेवरी येते! आह्मांदेखत पत्रें कारभारी वाचून पाहतात. आह्मी अगोदर मजकूर सांगावयाचा तो सांगितला परंतु जन त्रिविध! ' पटवर्धन देखील त्याजकडे गेले ' असें लोक बोलतात. घरांतील बारीक अर्थ कोण समजतो? आपणास इकडे न येतां कर्नाटकची मसलत व करवीरची करावी या अन्वयें सरकारचें पत्र गेलें आहे. आपली व श्रीमंत राजश्री तात्यांची मर्जी कशी ते आज्ञा करावी. त्या प्रमाणें विनंती करूं. कर्नाटकचा मनसबा आपण करावा. आपणाकडे फौज पारिपत्य हैदरखानाचें होय असी तरतूद करून पाठवावी येणें प्रमाणें यांच्या चित्तांत आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

श

ंढर

ित्र